. सं. ठाणे

# मराठी नाटकें माझा छंद



REFBK-0012353

वा. श्री. पुरोहित

# मराठी नाटकें ....

# माझा छंद —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..३४२७१..... वि: ..निबंध.....
क्रमांक ....१३२८....... नों: दि: ..३०।१२।६२

वामन श्रीधर पुरोहित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १२३४५
(स्थळ प्रत)

— अकमेव विक्रेते —
युनिव्हर्सल बुक एजन्सी.
कल्याण-मुंबई.

लोकहितवादी मंडळ, नाशिक-प्रकाशन

REFBK-0012353

किंमत
दहा रुपये

ऑगस्ट १९६२

(C)

सर्व हक्क लेखकाच्या
स्वाधीन

मुखपृष्ठ
सजावट

पंडित सोनवणी

प्रकाशक

डॉ. बा. वा. दातार

सरचिटणीस

लोकहितवादी मंडळ
(पेठे विद्यालय)
नासिक

मुद्रक

अ. द. पोतनीस

गांवकरी प्रिंटिंग प्रेस

७९७, आग्रारोड
नासिक

# ऋण-निर्देश

"वामन, हें तूं कुठें शिकलास ?" चाळीस वर्षांपूर्वी माझ्या मावशीनें–डॉक्टर भालेराव ह्यांच्या मातोश्रींनीं–विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर "मराठी नाटकें : माझा छंद" ह्या चौसष्ट–प्रकरणी आत्मनिवेदनांतून मी देण्याचा प्रयत्न करीत आहे. मावशी, तूं दिलेलें पहिलें प्रोत्साहन आणि नानवा गोखले ह्या नटाच्या दिव्य वाणीनें मनावर केलेला परिणाम ह्यांतूनच आजचा 'वामन' तयार झाला आहे.

'महाराष्ट्र–नाट्य–मंदिर' ह्या संस्थेच्या माझ्या संचालक स्नेह्यांचें ऋण निर्दिष्ट करणें एवढेंच मला शक्य आहे. मित्रवर्य सर्वश्री. बाळासाहेब कानिटकर, बाळासाहेब काळे, शंकरराव निफाडकर, पांडोबा कुलकर्णी, बाबूराव खारकर, बापूसाहेब लोथे, प्रल्हाद औरंगाबादकर, प्रभाकर महाबळ, वामनराव खरे, बाबूराव प्रभुणे वसंतराव रहाळकर, काका रहाळकर, प्रा. जोगळेकर आदि सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. संस्था नामशेष झाली परंतु तिनें कार्यकर्त्यांची एक पिढी तयार केली. इतिहासजमा झालेल्या त्या संस्थेचा मला अभिमान वाटतो व पुढेंहि वाटत राहील.

अशा प्रकारचें पुस्तक मी लिहावें ही प्रेरणा सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. भाऊसाहेब माडखोलकर ह्यांनीं दिली. ती प्रेरणा प्रबळ झाली ह्याला कारण श्री. ना. धों. ताम्हणकर आणि मित्रवर्य कवि गिरीश. पहिलीं ८०–९० पानें मी त्यांना वाचून दाखविलीं व त्यांनीं मला कल्पनातीत प्रोत्साहन दिलें. हें पुस्तक प्रकाशित होत असतांना श्री. ताम्हणकर हयात नाहींत ही मनाची खंत आहे. गुरुवर्य प्रा. श्री. आंबेकर, गुरुवर्य श्री. केशवराव दाते मित्रवर्य श्री. शिवराम गोविंद भावे व श्री. श्रीधरपंत देशपांडे ह्यांनीं अनेक उपयुक्त सूचना केल्या. सावंतवाडीचे माझे स्नेही

श्री. मेघश्याम शिरोडकर ह्यांनीं सगळें हस्तलिखित वाचून काढलें व पाठीवरून स्नेहाचा हात फिरवला.

येथील 'गांवकरी'चे संपादक श्री. दादासाहेब पोतनीस ह्यांनीं मुद्रणाच्या दृष्टीनें मला सवलती दिल्या. मुद्रण चालू असतां मुद्रणव्यवस्था पाहणारे श्री. प्रभाकर धर्माधिकारी ह्यांचा नवा लोभ जडला. त्यांचें सौजन्य वर्णन न करण्यांतच त्याची मातबरी आहे. मुखपृष्ठ व आंतील चित्रें ह्यांची जबाबदारी स्वीकारली श्री. पंडितराव सोनवणी ह्या तरुण कलावंतानें. त्यांच्या कुंचल्याइतकेंच त्यांचें मन कलापूर्ण आहे.

स्त्री-भूमिका आणि पुरुष-भूमिका करणाऱ्या नटांचीं छायाचित्रें मिळवणें हा एक अवघड प्रयोग झाला. ह्या बाबतींत नासिकचें सार्वजनिक वाचनालय व चाळीसगांवचें आनंदीबाई वंकट वाचनालय ह्यांनीं तीं तीं पुस्तकें देऊन अडचण दूर केली. श्री. बापूसाहेब सायगांवकर ह्यांनीं नटवर्य रघुवीर सावकार ह्यांचें दोन वेषांतील चित्र दिलें. माझे स्नेही श्रेष्ठ चित्रकार श्री. वासुदेवराव कुलकर्णी ह्यांनीं 'दुखांबी' ह्या जुन्या नाट्यवास्तूचें छायाचित्र काढून दिलें. पुरुषोत्तम इंग्लिशस्कूलमधील दोघे चित्रकला-शिक्षक श्री. मोगल व श्री. भानुवंशे ह्यांनीं कांहीं छायाचित्रें उपलब्ध करून दिलीं.

लोकहितवादी मंडळानें आपलें प्रकाशन म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास संमति दिली.

वर उल्लेखिलेल्या सर्व व्यक्ति व संस्था ह्यांचा मी अतिशय ऋणी आहे.

व्यवसायी नटांनीं मराठी भाषेंत आपलीं चरित्रें प्रकाशित केलीं आहेत. एका हौशी नटाचें हें चरित्र लिहितांना त्या श्रेष्ठींचें अनुकरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. कांहीं अपूर्व, अचाट ह्यांत आहे असा अभिनिवेश नाहीं; त्याचप्रमाणें हें सर्व व्यर्थ आहे असेंहि लाचारपणें म्हणण्याचें कारण नाहीं.

मराठी रंगभूमि आणि तिचे मातबर नट ह्यांचा जयजयकार करून हें ऋण-निर्देशन पुरें करतों.

दि. २२-८-१९६२ **वा. श्री. पुरोहित**

जन्माष्टमी : नाट्याचार्य खाडीलकर पुण्यतिथि.

# प्रकाशकाचे दोन शब्द

"**म**राठी नाटकें ... माझा छंद" हा श्री. वामनराव पुरोहित ह्यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेला ग्रंथ नाटयाचार्य श्री. कृष्णाजीपंत खाडील-कर ह्यांच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर लोकहितवादी मंडळातर्फे आज प्रकाशित होत आहे. मंडळाचें हें पहिलेंच प्रकाशन आहे. श्री. वामनराव पुरोहित लोकहितवादी मंडळाच्या संस्थापकांपैकीं आहेत. त्यांनीं नाटय–क्षेत्रांत केलेली कामगिरी आणि नाटयकलेची सेवा महाराष्ट्राच्या चांगल्याच परिचयाची आहे. आपला शिक्षकाचा पेशा सांभाळून त्यांनीं ही रंग-भूमीची सेवा केलेली आहे ही गोष्ट अधिकच कौतुकास्पद म्हटली पाहिजे.

आज नाटय, नाटक आणि रंगभूमि यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कितीतरी बदलला आहे. पण ज्या काळांत श्री. पुरोहित ह्यांनीं हा प्रपंच केला त्या काळांतली परिस्थिति भिन्न होती. एका शिक्षकानें 'नाटकाचा नादी' होणें एका दृष्टीनें धोक्याचेंच होतें. तथापि रंगभूमीच्या सेवेची ओढ दुर्दम्य ठरली व श्री. वामनराव पुरोहितांनीं शिक्षकाचा पेशा सांभाळून नाटकाचा आपला छंद अव्याहतपणानें चालू ठेवला.

रंगभूमीच्या पडत्या काळांत श्री. वामनरावांसारखे निष्ठावंत सेवक रंगभूमीला मिळाले म्हणूनच आजच्या स्वरूपांत ती सध्यां टिकून आहे, इतकेंच नव्हें तर आतां या कलेला शिष्टमान्यता मिळाली आहे. त्यांचें नाटयविषयक 'आत्मनिवेदन' पुस्तकरूपानें सादर करतांना मंडळाला फार आनंद वाटतो. नाटयरसिक या आत्मनिवेदनांतील 'आत्मानंदा'चा मनसोक्त आस्वाद घेतील अशी खात्री वाटते.

**अध्यक्ष,**

लोकहितवादी मंडळ, नासिक.

# अनुक्रमणिका ::


१ श्रीगणेशा
२ गणपतराव जोशी
३ गणपतराव भागवत
४ यशवंतराव टिपणीस
५ आवाजाची तयारी
६ लोकमान्य गेले
७ भालेराव–राव–मी
८ माझें पहिलें व्याख्यान
९ केशवराव दाते
१० राक्षसी महत्त्वाकांक्षा
११ कायद्याचा अभ्यास
१२ नासिकचें नाट्य–संमेलन
१३ शालेय रंगभूमीवरील एक क्रांति
१४ आमचा पहिला नाट्य–प्रयोग
१५ महाराष्ट्र नाट्य मंदिर
१६ बालगंधर्व
१७ चिंतामणराव कोल्हटकर
१८ कान्होपात्रा आणि श्रमसाफल्य
१९ रघुवीर सावकार
२० आठवणीचे खंदक
२१ नाट्यमन्वंतर लिमिटेड
२२ मी भजीं खातों !
२३ अंधारांतून प्रकाशाकडे
२४ महर्षि कर्वे
२५ मराठी वक्ते आणि नाट्य
२६ एक स्वाधीन उपक्रम
२७ गणपतराव बोडस
२८ देवलांचें हरीपूर
२९ "महाराष्ट्र नाट्य विद्यालय"
३० नाट्यदिग्दर्शन : कांहीं अनुभव
३१ गत नाटककार–स्मृतिदिन
३२ गणेशोत्सवांतील कार्यक्रम
३३ प्रेक्षक–संघटना
३४ नाट्य–संमेलनाला निमंत्रण
३५ शं. प. जोशी, भाटेबुवा, पाटणकर, बन्नु
३६ रणक्षेत्र !
३७ अब्रुनुकसानीची फिर्याद
३८ 'अभिजन–मंडळ' : प्रचार व प्रवास
३९ कलावंताच्या व्यथा
४० मुंबईचें नाट्य–संमेलन
४१ बेचाळीसचें गाजलेलें साहित्य–संमेलन
४२ श्री क्षेत्र पडघवली
४३ महोत्सव चक्राचे उलटसुलट फेरे

४४ महोत्सवाचें इतिवृत्त
४५ शतसांवत्सरिक महोत्सव–नासिक
४६ शतसांवत्सरिक महोत्सव–हैद्राबाद
४७ सोलापूर–पंढरपूर–पुणें
४८ पांच नोव्हेंबर आणि नंतर !
४९ "गडकऱ्यांचा राजयक्ष्मा"
५० खाडीलकरांचा वीररस
५१ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर
५२ दातारांचा नाट्यछंद
५३ त्रिकेंद्र योजना नि माझी एम्. ए. साधना.
५४ नाटकावर प्रवचनें
५५ लोकहितवादी मंडळ : स्थापना नि संयोजन
५६ रामायण–प्रवचनें आणि "नव्या वाटा"
५७ नटाचा योगाभ्यास
५८ डॉ. भालेराव अमर होतात !
५९ नांदगांवीं दोन वर्षें
६० पहिलें वहिलें शालेय नाट्य–शिबीर
६१ खुलें नाट्यगृह
६२ "सोन्याचा कळस" : चार प्रयोग
६३ केशवराव दाते, पृथ्वीराज कपूर आणि केरळ नाट्यसंस्था
६४ दुसरें शालेय नाट्य–शिबीर

## : शुद्धिपत्र :

| पान | चुकीचा शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|
| ३५ | खप | खूप |
| ८५ | पधरावा | सोळावा |
| १६८ | बत्तीसावा | चौतीसावा |
| १९३ | "मालवणचा" | "मालणचा" |
| २०४ | बेचाळीसावें | बेचाळीसचें |

क्रमांक ....२२२४.... नों दि. ३०।१।६५



डॉ. श्री. अमृत नारायण भालेराव....

मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक नी संवर्धक,
मराठी भाषा आणि मराठी नाटकें ह्यांचे निरपेक्ष सेवक,
'अरविंद' मासिकाचे उत्साही संपादक,
मुंबईस प्रतिवर्षी भरणाऱ्या मराठी नाट्यमहोत्सवांचे समर्थ संचालक,
रंगभूमीवरील व्यवसायी नटांचे एकमेव परिचारक,
लोकमान्य टिळकांचे एकनिष्ठ उपासक,
कणखर विचार आणि आचार, ऋजुता, मनाचें औदार्य, जबरदस्त
कष्ट, निरलस ध्येयनिष्ठा, स्नेहशीलता इत्यादि दुर्लभ गुणांचे आविष्कारक,
आपला एक नम्र अनुयायी आपल्या दिव्य स्मृतीस
हें पुस्तक अर्पण करीत आहे.

**— वामन**

दि. २२-८-१९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ....................
क्रमांक ........................ नों दिः ............
९२३४७

## लेखांक पहिला

# श्री गणेशा

शतायु झालेल्या मराठी रंगभूमीच्या इतिहासाचीं साधनें महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरहि विखुरलेलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं साधनें केवळ व्यक्तिस्वरूपांत आहेत. त्या त्या व्यक्ति नाहींशा झाल्या कीं तीं साधनें कालवश होणार. ही कटु जाणीव ठेवून मराठी रंगभूमीचा अभि–मान बाळगणारांनीं आपापले अनुभव आणि माहिती विनाविलंब शब्दांकित करणें अत्यावश्यक आहे. भाषेच्या कलाकुसरीपेक्षां ग्रथित केलेला अनुभव हीच अधिक महत्वाची गोष्ट आहे.

आयुष्याचीं गेलीं ४५ वर्षें मराठी नाटकें व त्यांचे मातबर प्रयोग यांच्या धुंदींत मी घालविलीं. त्या अर्धशतकाचें सिंहावलोकन करतांना किती–तरी आठवणींनीं मन भरून जातें आणि उत्कटतेनें वाटतें कीं हें मनांत सांठ-लेले शक्य तितकें शब्दांत उतरवावें. मायभाषेसंबंधीचें हें एक अपरिहार्य कर्तव्य आहे ह्या जाणीवेनें मी ही "प्रदक्षिणा" घालीत आहे.

वयाच्या दहाव्या वर्षीं 'ज्ञानेश्वर' ह्या नाटकाचा प्रयोग मी नाशि–कच्या ब्रह्मानंद थिएटरमध्यें पाहिला. त्याच वास्तूवर आजचें 'मधुकर' सिनेमा ह्या नांवाचें बोलपट-गृह उभें आहे. ज्ञानेश्वरांनीं चालविलेली भिंत आणि वाघावर स्वार होऊन आलेले योगीराज चांगदेव हे दोन देखावे आठ-वतात. 'नाटक पाहिलें' यापेक्षां अधिक संवेदना नाट्यप्रयोगानें माझ्या मनांत निर्माण केली नाहीं. माझ्या मनाचा अचूक वेध घेतला तो

" तोतयाचें बंड " ह्या नाट्यप्रयोगानें आणि त्यांतल्या त्यांत नाना फडणिसांची भूमिका करणाऱ्या नटश्रेष्ठ नानबा गोखले ह्यांच्या झारदार लवचिक आवाजानें. पार्वतीबाई आणि नाना फडणीस ह्यांचा तिसऱ्या अंकांतील तो प्रदीर्घ प्रवेश करतांना दोघेहि नट अभिनयकौशल्यानें करुणरसाचें असें कांहीं विलक्षण छत निर्माण करीत कीं त्याचें वर्णन शब्दांत करतां येणें शक्य नाहीं. रघुनाथराव गोखले पार्वतीबाईच्या भूमिकेंत राजघराण्यांतील विरहाकुल कुलीन पतिव्रतेचें असें कांहीं पवित्र दर्शन घडवीत कीं प्रेक्षक आभास विसरून नाटक हेंच सत्य मानीत. विशेषतः नाना फडणिसांचें तें प्रदीर्घ भाषण " शिव शिव, बाईसाहेब " ह्या उद्गारांनीं सुरू होऊन पानिपतावर सदाशिवरावभाऊंचा अखेरचा निरोप " नाना, मी चाललों. आता तूंच सांभाळ " येथपर्यंतचा भाग नानबा गोखले ज्या गद्गद स्वरांत म्हणत तसा स्वर मी फक्त नटवर्य गणपतराव जोशी ह्यांच्या तोंडून ऐकला.

त्या भाषणानें, प्रवेशानें आणि एकंदर त्या प्रयोगानें मी असा कांहीं भारला गेलों कीं मला दुसरें कांहीं सुचेनासें झालें. माझें मन नाटकानें भरून गेलें. नाटक मनांत संचारलें. विशेषतः नानबा गोखले ह्यांचा तो दिव्य आवाज, त्याचा पल्ला, खणखणीतपणा आणि तरीहि त्याला असलेली विलक्षण गोडी यांतच मी दंग झालों.

चित्ताकर्षक नाटक मंडळी साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांच्या नाटकांचे प्रयोग करीत असे. नाटक मंडळीच्या त्या एकाच मुक्कामांत मी चारींहि नाटकें पाहिलीं. तोतयाचें बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जुन युद्ध आणि अमात्यमाधव या चारहि नाटकांचे अत्यंत यशस्वी प्रयोग ती नाटक मंडळी करीत असे. रामभाऊ गोखले, रघुनाथराव गोखले, नानबा गोखले आणि ओ. बा. लिमये या चार नटांच्या भूमिका अतिशय परिणामकारक होत. नाट्यप्रयोगाच्या जाहिराती मोटरसायकलीवरून नासिकच्या गल्लीबोळांतून वांटल्या जात. ड्रॉपचा मखमलीचा पडदा असा याच नाटक मंडळीचा मी प्रथम पाहिला. नाटकें पहाणें त्या काळांत खूप स्वस्त होतें. विजयानंद नाटकगृहांत पोट, ओटा, गॅलरी व खुर्ची असे चार दर असत. ओटा ही सर्वांत उत्तम जागा मला वाटे. मी कांहीं उत्कृष्ट नाट्यप्रयोग याच जागेंतून पाहिले आहेत.

नानबा गोखले या नटानें पुढें स्वतःची स्वतंत्र नाटक मंडळी—लोकमान्य नाटक मंडळी या नांवानें काढली. १९२२–२३ मध्यें जिवंत असेपर्यन्त नानबांनीं मोठ्या ईर्षेनें ती कंपनी चालविली दामुअण्णा मालवणकर यांची सुरवातीची प्रसिद्धि चित्ताकर्षक नाटकमंडळींत असतांना झाली हें खरें आहे. परंतु "हाच मुलाचा बाप" या नाटकांतील डॉ. पशूची भूमिका हीच खरी दामूअण्णांची हातखंडा भूमिका. नानबा गोखले डॉ. गुलाबची नायकाची भूमिका करीत पण भूमिकेच्या मानानें ते अधिक प्रौढ वाटत. नानबा गोखल्यांनीं नासिकला एक धर्मार्थ खेळ केला. त्यावेळीं शाळेंतील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट नाटकांचे प्रयोग पहाण्यास बंदी करणाऱ्या त्या वेळच्या सरकारी हायस्कूलच्या मुख्याध्यापकांची त्यांनीं चांगलीच हजेरी घेतली.

नानबा गोखले या नटाशीं माझा प्रत्यक्ष परिचय कधींच झाला नाहीं १९२० च्या जानेवारींत श्री. ना. वि. कुलकर्णी यांच्या 'माईसाहेब' या नाटकाचा प्रयोग मी मुंबईस पाहिला. त्यांतली "अमृतमामाची" भूमिका नानबा अपूर्व कौशल्यानें करीत. श्री. दामुअण्णा मालवणकर आपल्या 'केशवमामाच्या' भूमिकेचा आविष्कार तितक्याच कौशल्यानें करीत. या नाटकाचा प्रयोग—त्यांतील सांघिक सहकार्य सर्वच श्रवणीय नि प्रेक्षणीय असे. खेड्यांतून आलेला एक खेडवळ या भूमिकेची वेषभूषा करतांना कोल्हापुरी वहाणा आणि उजव्या पायाच्या अंगठ्याला ठेंच लागल्यामुळें बांधलेली पट्टी वापरण्यांत नानबांनीं स्वाभाविकतेची कमाल केली होती.

नाथमाधवांच्या "मराठ्यांचा आत्मयज्ञ" या नाटकांतील 'मल्हारी'ची भूमिका करतांना शरीरसौष्ठवापेक्षां नानबांना त्यांच्या वाणीचाच अधिक उपयोग होत असे.

'माईसाहेब' या नाटकाचे कर्ते श्री. नारायणराव कुलकर्णी यांचा व माझा दृढ परिचय झाल्यानंतर त्यांनीं नानबांबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांपैकीं एक नमूद करण्यासारखी आहे. 'माईसाहेब' या नाटकाच्या अनेक प्रयोगांना श्री. कुलकर्णी हजर असत. नानबा त्यांना सांगत, "तुम्ही म्हणाल त्या वाक्याला टाळी घेऊन दाखवितों" आणि त्यांना याचें प्रत्यंतर नानबांनीं अनेक वेळां आणून दिलें. शेंकडों प्रेक्षकांना याप्रमाणें आपल्या इच्छेप्रमाणें

टाळी द्यायला भाग पाडायचें हें सामान्य कर्तृत्व नव्हे. नट हा एक साधक मानला तर त्याची ही साधना अलौकिक होय.

"हाच मुलाचा बाप" ह्या नाटकांतील हुंड्याची रकम बापाच्याच तिजोरींतून भरण्याच्या योजनेचा प्रवेश रंगवीत असतांना डॉ. गुलाबच्या भूमिकेंतील नानबाचें एक वाक्य—वसंताला टाकलेला तो सवाल—अजूनहि कानांत घुमत आहे. "यमूचा तो शंखासारखा पांढरा स्वच्छ गळा पाहून तुला आणि मला आनंदाच्या उकळ्याच फुटतील नाहीं?" या मर्मभेदक प्रश्नानें वसंत जमीनदोस्त होतो आणि बापाच्या तिजोरींतून हुंड्याची रकम चोरण्यास मान्यता देतो.

दामुअण्णा मालवणकर आणि काका कंपली हे दोन नट नानबांना अतिशय भरीव साथ देत. श्री. काका कंपली या नटाचा पुढें किती उत्कर्ष झाला हें मला माहीत नाहीं. पण या व इतर नाटक मंडळ्यांचीं जीं नाटकें मी पाहिलीं त्यावरून नाटक मंडळीचें मुख्य भांडवल म्हणजे आघाडीचे दोन नट—नायक व नायिकेची भूमिका करणारे व त्यांना साथ देणारे आणखी दोन तीन नट हेंच असे. बाकीची बहुधा रिक्रूट भरतीच असे. त्यांतल्या त्यांत स्त्री—भूमिका करणाऱ्या नटाला फारच 'भाव' असे. सर्वांगसुंदर भाऊराव कोल्हटकरांपासून तो स्वरूपसुंदर चापेकरापर्यंत स्त्री—भूमिका करणाऱ्या नटांचीं एक परंपरा होऊन गेली. या परंपरेंत चिंतोबा गुरव, कृष्णराव गोऱ्हे, बालगंधर्व, केशवराव भोसले, भाटेबुवा, बखले, मास्तर दिनानाथ यांसारखे संगीत स्त्री—भूमिका करणारे नट चमकून गेले तर गद्य नाटकांत अभिनयगुणानें गाजलेल्या स्त्री—भूमिका करणाऱ्या नटांची उज्ज्वल परंपरा निर्माण झाली. नटसम्राट गणपतराव जोशांच्याबरोबर नायिकेची भूमिका करणारे बाळाभाऊ जोग, कीचक-वधांतील सैरंध्री आणि भाऊबंदकींतील आनंदीबाई या भूमिकांनीं गाजलेले नट माधवराव टिपणीस, प्रेमसंन्यासांतील लीला, मत्स्यगंधेंतील गौरी, पुण्यप्रभावांतील वसुंधरा इत्यादि आपल्या भूमिकांनीं महाराष्ट्राला वेड लावणारे वामनराव पोतनीस अशीं किती नांवें सांगावींत. वामनरावांचा गोरा रंग, प्रमाणशीर बांधा आणि आवाज सर्वच गोष्टी स्त्री—भूमिकेला अनुकूल होत्या. स्त्रीप्रमाणेंच त्यांनीं डोक्यावरचे केस वाढविले होते व

पुरुषवेषांत हिंडतांना त्या केसांचा वेणी घातलेला शेपटा ते पाठीवर सोडून हिंडत असत. श्री. केशवराव दाते या व्यवसायांतील सुरुवातीच्या काळांत स्त्री–भूमिका करीत. केशवराव पुरुष–भूमिका करूं लागल्यानंतर श्री. पोतनीस आणि केशवराव यांची जोडी फार चांगली जमे. नाट्यप्रयोगांतील यशाचा बहुतेक 'स्कोअर' हे दोघेच काढून जात.

गद्य नाट्यप्रयोगांतून स्त्री–भूमिका यशस्वीपणें करणाऱ्या नटांच्या परंपरेंत श्री. विष्णुपंत औंधकर, श्री. मामा भट, श्री. राजे पेंटर, श्री. दळवी, श्री. सितारामपंत जोशी इत्यादि नटांचें कौशल्य वाखाणण्यासारखें होतें. 'तारामंडळ' या नाटकांत श्री. मामा भट भामिनीच्या भूमिकेंत "आम्ही बोलूनचालून बायका" हें वाक्य अशा आविर्भावांत बोलत, हाताला, पायांना आणि मानेला असा कांहीं लाडिक हेलकावा देत कीं प्रेक्षक थक्क होत असत. स्त्रीसुलभ राग–अनुरागाच्या छटा एका प्रौढवयीन पुरुषानें स्त्रीवेषांत दाखवाव्या ह्यांत त्या नटाची कुशलता निश्चित आहे. रघुनाथराव गोखले आणि रघुनाथराव इनामदार हे दोघेहि देखणे स्त्रीपार्टी नट होते. श्री. रघुनाथराव गोखले यांची मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताची भूमिका मीं पाहिली आहे. परंतु त्यांच्या स्त्री–भूमिकेइतका या भूमिकेचा प्रभाव माझ्यावर पडला नाहीं हें खरें !

इ. स. १९१० ते इ. स. १९२० या दहा वर्षांच्या काळांत ज्या ज्या नटांनीं मला प्रभावित केलें आणि मला नाटकाचा छंद लावला त्यांतील पहिले नट म्हणून श्री. नानबा गोखले यांच्याबद्दल मी लिहिलें. नानबा गोखले यांच्या आवाजाचा धर्म असलेले फार थोडे नट मला पहावयास मिळाले. कृष्णराव गोऱ्हे या संगीत नटांत तीच आवाजाची जादू होती यांत शंका नाहीं. त्या आवाजाचें वैशिष्टच असें कीं तो आवाज मनांत घर करून बसे. त्या आवाजाची ही प्रक्रिया मोठी विलक्षण आहे. जागेपणीं आणि झोपेंतहि तो आवाज कानांत घुमत रहातो व मनांत उमटत रहातो.

'तोतयाचें बंड' या नाटकाचें त्या काळांत विकत मिळणारें पुस्तक आणि त्यांतील नटांचे फोटो भारत नाटक मंडळींतील नटांचे आहेत. नाना फडणीस ही भूमिका श्री. यशवंतराव टिपणीस करीत, हैबती त्रिंबकराव प्रधान आणि सुखनिधान चिंतामणराव कोल्हटकर ! मी भारत नाटक

मंडळीचा प्रयोग पाहिला नाहीं. महाराष्ट्र नाटक मंडळींतून फुटून निघालेली ही नाटक मंडळी फार दिवस टिकली नाहीं हें खरें. 'मत्स्यगंधा' हें त्यांचें फार गाजलेलें नाटक. मी विद्यार्थी असतांना व नंतरहि 'तोतयाचें बंड' या नाटकांतील नाना फडणिसाच्या भाषणांचीं पारायणें अनेक वेळां केलीं.

इ. स. १९१८ मध्यें मॅट्रिकची परीक्षा देऊन आल्यानंतर आमच्या सरकारी शाळेचें स्नेहसंमेलन झालें. विद्यार्थ्यांनीं 'तोतयाचें बंड' हें नाटक करावें असें ठरलें. आपण नाना फडणिसांची भूमिका करावी अशी माझी उत्कट इच्छा ! परंतु दुसऱ्या शाळेंतून यत्ता ५ वींत आमच्या शाळेंत आलेला पण नट म्हणून गाजलेला एक विद्यार्थी –बापू कानिटकर– स्पर्धेसाठीं उभा राहिला. स्पर्धा घेण्यांत आली. पंच म्हणून आमच्या शाळेंतील तीन शिक्षक होते. त्यांत आदल्या वर्षीचे माझे वर्गशिक्षक श्री. वाघ हे एक होते. 'शिव शिव बाईसाहेब' हें प्रसिद्ध भाषण मी वाचून दाखविलें. माझें तें वाचन ऐकून श्री. वाघ स्तिमित झाले. मला जवळ बोलावून त्यांनीं मला प्रश्न विचारला, "हें कुठें शिकलास?" मी काय उत्तर देणार ?

त्या स्पर्धेत मला नाना फडणिसाची भूमिका मिळाली. मी ती भूमिका केली. आमच्या नाटकाचा प्रयोग झाला विजयानंद थिएटरमध्यें. राजापूरकर नाटक मंडळीचा रंगपट आणि कपडेपट शाळेला मिळाला होता. खोबऱ्याच्या तेलांत कालविलेलें तें रंगाचें गरगट आमच्या तोंडावर थापलें जात असतांना गाल अक्षरशः हुळहुळे झाले. नाना फडणिसाला बसण्यासाठीं दिलेल्या गादींतील कापूस जागोजाग गोळा होऊन दगडासारखा टणक झाला होता. तीं टणक टेकाडें टाळून बसणें हा एक समतोलतेचा दिव्य पाठ होता.

पार्वतीबाई आणि नाना यांच्या त्या प्रसिद्ध प्रवेशांत रामचंद्र नाईकाला कैद करण्याचा हुकूम देण्यासाठीं मी म्हणालों, "कोण आहे रे तिकडे? पकडा या हरामखोराला आणि घाला याच्या हातापायांत बेड्या आत्तांच्या आत्तां." मोठ्या दमांत मी तें वाक्य म्हटलें आणि राजापूरकरांच्या विजेच्या दिव्यांनीं डोळे गपकन् मिटले. रंगाचा बेरंग झाला.

प्रयोगाच्या सोईसाठीं आम्ही केलेले फेरफार विलक्षण होते. भाषणें पार्वतीबाईचीं पण म्हणणारा दादासाहेब, भाषणें अमलेचीं पण म्हणणारा

कमलाकर असा बदल करून आम्ही तो प्रयोग शेवटास नेला. विठाई गाळावीच लागली. त्या प्रयोगांत भूमिका केलेले बहुतेक विद्यार्थी नंतर मोठे प्रतिष्ठित नागरिक झाले. 'तोतयाचें बंड' हें नाटक आम्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनीं केलें आणि तेंहि थिएटरमध्यें हीच आमची बढाई. प्रयोगाचा दर्जा, नाट्यदिग्दर्शक, नेपथ्यरचना, वेषभूषा हे शब्दसुद्धां आम्हांला त्या काळांत माहीत नव्हते. मग त्यांच्या याद्या रंगवून रंगमंचावर ठेवण्याची गोष्ट कशाला ?

शाळेच्या नाटकांत नाना फडणिसाची भूमिका मिळावी म्हणून मी राजेबहाद्दर वाड्याच्या टोकाला असलेल्या अंधाऱ्या विहिरीच्या गल्लींतील गणपतीची प्रार्थना केली होती. मला ती भूमिका मिळाली. ती मला गणपती प्रसन्न झाल्यामुळें मिळाली कीं माझ्या तयारीमुळें मिळाली हा न सुटणारा प्रश्न आहे. माझ्या नाटकाच्या छंदाचा तो 'श्रीगणेशा' झाला हें मात्र खरें !

● ● ●

## लेखांक दुसरा

# गणपतराव जोशी

**ना**नबा गोखले या नटानें आपल्या दिव्य आवाजानें मला भारून टाकल्यापासून मला नाटकाचें वेड लागलें. या वेडांत शिस्त निर्माण करण्याचें श्रेय माझे ज्येष्ठ बंधु श्री. दत्तोपंत पुरोहित यांना आहे. गोविंदाग्रज आणि बालकवि ह्यांच्या कवितेवर त्या काळांत रसिकांची विशेष भक्ति होती. मासिक मनोरंजन ह्या लोकप्रिय मासिकाच्या पहिल्याच पानावर 'गोविंदाग्रज' ह्या नांवानें प्रत्येक महिन्याला कविता छापून येई. दत्तोपंतांनीं पुण्याहून अभिनव काव्यमालेचा एक भाग आणला होता. त्यांतल्या कांहीं ओळी दत्तोपंत अतिशय रसाळपणें म्हणत असत. "कन्हय्या बजाव बजाव मुरली। ही एक आस मनि उरली। मुरलींत शांतता भरली ।।" ह्या ओळी आजहि लक्षांत आहेत. श्री. रेंदाळकरांची नादमधुर कविता "उघडि नयन रम्य उषा हंसत हंसत आली। अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली ।।" तशीच 'मोत्ये' ही कविता आणखी कितीतरी कविता ते वाचीत आणि मला म्हणत "वामन, ही फार छान कविता आहे." मीहि त्या आनंदांत गुंगत असे. हें सर्व अभावितपणें घडत असे. नाटक हा सर्वश्रेष्ठ काव्यप्रकार आहे हें समजायला मला या कवितेच्या नादानें मदत केली. माझ्या भावाचा केवढा हा उपकार !

ह्याच काळांत झालेल्या आणखी एकदोन संस्कारांचा विचार करणें अपरिहार्य आहे. इ. स. १९१४ च्या सुमारास नासिकच्या हायस्कूलच्या

क्रीडांगणावर हा प्रसंग घडला. आमच्या वर्गांत असलेला 'गोसावी' या नांवाचा एक विद्यार्थी खेळ संपल्यावर आम्हां ५।६ विद्यार्थ्यांना हरिभाऊ आपटे यांची 'उषःकाल' ही कादंबरी प्रकरणशः सांगत असे. त्याची स्मरण-शक्ति आणि वर्णनशैली विलक्षण होती. अगदीं बारीकसारीक तपशीलसुद्धां त्याच्या सांगण्यांतून सुटत नसे. ती कादंबरी ऐकतांना मी तन्मय होत असे. सावळ्याचीं धाडसें, खानाची फजिती, हा भाग ऐकतांना तर आम्हांला विलक्षण भारल्यासारखें वाटे. हरिभाऊंचें 'करमणूक' हें साप्ताहिक त्या वेळीं निघत असे. " ही तिची करमणूक आणि ही आमची करमणूक " असं एक चित्र एका अंकांत पाहिल्याचं मला आठवतं. हरिभाऊंची एकुलती एक कन्या म्हणजे तिची करमणूक आणि साप्ताहिक करमणूक म्हणजे हरि-भाऊंची करमणूक अशी ती कोटी होती. याच साप्ताहिकांत विविध प्रकारची माहिती येई.

श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर ह्यांचें 'संदेश' हें दैनिक याच काळांत फार गाजलें. या दैनिकानें वृत्तपत्रसृष्टींत उच्चांक गांठला होता. 'वत्सला वहिनींचीं पत्रें' आणि 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी' हीं संदेशचीं सदरें अत्यंत लोकप्रिय होतीं. मला हें वर्तमानपत्र त्यांतील खुसखुशीत भाषेमुळें फार आवडत असे. एका ओळखीच्या गृहस्थाकडून संध्याकाळीं संदेशचा अंक मागून आणावयाचा, रात्रीं जागून तो वाचून काढावयाचा आणि सकाळीं तो परत करावयाचा. अर्धा आण्याचा तो अंक रोज विकत घेण्याची ऐपत नसल्यानें हा द्राविडी प्राणायाम करावा लागे. माझे आतेबंधु श्री. बाबुराव मांडवगणे हे ह्या प्राणायामांतील माझे सहकारी होत. आम्ही दोघांनीं कांहीं वाचलें आणि कांहीं पाहिलें. विशेषतः माझ्या नाटकें पाहण्याच्या छंदाला बाबुरावांचा पाठिंबा मला मिळाला नसता तर जीवनांत केवढी अतृप्तता राहिली असती. इ. स. १९१७ मध्यें महाराष्ट्र नाटक मंडळीचीं नाटकें आम्ही दोघांनीं पाहिलीं. आमच्या शाळेंत याच वेळीं दत्तु बोरकर या नांवाचा विद्यार्थी होता. माझ्या नाटकाच्या छंदाला बोरकरनें फार मोठी साथ दिली. महाराष्ट्र नाटक मंडळींतील एक आचारी त्याच्या ओळखीचा होता. त्यामुळे बोरकरला नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं प्रवेश होता. बोरकर त्या 'यक्षभूमीं'तील वेड लावणाऱ्या गोष्टी सांगे. ज्या नटांना रंगलेल्या

भूमिकेंत आम्ही रंगभूमीवर पहात असूं त्यांचें खाजगी जीवन हा आमच्या अनिवार्य उत्सुकतेचा विषय असे. मामा भट, पोतनीस, केशवराव दाते, औंधकर यांच्याशीं बोरकर प्रत्यक्ष बोलतो म्हणजे तो एक मोठा धन्यपुरुष वाटे.

"तोतयाचें बंड" या नाटकाचा आम्हीं प्रयोग केला. त्यावेळीं "हैबती" च्या भूमिकेसाठीं बोरकरनें स्पर्धेत भाग घेतला होता. पण त्याला ती भूमिका मिळूं शकली नाहीं. पुण्याला आम्ही कॉलेजांत असतांना न्यू पूना कॉलेजचीं स्नेहसंमेलनाचीं नाटकें फार गाजत. प्रि. शहा या नाटयप्रयोगांत जातीनें लक्ष घालीत आणि विद्यार्थ्यांना फार मोठें प्रोत्साहन देत. मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी. मला तें फार विलोभनीय वाटे. कारण नाटकें करण्याची प्रथा आमच्या कॉलेजांत बंद झाली होती. बोरकरला कॉलेजमध्यें असतांना 'हाच मुलाचा बाप' या नाटकांत 'वसंत'ची भूमिका मिळाली. बोरकरनें त्या भूमिकेवर खूप परिश्रम केले. त्यानें ती भूमिका चांगली केली. त्यानंतर बोरकर आजारी पडला. त्याला अन्न पचेना. रक्तक्षय होऊन बोरकर अखेर नासिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्यें वारला. त्याच्या आजारांतला एक प्रसंग मी त्याच्या समाचारासाठीं गेलों असतां त्यानें मला सांगितला. बोरकरवर त्याच्या चुलत्याचें निरतिशय प्रेम होतें. एक दिवस बोरकर रडूं लागला. काकांनीं विचारलें, "दत्तु, मरायला भितोस का?" दत्तूनें उत्तर दिलें, "नाहीं काका. मी तुमच्यासाठीं रडतों. मला तुमच्यासाठी कांहीं करतां आलें नाहीं म्हणून रडतों." बोरकर बेडर वृत्तीचा आणि स्नेहाला जागणारा असा माझा जिवलग मित्र होता. माझ्या नाटकाच्या छंदांत कांहीं काळ त्यानें मला उत्कट साथ दिली आणि हा माझा साथी एकाएकी निघून गेला.

इ. स. १९१६ मध्यें श्री. केशवराव दाते यांची विचित्र–लीला या नाटकांतील 'विचित्रा ची' भूमिका मुम्बई येथें माझे मावसबंधू श्री. यशवंतराव देशपांडे यांच्याबरोबर मी पाहिली. महाराष्ट्र नाटक मंडळीचा मी पाहिलेला हा पहिलाच प्रयोग. त्या नाटक मंडळींतील कांहीं नामवंत नटांचीं नांवें मला माहित होतीं. श्री. मामा भट यांनाच मी त्रिंबकराव प्रधान समजलों. नंतर ती चूक माझ्या लक्षांत आली. श्री. केशवराव दाते

आणि वामनराव पोतनीस या नाटकाची रंगत अगदी शिखराला नेऊन पोंचवीत. विचित्राचे ते विचित्र पोषाक, विशेषत: त्याची ती टोंकदार टोपी, त्या टोपीवर कांहीं रूपकहि त्या नाटकांत बसविलें आहे- श्री. बापूराव राजहंस यांची सुधेची भूमिका, श्री. मामा भट ह्यांची दादासाहेबांची भोळसट भूमिका-हा सगळा प्रयोगच महाराष्ट्र नाटक मंडळी अतिशय परिणामकारक करीत असे. श्री. राजे पेंटर, श्री. शाळीग्राम, श्री. औंधकर यांच्याहि दुय्यम भूमिका या प्रयोगांत पाहिल्याचें आठवतें. टिपणीस बंधू, त्रिंबकराव प्रधान अशी मातबर नटमंडळी नसतांना चांगला प्रयोग वठविण्यांत त्या नटांचे परिश्रम. विशेषत: केशवराव दाते आणि पोतनीस ह्यांची दृष्ट लागण्यासारखी साथ, या प्रयोगाच्या यशाला मुख्यत: कारण हें निश्चित!

श्री. केशवराव दाते ह्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकांतील "वृंदावना"च्या भूमिकेचा माझ्यावर फार परिणाम झाला. इ. स. १९१७ मध्यें मी नाशिकला महाराष्ट्र नाटक मंडळीचीं बरींच नाटकें पाहिलीं. "तारामंडळ", "प्रेमसंन्यास", "सत्वपरीक्षा", "पुण्यप्रभाव", "प्रेमध्वज" हीं विशेष लक्षांत असलेलीं नाटकें होत. 'सत्वपरीक्षें'तील हरिश्चंद्राची भूमिका करतांना केशवराव उत्कृष्ट अभिनय करीत. त्यांचा आवाज निर्दोष नाहीं हें मान्य करूनहि आहे तें आवाजाचें भांडवल वापरण्याचें तंत्र त्यांना चांगलें अवगत आहे. आवाज फेकतांना कांहीं वेळां तो बसल्यासारखा वाटतो. पण त्यांतला आवेश तो उणीव भरून काढतो. 'पुण्यप्रभाव' नाटकांतील शेवटच्या प्रवेशांतील वृंदावनाचें भाषण "वसुंधरे, माझा कर्मयोग-माझा दुष्कर्मयोग इतका दांडगा आहे. आणि त्याला मी आज रात्रींच्या अंधाराची जोड दिली आहे." यांतील त्या कर्मयोगाचीं वाक्यें केशवराव अत्यंत सफाईनें म्हणत. "कालिंदी"ची भूमिका करतांना श्री. बापूराव राजहंस फार उत्तम साथ देत. श्री. पोतनीसांची 'वसुंधरे'ची भूमिका अव्वल दर्जाची होई. विशेषत: शेवटचा 'हाराचा' प्रवेश करतांना ते अभिनयाच्या अत्यंत मनोज्ञ छटा दाखवीत. किर्लोस्कर संगीत मंडळी 'पुण्यप्रभाव' चा संगीत प्रयोग करीत असे. त्यांतहि चिंतामणराव कोल्हटकर, विसुभाऊ भडकमकर, कोल्हापुरे, बेहरे, मास्टर दीनानाथ असा ख्यातनाम नटसंच होता. या मंडळीचा प्रयोग मला पहावयास मिळाला नाहीं. ललितकलेनें बसविलेला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ................... विः ...................

याच नाटकाचा प्रयोग मी पाहिला. श्री. फाटक वृंदावनाची भूमिका चांगली करीत, परंतु मला मात्र केशवरावांची भूमिका अधिक आवडली.

इ. स. १९१७ सालीं नासिकला प्रांतिक परिषद श्री. श्रीनिवास शास्त्री ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. लोकमान्य टिळक आणि लोकमान्य दादासाहेब खापर्डे यांना लोकांनीं गांवांत गाडींतून मिरवीत आणलें. मला ती मिरवणूक चांगली आठवते. टिळकांची पगडी–अंगरखा आणि दादासाहें–बांचा तो भला मोठा फेटा हें सर्व लक्षांत आहे. याच वेळीं माझ्या नाट–काच्या छंदाच्या दृष्टीनें मला दोन विलक्षण नाटच-प्रयोग पहावयास मिळाले.

नटसम्राट गणपतराव जोशी यांची शाहूनगरवासी नाटक मंडळी त्यावेळीं नासिकला विजयानंद थिएटरमध्यें प्रयोग करीत होती. 'हॅम्लेट'चा हातखंडा प्रयोग पहाण्यास त्या रात्रीं रसिकश्रेष्ठ दादासाहेब खापर्डे हजर होते. पहिले तीन अंक दादासाहेबांसारखा मातबर प्रेक्षक समोर असतांना गणपतरावांनीं आपलें सर्व नाटककौशल्य जणू पणाला लावलें होतें. प्रत्येक शब्द, प्रत्येक हालचाल, मुद्रेवरील प्रत्येक आविर्भाव..... गणपतराव आपल्या गुणांची शिकस्त करीत होते. तीन अंक संपले आणि उरलेले दोन अंक गणपतरावांनीं जेमतेम अर्ध्या तासांत उरकले. कारण दादासाहेब तीनच अंक नाटकाला थांबले. त्या तीन अंकांत गणपतरावांनीं जें दाखविलें, जें ऐकविलें त्यामुळें आम्ही सर्व प्रेक्षक तृप्तीनें बेभान झालों होतों. पुढील दोन अंक न करतांच त्यांनी प्रयोग समाप्त केला असता तरी आम्ही तक्रार केली नसती. भूताचा प्रवेश चालू असतां गणपतराव दबलेल्या आवाजांत एक वाक्य बोलत. "अरे काक्या, तरी मला वाटलेंच." या एका वाक्यांत संताप, त्वेष यांची धार अशी विलक्षण असे कीं ऐकणाराचें अंतःकरण ती कापीत जाई. मला त्या प्रयोगांत केवळ यदृच्छेनें गणपतराव जोशी या महान् नटाचें दर्शन घडलें हें मी माझें महद्‌भाग्य समजतों. आजची पिढी तशा दर्शनाला वंचित झाली याबद्दल मला राहून राहून खेद वाटतो.

या थोर नटाशीं प्रत्यक्ष परिचय होण्याची संधि मला मिळाली नाहीं. परंतु त्यांच्या दानतीच्या आणि नाटच-परिश्रमाच्या कांहीं आख्यायिका मी ऐकल्या आहेत, त्या येथें नमूद करून ठेवतों. शाहूनगरवासीची शेवटचीं कांहीं

वर्षे हलाखीचीं गेलीं. कर्ज काढून तशा स्थितींत नाटकमंडळी चालवावी लागे. कर्ज मर्यादेच्या बाहेर गेलें असें दिसून येतांच गणपतराव मुम्बई–पुण्यास जाऊन आपल्या हातखंडा 'हॅम्लेट' नाटकाचा प्रयोग लावीत. पैशाचा पाऊस पडे. लगेच गणपतराव आपल्या सावकारांना तांतडीनें बोलावून घेत, पैसे त्यांच्यापुढें ठेवित आणि सांगत, "आम्हांला जगण्यासाठीं एवढा पैसा कमीत कमी पाहिजेच. तेवढा ठेवा आणि बाकीचे पैसे घ्या." सावकार प्रसन्न मनानें तो पैसा घेत आणि गणपतरावांच्या दानतीची स्तुति करीत निघून जात.

हॅम्लेटच्या भूमिकेचें शिक्षण घेतांना गणपतरावांच्या सहनशक्तीची परिसीमा झालेली दिसून येते. प्रोफेसर वासुदेवराव केळकर त्राटिका नाटकाचे कर्ते आणि नटश्रेष्ठ नानासाहेब फाटक यांचे एक आप्त गणपतरावांना ही भूमिका शिकवित. हें शिक्षण पुण्यास फाटकांच्या वाड्यांत चालत असे. हा वाडा अप्पा बळवंत गेटावरून गायकवाड वाड्याकडे जातांना उजव्या हाताला आहे. मोठ्या दरवाजांतून प्रवेश करतांना अंगणांत एक वर्तुळाकार हौद दिसतो. मी स्वतः तो हौद पाहिला आहे. भुताचा प्रवेश ( Ghost Scene ) शिकवितांना ऐन थंडीच्या मोसमांत प्रो. केळकर आपल्या या शिष्याला अगदीं पहांटें उठवून हौदापाशीं उभे करीत. समोर मोठा आरसा टांगलेला असे. रात्रभराच्या थंडीनें बर्फाप्रमाणें गारठणक झालेल्या पाण्याचे शिपके ह्या शिष्याच्या तोंडावर ते मारीत. त्या थंड पाण्याच्या स्पर्शानें होणारी कावरीबावरी मुद्रा समोरच्या आरशांत पहाण्यास त्या शिष्यास सांगत-भूत दिसतांच अशी चर्या झाली पाहिजे यासाठीं रोज पहांटें ही तालीम! 'चणे खावे लोखंडाचे' हें तपस्वी ऋषीमुनींचें कठोर व्रत या नटानें आचरलें तेव्हांच तो नाट्याच्या ब्रह्मपदीं नाचला ह्यांत संशय नाहीं. परिश्रमाविना आम्हांला नटसम्राट म्हणा ही भूमिका कोणीकडे आणि 'जीव जावो अथवा राहो नाट्यरंगीं माझा भावो' असें आचरण करणारे गणपतरावां–सारखे नाट्यभक्त कोणीकडे!

मी एकदां गायनतज्ज्ञ रसिकश्रेष्ठ श्री. गोविंदराव टेंबे ह्यांच्याशीं संभाषणाचा योग आला असतां त्यांना प्रश्न विचारला, "गणपतरावांच्या आवा–जाचें वैशिष्टय काय?" गोविंदरावांनीं दोन दृष्टांत देऊन त्या आवाजाचें

वैशिष्टच इतकें अचूक सांगितलें कीं इतर कुणाला तें तसें शब्दांकित करून सांगतां येईल असें मला वाटत नाहीं. गोविंदराव स्वरज्ञानाचे महान् पंडित होते आणि भाषाप्रभु होते. ते म्हणाले, "गणपतरावांच्या आवाजांत दोन गुण होते. आवाजाचा पल्ला आणि सामर्थ्य. एखादा मनुष्य पहातांच तो किती वजन उचलूं शकेल अशी एक स्थूल कल्पना आपण करतों. आपल्या कल्पनेच्या पंचवीसपट अथवा पन्नासपट वजन त्या माणसानें उचललें तर आपल्याला जसा आश्चर्याचा धक्का बसेल व आपण स्तिमित होऊं तीच स्थिति गणपतरावांचा आवाज ऐकतांना होत असे. तो आवाज त्याचा Range इतका वर चढत असे कीं ऐकणाराचा स्वतःवरचा विश्वास उडत असे. त्या आवाजाचें सामर्थ्य काय हें वर्णन करणें खरेंच कठीण आहे पण एक उदाहरण सांगतों. दिवसभर कष्ट करून एक माउली तान्हें मूल पोटाशीं घेऊन गाढ झोंपली आहे. अशी कल्पना करा. रात्रीं झोंपेंत तें मूल लोळत अंथरूण सोडून जमिनीवर–गार जमिनीवर जातें. तो गारवा त्याला झोंबतो आणि आईच्या कुशीची ऊब नाहीं याची जाणीव होतांच तें मूल रडूं लागतें. गाढ झोंपलेली ती माउली खडबडून जागी होते आणि त्या मुलाला जवळ घेते. त्या निरागस बालकाच्या आवाजांत आईचें हृदय ओढून घेण्याचें जें सामर्थ्य तेंच सामर्थ्य, तीच विलक्षण ओढ गणपतरावांच्या आवाजांत होती. त्या आवाजाची गोडी मंत्रमुग्ध करी आणि ती ओढ श्रोत्यांचें अंतःकरण एखाद्या विलक्षण लोहचुंबकाप्रमाणें खेंचून घेई. पुरोहित, असा आवाज झाला नाहीं, होणार नाहीं." एवढें बोलून गोविंदराव विलक्षण गंभीर झाले. तें वर्णन ऐकून मी तर शहारून गेलों.

इ. स. १९१७ मध्यें गणपतराव करीत असलेलें " माझी बहीण " हें नाटक मी पाहिलें. त्यांतील एक प्रवेश आणि त्यांत व्यक्त झालेलें गणपत–रावांच्या आवाजाचें आणि अभिनयाचें तें विलक्षण सामर्थ्य आजहि काल पाहिल्याप्रमाणें व ऐकल्याप्रमाणें स्मरणांत आहेत. प्रसंग असा. एक कामा-तुर राजा एका कुमारिकेच्या सौंदर्यानें मुग्ध होऊन आपल्या कामाग्नीच्या कुंडांत आहुती देण्यासाठीं त्या कुमारिकेची मागणी करतो. त्या मागणीनंतरचा बहीण आणि भाऊ यांचा निरोप घेण्याचा प्रसंग असतो. गणपतराव भावाची

भूमिका करीत. संभाषण संपल्यावर गणपतराव त्या प्रवेशाचा शेवट याप्रमाणें करीत. आपल्या कमरबंदांत असलेली कटचार म्यानासह काढून बहिणीच्या हातीं देत. कटचार शीलरक्षणाचें अखेरचें साधन! ही व नंतरच्या सर्व क्रिया मूकपणें घडत. आपली बहीण राजाकडे गेल्यानंतर आपल्याला दिसेल तें तिचें प्रेत या जाणीवेनें गणपतराव उठत आणि प्रेक्षकांच्या उजव्या हाताच्या वुइंगकडे धीमीं पावलें टाकीत जात. प्रत्येक पावलावर जणू कांहीं एकेका डोंगराचें वजन आहे इतकें तें पाऊल जड पडे. त्यांना होणारें दुःख किती प्रचंड आहे हें त्या पदन्यासावरून समजे. तशीं जड पावलें टाकीत गणपतराव वुइंगपर्यंत पोंचत. प्रवेशाचा हा शवट असेंच सर्वसामान्य प्रेक्षकांना वाटत असे. परंतु गणपतराव या प्रवेशाचा शेवट ज्या कलापूर्ण रीतीनें करीत तशी कला मी माझ्या आयुष्यांत अन्यत्र पाहिली नाहीं. गणपतराव वुइंगमध्यें एक पाऊल टाकीत आणि डोळ्याचें पातें लवतें ना लवतें एवढ्यांत एक गिरकी घेऊन "ताई" असा ब्रम्हांडाला भेदून जाणारा टाहो फोडून स्टेजच्या मध्यावर सुन्न होऊन बसलेल्या बहिणीच्या गळ्यांत जाऊन पडत. येथें पडदा पडे. ती विजेच्या वेगाची हालचाल, तो टाहो—सगळें कांहीं इतकें आकस्मिक घडे कीं प्रेक्षक करुणरसाच्या अतिबलशाली गतिमान प्रवाहांत अक्षरशः वहात जात.

मी जेव्हां जेव्हां तो "ताई" हांक मनांत स्मरतों तेव्हां तेव्हां गणपतरावांच्या आवाजाच्या आणि भावव्यक्तीच्या विलक्षण सामर्थ्यानें भारला जातो. बहिणीबद्दलचें अत्युत्कट प्रेम त्या एका शब्दांत व्यक्त करण्याची ती धडपड— कलेची ती अभिव्यक्ति मानवी नव्हे – अमानुष – अतिमानुष दैवी असेंच मनाला वाटतें आणि मी त्या असामान्य नटाविषयींच्या अथांग आदरानें स्तब्ध होतों.

● ● ●

लेखांक

तिसरा

# गणपतराव भागवत

गणपतराव जोशी यांना निसर्गानें अनेक देणग्या बहाल केल्या तर गणपतराव भागवत या नटाशीं निसर्ग सावत्र आईच्या कठोरतेनें वागला असेंच म्हणावें लागेल. अधू दृष्टि, पाठींत किंचित् पोक, काळसर रंग, किरकोळ शरीरयष्टि अशा दोषांनीं खचलेल्या व्यक्तीनें नट होण्याचा हव्यास धरावा हा एक चमत्कारच होय. मी या नटाला कधींच पाहिलें नाहीं परंतु त्यांच्याबद्दलच्या अनेक सुरस आख्यायिका मी ऐकल्या आहेत. माझा नाटकाचा छंद दृढतर होण्याला या आख्यायिका कांहीं प्रमाणांत कारण झाल्या हें खरेंच आहे.

कविवर्य केशवसुतांप्रमाणेंच नटवर्य गणपतराव भागवत या नटाचें छायाचित्र या जगांत उपलब्ध नाहीं. ज्यांनीं त्यांचीं कामें पाहिलीं आहेत ते नट अथवा प्रेक्षक त्यांचें जें वर्णन करतात त्यावरच समाधान मानून घेणें भाग आहे. १९१०–११ साल असेल. आमच्या घरीं घडलेला एक प्रसंग मला स्पष्ट आठवतो. दुपारीं चार वाजेचो वेळ असेल. आजच्या-प्रमाणें चहाचें बंड त्या काळीं नव्हतें. माझ्या वडलांचे पांचसहा स्नेही बंगल्यांत – घरांतील एका माडींत–जमले होते. त्यांच्यांत माधवराव खेडकर नांवाचे वडलांचे एक स्नेही होते. कीचकाचें भाषण म्हणण्याबद्दल त्यांना सर्वांचा आग्रह चालू होता. कीचक विराटाच्या घरीं फराळासाठी जातो त्या प्रवेशांतील तें भाषण होतें. उभे राहून माधवराव खेडकरांनीं कीचकाचें

भाषण केलें. मी केवळ एक तटस्थ प्रेक्षक होतों. आज त्या घटनेचा विचार करतांना माधवराव खेडकर आणि गणपतराव भागवत यांच्यांतील साम्य जुळविण्याचा प्रयत्न मी करतों. माधवरावांचा रंग काळसर, डोळे लहान, उंची बेताची, शरीरयष्टि किरकोळ हें मला आठवते. आणि गणपतराव भागवत तसेंच असावेत असें मी मानतों. मला नाटकाचा छंद लागण्या-पूर्वींच या नटश्रेष्ठानें जगाच्या रंगभूमीचा कायमचा निरोप घेतला होता. इ. स. १९१२ मध्यें भागवतांनीं आत्महत्या केली. त्यावेळीं ह्या क्रांतिकारक नटाच्या या दारुण अंताचा परामर्ष वृत्तपत्रांनीं, मासिकांनीं कसा घेतला याचें संशोधन करायला पाहिजे. महाराष्ट्र नाटक मंडळीचे एक वेळचे मालक श्री. अण्णासाहेब कारखानीस ह्यांच्या घरीं गणपतराव भागवतांच्या सह्या असलेलीं इंग्रजी पुस्तकें मी पाहिलीं आहेत. आज तो ग्रंथसंग्रह पुण्याच्या महाराष्ट्रीय कलोपासक ह्या संस्थेच्या स्वाधीन आहे अशी माझी माहिती आहे.

महाराष्ट्र नाटक मंडळींत नट म्हणून भागवतांनीं प्रवेश केला तोच मुळीं लोकविलक्षण पद्धतीनें. त्यांच्याबरोबरच्या सामानांत एक गाडाभर पुस्तकेंच होतीं. महाराष्ट्र नाटक मंडळीच्या चार मालकांना—चार नट श्रेष्ठांना भागवतांनीं आपला मनोदय कळविला. मालक लगेच रुबा-बांत बसले व म्हणाले, "आम्हांला तुमची परीक्षा घ्यावी लागेल." भाग-वतांनीं संमति दिली. मालकांनीं घ्यावयाची परीक्षा संपली आणि ते उठून जाऊं लागले. भागवत म्हणाले, "थांबा, आतां मला तुमची परीक्षा घ्यावयाची आहे. मला योग्य अशा मालकाचीच नोकरी मी करीन." माल-कांची खात्री झाली कीं हा पोटभरू नट नव्हे. भागवत आणि मालक यांच्यांत नोकरीच्या अटी ठरल्या आणि भागवत नट म्हणून नोकरी करूं लागले. एका ध्येयवादी सुशिक्षित नटानें मराठी रंगभूमीवर पदार्पण केलें आणि त्या रंगभूमीची कळा पालटून टाकली.

भागवतांनीं नाट्य—व्यवसायांत कांहीं महत्वाचीं तत्त्वें प्रत्यक्षांत आणलीं. नाटक मंडळींत येणाऱ्या अल्पवयी मुलांना शिकविण्याकरतां एक 'मास्तर' असला पाहिजे हा भागवतांचा आग्रह व त्याप्रमाणें महाराष्ट्र—नाटक मंडळींत 'मास्तर' प्रथम नेमला गेला. किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीनें गडकऱ्यांची नेमणूक 'मास्तर' म्हणूनच केली आणि गडकऱ्यांचे निकट-

वर्ती त्यांना 'मास्तर' म्हणूनच संबोधित असत. नाटक मंडळीजवळ वाचनीय पुस्तकांचा संग्रह असला पाहिजे ही कल्पना गणपतराव भागवतांचीच! नाट्यशास्त्रावरील उत्तम निवडक ग्रंथ या ग्रंथालयांत असावेत व नाट्यव्यवसायी लोकांनीं आपल्या भूमिका अभ्यासपूर्ण कराव्यात असा भागवतांचा कटाक्ष असे.

स्वतः गणपतरावांनीं किती प्रकारांनीं हा अभ्यास केला याचें टिपण उपलब्ध नाहीं. अधु दृष्टि हा एक फार मोठा दोष सांभाळून गणपतरावांना ऐतिहासिक आणि पौराणिक नाटकांतील भूमिका कराव्या लागत. या भूमिका करतांना चष्मा काढून ठेवायचा म्हणजे डोळे मिटूनच काम करायचें. त्यासाठीं स्टेजवरील सगळ्या वस्तूंची मांडणी करून त्यांतून सहज संचार करतां येईल अशी संवय ते करीत. त्यासाठीं ते अतिशय परिश्रम करीत. या विलक्षण प्रयोगशीलतेची एक आख्यायिका नमूद करण्यासारखी आहे. कीचकवध नाटकांतला हा प्रसंग आहे. विराटाच्या घरीं फराळासाठीं येणाऱ्या कीचकाच्या स्वागताची सर्व सिद्धता केलेली आहे. लांकडी तिवईवर फराळाचीं तबकें मांडलेली असतात. सैरंध्रीच्याऐवजीं धटिंगण बल्लव वाढण्यासाठीं आलेला पाहतांच कीचक चिडतो, फराळ करण्याचें नाकारतो. तिवईवर मांडलेल्या फराळाच्या तबकावर उजव्या हाताच्या टोकानें असा प्रहार भागवत करीत की तें तबक ठराविक गिरक्या घेत वुइंगमध्यें जात असे. यांत नाट्य-कौशल्य काय असा प्रश्न करणाराला त्या कौशल्यासाठीं कराव्या लागणाऱ्या परिश्रमांचा तो एक आविष्कार आहे हें सांगून तरी कसें कळणार?

कीचकवध नाटकाच्या तालमी चालू असतांना घडलेला हा प्रसंग आहे. नाट्याचार्य खाडीलकर स्वतःच्या नाटकाच्या तालमी अत्यंत कांटेकोर पद्धतीनें घेत. कोठल्याहि नटश्रेष्ठाचा मुलाहिजा त्यांच्यापुढें चालत नसे. नाटककाराला पाहिजे तसा स्वर (Tone), तसा पवित्रा, तसा आविर्भाव सिद्ध झालाच पाहिजे. तेथें दया आणि क्षमा यांचें नांवहि नसे. कीचकाची भूमिका भागवतांना द्यावी अशी चालकांची इच्छा. कीचक म्हणून गणपतराव खाडीलकरांच्या समोर उभे राहिले. पाठींत किंचित पोंक आलेला कीचक पाहून खाडीलकर म्हणाले, "हा कीचक, हा पोक आलेला कीचक."

गणपतरावांचा स्वाभिमान डिवचला गेला. त्यांनीं खाडीलकरांना उत्तर दिलें "आणखी एक महिन्यानें मी आपल्यापुढें उभा राहीन. त्यावेळीं आपल्याला पसंत पडल्यास मला भूमिका द्या–नाहीं पेक्षां अन्य कुणाची योजना करा."

आणि त्या एक महिन्यांत त्या नटश्रेष्ठानें केलेलें उग्र तप लक्षांत घेतलें म्हणजे मराठी रंगभूमीच्या या सरदारापुढें मस्तक आपोआप नम्र होतें. दिवसाचे आठ आठ तास गणपतराव जमिनीवर पालथे पडत व नोकराकडून कंपनीच्या सामानाची जड पेटी पाठीवर पोंक असलेल्या भागावर ठेवून घेत. केवढ्या-यातना, केवढे कष्ट! एक महिन्यानंतर भागवतांनीं खाडीलकरांना निरोप पाठविला. खाडीलकर आले. कीचकाच्या भूमिकेंत भागवत उभे राहिले. खाडीलकरांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. या कीचकाची मानसिक उंची विलक्षण होती. "मला माझ्या नाटकांतून प्रेक्षकांसमोर उभा करायचा तो कीचक हाच. याच्या नसानसांतून त्या उद्दाम कीचकाचें रक्त सळसळत आहे, वहात आहे.याच्या स्वरास्वरांतून रावणशाही-हुकूमशाही थयथया नाचत आहे! 'राज्यकर्ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास' हें साम्राज्यवाद्याचें उर्मट वाक्य बोलण्याचें सामर्थ्य असणारा हाच तो कीचक!!" खाडीलकरांनीं मोठ्या संतोषानें भागवतांची भूमिका मान्य केली. साऱ्या महाराष्ट्रभर या कीचकानें असें कांहीं भयानक थैमान घातलें कीं नोकरशाही थरथरली, हादरली. कीचकवध नाटकाच्या प्रयोगांना बंदी झाली. मराठी नाटकांनीं आपल्या तेजस्वितेचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला. परतंत्र देशांतील भाषेचा हा गौरव होय. मराठी भाषेचा हा ध्वज चिरंतन फडकत राहील. त्या कीचकवध नाटकावरील बंदी आज उठली आहे. आज आम्ही स्वतंत्र झालों आहोंत आणि आमचें तेज लुप्त झालें आहे. दैवदुर्विलास म्हणतात तो हाच!

भागवतांचे समकालीन नट निसर्गाचे लाडके होते आणि त्यांच्या नैसर्गिक गुणांशीं मुकाबला द्यावयाचा तर आपली अशी स्वतंत्र अभिनय–पद्धति भक्कम शास्त्रीय पायावर उभारली पाहिजे ही जाणीव भागवतांना होती. प्रथम त्यांनीं रंगभूषेंत फार सुधारणा घडवून आणली. भागवतांनीं 'ग्रीजपेंटस्' प्रथम मराठी रंगभूमीवर सुरू केले. भागवत येथेंच थांबले

नाहींत. भूमिकेला उठाव येईल असा 'मेक-अप्' कसा करावयाचा याचें शास्त्रीय ज्ञान प्राप्त करून घेऊन त्यांनीं एक स्वतंत्र परंपरा सुरू केली. केशवराव दाते आणि शाळीग्राम ह्या दोघांहि नटांजवळ 'मेक-अप्'चें अपूर्व कौशल्य दिसून आलें. 'शिवसंभव' नाटकांतील कमालखानाच्या भूमिकेंत शाळीग्राम गांजेकसाचा जो 'मेक-अप्' करीत तो अत्यंत परिणामकारक असे. रंग आणि 'मेक-अप' ह्याप्रमाणेंच आपल्या आवाजाला पेलेल आणि प्रभावी ठरेल अशी कृत्रिम उच्चारपद्धति (Toning) भागवतांनीं तयार केली. नाट्याचार्य खाडीलकर या उच्चारपद्धतीचे पुरस्कर्ते होते. शब्दाशब्दावर विशिष्ट आघात देऊन आणि स्वर लांबवून अथवा आंखूड करून नकलेंतील प्रत्येक शब्द घोटून घ्यावयाचा व सांधिक बळ एकवटून नाट्यप्रयोग रंगवायचा ह्याचें स्वतंत्र तंत्र भागवतांनीं निर्माण केलें. या तंत्रावर अस्वाभाविक, कृत्रिम वगैरे पुष्कळ टीका झाली. परंतु तंत्र म्हटलें कीं परिश्रम आले हें सत्य या टीकाकारांनीं ध्यानांत घेतलें नाहीं. केलेल्या आविष्कारांत केवळ नैसर्गिक गुणांवर अवलंबून चालत नाहीं. परिश्रमांनीं ते गुण विकसित केलेच पाहिजेत. भागवतांनीं नैसर्गिक गुणांच्या अभावी परिश्रमांची शिकस्त करून आपल्या भूमिका गाजविल्या, प्रभावी केल्या.

भागवत आणि गडकरी यांचे संबंध स्नेहाचे असत असा उल्लेख श्री. चिंतामणराव कोल्हटकरांनीं आपल्या 'बहुरूपी' या ग्रंथांत केला आहे. 'प्रेमसंन्यास' या नाटकांतील 'कमलाकरा'ची भूमिका गडकऱ्यांनीं भागवतसाठींच लिहिली होती. भागवतांनीं तें नाटक वाचलें होतें आणि त्यांनीं गडकऱ्यांना भरपूर प्रोत्साहन दिलें होतें.

भागवतांचा अंत ही एक दुर्दैवी घटना तर खरीच परंतु आम्हां मराठी लोकांतील असहिष्णु वृत्तीचा तो एक भयानक आविष्कार आहे. भागवतांच्या गुणांची परंपरा श्री. कारखानीस आणि श्री. केशवराव दाते ह्यांनीं यशस्वी रीतीनें चालविली. परंतु खेदाची गोष्ट अशी कीं या दोघांहि नटश्रेष्ठांनी त्या गुणपरंपरेची अधिकृत नोंद केलेली नाहीं. ह्या न पाहिलेल्या नटाबद्दल माझ्या मनाला सतत विलक्षण ओढ वाटत आली आहे. भागवतांचें चित्र नाहीं तरी त्यांचें अधिकृत चरित्र उपलब्ध होणें अत्यंत निकडीचें आहे. मराठी रंगभूमीच्या इतिहासांत या 'भागवत धर्माला' अनन्य साधारण महत्वाचें स्थान आहे. ● ● ●

लेखांक चवथा

# यशवंतराव टिपणीस

इ. स. १९१८ च्या मार्च महिन्यांत मॅट्रिकच्या परीक्षेसाठीं मी मुंबईला गेलों. मराठी, शास्त्र आणि भूगोल या विषयांचें समाधानकारक ज्ञान असल्याचा दाखला शाळेनेंच द्यावयाचा आणि उरलेल्या बादशाही विषयांची परीक्षा विद्यार्थ्यानें द्यावयाची. तीहि सोय फक्त मुंबईंत.

माझे चुलते –नाना– शीव या मुंबईच्या उपनगरांत रहात असत. परीक्षेंत व्यत्यय नसावा, वेळ वांचावा म्हणून गवालिया टँकजवळ रहात असलेल्या त्यांच्या एका स्नेह्याकडे माझी परीक्षेचे चार दिवस रहाण्या–जेवणाची सोय नानांनीं केली. रविवारीं संध्याकाळीं मला तेथें आणून त्यांनीं पोंचविलें. मुंबईच्या पद्धतीप्रमाणें दोनच खोल्यांचा त्यांचा ब्लॉक होता. नवरा-बायको दोनच माणसें घरांत. चार दिवसांचा विद्यार्थी–पाहुणा मी त्यांच्याकडे परीक्षेसाठीं जाऊन राहिलों. विद्यार्थ्याला जेवण घालणें म्हणजे कांहीं पुण्यकर्म अशी त्या काळांत समजूत असावी. परीक्षेच्या ओढीमुळें मला इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास सवड नव्हती. तरीहि शास्त्रीहॉलच्या त्या चाळींत " मम आत्मा गमला हा " या पदाचे सूर मी ऐकले. 'स्वयंवर' नाटकांतील तें लोकप्रिय गीत मुंबईचे हौशी लोक तासचे तास गुणगुणत सोप्यांत उभे रहात. नाना रोज संध्याकाळीं येऊन मंडपावर मला भेटत आणि 'पेपर' कसे गेले ह्याची चौकशी करीत. नंतर मला एका हॉटेलमध्यें नेऊन ते कांहीं खायला देत. ते स्वतः हॉटेलमध्यें कांहींच खात

नसत. त्यांची ती प्रेमळ वागणूक मी कधींच विसरणार नाहीं. परीक्षा संपली आणि नानांनीं मला गिरगांवांत माझ्या मावशीकडे आणून घातले. नुकतेंच माझ्या मावसभावाचें -बापूसाहेबाचें- लग्न झालें होतें. हांच बापूसाहेब पुढे आपल्या कर्तृत्वानें डॉ. भालेराव या नांवानें प्रसिद्धीस आला.

मुंबईच्या या मुक्कामांत माझा नाटकाचा छंद प्रथम व्यक्त झाला. आम्ही कांहीं समवयस्क विद्यार्थी गप्पा मारीत बसलों होतों. त्यांत माझा मामेभाऊ दत्तू जहागीरदार होता. त्यानें मला नाटकांतील भाषण म्हणण्याचा आग्रह केला. मी एक भाषण म्हटलें. 'तोतयाचें बंड' या नाटकांतील हैबतीचें भाषण असावें तें. दत्तूला व इतर श्रोत्यांना तें भाषण आवडलें. सर्वांनीं माझें कौतुक केलें.

बापूसाहेबानें मोठ्या हौसेनें मला 'चंद्रग्रहण' हें नाटक दाखविलें. आम्ही दोघांनीं बरोबर पाहिलेला हाच पहिला नाट्यप्रयोग. यशवंतराव टिपणीस यांची आर्यावर्त नाटक मंडळी या नाटकाचे प्रयोग करीत असे. नाटककार स्वतः यशवंतराव टिपणीस शिवाजीची भूमिका करीत. महाराष्ट्र नाटक मंडळीचे एकवेळचे हे मालक कांहींशा विपन्नावस्थेंतच असावेत. माधवराव टिपणीस आणि वैशंपायन हे दोन्ही नट मी ह्याच प्रयोगांत प्रथम पाहिले. 'मत्स्यगंधे'च्या भूमिकेनें प्रसिद्धीला आलेले वैशंपायन पुरुषभूमिका करूं लागले होते. यशवंतराव टिपणिसांची वाक्यें समजून उच्चारण्याची पद्धति आल्हादकारक होती. मला त्यांची तेवढीच भूमिका पहावयास मिळाली. 'भाऊबंदकी' व 'कांचनगडची मोहना' या नाटकांच्या पुस्तकांतील 'राघोबा' व 'प्रतापराव' या भूमिकांतील त्यांचीं छायाचित्रें मी पाहिलीं आहेत.

"चंद्रग्रहण" या नाटकाचा प्रयोग परिणामकारक झाला. परंतु या नटांनीं मला भारून टाकले नाहीं हें खरें. "चंद्रग्रहण" या नाटकाचें कथानक एका ग्रीक कथेवरून घेतलेलें आहे हें मी शिक्षकाचा व्यवसाय करूं लागल्यानंतर मला कळलें. माझ्या शालेय जीवनांत नाटकाइतकेंच जबरदस्त आकर्षण मला फुटबॉल या खेळाचें वाटत असे. या खेळांत माझी प्रगति बऱ्यापैकीं होती. शाळेच्या फुटबॉल संघांत मला महत्त्वाचें स्थान होतें. या खेळामुळें गांगल या नांवाच्या मुलाची माझी चांगली ओळख झाली.

गांगल गोरा, नाकींडोळीं नीटस आणि स्त्रीभूमिकेला लायक होता. १९१७–१८ च्या दरम्यान नाटकाचा एक क्लब काढावा व त्याच्यातर्फे नाटकें करावीं अशी माझी कल्पना होती. आम्हांला येऊन जाऊन अडचण स्त्री–पार्ट्यांची. गांगलला मी विचारलें पण त्यानें थांग लागू दिला नाहीं. नंतर मला कळलें कीं गांगल दरवर्षी कोंकणांतल्या आपल्या गांवीं जाऊन तेथल्या नाटकांत स्त्रीभूमिका करीत असे. आमच्या हनुवटीवर, ओठावर लव येऊन दाढीमिशांची काळसर छाया दिसूं लागली तरी गांगलचा चेहरा साफ ! त्या साफपणाचें रहस्य म्हणजे गांगल 'क्लीन शेव्ह' करीत असे. आम्ही आमच्या त्या क्लबाचें नांव ठेवलें Ideal Club. त्याची एक इंग्रजी भाषेंत घटना केली व टाईप केलेल्या प्रती तयार करवून घेतल्या. शाळेंत असतांना 'तोतयाचें बंड' या नाटकाचा जो प्रयोग झाला त्यांत बगंभटाची भूमिका केलेले खाडीलकर नांवाचे विद्यार्थी मला सहकारी म्हणून मिळाले. त्याचें दुर्दैव असें कीं त्याला मधूनमधून फिटस् येत असत. बोरकर त्याच्या समोरच रहात असे. त्याच प्रयोगांत धर्मा–निंबा–सर्जा ह्या प्रवेशांत धर्म्याची भूमिका करणारे श्री. कानिटकर–त्या वेळचा बाळचा कानिटकर हाहि त्याच गल्लींत म्हणजे रविवार पेठेंतील गाडगीळाच्या देवीच्या गल्लींत रहात असे. परंतु त्यावेळीं त्याचा व माझा जो स्नेह झाला नाहीं तो आम्ही दोघे फर्ग्युसन कॉलेजमध्यें असतांना झाला.

माझ्यापुढें नाटचप्रयोग करण्याच्या अगदीं स्थूल कल्पना होत्या. नायक, नायिका व खलनायक यांसाठीं तीन माणसें असल्याशिवाय आमचा नाटकाचा अड्डा जमणें शक्य नव्हतें. त्यांत बोरकर व मी अनुक्रमें नायक व खलनायक या भूमिकांसाठीं तयार होतों. पण नायिकेची भूमिका करायला आमच्याजवळ गडी नव्हता आणि आमचा नाटकाचा डाव अडला तो अकरा वर्षें त्या गड्यावांचून. आमच्या खाडीलकरांची नाटकाची हौस दांडगी. पातळ मिशा ठेवून त्यावर सिगरेटचा पातळ कागद चिकटवून मेक–अप् करावयाचा व स्त्रीपार्ट करायचा अशी अचाट कल्पना त्यांनीं मोठ्या आग्रहानें आमच्यापुढें मांडली. आम्ही ती कल्पना ऐकली पण प्रत्यक्षांत कधींच आणली नाहीं. मिशा काढणें, केस राखणें या गोष्टी त्या वेळीं सर्रास नव्हत्या. मी कॉलेजमध्यें गेल्यावर केस ठेवले आणि १९४७ मध्यें

आईच्या मृत्यूनंतर मी मिशा काढूं लागलों.

१९१५–१९१६ मध्यें नाशिकमध्यें नाटकाचा षोक असणारीं जीं माणसें होतीं त्यांपैकीं बापूसाहेब लोथे या नांवाचे सुखवस्तु गृहस्थ-वयानें आमच्यापेक्षां पुष्कळ मोठे–हे एक होते. एक जोशी नांवाचे स्त्रीपार्टी होते. नाटकाचे हौशी क्लब असले तरी त्यांचे प्रयोग मात्र फारसे होत नसत. नाहीं म्हणायला त्या वेळच्या सेंट जॉर्जेस् हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं वॉरफंडासाठीं 'चंद्रगुप्त' या नाटकाचा प्रयोग केल्याचें व मी तो पाहिल्याचें आठवतें. नाना फडणिसांच्या भूमिकेसाठीं स्पर्धा करणारा बापू कानिटकर यानें या प्रयोगांत चंदनशेटची भूमिका केली होती व त्याच्या भाषणाला प्रेक्षकांनीं टाळयाहि दिल्या होत्या. त्या भरंवशावरच त्यानें माझ्याशीं स्पर्धा केली होती. ५ व्या यत्तेंत गोखले मास्तरांच्या वर्गांत शेवटच्या बाकावर बसणारे आम्ही चौघे विद्यार्थी–लक्ष्मण महाशब्दे, बापू कानिटकर, मी आणि कनोल्ला पहिल्या तासाला चक्क झोंपा काढीत असूं. गंगेच्या पावसाळी पाण्यांत यथेच्छ पोहायचे, पोटभर जेवण करायचें आणि शाळेंत जायचे. अशा स्थितींत पहिल्या तासाला आम्ही दुसरें काय करूं शकणार ? अर्थात् ती झोंप सावध असे. थोडीशी चाहूल लागतांच आम्ही जागे होत असूं.

पावसाळयांत यथेच्छ पोहणें आणि हिवाळयांत–उन्हाळयांत हाय-स्कूलच्या ग्राऊंडवर फुटबॉल खेळणें यांत मी रमून जाई. त्या पोहण्यांत आणि खेळण्यांत शरीराची मस्ती म्हणजे काय याची चांगली साक्ष पटे. व चालतांना कशाचीहि तमा न बाळगतां मी जणूं अधांतरीं चालत असे. चित्रकला आणि क्रिकेट याबाबतींत मात्र त्या त्या शिक्षकांनीं मला सुरुवातीलाच नाउमेद केल्यामुळें माझ्या आयुष्यांतील फार मोठ्या आनंदाला मी मुकलों याची मला राहून राहून खंत वाटते. मला जितकें नाटकाचें वेड तितकेंच क्रिकेटचें वेड माझ्या बंधूंना–दत्तो-पंतांना–होतें. उंचपुरी शरीरयष्टि, बळकट मनगट आणि डोक्यानें खेळण्याची पद्धत यामुळें दत्तोपंत झकास चौकार आणि षट्कार लगावीत. त्यांची अभ्यासाची पद्धति विलक्षण असे. सातव्या यत्तेंत असतांनाच त्यांनीं बारीक टाईपांतला सगळा 'रेनॉल्डस्' वाचून काढला

होता. सहा आण्याला त्या मालेचीं पुस्तकें मिळत असत. मुखपृष्ठावर रेनॉल्डस् या लेखकाचें चष्मा घातलेलें अर्धप्रतिमेचें चित्र असे. नाथमाधव आणि दातार यांनीं मकरंदमालेंतून या लेखकाच्या कित्येक कादंबऱ्यांचीं सुरस भाषांतरें केलीं आहेत. 'वीरधवल', 'कालिकामूर्ति' ह्या त्या काळांतील अतिशय लोकप्रिय कादंबऱ्या होत. दत्तोपंतांच्या वर्णनशैलीला बहर येण्याचें कारण त्यांचें या इंग्रजी कादंबऱ्यांचें वाचन होय.

मी कॉलेजमध्यें गेल्यावर मेरी कॉरेली व हॉल केन या इंग्रज लेखकांच्या कादंबऱ्या भरपूर वाचल्या. या ग्रंथकारांनीं इंग्रजी भाषेचा आणि भावशीलतेचा संस्कार मजवर केला. इंग्रजी कादंबरी वाचली कीं इंग्रजी बोलण्याचा उबळ येई आणि कॉलेजच्या वसतिगृहांत वादावादी होई ती इंग्रजींतूनच.

१९१८ मध्यें मी मॅट्रिक उत्तीर्ण झालों आणि कॉलेज शिक्षणासाठीं माझे बंधु दत्तोपंत पुरोहित यांच्याबरोबर पुण्यास गेलों. त्यापूर्वीं इ. स. १९१६ मध्यें मी पुण्यास सात आठ दिवस राहिलों होतों. त्या वेळीं गंधर्व नाटक मंडळीचें "मानापमान" हें नाटक मी पाहिलें. त्यांत नटश्रेष्ठ बालगंधर्व, गणपतराव बोडस ह्यांचीं कामें पाहिल्याचें आठवतें. गणपतरावांचो त्या नाटकांतील भूमिका फारच लोकप्रिय होती. परंतु विनोदी भूमिकेपेक्षां खलनायक अथवा नायक ह्यांच्या भूमिकांचें जबरदस्त आकर्षण मला वाटत असल्यानें मो गणपतरावांच्या त्या भूमिकेनें प्रभावित झालों नाहीं हें खरें.

१९१८ मध्यें एक सहामाही मी पुण्यांत राहिलों. आईवडील व घर सोडून रहाण्याचा माझ्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग. खानावळीचें अन्न आणि अपरिचित वातावरण ह्यांचा माझ्या मनावर अगदीं निराशाजनक परिणाम झाला. आयडियल क्लबचे साथीदार नाशकांत आणि मी पुण्यांत ! मनाची विलक्षण उपासमार होऊं लागली. पहिली सहामाही मी कशीबशी काढली आणि दुसऱ्या सहामाहीच्या सुरुवातीला जेमतेम एक आठवडा मी पुण्यांत राहिलों आणि एक दिवस रात्रींच्या गाडीनें मी पुणे सोडलें. तुझी क्लबांत जेवणाची सोय करतों–तूं कॉलेज सोडूं नकोस म्हणून दत्तोपंतांनीं मला परोपरीनें सांगून पाहिलें. परंतु ओढाळ गुराप्रमाणें

माझें मन अनावर झालें आणि मी कांहींएक न ऐकतां ट्रंक वळकटी घेऊन नाशिकला परतलों. ती रात्र आणि त्यानंतरचा तो दिवस मी माझ्या आयुष्यांत कधींहि विसरणार नाहीं.

● ● ●

८

लेखांक पांचवा

# आवाजाची तयारी

इ. स. १९१८ च्या नोव्हेंबर महिन्यांत पहिल्या जागतिक महायुद्धाची समाप्ति झाली हें खरें आहे. परंतु याच काळांत मुम्बईच्या एल्फिन्स्स्टन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं वॉरफंडाकरतां 'हॅम्लेट' या नाटकाचा प्रयोग बसविला होता. नाशिकला विजयानंद थिएटरमध्यें झालेला या नाटकाचा प्रयोग मी पाहिला: हॅम्लेटची भूमिका फणशीकर या नांवाचे विद्यार्थी करीत असत. फणशीकर ती भूमिका चांगली करीत. १९१९–२० मध्यें मी एक वर्ष एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें असतांना श्री. फणशीकरांशीं परिचय करून घेतला. ते ठाण्याहून मुंबईला जात व मी शींवहून जात असे. श्री. फणशीकर यांना त्या भूमिकेचें शिक्षण श्री. ओ. बा. लिमये या नटाकडून मिळालें असें मला कळलें. श्री. फणशीकर त्यानंतर कोठे फारसे चमकल्याचें दिसत नाहीं. ठाणे, पुणे आणि नगर या तीनहि गांवीं त्या काळांत 'सोशल क्लब' या नांवाचीं नाट्यमंडळें होतीं. श्री. घैसास या नांवाचे लेखक ठाण्यास या चळवळीचे स्थानिक पुढारी होते. पुण्यास दादा फाटक, गोखले आणि दादा काळे अध्वर्यु होते. पुण्याच्या या तीनहि हौशी नटांशीं माझा परिचय झाला. परंतु १९२० नंतरचा तो इतिहास त्याच कालखंडांत निवेदन करणें बरें.

मी पुणें सोडलें आणि कार्तिक शुद्ध पौर्णिमेला संध्याकाळीं घरीं पोंचलों. अंधार पडला होता. भाऊ–माझे वडील–आजारी होते. कांहींशा

अगतिकतेनेंच त्यांनीं माझें स्वागत केलें. एकुलता एक मुलगा–रागावून कांहीं बोलावें आणि तो घरांतून गेला तर काय करायचं अशा काहीं विचारानें ते स्वस्थ बसले. मी जेवण केलें आणि गंगेच्या घाटावरचे दिवे पहावयास बाहेर पडलों.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या नाटकी मित्रांना भेटलों. त्या सहा महिन्यांत मी आवाजाची खूपच तयारी केली. खाडीलकरांकडे जाऊन संध्याकाळीं चहा घ्यायचा आणि गंगेच्या कांठीं असलेल्या डोंगरउताऱ्याला वाळूंत बसून टिपेच्या आवाजांत पुण्यप्रभावांतील वृंदावनाचीं दीर्घ भाषणें वाचायचीं–म्हणायचीं! आवाजाचा पल्ला आणि धार दोन्ही गुण या मेहनतींतून साध्य झाले. ती मेहनत आज चाळीस वर्षे मला पुरली आहे. पुष्कळजण त्या आवाजाची स्तुति करतात.

त्याच मेहनतीचा आणखी एक परिणाम झाला. त्यामुळें–गडकऱ्यांच्या नादमधुर भाषेची जबरदस्त पकड माझ्या मनावर बसली. गडकरीभक्त म्हणून जो एक तरुण वर्ग गडकऱ्यांच्या मरणानंतर निर्माण झाला त्यांत स्वतःची गणना करण्यास मला अभिमान वाटे. त्या भाषेच्या पाठांतरानें मला लेखनांत आणि वक्तृत्वांत फार मोठें वळण लावलें–साहाय्य केलें ह्यांत शंका नाहीं.

मी केलेलें तें पाठांतर नाटकाच्या छंदामुळें आणि म्हणून त्या पाठांतरांत मला रहस्य वाटे. "तोतयाचें बंड" या नाटकांतील पहिल्याच प्रवेशांतील सुखनिधनाचा एक उतारा टिपेच्या आवाजांत म्हणतांना मोठें अवसान चढे. त्या उताऱ्याची सुरुवात अशी: "नाईक, दूर व्हा. सोडा माझे पाय. सदाशिवराव भाऊ पेशवा पानपतावर मेला नाहीं. तो आज स्वराज्यांतल्याच एका खडकावर उडी टाकून मरणार आणि या सर्वांचं पाप नाईक तुमच्या डोक्यावर बसणार." या 'स्टॉप्यांत' आवाज चढवीत नेण्याची ईर्षा लागे. शकरराव निफाडकर–माझे एक स्नेही–याबाबतींत सर्वांत अधिक आवाज चढवीत.

शास्त्रशुद्ध नाटच–शिक्षणाची सोय त्याकाळीं नाशिकमध्यें उपलब्ध नव्हती. नाहीं म्हणायला त्यावेळच्या फाळके यांच्या हिंदुस्थान सिनेमा कंपनींतील एक नट श्री. गजाननराव साने कांही विद्यार्थ्यांना मुद्राभिन-

याची संथा देत. मला उघड रीतीनें नाट्यशिक्षण घेण्याची सवलत घरून मिळाली नाहीं. 'एकलव्य' पद्धतीनेंच मला नाटयशिक्षण घ्यावें लागलें. नानबा गोखले, गणपतराव जोशी, केशवराव दाते, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, नानासाहेब फाटक या नटांच्या भूमिकांचा एक सामुदायिक परिणाम माझ्यावर होत आला आहे आणि त्यांतूनच मी तयारी केली.

१९१९ च्या जूनमध्यें मी मुंबईस अेल्फिन्स्टन कॉलेजमध्यें दाखल झालों. शींवला नाना—माझे चुलते—विठोबाच्या चाळींत रहात असत. नाशिकचे बापूराव रवळगांवकर त्याच चाळींत रहात. मी रोज १०–२० च्या गाडीनें मुंबईला जात असे व बोरीबंदर ते कॉलेज हा २० मिनिटांचा रस्ता पायीं चालत जात असे. माझ्याबरोबर नाशिकला शाळेंत असलेला कमा प्रधान त्याच कॉलेजांत होता. बापूसाहेब व त्याचा मित्र राव दोघे झेवियर कॉलेजमध्यें होते. मी कॉलेज सुटल्यावर बहुधा रोज मावशीकडे जात असे. अण्णासाहेब आजारीच होते आणि ते त्यांचें शेवटचें दुखणें ठरलें. ऑगस्टमध्येंच त्यांचा अंत झाला. मावशी विधवा झाली.

बापूसाहेबांच्या घरीं नाटकाच्या नादी लोकांचें एक अनौपचारिक मंडळ तयार झालें. त्यांत बापूसाहेब भालेराव, त्याचा स्नेही राव, शिरोळकर—पुण्याच्या सोशल क्लबाचे एक सदस्य, श्री. लंके, नारायणकाका कोरान्ने, दत्तु जहागीरदार, नाना अभ्यंकर, आणखी कांहीं समवयस्क येऊन जाऊन असत. आमच्या गप्पागोष्टी आणि मावशीनें खाण्यासाठीं केलेले रोजचे वेगवेगळे पदार्थ यांत आम्ही दंग होतों. कॉलेजमध्यें मी नियमानें जात असे एवढेंच ! पण तेथल्या अभ्यासाकडे माझें बिलकूल लक्ष नसे. रोज घरीं परत जायला उशीर होत असे. मावशीकडे किंवा बाहेर हॉटेलमध्यें भरपूर खाल्ल्यानें पोटांत भूक नसे तरी रात्रीं जेवत असे. नाना कांहीं बोलत नसत. कधीं कधीं न कळवितां मावशीकडे मी रहात असे. नाटकी केस, नाटकी कपडे, नाटकी बोलणें चालणें असें सगळें बेबंद जीवन चाललें होतें.

एक प्रसंग आठवतो. 'बाबल्या' म्हणून बालगंधर्वाची सुरेख नक्कल करणारा पोरगा केव्हांतरी आमच्या बैठकींत येई. तो 'एकच प्याला' नाटकांतील पदें ठसक्यांत म्हणत असे. अशीच एक बैठक झाली. घरीं जायला खूप

उशीर झाला. नाना त्या दिवशीं एवढेंच म्हणाले, "वामन, हें बरं नाहीं."

चाललें आहे हें बरें नाहीं हें मलाहि कळत होतें पण वळत नव्हतें. मनाची ओढाताण चालली होती. कॉलेजच्या अभ्यासाकडे मन वळतच नव्हतें. नाटकाचीच एकमेव ओढ त्या मनाला होती. कॉलेजमध्यें मात्र मी नियमितपणें जात येत असे. श्रीमंत गुजराती आणि पारशी मुलामुलींच्या घोळक्यांत आमच्यासारख्यांना विचारतो कोण? मी त्या कॉलेजच्या जीवनांत समरस झालों नाहीं हें खरें.

या वर्षांत भालेरावांचें घर हेंच माझें खरेंखुरें आकर्षण होतें आणि त्याचें मुख्य कारण म्हणजे आमच्या नाटकी छंदाला तेथें संपूर्ण वाव होता—स्वातंत्र्य होतें. १९२० च्या जानेवारींत संक्रांतीच्या आधल्या रात्रीं 'माईसाहेब' या नवीन नाटकाचा प्रयोग मी पाहिला. गडकरी यांच्या भडक भाषालाघवानें भारून गेलेले आम्ही या नाटकाच्या साधेपणानें मुग्ध झालों हें खरें. या नाटकांतला 'चोर कोण' हा शेवटचा प्रवेश नानबा मोठ्या कौशल्यानें करीत. 'माईसाहेब' या नाटकाला स्वयंसिद्ध रंगत आहे यांत शंका नाहीं. भाषेंत साधेपणा आणि जिव्हाळा आहे. नुकत्याच होऊन गेलेल्या महायुद्धाचे कांहीं उल्लेख त्यांत होते. त्यांतून हास्यरस निर्माण होई. नानबांचें वैशिष्ट्य असें कीं मुंबईंत झालेल्या पहिल्याच प्रयोगाचें उत्पन्न त्यांनीं तेथील ब्राह्मणसभेच्या मदतीसाठीं दिलें. नाटक मंडळ्यांच्या इतिहासांत हें बहुधा अपवादात्मकच उदाहरण म्हणावें लागेल.

मार्चच्या सुरुवातीला वार्षिक परीक्षा झाली. गणिताची प्रश्नपत्रिका होती. मी समोर दिसणाऱ्या समुद्राकडे पहात वेळ घालवीत होतों. गणिताचे वृद्ध प्राध्यापक श्री. दातार माझ्याजवळ आले व म्हणाले, "पेपर सोपा आहे." मी उत्तर दिलें, "खरें आहे. पण मी अभ्यास केला नाहीं." त्या वृद्धानें एक सहानुभूतीचा निश्वास टाकला आणि ते निघून गेले.

१० मार्चला परीक्षेचा निकाल लागला. सगळ्या शेंदीडशें विद्यार्थ्यांत दोनतीनच नापास झाले आणि त्या अल्पसंख्यांकांत मी होतों. घरीं येऊन नानांना मी निरुपायानें सांगितलें, "मी नापास झालों." त्यांना फार वाईट वाटलें. आपला भाऊ आपल्याला दोष देईल—घरची आर्थिक स्थिति समाधानकारक नाहीं इत्यादि गोष्टी त्यांनीं मोठ्या कळकळीनें सांगितल्या. तें सर्व

ऐकतांना मला वाईट वाटलें. पण त्या उद्वेगाचें रूपांतर कोठल्याहि कृत-निश्चयांत झालें नाहीं हें खरें.

त्याच वर्षी एप्रिल महिन्यांत केव्हांतरी एक दिवस मावशी नासिकला आली. माझ्यासाठीं ठरविण्यांत आलेली मुलगी तिनें पाहिली. भाऊंना तिनें काय सांगितलें तें मला कळलें नाहीं. परंतु मे महिन्यांत माझा विवाह झाला. माझ्या धाकट्या बहिणीचा विवाह एकच दिवसाच्या फरकानें झाला. त्याच सुमारास भाऊंनीं पाथर्डी येथें एक मळा विकत घेतला. खरेदीखतासाठीं लागणारा पैसा एका सावकाराकडून उसनवार घेतला. त्या कर्जरोख्यावर आमच्या तिघांच्या—दत्तोपंत, नाना आणि मी—सह्या होत्या.

२३ जानेवारी १९२० रोजीं गडकऱ्यांची पुण्यतिथि आम्ही प्रत्येकानें वीस कप चहा पिऊन आणि "स्त्रीजात तेवढी सारी निमकहराम" हें पुण्यप्रभाव नाटकांतील सुदामाचें वाक्य घसा बसेपर्यंत रात्रीं बारा वाजेपर्यंत ओरडून साजरी केली. घरांत मावशी नसल्यानें आमचेंच राज्य होतें. बिचाऱ्या वहिनीनें तें सारें सहन केलें आणि वर चहा करून दिला.

आचरटपणा ह्यापेक्षां त्या प्रकाराला दुसरें नांव नाहीं !

• • •

## लेखांक सहावा

# लोकमान्य गेले :

मुंबईच्या एक वर्षाच्या मुक्कामानंतर मी कॉलेज शिक्षणासाठीं पुन्हा पुण्यास दाखल झालों. १९२०–२१ ह्या वर्षी सदाशिव पेठेंत नागनाथाच्या पाराजवळ असलेल्या मावशीच्या घरांत मी रहात असे. माझे ज्येष्ठ मावसबंधु चाळीसगांवचे यशवंतराव देशपांडे यांनीं आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं बिऱ्हाड केलें होतें. ताईमावशी तेथें होती. मला बोर्डिंग व लॉजिंग दोन्हीं मोफत होतीं.

गांवांतून मी रोज फर्ग्युसन कॉलेजला चालत जात असे. या माझ्या प्रवासांत गंधर्व नाटक मंडळीच्या ठिकठिकाणीं भिंतीवर लागलेल्या नाटकांच्या जाहिराती मला सोबत करीत असत. पावसाळ्याचे चार महिने गंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम पुण्यास असे. स्वतः बालगंधर्व, मास्तर कृष्णा आणि पंढरपूरकरबुवा हीं तीन गाणारीं पात्रें गणपतराव बोडस, रानडे, भांडारकर आणि अभ्यंकर हीं तीनचार अभिनयकुशल पात्रें यांच्यावरच प्रयोगाची रंगत अवलंबून असे. नाटकें पाहाण्याची उत्कट इच्छा असूनहि मला माझ्या आर्थिक परिस्थितीमुळें तीं पहातां आलीं नाहींत. या काळांत गंधर्वांचें एक अर्धें नाटक पाहिलें. ३१ जुलैला बापूसाहेब भालेराव पुण्यास त्याच्या घराच्या कामानिमित्त आला होता. त्या रात्रीं गंधर्व नाटक मंडळीच्या मूकनायक ह्या नाटकाचा प्रयोग होता. त्या सबंध आठवड्यांत पुण्यांत खूप अस्वस्थता होती. मुंबईच्या सरदारगृहांत लोकमान्य टिळक

नवज्वरानें आजारी होते. तीनतीन चारचार तासांच्या अंतरानें त्यांच्या प्रकृतीसंबंधी ठिकठिकाणीं पत्रकें लागत. रानडे काँट्रॅक्टर यांच्या वाड्यांत टेलिफोनवरून बातमी येत असे. टिळकांचा आजार ही एक राष्ट्रीय आपत्ति आहे याची जाणीव आम्हांला नव्हती.

किर्लोस्कर थिएटरमध्यें पांचव्या सहाव्या रांगेंत आम्ही दोघे—भालेराव व मी—नाटक पहात होतों. नाटक चांगलें रंगत चाललें होतें. विक्रांत बागेंत झोपला आहे आणि सरोजिनी तिकडे जात आहे. बालगंधर्वांचें एक गाणें संपून तो प्रवेश संपायचा होता. इतक्तांत ड्रॉप पडला. आम्ही बसलों होतों तेथून डाव्या हाताच्या वुइंगमधून पेठे मॅनेजर बाहेर आले. त्यांचे हात थरथर कांपत होते. हात जोडल्यासारखे करून त्यांनीं "लोकमान्य" हा एकच शब्द उच्चारला आणि "गेले" या अर्थाचा बोध त्यांच्या हातावरून झाला. सगळें थिएटर अक्षरशः क्षणांत निःशब्द स्थितींत रिकामें झालें.

आम्ही घरीं आलों. सकाळीं पहिल्याच गाडीनें बापूसाहेब मुंबईस गेला. मी पुण्यांतच राहिलों. गांवांतले सर्वच व्यवहार बंद होते. शंकरराव देव सकाळीं किर्लोस्कर थिएटरजवळच्या एका दुकानापाशीं उभे राहून लोकांना आवर्जून सांगत होते, "लोकमान्यांचा देह पुण्यास आणला गेला पाहिजे." त्यांचा तो सत्याग्रह यशस्वी झाला नाहीं परंतु दहाच्या सुमाराला एका पालखींतून लोकमान्यांच्या प्रतिमेची मिरवणूक निघाली. मी त्या मिरवणुकींत होतों. नारायण पेठ आणि सदाशिव पेठ या भागांतून मिरवणूक जात असतां प्रत्येक घरांतील स्त्रिया खिडकींत उभ्या राहून रडत होत्या. पुण्यांतील जनतेचें दुःख त्या स्त्रियांच्या डोळ्यांतून ठिपकत होतें. स्वतःचा निकटचा आप्त जावा असें तें दुःख होतें. दिवसभर मी उपास केला आणि रात्रीं जेवण केलें.

टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकांचें थोरपण आकार घेऊं लागलें. दहाव्या दिवशीं रे मार्केटमध्यें प्रचंड सभा झाली. या सभेसाठीं पंजाबचे सिंह आणि टिळकांचे एक श्रेष्ठ सहकारी, लाल–बाल–पाल ह्या त्रयींतील पहिले—पुण्यास आले होते. रे मार्केटच्या मागच्या मैदानांत ही सभा भरली आणि जे जे वक्ते त्या सभेंत बोलले त्यांत प्रा. ना. सी. फडके ह्यांचें

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. 

अनुक्रम ........................ वि: ........................

इंग्रजी भाषेंतील वक्तृत्व सर्वांनाच अतिशय पसंत पडलें. आज त्या भाषणाचा आशय लक्षांत नाहीं. लाला लजपतराय हिंदींत बोलले. त्यांचें व्यक्तिमत्व प्रभावी होतें. टिळकांसारखा एक खंदा लढवय्या गेला हें त्यांचें दुःख मोठें होतें.

टिळकांचा अस्त आणि गांधींचा उदय या दोन्ही घटना एक ऑगस्ट-लाच घडून आल्या. एक ऑगस्ट, आठ ऑगस्ट आणि आतां पंधरा ऑगस्ट या तीनहि तिथी भारताच्या इतिहासांत अत्यंत क्रांतिकारक समजल्या जातील यांत शंका नाहीं.

विश्वामित्रे मास्तर या नांवाचे चाळीसगांवचे एक शिक्षक कॉलेज शिक्षणासाठीं पुण्यास येऊन राहिले होते तेहि देशपांडे यांच्याच बिऱ्हाडांत वस्तीला असत. त्यांचें जेवणखाण बाहेर असे. ज्ञाने-श्वरीचा त्यांचा व्यासंग चांगला होता आणि त्यांची प्रवृत्ति अध्यात्मिक होती. ते रोज अर्धा अर्धा तास शीर्षासनाचा व्यायाम करीत. बेताचीच उंची असली तरी त्यांच्या शरीराला पिळदारपणा आणि घाट दोन्हीं प्रेक्षणीय होतीं. विश्वामित्रे स्नेहाला जागणारे आणि सत्प्रवृत्त असत. त्यांच्या त्या वर्ष-भराच्या सहवासाचा माझ्या मानसिक घडणीवर महत्वपूर्ण परिणाम झाला हें खरें.

लोकमान्य टिळकांची महायात्रा पाहून परिणाम होणार नाहीं असा मनुष्य विरळा. बापूसाहेब भालेराव यानें मुंबईस जाऊन ती महायात्रा पाहिली व एक विलक्षण धाडसी निर्णय घेतला. 'अरविंद' या नांवाचें मासिक काढावयाचें असें त्यानें ठरविलें व त्याप्रमाणें अतिनेटानें तो त्या उद्योगाला लागला. त्यानें पत्रद्वारें मला त्याचा तो विचार कळविला. 'अरविंद' मासिकाचा पहिला अंक नोव्हेंबर महिन्यांत निघाला. अंकाच्या मुखपृष्ठावर लोकमान्य टिळकांचें पूर्णाकृति (Full size) चित्र होतें व पायाशीं उमल-लेलें कमल असून त्यांत 'अरविंद' अशीं अक्षरें होतीं. देशभक्त कै. लक्ष्मण बळवंत भोपटकर यांनीं या अंकासाठीं एक खास लेख लिहिला होता. अंकाचें स्वागत चांगलें झालें. विशेषतः त्यांतील हिंदी विभाग आणि मराठी रंगभूमि हीं दोन सदरें नावीन्यपूर्ण होतीं. श्री. ग. वि. कुलकर्णी –'उद्यान्' मासिकाचे संपादक– ह्यांचा 'उद्यान प्रेस' भालेरावांच्या मालकीच्या इमा-

रतींत होता. गिरगांव पोस्ट पूर्वी ज्या जागेंत होतें ती ही इमारत. ठरलेल्या तारखेला अंक निघावा म्हणून भालेरावानें फार परिश्रम केले. स्वतः छापखान्यांत उभे राहून आठ आठ तास त्यानें ट्रेडल चालविलें. त्याची शारीरिक आणि मानसिक श्रम करण्याची शक्ति अलौकिक होती हें आतां स्पष्टच झालें आहे.

भालेराव मुंबईला आणि मी पुण्याला– आमचा पत्रव्यवहार खप होई. चिपळूणचे 'आनंद' कवि, श्री. भीमराव खंडेराव कोरान्ने ह्यांचा मासिक काढण्याच्या प्रयत्नांत फार उपयोग झाला. 'अरविंद' मासिकाचें छोटेसें कार्यालय थाटून संपादक म्हणून भालेराव त्या ऑफिसांत बसत असे. 'विविधज्ञानविस्तार' ह्या जुन्या आणि दर्जेदार मासिकाचे वयोवृद्ध संपादक श्री. मोरमकर 'अरविंद' मासिकाच्या संपादकाला भेटण्यास आले. संपादक म्हणजे वयानें प्रौढ असा कोणी प्रतिष्ठित गृहस्थ भेटेल अशी त्यांची अपेक्षा. त्याऐवजीं हा पोरसवदा मिसरूड न फुटलेला संपादक पाहून श्री. मोरमकरांना आश्चर्याचा धक्काच बसला. भालेराव त्या भेटींतील गमती अतिशय रंगून सांगत असे.

याच काळांत मी अल्पसें लेखन करूं लागलों. बालकवि आणि गोविंदाग्रज यांच्या कविता मला माझे चुलत बंधु श्री. दत्तोपंत पुरोहित अतिशय आवडीनें वाचून दाखवीत. दत्तोपंतांची रसिकता आणि समीक्षक बुद्धि समृद्ध होती. साहित्याच्या मनोज्ञ आनंदांत मला नेऊन उभे करण्याचें श्रेय दत्तोपंतांचें आहे. परंतु माझ्या लेखनशक्तीचा परिपोष करण्याचें श्रेय आहे मुख्यतः चुनीलाल शेठ ह्याला. १९२१ च्या जानेवारी महिन्यांत नासिक जिल्हा विद्यार्थी संघाच्या वतीनें गडकऱ्यांची पुण्यतिथि बॉटनी हॉलमध्यें प्रोफेसर येवलेकर –आमच्या संघाचे मार्गदर्शक आणि अध्यक्ष– ह्यांच्या अध्यक्षतेखालीं कार्यक्रम साजरा झाला. मी 'गडकऱ्यांची कविता' या विषयावर त्या सभेंत बोललों. दुसऱ्याच दिवशीं एक गोरापान ठेंगणा विद्यार्थी ॲंफी थिएटरसमोर मला भेटला व म्हणाला, "मला तुमचं भाषण फार आवडलं. मला तुमच्याशीं बोलायचं आहे." हाच तो चुनीलाल शेठ! त्याच्या व माझ्या परिचयाचें रूपांतर नंतर अतिशय दृढ अशा स्नेहांत झालें व त्याच्यापासून काव्यरचनेचे अनेक पाठ मी घेतले. काव्यविषयक चर्चेंत अनेक स्नेहपूर्ण रात्रीं आम्ही घालविल्या.

'अरविंद' मासिकासाठीं कविता निवडण्याचें काम श्री. आनंद कवि करीत असत. ही निवड करतांना ते आलेल्या कवितांची विभागणी तीन गटांत करीत. माझी कविता ते पहिल्या गटांत टाकीत असें मला भालेरावानें कळविलें होतें. 'उमाकांत' या नांवानें माझ्या कविता त्या वेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत. तें माझें संध्येंतील नांव आहे. माझ्याकडून अपेक्षित सहकार्य मिळत नाहीं अशी भालेरावाची तक्रार असे. 'अरविंदा'चा प्रत्येक अंक मी वाचीत असे परंतु त्याबद्दल गुणदोषचर्चा करीत नाहीं असें तो म्हणे. त्याचा आक्षेप बरोबर होता. माझ्या हातून तें झालें नाहीं हें खरें आहे.

१९२०–२१–असहकारितेच्या युगाचा प्रारंभ. सरकारी पदव्या, न्यायालयें आणि सरकारी ग्रँट घेणारीं शाळा–कॉलेजें यांवर बहिष्कार हा आंदोलनांतील एक महत्त्वाचा भाग होता. प्रचारक देशभक्तांचीं भाषणें ऐकून माझ्या मनावर परिणाम झाला. फर्ग्युसन कॉलेजच्या भिंती म्हणजे तुरुंगाच्या भिंती असेंहि वाटूं लागलें. मी ती. भाऊंना कळविलें कीं मी कॉलेज सोडलें. प्रोफेसर एस्. आर. अय्यर नांवाचे प्राध्यापक आम्हांला इंग्रजी शिकवीत. मद्रासी उच्चार एवढा एकच दोष सोडला तर त्यांचें अध्यापन आम्हांला आवडत असे. व्यासंग चांगला, वक्तृत्व प्रभावी आणि आविर्भाव प्रेक्षणीय यांमुळें त्यांचा तास अतिशय आनंदांत जाई. प्रो. अय्यर यांनीं कॉलेज सोडणें अनिष्ट कसें याबद्दल वर्गांत आम्हांला एक व्याख्यान दिलें. अर्थात्‌च आम्ही तें मानलें नाहीं.

उच्च शिक्षणाची आवश्यकता नाहीं अशा समजुतीवरच मी कॉलेज-मध्यें जात होतों. कॉलेज सोडायला मला कांहींतरी निमित्तच पाहिजे होतें. राष्ट्रव्यापी आंदोलन हें कांहीं लहानसहान निमित्त नव्हतें. मी कॉलेज सोडलें पुण्यांत निघालेल्या टिळक विद्यापीठानें चालविलेल्या वर्गांत मी गेलों. पण तें कांहीं खरें नव्हे. 'इतो भ्रष्टोस्ततो भ्रष्टः' अशीच कांहींशी माझी अवस्था झाली.

• • •

लेखांक सातवा

# भालेराव–राव–मी

**म**हाबळेश्वर ! श्रीमंतांचें हवा खाण्याचें ठिकाण. मला त्या ठिकाणीं एक महिना राहातां आलें कारण् भालेरावांचा भव्य बंगला तेथें आहे. मावशीनें सांगितलें, बापूसाहेबानें आग्रह केला आणि मी महाबळेश्वरला गेलों. बापूसाहेब, त्याचा मित्र राव, मी आणि बापूसाहेबांची पत्नी–वहिनी–एवढींच चार माणसें त्या प्रशस्त बंगल्यांत राहिलों. 'व्हिक्टोरिया कॉटेज' हें नांव केवळ विनयदर्शक होतें. बाळाजी पांडुरंग–बापूसाहेबाचे आजोबा ह्यांनीं हा बंगला बांधला. प्रत्येक उन्हाळ्यांत भालेराव मंडळी दोन महिने त्या बंगल्यांत जाऊन रहात असत. मी एक सामान्य स्थितींतला विद्यार्थी त्या बंगल्यांत राहिलों कारण मावशी त्या घरांत दिलेली होती. आयुष्यांतील सर्व सुखें स्वकष्टार्जित नसतात हेंच खरें.

या एक महिन्यांत सकाळ–संध्याकाळ त्या पर्वतावरील निरनिराळ्या पॉइंटस्पर्यंत सहल करून येणें हाच महत्त्वाचा कार्यक्रम असे. त्या हवेचें वैशिष्टच असें कीं रोज १०–१५ मैल फिरूनहि थकवा येत नसे. मटार आणि बटाटे अतिशय चवदार असतात. स्ट्रॉबेरीसारखीं ताजीं फळें खाण्याची मजा असते.

एके दिवशीं संध्याकाळीं कुठल्यातरी एका पॉइंटवर जाऊन आम्ही बसलों. रावनें ' रक्षाबंधन ' ह्या नाटकांतला एक टप्पा म्हटला. नानासाहेब फाटक यांच्या ' गिरिधर 'च्या भूमिकेंतील तें भाषण होतें. " सारी सृष्टीच

फिरली कीं माझ्या दृष्टींतच कांहीं फरक झाला आहे" असं तें वाक्य म्हणतांना डोळ्यांची अशी कांहीं विलक्षण हालचाल फाटक करीत आणि ती इतक्या त्वरेनें करीत कीं पहाणारा स्तिमितच होई. गणेश नाटक मंडळी तें नाटक करीत असे. वामनराव पोतनीस, शिवरामपंत परांजपे यांनीं काढलेल्या या नाटक मंडळीनें रत्नागिरीचे श्री. शेटे हे नवीन नाटककार पुढें आणले. 'रक्षाबंधन' या नाटकावर गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव'ची बरीच छाप आहे. 'वृंदावन' आणि 'गिरिधर' जुळे भाऊच वाटतात. रावचा आवाज मोठा नसला तरी त्याची अनुकरणशक्ति चांगली होती. भालेराव आणि राव इंग्रजी शाळेपासून एकमेकांचे स्नेही. राव भाई जीवनजी बिल्डिंगमध्यें ४ थ्या मजल्यावर रहात असे. आमचें तिघांचें एकत्र असें एक छायाचित्र आहे. त्याची एक प्रत मला देतांना बापूसाहेबानें चित्राखालीं लिहिलेला मजकूर असा आहे. "दोघांचा मध्यस्थ दोघांत तिसरा होऊं शकतो." बापूसाहेबानें अण्णासाहेबांचा एक फोटो मला देतांना त्या चित्राखालीं असा मजकूर लिहिला आहे: "या माणसाचे कांहीं गुण तुझ्या अंगीं यावें म्हणून."

राव त्या मानानें अबोलच असे पण त्याचा सहवास सुखद वाटे हें खरें आहे. भालेराव आणि राव ह्यांच्या मुळेंच कॉनन डॉईल या लेखकाच्या शेर्लॉक होम्स ह्या काल्पनिक गुप्त पोलिसाचा मला परिचय झाला.दैनंदिन जीवनांत भालेराव आणि राव दोघेहि शेरलॉक होम्स्चें अनुकरण करीत. मूकपणें कांहीं निरीक्षण करून त्यावरून अचानक निष्कर्ष बोलून सामान्य माणसांना चकित करण्याची पद्धति ते दोघे वापरीत. माझी भूमिका चकित होणाऱ्या सामान्य माणसाची–वॉटसन्ची असे. भालेरावमुळेंच इंग्रजी कादंबऱ्या वाचण्याचा नाद मला लागला.हॉल केन व मेरी कॉरेली या ग्रंथकारांच्या बऱ्याच कादंबऱ्या मी वाचल्या. कथानकरचनेचें कौशल्य आणि व्यक्तिरेखनांतील मार्मिकता हे दोन गुण विशेष वाटले. तें वाचन माझ्या लेखनशक्तीच्या विकासाला कांहीं प्रमाणांत उपयुक्त ठरलें असें मला वाटतें.

लिंगमाळ आणि सावित्रीचें खोरें या दोन स्थळांचें सृष्टिसौंदर्य संस्मरणीय आहे. लिंगमाळ दाट झाडींत असलेला एक खडकाळ माळ आहे. लहानमोठ्या दगडगोट्यांनीं तो माळ व्यापलेला आहे. आजूबाजूची दाट झाडी, तींतून कष्टानें प्रवेश करणारे सूर्यकिरण, वसंत ऋतूंतील नवपल्लव ही शोभा मनाला

मुग्ध करणारी होती. परंतु सावित्रीच्या खोऱ्यांतील सौंदर्याचें स्वरूप उग्र आहे. उभे राहून पहाण्याची सोयच नाहीं. पोटावर पडून तें रुद्र स्वरूप डोळ्यांत सांठवावें लागतें हेंच खरें !

या सगळ्या मुक्कामांत दोन दर्शनें मला अत्यंत विस्मयकारक वाटलीं. आम्ही प्रतापगडला गेलों. देवीचा मंडप जळून गेला होता. देवीची उघडी मूर्ति पहावयास मिळाली. त्या मूर्तीच्या अंगावर ठिकठिकाणीं सोन्याच्या रेषा स्पष्ट दिसत होत्या. वाटेवरच अफझलखान आणि सय्यद बंडा यांचीं थडगीं आहेत. शिवाजी महाराजांच्या असामान्य शौर्याचा प्रसंग ज्या परिसरांत घडला त्या परिसरांत उभें राहून मन शांत राहणें अशक्य आहे.

वाटेवरच घोममहाबळेश्वर लागते. कृष्णा, कोयना, वेण्या आणखी दोन नद्या अशा पांच नद्यांचे उगम देवळाच्या भिंतीला लागून असलेल्या पहाडांतून निघालेले स्पष्ट दिसतात. गोमुखांतून त्या पंचप्रवाहांचें पाणी एकत्र घेतलें आहे व तें एका कुंडांत पडतें तेंच तीर्थ !

महाबळेश्वरीं एक मोठा तलाव आहे.तो पोहून जातांना एकदां जिवावर बेतली. शेर अच्छेर पाणी पोटांत गेलें तरीहि तसाच धीर धरून देवाचें नांव घेतलें आणि पाणी तोडण्यास सुरुवात केली. दुसरें तीर गांठलें आणि कानाला खडा लावला कीं अनोळखी पाण्यांत पुन्हां उडी टाकायची नाहीं.

महाबळेश्वरचा एक महिन्याचा मुक्काम संपवून आम्ही परतलों. मावशी मला म्हणाली, "महाबळेश्वरची हवा मानवली बरं कां ! एकेक चिपटं धान्य मावेल इतके गाल वर आले आहेत." मावशीची ती उपरोधपूर्ण टीका खरीच होती.

मुंबईहून नाशिकला परत जाण्यापूर्वीं गंधर्व नाटक मंडळीचें 'संशयकल्लोळ' नाटक मी पाहिलें. गणपतराव बोडसांनीं फाल्गुनरावाची भूमिका अप्रतिम कौशल्यानें केली. नाटकाचा प्रयोग बसवितांना भरपूर परिश्रम घेतलेले दिसत होतें. स्वतः बालगंधर्व आणि गणपतराव बोडस तसेच कृत्तिकेची भूमिका करणारे श्री. रानडे परस्परांना परिणामकारक साथ देत. मराठी अनेक नाटकांतील हुकमी रंगतीचें नाटक म्हणून 'संशयकल्लोळ'ची ख्याति झाली. कितीतरी गांवगन्ना नाटचमंडळें नाटकाचे प्रयोग आपापल्या कुवतीप्रमाणें मोठ्या हौसेनें करीत.

‘लक्ष्मीधर’ ही ‘मानापमानां’तील गणपतरावांची हातखंडा भूमिका माझ्या १९१५-१६ मधल्या पुण्याच्या ७-८ दिवसांच्या मुक्कामांत श्री. अध्यापक यांनीं मला दाखविली होती. हास्याचे कल्लोळ उठविण्याचें विलक्षण सामर्थ्य गणपतरावांजवळ आहे. अनुकूल अंगलट आणि मिष्कील डोळे यांचा यथास्थित उपयोग गणपतराव करतातच. परंतु वाक्यें आणि शब्द यांच्या उच्चारांना आरोह–अवरोहाचीं नाजूक वळणें देऊन हास्यरस निर्माण करण्याचें गणपतरावांचें सामर्थ्य असामान्य आणि कष्टसाध्य आहे हें विसरून चालणार नाहीं.

गणपतरावांनीं ‘फाल्गुनरावाची’ भूमिका ज्या अर्थसंदर्भांत व्यक्त केली त्याबद्दल कांहीं तज्ज्ञांचे आक्षेप आहेत. गणपतराव जोशी आणि गणपतराव भागवत या भूमिकेचा आविष्कार अगदीं भिन्न पद्धतीनें करीत असें सांगतात. मी स्वतः गणपतराव भागवतांचें काम पाहिलें नाहीं, परंतु त्या आविष्काराचा हवाला देऊन श्री. मामा पेंडसे यांनीं केलेली भूमिका मी पाहिली आहे. आविष्कार बुद्धिगम्य खरा परंतु तो रंगला नाहीं. लोक अडाणी असा एक आक्षेप घेतला जातो. परंतु आपला बुद्धिवाद प्रभावी ठरला नाहीं म्हणजे लोकांना दोष देण्याची प्रवृत्ति मला मान्य नाहीं.

या नाटकाच्या संदर्भांत गणपतराव बोडसांच्या ‘माझी भूमिका’ या आत्मचरित्राचा प्रकाशक म्हणून मला अनुभवावा लागलेला एक प्रसंग येथेंच सांगून टाकतो. ‘बदनामी’ Defamation या कलमाखालीं एका संबंधित गृहस्थानें माझ्यावर फिर्याद केली. पुस्तकाचे लेखक सांगलींत आणि मुद्रक कोल्हापुरांत–दोघे संस्थानी नागरिक म्हणून कायद्याच्या कक्षेबाहेर –मी प्रकाशक ब्रिटिश हद्दींत म्हणून मी आरोपी झालों. कोर्ट ठाण्याचे–प्रत्येक तारखेला चक्कर म्हणजे दहा रुपयांचा फटका! शिक्षकाच्या पेशाला न परवडणारी ती चैन होती. श्री. चित्रे–माझे वकील यांच्यामार्फत मला हजेरीची माफी मिळावी असा मी अर्ज केला. एक बोहरी जातीचे गृहस्थ या खटल्याचें काम मॅजिस्ट्रेट म्हणून पाहणार होते. त्यांच्यापुढें मला उभे करण्यांत आलें. बोहरी लोक ज्या विशिष्ट रीतीनें मराठी बोलतात त्याच भाषेंत ह्या साहेबांनीं एक नाटचविषयक परिसंवाद मला ऐकवला. ‘संशयकल्लोळ’ नाटकांतली सारी ‘ड्रेपरी’ व फाल्गुनरावाची ती विलक्षण पगडी

यांचा इतिहास मला ऐकवल्यानंतरच माझी कैफियत त्यांनीं ऐकली. नाटकाचा नादी म्हणून माझ्याबद्दल सहानुभूति आणि फिर्यादीबद्दल अडवणूक असें धोरण साहेबांनीं स्वीकारलें. फिर्यादीचा निकाल तडजोडींत झाला. तडजोडीच्या दोन अटी ठरल्या. दुसऱ्या आवृत्तींत बदनामी करणारा मजकूर गाळावा. आणि 'केसरी' या वर्तमानपत्रांत मी माफी प्रसिद्ध करावी. दुसऱ्या आवृत्तीचा प्रसंग अद्याप आला नाहीं आणि माफीचा मजकूर लिहून देण्याला फिर्यादीला अद्याप सवड झाली नाहीं.

माझ्या वकिलांकडे नंतर शोध केल्यावर कळलें कीं मॅजिस्ट्रेट साहेबांचें एक पेट्रोमॅक्स बत्त्यांचें दुकान ग्रँटरोडवर बाँबे थिएटरजवळ होतें. धंदा करतांना मराठी नाटकांचें वेड त्यांना जडलें. मारवाडी आणि बोहरी समाजांना स्वतःची रंगभूमि नाहीं हें खरें. पारशी आणि गुजराती यांना स्वतःची रंगभूमि आहे. तरीहि हे सर्व अन्यभाषिक मराठी नाटकांवर लट्टू असत. हा त्या काळांतील व्यवसायी नटांचा आणि नाटककारांचा प्रभाव यांत शंका नाहीं.

● ● ●

लेखांक

आठवा

# माझें पहिलें व्याख्यान

गेलीं तीन वर्षे या ना त्या कारणानें अडलेला कॉलेजचा पहिल्या वर्षाचा माझा अभ्यासक्रम पुन्हां सुरू झाला. वैदिकाश्रमांतील एका खोलींत मी रहात असे–वसतिगृहांतील नासिक क्लबांत जेवण आणि एक वेळचा चहा कानिटकराच्या खोलीवर अशी त्रिस्थळी यात्रा होती

कानिटकर शास्त्रविषयाचा विद्यार्थी– बी. ए. शास्त्र–मी पहिल्याच वर्गात तरीहि या सहवासांतुन आमचा स्नेह सिद्ध झाला हें निश्चित. श्री. के. व्ही. केळकर, एस्. डी. भावे, पानसे हे सर्वजण हुषार आणि अभ्यासू होते. त्यांच्या मानानें मी खूपच मागासलेला. तरीहि ते सर्व मला बरोबरीच्या नात्यानें वागवीत–एक साहित्यिक म्हणून मला मान देत. चहा तयार करणें आणि घेणें ह्या तास–अर्ध्यातासांत विनोदाची खसखस खूप पिके. कानिटकर आक्रमक वाग्युद्धांत तयार असे. एखाद्याची फजिती होणें यासाठीं कानिटकरानें एक स्वतंत्र शब्द बनविला होता. " हौद्या " हा तो शब्द ! माझ्या दृष्टीनें त्या शब्दाची व्युत्पत्ति अशी. कुस्ती खेळण्याची जागा म्हणजे हौदा. चारीमुंडे चीत झालेल्या गड्याप्रमाणेंच वाग्युद्धांत पराभूत झालेल्या प्रतिस्पर्ध्याला " हौद्या " म्हणून हिणवणें असा त्या शब्दाचा संकेत आहे. रोज चहाच्या वेळीं कुणाचा ना कुणाचा तरी " हौद्या " होई. माझी भूमिका पुष्कळशी उदासीन असे. गेल्या तीन वर्षांतील प्रगतिशून्य जीवनक्रम हेंच त्या उदासीनतेचें कारण होतें.

चुनीलाल शेठ आणि मी कविता करीत असू. मला चुनीलालच्या कविता अतिशय आवडत आणि त्याला मी त्याच्या कवितांचें जें रसग्रहण करीत असे तें फार आवडे. कित्येक वेळां मी तें रसग्रहण लिहीत असे. काव्य-समीक्षणाची एक महत्त्वपूर्ण दृष्टि मला त्यामुळें प्राप्त झाली. आमच्या वाढत्या स्नेहाचें माध्यम होतें ही काव्यासक्ति. कितीतरी रात्री काव्यविषयक गप्पांत आम्ही घालविल्या आहेत. चुनीलालच्या सहवासांत आणि संभाषणांत मला एक चिकित्सक दृष्टि प्राप्त झाली.

माझे कांहीं स्फुट लेख त्यावेळच्या कॉलेजच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झाले. Value Payable या नांवानें मी ते लेख लिहीत असे. फार थोडयांना मी तो हें माहीत होतें. कॉलेजच्या जगांत त्या लेखांनीं लेखक म्हणून कांहीं प्रतिष्ठा मला प्राप्त झाली हें नाकारण्यांत अर्थ नाहीं.

भालेरावांच्यामुळें इंग्रजी कादंबऱ्या वाचण्याची गोडी मला लागली होती. नाशिकला आमच्या नाटयविषयक चळवळीला अधिक संघटित स्वरूप प्राप्त होत होतें. आयडियल क्लबाचे सभासद एकत्र जमत, कांहीं चर्चा करीत आणि खाण्यापिण्याचे कार्यक्रम होत. या कार्यक्रमांचीं पत्रें मला येत परंतु पुण्याला कॉलेजच्या पहिल्याच वर्षांत (First Year Arts) अडकून पडलेला मी त्या चळवळीचें नेतृत्व कसें करणार?

१९२१–२२ मध्यें नाशिकहून विद्यार्थ्यांचा एक नवा गट कॉलेजमध्यें दाखल झाला. त्यांत जानोरकर, गोरवाडकर, टी. जी. कुलकर्णी यांच्याशीं माझे स्नेहसंबंध जमले. त्या गटांत एक उच्चभ्रूंचा वर्ग होता. श्रीमंतांचीं तीं मुलें आणि त्यांचे चार मित्र गायन आणि तत्त्वज्ञान या विषयांची चर्चा जेव-तांना करीत. मला ते विषय न आवडणारे म्हणून अपरिचित होते. आज मला त्या अज्ञानाची खंत वाटते आणि जीवनविकासाच्या या दोन साधनांना मी मुकलों म्हणून दुःखहि वाटतें.

१९२२ च्या मार्चमध्यें परीक्षा झाली. मी घरीं परत आलों. एप्रिलमध्यें केव्हांतरी परीक्षेच्या निकालाचें पत्र आलें. गणित विषयांत Failure Condoned असा शेरा देऊन मला वरच्या वर्गांत जाण्याची सवलत देण्यांत आली होती. चार वर्षें एकाच वर्गांत अडलेलें अभ्यासक्रमांचें घोडें पुढें सरकलें!

१९२२–२३ हें इंटरचें वर्ष नव्या संवगडयांच्या सहवासांत पुष्कळच

व्यवस्थित गेले. टी. जी. कुलकर्णी आणि गोरवाडकर या दोघांची अभ्यास-पद्धति योजनाबद्ध असे. त्यांना वसतिगृहांत स्वतंत्र खोल्या होत्या. अभ्यासाला पोषक असें वातावरण निर्माण करून त्यांचा अभ्यास चालला होता. लॉजिक हा नवीन विषय आणि त्याचे नामवंत प्राध्यापक श्री. व्ही. के. जोग यांची कठीण प्रश्नांची चर्चा करण्याची आकर्षक पद्धति ह्यांमुळें अभ्यासक्रमांत मला नवी गोडी वाटूं लागली. फर्ग्युसन कॉलेजचीं जीं आकर्षणें त्या काळांत होतीं त्यांत प्रा. व्ही. के. जोग यांचें त्या काळांत स्थान फार वरचें असें.

१९२३ च्या जूनमध्यें इंटरमीजिएटची परीक्षा झाली व मी त्या परीक्षेंत उत्तीर्ण झालों. पहिल्याच वर्षी माझ्याकडून घडलेला हा विक्रम अनेकांना अपेक्षित नव्हता. परंतु तसें घडलें. कांहीं समकालीन बुद्धिमंत वरिष्ठांना धक्का बसला. माझ्या गैरहजेरींत तशी चर्चा झाली आणि निष्कर्ष असा निघाला कीं पुरोहित मठ्ठ नाहींत. नकारात्मक निष्कर्ष पण तोहि कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. परीक्षेंतील माझ्या यशापेक्षांहि दोन महत्त्वाच्या घटना १९२३ च्या फेब्रुवारींत व एप्रिल–मे महिन्यांत घडल्या. राव–भालेरावांचा स्नेही–ह्याचें मला फेब्रुवारींत पत्र आलें कीं मावशी परलोकवासी झाली. तिच्या निधनाच्या दुःखद वार्तेनें मी अस्वस्थ झालों. या मावशीच्या स्मरणार्थ म्हणूनच ‘ दुनिया ’ या नांवानें एक अनियमित दैनंदिन लिहिण्याचा उपक्रम मी सुरू केला व २५ वर्षें तो चालविला. आईनें मला जन्म दिला पण माझ्या मावशीनें मला जीवनविकासाच्या संधि दिल्या. तिच्याच प्रोत्साहनानें आणि आग्रहानें मी नाटकांतील भाषणें म्हणूं लागलों. चाळींतल्या दहावीस बायका जमवायच्या आणि रात्रीं जेवणें झाल्यानंतर माझा नाटकी भाषणांचा छोटासा कार्यक्रम करावयाचा. माझें म्हणणें झालें कीं आपल्या बहिणीचा मुलगा म्हणून सारें कौतुक एकवटून तिनें मला प्रश्न करावा, “ वामन, हें तूं कुठं शिकलास ? ” तो तिचा कौतुकाचा प्रश्न आजहि आठवतो आणि मन अस्वस्थ करतो. स्वतःच्या गुणांचें प्रदर्शन न करणारीं आणि मुलांच्या गुणांचें कौतुक करणारीं हीं जिवाभावाचीं माणसें आज आयुष्यांत नसावींत याचें विलक्षण वैषम्य वाटतें. त्यांचे ते कौतुकानें भरलेले डोळे कितीहि दूरवर पाहिलें तरी आज दिसत नाहींत हें दुःख कुणाला सांगावयाचें ?

परीक्षा झाल्यानंतर मी घरीं आलों आणि एप्रिल–मे महिन्यांत रवींद्र-

नाथांचें कांहीं साहित्य इंग्रजींतून वाचलें. कादंबऱ्या, कथा, काव्य वाचतांना माझ्या मनावर फार इष्ट असे संस्कार झाले. भाषेचा तो सुगंध मन धुंद करीत असे. कल्पनांचे ते उत्तुंग संचार मन उल्हासित करीत आणि व्यक्तिव्यक्तींचें तें भव्य दर्शन मन उदात्त करी. रवींद्रनाथांच्या त्या ग्रंथसंपदेनें मला आनंद दिला परंतु एका अनपेक्षित रीतीनें त्याच वाचनानें मला एका अवघड प्रसंगांत आणून सोडलें.

आमच्या कॉलेजच्या वक्तृत्व विभागाचे सेक्रेटरी म्हणून निवडून आलेले श्री. शिवराम गोविंद भावे हे गृहस्थ जुलै महिन्यांत एक दिवस माझ्या खोलींत आले व म्हणाले, "तुम्ही एक व्याख्यान द्या." मी व्याख्यानें फार चांगलीं देतों अशी टवाळी माझ्या कांहीं भोजनभाऊ मित्रांनीं केली व भावे महाशय ती खरी मानून माझ्याकडे आले. मी त्यांना परोपरीनें सांगितलें कीं मला बोलण्याची संवय नाहीं. माझा तसा अभ्यास नाहीं. परंतु माझं सगळं म्हणणं ऐकूनहि भावे यांना काय वाटलें कुणास ठाऊक—त्यांनीं स्वतःच निर्णय घेतला आणि मला सांगितलं कीं तुम्ही टागोरांच्या Nationalism या विषयावर बोला. मला तयारीसाठीं त्यांनीं तें पुस्तक तर दिलेंच परंतु मुंबईच्या रॉयल एशियाटिक लायब्ररींतून भाराभर पुस्तकें आणून दिलीं.

या ना त्या कारणानें माझ्या व्याख्यानाचा ठरलेला मुहूर्त लांबत चालला. अखेर १९२३ च्या ऑगस्टमध्यें एक दिवस उगवला आणि माझ्या व्याख्यानाची जाहिरात कॉलेजच्या बोर्डावर लागली.

ती संस्मरणीय संध्याकाळ मी कधींच विसरणार नाहीं. प्रा. श्री. एन्. जी. दामले त्या सभेचे अध्यक्ष होते. माझे कांहीं मित्र व हितचिंतक आणि साधली तर माझी टवाळी करतां यावी म्हणून अनेकजण त्या व्याख्यानाला जमले होते. अँफी थिएटरच्या स्टेजवर जाण्याच्या पायऱ्या चढतांना मनाची धाकधुक चढतच होती. तो एक विलक्षण क्षण होता. मी बोलायला सुरुवात केली. छाती धडधडत होती. समोर बसलेले विद्यार्थी कांहीं चमत्कारिक आकार धारण करीत आहेत असें वाटूं लागले. बांक तरंगूं लागले आणि एकंदर दृष्टिच तरळूं लागली. त्या अवघड अवस्थेंतून कोण मला पुढें ढकलीत होतें. कोणती शक्ति मला धीर देत होती हें मला कळत नव्हतें. नाटकासाठीं अल्पपरिश्रमांनीं तयार केलेला तो आवाज त्या परिसरांत घुमूं लागला. समोरचे

श्रोते माझें भाषण निमूटपणें ऐकत होते. तो एक अननुभूत संचार होत होता. माझ्या शरीराच्या कणाकणांतून तो संचार थरथरत होता. पहिल्या २–३ मिनिटांनंतर डोळ्याचे नि मनाचे सारे विभ्रम नाहींसे झाले. मी कांहींसा बेफान होऊन बोलूं लागलों. त्या विषयावर मी पद्धतशीर टिपणें लिहून काढलीं होतीं. पानापानांवरचे मुद्दे–उल्लेख मला माहीत होते. रवींद्रनाथांनीं प्रतिपादलेला आंतरराष्ट्रीय वाद मला मान्य नव्हता. एका परतंत्र देशाला "हें विश्वचि माझें घर" ही चैन परवडण्यासारखी नव्हती. राष्ट्रवाद कीं विश्वकुटुंबवाद–आधीं काय असा माझा सवाल होता. मी आवेशानें मत–प्रतिपादन करीत होतों आणि माझा नाटकाचा छंद शब्दाशब्दाला मला साथ देत होता.

मी भाषण संपविलें आणि श्रोत्यांनीं कडकडून टाळी दिली व माझ्या व्याख्यानाचें अभिनंदन केलें.

मी माझ्या मित्रमंडळींत जाऊन बसलों आणि त्यांनीं माझें मनःपूर्वक अभिनंदन केलें. यानंतर १८ उपवक्ते बोलले आणि त्यांना उत्तरें देण्याची संधि मला देण्यांत आली. मी माझ्या उत्तराच्या भाषणांत सर्व आक्षेपकांना यथास्थित उत्तरें दिलीं. माझ्या मूळ भाषणापेक्षांहि माझीं उत्तरें अधिक परिणामकारक झालीं असें लोक म्हणूं लागले. अध्यक्षांनीं समारोप करतांना मला भरपूर प्रोत्साहन दिलें, माझ्या वक्तृत्वाचा यथोचित गौरव केला आणि भविष्यकाळाबद्दल आशा व्यक्त केली.

श्री. भावे यांना हायसें वाटलें. टवाळी केली ते मनांत वरमले. माझ्या आयुष्यांतील कर्तृत्वाचा, यशाचा, आनंदाचा तो पहिला प्रसंग होता. मी आनंदानें अंतर्बाह्य भरून गेलों. रात्रीं क्लबांत जेवण करून मी व माझे मित्र गांवांत गेलों आणि मथुराभुवन मध्यें जाऊन एकेक 'दूधकी लोटी' प्यालों. ही आमची चैन !

रात्रीं अंथरुणावर अंग टाकलें आणि त्या पहिल्या आनंदाच्या भरांत मला केव्हां झोप लागली तें कळलेंच नाहीं.

● ● ●

लेखांक नववा

# केशवराव दाते :

सात ऑगस्ट १९२३ ला तें माझें पहिलें व्याख्यान झालें. कॉलेज-जीवनांतील ती माझी आठवण अत्यंत आनंददायक आहे यांत शंकाच नाहीं. त्या व्याख्यानाला रंग भरला याला एक प्रबळ कारण म्हणजे माझा नाटकाचा छंद ! माझी आवाजाची तयारी दमदार होती. गणपतराव जोशी आणि नानबा गोखले हे माझे आदर्श होते. विशेषत: नानबांचा तो पल्लेदार आणि झारदार आवाज माझ्या कानांत सारखा घुमतच असे. आवाजाची शास्त्रशुद्ध मेहनत कशी करावी याचें शास्त्रशुद्ध शिक्षण मला कधींच मिळालें नाहीं. मला स्वत:ला सुचलें तसेंच मी शिकत गेलों. गडकऱ्यांच्या नाटकांतील भाषा आवाजाच्या तयारीला चांगली असें माझें ठाम मत आहे. नादमधुरता हा तर त्या भाषेचा गुण आहेच परंतु एकेका वाक्याची लांबी म्हणतांना आवाजाचा दमदारपणाहि वाढतो असा माझा अनुभव आहे. वृंदावनाच्या भूमिकेंत केशवराव दाते तीं वाक्यें ज्या पद्धतीनें म्हणत ती पद्धत मला फार आवडते. केशवरावांचा आवाज निकोप नाहीं तरीहि टिपण साधून उडी घेणाऱ्या वाघाप्रमाणें त्यांची वाक्यावाक्यांची, शब्दाशब्दांची फेक श्रोत्यांच्या मनाचा अचूक वेध घेते. त्या प्रत्येक वाक्याचें अवसान असें असतें कीं श्रोता तल्लीन व्हावा. मास्टर दत्ताराम हा एकच नट आजच्या रंगभूमीवर त्या प्रभावीपणें बोलतो असें मला वाटतें.

गडकऱ्यांच्या नाटकांतील कांहीं उताऱ्यांचें पाठांतर नाटकाच्या

नादानें झालें आणि माझी 'भाषा' तयार झाली. गडकऱ्यांचें भाषाप्रभुत्व अनेक प्राचीन कवींच्या अभ्यासांतून सिद्ध झालें आहे. ज्ञानेश्वरांची अचाट कल्पकता आणि श्रीधराची अमृतमय रसवत्ता यांचा मनोज्ञ संगम गडकऱ्यांच्या भाषेंत दिसून येतो. आज साधेपणाचा म्हणजेच दारिद्र्याचा आम्हांला डौल वाटतो हें आमचें दैन्य तर आहेच परंतु परिश्रम न करण्याचा षंढपणाहि त्या प्रवृत्तींत आहे.

'नॅशनॅलिझम्' या रवींद्रनाथांच्या तीन निबंधांवर बोलण्याची तयारी करतांना श्री. भावे यांनीं मला संदर्भग्रंथांचा जो पुरवठा केला त्यामुळें विषय माझ्याशीं बोलत होता. माझ्या विवेचनांत जी उत्कटता होती तिचें कारण ती तयारी! त्या तयारीनें मी कॉलेजच्या विषयांचा अभ्यास केला असता तर —तर सहज पहिल्या वर्गांत आलों असतों ! ! पण तसें घडलें नाहीं हें खरें. मी व्याख्यानाचीं टिपणें लिहून काढल्यामुळें माझ्या बोलण्यांत शिस्त होती.

त्या व्याख्यानानें एक उत्तम वक्ता म्हणून कॉलेजमध्यें माझी ख्याति झाली. मी त्या संधीचा जास्तीत जास्त उपयोग केला असें मला वाटत नाहीं. श्री. भावे यांचा स्नेह आणि त्यांतून मजवर झालेले संस्कार मी कधींहि विसरणार नाहीं. रॉयल एशियाटिक लायब्ररीचें सभासदत्व असल्यानें श्री. भावे यांना पुस्तकांचा भरपूर पुरवठा होई. शेक्सपियरचें 'ज्यूलियस सीझर' हें नाटक बी. ए. च्या परीक्षेसाठीं आम्हांला नेमलेले होते. त्या नाटकाचा नायक कोण असा वादग्रस्त प्रश्न परीक्षेंत विचारला जाई. त्या नादानें आणि नाटकाच्या आवडीनें मी त्या विषयावरील पुष्कळ पुस्तकें वाचलीं. श्री. भावे मजकडे येऊन तासचे तास बोलत असत. मुकाट्यानें ऐकणें एवढेंच लहानसें मोल देऊन मला त्या भाषणांचा फार उपयोग झाला. साहित्याकडे पहाण्याची एक चिकित्सक दृष्टि मला प्राप्त झाली याचें मोठें श्रेय त्या बैठकींना म्हणजेच श्री. भावे यांना आहे.

स्वत: श्री. भावे यांनीं त्या काळांत दिलेलीं दोन नाट्यविषयक व्याख्यानें मला आठवतात. 'बेबंदशाही' या नाटकाचे प्रयोग पुण्याच्या विजयानंद थिएटरमध्यें ऐन भरांत त्यावेळीं होत होते. शाळीग्राम या नटाची संभाजीची भूमिका अशा कांहीं तडफेनें होत असे कीं साऱ्या प्रयोगाचें यश हा एकटा

क्रम ........................ दि: ........................
ांक ........................ नों. दि: ........................



←

नटश्रेष्ठ गणपतराव जोशी : ' माझी बहीण'मधील कोपनशील शरीराच्या कणाकणांतून संचारलेला मूर्तिमंत 'हॅम्लेट'



→

नटवर्य नानबा गोखले. 'अमात्य माधव'मधील रुद्रदाम. गेलीं ५० वर्षें ज्या नटाच्या आवाजानें माझा नाटकाचा छंद जागा ठेवला तो अवर्णनीय आवाज मी प्रथम १९१३मध्यें त्या नटाच्या 'नाना फडणीसा'च्या भूमिकेंत ऐकला.

........................

• मराठी नाटकें माझा छंद ....



←

तो इरसाल शकार
आणि
हा पैजारांनीं पायमल्ली
झालेला सुधाकर.



→

नटवर्य गणपतराव बोडस
ह्यांच्या भावशक्तीचे
दोन प्रबल आविष्कार.

• • • • • • • • • • • • • • • • • • • •

● मराठी नाटकें
माझा छंद . . . .

नट खाऊन जाई. केशवराव दाते, वैशंपायन, दातार, औंधकर, सीताराम जोशी सारेच मातबर नट या नाटकाची रंगत अशा कांहीं उत्कटतेनें खुलवीत कीं त्याला तोड नाहीं.

श्री. भावे यांनीं 'बेबंदशाही' या नाटकाचें परीक्षण करणारें व्याख्यान दिलें. नाटककार औंधकर स्वत: त्या व्याख्यानाला उपस्थित होते. एका ट्रॅजेडीचा–करुणरसात्मक नाटकाचा–इतका आशादायक शेवट केल्याबद्दल श्री. भावे यांनीं विशेष चर्चा केली. संभाजीचा अंत हजारों स्वराज्याभिमानी कार्यकर्त्यांना जन्म देईल हा तो आशावाद ! नाटकाकडे, नाटकाच्या परिणाम-कारक शेवटाकडे पाहण्याची ही एक नवी दृष्टि होती. श्री. भावे यांनीं आणखी एक इतिहासावर आधारलेला मुद्दा मांडला. संभाजीच्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत त्याला तीन युद्धें (Wars) लढावीं लागलीं. प्रत्येक युद्ध म्हणजे अनेक लहानमोठ्या लढायांची (Battles) सांखळी. या सर्व खटाटोपांत संभाजीला तुळशीच्या नादीं लागून दारूच्या व्यसनांत गर्क होण्यास वेळच कोठें होता असा प्रश्न उपस्थित करून संभाजीचें तें नाटकांतील चित्रण अनैतिहासिक आहे असा दावा श्री. भावे यांनीं मांडला. संभाजीचा दुर्दैवी शेवट आणि त्यावरून त्याचें मूल्यमापन करण्याची तर्कदुष्ट पद्धत सदोष आहे याची जाणीव त्या व्याख्यानांत श्री. भावे यांनीं करून दिली. श्री. औंधकर थोडेसें बोलले पण तें सारें गौरवामुळें नम्र झालेल्या माणसाचें बोलणें होतें. एक ख्यातनाम स्त्रीपार्टी आम्ही पहात होतों–ऐकत होतों हेंच आमचें समाधान !

श्री. भावे ह्यांचें दुसरें व्याख्यान म्हणजे "गडकऱ्यांचा विनोद" या विषयावर झालेलें. श्री. बन्याबापू कमतनूरकर त्या व्याख्यानाला अध्यक्ष होते. कॅफी थिएटर चिक्कार भरलें होतें. त्या गर्दींत गडकऱ्यांच्या अभ्यासकां-पेक्षां गडकरी–वेडेच अधिक. श्री. भावे ह्यांनीं शुद्ध विनोद म्हणजे काय या-संबंधीं–तात्विक चर्चा करून त्या निष्कर्षांच्या कसोटीवर गडकऱ्यांच्या विनोदाची चर्चा केली – त्या विनोदाचे गुणदोष दाखविले. गडकऱ्यांचे दोष दाखविणें म्हणजे अक्षम्य पातक असें आमचें मत होतें ! आम्ही गडकरी-भक्त चिडलों तर खरेंच परंतु खुद्द अध्यक्ष श्री. कमतनूरकर यांचाहि तोल सुटला आणि उपरोधपूर्ण टवाळीनें त्यांनीं श्री. भावे यांच्यावर हल्ला चढविला.

वक्रोक्तीला त्यांनीं नुसता बहर आणला. कडाडून टाळी देऊन आम्ही त्या प्रवृत्तीला आमचा पाठिंबा व्यक्त केला. भावे तो सर्व प्रकार पहात होते आणि ऐकत होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेहमींप्रमाणें माझ्या खोलीवर श्री. भावे आले. आघल्या दिवशींच्या अध्यक्षीय समारोपाचा विषय निघाला. भावे एवढेंच म्हणाले, " मी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर न देतां माझा उपहास करणें ही योग्य पद्धति नव्हे. झाला प्रकार बरा झाला नाहीं. " गेल्या कांहीं वर्षांत श्री. भावे ह्यांच्या त्या विषयावरील पुस्तकाला–गडकऱ्यांचा विनोद–पुष्कळच मान्यता मिळाली आहे. नाटचशास्त्राचे नियम लक्षांत घेऊन गडकऱ्यांच्या लेखनाचें मूल्यमापन करण्याचा पहिला प्रयत्न श्री. भावे यांनींच केला यांत संशय नाहीं.

महाराष्ट्र नाटक मंडळीनें दोन नवीन नाटकें याच काळांत रंगभूमीवर आणलीं. त्यांपैकीं एक म्हणजे श्री. त्र्यं. सी. कारखानीस यांनीं लिहिलेलें " राजाचें बंड " हें होय. या आधींचीं दोन बंडें, " बायकांचें बंड " आणि " तोतयाचें बंड " हीं दोन्हीं रंगभूमीवर गाजलीं. " राजाचें बंड " गाजलें तर नाहींच पण अल्पजीवी ठरलें. या नाटकाचा प्रयोग करतांना नटांनीं आपली शिकस्त केली होती. परंतु नाटचवस्तूच अशा क्लिष्ट स्वरूपांत मांडली होती कीं नाटकाची रंगत चढेना. श्री. केशवराव दाते त्या नाटकांत " कुमारची " भूमिका करीत. या भूमिकेसाठीं एक मखमलीचा पोषाख घालून केशवराव एका प्रवेशांत काम करतांना राजाचा सारा रुबाब व्यक्त करीत. "नाव घडवली गो चंदनाची–चंदनाची" असें एक होडी वल्हविणाऱ्या नावाड्याचें गाणें त्या प्रवेशांत म्हटलें जाई. त्या प्रवेशाची पार्श्वभूमि काव्यमय होती. " नौकाविहार " करणारा 'कुमार' तारुण्य आणि काव्य यांच्या धुंदींत बोलत असतो. झाडावर कुठेंतरी कोकिळा ओरडते आणि 'कुमार' त्या पंचम स्वराची नक्कल करतो. केशवराव दाते आपल्या त्या कांहींशा बसक्या आवाजांतून तो पंचम स्वर इतक्या उत्कृष्टपणें काढीत कीं ऐकणारा थक्क होऊन जावा. त्या नाटकाचे प्रयोग फारच थोडे झाले. श्री. दळवी 'वीरनवाली' या एका गांजलेल्या स्त्रीची भूमिका करीत. 'जालीयनवाला बाग' आणि 'वीरनवाली' यांची सांगड घालून त्या अत्याचारानें संतप्त

झालेल्या हिंदी जनतेला 'वीरनंवाली' च्या स्वरूपांत उभी करण्याचा प्रयत्न नाटककारानें केला होता. त्या नाटकांतील संघर्ष रंगवितांना राज्य म्हणजे काय, राजा कोणाला म्हणावे, आणि राजनीतीच्या रूढ कल्पनांविरुद्ध बंड म्हणजे " राजाचें बंड " ही सारी चर्चा प्रेक्षकांच्या डोक्यावरून जाई. केशवराव दाते, शाळिग्राम, वैशंपायन असे मातबर नट कामास आले परंतु नाटक गर्दी खेंचीना. धंदा म्हटला म्हणजे उच्च तत्त्वांना वाव नाहीं हें आणखी एकदां प्रत्ययाला आलें. ' बेबंदशाही ' च्या झगझगाटानंतर हें ' राजाचें बंड ' अगदींच थोतांड ठरलें.

● ● ●

12343

लेखांक दहावा

# राक्षसी महत्त्वाकांक्षा

**श्री**. शं. प. जोशी ह्यांच्या 'खडाष्टक' नाटकाचा प्रवेश महाराष्ट्र नाटक मंडळीनें पुण्याच्या विजयानंद नाटकगृहांत केला तो आम्ही पांच सहा मित्रांनीं एकत्र पाहिला. त्या प्रयोगानें दिलेला आनंद दीर्घकाळ आमच्या आठवणींत राहिला. पांच पुरुष आणि चार स्त्रिया अशा नऊ रत्नांवर आधारलेला तो प्रयोग अत्यंत प्रभावी होत असे. 'विचित्र-लीला' आणि 'मायचा पूत' ह्या दोन नाटकांचे लेखक श्री. शं. प. जोशी ह्यांचें हें तिसरें नाटक होय. चार जोडपीं आणि एक म्हातारा या नऊहि भूमिका अत्यंत उठावदारपणें केल्या जात. कर्कशरावाच्या भूमिकेंत वैशंपायन, कवीश्वराच्या भूमिकेंत केशवराव दाते, रागिणीच्या भूमिकेंत श्री. पोतनीस आणि गौरीच्या भूमिकेंत श्री. सीताराम जोशी आपल्या नाट्यकौशल्याची परिसीमा करीत. श्री. दाते यांच्याकडे या नाटकांत 'डबल रोल' होता. कवीश्वर-एक कॉलेज तरुण आणि सोकाजीराव- एक उल्लू समाज-कंटक या दोनहि भूमिका करतांना केशवराव कांहीं अप्रतिम नाट्यकौशल्य व्यक्त करीत. नाटकांतील काव्यमय भाषा कशी म्हणावी - उच्चारावी ह्याची समज केशवराव उत्कटतेनें व्यक्त करीत. 'प्रेमसंन्यास' नाटकांतील "लीले, लज्जाललिते लीले," या शब्दांतील 'ल' चा अनुप्रास केशवराव अशा कांहीं भावपूर्ण रीतीनें म्हणतात कीं ते स्वर आजहि कानांत घुमत आहेत. 'खडाष्टक' मधील बागेंतील प्रवेशांतील प्रियाराधन केशवराव त्याच उत्कटतेनें

करीत. सोकाजीरावाच्या भूमिकेंत केशवराव केवळ वेषांतरच करीत असें नाहीं तर स्वर आणि शारीरिक हालचाल यांतून जो ढंग दाखवीत त्याला मराठी रंगभूमीवर तोड नाहीं.

'खडाष्टक' या नाटकाची रंगत म्हणजे रंगमंचावरील सांघिक सहकार्याचा एक अलौकिक नमुना होय. येथें एकच नट इतरांना खाऊन टाकीत नसे. प्रत्येकजण दुसऱ्याला साथ अशा कांहीं कौशल्यानें करी कीं सर्वजण मिळून प्रेक्षकांच्या सामुदायिक आनंदाला सारखी भरती आणण्याचा नेटानें प्रयत्न करीत आहेत असें वाटे. गर्गशा आणि कवीश्वर या प्रवेशांत श्री. दळवी व श्री. केशवराव एकमेकांना जी साथ देत तिचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. नाटक मंडळी म्हणजे एक कुटुंब याचें प्रत्यंतर तो प्रयोग पाहतांना येई.

माझे एक स्नेही या प्रयोगाबद्दल म्हणत, "अंगठींतल्या खड्यासारखं नाटक बसलं आहे." सोन्याच्या कोंदणांतील रत्न ही कल्पना मला फार आवडली. या नाटकाचे लेखक श्री. शं. प. जोशी यांचा त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं परिचय होण्याचा योग आला. भाटेबुवांच्या नाटचकला प्रसारक मंडळीच्या बिऱ्हाडीं नाशिकला ते आले होते. त्यांचें नाटचप्रयोगाच्या यशस्वितेबद्दल एक ठरलेलें अनुभवसिद्ध गमक होतें. ते म्हणत, "एकदां प्रयोग पाहून गेलेला प्रेक्षक पुन्हा पुन्हां त्या प्रयोगाकडे खेंचला गेला तरच तो खरा प्रयोग." मराठी रंगभूमीवर सौभद्र, शारदा, मानापमान, स्वयंवर, संशयकल्लोळ हीं कांहीं संगीत नाटकें आणि राणा भीमदेव, हॅम्लेट, भाऊबंदकी, कीचकवध, शिवसंभव, हाच मुलाचा बाप, माईसाहेब, खडाष्टक यांसारखीं कांहीं गद्य नाटकें प्रेक्षक अनेकवार पहात हें सत्य आहे. या सर्व नाटकांच्या तऱ्हा भिन्नभिन्न आहेत. परंतु त्यांची रंगत म्हणजे सामुदायिकस्वरूपी आनंद एकच आहे. हेंच त्या धंद्याच्या यशस्वीपणाचें रहस्य होय असें मला वाटतें.

या काळांतील अनियमित लिहिलेल्या माझ्या दैनंदिनीचीं पानें चाळीत असतांना जें चित्र माझ्यासमोर उभें रहातें तें मुळींच प्रशंसनीय नाहीं. आमचा पांचसहाजणांचा एक गट होता. अत्यंत लहानसहान कारणांवरून आमचीं भांडणें होत आणि त्याचें पर्यावसान दीर्घकाल अबोल्यांत होई. नव्हती आमच्यांत महत्त्वाकांक्षा, नव्हती देशभक्ति – नव्हती कोठलीहि निष्ठा. कॉलेजमध्यें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–वर्गांत शेंकडा नव्वद विद्यार्थी अगदींच पोकळ

असत. महात्मा गांधींच्या चळवळीला जे फांटे फुटले होते त्यांत लोकमान्य टिळकांचे वारस श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांनीं विरोधाचा पवित्रा घेतला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरप्रणित उपहास – उपरोध महाराष्ट्रांत भरपूर लोकप्रिय झाला होता. आमच्या छोटचाशा मित्र मंडळांत त्याच प्रवृत्तीचें प्रतिबिंब दिसे. एकमेकांचीं उणींदुणीं काढून दुसऱ्याचा मर्मभेद करण्यांत आम्हां सर्वांना मोठें अवसान चढे. श्री. भावे मधूनमधून माझ्या खोलीवर येत व साहित्यविषयक चर्चा करीत. ते बोलत असत आणि मी तें ऐकत असे. तासचे तास हा 'श्रवणयोग' चाले. त्यांची सखोल विचार करण्याची पद्धति मला फार आवडे. शिजवून तयार केलेलें ज्ञान माझ्यासारख्या आस्थे-वाईक श्रोत्याला देतांना श्री. भावे यांनाहि हुरूप वाटे. मी कॉलेजमध्यें जात असे. परंतु माझ्या बौद्धिक प्रगतीची खरीखुरी जबाबदारी उचलली होती ती श्री. भावे यांनींच.

बी. ए. च्या परीक्षेसाठीं शेक्सपियरच्या दोन नाटकांचा अभ्यास मला करावयाचा होता. ज्यूलियस सीझर आणि ट्वेल्थ नाईट या दोन्ही नाटकांच्या अभ्यासासाठीं श्री. भावे ह्यांनीं मला रॉयल एशियाटिक लायब्ररीमधून कितीतरी ग्रंथ पुरविले. मी त्या ग्रंथांचें केवळ स्थूल वाचन केलें. इंग्रजी भाषेंत शेक्सपियर या नाटककारावर किती प्रकारचें टीकासाहित्य आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे मराठी नाटकांचा आमचा अभ्यास अगदीं पोरका वाटतो. ब्रॅडले हें नांव त्यावेळीं अतिशय प्रसिद्ध होतें. चार शोकान्तिका घेऊन त्याच्या अंगोपांगांची विस्तृत चर्चा ब्रॅडले ह्यांनीं लिहिली आहे. आमच्या शब्दकोशांत टीका म्हणजे टवाळी एवढा एकच अर्थ असल्यानें ब्रॅडले पद्धति आम्हांला परवडणार कशी ? तरीहि स्वतःवर अन्याय न करतां मी असें म्हणेन कीं नाटकाकडे पहाण्याची माझी दृष्टि तयार होण्यास त्या स्थूलवाचनाचा मला फार उपयोग झाला. प्लूटार्क या ग्रंथकाराचीं कथानकें घेऊन त्यावर आपल्या प्रतिभेनें शेक्सपियर एक नवा साज चढवीत असे. इंग्लंडच्या इति-हासावर त्यानें जीं नाटकें लिहिलीं त्यांचा विचार कसा करावा याचीहि एक निराळी दृष्टि मला प्राप्त झाली. तो काळ इंग्लंडच्या इतिहासांतील पराक्रमाचा-साम्राज्यविस्ताराचा काळ होता. स्पेन आणि इंग्लंड यांचीं सागरी स्वामि-त्वाचीं युद्धें संपून इंग्लंड 'सागराची स्वामिनी' झालें होतें. इंग्लंडचीं जहाजें

आपला अनिरुद्ध संचार करीत सातहि समुद्रांपलीकडच्या नवभूमीचा शोध घेत होतीं. नवचैतन्यानें रसरसणाऱ्या राष्ट्राचा तो महाकवि तीं नवरसानें रसरसलेलीं नाटकें लिहित होता.

या सर्व अभ्यासांत एक गोष्ट लक्षांत आली कीं टीकाकारांनाहि विचार करायला लावतील असे नवे नवे अर्थ इंग्रज नटनटींनीं या महाकवीच्या नाटकांना प्राप्त करून दिले. गॅरिक आणि आर्यव्हिंग या नटांची शहामत अशी कीं त्यांनीं या राष्ट्रीय नाटककाराला जागतिक साहित्यांत मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. युरोप आणि अमेरिका या खंडांतील नटनटी इंग्रज नटनटींचा अभिनय आपला आदर्श मानूं लागले.

१९२५ च्या एप्रिलमध्यें मी बी.ए. च्या परीक्षला बसलों. शेक्सपियरच्या नाटकावरील २५ मार्कांचा एकच प्रश्न लिहितांना माझा निम्मा वेळ गेला. सर्व प्रश्न लिहून झाले नाहींत. मला परीक्षेंत अपयश आलें.

याच काळांत प्रत्येक मे महिन्यांत ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी नाशिकच्या विजयानंद थिएटरमध्यें आपले हातखंडा प्रयोग करीत असे. पीट आणि ओटा ह्या आमच्या नाटकें पहाण्याच्या पेटंट जागा. श्री. बापूराव पेंढारकर, श्री. चापेकर, श्री. माशेलकर, श्री. नानासाहेब फाटक, शितूत, मामा साने, देशमुख, पिंगळे, कानडे असा मोठा मातबर नटसंच ललित-कलेच्या नाटकांतून काम करीत असे. केशवराव भोसले ह्यांच्या अकाली मृत्यूनंतर बापूराव पेंढारकरांनीं आपल्या कर्तृत्वानें या कंपनीचा दर्जा वाढविला. या कर्तृत्वाच्या दृष्टीनें मी असें म्हणेन कीं ब।पूराव पेंढारकर चालक–नट या नात्यानें एक असामान्य नट होऊन गेले. ‘ सत्तेचे गुलाम ’ या नव्या नाटकाच्या प्रयोगांत भूमिका करतांना जी तडफ ते दाखवीत तो पेंढारकरांचा आत्मा होय. गणपतराव जोशांसारख्या प्रतिभासंपन्न नटश्रेष्ठानें बापूरावांचें काम पाहून काढलेले उद्‌गार मननीय आहेत. “ देव तुला रूप द्यायला कसा विसरला रे ? ” या उद्‌गारांतील जिव्हाळा आणि प्रशंसा लक्षांत यायला मन नाटकी असावें लागतें. आईचें कौतुक आणि बापाची व्यवहारी दृष्टि ह्यांचें मधुर मिश्रण त्या उद्‌गारांत आहे.

‘ राक्षसी महत्त्वाकांक्षा ’ या नाटकाचा प्रयोग मी पाहिला. श्री. नानासाहेब फाटक यांच्या अभिनयाचा उच्चांक त्या प्रयोगांत पाहिला तसा

मला पुन्हा पहावयास मिळाला नाहीं. दरबारांत असलेल्या विक्रांताला आपला मुलगा मारला गेल्याची वार्ता कळते. एका पराक्रमी सेनापतीचा संताप आणि दुःख व्यक्त करतांना नानासाहेब जो मूक अभिनय करीत तो पाहून मला गणपतराव जोशांची आठवण झाली. स्टेजच्या मागील बाजूपासून सहासात पावलें टाकीत नानासाहेब पुढील बाजूला येत व या लहानशा पद-न्यासांत म्यान्यांतल्या तरवारीवर उजव्या हाताच्या पंजानें असे कांहीं विलक्षण आघात करीत कीं ती म्यान्यांतली तरवार एखाद्या क्रुद्ध नागिणीप्रमाणें जणू कांहीं फुत्कार टाकीत आहे असें वाटावें.

नानासाहेब फाटक ऐन तारुण्यांत–शरीर आणि आवाज यांचें तेज लखलखीत – कोणाहि नाटकवेड्याला भारून टाकण्यासारखी भूमिका नाटकांतून वठवीत असत. माझ्या मनाचा असा एक कल आहे कीं अशा भूमिकांनीं प्रभावित झालेल्या मनाला त्या व्यक्तीचा परिचय व्हावा, संभाषण करायला मिळावें असें उत्कटतेनें वाटे. श्री. नानासाहेब फाटक यांची मी एक मुलाखत घेतली. त्या मुलाखतींत त्यांच्याच तोंडून गणपतराव जोशी या नटाच्या कठोर साधनेची माहिती मला कळली. यापूर्वी ती माहिती दिली आहे.

स्वतः नानासाहेबांबद्दल पुढील गोष्टी ह्या मुलाखतींत कळल्या. मराठा स्टुडंटस् ब्रदरहुड या संस्थेनें केलेल्या 'सत्त्वपरीक्षा' नाटकांतील विश्वा-मित्राची भूमिका हीच फाटकांची पहिली भूमिका. त्यानंतर २–२॥ वर्षें पुण्याच्या वॉर ऑफिसमध्यें टायपिस्ट म्हणून त्यांनीं काम केलें. महाराष्ट्र भ्रातृहितचिंतक मंडळ या संस्थेचे सेक्रेटरी म्हणूनहि त्यांनीं काम केलें. श्री. शिवरामपंत परांजपे-प्रेमसंन्यासांतील गोकुळच्या भूमिकेनें नांवाजलेले - यांच्या ओळखीनें ते गणेश नाटक मंडळींत गेले. त्यावेळीं त्यांना रु. २५ पगार होता. नंतर ते ललितकलादर्श मंडळींत रु. ७५ पगारावर राहिले. नाटक मंडळीच्या फिरत्या जीवनाचा त्यांना कंटाळा वाटे. प्रथम त्यांचा आवाज किनरीसारखा बारीक होता. प्रयत्न करून त्यांनीं तो रुंद केला. गणपतराव जोशी, केशवराव दाते, कोल्हटकर यांच्यासारख्या नटांचीं कामें पाहून अभिनयाचा अभ्यास त्यांनीं केला.

प्रथम चापेकर आणि नंतर माशलकर या स्त्रीभूमिका करणाऱ्या

नटांनीं पेंढारकरांना साथ दिली. माशेलकर गोव्याकडचे–त्यांची बोलभाषा वेगळी असे. पेंढारकरांनीं त्यांना बोलण्याचें शिक्षण दिलें. नानबा गोखले आणि पेंढारकर यांच्या आवाजांत आणि भाषणपद्धतींत मला फार साम्य वाटलें.

हीं नाटकें पहातांना मला सारखें वाटे कीं आपण नाटक बसवावें, स्वतः भूमिका करावी. स्त्रीभूमिका करणारा नट मिळणें हा नेहमींचा यक्ष–प्रश्न ! स्त्रीभूमिकेच्या दृष्टीनें आम्ही घटिंगण–आमचा काय उपयोग ? शिक्षण आणि नाटकाचा छंद या दोन्ही आघाड्यावर मी पराभूतच होतों. १९२६ च्या जूनमध्यें मी बी. ए. झालों आणि एल्एल्. बी. च्या अभ्यासासाठीं पुण्याच्या लॉ कॉलेजमध्यें दाखल झालों.

• • •

## लेखांक अकरावा

# कायद्याचा अभ्यास

पुण्याच्या लॉ–कॉलेजचे वर्ग त्यावेळीं फर्ग्युसन कॉलेजच्या अँफी थिएटरमध्यें सकाळीं भरत असत. कांहीं मुंबईचे, कांहीं पुण्याचे आणि एक सांगलीचे अशा तीन ठिकाणांहून कायद्याचे तज्ज्ञ प्राध्यापक म्हणून यऊन आमच्या वर्गाला व्याख्यानें देत. मी गांवांतच रहात असे.

पुष्कळसा रिकामा वेळ असूनहि मी पैसे मिळविण्याचा कांहींच उद्योग केला नाहीं–पाहिला नाहीं. श्री. ल. ब. भोपटकर, श्री. शिगणे, सांगलीचे श्री. जी. आर्. अभ्यंकर यांचीं वक्तृत्वपूर्ण व्याख्यानें ऐकतांना मला फार आनंद वाटे. अभ्यंकर सर्वांत अधिक नाटचपूर्ण बोलत. हीं सर्व व्याख्यानें इंग्रजींतून होत. मुंबईचे श्री. घारपुरे, छोटे अभ्यंकर व आणखी एक प्राध्यापक यांचीं व्याख्यानें म्हणजे केवळ हजेरी लावण्याचीं व्याख्यानें असेंच मानलें जाई. घारपुरे हे तर प्रिन्सिपल परंतु त्यांच्या तासाला अतिशय गोंधळ होई. त्यांचें इंग्रजी म्हणजे "बाबू इंग्लिश" आणि कांहीं अवघड विचार साभिनय व्यक्त करण्याची धडपड यांतून भरपूर हास्य निर्माण होई. हिंदु लॉ या विषयावरील त्यांचा व्यासंग इतरांना मंजूर असेल परंतु हजेरी भरण्यासाठीं आलेल्या-आमच्यासारख्या टवाळांना त्याचें काय ?

१९२६–२७ याच काळांत 'गुलबकळी' या नांवाची एक दीर्घ-कथा मी लिहिली. ही गोष्ट कुणाला तरी वाचून दाखविल्याशिवाय मला चैन पडेना. म्हणून मी श्री. नारायणराव कुलकर्णी–'माईसाहेब' नाटकाचे

कर्ते व महाराष्ट्र कुटुंब मालेचे संपादक–यांच्या बिऱ्हाडी गेलों. विठूकाका खाडीलकर, यमूताई हीं माणसें मी प्रथमच पाहिलीं. अळवणी फौजदारांच्या वाड्यांत तें बिऱ्हाड होतें. माझ्या गोष्टीचें वाचन मीच केलें. नारायणरावांनीं मला भरपूर प्रोत्साहन दिलें. हा साहित्यिक परिचय मला फारच पोषक ठरला.

'गुलाबकळी' ह्या गोष्टीचें वाचन मी आणखी दोघातिघांपुढें केलें. त्या गोष्टींत मी श्री. माधवराव पटवर्धन यांच्या एका कवितेचा उपयोग केला होता. 'कुठें' हें त्या कवितेचें नांव. माधवराव त्या वेळीं डेक्कन जिमखाना पोस्टाच्या वरच्या मजल्यांतील एका खोलींत रहात असत. कॉलेजला जातांना मी आपण होऊन त्यांची भेट घेतली व त्यांना गोष्ट वाचायला दिली. 'उद्यां या' असें त्यांनीं सांगितलें. दुसऱ्या दिवशीं मी माधवरावांना भेटलों. त्यांनीं मनःपूर्वक माझें स्वागत केलें–गोष्टीबद्दलचा अनुकूल अभिप्राय सांगितला. "पुरोहित, तुमची गोष्ट मी आमच्या रविकिरण मंडळांत काल वाचून दाखविली. ह्यापुढें माझी कोठलीहि कविता तुम्ही माझ्या परवानगीशिवाय खुशाल वापरीत जा. तुम्ही फार Chaste लिहितां." मला तें ऐकून आनंद वाटला. माझी ती गोष्ट कोठेंच प्रसिद्ध झाली नाहीं. परंतु त्या गोष्टीनें माधवराव पटवर्धनांचा लोभ मला मिळवून दिला. माझ्या आयुष्यांतील एक अत्यंत स्वागतार्ह घटना म्हणून मी त्या गोष्टीकडे पहातों. माधवराव एक व्यासंगी पंडित होते परंतु त्यांच्या मनाचा उदार दृष्टिकोन ही एक दुर्लभ गोष्ट होय.

"गुलाबकळी' ह्या दीर्घ कथेबरोबरच मी आणखी सहा लघुकथा लिहिल्या. 'बाळ–दृष्ट', 'श्रावण–धारा', 'स्मृति–प्रेम', 'प्रेम–वन', 'वत्सला', 'सखाराम' ह्या सहा गोष्टींपैकीं 'बाळ–दृष्ट' प्रसिद्ध झाली. 'सखाराम' ही गोष्ट त्या काळच्या एका प्रथितयश साहित्यिकाच्या हातून हरवली. एका शेतकरी मुलाचें स्वच्छंद जीवन मी त्या गोष्टींत रंगविण्याचा प्रयत्न केला होता. लिहावें ही प्रेरणा बळकट होती. परंतु त्या काळांत त्या प्रेरणेला पोषक वातावरण नव्हतें.

केव्हांतरी एका मे महिन्यांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांची मी मुलाखत घेतली. डॉ. भालेराव ह्यांची ओळख सांगून मी गेलों. माझ्या गोष्टी तात्या-

साहेबांनीं अतिशय बारकाईनें वाचल्या आणि तपशीलवार सूचना केल्या. ह्या निमित्तानें झालेल्या मुलाखतींत तात्यासाहेबांनीं व्यक्त केलेला एक अभिप्राय आठवतो. ते म्हणाले, 'तरुणांच्या मुलाखतींत आमचा फायदा असतो. आम्हांला दिसतात तरुण चेहरे—त्यांचे हंसरे डोळे—तारुण्यानें रसरसलेलीं शरीरें आणि त्यांचा दुर्दम्य उत्साह ! याच्या उलट तरुणांना पहावे लागतात ते आमचे सुरकुतलेले चेहरे आणि वार्धक्यानें निराश झालेले डोळे ! " पुढें आयुष्यांत शिक्षकाचा व्यवसाय करतांना मला त्या बोलण्याची वारंवार आठवण होत असे.

लॉ–कॉलेजमध्यें असतांना स्नेहसंमेलनासाठीं 'कांचनगडची मोहना या नाटकाचा प्रयोग करावा म्हणून मी प्रयत्न केले. आधींच नाटकांत भाग घेऊं इच्छिणारांची संख्या कमी–त्यांत मिशा काढून स्त्रीपार्ट करायला कोणी मिळणें अधिकच कठीण. मारून मुटकून एकदोघांना तयार केले. लॉ–कॉलेजच्या एका खोलींत दोनतीन दिवस तालमी झाल्या. आपसांतील हेव्यादाव्यांमुळें नाटक मोडलें. मला वाईट वाटलें पण त्याचा उपयोग नव्हता. संघशक्तीनें करावयाच्या कार्याची आम्हांला संवय नव्हती–शिक्षण नव्हतें. फुकट वहाणाऱ्या पाण्यासारखा आमचा विद्यार्थ्यांचा वेळ व्यर्थ जात होता. रिकाम्या डोक्यांत सैतानाचे कारखाने भर वेगांत चालत होते.

श्री. नारायणराव कुलकर्णी "पैसा" ही कादंबरी लिहीत असतांना मी त्यांच्याकडे जात असे. तेव्हां कादंबरीच्या कथानकाबद्दल, स्वभावरेखनासंबंधी कांहीं चर्चा होई. 'महाराष्ट्र कुटुंब माले'साठीं मी एक कादंबरी लिहावी असें त्यांनीं माझ्या मनांत भरवून दिलें आणि मीहि होकार दिला. 'महाराष्ट्र–लक्ष्मी' ह्या नांवानें कांहीं प्रकरणें लिहून मी त्यांना दाखविलीं. त्यांना तीं आवडलीं. चालायला शिकणाऱ्या मुलाला पांगुळगाड्याचा जो उपयोग तसाच लेखकाच्या उमेदवारीच्या काळांत या प्रोत्साहनाचा उपयोग असतो. मला नंतर जो अनुभव आला आणि कांहीं लेखकांशीं जो संबंध आला त्याचा निष्कर्ष हाच कीं लेखनाची वेल भक्कम प्रोत्साहनाच्या वृक्षावरच चढते. कांहीं लिहावें यापेक्षां काय लिहावें ही प्रेरणा बलवत्तर होण्यासाठीं हें प्रोत्साहन आवश्यक आहे. भवभूतीसारखा असामान्य लेखक कधींकाळीं कुठेंतरी जन्माला येणाऱ्या 'समानधर्मा रसिका'च्या आशेवर तग धरील

परंतु बहुसंख्य लेखकांची समानधर्मा रसिका ही अपरिहार्य गरज आहे. शाई आणि कागद ह्यांचा मध्यस्थ हा रसिक असतो. लेखनाच्या प्रथमावस्थेंत लेखकाला आपण स्वतःशीं बोलत आहोंत त्याप्रमाणें या रसिकाशीं बोलणें आवश्यक आहे.

१९२६–२७ ह्या वर्षांत मला सवड भरपूर आणि उद्योग कमी. त्यामुळें माझ्या नाटकाच्या छंदाला भरपूर वाव होता. 'भारतसेवक समाज' ह्या नांवाच्या एका क्लबांत माझे स्नेही श्री. कानिटकर व मी सभासद म्हणून दाखल झालों. बुधवार पेठेंत श्री. पोपटलाल शहा ह्यांचें खादीभांडार त्यावेळीं होतें. 'मत्स्यगंधा' या नाटकाचा प्रयोग होणार अशी पाटी पाहून आम्ही आंत शिरलों. ह्या प्रयोगाचे संचालक कोण इत्यादि चौकशी आम्ही केली. गोविंदराव नांवाच्या एका गृहस्थानें रास्ता पेठेतील एका घराचा पत्ता दिला. एका सुटीच्या दिवशीं आम्ही तेथें गेलों. तेथें श्री. बर्वे – कवि आनंद – ह्यांच्या 'दर्यादौलत' ह्या नाटकाचें हस्तलिखित वाचायला मिळालें. चिमाजी अप्पाची भूमिका मला देण्यांत आली. नाटकाचें वाचन चालू असतां घडलेला एक प्रसंग सांगतों. त्यावरून क्लबवाल्या सदस्यांचा शैक्षणिक दर्जा लक्षांत येईल. "तुझी डा" एक सदस्य वाचीत होते. त्या शब्दाचा बोध होईना. म्हणून विचारलें, "अहो, हें काय वाचीत आहांत ?" उत्तर मिळालें "जसें लिहिलें आहे तसें वाचीत आहे." बरं, पुढें वाचा, "वाचन चालू झालें" "वाळ शिजणार नाहीं." संपूर्ण वाक्याचा अर्थ कळला आणि खूप हंसू आलें तुझी डाळ शिजणार नाहीं ह्यांतील डाळ शिजणारचीं पदें पाडून अभावित विनोद निर्माण झाला. त्या नाटकाचा प्रयोग झालाच नाहीं. स्त्रीपार्टयांचा अभाव हेंच मुख्य कारण.

'बेबंदशाही' नाटकांतील संभाजीच्या भूमिकेंत गाजलेले व महाराष्ट्र नाटक मंडळींतून बाहेर पडलेले एक नट श्री. शाळीग्राम ह्यांनीं १ ऑगस्टच्या मुहूर्तावर एका क्लबाची स्थापना केली. नारायणराव कुलकर्णी मला तेथें घेऊन गेले. तेंव्हां मी अभिष्टचिंतनपर छोटेसें भाषण केलें. महारथी कर्णासारखाच पराक्रमी आणि तितकाच दुर्दैवी असलेल्या ह्या नटाबद्दल मला सतत जिव्हाळा वाटला. शाळीग्राम नट म्हणून मी लिहिलेला एक लेख वाचून शाळीग्रामला खूप आनंद वाटला. स्वतः परिश्रम करून मिळविलेल्या गुणांचा

कुणीतरी गौरव करावा ही मानवी स्वभावांतील विलक्षण भूक आहे. विचारा शाळीग्राम अत्यंत हलाखींत वारला. त्यानें आशेनें स्थापन केलेल्या क्लबाला माणसांची उणीव–विशेषत: स्त्रीपार्टी नटांची उणीव म्हणून तो क्लब चालला नाहीं.

ह्याच काळांत महाराष्ट्र–नाटक–मंडळीचे सेवानिवृत्त मालक श्री. त्र्यंबक सीताराम कारखानीस ह्यांची मुलाखत शनिवार पेठेंतील त्यांच्या घरीं जाऊन घेतली. गणपतराव भागवत ह्यांची इंग्रजी स्वाक्षरी असलेलीं पुस्तकें मी तेथें पाहिलीं. श्री. कारखानीस कांहींसे अबोल आणि एकंदरीत आपल्या विषयीं आजूबाजूच्या लोकांत दबदबा असावा असें बोलणें–नाट्य-शिक्षण देईन असें ते म्हणाले. प्रत्यक्ष कांहींच घडलें नाहीं. Amature theatricals by C. Lang Neil वाचल्याची नोंद माझ्या दैनंदिनींत आहे. १८ प्रकरणें असलेलें तें पुस्तक मला विचार–प्रवर्तक वाटलें. हौशी नट संघांनीं प्रयोगासाठीं शक्यतोंवर Light comedy निवडावी, वस्त्रप्रावरणांचा खटाटोप असलेलीं नाटकें निवडूं नयेत असा त्या लेखकाचा अभिप्राय आहे. पुस्तकाची रचना अनुभव आणि व्यासंग ह्यावर आधारलेली आहे. पहिल्याच प्रकरणांत ख्यातनाम हौशी नटांची माहिती देतांना प्रसिद्ध इंग्लिश लेखक चार्लस् डिकन्स ह्याच्याबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत.

" All who ever saw Dickens act have declared that in gaining a great novelist the world lost a most accom plished actor "

हौशी नटांचा विचार एवढ्या साक्षेपानें करणाऱ्या देशांत नटांची व नाटककारांची अखंड परंपरा निर्माण होत रहावी हें स्वाभाविक आहे. मराठी रंगभूमीच्या दुखण्याची चिकित्सा करणारांनीं हा साक्षेप आधीं लक्षांत घ्यावा ! व्यवसायी नटांबद्दल जेथें उपेक्षेचें रान माजलेलें आहे तेथें हौशी नटाला विचारतो कोण ?

पहिल्या एल्. एल्. बी.ची परीक्षा झाली आणि मी घरीं परत आलों. श्री. बापूसाहेब टकले ह्यांनीं आपल्या रविवार पेठेंतील वाड्यांतील एक दिवाणखाना नाटकाच्या तालमीसाठीं आम्हांला दिला. 'तोतयाचें बंड'

या नाटकाच्या तालमी—म्हणजे टिपेच्या आवाजांतील आरडाओरड सुरू झाली. पहिल्या अंकांतील पहिल्याच प्रवेशांतील सुखनिधानाचें एक प्रदीर्घ भाषण म्हणण्याची दमछाकी आम्ही करीत असू. "सदाशीवराव भाऊ पेशवा पानपतावर शत्रूंशीं लढतांना मेला नाहीं. त्यांचं रक्त स्वराज्यांतल्याच एका किल्ल्याच्या खडकावर सांडणार याचं पातक तुमच्या—नाईक—तुमच्या डोक्यावर बसणार. सोडा माझे पाय." अशा आशयाचें तें भाषण होतें. 'ही आली दु:खाची छटा' असें बोलून त्या छटेचें प्रात्यक्षिक करावयाचें ! आमचे हेहि प्रयत्न निष्फळच ठरले. स्त्रीपार्टी नट नाहीं हेंच त्या अपयशाचें कारण. गजबजलेल्या शहरांतील आमचें तें "अरुण्यरुदन" ऐकतो कोण ? नाशिकला व्हावयाच्या नाट्य—संमेलनांचा आवाज क्षीण होत चालला होता. कां कुणास ठाऊक परंतु तसें घडत होतें खरें ! १९२७ ते १९३२ ह्या सहा वर्षांत मी पहिल्या एल्. एल्. बी.च्या परीक्षेला दर सहा महिन्यांनीं बसत होतों आणि नापास होत होतों ! !

• • •

लेखांक

बारावा

# नासिकचें नाट्यसंमेलन

**का**यद्याचा अभ्यास माझ्या मन:प्रवत्तीला मानवत नव्हता. कायदा आणि काव्य ह्यांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. यशस्वी वकिलीच्या व्यवसायांत लागणाऱ्या गुणांत नाट्याला फार मोठें स्थान आहे हें खरें. वकील होण्याला माझा नेमका तोच गुण प्रतिरोध करीत होता.समोर कायद्याचें पुस्तक आणि मन नाटकाच्या सृष्टींत अनिरुद्ध विहार करीत असे. पुढील सहा वर्षें ही मानसिक प्रतारणा चालू होती.

१९२७ च्या मे महिन्यांत मी एक सक्त मेहनतीचें काम केलें. त्यावर्षी पुण्यास व्हावयाच्या साहित्यसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षीय भाषणाची मुद्रणप्रत मी लिहून तयार केली. त्यासाठीं रोज १२ ते ५ बसून मी ती प्रत लिहीत असे.भाषण अद्ययावत् व्हावे व त्यांत दोष राहूं नये म्हणून स्वत: श्री. वि. स. खांडेकर नाशिकला येऊन राहिले होते. त्यांच्या चर्चा होत. परंतु त्या मला ऐकायला मिळाल्या नाहींत. प्रा. भा. ल. पाटणकर :–तात्यासाहेबांचे जांवई–यांच्या बिऱ्हाडीं तात्यासाहेबांचा मुक्काम असे. तीन साडेतीनला मला एक कप चहा मिळे. केव्हां तरी खांडेकर अथवा तात्यासाहेब माझें प्रत करण्याचें काम कसें चालू आहे तें पाहून जात. मी मांडी मोडून लिहितों: तासचे तास न कंटाळतां एकाग्रतेनें काम करतों ह्याचें केव्हांतरी कौतुक केलें जाई. त्या अध्यक्षीय भाषणाची एक छापील प्रत मला सप्रेम भेट म्हणून मिळाली. ‘जिथें नांदते श्रीपादाची

कलावती वाणी ' असा ज्यांच्या भाषेचा गौरव गडकऱ्यांनीं केला ते कोल्हट-कर नाटककार, कादंबरीकार, टीकाकार आणि महाराष्ट्र–गीताचे महान् रचनाकार –गडकऱ्यांचे गुरु–त्यांचा परिचय झाला–त्यांचें व्यक्तित्व जवळून पहावयास मिळालें ह्याचा माझ्या मनावर संस्कार झाला ह्यांत शंका नाहीं.

जून महिन्यांत परीक्षेचा निकाल लागला. मी नापास झालों. आतां घरींच राहून अभ्यास करावा असें ठरलें. १९१८ ते १९२६ ह्या नऊ वर्षांत जून महिन्यांत पुण्याला जाण्याचा कुलधर्म टळला. नापास झाल्याचें खरें दु:ख तें होतें. पुण्याचें अनिर्बंध जीवन आतां नाहीं–पुण्याचें तें उत्साहवर्धक वातावरण नाहीं–कांहीं नाहीं. कांहीं महिने अतिशय जड गेले.

नाटकाच्या छंदांतील त्या काळांतील माझे सोबती म्हणजे बाळू–आतां बाळासाहेब काळे, शंकरराव निफाडकर बाळू–आतां बाळासाहेब कानिटकर, प्रल्हाद ठाकूर–औरंगाबादकर, आणि गंगाधर सोहनी हे होत. संध्याकाळीं हत्तीलाटेच्या खडकावर बसून गप्पाष्टकें झोडायचीं हीच आमची चळवळ ! नाशिक गांवाचें हें वळणच आहे. पावसाळा सोडून उरलेल्या आठहि महिन्यांत गांवकऱ्यांचे लहानलहान गट नदीच्या दोन्हीं कांठांनीं पेरलेले असत. कोणी देवधर्म करी तर कोणी केवळ कुटाळक्या करी. हरिभक्त परायणापासून देशभक्तपरायणापर्यंत सर्व थरांतील लोक या प्रवाहांत आढळून येत.

नाशिकला व्हावयाच्या नाट्यसंमेलनाचे वारे पुन्हां वाहूं लागले. एक प्रेक्षक म्हणून विजयानंद थिएटरमध्यें भरलेल्या त्या अधिवेशनाला मी हजर होतों. विद्वद्वर्य श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर ह्यांना अध्यक्षपद देण्यांत आले होते. स्वागताध्यक्ष होते प्रा. डी. जी. पाध्ये. ह्या अधिवेशनाचीं सर्वच सूत्रें मुंबईहून हलत होतीं. बालनटांच्या एका नाटक मंडळीनें–मला वाटते शिरगुप्पीकरांच्या आनंद संगीत मंडळीनें आलेल्या पाहुण्यांचा भोजनखर्च केला. अच्युत बळवंत कोल्हटकर आणि मामा वरेरकर यांचीं भाषणें ऐकावयास मिळालीं. "सरकार आपली पॉलिसी सोडीत नाहीं आणि पोलिसी सोडीत नाहीं" हें वरेरकरांचें वाक्य बराच काळ लक्षांत राहिलें. महत्वाचे फारसे ठराव झाले नाहींत. सिनेमा महर्षी श्री. धुंडीराज गोविंद फाळके रंगमंचावर मानाच्या जागीं बसले होते. 'रंगभूमि' ह्या नांवाचें दोन हप्त्यांत

केलें जाणारें एक नाटक त्यांनीं लिहिलें होतें.मी त्या नाटकाचा प्रयोग पाहिला नाहीं अथवा तें नाटक वाचलेंहि नाहीं. ज्यांनीं तें नाटक पाहिलें त्यांना भरपूर करमणूक झाली एवढें कळलें. नाशकांत त्यावेळीं नांव घेण्यासारखा एकहि नाटकाचा क्लब नव्हता.

त्या वर्षीं गणपति उत्सवांत मी खूप जाग्रणें केलीं. रात्रभर झोंप नाहीं असें तें जाग्रण एखाद्या अंमली पदार्थाप्रमाणें अंगावर येई. त्या जाग्रणांचा आणि माझ्या अनियमित वागण्याचा परिणाम म्हणून सरत्या पावसाळ्यांत दम्याची व्यथा सुरू झाली. आईला तीच व्यथा होती. अनुवंशिक ह्या दृष्टीनें मी त्या व्यथेकडे पाहूं लागलों. पुढें २७ वर्षें पावसाळ्यांत तो त्रास मी काढीत असे. तात्पुरता औषधोपचार करून माझा नित्यक्रम चालत असे.

'त्याग' ह्या नांवानें पुढें प्रसिद्ध झालेली कादंबरी मी त्या वर्षीं आषाढी एकादशीला लिहावयास सुरुवात केली व ३–४ प्रकरणें लिहिलीं. 'महाराष्ट्र-कुटुंब–माले'साठीं वर्गणीदार मिळवावे म्हणून नारायणराव कुलकर्णी नाशिकला आले. त्यांच्या त्या कामासाठीं प्रल्हाद व मी गांवांत हिंडलों तसें नासिकरोड येथेंहि गेलों. एक आठवड्यांत तीस वर्गणीदार आम्ही मिळविले. तीस वर्गणीदारही त्या काळाच्या मानानें लहानसहान गोष्ट नव्हती. प्रल्हादचा व माझा ह्या निमित्तानें झालेला परिचय दृढतर होत गेला व त्याचें रूपांतर स्नेहांत झालें.

मराठी नाटकमंडळ्यांचें साधारण स्वरूप त्या काळांत असें होतें. नाटकमंडळी गद्य असो वा पद्य असो. नायक नायिका आणि विनोदी भूमिका अशा तीन नटावरच नाटकमंडळीचा बहुतांश भार असे. स्त्रीभूमिका पुरुषच करीत असल्यानें त्याचें स्वरूप, गोरेपण स्त्रीसदृश अंगलट ह्या गोष्टींकडे कटाक्षानें लक्ष पुरविलें जाई. कोकणपट्टी आणि गोवा ह्या प्रदेशावर ऐतिहासिक काळांत मराठ्यांनीं जशा स्वाऱ्या केल्या तशाच स्वाऱ्या मराठी नाटक मंडळ्यांच्या मॅनेजरांनीं केल्या. स्त्रीभूमिकेला साजेशीं गरीबांचीं मुलें त्या प्रांतांतून 'पळवून' आणणें हाच त्या स्वाऱ्यांचा हेतु असे. 'पार्सल' अशी विशिष्ट संज्ञा ह्या पळवून आणलेल्या मुलांच्या बाबतींत वापरली जात असे. प्रथम प्रथम हीं मुलें बावरून जात असत आणि त्यांना ह्या व्यवसायांत स्थिर करण्याचा एक रूढ मार्ग त्या काळांत होता. रात्रीं रंग लावून स्त्रीवेषांत मुरके

मारणाऱ्या ह्या कोवळ्या मुलांना तो वेष उतरल्यानंतरहि अंथरूणावर आपल्या कुशींत घेऊन झोपणारा कुणीतरी नाटकमंडळींतील बहाद्दर असायचाच. हें अगदीं Open secret उघड गुपित असे. नाटक व्यवसायांतील त्या काळच्या कांहीं नटांत मद्यपान वेश्यागमन हीं जशीं व्यसनें होतीं तशीच ही 'पोरेबाजी' हेंहि एक व्यसन होतें. उत्तर हिंदुस्थानांत लखनौचे लवंडे प्रसिद्ध आहेत. मनुष्य स्वभावांतील एक चमत्कारिक शरीर–व्यथा एवढेंच फार तर ह्या व्यसनाबद्दल म्हणतां येईल. स्त्रीसहज नाट्य व अभिनय ह्या अनुपानाशिवाय साधणारच नाहीं असा त्या काळांतील कांहीं नाट्यव्यवसायिकांचा जबरदस्त दावा होता. समाजांतील हा एक चमत्कारिक पदर आहे. सर्वसामान्य प्रवृत्तीच्या माणसाला हें मोठें कठिण वाटे आणि सुशिक्षित सुसंस्कृत माणसें ह्या व्यवसायांत न जाण्याचें तें एक जबरदस्त कारण होतें.

ह्याच व्यवसायाची आणखी एक काळी कड आहे तीहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. पुरुष भूमिका करणारे कांहीं नट असामान्य देखणे असत. त्यांचें नाटकांतील बोलणें चालणें इतकें आकर्षक असे कीं वेश्या तर त्यांच्यावर फिदा होत परंतु कांहीं कुलीन स्त्रियांनाही तें आकर्षण अनावर होई. नाटक–धंद्यांतील एखाद्या नटानें एखाद्या कुलीन स्त्रीला आपल्या कक्षेंत ओढून आणल्याचीं उदाहरणें नाहींत असें नाहीं. परंतु ह्यांतील समाज–विघटना करणारा भाग म्हणजे ह्या व्यवसायांतील कांहीं नट एखाद्या कुलीन स्त्रीला वश करण्यासाठीं सांघिक प्रयत्न करीत. त्या प्रयत्नांचें स्वरूप असें असे. कुलीन स्त्रियांच्या जाण्यायेण्याच्या मार्गावर–दुकानांतून, नदीघाटावर, देवळांत अशा नटांचे अड्डे असत. कांहींवेळां हें शरसंधान नाट्यप्रयोग चालू असतां रंगभूमीवरून चालत असे.

स्त्रियांनींच स्त्रीभूमिका कराव्या असा तथाकथित वास्तववाद मराठी मासिकांतून सुरू होता. त्यावेळीं त्या मताचे विरोधक ह्या व्यवसायांत जाऊं इच्छिणाऱ्या स्त्रियांचें शील बिघडेल अशी एक हरकत घेत असत. तडजोड म्हणून असें म्हटलें जाई कीं दुसऱ्याच्या मुलीनें, बहिणीनें, बायकोनें वाटेल तर स्त्री भूमिका करावी–ती मी पाहीन. परंतु माझ्या घरांतील स्त्रीनें करूंच नये. जें मला दुसऱ्यानें केलेलें पहायला आवडतें तें मी स्वतः करणार नाहीं ही मनुष्य स्वभावांतील नाजूक खोंच आहे.

बिचारे मराठी नट ! आधींच अशिक्षित, व्यवसायांत आर्थिक स्थिरता नाहीं–समाजांतल्या प्रतिष्ठितांची सहानुभूति नाहीं–कलेच्या उपासनेचा दिव्य मार्ग नाहीं–रात्रींच्या जाग्रणांनीं आणि नानातऱ्हेच्या व्यसनांनीं शरीर नाना रोगांचें माहेरघर झालेलें–त्यांची कठोर नालस्तीच सर्वांनीं केली ! चुकलेल्या ह्या मुलांना उराशीं धरून दिलासा देण्याची उदारता कोण दाखविणार ?

● ● ●

लेखांक तेरावा

# शालेय रंगभूमीवरील एक क्रांति

**ना**सिकच्या स र का री शाळेचा मी एक माजी विद्यार्थी! माझें सारें दुय्यम शिक्षण म्हणजे यत्ता ३ री ते ७ वीपर्यंतचें ह्याच शाळेंतून झालें. आग्रारोडवरील दगडी इमारतींत ही शाळा जाण्यापूर्वीच मी मॅट्रिकची परीक्षा पास होऊन कॉलेजमध्यें प्रविष्ट झालों होतों. १९१८ ते १९२७ ह्या काळांत विद्यार्थ्यांची नवी पिढी शाळेंत दाखल होऊन शिकत होती. मी इंग्रजी तिसरींत असतांना 'चतुरगडच्या विनोदी स्त्रिया' ह्या नांवाच्या नाटकांतील एका विनोदी प्रवेशांत मी एक लहानशी भूमिका केली. महाकवि शेक्स्पीयरच्या Merry wives of windsor ह्या नाटकाचें तें रूपांतर आहे आणि त्याचे लेखक श्री. पी. एम्. लिमये नांवाचे कोणी गृहस्थ आहेत ह्याची मला माहितीच नव्हती. १९२७ मध्यें नासिक हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून श्री. पी. एम्. लिमये नासिकला आले. शाळेंतील विद्यार्थ्यांना स्त्री–भूमिका करण्याची परवानगी देऊन श्री. लिमये ह्यांनीं नाशिकच्या सनातनी विचारसरणीला मोठाच धक्का दिला. श्री. बाळू काळे हेच त्या नाटकाचे दिग्दर्शक! मी केवळ हौस म्हणून नाटकाच्या तालमींना जात असे. श्री. काळे ह्यांच्या प्रेरणेनें मी पुरुष–भूमिका सांगू लागलों. नाट्य–दिग्दर्शनाचा शास्त्रीय अभ्यास न करतांच मी दिग्दर्शक झालों. चांगल्या नटांचीं नाटकें पाहिलेलीं एवढेंच माझें भांडवल आणि ज्ञान! 'चंद्रग्रहण' ह्या नाटकाचा प्रयोग काळे आणि मी या दोघांनीं बसविला. ह्या नाटकांत स्त्रीभूमिका करण्यासाठीं

दत्तु खरे आणि गंगाधर कुकडे अशीं दोन मुलें निवडलीं. दत्तु खरे देखणा नव्हे. दत्तु रंगला–त्याला टोप चढविला आणि लुगडें नेसविलें. स्त्री वेषांत तो असा कांहीं दिसू लागला कीं त्याला वर्गांत रोज पहाणारांनाहि त्याच्या खांद्यावर हात ठेवण्याचा मोह टाळतां आला नाहीं. नाटकाचा प्रयोग–प्रेक्षकांच्या दृष्टीनें फारच उठावदार झाला.

आमचा नाटकें करण्याचा छंद स्त्रीपार्टी नाहीं म्हणूनच अडला होता. आमच्या मनाला मृगजळाप्रमाणें हीं स्त्रीपार्टी मुलें दिसू लागलीं. आज ना उद्यां हींच मुलें आपल्या उपयोगी पडतील असें वाटू लागलें. दत्तु खरे आज मोठा डॉक्टर झाला आहे.

'चंद्रग्रहण' नाटकाच्या त्या प्रयोगानें १९२७ च्या नाशकांत अल्पप्रमाणांत कां होईना पण खळबळ उडवली हें खरें. नाटकाची आवड असणाऱ्या चार लोकांत श्री. काळे आणि मी माहीत झालों. नाट्यदिग्दर्शन ह्या विषयाचें आजचें तांत्रिक आणि मंत्रशून्य स्वरूप पाहिलें म्हणजे त्यावेळीं आम्ही केलेल्या धाडसाचें कौतुक वाटतें. जिद्दीच्या मराठी नटांनीं आपल्या नाट्यप्रयोगांतून आम्हांला नाटकाचा उज्ज्वल मंत्र दिला होता. त्या मंत्रानें भारावून जाऊन आम्ही त्या अवघड मार्गावर धांवत होतों. पाण्यांत पडलें म्हणजे पोहतां येतें तसाच नाट्य दिग्दर्शनाचा आमचा प्रयत्न होता.

शाळेंतील विद्यार्थ्यांचीं नाटकें बसवितांना मला कांहीं हृद्य अनुभव आले. नाशिकच्या मराठा हायस्कूलचें 'करीन ती पूर्व' हें नाटक मी बसवीत होतों. शिवाजीची भूमिका करणारा विद्यार्थी चक्क 'न'चा 'ण' आणि 'ण'च्या ठिकाणीं 'न' म्हणत होता. माझ्या कानाला तें बोलणें अशुद्ध म्हणून खटकलें मी एक आठवडा जिवाचा आटापिटा करून त्याला शुद्ध बोलणें शिकविण्याचा प्रयत्न केला. एक दिवस मलाच जाणीव झाली कीं आपला हा खटाटोप व्यर्थ आहे. कुणाला ठाऊक खऱ्या खुऱ्या शिवाजी महाराजांची हीच भाषा असेल. मी तो नाद सोडून दिला. मी त्या विद्यार्थ्याला सांगितलें कीं बोलण्यांतली भावना कायम ठेव आणि भाषेच्या शुद्धतेकडे लक्ष देऊं नकोस.

'करीन ती पूर्व' ह्या नाटकाच्या तालमी चालू असतांच एक प्रसंग घडला. वैद्य नांवाचा एक विद्यार्थी तालमीच्या वेळीं प्रॉम्पटींग करीत असे. रात्रीं ११ वाजतां तालीम संपवून मी परत चाललों होतों. शाळेंतून बाहेर

पडल्यावर कांहीं अंतरावर त्या विद्यार्थ्यानें मला थांबविलें. त्याला माझ्याशीं कांहीं बोलावयाचें होतें. परंतु तें कसें बोलावें हेंच त्याला समजत नव्हतें. थोड्या वेळानें तो म्हणाला, "तुम्ही तालीम घेत असतांना मला कससंच होतं." 'कसंस' ह्या शब्दाचा खुलासा त्याला परोपरीनें प्रश्न करून काढून घेतला. बाजी, शिवाजी आणि हिरोजी ह्यांचीं भाषणें मी म्हणत असे. माझ्या त्या म्हणण्याचा त्याच्यावर परिणाम होत असे; अंगावर रोमांच उभें रहात आणि पोटांत आनंदाच्या उकळ्या फुटत. मी त्याला धीर दिला. "घाबरूं नकोस. तूं भाग्यवान् आहेस. तुझं मन संस्कारक्षम आहे तें तसेंच राहूं दे." तो प्रसंग, त्या विद्यार्थ्याची ती भारावलेली चर्या मी विसरूं शकत नाहीं. नाटककाराच्या प्रभावी लेखनकलेचें तें दिव्य सामर्थ्य त्या विद्यार्थ्याच्या बावरलेल्या वृत्तींतून बोलत होतें. नानबा गोखले ह्या नटाच्या वाणीनें मी भारावलों आणि नाटकाचा नादी बनलों. तसाच वैद्य माझ्या आवाजानें व नाटककाराच्या भाषावैभवानें भारावला.

ह्याच वर्षांत केव्हांतरी ह्यू वालपोल ह्या लेखकाची एक कादंबरी "Fortitude" मी वाचली. एका अनाथ मुलानें स्वतःच्या हिमतीवर आणि प्रयत्नशीलतेवर स्वतःचा विकास कसा करून घेतला ह्याची ती कहाणी आहे. रहायला घर नाहीं. –मार्गदर्शन करायला मायेचीं माणसें नाहींत–शिक्षण घ्यायला पैसा नाहीं–अर्धपोटी–कुडकुडायला लावणाऱ्या थंडींत पाय पोटाशीं घेऊन पुस्तकाच्या दुकानाच्या तळघरांत झोपणारा पोऱ्या ही ज्याच्या आयुष्याची सुरुवात तोच नंतरच्या आयुष्यांत एक प्रतिष्ठित नागरिक होतो–घराचा मालक होतो–पार्लमेंटचा सभासद म्हणून निवडून येतो हा विकास–हे प्रगतीचे टप्पे लेखकानें अतिशय भावपूर्ण रीतीनें रंगविले आहेत. विरोधी परिस्थितीशीं दुर्दम्य सामना करणाऱ्या या मुलाला आपल्या जीवनाचें रूपक म्हणून एक देखावा मनःचक्षूपुढें दिसत असतो. तो सगळाच उतारा मी त्या पुस्तकांतून उतरून घेतला आहे. इंग्रजी भाषेचें अर्थ व्यक्त करण्याचें सारें सामर्थ्य त्या उताऱ्यांत आहे. माझ्या मराठी नाटकांच्या छंदांत मी अनेकवेळां निरुत्साही झालों–निराश झालों त्या त्या वेळीं तो उतारा मी आठवीत असे आणि कामाला लागत असे. "It is not life that matters but it is the courage that you bring to that life" हें एकच सूत्र सगळ्या

कादंबरींतून विशद केलें आहे. ज्या जीवनांत धैर्य आणावयाचें त्या जीवनाचें स्वरूप लेखकानें पुढील शब्दांत वर्णन केलें आहे. कलेचा आपल्या उपासकाला हा निर्वाणीचा संदेश आहे.

" Go back to the life. you have fought for yourself. Now go and fight for others. There are so many wreched people who need your help." (एकच प्याला नाटकांतील पद " झणि दे कर या दीना ! प्रेम जलाविन मृतशा मीना " यांत हाच विचार सांगितला आहे.)

Go and work for them. Art is a very dangerous game. One is baffled now and then the world like a mysterious power always holds our life in suspense. Success is never a surety. It is always disinterested work selfless toil that is needed.

कला एक धोक्याचा खेळ आहे. कलाक्षेत्रांत पाऊल टाकणारे किती विद्यार्थी–किती कलार्थी ह्या धोक्याची दखल घेतात आणि त्या क्षेत्रांत पाय रोवून प्राणपणानें आपला प्रवास चालूं ठेवतात .हा खरोखरच विचार करण्या-सारखा प्रश्न आहे.

सरकारी हायस्कूलच्या मुख्याध्यापकांनीं श्री. लिमये ह्यांनीं स्नेह-संमेलनाच्या नाट्य–प्रयोग करण्याच्या पद्धतींत क्रांति केली. गांवांतील इतर शाळांना त्या प्रवृत्तीचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली हा त्या क्रांतीचा प्रत्यक्ष परिणाम होय. न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री. अध्यापक ह्यांनीं " चंद्रग्रहण " ह्याच नाटकाचा प्रयोग करा व त्यांत मुलांना स्त्री-भूमिका घेऊं द्या असें सांगून आपल्या शाळेंत इष्ट ती सुधारणा घडवून आणली. शाळेच्या विद्यार्थ्यांचा परिचय ह्या निमित्तानें झाला–होऊं लागला. माझ्या छंदाला कृति रूप करण्याला हा परिचय कारणीभूत झाला. त्यांपैकीं कांहीं विद्यार्थ्यांचा उल्लेख करणें आवश्यक आहे.

गंगाधर सोहनी हा एक धाडसी विद्यार्थी होता. नाकींडोळीं नीटस, आत्मविश्वासानें भरलेल्या अशा या विद्यार्थ्याशीं माझा परिचय झाला. त्याच्यांतला एकच दोष म्हणजे त्याची भरगच्च दाढी. न्हाव्यानें दाढी केल्या-

नंतर तेवढा भाग हिरवागार दिसत असे. नाटकांत स्त्रीपार्ट करायचा म्हणजे गालांचा कोवळेपणा आवश्यक आहे. गंगाधर स्त्रीपार्ट करायला तयार होता. गालांचा लुसलुशीतपणा आणि शरीराचा डौल इत्यादि मिजास आम्हांला परवडणारी नव्हती.

नाशिकला हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज १९२४ मध्यें निघालें. त्या कॉलेजचीं स्नेह-संमेलनाचीं नाटकें होऊं लागलीं. त्यांतून श्री. पांडोबा कुलकर्णी हे एक निष्ठावंत सहकारी मिळाले. रंग गोरा-पण तोंडावर देवीचे वण आणि एक डोळा खोटा हें त्यांचें अवसान! आवाज मात्र धारदार आणि बापूराव पेंढारकरांच्या भूमिका करण्याचें वेड. महाराष्ट्र-नाटच-मंदिर ह्या नांवानें जी संघटना आम्ही उभारली तिच्या उभारणींत पांडोबांचे परिश्रम फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झालें!

• • •

लेखांक चौदावा

# आमचा पहिला नाट्य-प्रयोग

"महाराष्ट्र नाटच-मंदिर" या नांवांतच त्या संस्थेच्या कार्यकर्त्यांची नाटचविषयक भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे माझ्या माहितीप्रमाणें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं नाटकाचे क्लब होते. मंदिर शब्दाला कांहीं परंपरागत अर्थ आहेत–भावना आहेत–संवेदना आहेत. मराठी रंगभूमीकडे –म्हणजेच मराठी नाटकांकडे पहाण्याचा आमचा दृष्टिकोन भक्तियुक्त आदराचा आहे. मराठी व्यवसायी नटांच्या सर्व दोषांसह त्यांच्यावर आमचें नितांत प्रेम होतें. मला नाटकाची प्रेरणा देणारे आणि तिचा परिपोष करणारे सर्वच नट व्यवसायी. ध्रुवताऱ्याप्रमाणें अढळ असणारी त्यांची कला मला कुठल्या तरी अज्ञात क्षितिजाकडे खेचून नेत होती.

महाराष्ट्र–नाटच–मंदिर ह्या संस्थेची घटना तयार करणारे शिल्पकार माझे मित्र श्री. बाळासाहेब कानिटकर होत.आम्ही पांचजण आमच्या आमच्या मगदुराप्रमाणें महाराष्ट्र–नाटच–मंदिर ह्या कल्पनेला साकार करण्याची धडपड करीत होतों. श्री. बाळासाहेब काळे, श्री. कानिटकर, श्री. प्रल्हादराव औरंगाबादकर, श्री. शंकरराव निफाडकर आणि श्री. पांडोबा कुलकर्णी ह्या पांचजणांचें तें सहकार्य रचनात्मक दृष्टीनें फार मोलाचें होतें. आमच्या ह्या पहिल्या उत्साहांत काम करीत असतांना मला आणखी कांहीं व्यक्तींचा ऋणनिर्देश केला पाहिजे. श्री. भय्यासाहेब कुलकर्णी ह्यांनाहि नाटकाची दांडगी हौस. त्यांच्या सुवाच्य अक्षरांत मंदिराचे कितीतरी दप्तर लिहिलेलें

आहे. श्री. बापूसाहेब लोथे ह्यांनीं मंदिराच्या स्थापनेपासून या उपक्रमाबद्दल आणि व्यक्तिशः माझ्याबद्दल जो अबोल लोभ व्यक्त केला त्याचें महत्व मला आज कळतें. हरी थत्ते आणि दामू साने–दोघे काळ्यांचे स्नेही परंतु अतिशय कष्टाळू. बाबूराव तासकर, बाबूराव खारकर, बाबूराव सुगंधी, राजाभाऊ वेलदे आणखी त्यांचे कोर्टकचेरींतील सहकारी ह्यांचाहि आम्हांला पाठिंबा होता. बाबूराव खरे, शंकरराव सोहनी, नाना ढोके, गोखले हा एक गट आमच्यांत सामील होता. परंतु ह्या सर्व सहकाऱ्यांपैकीं प्रल्हाद औरंगाबादकर ह्याची बुद्धिमत्ता विलक्षण होती. त्याचें शिक्षण अल्प पण त्याचा अनुभव, त्याची सलगी देण्याची पद्धत, त्याचें संघटणाचातुर्य, त्याचें धाडस अशा किती गुणांचें वर्णन करावें तेंच कळत नाहीं. त्याचे वशिले आणि तो स्वतः कुठपर्यंत भिडत असे ह्याचा मला कधींच थांग लागला नाहीं.

एक नाटय–प्रयोग करून महाराष्ट्र–नाटय–मंदिराची स्थापना करावयाची असा आमचा संकल्प झाला. परंतु स्त्री–भूमिका करणारीं मुलें आमच्याजवळ नव्हतीं. नाटकाची निवड केल्याशिवाय भूमिकांची योजना आंखतां येत नाहीं. भूमिका घेणारीं माणसें पाहूनच नाटकाची निवड करावयाची असते. असा हा अन्योन्य संबंध आहे. श्री. पांडोबा कुलकर्णी ह्यांनीं ह्या बाबतींत प्रयत्न करून "स्त्री भूमिका" ही बाजू सांभाळली. "माईसाहेब" ह्या नाटकाचा प्रयोग करण्याचा निर्णय आम्ही घेतला. श्री. वसंतराव कुलकर्णी–प्रि. श्री. टी. ए. कुलकर्णी ह्यांचे पुतणे. ह्यांना पांडोबांनीं "माईसाहेब" ह्या स्त्रीभूमिकेसाठीं तयार केलें. आमचा धाडसी वीर गंगाधर सोहनी ह्यानें "कमल"ची भूमिका करण्यास संमति दिली. प्रेमाबाईच्या अगदीं लहान भूमिकेसाठीं डोंगरे ह्या नांवाचा एक विद्यार्थी आम्हांला मिळाला. स्त्री–भूमिका–स्त्रीभूमिका हा आतांपर्यंत न सुटणारा यक्षप्रश्न सुटला. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. प्रत्यक्ष नाटय–प्रयोगांत पुढील लोकांनीं भूमिका केल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| अण्णासाहेब | : बाळासाहेब काळे | माईसाहेब | : वसंतराव कुलकर्णी |
| उत्तम | : अ. वा. वर्टी | कमल | : गंगाधर सोहनी |
| केशव मामा | : पांडोबा कुलकर्णी | अमृतमामा | : वा. श्री. पुरोहित |
| टांगेवाला | : बा. मो. कानिटकर | शाळीग्राम | : पोटे |

प्रेमाबाई : डोंगरे

न्यू इंग्लिश स्कूलचे वर्ग त्यावेळीं राजेबहाद्दर वाड्यांत भरत असत. शाळेच्या चालकांनीं त्या वेळच्या ड्रॉइंग हॉलमध्यें तालमी घेण्याची आम्हांला परवानगी दिली. ही दुखांबी नाट्य व्यवसाय दृष्ट्या ऐतिहासिक महत्वाची आहे.विजयानंद अथवा ब्रह्मानंद हीं थिएटरें नव्हतीं त्या काळांत. व्यवसायी नाटक मंडळ्यांचीं नाटकें येथेंच होत. ४००–५०० इतकेच प्रेक्षक त्या काळांत नाटकाला जमत. तालमी करतांना मला नेहमीं नानबा गोखले ह्यांची आठवण येई. कारण अमृतमामा ही त्यांचीच गाजलेली हातखंडा भूमिका होय.

महाराष्ट्र–नाट्य–मंदिरानें "माईसाहेब" नाटकाच्या प्रयोगासाठीं विजयानंद थिएटर भाड्यानें घेतलें. थिएटरचे मालक श्री. शंकरशेट चुंबळे ह्यांनीं एका रात्रीचें भाडें रु. ३० घेऊन आम्हांला प्रयोगाची सवलत दिली. प्रयोगाचा खर्च वजा जातां कांहीं पैसा शिल्लक रहायचा तर कॅनव्हॅसिंग करणें अपरिहार्य होतें. प्रल्हादच्या ओळखी आणि आमचे श्रम असें करून आम्ही तिकिटें खपविलीं. हें काम करीत असतांना प्रल्हादची संगत मला मिळाली. राजे लक्ष्मण राजे भोंसले, ह्यांच्यापर्यंत आम्ही गेलों. माझा बाल स्नेही चिंतामणी–पाटणकर ह्याच्या ओळखीनें आमचा वशीला लागला. त्यांच्या म्हणजे राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं प्रयोग करावयाचा असें ठरलें. राजेसाहेबांचा गोषा नाटक पहायला येणार–प्रल्हादनें चादरी लावून तीहि व्यवस्था केली. प्रल्हाद कोठेंच अडत नसे.

रावबहादूर पाध्ये त्यावेळीं नाशिकच्या कॉलेजांत इंग्रजी विषय शिकवीत. जुन्या पिढींतले एक नामवंत रसिक कार्यकर्ते म्हणून आम्ही त्यांना नाट्यप्रयोगाचें निमंत्रण दिलें. आमच्या घटनेप्रमाणें आम्ही त्यांना महाराष्ट्र-नाट्य–मंदिराचे पहिले अध्यक्ष म्हणून मानाची जागा दिली.

बापूराव पेंढारकर ह्यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळीचा मुक्काम त्या वेळीं नाशिकलाच होता. कंपनीचें बिऱ्हाड मेनरोडवरच्या रेगे धर्मशाळेंत होतें. दर पांच दहा मिनिटांनीं मी त्या धर्मशाळेच्या ५० पायऱ्या चढून धांवत जात असे आणि बापूरावांकडे कांहींतरी नाटकांतील वस्तु मागत असे. माझ्या अशा दोनतीन खेपा झाल्यानंतर बापूराव मला हंसून म्हणाले "पुरोहित, रात्रीं आमच्या कपडेपटाच्या साऱ्या पेट्या मी उघडून ठेवायला सांगेन तुम्हाला पाहिजे ती वस्तु घ्या. आतां पुन्हां धांवत येऊं नका." त्यांचा

तो आदेश मी मानला. अमृतमामाच्या भूमिकेसाठीं मला पांढरा लाँग कोट पाहिजे होता. तो मी भाऊसाहेब पाटणकर वकील ह्यांच्याकडून मिळविला. पांढरा फेटा घरींच होता. तो मी घेतला.

ब्रह्मदेव वाघ मला वाटतें आम्हांला रंगवायला आला होता. मला रंग– लावला जात असतांना नटवर्य नानासाहेब फाटक सहज रंगपटांत आले. ते मला म्हणाले, "तुमचा चेहरा रंगाला चांगला आहे. नुसतं व्हॅसलीन लावून वर पावडर मारा." एका श्रेष्ठ नटानें आपल्याविषयीं कांहीं शिफारसवजा बोलावें ही कल्पना नव्हती. त्या बोलण्यानें मनाला उत्साह वाटला.

नानबांचा मेकप आणि वेषभूषा माझ्यासमोर होतीं. नाटकाचा तो प्रयोग सुरू झाला. ललितकलेचे कांहीं नट नाटक थोडावेळ पहायचें आणि उठून जायचें अशा विचारानें आले होते. नाटक कसें कुणाला ठाऊक रंगतच गेलें. विशेष आश्चर्य म्हणजे स्वत: शंकरशेट चुंबळे नाटकाला शेवटपर्यंत बसले. "तुम्ही चांगलं काम करतां. आज नानबाची आठवण तुम्ही करून दिलीत" हा अभिप्राय शंकरशेटनीं मुद्दाम आंत येऊन मला सांगितला. उगांवच्या एका सोनारानें एक शंकराचें चित्र असलेलें चांदीचें लॉकेट मला बक्षीस दिलें.

हें नाटक चालू असतां एक प्रसंग घडला. पहिल्या किंवा दुसऱ्या अंकांत एक कव्हरचा पडदा सुटला आणि जमिनीपासून चारसहा बोटें वर असतांना रूळ एकदम आदळला. अंक संपला. बापूराव पेंढारकर आंत आले. त्या पडद्यावर असलेल्या माणसाला त्यांनीं समोर उभा केला आणि म्हणाले, "क्लबाचं नाटक म्हणून पडदा असा आदळतोस काय ? याद राख." त्या माणसाच्या श्रीमुखांत एक भडकावून बापूराव निघून गेले. मी पहातच राहिलों. बापूराव अत्यंत कडव्या शिस्तीचे गृहस्थ आहेत हा त्यांचा लौकिक मला माहीत होता. पण त्याचें स्वरूप हें असें असेल अशी मला कल्पना नव्हती.

मध्यंतरांत राजे लक्ष्मणराजे भोंसले,, रा. ब. पाध्ये, बापूराव पेंढारकर ह्यांना हारगुच्छ देऊन आम्ही त्यांचा सत्कार केला व आमच्या उपक्रमाला आम्ही त्या थोरांचे आशीर्वाद घेतले.

नाशिकसारख्या सनातनी गांवांत मी, बाळू कानिटकर, पांडोबा कुलकर्णी, वसंतराव कुलकर्णी इत्यादि सुशिक्षितांनीं नाटकांत कामें करावीं


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

हा तथाकथित सभ्य समाजाच्या दृष्टीनें फार मोठा अशिष्ठपणा होता - शांतं पापं होतें. नाटचप्रयोग निर्विघ्नपणें पार पडला. ३० मे १९२९ ह्या तारखेला महाराष्ट्र नाटच मंदिरानें आपला पहिला प्रयोग केला आणि नाशिकच्या सार्वजनिक जीवनांत आम्ही संघटित स्वरूपांत प्रथम उभे राहिलों. आम्ही नाटक करीत होतों त्याच वेळीं आमच्या गांवांतील आमच्याच वयाचे कांहीं देशभक्त आम्हांला आणि आमच्या उपक्रमाला मनसोक्त शिव्या देत होते.

दुसऱ्या दिवशीं आमच्या घरीं आंब्याच्या रसाचें जेवण होतें. आंब्याचा रस काढीत असतांना मला माझ्या चुलत्यांनीं–नानांनीं–प्रश्न केला, 'काल नाटकाला उत्पन्न किती झालं ?" मी म्हणालों, 'तीनशें रुपये !" "धंदा वाईट नाहीं" असें कांहींतरी ते त्यावर म्हणाले. त्यांच्या म्हणण्याचा रोख असा कीं आम्ही नाटकमंडळी काढून तो व्यवसाय करणार. मी तो रोख लक्षांत घेऊन सर्दच झालों.

नाटकानंतर उत्पन्नाचा हिशेब जुळविणें ही एक कठीण गोष्ट होऊन बसते हा अनुभव मला प्रथम आला. दारोदार हिंडून मिळविलेले रु. ३०० फुटाण्यासारखे उडाले ! प्रल्हादनें त्याच्या जागेचें भाडें वसूल करून घेतलें. कांहीं तिकिटांचे पैसे वसूलच झाले नाहींत.

नाटकाच्या दुसऱ्या दिवशीं जेवण झाल्यानंतर मी झोंपलों तो संध्याकाळचा अंधार पडल्यावर उठलों. आई मीठमोहऱ्या घेऊन समोर उभी राहिली व तिनें माझी दृष्ट काढली. दृष्टीच्या मीठमोहऱ्या चुलींत टाकून ती बाहेर आली व म्हणाली, "तुझं काम फार चांगलं झालं असं लोक म्हणतात. मी मुद्दामच आलें नाहीं. आईची दृष्ट फार वाईट असते."

माझ्या आईचे ते शब्द आणि तिच्या भावनेचा तो आवेग मला ऐकायला मिळाला, पहायला मिळाला ह्याचें कारण माझा नाटकाचा छंद असेंच मला आजहि वाटतें. ह्या पहिल्या प्रयोगानें महाराष्ट्र नाटच मंदिराची स्थापना तर झाली. पण ह्या संस्थेचा परिपोष कसा करावयाचा हा आमच्यापुढें मोठाच प्रश्न होता.

● ● ●

लेखांक
पंधरावा

# महाराष्ट्र नाट्य मंदिर

प्रिन्सिपल् श्री. दा. ग. पाध्ये ह्यांनीं महाराष्ट्र नाटच मंदिराचें एक वैशिष्टच सांगितलें. तें असें कीं ह्या संस्थेला दप्तर (Record) आहे. आमच्यांत श्री. कानिटकरांना दप्तराची हौस फार. भारत इतिहास संशोधक मंडळांत त्यानें जें विनावेतन काम केलें होतें त्याचा तो परिणाम असावा. तें कसेंहि असो, कानिटकरानें एक घटना केली. कार्यक्षेत्र, उद्देश, कार्यकारी मंडळ; कार्यालय, कार्यपद्धति इत्यादि कितीतरी गोष्टींचा त्या घटनेंत व्यवस्थित अंतर्भाव करण्यांत आला होता. त्या काळांत नाटचक्षेत्रांत कार्य करणाऱ्या ज्या हौशी संस्था होत्या त्यांपैकीं फारच थोडयांना अशी घटनापद्धति होती.

महाराष्ट्र नाटच मंदिरानें जें कांहीं करावयाचें तें घटनेला धरूनच करावयाचें असें ठरल्यानंतर मंदिराच्या कित्येक सभासदांना नियमांचा तो जांच सहन होईनासा झाला. वार्षिक वर्गणी अवघा एक रुपया—तीहि देणें अनेकांना जमेना. वर्गणी देणें हा नियम होता. "आम्ही वर्गणी नियम म्हणून देणार नाहीं" असें म्हणणारांना तो नियम शिकवावा लागला—बंडखोरांना नियमाप्रमाणें मंदिरांतून काढून टाकणें भाग पडलें. सार्वजनिक कार्य करतांना हा अप्रियपणा अपरिहार्य होतो व त्यांतून अकारण शत्रुत्व निर्माण होतें हें खरें. परंतु ह्या नियमपालनांत माझ्या पांचहि सहकाऱ्यांनीं म्हणजे काळे, पलोबा, पांडोबा, निफाडकर आणि कानिटकर ह्यांनीं मला पाठिंबाच दिला. ती केवळ वैयक्तिक निष्ठा होती असें नाहीं.

१९३० च्या मे महिन्यांत "तोतयाचें बंड" हें नाटक बसवायचें आम्ही ठरविलें. पार्वतीबाईच्या भूमिकेसाठीं श्री. बाबूराव खारकर हे एक हौशी गृहस्थ आम्हांला मिळाले. कोर्टांत नोकरी करणाऱ्या खारकरांना नाटकाचा छंद होता. ठेंगणी ठुसकी आकृति—फार सुस्वरूप नसले तरी कुरूप नव्हे—स्त्रीपार्ट करण्याची विलक्षण हौस! बाबूरावांची नाशिकहून बदली झाली तेव्हां आम्हांला त्यांची खरी उणीव भासली.

चित्ताकर्षक नाटक मंडळीचें हेंच नाटक पाहून व नानबा गोखले ह्यांची नाना फडणिसांचीं प्रदीर्घ भाषणें ऐकूनच मला नाटकाच्या छंदाची प्रेरणा मिळाली. शाळेंत असतांना झालेल्या प्रयोगांत मी तीच भूमिका केली होती. परंतु आतां माझ्या शरीराचा आकार त्या भूमिकेला शोभण्यासारखा नव्हता. पांडोबा कुलकर्णी ह्यांची अंगलट आणि विशेषतः आवाज त्या भूमिकेला अनुकूल असल्यानें त्यांना नाना फडणिसाची भूमिका दिली व माझ्याकडे हैबतीची भूमिका आली. सुखनिधान—तोतयाची भूमिका शंकरराव निफाडकरांनीं केली. नानासाहेब फाटकांच्या आवाजाची शहाम्मत शंकररावांच्या आवाजांत होती. शंकरराव शरीरानें कसदार, रंगानें गोरे, आवाजानें दमदार पण किंचित् अपऱ्या नाकाचे आहेत. विलक्षण कष्टाळूपणा हा त्यांचा स्थायी भाव. मंदिराची जागा झाडणें व स्वच्छ ठेवणें हा जणू त्यांचा मक्ताच होता. बाळासाहेब काळे ह्यांच्यामुळेंच शंकररावांचा व माझा स्नेह झाला. महाराष्ट्र नाटक मंडळींत त्यांचा प्रवेश व्हावा म्हणून मी केशवराव दाते ह्यांची भेट घेतली. स्वतः केशवरावच मालकी सोडण्याच्या विचारांत आहेत हें मला माहीत नव्हतें. त्यामुळें ती मुलाखत अगदींच औपचारिक स्वरूपाची झाली. शंकरराव महाराष्ट्र नाटक मंडळींत नोकरीला राहिले पण केशवरावांनीं नाटक मंडळी सोडल्यानंतर. महाराष्ट्र नाटक मंडळीचा तो उतरता काळ होता. शाळीग्रामकडे कांहीं काळ त्या कंपनीचें चालकत्व आलें. महाराष्ट्र नाटक मंडळीचें पृथ्वीनें गिळलेलें रथचक्र बाहेर काढण्याचा प्रयत्न करणारा शाळीग्राम कर्णासारखाच शूर, उदार पण दुर्दैवी होता. शंकररावांना त्या थोड्या दिवसांत मेकअप्चें जें शिक्षण मिळालें त्यावर ते आज उत्तम तऱ्हेनें गुजराण करीत आहेत.

'तोतयाचें बंड' या नाटकाचीं तिकिटें विकतांना आम्ही—म्हणजे



राजेबहाद्दर वाड्यांतील प्रसिद्ध दुखांबी', नासिकचें
← जुनें खुलें नाट्यगृह : आतां तेथें चित्रकला वर्ग भरतो.

व्हिक्टोरिया ज्युबिली संगीत नाटक मंडळी

**'इंद्रसभा'**

**प्रयोगस्थळ : दुखांबी : राजेबहाद्दर वाडा**

अशी जाहिरात मी वाचली आहे. प्रा. श्री. वि. मा. दि. पटवर्धन ह्यांच्या संग्रहीं ती जाहिरात आहे. ही बखळ जागा आहे, मागें छायाचित्रांत दाखविलेला दिवाणखाना आहे. ५०० पेक्षां अधिक प्रेक्षक ह्या खुल्या जागेंत वसूं शकणार नाहींत. 'मराठी नाटकें' अशाहि जागेंत झालीं व गाजलीं.

खास घेतलेलें छायाचित्र सुप्रसिद्ध चित्रकार श्री. वासुदेवराव कुलकर्णी ह्यांच्याकडून मिळालें.



← एक अबोल पण सुखकारक व्यक्तित्व: डॉ. गजानन शामराव राव.



↑ माझे कविमित्र श्री. चुनीलाल मीठा शेठ, महाड व मी.

पलोबा आणि मी–अगदीं मेटाकुटीस आलों. कोर्टांत शिरण्याच्या रस्त्यावर एक छोटासा पूल आहे. त्यावर बसून आम्ही दोघांनीं ठराव केला कीं तिकिटांचीं पुस्तकें पुलाखालच्या गटारींत टाकून द्यायचीं आणि आपण घरीं निघून जावयाचें. प्रसूति–वैराग्यासारखाच आमचा तो वैताग होता. अशा वेळीं प्रल्हाद सोबतीला असला कीं तो असं कांहीं बोलत असे कीं सारा शीण–सारा वैताग नाहींसा होत असे.

तिकिटें खपविण्याचा प्रयत्न करीत असतांना कांहीं आश्चर्यकारक अनुभव येतात. त्रिंबक रस्त्यावर एका बंगल्यांत रहाणाऱ्या एका वृद्ध सेवानिवृत्त गृहस्थांची आम्ही भेट घेतली. त्या गृहस्थानीं आमचें म्हणणें अत्यंत शांतपणें ऐकून घेतलें, पेटी उघडली आणि दोन तिकिटांचे पैसे त्यांनीं आमच्यापुढें मोजून ठेवले. आम्ही त्यांना दोन तिकिटें फाडून दिलीं. तीं आम्हांला परत करून ते म्हणाले "मी नाटक पहात नाहीं. तुम्ही असं करा. हीं दोन तिकिटं कुणातरी दोघा संन्याशांना नेऊन द्या. त्यांना नाटक पहावंसं वाटतं. पण त्यांच्याजवळ पैसे नसतात. एवढं कराल तुम्ही माझ्यासाठीं ?" त्यांचा तो प्रश्न आणि बोलण्याची पद्धत आम्हांला कांहींशी धक्का देणारीच होती. पण प्रल्हादनें भरभक्कम होकार दिला. पैसे आणि तिकिटें घेऊन आम्ही बाहेर पडलों. बंगल्याच्या बाहेर पडल्यावर प्रल्हाद म्हणाला, "वामन्या, दे टाळी." मी टाळी दिली. मनुष्यस्वभावाचा हा नमुना विशेष होता. तीं तिकिटें घेऊन आम्ही शंकराचार्यांच्या मठांत जाऊन दोन संन्यासी गांठले–त्यांना तीं तिकिटें दिलीं व नाटकाला येण्याची विनंती केली. त्या संन्याशांनीं तीं तिकिटें तर घेतलींच पण ते दोघे प्रथमपासून अखेरपर्यंत त्या प्रयोगाला थांबले. दोन संन्यासी आमच्या नाटकाला हा नाट्यसृष्टींतला एक अजब योग होता हें खरेंच !

महाराष्ट्र नाट्य मंदिर ह्या संस्थेचा एक कार्यकर्ता ह्या कारणानें माझा परिचय वेगवेगळ्या व्यक्तींशीं झाला व त्या त्या व्यक्तींच्या गुणसमुच्चयांतून मला जें अपरोक्ष शिक्षण मिळालें त्यांतून माझा मानसिक विकास झाला हें निर्विवाद आहे. सार्वजनिक कामांत मनुष्य मनानें तयार होतो–त्याच्या मानसिक विकासाला निरनिराळीं नवीं क्षितिजें खुलीं होतात आणि अडलेल्या समाजाला अशा मनुष्याचा उपयोग होतो ह्याची जाणीव समाजांत निर्माण होते.

श्रीमंत बापूसाहेब लोथे–नाशकांतले त्या काळांतले एक मोठे रसिक–आमच्या पाठीशीं होते. एक रुपया वर्गणी देणारे सभासद हाच त्यांचा दर्जा असे. बापूसाहेब आमच्यापेक्षां वयानें मोठे–त्यांच्या तारुण्यांत त्यांनीं नाटकें करण्याचा षोक केला होता. त्यांना गाण्याचें फार वेड. नाशिकच्या मेनरोडवर असलेल्या गणपति मंदिरांत दर गुरुवारीं कुणाचें तरी गाणें होई. बापूसाहेब त्या गाण्याला नियमानें हजेरी लावीत. बाळासाहेब काळे आणि बापूसाहेब लोथे दोघांचें ह्या गाण्याचें समान व्यसनच त्यांना एकत्र आणणारा धागा होता. 'बाळू' ह्या एकेरी नांवानेंच ते काळ्यांना हांक मारीत. मंदिराच्या मासिक सभांना बापूसाहेब येत असत. सभेंत ते फारसें बोलत नसत. पण त्यांना कांहीं खटकलें तर ते सल्ला देत. त्यांचा मोठा वाडा रविवार कारंजाजवळ आहे आणि त्या वाड्यांत गणपतीचें मंदिर आहे. एखाद्या संस्थानिकाप्रमाणें बापूसाहेब मंदिरांत पूजा अर्चा उत्सव कथा, कीर्तनें इत्यादि करीत असत. कुणाहि अतिथि–अभ्यागताचें ते स्वागत करीत. बापूसाहेब दिसायला देखणे आणि बोलायला रुबाबदार असत. पी. डब्ल्यू. डी.च्या इरिगेशन शाखेकडे त्यांना नोकरी होती. माझे वडील त्याच खात्याच्या दुसऱ्या शाखेंत हेडक्लार्क म्हणून काम करून सेवानिवृत्त झाले होते. भाऊसाहेबांचा मुलगा म्हणून बापूसाहेब मला ओळखत आणि वडिलांच्याबद्दल वाटणाऱ्या आदराचा अल्पसा वारसा मला देत.

ह्याच काळांत आणखी दोन संस्था आपापल्या मगदुरांप्रमाणें नासिकमध्यें कार्य करीत होत्या. वाङ्मयविहार मंडळ या संस्थेच्या स्थापनेची प्रेरणा त्या वेळीं नासिकला बदलून आलेले अनंततनय ह्यांच्याकडून मिळाली. मंजुमाधव, वनवसंत, अशीं नांवें धारण करून कविता लिहिणारे श्री. माधवराव काळे, श्री. वसंतराव रहाळकर, श्री. सदाशिवराव निफाडकर ह्यांनीं ती संस्था नांवारूपाला आणली. नाशिकला १९२४ मध्यें कॉलेज निघालें आणि त्यामुळें जीं उच्चशिक्षित माणसें नाशकांत आलीं त्यांत प्राध्यापक श्री. भा. ल. पाटणकर एक आहेत. प्रि. श्री. टी. ए. कुलकर्णी कॉलेजवरच रहात असत. परंतु प्रा. पाटणकर कित्येक वर्षं 'दहीपूल' ह्याच पत्त्यावर गांवांत रहात असत. गांवाशीं त्यांचा संबंध अधिक येई. तात्यासाहेब कोल्हटकरांचे जामात म्हणून त्यांना वेगळीच प्रतिष्ठा होती. बापूराव पेंढारकरांचे वर्गबंधु आणि स्नेही म्हणूनहि त्यांचा अधिकार आगळा होताच.

पाटणकरांचे स्नेही देवदत्त नारायण टिळक, त्यांच्या मातोश्री लक्ष्मी-बाई टिळक, त्यावेळचे उदयोन्मुख कवि सोपानदेव चौधरी, कॉलेजचे कांहीं प्राध्यापक—श्री. सबनीस, रा. श्री. जोग इत्यादि प्रतिष्ठितांचा पाठिंबा ह्या मंडळाला होता. महाराष्ट्र नाट्य मंदिराचं सर्वसाधारण धोरण सहकार्याचें होतें. सार्वजनिक कार्यांत मला मार्गदर्शन करणारे म्हणून प्रा. पाटणकर ह्यांचें ऋण मी मान्य करतों.

वाङ्मयमंडळ ह्या नांवाचें आणखी एक मंडळ त्या काळांत होतें. श्री. नाथ निफाडकर हेच त्या मंडळाचे सर्वाधिकारी होते. नाशकांत रहायला आल्यापासून ह्या मंडळाच्या वतीनें दीडदोनशें साहित्यविषयक व्याख्यानें त्यांनीं घडवून आणलीं आणि मोठी धमाल उडवून दिली ह्यांत शंका नाहीं. गांधी रस्त्यावरील सेवासदनच्या बाजूला असलेल्या दोन खोल्यांत त्यांचें बिऱ्हाड होतें. गांवांतून हिंडतांना एक वर्तमानपत्र आणि एक पुस्तक घेऊनच ते फिरत. त्या दृष्टीनें तो त्यांचा 'ट्रेडमार्क' होता. ते एक उत्कृष्ट क्रिकेटपटू होते. मी त्यांचा खेळ कधींच पाहिला नाहीं. माझ्या लहानपणीं 'चित्रमयजगत्' ह्या मासिकांतून त्यांची एक कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होत असे. श्री. निफाडकरांचा व माझा संबंध त्यांच्या कांहींशा कष्टप्रद काळांत झाला. निफाडकरांना नव्या कल्पनांचें आकर्षण होतें आणि मला नव्या कल्पनांचें वेड होतें.

ह्या दोन्ही संस्थांना एक प्राध्यापक आणि दुसरा ख्यातनाम लेखक ह्यांमुळें मोठीच प्रतिष्ठा होती. त्या मानानें आम्हांला— महाराष्ट्र नाट्य मंदिराच्या-कार्यकर्त्यांना तशी कांहींच सार्वजनिक अब्रू नव्हती. शरीरकष्टांची लाज नाहीं—मानापमानाची चाड नाहीं. वाङ्मय विहार मंडळ आणि वाङ्मय मंडळ ह्या दोन्ही संस्थांशीं आम्ही सहकार्य करीत होतों. त्या दोन संस्थांत मात्र परस्पराबद्दल कांहींशीं विरोधाचीच भूमिका होती.

श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांच्या महाराष्ट्र कुटुंब मालेंतून माझी पहिलीच कादंबरी 'त्याग' १९२९ मध्यें प्रसिद्ध झाली. सत्याग्रहाचें आंदोलन भर वेगांत सुरू असतांनाच ह्या कादंबरीवर 'नवाकाळ'मध्यें खूप विस्तृत अभिप्राय आला. माझ्या लेखनाबद्दल खूप मोठाल्या अपेक्षा त्यांत व्यक्त करण्यांत आल्या होत्या. गडकरी आणि टागोर ह्यांच्या लेखनशैलीचा माझ्यावर

फार परिणाम झाला होता. 'नवाकाळ' व इतर वृत्तपत्रांतून आलेल्या अभिप्रायांनीं मला लेखक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. माझा नाटकाचा छंद आणि लेखनाचा छंद ह्यांपैकीं लेखनाचा छंद दुबळा ठरला. दुबळ्या पायांची निंदा करणाऱ्या हरणाप्रमाणेंच माझी स्थिति झाली. मला शोभिवंत वाटणाऱ्या नाटकाच्या छंदानें जीवनांत मला ठायीं ठायीं अडविलें तर लेखनाच्या छंदानें मला माझ्या भाषेची सेवा केल्याचें समाधान मिळवून दिलें.

● ● ●

## लेखांक पंधरावा

# बालगंधर्व

**बा**लगंधर्व ! मराठी रंगभूमीवरील ह्या शतकांतील युग पुरुष. ज्यांच्या स्त्रीभूमिका पाहतां पाहतांत्या काळांतले तरुण वेडे झाले आणि ज्यांच्यापासून तरुणींनीं आपल्या वेषभूषेचे आणि केशभूषेचे पाठ घेतले त्या बालगंधर्वांची आणि माझी प्रत्यक्ष ओळख होईल असें मला कधींच स्वप्न पडलें नाहीं. प्रत्यक्ष घडलें तें मात्र वेगळेंच ! माझे स्नेही–महाराष्ट्र–कुटुंब–मालेचे संपादक श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांच्यामुळेंच ह्या थोर गायक नटाशीं माझा परिचय झाला. नाटकमंडळीचें बिऱ्हाड ही माझ्यासारख्याला अप्राप्य अशी यक्षभूमीच होती. अशा त्या यक्षभूमींत ११ ऑगस्ट १९३० ह्या दिवशीं दुपारीं ४ वाजण्याच्या सुमारास मी प्रवेश केला.

'मगनभाईंची हवेली' ह्या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या तिवंध्यांतील एका चार मजली इमारतींत गंधर्व नाटक मंडळीचें बिऱ्हाड पसरलेलें होतें. खाशा स्वाऱ्या चवथ्या मजल्यावर आणि बाकीचे चिल्लर नट व कर्मचारी आपापल्या दर्जाप्रमाणें त्याच्या खालच्या मजल्यावर रहात होते. स्वयंपाकघर, कोठी आणि जेवणघर अगदीं तळमजल्याला सजवलीं होतीं. प्रत्येक दालनांत चारपांच माणसें आपली ट्रंक व वळकटी घेऊन रहात असत. एखाद्या लष्कराचा तळ असावा असें त्या बिऱ्हाडाचें स्वरूप होतें. वाड्याचा एकूण विस्तार फारच मोठा त्यामुळें त्याची भौगोलिक रचना लक्षांत ठेवणें कांहींसें अवघडच आहे ! बालगंधर्वांची आणि माझी प्रत्यक्ष अशी ही पहिलीच

मुलाखत–मी कांहींसा गोंधळलेलाच होतों. पांढऱ्या सुती दोरखंडानें बांधलेली पांढरी स्वच्छ चड्डी ह्याशिवाय अंगावर कपडा नाहीं अशा स्वयंभू स्वरूपांत बालगंधर्वांना पहातांना माझ्या मनाचा विरस झाला. ज्यांच्या स्त्री–वेषांतील चित्रांनीं आम्ही तरुण विद्यार्थी आमची खोली मोठ्या अभिमानानें सजवीत असू आणि त्या स्त्रीवेषांतील सौंदर्याची पूजा करीत असू तें हेंच कां सौंदर्य असा संभ्रम मनांत निर्माण झाला.

त्या पहिल्या मुलाखतींत बालगंधर्वांच्या बोलण्यांतले दोनतीन मुद्दे लक्षांत राहिले. "आम्ही नट म्हणजे एक प्रकारचे कीर्तनकारच आहोंत– आमचीं नाटकें येऊन पहा." खाडीलकरांचीं पौराणिक नाटकें करतांना ही भूमिका रास्त आहे पण 'एकच प्याला' ह्या सारख्या सामाजिक नाटका-बद्दल काय म्हणतां येईल ? केशवराव दाते ह्यांची 'सवती मत्सर' नाटकां-तील रामाची भूमिका बालगंधर्वांना अतिशय आवडली होती. केशवरावांच्या नाट्यविषयक तयारीबद्दल अत्यंतिक आदर त्यांच्या बोलण्यांत आला. नाट्याचार्य खाडीलकर आणि कै. नानासाहेब जोगळेकर ह्या दोघांबद्दल असाच नितांत आदर त्यांनीं व्यक्त केला. पौराणिक कथेंत आधुनिक राज-कारणाचा मोठ्या कौशल्यानें अंतर्भाव करून नाट्यक्षेत्रांत खाडीलकरांनीं क्रांति केली हा बालगंधर्वांचा आवडता विजय दिसला.

मास्तर कृष्णराव, बापूराव राजहंस त्याच दालनांत रहात असत. त्यांचाहि परिचय झाला. आपल्या मुलीच्या लग्नानिमित्त 'अहेर' म्हणून नारायणराव कुलकर्णी ह्यांनीं 'अडला नारायण' हें नाटक दिलें आहे ही गोष्ट बालगंधर्वांनीं मोठ्या अभिमानानें सांगितली. 'कान्होपात्रा' हें नाटक रंगभूमीवर आणावें म्हणून जे प्रयत्न चालू होते त्यांतील एक टप्पा म्हणून नारायणराव कुलकर्णी नाशिकला आले आणि कंपनींत राहिले. 'नाटक घेतों' असें आश्वासन मिळालें परंतु नाटकाच्या तालमी सुरू होणें, पदांच्या चाली देणें इत्यादि गोष्टी अधांतरींच होत्या. त्यामुळें नारायणरावांना किती मानसिक त्रास सहन करावा लागत होता ह्याची जाणीव मला आहे.

बालगंधर्वांचीं कांहीं धोरणें मानसशास्त्रावर आधारलेलीं आहेत ह्याची जाणीव गंधर्व नाटक मंडळीच्या ह्या मुक्कामांत मला झाली. बुधवार, शनिवार आणि रविवार दिवसा असे तीन खेळ गंधर्व नाटक मंडळी करीत

असे. सोमवारीं मंडळीच्या बिऱ्हाडीं भजनाचा कार्यक्रम असे. त्यांत स्वतः बालगंधर्व भजनें म्हणत. हा कार्यक्रम सर्वांना खुला आणि विनामूल्य असे. परिणाम असा होई कीं अनेक स्त्रिया—तरुण, प्रौढ त्या कार्यक्रमाला जमत आणि बालगंधर्वांचें तें दिव्य संगीत ऐकल्यानंतर त्यांना नाटक पहाण्याची इच्छा होई. आपल्या नाटकांची फार मोठी जाहिरात ह्या भजनांतून होते ह्याची पुरेपूर जाणीव बालगंधर्वांना होती. भजनें म्हणतांना ते कधींच कसूर करीत नसत. भजन ऐकायला येणारी स्त्री नाटकाला एकटीं कधींच जात नसे. तिला सोबत म्हणून घरच्या पुरुषाला बरोबर जाणें भाग होतें. ह्यामुळें एकाच्या ऐवजीं दोन तिकिटें खपत आणि नाटकाच्या उत्पन्नाचा गल्ला भरून निघे.

'गणेशोत्सव' मोठ्या थाटानें साजरा करण्याची पद्धति ह्या नाटक मंडळींत दिसून आली. गणपति पालखींतून मिरवीत आणतांना स्वतः बालगंधर्व हातीं टाळ घेऊन भर रस्त्यावरून भजनें म्हणत जातांना पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसावा हें स्वाभाविक आहे. श्रीची स्थापना, मंत्रजागर, धूपदीप, विसर्जन सगळें कांहीं यथास्थित चालत असे. ह्या भाविकतेचा श्रद्धाळू जनतेवर परिणाम होत असे.

'कान्होपात्रा' ह्या नाटकाची हस्तलिखित प्रत करण्याचें काम त्यावेळचे एक विद्यार्थी विन्दा भट—आतां डॉक्टर भट—ह्यांनीं केलें. गणपतराव बोडस नाटकापेक्षां त्या वळणदार अक्षरावरच फार खूष झाले. स्वतः गणपतरावांचीं बाळबोध व मोडी लिपींतील अक्षरें अतिशय वळणदार आहेत. ह्या नाटकाबाबत एके दिवशीं एक प्रसंग घडला.गणपतराव बोडस; नारायणराव कुलकर्णी आणि मी असे तिघेच बसलों असतांना गणपतरावांनीं मला अचानक प्रश्न केला, "कान्होपात्रा नाटकाविषयीं तुमचं काय मत आहे " क्षणाचाहि अवधीं न घेतां मी उत्तर दिलें, "मला तें नाटक आवडलें आहे." ती बैठक संपली आणि दुसऱ्या दिवशीं नारायणरावांनीं मला सांगितलें कीं माझ्या त्या उत्तराचा गणपतराव बोडसांवर फार परिणाम झाला.त्या उत्तरामुळें नाटकाचें अडलेलें घोडें पुढें सरकलें.

गंधर्व नाटक मंडळीच्या ह्या मुक्कामांत बालगंधर्व आणि बोडस ह्यांचीं व्याख्यानें झालीं. महाराष्ट्र—नाट्य—मंदिराचा एक नवा उपक्रम

ह्या दृष्टीनें त्या व्याख्यानांना महत्त्व होते. नट हा समाजाचा घटक आहे व त्यानें केव्हांतरी समाजाभिमुख होऊन आपली कैफियत मांडली पाहिजे अशीं तीं व्याख्यानें घडविण्यामागें आमची भूमिका होती.

विनायकराव पटवर्धन–त्यावेळचे विनायक बुवा–गंधर्व नाटक मंडळीचे नायक भूमिका करणारे ह्यांचा परिचय झाला. त्यांची गाण्याची मेहनत रोज चालत असे. पंडित विष्णु दिगंबरांचे हे शिष्य–त्यांची एकंदर पठडी वेगळी. नाटक मंडळींत राहूनहि नाटकीपणा त्यांना आवडत नसे. पंचवटींत पंडितजींनीं स्थापन केलेला 'राम–नाम आधाराश्रम' हें विनायकरावांचें माहेर. त्यांचा सवडीचा वेळ तिकडेच जाई. स्नान, संध्या, जप ते नियमानें करीत. त्यांच्या एकंदर वागण्यांत कर्मठपणा अधिक आहे.

ऑक्टोबरच्या परीक्षेची तयारी करण्याचा माझा वेळ नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं तासचे तास गप्पा ऐकण्यांत जाई. ह्या गप्पांना रंग चढविणारे दोन बहाद्दर–एक मास्तर कृष्णराव आणि दुसरे आमचे प्रल्हादराव औरंगाबादकर. मास्तर कृष्णराव हे एक पट्टीचे गायक आहेत तसेच एक बहाद्दर नकलाकार आहेत. कांहीं वेळां तर गाण्याच्या बैठकीपेक्षां त्यांची ही नकलांची बैठकच अधिक रंगत असे. स्वरज्ञान पक्कें त्यामुळें कुणाचाहि स्वर ते गळ्यांतून काढीत असत, भास्करबुवांचा हा शिष्य बालगंधर्वांना गुरुच्या ठिकाणीं होता. बालगंधर्वांचा गळा आणि मास्तरांची शिकवण ह्यांचा दूधसाखरेसारखा मिलाफ होऊन बालगंधर्वांच्या गाण्याला अफाट लोकप्रियता मिळाली.

गंधर्व–नाटक–मंडळीचा नाशिकचा मुक्काम संपत आला. महाराष्ट्र नाट्य मंदिराच्या छोट्या जागेंत बालगंधर्व, बोडस इत्यादि प्रमुख नटांचा सत्कार संस्थेच्या वतीनें करण्यांत आला. चहापाणी, हारगुच्छ हेंच त्या सत्काराचें प्रमुख स्वरूप होतें. महाराष्ट्र नाट्य मंदिरानें नटांच्या मुलाखती लेखी स्वरूपांत नमूद करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांत पहिली मुलाखत नटवर्य केशवराव दाते ह्यांची होती. त्यानंतर बालगंधर्व, बोडस, औंधकर, दिनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर अशा १६–१७ प्रसिद्ध नटांच्या मुलाखती घेतल्या. ह्या मुलाखतीसाठीं आम्ही एक प्रश्नमाला तयार केली. फुलस्केप आंखलेल्या कागदांच्या वहींत त्या मुलाखती लिहून घेतल्या जात. मुलाखत संपल्यानंतर त्या नटाला संपूर्ण मजकूर वाचून दाखविला जाई व शेवटीं

मुलाखत बरोबर आहे असा नटाच्या हस्ताक्षरांत शेरा व त्याची स्वाक्षरी घेतली जाई. कांहीं नटांच्या मुलाखती घेतांना खूप वेळ लागे. विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर मुद्याला धरून देणें त्यांना जमत नसे. खूप वळणें–वळणें घेऊन त्यांना पुन्हां मुद्यावर आणणें ही एक बौद्धिक कसरत होती. शेंकडो तास खर्चून घेतलेल्या ह्या मुलाखतींची वही कोठें तरी गहाळ झाली. ज्या नटांच्या मुलाखती घेतल्या त्यांतले कांहीं आतां दिवंगत झाले आहेत. मराठी रंगभूमीच्या इतिहासाचें तें एक मूल्यवान् साधन नाहींसें झालें. आज उरली आहे ती हळहळ !

गंधर्व–नाटक–मंडळी उमरावतीला गेली आणि मी त्या दीडदोन महिन्यांतील स्वप्नवत् आयुष्याचा विचार करीत पुन्हां कायद्याच्या अभ्यासाला सुरुवात केली.

● ● ●

## लेखांक सतरावा

# चिंतामणराव कोल्हटकर

१९३० चा नोव्हेंबर ते १९३१ चा ऑक्टोबर ह्या अकरा महिन्यांच्या कालखंडांत एक महत्त्वाचा बदल झाला. १९३१ च्या जूनमध्यें allowed to keep terms असा पहिल्या एल्. एल्. बी परीक्षेचा निकाल लागून माझ्या अडलेल्या जीवनाला निराळी दिशा मिळाली.

एल्. एल्. बी. चा अभ्यास नांवापुरता होई. मन मात्र निरनिराळीं कथानकें रचण्यांत दंग होई. ४–५ नाटकांचीं कथानकें त्या काळांत माझ्या डोक्यांत घोळत होतीं. 'दक्षिण–उत्तर' ह्या नाटकांत शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका हा विषय मांडण्याचा माझा विचार होता. मी कांहीं इतिहास वाचला आणि मनाशीं एक बिनतोड प्रसंग आंखला. बुरडी पेटाऱ्यांतून शिवाजी पळाला ही आख्यायिका मला पटेना. मी असा प्रसंग रचला. औरंगजेब व शिवाजी ह्यांची एक गुप्त राजकीय मुलाखत होते. त्या मुलाखतींत शिवाजी आपल्या वाढत चाललेल्या शक्तीची जाणीव देतो व सुटका अथवा सर्वस्व नाश ह्यांपैकीं एक स्वीकारण्याबद्दल औरंगजेबाला शह देतो. औरंगजेब शिवाजीच्या सुटकेला निरुपायानें मान्यता देतो अशी उपपत्ति मी बसवीत होतों. प्रत्यक्ष लिहून कांहींच झालें नाहीं.

'गुरु–कुल' हें नाटक कॉलेज–जीवनावर लिहून मी पुरें केलें. हुकुमशहा प्रिन्सिपॉल व त्याच्या हुकूमशाहीला शह देणारा त्याचा लाडका विद्यार्थी असा संघर्ष त्या नाटकांत मी दाखविला होता. 'गजपति' हा नायिकेचा

भाऊ पहिल्याच वर्षाच्या परीक्षेंत बारावेळां नापास झालेला आणि म्हणून कोठल्याहि चळवळीला विरोध करणारा–हालचाल न करणारा परंतु स्वतःचे जीवन विषयक तत्त्वज्ञान प्रतिपादन करणारा–हास्यरसाला पोषक म्हणून मी ह्या नाटकांत रंगविला होता. ह्या नाटकाचें वाचन मी माझ्या कांहीं मित्रापुढें केलें. श्री. केशवराव दाते, श्री. नारायणराव कुलकर्णी अशा कांहीं अधिकारी व्यक्तींनीं तें नाटक वाचलें. त्या नाटकाचा कांहीं भाग श्री. निफाड-करांच्या 'नाटक' ह्या मासिकांत छापून प्रसिद्ध झाला. नाटकाच्या वह्या कुठें तरी हरवल्या आणि नाटक पुन्हा लिहून काढण्याची उमेद माझ्यांत नसल्यानें माझा तो प्रयत्न हवेंत विरला.

नाटकाच्या कथानकाचा कांहीं भाग मला सुचत असे–नांवहि सुचत असे परंतु प्रत्यक्ष लेखन मात्र होत नसे. 'जय–निनाद', 'मूर्तिपूजा', 'मोगली बेदाणा' हीं कांहीं नांवें नाममात्र राहिलीं.

महाराष्ट्र–नाट्य–मंदिर ह्या संस्थेच्या स्थापनेपासून तिची जोपासना करतांना मला मनुष्य–स्वभावाचे भलेबुरे अनेक अनुभव आले. संस्था–जीवन आणि संस्थेबद्दलची निष्ठा ह्यांचा बव्हंशी अभावच मला आढळला श्री. कानिटकर, काळे, प्रल्हाद, पांडोबा हीं कांहीं माणसें सोडलीं तर संस्थेच्या कामाचा बोजा घ्यायला कोणीच तयार नाहीं. 'जो तो युक्तीच सांगतो' हीच जनरीत !

कार्यक्रमाशिवाय संस्थेची प्रगति नाहीं. कार्यक्रम म्हणजे योजना आंखण्यापासून त्याचा तपशील तयार करणें, प्रत्येक तपशील अंमलांत आणण्यासाठीं व्यवस्था करणें आणि एकंदर कार्यक्रमाबद्दल जनतेंत उत्साह निर्माण करणें हें सर्व साधणें फार अवघड आहे. प्रत्यक्ष कार्य करूं लागल्यावर मला ती जाणीव पुरेपूर झाली. माझी आणखी एक अडचण होती. मी एल्. एल्. बी.च्या परीक्षेला बसणारा एक प्रौढ विद्यार्थी ह्यापेक्षां मला समाजांत अन्य दर्जा ( Status ) नव्हता. कोणत्याहि चळवळीचा पुढारीपणा घेणारानें प्रथम हें ( Status ) मिळविल्याशिवाय त्याचें प्रयत्न यशस्वी होत नाहींत हें एक विदारक सत्य आहे.

श्री. सी. वाय्. काळे ह्यांनीं लिहिलेल्या 'सावित्री ह्या नाटकाचें वाचन मंदिरांत झालें. प्रयोग करावा तर त्यांनीं आम्हांला झेपणार नाहींत.

अशा अटी घातल्या. हो ना करतां करतां विना अट नाटक आमच्या स्वाधीन करण्याचा निर्णय नाटककारानें घेतला. परंतु सावित्रीच्या भूमिकेला अनुरूप असा स्त्रीपार्टी आमच्या जवळ नव्हता. तेव्हां नवें नाटक बसविण्याचा आमचा हा प्रयोग अशा रीतीनें फसला. स्वयंवरांतली रुक्मिणी आणि सावित्री ह्यांच्यांत खूप साम्य होतें. १९३१ च्या मे महिन्यांत प्रयोग करणें, प्रयत्न करूनहि जमलें नाहीं. नवीन संस्था ह्या दृष्टीनें हा अकार्यक्षमतेचा प्रसंग महागांत पडला.

चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दिनानाथ ह्यांच्या मुलाखती घेतल्या व वहींत नोंदविल्या. चिंतामणरावांनीं मंदिरासाठीं "मराठी रंगभूमीवरील अभिनय परंपरा" ह्या विषयावर प्रात्यक्षिकासह माहितीपूर्ण व्याख्यान दिलें. व्याख्यान लोकसत्ता हॉलमध्यें झालें. फुकटांत नाटकांतील भाषणें ऐकावयास मिळतील म्हणून व्याख्यानाला गर्दीहि खूप झाली. चिंतामणरावांनीं तीन परंपरांची चर्चा त्या व्याख्यानांत केली. पाटकर, देवल आणि खाडीलकर ह्या त्या तीन परंपरा होत. पाटकरांच्या परंपरेंत पवित्र्याला फार महत्त्व होतें. पायांचा विशेष कोन करून उभें राहण्याचें प्रात्यक्षिक चिंतामणराव करून दाखवीत होते. दूर अंतरावर बसलेले एक श्रोते ओरडले, "टेबलावर उभें राहून दाखवा." चिंतामणरावांनीं उत्तर दिलें, "मी सर्कस करून दाखवायला आलों नाहीं." देवलांच्या परंपरेंत स्वाभाविक भाषणपद्धतीला फार महत्त्व होतें. गणपतराव बोडस ह्या परंपरेंतील नामवंत नट होत. खाडीलकरांच्या परंपरेंत आवाजांच्या कृत्रिम आरोह अवरोहाला महत्त्व असे. स्वतः खाडीलकर आपल्या नाटकांत कामें करणाऱ्या नटांना स्वतः भूमिका शिकवीत. गळ्यांतून, छातींतून आणि पोटांतून निघणारा आवाज ह्या सर्व प्रकारांचा शास्त्रीय अभ्यास खाडीलकरांनीं केला होता व नटानें तसाच शब्दोच्चार केल्याशिवाय खाडीलकरांचें समाधान होत नसे. त्यांची शिस्त फार कडक होती. 'झुंझारराव' ह्या नाटकांतील एक उतारा चिंतामणरावांनीं पाटकरपद्धतीनें व देवलपद्धतीनें म्हणून दाखविला.

चिंतामणरावांच्या ह्या मुक्कामांत त्यांना अत्यंत दुःख देणारा एक प्रसंग घडला. तो म्हणजे 'साहेबां'चा मृत्यु! 'साहेब' हें अच्युतराव कोल्हटकरांचें नांव. त्यांच्या परिवारांतील रूढ नांव. चिंतामणरावांना त्या मृत्यूनें दुःख झालें तें साहजिक होतें.

'नारिंगी निशाण नाट्य संस्थेचे' एक प्रवर्तक, नारिंगी निशाण ताई तेलीण, स्वामी विवेकानंद इत्यादि नाटकांचे कर्ते, 'संदेशकार' ह्या पदवीनें लोकप्रिय असलेले एक चतुरस्र पत्रकार, अत्यंत प्रभावी वक्ते, व्यासंगीं विद्वान् आणि मराठी भाषेचे ढंगदार शिल्पकार हा 'साहेबांचा' लौकिक लक्षांत घेतला म्हणजे चिंतामणरावांच्या दुःखाची तीव्रता लक्षांत येते. केवळ एका आप्ताचा वियोग हेंच एकमेव कारण चिंतामणरावांना वाटणाऱ्या दुःखाचें नव्हतें. अच्युत बळवंतांचा मृत्यु म्हणजे एका राष्ट्र-पुरुषाचा मृत्यु, अशी चिंतामणरावांची निष्ठा होती आणि ती निष्ठा त्यांना रडवीत होती.

गडकऱ्यांच्या भाषेनें प्रभावित होण्यापूर्वीं अच्युतरावांच्या भाषेनें मराठी मनें भारावून टाकलीं होतीं. "जिजा, तू कां रडतेस ?" ह्या लेखमालेंतील अक्षरन् अक्षर करुणरसांत चिंब भिजवून काढलेलें होतें. अडसूळ फौजदारानें त्या असहाय्य जिजावर केलेला राक्षसी अत्याचार अच्युतरावांनीं अशा कांहीं तीव्र शब्दांत वर्णन केला होता कीं कोणीहि सहृदय वाचक दांतओठ खाऊन 'सूड सूड' ओरडत उठावा.

संपत्ति आणि विपत्ति ह्यांत एकरूपता पावलेल्या अच्युतरावांची एक आख्यायिका वामनशास्त्री दातार ह्यांनीं सांगितली आहे. अच्युतरावांना राष्ट्रीय पक्षांतील एक कार्यकर्ते आणि पूर्वींचे क्रांतिकारक म्हणून दातारांबद्दल अगत्य वाटे. साहेबांच्या घरीं घडलेले हे दोन भोजनप्रसंग आहेत. एकदां पानावर फक्त शिजविलेली हरबऱ्याची उसळ होती तर दुसऱ्या वेळेला केळीच्या पानावर चारहि ठावांचें जेवण होतें. साहेबांनीं दातारांच्या बरोबर दोन्ही वेळच्या जेवणाचें त्याच उत्साहानें स्वागत केलें.

१९३१ च्या जूनपासून ऑक्टोबरपर्यंत मी पुण्यांत दुसऱ्या एल्. एल्. बी. वर्गाच्या टर्म्स भरण्यासाठीं श्री. नारायणराव कुलकर्णी आणि विठूकाका खाडीलकर ह्यांच्या संयुक्त बिऱ्हाडांत राहिलों होतों.त्यावेळीं श्री. नानासाहेब गोखले, श्री. दादासाहेब फाटक, श्री. दत्तोपंत काळे, श्री. मामा जोशी, श्री. भाऊसाहेब दातार इत्यादि नाट्यक्षेत्रांतील नट व नाटककार ह्यांचा परिचय झाला. त्यांतून श्री. नानासाहेब गोखले ह्यांच्या अरुणोदय नाटक मंडळीसाठीं मी एक नाटक लिहावें असा सूर निघाला आणि मीहि त्याप्रमाणें नाटकाचा एक खर्डा लिहिला.

'वाल्मिकी' हें त्या नाटकाचें नांव होतें. नारायणरावांची प्रबळ इच्छा कीं मी नाटक लिहावें–नाटककार म्हणून माझें नांव व्हावे. पांढरे स्वच्छ बॉंड कागद, डेस्क, दौत, टांक अशी सारी तयारी करून दिली. नाटकाच्या कथानकाची चर्चा झाली. अंकाचा प्रारंभ, मध्य आणि शेवट कसा साधावा ह्याच्या मार्मिक सूचना नारायणरावांनीं दिल्या. प्रत्येक वाक्य अर्थपूर्ण असावे, कथानकाच्या प्रगतीचीं बीजें त्यांत असावींत, स्वभावाचा आविष्कार त्यांतून व्हावा अशा अनेक सूचना त्यांनीं दिल्या. मी हिय्या करून त्या नाटकाचे अंक लिहिले. नाटकाचें वाचन झालें. विनोद अधिक पाहिजे ह्या मुद्यावर तें नाटक अडलें. माझा आळस, जिद्दीचा अभाव ह्या दोषांमुळें तें हस्तलिखित आजतागायत कोठें तरी धूळ खात पडलें आहे. नाटक लिहिणें ही फार अवघड गोष्ट आहे. त्यासाठीं कल्पकता, चिंतनशीलता सतत व्यासंग इत्यादि गुण अंगीं असावे लागतात. मराठींतील कांहीं सिद्धहस्त लेखकांना जें नाट्य–लेखन यशस्वी रीतीनें करतां आलें नाहीं त्या नाट्य–लेखनाला मी अजून दबकूनच आहे.

● ● ●

## लेखांक अठरावा

# कान्होपात्रा आणि श्रमसाफल्य

'कान्होपात्रा' ह्या नाटकाच्या तालमी गंधर्व नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं अथवा कांहीं वेळां किर्लोस्कर थिएटरमध्यें होत असत. श्री. गणपत राव बोडस तालीममास्तर असत. तालमीच्या वेळेपूर्वी पांच मिनिटें आधीं गणपतराव स्वत: हजर असत. बाकीचे नट पुढें मागें येत. नारायणराव कुलकर्ण्यांच्या बरोबर मी तालमींना जात असे. नाटकें करणें हा आपला पोटाचा व्यवसाय आहे आणि त्यासाठीं भरपूर परिश्रम केले पाहिजेत—कांहीं अभ्यास केला पाहिजे ह्याची जाणीव असणारे नट फारच थोडे. संगीत नाटक म्हणजे फार मोठा भार संगीतावर .स्वत: बालगंधर्व, विनायक बुवा पटवर्धन, मास्तर कृष्णराव ह्यांची संगीताची फळी मजबूत असल्यानें इतर नट आपला पूर्वलौकिक सांभाळून एखाद्या वतनदाराप्रमाणें वावरत. गणपतरावांची तालीम देण्याची पद्धत खेळीमेळीची असे. एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशीं संबंध समजावून सांगणें—स्वरांचे आरोह अवरोह म्हणून दाखविणें—मुद्राभिनय—रसपरिपोष करण्याच्या युक्त्या 'प्रयुक्त्या इत्यादि गोष्टींचा सूक्ष्म विचार करूनच गणपतराव तालीम घेत.

दिवसा 'कान्होपात्रा' नाटकाच्या तालमी आणि शनिवार, रविवार, बुधवार ह्या दिवशीं गंधर्व—नाटक—मंडळीच्या नाटकांना थिएटरवर हजर असणें अशा रीतीनें मी नाटकाच्या वातावरणांत पुरतां बुडून गेलों.

मराठी नाटक मंडळयांचे शिष्ठाचाराचे म्हणून कांहीं संकेत असत. त्यांपैकीं एक प्रयोगाच्या वेळीं थिएटरवर जाणें हा फार मोठा शिष्टाचार मानला जाई. नाटक–मंडळीच्या मालकापासून नोकरापर्यंत सर्वजण हा शिष्टाचार आर्जवानें पाळीत. हा शिष्टाचार पाळीत असतांना मला नाटयाचीं कांहीं अमोल दर्शनें घडलीं. 'मृच्छकटिक' ह्या नाटकांतला पावसाचा प्रवेश चाल होता. भांडारकर 'मैत्रेयाची 'भूमिका करीत असत. चारुदत्त आणि वसंतसेना स्टेजच्या मध्यावर एकमेकांना बिलगून उभी असतांना बिचारा 'मैत्रेय' आपल्या मित्रावर कोसळलेला तो प्रसंग पहात एका कोपऱ्यांत आपल्या काठीचा आधार घेऊन उभा राहिला. पावसाच्या पाण्यानें भिजून हिंवलेलें तें शरीर पायापासून डोक्यापर्यंत थंडीनें कुडकुडण्याचा अभिनय भांडारकर उत्कृष्ट करीत असे.

भांडारकराचें गद्य भाषण सुरेल आहे आणि त्याच्याबरोबर बोलणाऱ्या नटाचें बोलणें बेसूर आहे हें एका प्रयोगाच्या वेळीं विनायकबुवा पटवर्धनांनीं पडद्याच्या आड उभें राहून मला समजावून दिलें. भांडारकर बालगंधर्वांच्या भजनी मेळयांतला फार मोठा साथीदार असे. भांडारकर तसा अबोल असे एका नाटकमंडळीचा एक वेळचा मालक असलेला भांडारकर एक नोकर झाला तरी त्यानें आपली प्रतिष्ठा सोडली नाहीं. नाटक धंद्याच्या पडत्या काळांत भांडारकरानें कित्येक महिने खानावळीचा धंदा केला. भांडारकर उत्तम पाकशास्त्रज्ञ होता. विनोदाचा आविष्कार करण्याचें त्याचें सामर्थ्य प्रचंड होतें. 'एकच प्याला' नाटकांतील तळीराम म्हणून भांडारकर रंगला कीं तो असा कांहीं विलक्षण 'मूड' घेत असे–अशी कांहीं 'चर्या' करीत असे व तासचे तास ती टिकवीत असे हें भांडारकराचें कौशल्य म्हणजे एक महान साधना होती. प्रवेश नसतांनाहि भांडारकर त्या 'मूड 'मधून बाहेर येत नसे. पहिल्याच अंकांतील तळीरामाचें एक प्रदीर्घ भाषण म्हणतांना पेटवलेल्या काडचा विझविण्याचें त्याचें गणित अगम्य असे. 'एकच प्याला' नाटकाच्या रंगतीचे जे महत्त्वाचे घटक होते त्यांत भांडारकराचें 'तळीराम' च्या भूमिकेंतील कौशल्य हा महत्त्वाचा घटक होतो. असा तळीराम झाला नाहीं पुढें होईल असें वाटत नाहीं.

पहिली सहामाही पुण्यांत संपवून दुसऱ्या सहामाहीला मी मुंबईंत

माझे मावसबंधू डॉ. भालेराव ह्यांच्या घरीं राहिलों. महाराष्ट्र–नाटच–मंदिरासारखी एखादी संस्था डॉ. भालेराव ह्यांनीं मुंबईंत स्थापन करावी व चालवावी असें मला फार वाटे. अनेक वेळां आमची तशी चर्चा होई. परंतु मी मुंबईंत असेपर्यंत त्या कल्पनेला मूर्तस्वरूप आलें–नाहीं.

महाराष्ट्र–नाटच–मंदिरानें ह्याच काळांत एक प्रगतीचें पाऊल टाकलें. साहित्याचार्य श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या 'श्रम–साफल्य' ह्या नाटकाचा पहिला प्रयोग लासलगांव रिलीफ फंडासाठीं मंदिरानें केला. हा प्रयोग पहावा अशी उत्कट इच्छा असूनहि मला त्या प्रयोगाला हजर राहतां आलें नाहीं. मी ती रात्र कांहीं विलक्षण मनस्तापांत घालविली. प्रयोग चांगला झाला. रा. ब. प्रधान ह्यांनीं नेतृत्व घेऊन नाटकांचीं तिकिटें खपविलीं. एक सरकारी यंत्रणा पाठीशीं उभीं राहातांच कोणता चमत्कार घडतो ह्याचा अनुभव आला. माझे स्नेही श्री. कानिटकर ह्यांनीं प्रयोगाचें वर्णन करणारें खुलासेवार पत्र पाठवलें. श्री. बाळासाहेब काळे ह्यांनीं 'दिवाणजी'ची भूमिका अप्रतीम कौशल्यानें केली. ह्या नाटकाचे तीन प्रयोग मंदिरानें केले. दोन नाशिकला व एक सिन्नरला असे प्रयोग झाले. सिन्नरच्या प्रयोगाच्या वेळीं आपसांत गैरसमजानें भांडणें झालीं. ह्या प्रयोगांनीं मंदिराचा बोलबाला झाला प्रतिष्ठा वाढली.

नाशिकचा पहिला प्रयोग झाल्यानंतर कानिटकर मुंबईस येऊन गेला. ती रात्र आम्ही दोघांनीं बोलत संपविली. माझ्या दुखऱ्या मनाला ती भेट सुखदायक वाटली. महाराष्ट्र–नाटच–मंदिराच्या विकासाचे ते बेत आम्ही बेभान होऊन बोलत होतों.

जेम्स अॅगेट ह्या ग्रंथकाराचें पुस्तक English Theatre मी वाचलें. ग्रंथकाराची तक्रार अशी कीं इंग्लिश रंगभूमीचा दर्जा खालावत आहे. पूर्वींच्या थोर नटांच्या परंपरा नामशेष होत आहेत. कांहीं तरी फार्स–वजा नाटकांची चलती आहे आणि हें कांहीं बरें लक्षण नव्हे. इंग्लंडसारख्या देशांत केवळ साक्षरच नाहीं तर सुसंस्कृत स्त्री–पुरुषांचें प्रमाण महाराष्ट्रां पेक्षां कितीतरी अधिक आहे. शिवाय इंग्लंड हा स्वतंत्र देश–नाटचकलेच्या अभ्यासाची सोय असें असूनहि रंगभूमीचा दर्जा खालावत असेल तर महा–राष्ट्रांत तसें घडल्यास नवल नाहीं. तें पुस्तक वाचतांना असें कांहीं तुलनात्मक

विचार मनांत येत होते. कांहीं हौशी नट इंग्रजी रंगभूमीचा दर्जा सुधारावा म्हणून अपरंपार प्रयत्न करीत आहेत ह्याचीहि नोंद त्या पुस्तकांत केली आहे. महाराष्ट्र–नाटच–मंदिराचे आम्ही कार्यकर्ते असाच कांहीं तोडका-मोडका प्रयत्न करीत आहोंत हें मनांत येऊन समाधान वाटलें. आमच्या प्रयत्नांचा मुख्य रोख होता तो मराठी नटाचा सामाजिक दर्जा सुधारावा इकडे ! 'मंदिर' ह्या नांवांतच आमचा तो हेतु स्पष्ट होता. 'महाराष्ट्र–नाटच-मंदिर' ह्या नांवानें मराठी रंगभूमीविषयक काम करणारी ही एकमेव संस्था महाराष्ट्रांत आहे असा आमचा अभिमान होता.

श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांच्या 'कान्होपात्रा' ह्या नाटकाचा पहिला प्रयोग कार्तिक शुद्ध एकादशी २० नोव्हेंबर १९३१ या दिवशीं झाला. गंधर्व नाटक मंडळीसारख्या अव्वल दर्जाच्या नाटक मंडळीचा नव्या नाटकाचा पहिला प्रयोग एक सन्मान्य प्रेक्षक म्हणून पहाण्याची संधि मला मिळाली ह्याला कारण नारायणराव कुलकर्णी ह्यांचा मी एक स्नेही हेंच होय. नव्या नाटकाचा पहिला प्रयोग म्हणजे व्यवसायी नाटक मंडळीच्या नशिबाची एक चमत्कारिक परीक्षाच असते. मात्र नाटक मंडळीचा मालक हाच खरा परीक्षार्थी असतो. भिन्न रुचीचा प्रेक्षक समुदाय ही प्रश्नपत्रिका सोडवणें अतिशय अवघड काम असतें. ह्या पहिल्या प्रयोगाच्या यशावर नाटक मंडळीचें भवितव्य–जीवन अवलंबून असतें. केवळ नटवर्गानें आपल्या कौशल्याची परिसीमा करून भागत नाहीं. वृत्तपत्रांतील अनुकूल वा प्रतिकूल अभिप्राय प्रयोगाच्या यशापयशाला कांहीं प्रमाणांत कारण असतात. नाटककार आणि संपादक ह्यांचे परस्पर संबंध ज्या प्रकारचे असतील त्यावर अभिप्रायाचें स्वरूप अवलंबून असतें. 'कान्होपात्रा' ह्या नांवाचें विडंबन 'अळुपात्रा' (अळूच्या वड्या) असें करून विपर्यस्त टीकेचा एक नमुना त्या वेळच्या वृत्तपत्रांत येऊन गेला आहे.

मला त्या प्रयोगाच्या निमित्तानें बालगंधर्वांच्या नाटचगुणा व्यतिरिक्त इतर कांहीं गुणांचें मनोज्ञ दर्शन झालें. चोखामेळा आणि विलास ह्या भूमिका करणारांनीं परिणामकारक साथ दिली. विशेषतः विनायक बुवांनीं विलासची भूमिका अतिशय ढंगदारपणें केली. स्वतः बालगंधर्व आपल्या भूमिकेंत जास्तीत जास्त जीव ओतीत होते. परंतु प्रत्येक लहान लहान भूमिका करणा-

रानें सामुदायिक यशासाठीं जी शिस्त पाळणें आवश्यक असते ती शिस्त दिसली नाहीं. स्वतः बालगंधर्व काखेंत झालेल्या व्याधीनें त्रस्त होते. तरीहि त्यांनीं आपल्या कामांत त्या यातनांचा परिणाम होऊं दिला नाहीं. एखाद्या सेनापतीप्रमाणें समरांगण लढविण्याचा प्रयत्न ते करीत होते. विठोबाची मूर्ति आणि देवळाचा सभामंडप पंढरपूरच्या मूर्तीची व मंडपाची हुबेहूब प्रतिकृति दिसावी असा कसोशीनें प्रयत्न करण्यांत आला होता. नाशिकहून करताल तयार करून पाठविण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली होती ती मी यथाशक्ति पार पाडली.

स्वतः नारायणराव कुलकर्णी ह्यांना ह्या नाटकासाठीं अनेक महिने मानसिक त्रास सहन करावा लागला. नाटकमंडळीबरोबर हिंडतांना आणि नाटकाच्या तालमी होत राहिल्या पाहिजेत हें पाहण्यांत कितीतरी वेळ गेला.महाराष्ट्र–कुटुंबमालेचा चालू व्यवसाय स्थगित झाला. गुलबकावलीचें फूल एक वेळ सुलभ ठरेल परंतु नवें नाटक रंगभूमीवर येणें किती दुर्लभ आहे ह्याची जाणीव त्या प्रयोगाच्या वेळीं झाली.

प्रयोग झाला–यशस्वी झाला. नारायणरावांना हायसें वाटलें.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक

## लेखांक एकोणावीस

# रघुवीर सावकार

रघुवीर सावकार ह्या नटानें मराठी रंगभूमीवर आपलें 'नांव' गाजविलें. ह्या धाडसी नटानें संशय-कल्लोळांतील 'रेवती' च्या भूमिकेनें प्रेक्षकांना वेड लावलें. पुण्या-मुंबईला त्यांची वाढत असलेली लोकप्रियता मी वर्तमानपत्रांतून वाचीत असे आणि मनांत म्हणत असे कीं "दुनिया झुकती है। झुकानेवाला चाहीये।" ह्या नटाशीं माझे संबंध येतील असें मला कधींच वाटलें नाहीं. ते संबंध आले—त्या वेळेपुरते दृढ संबंध आले. तें असें घडलें.

वाङमयमंडळ ह्या संस्थेचे एकमेव संचालक श्री. नाथ निफाडकर ह्यांनीं नाशिकमध्यें एक व्याख्यानसत्र सुरू केले. त्यावेळचा रंगभूमीवरचा एक ज्वलंत वाद 'स्त्रियांनीं स्त्रियांच्या भूमिका कराव्यांत कां?' ह्या विषयावर एक व्याख्यान झालें. नूतन महाराष्ट्र नाटक मंडळीचे एक संचालक श्री. गणेश कृष्ण बोडस ह्यांनीं स्त्रियांनीं स्त्रियांच्या भूमिका करूं नयेत अशी बाजू मांडली. मी ह्या मताशीं माझा सक्त विरोध व्यक्त करतांना एक विधान केलें, 'मराठी रंगभूमीवर नट सम्राट झालाच नाहीं.' माझ्या त्या विधानानें नूतन महाराष्ट्र नाटक मंडळीचा व्यवसायी नटवर्ग खवळून गेला. मी माझें विधान मागें घ्यावें अथवा सिद्ध करावें असा आव्हान स्वरूपाचा निरोप मला पाठविण्यांत आला. श्री. नाथ निफाडकरांना आपल्या व्याख्यानसत्राच्या दृष्टीनें ती एक मोठी आकर्षक घटना वाटली. त्यांनीं आम्हा दोघांना झुंजवायचे असें ठरविलें. व्हिक्टोरिया ब्रिजजवळ असलेल्या श्री. रत्नपारखी ह्यांच्या

बंगल्यांत नदीकांठच्या एका माडींत माझें व्याख्यान झालें. आव्हान देणारा पैकीं एकहि जण व्याख्यानाला हजर राहिला नाहीं. मी माझ्या पद्धतीनें व्याख्यानाची पूर्ण तयारी करून गेलों होतों. जमलेल्या २०-२५ जणांपुढें मी व्याख्यान दिलें. त्याच विषयावर एक लेख लिहून मी पुण्याच्या एका वर्तमानपत्राकडे पाठविला. तो लेख छापून आला. त्यानंतर केव्हांतरी श्री. ग. कृ. बोडस ह्यांनीं रस्त्यांत मला सांगितलें कीं श्री. रघुवीर सावकार तुम्हांला भेटूं इच्छितात. त्यांना माझा लेख आवडला म्हणून ते चर्चा करूं इच्छितात.

रंगबोधेच्छु नाटक मंडळी हें सावकारांच्या नाटक मंडळीचें नांव ! स्वत: रघुवीर सावकार ह्यांच्याभोवतीं रहस्यमयतेचें एक दाट आवरण पसरलें होतें. त्या रहस्यकथा ऐकायला आकर्षक असत. त्यांतील सत्यांश किती हें बहुधा कोणीच पाहिलें नसावें. कुणी गोडबोले महाराज नांवाचे साधु त्या नाटक मंडळीची अधिष्टात्री देवता म्हणून असत. स्वत: सावकार रंगभूमीवर प्रवेश करण्यापूर्वी स्त्री–वेषांत ह्या महाराजांची पूजा करीत– त्यांचा आशीर्वाद घेत व मगच रंगभूमीवर जात असत. आणखीहि कांहीं आख्यायिका ह्या महाराजांबद्दल ऐकायला मिळत.

श्री. रघुवीर सावकार ह्यांची व माझी मुलाखत झाली ती विजयानंद थिएटरमध्यें. त्या मुलाखतीपूर्वी त्यांचें "भोळा शंकर" हें नाटक मी पाहिलें. ह्या नाटकांत "पार्वती 'ची भूमिका करतांना सावकार अपूर्व संयम दाखवीत. त्यांच्या 'रेवती 'च्या भूमिकेबद्दल ज्या उत्तानपणाच्या आख्यायिका माझ्या कानांवर होत्या त्यांना ही भूमिका पहातांना मुरड पडली मला वाटणारा आदर मी त्या मुलाखतींत व्यक्त केला. 'संशय कल्लोळ' नाटकाचा आमचा प्रयोग पहा असें त्यांनीं खास आमंत्रण दिलें.

रघुवीर सावकारांचा विशेष बोलबाला झाला तो ह्याच 'संशय कल्लोळ' नाटकामुळें आणि त्यांतल्या जलशाच्या सीनमधील त्यांच्या उत्तान शृंगारभावदर्शनानें. मी तो प्रयोग पाहिला व त्यांतील तो भावदर्शनाचा प्रसंगहि पाहिला. त्या प्रवेशांत श्री. सावकार 'मत मारो पिचकारी ! भिज गयी तन् मेरी सारी । कन्हय्या ' हें पद म्हणत व त्यांतील अर्थानुकूल अभिनय करीत असत. सर्वसामान्य प्रेक्षक ह्या प्रवेशावर बेहद्द खूष असत आणि त्या गाण्याला व विशेष त: त्यांतील अभिनयाला 'वन्स मोअर' देत. ह्या प्रवेशा-

92343

कडे पाहण्याचा दृष्टिकोन काय असावा ह्या संबंधी श्री. सावकार ह्यांनीं मला एक निराळें दालन खुलें केलें.

नृत्त, नाट्य आणि नृत्य असे तीन वेगळे वेगळे प्रकार भरतमुनीनें आपल्या भरतनाट्यांत वर्णन केले आहेत. त्यांपैकीं 'नृत्त' ह्या प्रकारांत आविर्भाव, नृत्य आणि गायन ह्या तीनचा समावेश होतो. स्वतः सावकार कलकत्ता येथें एका उर्दू नाटक मंडळींत स्त्रीभूमिका करीत. 'सीते'ची भूमिका उत्कृष्ट रीतीनें केल्याबद्दल सुवर्णपदक देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला होता. 'नृत्त' हा प्रकार शिकण्याची संधि त्यांना तेथेंच मिळाली.

ही सर्व माहिती ऐकल्यानंतर मी 'संशय कल्लोळ'मधील तो प्रवेश पाहतांना स्तिमित झालों. मेहनतीनें तयार केलेल्या एका कलाविष्काराला उत्तान, शृंगाराचा जल्लोष समजणें ही चूक तर आहेच पण एका कलावंताला घोर अन्याय करण्यासारखे आहे. रघुवीर सावकारांना आपल्या नाटकावर पैसा मिळाला, नांवलौकिक मिळाला पण परिश्रमपूर्वक मिळविलेल्या त्यांच्या कलेचा यथायोग्य गौरव झाला नाहीं.

त्या मुक्कामांत श्री. रघुवीर सावकार ह्यांनीं महाराष्ट्र–नाट्य–मंदिराला भेट दिली. त्यावेळीं नाट्यलेखनाबद्दल त्यांनीं एक योजना सांगितली. ५–६ मंडळ्यांसाठीं नाटककाराकडून एक नाटक लिहून घ्यावयाचें. त्या पांचसहा नाटक मंडळ्यांनीं त्या नाटकाचे प्रयोग करावयाचे. त्यामुळें नाट्यकौशल्य कोणाचें अधिक ह्याची जाणीव प्रेक्षकांना होईल व अभ्यासू नटाला चांगलें उत्तेजन मिळेल. नाटकाबद्दल सर्व हक्क स्वाधीन अशी नाटक-मंडळ्यांची पद्धति असल्यानें कुचंबणा होते व चांगलीं नाटकें मिळत नाहींत. किर्लोस्कर नाटकमंडळींतून फुटून बाहेर पडलेल्या गंधर्व नाटक मंडळीला ह्याच अडचणीला प्रथम तोंड द्यावें लागेल. नाट्याचार्य खाडीलकरांचें 'स्वयंवर' नाटक फक्त बालगंधर्वच करूं शकतात.

हौशी नटांना व्यवसायी नाटक मंडळ्यांतून त्यांच्या योग्यतेप्रमाणें भूमिका मिळण्याची सोय असावी असा एक मुद्दा त्या चर्चेत मी मांडला. श्री. सावकारांनीं ह्या विचाराला अनुकूलता दाखविली.

'भोळा सांब' ह्या नाटकाचे कर्ते श्री. य. गो. जोशी ह्यांनीं आपल्या नाटकाचा प्रयोग सिन्नर येथें कोणत्या पद्धतीनें झाला ह्याचें वर्णन केलें.

त्यांतला कांहीं विनोदाचा भाग सोडला तरी मराठी रंगभूमीच्या अधोगतीचें कारण काय ह्या प्रश्नाचें उत्तर त्या वर्णनांत सांपडेल. नटांच्या नकला पाठ नाहींत, गाणीं वर्गणी करून कांहीं त्या नाटकांतून तर कांहीं बोलपटांतून गोळा करून म्हटलीं गेलीं. नाटकाचा प्रयोग झाला–घोडें गंगेंत न्हालें. कांहीं पोटभरू नाटक मंडळ्या यात्रेच्या गांवीं नाटकांचे प्रयोग करीत. कोणत्याहि नाटक मंडळीचे कितीहि संरक्षित हक्काचें नाटक हीं मंडळी करीत. धैर्य-धराच्या पदाला भामिनीनें तबल्याची साथ करायची आणि लक्ष्मीधरानें पेटी सांभाळायची. तसाच कांहींसा हा प्रकार होता. तें सुरस चमत्कारिक वर्णन ऐकतांना कानाला बरें वाटतें. पण मनाला यातना होतातच !

नाशिकला सायगांवकर फोटोग्राफर ह्यांचें दुकान चांदवडकर गल्लींत भर रस्त्यावर होतें. तेथें एका स्टँडवर श्री. रघुवीर सावकार ह्यांचें रंगीत एन्लार्जमेंट मांडून ठेवलेलें असें. तीच त्या दुकानची शोभा होती. धैर्यधर आणि भामिनी ह्या दोन वेषभूषांत रघुवीर सावकार असें तें चित्र होतें.

संशय कल्लोळांतील ‘ रेवती ’ ह्या भूमिकेचें कांहीं विलक्षण आकर्षण मराठी नाट्य–रसिकांना असलें पाहिजे असें दिसतें. अगदीं सामान्य क्लबा-पासून गंधर्व नाटक मंडळीसारख्या संगीत श्रेष्ठ नाटक मंडळीनें ह्या नाटकाचे प्रयोग केले आहेत. ‘संशय कल्लोळा ’ची रंगत अक्षय्य आहे. सौभद्र, मृच्छ-कटिक, मानापमान, माईसाहेब हीं अशींच अक्षय्य रंगतीचीं नाटकें आहेत.

ह्याच काळांत सुलोचना पालकर ह्या नांवाची एक नटी ‘ रेवती ’च्या भूमिकेनें प्रसिद्धीस आली. बाईचें तारुण्य, गौर वर्ण आणि अभिनयांतील मोकळेपणा ह्यामुळें प्रेक्षकांना नाटक पहातांना आनंद वाटे. बालगंधर्व ह्यांच्या स्त्रीवेषांतील माना वेळणें इत्यादि सारे ढंग बाईनीं आत्मसात केले होते. त्यांच्या ‘ मृच्छकटिक ’ नाटकाला खूप गर्दी होई. कारण उघड आहे. ‘ अंगें भिजलीं जलधारांनीं । ऐशा ललना स्वयें येउनी । आलिंगिती ज्या लागोनी । तेचि पुरुष दैवाचे । ’ ह्या पदांत वर्णन केलेला तो दैववान् पुरुष पहायला ती गर्दी नसे–तर ती अंग भिजली ललनाच पहायला ती गर्दी होई. त्या प्रवेशाला वन्समोअर दिले जात ते अभिनयासाठीं नव्हे–गाण्यासाठीं नव्हे तर कृत्रिम पावसानें भिजून ओलें चिंब झालेलें एका ललनेचें अंग पुन्हां पुन्हां पहायला

मिळावें म्हणून ते वन्स्‌मोअर असत. बहुरत्ना तशीच भिन्नरुची वसुंधरा हेंच खरें आहे.

नाशिकला बाबूराव पांडे नांवाचे एक संगीतप्रेमी सुखवस्तु गृहस्थ आहेत. 'केशव संगीत समाज' ह्या नांवाचा संगीत नाटकें करणारा त्यांचा एक क्लब असे. त्यांत ब्रह्मदेव वाघ ह्या नांवाचा एक मुलगा रेवतीची भूमिका करी. मी स्वत: तो प्रयोग पाहिला नाहीं.आमचे बाळासाहेब काळे, शंकरराव निफाडकर त्या क्लबाचे सभासद असत. रात्रीचीं जाग्रणें, गप्पासप्पा आणि गाणें बजावणें ह्यासाठीं भरवस्तींत एक निरामय जागा ह्या दृष्टीनें कांहीं मंडळी तेथें जमत. सौभद्र, संत तुकाराम हींहि नाटकें ते करीत. धड व्यवसाय नाहीं, धड हौस नाहीं असें कांहींसें चमत्कारिक स्वरूप असलेला तो क्लब होता !

## लेखांक विसावा

# आठवणीचे खंदक

आठवणीचे खंदक! श्री. र. गो. टेंबे ह्यांनीं एका जर्मन प्रहसनाचें केलेलें हें मराठी रूपांतर प्रथम 'रत्नाकर' मासिकांत प्रसिद्ध झालें. श्री. बाळासाहेब काळे ह्यांनीं त्या प्रहसनाची शिफारस केली. आम्ही त्या प्रहसनाचें सामुदायिक वाचन केलें. दोन विसराळू म्हातारे, एक तरुण व एक तरुण मुलगी—एक अंक एकच प्रवेश—शिकस्त पाऊण तास चालणारें तें प्रहसन मस्त होतें. आम्ही त्या प्रहसनाचा प्रयोग करावा असें ठरविलें. श्री. डास शालेय जीवनांतून विनोदी भूमिका करणारे हौशी नट म्हणून ख्यातनाम झालेले—हायस्कूलचे माजी विद्यार्थी ह्यांना कीर्तिवानरावाची भूमिका द्यावी असा विचार ठरला. एकदां येऊन त्यांनीं तालीमहि घेतली. कांहीं कारणांनीं ते ती भूमिका करूं शकले नाहींत. श्री. काळे कीर्तिवानराव आणि मी उदाजी-राव अशा भूमिका केल्या. त्यांतील दिनकर आणि तुळसा अनेकवेळां बदलले. मुंबईच्या ब्लॅव्हाटस्की लॉजमध्यें आम्ही तो प्रयोग मुंबई—मराठी साहित्य-संघासाठीं केला. त्यावेळीं अनंत वर्तक ह्यांनीं दिनकरची भूमिका केली.

एका गणपति उत्सवांत आम्ही त्या प्रहसनाचे प्रयोग मेळापद्धतीनें केलें. त्यांतला एक प्रयोग नाशिकच्या राजस्थान मंडळांत केला. त्या प्रयोगाचें वैशिष्ट्य असें कीं ३००–४०० मारवाडी स्त्रिया डोळ्यांवर घुंगट ओढून दोन बोटांच्या फटींतून दिसेल तो प्रयोग पहात होत्या. पहिल्या दोन रांगांत शाळेंतल्या १०–२० मुली बसल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरचें हंसू दिसे.

बाकी आवाज ऐकूं येत. परंतु हंसणारे चेहरे अदृश्यच ! त्या मारवाडी स्त्रियांचा प्रयोगाबद्दलचा अभिप्राय दुसऱ्या दिवशीं ऐकायला मिळाला. नाटक चांगलें— त्यांत तरुण पोराला आणि पोरीला एकाच खोलींत कोंडतात तें करूं नये ! अभिप्राय अत्यंत प्रांजल. फक्त त्या नाटकांतला सारा हास्यरस त्याच एका प्रसंगावर आधारलेला आहे हें त्यांना कळलें नाहीं. पण हा त्यांचा दोष म्हणतां येणार नाहीं. एका व्यायाम शाळेच्या सुशिक्षित चालकानें ह्याच मुद्यावर हुज्जत घालून नैतिक दृष्टचा हीन आभरुचीचा हा प्रयोग करूं नका म्हणून दुराग्रह मांडला. दोन म्हाताऱ्यांच्या विस्मरणामुळें हें घडत आहे. त्यांत नीति अनीतीचा संबंध नाहीं हें जीव तोडून सांगितलें तरी त्यांचें समाधान होईना. शेवटीं निकरावर गोष्टी आल्या तेव्हां त्यांना सांगावें लागलें कीं तुमच्या शाळेनें हा प्रयोग घेतला नाहीं तर आम्ही तो स्वतंत्रपणें करूं. प्रयोग झाला. शेंकडों प्रेक्षकांनीं दिलेला कौल पाहून चालक महाशय चक्क झाले.

१९३३ च्या सप्टेंबर महिन्यांत नाशिकला झालेल्या कवि संमेलनांत डॉ. माधवराव पटवर्धन ह्यांच्यासमोर विजयानंद नाटकगृहांत आम्ही तें प्रहसन केलें. ज्या मूळ जर्मन नाटकावरून हें रूपांतर करण्यांत आलें आहे त्या नाटककाराची कूस विलक्षण समृद्ध आहे. ६०० पेक्षां थोडीं अधिक नाटकें ह्या एका नाटककारानें जर्मन भाषेंत लिहिलीं आहेत. 'आठवणीचे खंदक' ह्या नाटकांतील भाषेवर श्री. गोविंदराव टेंबे ह्यांचा हात निश्चित फिरला आहे.

१९४१ च्या डिसेंबर महिन्यांत आचार्य अत्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या मुंबईच्या नाट्यसंमेलनांत एक कार्यक्रम म्हणून आम्ही ह्या प्रहसनाचा प्रयोग केला. म्हातारे तेच म्हणजे काळे व मी, तरुण श्री. वसंता बापट आणि तरुण मुलगी बाळू आचार्य असा संच होता. बाळू आचार्य हा देखणा मुलगा स्त्रीवेषांत पाहून ती मुलगीच आहे असेंच मत अनेकजण बोलूं लागले. मुंबईंत हें प्रहसन फार लोकप्रिय झालें. गणपति उत्सव, मंगळागौर, स्नेहसंमेलन अशा अनेक प्रसंगीं अनेक हौशी नटसंघांनीं त्या प्रहसनाचे प्रयोग केले. आम्हांला हें कळण्याचें कारण आम्ही छापून काढलेल्या त्या पुस्तिकेची आवृत्ति हां हां म्हणतां खलास झाली. आज त्या पुस्तिकेची प्रत दुर्मिळ आहे. आचार्य अत्रे ह्यांनीं त्या प्रहसनाची यथास्थित स्तुती केली.

जून १९३३ पासून मी नाशिकच्या न्यू इंग्लिश हायस्कूल मध्यें शिक्षक

म्हणून नेमला गेलों. ज्या राजेबहाद्दर वाड्यांत शिक्षक म्हणून मी काम सुरू केलें तेथेंच पूर्वी नासिक हायस्कूल ही सरकारी शाळा होती. त्या शाळेचा मी माजी विद्यार्थी असल्यानें माझ्या विद्यार्थी जीवनाच्या अनेक आठवणी त्याच वास्तूंत होत्या. त्याच वाड्यांत मी विद्यार्थी असतांना 'तोतयाचें बंड' या नाटकाच्या तालमी केल्या. त्या वेळच्या माझ्या मुख्याध्यापकांनीं–श्री. आर. के. भिडे ह्यांनीं माझ्या नाना फडणीसाच्या भूमिकेबद्दल काढलेले प्रोत्साहनपर उद्‌गार मी ह्याच वाड्यांत ऐकले होते.

न्यू इंग्लिश ही एक खाजगी शिक्षणसंस्था होय. ४ थी अचा मी वर्ग-शिक्षक झालों. नाटकाच्या नादानें मी बोलायला शिकलों होतों, आवाजाची मेहनत केली होती. तें भांडवल मला न कळत शिक्षकाच्या व्यवसायाच्या प्रारंभकाळांत खूपच उपयोगी पडलें. आपले 'सर' नाटकांत कामें करतात ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें एक अपूर्वाई होती. माझे त्यावेळचे सहकारी श्री. पी. डी. चंद्रात्रे अतिशय हुषार आणि व्यासंगी गृहस्थ आहेत. मी व त्यांनीं मिळून ४ थी अ व ब चे वर्ग विषयदृष्टचा सांभाळलें. ४ थी बचा वर्ग नव्या शिक्षकाला भीतिदायक वाटावा असाच होता. ही भीति त्या मुलांची नसून आपण काय शिकवायचें आणि कसें शिकवायचें Matter and method ह्यांच्या अज्ञानामुळें निर्माण झालेली ही भीति आहे ह्याचा उमज मला फार उशीरा झाला. ४ थी ब च्या वर्गांतील पहिला आठवडा मी एक गोष्ट सांगून पार पाडला. माझ्या सांगण्यांतील नाटच मुलांवर प्रभाव पाडण्याइतकें समर्थ होतें. असा मला अनुभव आला. मी त्या वर्गांत रुळायला माझा नाटकाचा छंद कारण झाला.

१९३३ पासून १०–१५ वर्षें त्या शाळेच्या गॅदरींचीं नाटकें मीच बसवायची असा एक अलिखित नियमच झाला. शालेय रंगभूमि असा कांहीं वेगळा प्रकार त्यावेळीं नव्हता. व्यवसायी रंगभूमीवरचें एखादे रंगतदार नाटक घ्यावयाचें आणि त्यांत काटछाट करून तो कपडा मुलांच्या अंगाला बसेल इतपत केलें कीं झालें गॅदरींगचें नाटक !

इंग्रजी शाळेंतला कुणीहि शिक्षक गॅदरिंगचें नाटक बसवायला सहसा धजत नसे. अशा शिक्षकाला कष्ट तर लागतात पण केलेल्या कष्टांची जाणीव शाळा चालकांना असत नाहीं–त्याला जाहीर धन्यवाद देण्याची

गरज त्यांना वाटत नाहीं. अनेक किरकोळ गोष्टीबद्दल मनसोक्त आधार मानले जात असतांना ह्या नाटचशिक्षकाचें विस्मरण होतें–त्याची उपेक्षा होते. पहिल्याच वर्षी 'माईसाहेब' हें नाटक शाळेंतील विद्यार्थ्यांकडून मी बसविलें. नाताळची सुटी हाच बहुधा गॅर्दरिंगचा हंगाम असे. महिना दीड-महिना मी सक्त मेहनत घेतली. स्वरसंहिता घोकून घेतात तशी नाटच-संहिता मुलांकडून घोकून घेतली. प्रयोग चांगला झाला. श्री. गिरीश त्या प्रयोगाला हजर होते. त्यांनीं मला माझ्या परिश्रमाबद्दल धन्यवाद दिले परंतु शाळेच्या मुख्याध्यापकांनीं आपल्या भाषणांत चुकून दखल घेतली नाहीं. मीहि माणूसच आहे. माझ्या मनाला ती गोष्ट खटकली. बोलण्याची सोय नाहीं कारण आम्ही नोकर आणि ते मालक!

शाळेंतील मुलांचा लोभ जमावा असें आकृतीचें अथवा लाघवी बोलण्याचें भांडवल माझ्याजवळ नव्हतें. उलट माझे डोळे हा अनेकांना भीतीचा विषय वाटत असे. नाटक हा एकच दुवा असा होता कीं ज्यामुळें कांहीं विद्यार्थ्यांचा व माझा परिचय झाला आणि त्यांना मजबद्दल वाटणाऱ्या भीतीचें रूपांतर त्यांना व मला न कळत एकमेकांबद्दलच्या लोभांत झालें. माझ्या नाटकाच्या छंदाचे मी फार उपकार मानतों. कारण त्या छंदानें मला आयुष्यांत कांहीं अकृत्रिम स्नेही मिळवून दिले त्याचप्रमाणें मजवर निरतिशय लोभ करणारे कांहीं विद्यार्थीहि मिळवून दिले. अन्यथा निरर्थक असणाऱ्या माझ्या जीवनाला अर्थ मिळाला. तो ह्या मित्रांच्यामुळें आणि विद्यार्थ्यांच्या मुळेंच. केवळ माझ्या आग्रहामुळें लुगडें नेसायला तयार झालेला जोशी नांवाचा विद्यार्थी आज एक सधन व्यापारी आहे. तो मला अजूनहि चाहतों–रस्त्यांत भेटला तर थबकतो आणि त्यावेळच्या नम्रतेनें बोलतो.

'माईसाहेब' ह्या नाटकाची तालीम देतांना मला हाहि अनुभव आला कीं तालीम पाहायला जमणाऱ्या विद्यार्थ्यांत एखादा सुप्त नट असतो. 'उत्तम'ची भूमिका करण्यासाठीं मी निवडलेला मुलगा तितकासा समाधान-कारक नव्हता. शाळेच्या क्रिकेट खेळाडूंपैकीं एक दुगल नांवाचा विद्यार्थी केवळ तालीम ऐकायला येऊन बसत असे. मी शाळेंतला नवीन शिक्षक-तरीहि मी त्या मुलाला त्या भूमिकेसाठीं उभा केला आणि त्यानें ती भूमिका यशस्वी-रीतीनें केली.

सहकारी शिक्षक शारीरिक मेहनतीला फारसे उत्सुक नसतात असा माझा अनुभव आहे. त्यांचा भलेपणा म्हणजे कांठावर बसून ते पाण्यांत पडलेल्याला प्रोत्साहन देतात–एखादी दुसरी त्यांच्या दृष्टीनें मोलाची सूचना त्या प्रवाहपतिताच्या अंगावर फेकतात. ह्या नाटकाच्या निमित्तानें एका चांगल्या कलावंताची ओळख झाली. तो म्हणजे सहदेव तापकिरे ! फाळक्यांच्या फिल्मकंपनींतला तो एक नट. स्त्रिया भूमिका करीत नसत त्या जमान्यांत. मुक्या चित्रपटांत साधव स्त्रीभूमिका करीत असे. तो मेक-अप् फारच चांगले करतो. आज तो मद्रासला जैमिनी फिल्म्स्मध्य हजार रुपये पगारावर मेक–अप् मास्टर आहे.

• • •

## लेखांक एकवीसावा

# नाट्य-मन्वंतर लिमिटेड

'सावित्री' ह्या नाटयाचार्य खाडीलकरांच्या नव्या नाटकाचा प्रयोग पहायला गेलों असतांना श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांनीं एका व्यक्तीकडे बोट दाखवून सांगितलें कीं नाटय-मन्वंतरचे वर्तक ते हे. मी त्या गृहस्थांना पाहिलें. गोरा रंग, डोळ्याला चष्मा, मजबूत शरीर, अंगांत पांढरा कोट, डोक्याला काळी टोपी ही माझी आठवण आजहि ताजी आहे.

'नाटय-मन्वंतर लिमिटेड' ह्या नांवामुळें आणि त्या नांवाशीं संलग्न असलेल्या व्यक्तींमुळें ह्या संस्थेबद्दल माझेंच नव्हे तर नाटक वेडया अनेकांचें कुतूहल जागृत झालें. अण्णा कारखानीस, केशवराव दाते ही आमच्या नाटय-परंपरेंतील जुनीं प्रस्थें ! विशेषत: केशवराव दाते हे माझ्या मनाचें फार मोठें आकर्षण. 'आंधळ्यांची शाळा' ह्या नाटकाच्या तालमी व जाहिराती चालू होत्या. सुशिक्षित कुलीन, स्त्रिया ह्या प्रयोगांत भूमिका करणार हें नाटयसृष्टींतील एक मन्वंतर! इब्सेन प्रणालींतील नाटकाचा प्रयोग हें दुसरें मन्वंतर ! ! सजावट, प्रकाश योजना, पार्श्वसंगीत हें तिसरें मन्वंतर ! ! !

ह्या नाटकाची तालीम पहायला मिळावी हा माझा छंद म्हणून मी मुंबईस गेलों असतां तालमीच्या जागेचा शोध करीत त्या जागीं पोंहचलों. श्री. अनंत काणेकर व आणखीं दोनतीन माणसें तेथें होतीं. मी कांहीं वेळ तेथें थांबलों. केशवराव दाते आले नाहींत. तालीम झाली नाहीं. मी परत आलों.

नाशिकला विजयानंद थिएटरमध्यें 'आंधळ्यांची शाळा' ह्या नाटकाचा प्रयोग झाला. मुंबईपुण्याला झालेल्या प्रयोगांतील संच आणि हा संच ह्यांत फरक होता. श्री. के. नारायण काळे, पार्श्वनाथ आळतेकर ही मंडळी बाहेर पडली होती. स्वत: वर्तक काळे ह्यांची भूमिका करीत आणि काकाजी जोगळेकर अळतेकरांची भूमिका करीत. मिसेस् वर्तक आणि लीला चिटणीस ह्या दोन स्त्रिया त्या प्रयोगांत होत्या. स्वत: केशवराव दाते प्रभात फिल्म कंपनींत 'राजगुरू'च्या भूमिकेसाठीं राहिले होते. नासिकच्या प्रयोगासाठीं ते पुण्याहून जात येत असत. केशवरावांशीं माझा परिचय असल्यानें मी त्यांना रंगपटांत भेटायला गेलों. राजगुरूच्या भूमिकेसाठीं डोक्याचा चक्क गोटा केलेला—आणि इथे भूमिका रंगेल मनोहरची ! प्रयोग अतिशय परिणामकारक झाला. इब्सेन आणि बर्नार्ड शॉ ह्यांचे पुतळे स्टेजवर मांडून नाट्यक्षेत्रांतील नव्या युगाची जाणीव दिली जात असे. फ्लॅट सीन, आंतून वापरलेले प्रकाश झोत, गद्य भाषणाला तंतुवाद्याची साथ, नैर्सगिक भाषण पद्धति इत्यादि तंत्रें उठावदार रीतीनें वापरलेलीं असलीं तरी तीं सर्वस्वी नवीन नव्हतीं. बापूराव पेंढारकरांनीं केवळ सामाजिकच नव्हे तर कृष्णार्जुयुद्धासारख्या पौराणिक नाटकांतहि तीं तंत्रें वापरलीं होतीं.

मनोहरच्या भूमिकेंत केशवराव दाते आपल्या नाट्यगुणांचा संपूर्ण आविष्कार करीत. विशेषत: दुसऱ्या अंकांतील त्यांचा प्रवेश अतिशय कौशल्यपूर्ण होई. मनोहर येत आहे हें कळतांच सुशीलेचें घाईघाईनें निघून जाणें, तिच्यासाठीं आणविलेला पाण्याचा भरलेला पेला तसाच भरलेला तेथें टेबलावर रहाणें, मनोहराचा शून्य दृष्टीनें प्रवेश, अण्णासाहेबांचा प्रश्न, 'कायरे घुबडा. दिवसां इकडे कोणीकडे ?', मनोहरनें उत्तर न देतां पाण्याचा पेला पिऊन टाकणें. ह्या साऱ्या बारीकसारीक हालचालींतून केशवरावांच्या दिग्दर्शन कौशल्याचे तेजस्वी पैलू दिसत. मी जळगांवच्या एका मासिकांत 'आंधळ्यांच्या शाळेंतील एकच प्याला' म्हणून ह्या दिग्दर्शनाचें रसग्रहण करणारा एक लेख लिहिला.

महाराष्ट्र—नाट्य—मंदिर ह्या आमच्या संस्थेतर्फे नाट्यमन्वंतरच्या चालकांचे व नटवर्गाचें अभिनंदन करण्यासाठीं एक लहानसा स्वागत समारंभ आम्ही योजला. श्री. वर्तक माझ्या बंधूचे—दत्तोपंत पुरोहितांचे फर्ग्युसन


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................... दि: ...................

कॉलेजमधील सहाध्यायी व स्नेही–ती ओळख उपयोगी पडली. श्री. वर्तक ह्यांनीं आमचें निमंत्रण स्वीकारलें. मिसेस् वर्तक व कांहीं नटांना घेऊन वर्तक आले. श्री. वर्तक ह्यांच्याशी त्यानंतर जेव्हां जेव्हां माझा संबंध येत गेला त्या त्या वेळीं मला त्यांच्या स्नेहबुद्धीची जाणीव झाली. 'आमचा मुज़ुमदार काय करतो ? पुरोहित कुठें आहे ?' हे त्यांचे हमखास प्रश्न आणि माझीं ठरलेलीं उत्तरें–मुजुमदार वकिली करतात आणि पुरोहित शाळेंत आहेत. हा एक ठराविक कार्यक्रम असे.

श्री. वर्तक ह्यांना मी माझें 'गुरुकुल' नाटकाचें हस्तलिखित वाचावयास दिलें होतें. तें वाचून त्यांनीं कांहीं सूचना केल्या. आमच्या प्रत्येक भेटींत ते एक गोष्ट आवर्जून बोलत. "पुरोहित, तुम्हांला पाहिलं कीं अथेल्लो बसवावें असं वाटतें. What a broad face आणि माझ्या रुंद चेहऱ्याचें त्यांचें मूल्यमापन कांहीं निराळेंच होतें. मी स्वतः माझ्या चेहऱ्याकडे त्या दृष्टीनें कधींच पाहिलें नाहीं. श्री. नानासाहेब फाटक ह्यांचें माझ्या चेहऱ्याबद्दलचें मत मागें दिलेंच आहे. श्री. आजगांवकर–बावडेकरांचे स्नेही आणि संतकाव्याचे उपासक–ह्यांची विविधवृत्त कचेरींत गांठ पडली तेव्हां त्यांनींहि मला पाहून गणपतराव जोशांची आठवण होते असें सांगितलें. त्यांचे ते उद्गार ऐकून मी गोंधळून गेलों. हें सर्व लिहितांना मला ही कष्टप्रद जाणीव आहे कीं इतरांच्या दृष्टीनें विशेष दिसणाऱ्या त्या चेहऱ्याचा नाट्यदृष्ट्या मला फारच थोडा उपयोग करतां आला. पॉल रॉब्सन ह्या निग्रो नटाचीं 'अँथेल्लोच्या' भूमिकेंतील छायाचित्रें मी जेव्हां पाहिलीं त्यावेळीं श्री. वर्तकांच्या त्या उद्गारांचा– broad face –अर्थ कळला.

मराठी रंगभूमीच्या इतिहासांत श्री. वर्तकांना एक विशेष स्थान आहे. स्वतःच्या पत्नीला नाटकांत भूमिका करूं देण्याचें नैतिक धैर्य आणि मनाचें औदार्य असणाऱ्या वर्तकांसारख्या व्यक्ति विरळा ! इतरांच्या मुलींनीं बायकांनीं नाटकांत कामें करावींत असें परोपदेशे पांडित्य करणाऱ्या शेंकडों वाचाळांपेक्षां वर्तकांची कृति–शीलता प्रशंसनीय–अनुकरणीय आहे. श्री. वर्तक मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें एक नांवाजलेले अधिकारी होते आणि डेक्कनकिंग सोप ह्या कारखान्याचे संचालक होते. ह्या दोन्ही कारणांनीं मिळालेल्या



महाराष्ट्र-कुटुंब मालेच्या कुटुंबांतील दोन कर्ते पुरुष श्री. ना. वि. कुलकर्णी आणि श्री. विठुकाका खाडीलकर व मी.



कांदीवलीच्या टेकडीवर मराठी नाटकाचा झेंडा फडकवणारा माझा आवडता मित्र प्रभाकर महाबळ.



महाराष्ट्र नाट्य-मंदिराच्या लोकसंग्रहाचा भक्त प्रल्हाद औरंगाबादकर : त्याची रसिकता आणि वर्णनशैली ह्यांना 'माप' नव्हतें.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • •

● मराठी नाटकें माझा छंद . . . .

पैशांतून श्री. वर्तकांनीं नाट्यमन्वंतरची उभारणी केली आणि शेवटीं पंधरा-वीस हजारांची नुकसान सोसली.

नाट्यमन्वंतराचा नाशिकला जाहीर झालेला खेळ, "आंधळ्यांची शाळा" अपरिहार्य कारणासाठीं बंद ठेवावा लागला. बोलपटसृष्टींत लठ्ठ वेतनामागें लागलेल्या नटींनीं प्रयोगाच्या दिवशीं अनुपस्थित राहून ही अवघड परिस्थिति निर्माण केली. स्वत: केशवराव दाते ह्यांच्या मनाला ती गोष्ट खूप बोंचली. त्यांचाहि निरुपाय होता. नाट्यमन्वंतरचे तें हजारों रुपये खर्च करून तयार केलेले सामान विजयानंद थिएटरमध्यें एका अडगळीच्या खोलींत कित्येक महिने धूळ खात पडलें होतें. श्री. काकाजी जोगळेकर ह्यांनीं मेहुणपुऱ्यांत १६ रुपये भाड्याची एक खोली घेऊन कित्येक वर्षें तें सामान जिवापाड जतन करून ठेवलें होतें. इतरांना निर्जीव वाटणारें तें नाटक-वाल्यांचें सामान म्हणजे त्यांचा संसार असतो. त्या सामानावर जिवंत माणसा वर करावें तसें त्यांचें प्रेम असतें. त्या सामानाची वाताहत म्हणजे कुणीतरी काळजाचा लचका तोडावा अशा यातना त्यांना होतात. त्यांच्या त्या वेदनांची जाणीव कोण घेणार ?

श्री. केशवराव दाते ह्यांना ह्या दुसऱ्या मुक्कामांत बरीच सबड होती. म्हणून त्यांच्याशीं दृढ परिचय करून घेण्याची मला संधि मिळाली. नाट्य-मन्वंतराच्या नटांना ह्याहि वेळीं महाराष्ट्र–नाट्यमंदिराला भेट देण्याचें निमंत्रण आम्ही दिलें. श्री. केशवराव दाते आले. कांहीं मंडळींना घेऊन आले मध्यान्हीची वेळ. प्रल्हादरावांच्या घरीं मोठी जागा म्हणून कार्यक्रम तेथें घेतला. नाशिकच्या गणेशोत्सवांत मी एक नवीन कार्यक्रम करीत असे. 'सवाई माधवरावांचा मृत्यु', 'कांचनगडची मोहना' ह्या नाटकांतील स्वगतें मी नाट्यदृष्ट्या वाचून दाखवीत असे व त्यासाठीं करावयाच्या अभिनयाची चर्चा करीत असे. नाट्य शिक्षणाचा तो एक छोटासा प्रयत्न होता. केशवरावांचा अभिप्राय मिळावा म्हणून त्या भर दुपारीं मी कांहीं स्वगतांचें वाचन केलें. चहापाणी झालें. केशवरावांनीं मला त्या उपक्रमाबद्दल प्रोत्साहन दिलें आणि नाट्य–दृष्ट्या तुम्ही एक महत्त्वाचें कार्य करीत आहांत असेंहि सांगितलें.

आज गाजलेलें 'अंमलदार' नाटक ज्या मूळ रशियन नाटकाच्या

इंग्रजी भाषांतरावरून घेतलें आहे त्या गोगलच्या Government Inspector ह्या नाटकाचें मी शब्दशः भाषांतर केलें होतें. माझे स्नेही श्री. शिवराम गोविंद भावे ह्यांनीं त्या नाटकाची शिफारस केली आणि इंग्रजी पुस्तकहि मिळवून दिलें. मी तें भाषांतर केशवरावांना वाचावयास दिलें. त्यांना त्या नाटकाची मूळ कल्पना फार आवडली. त्यांची स्वतःची नाटकमंडळी असती तर कदाचित आवश्यक ते संस्कार करून त्यांनीं त्या नाटकाचा प्रयोगहि केला असता. आणि मग जो 'ढेरे साहेब' महाराष्ट्राला दिसला असता तो अविस्मरणीय ठरला असता.

श्री. वर्तक नवीन विचारप्रवाहाच्या नाटकांचे प्रवर्तक झाले आणि मराठी रंगभूमीवर एका नवीन प्रकाशझोताचा उदय झाला. श्री. अत्रे, श्री. रांगणेकर ह्यांनीं तो प्रवाह समृद्ध केला. आज तो प्रवाह आटत चालला आहे हें पाहून दुःख वाटतें. मराठी मनाची ती जिद्द, तो चिवटपणा, तो अभिमान ह्या सर्व गुणांचा विलक्षण प्रभावी संगम श्री. वर्तकांच्या व्यक्तित्वांत झाला होता. त्या संपन्न व्यक्तित्वाला माझे शतसहस्र प्रणाम असोत !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..............

## लेखांक बावीसावा

# मी भजी खातो !

'भजीं खाणें' ह्या वाक्प्रचारानें जी अप्रतिष्ठा जी मानहानि सूचित होते त्या सर्वांचा मी एका रात्रींत अनुभव घेतला. माझ्या आयुष्यांतील तो दिवस, ती रात्र मी कधींहि विसरणार नाहीं. मला आयुष्यांत अपयश माहीत नव्हतें असें नाहीं. परंतु सार्वजनिक जीवनांतील अपयश कसें झोंबतें ह्याचा अनुभव मी त्या उत्तररात्रीं घेतला. त्या अनुभवाच्या आठवणीनें माझें मन आजहि उदास होतें.

'नवमतवाद' हा त्या काळांत गरम चर्चेचा विषय होता. कांहींहि लोकविलक्षण—मग तें नैतिक असो, सामाजिक असो, धार्मिक असो—म्हणजे नवमतवाद असा सर्वसाधारण माणसाचा समज होता. समाजांत हींच माणसें बहुसंख्य. सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ आणि साहित्यिक श्री. वामन मल्हार जोशी ह्यांनीं ह्या विषयांवर 'विस्तवाशीं खेळ' ह्या नांवाचें एक नाटकहि लिहिलें. पुण्यास त्याचा प्रयोग झाल्याचें मी वृत्तपत्रांतून वाचलं. माझे एक स्नेही श्री. वसंतराव रहाळकर ह्यांनीं ह्याच विषयावर एक नाटक लिहिलें. त्या नाटकाचें नांव 'नवे डोळे'. महाराष्ट्र–नाट्य–मंदिरानें तें नाटक रंगभूमीवर आणावयाचें असें ठरविलें. नाटकाचें वाचन झालें. पात्रयोजना करतांना स्त्रीभूमिकांची चणचण भासूं लागली. येथपासून आमच्या चुकांच्या मालिकेला प्रारंभ झाला. आणि त्याचा कळस प्रेक्षकांपैकीं कांहींजणांनीं स्टेजवर भजीं फेकण्यांत झाला.

नाटकांच्या तालमी यथातथाच झाल्या. बहुसंख्य हौशी नाटकवाले तसेच करतात. नकला पाठ नाहींत. तिकिटें मात्र चिक्कार खपविलीं. जणू कांहीं आमच्या बेअब्रूचें प्रदर्शन अधिक उत्कट व्हावें म्हणून त्यावेळचे डिस्ट्रिक्ट जज्ज ह्यांना तिकीट देऊन नाटकाचें निमंत्रण दिलें. त्यांचे शिरस्तेदार आमच्या प्रयोगांत नायकाची भूमिका करणार होते. नाटकाचा दिवस उजाडला.

दुपारीं १–१॥ च्या सुमारास खांदवे गणपतीजवळ एक मनुष्य मला भेटला. त्यानें सांगितलें, "नानासाहेबांनीं नाटकासाठीं पडदे वगैरे सामान पाठविलें आहे तें कोठें न्यावयाचें ?" मला काय वाटलें कुणाला ठाऊक मी त्या माणसाला सांगितलें कीं आम्हांला सामान नको. दाराशीं चालून आलेलें सामान मी नाकारलें. आमच्याजवळ स्वतःचें सामान नव्हतें. स्टेजसजावट करण्यांत कलात्मक दृष्टी असलेल्या एका गृहस्थावर आम्ही अवलंबून होतों त्यांनीं संध्याकाळीं अंधार पडल्यावर सामानाची यादी दिली व हें सामान थिएटरमध्यें आणून ठेवा असा निरोप पाठविला. मला कांहीं अडलें कीं मी प्रल्हाद औरंगाबादकराकडे जात असे. तोहि असा बहाद्दर कीं अडलेलें काम तो सुरळीत करीत असे. संध्याकाळीं टेक चढून मी त्याच्या घरीं गेलों व त्याला माझी अडचण सांगितली. तो स्नानाच्या तयारींत होता. तशाहि स्थितींत त्यानें मला धीर दिला. त्यानें स्नान उरकलें आणि रात्रीं आठ वाजतां आम्ही दोन हमाल घेऊन हौदाच्या बंगल्यांत शिरलों.

फाळके ह्यांच्या चित्रपटव्यवसायाचा प्रारंभ जेथें झाला व त्या व्यवसायाचा प्रकर्ष जेथें घडला तोच हा प्रसिद्ध हौदाचा बंगला, रात्रीं मोठाले नाग त्या आवारांत स्वैर वावरतात अशी त्या बंगल्याची आख्यायिका होती. प्रल्हाद, मी आणि नंतर आलेले दोन हमाल तेथें जाऊन –चित्रपटासाठीं कधीं तरी केलेले व आतां धूळ खात पडलेले खांब ओढून काढूं लागलों. प्रल्हादला तशाहि अवस्थेंत विनोद सुचला व तो मला म्हणाला, "वामन्या, उद्यां वर्तमानपत्रांत बातमी येणार. महाराष्ट्र–नाटय–मंदिराचे दोन कार्यकर्ते साप चावून मेले." आम्ही दोघेहि मनमुराद हंसलों आणि पुन्हां कामाला लागलों. तास-दोन तास झटापट करून खांब आम्ही बाहेर काढले व हमालाच्या डोक्यावर देऊन आम्ही थिएटरचा रस्ता चालूं लागलों.

नाटकाची सुरुवात ९ वाजतां व्हावयाची तर आंतलें सेटिंग मांडलेलें

नाहीं. सगळी तयारी होतां करतां १०॥ वाजून गेले. बाहेरून प्रेक्षक नऊ वाजल्यापासून जमलेले होते ते शिटचा मारून आपली उतावीळ जाहीर 'करीत होते. एकदांचा पडदा वर गेला आणि वाट पाहून कंटाळलेल्या-नीं चिडलेल्या प्रेक्षकांसमोर प्रयोग सुरू झाला. आमचे तीन्हीहि स्त्रीपार्टी बेढब, रंगभूषा-वेषभूषा घाणेरडी, भाषणांत मजा नाहीं, इतरहि कोठला झगझगाट नाहीं. एक अंक संपला. नवमतवादाची नुसती चर्चा कोण ऐकणार ?

श्री. राजाभाऊ वेलदे ह्यांनीं ह्या नाटकांत नायकाची भूमिका केली. कोर्टांतील शिरस्तेदार हा त्यांचा व्यवसाय. परंतु त्यांचा वाणीसंस्कार अत्यंत शुद्ध होता. आवाजाला धार अशी कीं नानबा गोखल्यांची आठवण व्हावी. पंडित महाजन ह्या तरुण चित्रकारानें आपली भूमिका समजून केली. पांडोबा कुलकर्णी, बाळासाहेब काळे हे तर मंदिराचे नामांकित नट! आमच्या तीन स्त्रीभूमिका करणाऱ्या नटांत तीन वेगवेगळे दोष दिसून आले. एक स्त्रीभूमिकेला शोभतच नव्हता. दुसऱ्याचा काळा रंग, हिरवी दाढी आणि टांगलेले हात तिसऱ्याचा खुजेपणा ह्या सर्वांची अनिष्ट युती होऊन प्रयोगाचा बोऱ्या वाजला.

शेवटच्या अंकाला पांडोबा कुलकर्णी, मी आणखी पांचसातजण स्टेजवर उभे असतां वरच्या गॅलरींतून कुणीतरी भजीं फेंकलीं. त्यांतील एक भजें पांडोबांच्या पायाशीं पडलें. त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक. त्यांनीं तें भजें उचललें व चक्क तोंडांत टाकलें. त्यांच्या त्या धाडसाचा कांहीं विलक्षण परिणाम प्रेक्षकांवर झाला असावा. ही कंपनी दोन शेर भजीं खाऊन टाकील आणि प्रयोग अधिकच टुक्कार करील असा त्यांचा ठाम ग्रह होऊन त्यांनीं भजीं मारणें सोडलें व थिएटर रिकामें करायला सुरुवात केली. पुढच्या रांगांतील प्रतिष्ठितांनीं आपल्या खुर्च्या केव्हांच सोडल्या होत्या ज्याला Dead point म्हणतात असा क्षण निर्माण झाला. स्टेजवर नक्कल कुणीच म्हणेना. मी त्या नाटकांतला बाबासाहेब स्टेजच्या मध्यावर उभा होतों. मी प्रत्येकाला विनंति केली. कोणीच बोलायला तयार नाहीं. मी त्यांना आंत जाण्यास सांगितलें. ड्रॉपच्या पडदेवाल्याला पडदा टाकण्यास सूचना दिली-रंगभूमीला आणि त्या ड्रॉपला मी नमस्कार केला आणि मेकप उतरविण्यास आंत गेलों.

सार्वजनिक जीवनांतील ती फजीती. तो पडलेला प्रयोग ह्यांचा माझ्या

मनावर फार परिणाम झाला. मला रडू कोसळलें नाहीं इतकेंच. परंतु त्याची सर्व पूर्वतयारी मनांत झाली होती. त्या प्रयोगानंतर जो तो काढतां पाय घेऊन निघून गेला. आम्ही सगळें सामान आवरलें आणि तिवंध्यांत प्रल्हादच्या सासऱ्याच्या घरीं एका माडींत जाऊन बसलों. थंडीनें हुडहुडी भरली. आंतून मनाचा आणि बाहेरून शरीराचा थरकांप होत होता. बापूसाहेब लोथे थांबले. त्यांनीं मला धीर दिला आणि सात्विक संतापानें मला प्रश्न केला, ' वामनराव, ही सगळी देशभक्त कंपनी कशाला गोळा केलींत ? सभेंत लंबीचवडीं भाषणें करणारे हे–आज ह्यांची दांतखीळ कां बसली ? मंदिराचा अपमान होत असतांना कोणीच कां पुढें येऊन उभा राहिला नाहीं ? " त्या प्रश्नांना माझ्याजवळ उत्तर नव्हतें. किंबहुना उत्तर देण्याच्या मन:स्थितींत मी नव्हतों. प्रल्हाद, हरी थत्ते, बापू औरंगाबादकर, बापू साहेब लोथे आणि मी असे पांचजण एका पेट्रोमॅक्सभोंवतीं शेकत बसलों.

ती भयानक रात्र संपली. प्रात:स्नानाला निघालेल्या ब्राह्मणांचीं बोलणीं ऐकूं येऊं लागलीं. मी घरीं जायला निघालों. महाराष्ट्र–नाट्य मंदिर ह्या संस्थेची स्थापना आम्ही केली–यथाशक्ति तिची जोपासना केली आणि आज तें सर्व कार्य एका प्रयोगानें आम्ही धुळीला मिळविलें.

ह्या प्रयोगाच्या विविध प्रतिक्रिया प्रथम पहायला मिळाल्या त्या डोअरपासांवर. दोन तीनशें डोअर पासांवर नाटककाराबद्दल, मंदिराबद्दल मनाला येईल तें प्रेक्षकांनीं लिहून ठेवलें होतें. ते शेरे आणि ताशेरे वाचतांना इतरांची करमणूक झाली असेल परंतु माझ्या मनाला मात्र अतिशय दु:ख झालें.

दुसरी प्रतिक्रिया म्हणजे मंदिराच्या कार्यकर्त्यांनीं ह्यापुढें नाटक करावयाचें नाहीं असा घेतलेला निर्णय ही होय ! आलेल्या संकटामुळें हबका खावा तशींच बहुतेकांची स्थिति झाली. नाट्यप्रयोग करावयाचे नाहींत तर मग मंदिराच्या अस्तित्वाला अर्थ काय ? नाट्य हाच ज्या संस्थेचा मुख्य प्राण त्या संस्थेंत ही विचारसरणी बळावणें घातक आहे हें मला समजत होतें. पण मी एकटा काय करणार ? ज्यांनीं मला आजपर्यंत साथ दिली तेच माघार घेऊं लागल्यानंतर माझ्या पुढारीपणाला अर्थ काय ? मी असें म्हणेन कीं माझ्या मानसिक शक्तींची कसोटी पहाण्यासाठींच तो प्रसंग निर्माण झाला ! कित्येक महिने आम्ही कांहीं न करतां घालविले आणि त्या निष्क्रियतेंतूनच आम्हांला पुढचा मार्ग सुचला ! !

● ● ●

लेखांक
तेवीसावा

# अंधारांतून प्रकाशाकडे

'तमसोमाज्योतिर्गमय
अंधारांतून आम्हांला प्रकाशाकडे
ने ही प्रार्थना उच्च रवानें म्हणायला ठीक आहे. परंतु अपयशाच्या गडद अंध:कारांत बुडालेल्या मनाला तो प्रकाश किती दुर्लभ होतो ह्याचा अनुभव घेणें हें एक अतिशय अवघड व्रत आहे. 'नवे डोळे' ह्या नाटकाचें तें तसें झाल्यानंतर महाराष्ट्र–नाट्य–मंदिराचे कार्यकर्ते अवथंडल्यासारखे झाले. आमचें चलनवलन बंद झालें. एक वर्ष नाटकाचें नांव नाहीं.

२३ जानेवारीला एक वर्षानंतर गडकऱ्यांची 'पुण्यतिथी' साजरी करावी व ती करतांना 'एकच प्याला' नाटकांतील बंडगार्डन प्रवेश करावा असें मी सुचविलें. चार गृहस्थ व सुधाकर–त्यांत सुधाकर मी; वीस मिनिटांचा तो प्रवेश–तोहि करूं नका असा विरोध मला दिसला. 'नवे डोळे' लक्षांत ठेवा हें सर्व मला बजावण्यांत आलें. स्टेजवर भजीं खाल्लींच आहेत–आतां जोडे खाऊं असें निकरानें सांगून मी तो प्रवेश करण्याचा निश्चय व्यक्त केला. आधीं भाषणें आणि शेवटीं तो प्रवेश अशी योजना आखली. कार्यक्रम विजयानंद थिएटरमध्यें ठेवला. कार्यक्रम विनामूल्य होता. अपेक्षेपेक्षां गर्दी खूप झाली. भाषणें झालीं.

सुधाकराच्या भूमिकेंत मोकळ्या स्टेजवर मी प्रवेश केला. एकामागून एक चार गृहस्थ येऊन गेले. चौथ्या गृहस्थानें उपदेश केला, "सुधाकर, तुम्ही दारु सोडा." तो निघून गेला. त्यानंतरचें माझें स्वगत "दुर्दैवाचे दशावतार

पाहण्याची आतां माझ्यांत ताकद नाहीं." येथून सुरुवात करून "सुधाकराचा शेवटचा प्रणाम–आतां ह्यापुढें एक दारू, प्राण जाईपर्यंत दारू, शेवटपर्यंत दारू" येथपर्यंत मी म्हटलें. कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडला.

दुसऱ्या दिवशीं त्या कार्यक्रमाबद्दल व त्यांतील नाटच–प्रवेशाबद्दल प्रशंसा ऐकू येऊं लागली. नव्या डोळ्यांच्या अपयशानंतर व एक वर्षाच्या अज्ञातवासानंतर ती प्रशंसा आम्हांला अमृतासारखी वाटावी ह्यांत नवल नाहीं. गजाननराव भागवत नांवाचे एक हितचिंतक मला भेटले व त्यांनीं माझें अभिनंदन केलें. ते म्हणाले, "तुम्ही स्टेजवर प्रवेश केल्यापासून असं कांहीं वातावरण निर्माण केलंत कीं त्यापूर्वीचें नाटक आम्ही पाहिलें आहे असें आम्हांला वाटलें. एका प्रवेशानें ही भावना निर्माण करणें अवघड आहे तुम्ही तें केलेंत म्हणून अभिनंदन !" एका सहृदय प्रेक्षकाचा तो अभिप्राय ऐकून मला आनंद वाटला. वैयक्तिक अभिमानानें फुगून जाणें माझ्या स्वभावांत नाहीं. सामुदायिक सहकार्यावर आधारलेल्या संस्थेच्या जीवनांतून प्रत्यक कार्यकर्त्यानें हाच धडा शिकावयाचा असतो. व्यक्तीचें लहानमोठेपण संस्थेच्या कार्यांतूनच व्यक्त होतें. जेथें व्यक्तीचा बडेजाव संस्थेपेक्षां अधिक ठेवला जातो तेथें संस्था आणि व्यक्ति दोघांचा नाशच होतो.

'एकच प्याला' ह्या नाटकांतील त्या लहानशा प्रवेशानें मला फार मोठें मानसिक बळ दिलें. नटश्रेष्ठ गणपतराव बोडस तें स्वगत 'दुर्दैवाचे दशावतार' इ. म्हणतांना स्टेजवर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत असा पदन्यास करीत कीं त्या त्या ठिकाणीं खुणा केल्या तर एक प्रमाणबद्ध अर्धवर्तुळ रेखाटलें जावें. मला तसा पदन्यास साधलाच असें मी म्हणत नाहीं. परंतु मी तसा प्रयत्न केला. चौथा गृहस्थ आणि सुधाकर ह्यांच्या नाटक-पुस्तकांतील छायाचित्रांत गणपतरावांची जी भावमुद्रा व्यक्त होते ती खरोखरीच त्यांच्या श्रेष्ठ कलेची द्योतक आहे. अगदीं प्रथम जेव्हां माझ्या हातीं 'एकच प्याला'चें सचित्र पुस्तक मिळालें त्यावेळीं मी त्या भावमुद्रेनें भारावून गेलों. मराठी नाटकांच्या पुस्तकांतील नटांचीं छायाचित्रें आजकाल दुर्मिळ होत आहेत ही माझ्या दृष्टीनें एक मोठी ऐतिहासिक हानि आहे. बालगंधर्व, केशवराव भोसले ह्यां नटांची भामिनी किंवा मृणालिनी ह्या भूमिकांतील छायाचित्रें आजच्या नटींनीं एक नमुना म्हणून समोर ठेवावीत इतकीं भाव-

पूर्ण व सौंदर्यपूर्ण आहेत. कधीं काळीं हा उद्योग करण्यासारखा आहे. उपलब्ध होतील तेवढीं वेग वेगळीं त्या त्या नटांचीं त्या भूमिकांतील छायाचित्रांचा एक आल्बम छापला जावा व तो स्वस्त किंमतींत मिळावा.

श्री. चं. वि. बावडेकर ह्यांचा व माझा परिचय झाला ह्याला कारण श्री. वर्टी. 'माईसाहेब' ह्या आम्ही केलेल्या मंदिराच्या पहिल्या प्रयोगांत वर्टी ह्यांनीं 'उत्तम'ची भूमिका केली. श्री. बावडेकर ह्यांच्या परिचयानें एक अकृत्रिम स्नेही मला त्यांनीं मिळवून दिला हा मी त्यांचा उपकार मानतों त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतों. श्री. बावडेकर ह्यांच्या प्रोत्साहनामुळें 'विहार' या साप्ताहिकांत मी एक लेखमाला लिहिली. 'मराठी रंगभूमीच्या नाट्यमंदिरांत' असें त्या लेखमालेचें शीर्षक होतें. माझ्या दृष्टीनें मराठी रंगभूमीवर ज्यांचें व्यक्तिमत्व प्रभावीं ठरलें अशा १५–२० नटांच्या अभिनय-कौशल्याची चर्चा मी त्या लेखमालेंत केली आहे. त्या लेखमालेंत महाराष्ट्र–नाटक–मंडळींतील शाळीग्राम ह्या नटाबद्दल मी एक स्वतंत्र लेख लिहिला. त्यानें तो लेख वाचला तेव्हां त्याला फार समाधान वाटलें. पैसे भरून बोलपटांतील नटनटींची जशी सचित्र जाहिरात आजकाल होते तशी प्रसिद्धी रंगभूमीवरील नटांना मिळाली नाहीं. नाटकमंडळीच्या कांहीं मालकांना ती प्रसिद्धी मिळे. परंतु शाळीग्राम होता नोकर. माझ्या मतें कांहीं फार श्रेष्ठ दर्जाचे नाट्यगुण शाळीग्राममध्यें होते. मी साक्षेपानें त्या गुणांची चर्चा केली ह्याचा शाळीग्रामला आनंद वाटला. आपल्या मित्राजवळ त्यानें तो आनंद व्यक्त केला हेंहि मला कळलें.

लेखमालेची आंखणी व जुळणी कशी करावी ह्या संबंधीचें महत्वाचें मार्गदर्शन बाळू कानिटकरानें केलें आणि माझ्या लेखनाला वळण लावलें. ह्याचें मला कधींहि विस्मरण होणार नाहीं. 'मनोरथ' हा माझा लघुकथा-संग्रह कानिटकरांना अर्पण करतांना मला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'सोयरीक' आणि 'चढाओढ' अशा दोन मूळच्या फ्रेंच नाटकांचीं मराठी रूपांतरें श्रीमती शकुंतला परांजपे–त्या वेळच्या स्लेप्टसॉफ ह्यांनीं केलेलीं माझ्या वाचण्यांत आलीं. त्यांपैकीं 'चढाओढ' ही नाटिका करावी असें आम्ही ठरविलें. ह्या नाटिकेंत स्त्रीभूमिका दोनच आणि त्यांना भाषणें

फार कमी ही आमच्या दृष्टीनें महत्वाची गोष्ट होती. गणपतराव ही ह्या नाटकांतील मध्यवर्ती व्यक्ति. त्याला खूष करून त्याची सुंदर मुलगी मिळविण्याचे प्रयत्न दोन तरुण करतात म्हणून नाटिकेला 'चढाओढ' हें नांव देण्यांत आलें आहे. मानसशास्त्राची मोठी मजेदार गुंतागुंत नाटिकेंत आहे. 'गणपतराव' ही भूमिका करतांना मला मोठा हुरूप वाटला. दुपारीं दोन तासासाठीं विजयानंद थिएटर भाड्यानें घेऊन मंदिरानें तो प्रयोग केला. औरंगाबाद येथून प्रथमच आगगाडीनें प्रवास करणारा एक जमीनदार मोठ्या गर्दीनें प्रवेश करतो असें मला गणपतरावच्या भूमिकेंत दाखवायचें होतें. माझ्या मापाची हैद्राबादी पगडी बनवून आणली होती. ती मी डोक्यावर ठेवली. हैद्राबादी पद्धतीचा कोट अंगावर चढविला. त्याच्या गुंड्या घातल्या. तेवढ्यांत एक गृहस्थ रंगपटांत आले. ते मला म्हणाले, "कोटाच्या गुंड्या वरखालीं झाल्या आहेत. त्या नीट करा." मी केलेली ती ट्रिक–गर्दीत असणाऱ्या माणसानें गुंड्या नीट न लावणें. यशस्वी झाली ह्याचा मला आनंद वाटला. गाडी पकडायला जाणाऱ्या माणसाची जी गडबड होते ती दाखवण्यासाठीं मी आणखी एक युक्ति केली. फळांची एक करंडी बरोबर घेतली. प्लॅटफॉर्मवरच्या धांवपळींत मागें पुढें होण्यांत करंडींतून फळें सांडत आहेत हेंहि मी दाखविलें.

त्या छोट्याशा नाटिकेचा आम्ही केलेला प्रयोग यशस्वी झाला. अभिनय आणि नाट्य ह्यांच्या आविष्काराला त्यांत भरपूर जागा होत्या. उपकृत आणि उपकारकर्ता ह्यांपैकीं उपकृत माणसाचा लोभ वाटतो ह्या मानसशास्त्रीय सिद्धांतावर नाटकांतील महत्त्वाचे प्रसंग आधारलेले आहेत व त्यांतून हास्यरस मोठ्या कौशल्यानें निर्माण केला आहे.

'सोयरीक' ह्या नाटिकेचा प्रयोग नाशिकच्या सेवासदनच्या मुलींनीं केला. मी त्या प्रयोगाचें दिग्दर्शन केलें. स्त्रियाच पुरुष–भूमिका करणार होत्या. तालमीच्या वेळींच मी त्यांना पुरुषवेषांत वावरण्याची सक्ती केली. त्या संवयीचा इष्ट तो परिणाम झाला. प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं त्यांच्या हालचाली पुरुषाला साजेशा झाल्या. तोहि प्रयोग रंगला.

'चढा ओढ' या नाटिकेचा प्रयोग नाशिकच्या कॉलेज विद्यार्थ्यांनीं गॅदरिंगसाठीं केला. तोहि प्रयोग चांगला झाला. थोड्या परिश्रमांनीं रंगणाऱ्या नाटकांपैकीं एक हें नाटक आहे परंतु त्याचा व्हावा तसा पुरस्कार हौशी वा व्यावसायिक नटांकडून झाला नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

● ● ●

## लेखांक चोविसावा

# महर्षि कर्वे

Rain! In his fall he saveth the earth ! !

आपल्या पतनानें पृथ्वीचें पोषण करणाऱ्या पर्जन्यासंबंधी हा विचार माझ्या मनांत आला आणि मी क्षणभर स्तिमित झालों. त्या विचारानें जो शब्दरूप आकार घेतला तीच प्रतिभा–तीच शारदा. त्या शारदेचा तो प्रसाद मी जपून ठेवला.

महाराष्ट्र–नाटय–मंदिराच्या कांहीं सभासदांनीं कांहीं नाटकांचा अभ्यास केला. नाटकाचें तंत्र समजावें ह्या दृष्टीनें नाटयरचनेचा एक आराखडा तयार केला होता. त्यांतील माहितीचीं सदरें भरणें हा अगदीं प्राथमिक स्वरूपाचा असला तरी अभ्यास आहे हें समजून तयार केलेले कांहीं कागद मंदिराच्या दप्तरांत आहेत. ह्या प्राथमिक अभ्यासांतून भूमिकेचा अभ्यास सुरू करावा आणि भूमिका समजल्यानंतर बोलणें आणि अभिनय ह्यांची तालीम करावी असा आराखडा होता. ही सर्व शिस्त पाळायची तर वेळ नव्हता आणि अगदीं खरें सांगायचें तर अभ्यासाची इच्छाच नव्हती.

'खडाष्टक' ह्या नाटकाचा प्रयोग मंदिरानें करावा असें ठरलें. ह्या प्रयोगाचा हेतु फारच स्तुत्य होता. महर्षि धोंडो केशव कर्वे ह्यांच्या वयाला ८० वर्षें पुरीं झालीं म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांच्या अंगीकृत कार्यासाठीं कांहीं निधि द्यावा अशी भूमिका स्वीकारून नाशिकमध्यें एक सत्कारमंडळ स्थापन झालें. ह्या निधिसाठीं एक नाटयप्रयोग करण्याची

विनंति महाराष्ट्र–नाटय–मंदिराला करण्यांत आली. एका अटीवर आम्ही हा प्रयोग करण्याचें मान्य केलें. स्वत: अण्णासाहेब कर्वे ह्या प्रयोगाला उपस्थित असावेत ही ती अट. आमची अट मान्य झाली आणि आम्ही नाटकाच्या तालमी सुरू केल्या.

एप्रिल महिन्यांत सकाळच्या शाळा असल्यानें दुपारीं तालमींना भरपूर वेळ मिळत असे. माझे एक सहकारी शिक्षक व स्नेही श्री. दत्तोपंत भट–कवि अशोक ह्यांच्यांत नाटयगुण भरपूर, नायकाच्या भूमिकेला साजेशी रूपसंपदा–ह्या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांना कवीश्वराची–नायकाची भूमिका देण्यांत आली. बाळासाहेब काळे वारोपंत, मी रागोपंत, पांडोबा कुलकर्णी कर्कशराव, वक्रतुंड बाळासाहेब कानिटकर ह्या मुख्य पुरुष भूमिका आणि शित्रे रागिणी, बेटावदकर गौरी, चित्रे वारूबाई आणि खासनीस कर्कशा अशी स्त्रीभूमिकांची व्यवस्था झाली. हा प्रयोग १९–५–१९३८ ला झाला आणि स्वत: अण्णासाहेब कर्वे त्या प्रयोगाला हजर राहिले. मुरुड ते मुंबई जलप्रवास आणि मुंबई ते नासिक रेल्वेप्रवास विश्रांती न घेतां करून अण्णासाहेब सायंकाळीं पांच वाजतां नाशिकला पोहचले.

प्रत्यक्ष प्रयोगाविषयीं कांहीं सांगण्यापूर्वी आमच्या नाटकाच्या तालमीसंबंधी कांहीं अनुभव सांगतो. 'कवीश्वर'ची तालीम देतांना मला सारखी केशवराव दाते ह्यांची आठवण होई. चाळीशीच्या घरांत असलेले केशवराव विशीतल्या कॉलेज–कुमाराची भूमिका ज्या उत्साहानें, तडफेनें करीत तो उत्साह आणि ती तडफ प्रत्यक्ष विशीपंचविशींत असलेल्या हौशी नटानें दाखवावी असें मला वाटे. परंतु तीनतीन तास तालीम आमच्या हौशी नटांना परवडत नसे. शरीरानें आणि मनानेंहि ते थकून जात. तारुण्यानें मुसमुसणाऱ्या आम्ही हौशी नटांचा हा थकवा लक्षांत घेतला म्हणजे त्या पार्श्वभूमीवर अण्णासाहेबांचा कणखरपणा आणि उत्साह विशेषच उठून दिसला.

नाटयप्रयोग व्यवस्थित व्हावा ह्यासाठीं खाण्यापिण्याचीं कांहीं पथ्यें पाळावीं लागतात ह्याचें भान न राहून आमच्यांतील कांहीं हौशी नटांनीं चिवडा आणि रस सेवन करून एक उपाधी निर्माण केली. रेच थांबावेत म्हणून अफू घ्यायची आणि अफू घेतली म्हणून विस्मृति अशा दुष्ट चक्रांत ते सांपडले. नाटकाच्या नकलांचा गोंधळ झाला. रागिणी कर्कशरावांची

भाषणें बोलूं लागली आणि कर्कशराव रागिणीला नुसत्याच शिव्या देऊं लागला. गंधर्व नाटक मंडळींतील भांडारकर आणि वेळणेकर ह्या दोन नटांनीं आम्हांला हरतऱ्हेचे साहाय्य केले. प्रयोग आपला आपण रंगला. त्यानें आम्हा हौशी नटांची पर्वा न करतां रंगत उभीं केली. हौशी नटांचे स्वाभाविक दोष लक्षांत घेऊनच एका लेखकानें अशी शिफारस केली आहे कीं हौशी नटांनीं हलकींफुलकीं आनंदपर्यवसायी नाटकें प्रयोगासाठीं निवडावीत. 'खडाष्टक नाटकाच्या निमित्तानें त्या विधानाचा पुरेपूर अनुभव आम्हांला आला.

ह्या नाटकाच्या निमित्तानें अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या व्यक्तिमत्वाचा मला जो अनुभव आला तो मी आयुष्यांत विसरणार नाहीं. अण्णासाहेब प्रयोगाच्या सुरुवातीपासून थिएटरमध्यें हजर राहिले. एक अंक झाला आणि एका हितचिंतकानें सुचविलें कीं अण्णासाहेबांनीं घरीं जाऊन विश्रांति घ्यावी. अण्णासाहेबांच्या उत्तरांतील शब्दाशब्दांतून त्यांचा थोरपणा व्यक्त होतो. ते म्हणाले, "या मंडळींनीं दोनतीन महिने जाग्रणें करून हा प्रयोग बसविला आहे. मी नाटक शेवटपर्यंत पहाणार आहें. मला त्यांत कसलाच त्रास नाहीं." ह्या थोर माणसानें ह्या साध्या उद्गारांतून सार्वजनिक कार्यकर्त्यांना केवढा मोलाचा उपदेश केला आहे !

नाटकाचे दोन अंक झाल्यानंतर अण्णासाहेब आंत आले आणि प्रयोगांत काम करणाऱ्या प्रत्येक नटाची त्यांनीं आस्थापूर्वक विचारपूस केली, प्रत्येकाला प्रोत्साहन दिलें. त्यांची बोलण्यांतील कळकळ आणि आमच्यासारख्या सामान्य माणसांशीं वागण्याची ती जिव्हाळ्याची पद्धत पाहून मी थक्क झालों. चंदनाप्रमाणें झिजलेल्या त्या महान् पुरुषाच्या आचरणाच्या सुगंधानें माझें मन भारून गेलें—मी धुंद झालों.

अण्णासाहेबांनीं नाट्यप्रयोग तर शेवटपर्यंत पाहिलाच परंतु दुसऱ्या दिवशीं महाराष्ट्र नाट्य मंदिराला भेट देऊन आमच्यावर मोठाच अनुग्रह केला. प्रल्हादच्या सासऱ्याच्या वाड्यांत ती मुलाखत झाली. महाराष्ट्र–नाट्य मंदिराचें उद्दिष्ट व कार्य ह्यांचा मी परिचय करून दिला. अण्णासाहेबांनीं अत्यंत सहानुभूतीनें माझें बोलणें ऐकून घेतलें. आणि मोठ्या संतोषानें त्यांनीं आम्हांला आशीर्वाद दिला: " तुम्ही एक फार चांगलें कार्य करीत आहांत. तुमचा परिचय झाला. मला फार आनंद वाटला. मलाहि लहानपणा-

पासून नाटकाचा नाद आहे. तुम्ही मोठ्या निष्ठेनें हें सारें करीत आहांत हें पाहून मला फार बरें वाटलें."

जवळजवळ तास दीडतास आमच्यांत बसून, अण्णासाहेबांनीं जी चर्चा केली ती उद्‌बोधक तर होतीच पण त्यांच्या थोर व्यक्तित्वाची साक्ष होती. लोकांवर रागावू नये-आपण लोकांच्या हितासाठीं कांहीं करतों आहोंत हें त्यांना कळत नाहीं—त्यांनीं शिव्या दिल्या तरी त्यांना गोंजारून आंजारून आपण आपलें काम केलें पाहिजे, अशा कितीतरी सूचना त्यांनीं आम्हांला दिल्या.

अण्णासाहेब भेट संपवून निघून गेले. बाळू कानिटकरानें मला धन्यवाद दिले. मी त्याला कारण विचारलें तर तो म्हणाला, "तूं आज महाराष्ट्र नाट्य मंदिराच्या परिचयाचं जें भाषण केलेंस तें मला आवडलें." त्याच्या त्या स्नेहपूर्ण उद्‌गारांनीं मला मूठभर मांस चढलें.

महाराष्ट्र नाट्य मंदिर ह्या संस्थेचे आम्ही संस्थापक, संचालक, कार्यकर्ते सारें खरें आहे. परंतु त्या संस्थेनें आम्हांला आमच्या व्यक्तिविकासाची जी संधि मिळवून दिली त्याबद्दल आम्ही आज कुणाचे उपकार मानायचे? महाराष्ट्र नाट्य मंदिर ही संस्था आज नामशेष आहे—आम्ही स्नेही आज चार ठिकाणीं पांगलेले आहोंत आणि आम्हांला अनेक प्रकारांनीं रिझविणारा, आमच्यासाठीं झिजणारा प्रल्हाद औरंगाबादकर आज आमच्यांत नाहीं.....मन सुन्न होतें, विषादानें भरून जातें!!

● ● ●

लेखांक

पंचविसावा

# मराठी वक्ते आणि नाट्य

नासिकच्या 'वसंत व्याख्यान-मालेंत' बहुधा दरवर्षी मी मराठी रंगभूमीबद्दल व्याख्यान देत असे. मराठी रंगभूमीच्या त्या पडत्या काळाला उद्देशून मी एका वर्षीं 'दृष्ट हिला लागली' हा मथळा देऊन व्याख्यान दिलें. कविवर्य तांबे ह्यांच्या कवितेंतील हा चरण आहे. मराठी नाटकाच्या छंदाच्या माझ्यावर झालेल्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणामांपैकीं हा एक परिणाम आहे. नाटकाइतकीच मला बोलण्याची हौस आहे. नाटकाच्या नादानें तयार केलेला आवाज आजहि खडा आहे. आणि माझ्या भाषणांतील तें एक महत्त्वाचें आकर्षण आहे. व्याख्यानाचा विषय आकर्षक शब्दांत सूचित करणें हा माझा छंद आहे. विषयाच्या नांवापासून व्याख्यानाबद्दल जिज्ञासा निर्माण करणें हा नाटकाचा माझ्यावर झालेला परिणाम आहे

व्याख्यान देण्याचे पहिले धडे मला बाळू कानिटकरानें दिलें. ते धडे गिरवून त्या विषयांत प्रगति करण्याचा मी प्रयत्न केला आहे. बोलणें रसपूर्ण असलें पाहिजे हा माझा कटाक्ष आहे आणि मी तो प्रयत्नपूर्वक पाळीत आलों आहे. गायन आणि वक्तृत्व ह्या दोन्ही कला आहेत. परंतु गायनाची पद्धत जशी बंदिस्त आहे तसा वक्तृत्वाचा विचार केलेला आढळत नाहीं. सुरांच्या आरोह–अवरोहांनीं गाणें खुलविणें–रंगवीणें हें जसें प्रयत्नसाध्य आहे तसा कांहींच प्रकार बोलण्याच्या बाबतींत सहसा आढळत नाहीं.

शिवरामपंत परांजपे, स्वातंत्र्यवीर सावरकर, बॅ. जयकर ह्यांचीं

भाषणें मी ऐकलीं आहेत. हे तिघेहि वक्ते नाटचगुणांचा भरपूर उपयोग आपल्या भाषणांत करीत. दर्शनीय आकृति, मुलायम आवाज, विषयाची कलापूर्ण मांडणी, श्रोत्यांच्या अंतकरणांत घुसण्याची शक्ति हे सर्व गुण नटाचे आहेत आणि हे तीनहि वक्ते त्या गुणांत परिपूर्ण असत. मराठी नाटकांचें आणि मराठी नटांचें ऋण त्यांना मान्य आहेच. १९४३ मध्यें सांगली येथें झालेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाचे अध्यक्ष म्हणून भाषण करतांना स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं गणपतराव जोशी ह्यांच्यासारख्या नटांनीं आपल्या नाटकांतून आम्हांला देशभक्ति शिकवली असे उद्‌गार मोठ्या कृतज्ञतेनें काढले आहेत.

मी कॉलेजमध्यें पुण्याला असतांना दोन मराठी वक्त्यांचा विशेष प्रभाव माझ्यावर झाला. एक श्री. दा. वि. गोखले आणि दुसरे प्रा. श्री. म. माटे. दोघांचींहि खूप व्याख्यानें मी ऐकलीं आहेत. श्री. गोखले ह्यांच्या भाषणांतील आवेश आणि श्री. माटे ह्यांचें शब्दलाघव ह्यांचा माझ्यावर विशेष परिणाम झाला. माझ्या विद्यार्थीदशेंत ह्या दोघांहि वक्त्यांना मी 'देव' मानीत असे. माझ्या आयुष्यांत दोन प्रसंग असे आले कीं ह्या दोघांपैकीं प्रत्येकानें निरनिराळ्या वेळीं माझें भाषण ऐकलें आणि माझी पाठ थोपटली. त्यावेळचा मला वाटणारा आनंद शब्दांत व्यक्त करण्यापलीकडचा आहे. एखाद्या लहान मुलासारखें माझें मन अक्षरशः नाचूं लागलें. श्री. माटे ह्यांना त्यांतल्या त्यांत धाडस करून मी विचारलें, "आपण कधीं नाटकांत कामें केलीं आहेत कां ?" माझ्याकडेच उलट रोखून पहात त्यांनीं मला प्रश्न विचारला, "नाटकांत कामं केल्याशिवाय असं बोलतां येतं कां ?" त्या प्रश्नांतच माझ्या प्रश्नाचें उत्तर आहे.

ह. भ. प. पांगारकर आणि धुळ्याचे समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव ह्यांच्या व्याख्यानांत हुकमी रंगत असे. परंतु दोघांचाहि नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कलुषित असे. पोषाखापासून सर्व आविर्भावांपर्यंत नाटचगुणांचा उपयोग भरपूर करूनहि नाटकाच्या कपाळीं शिव्याच असा कांहीं चमत्कारिकपणा ह्या दोघांच्या बाबतींत होता. ह्या सांप्रदायांतील मराठी भाषा भूषण श्री. आजगांवकर तितकेच रसाळ बोलत परंतु; त्यांचा नाटकाबद्दल व नटाबद्दल अभिमान जाज्वल्य असे.

नाट्याचार्य खाडीलकर आणि वीर वामनराव जोशी दोघेहि वक्तृत्व-कलेचे थोर प्रणेते होते. राजकीय क्षेत्रांत काम करतांना जनतेचीं मनें हेलावून टाकण्याचें त्यांचें सामर्थ्य वादातीत होतें. भाषणाचा विषय (Matter) आणि पद्धति (Method) ह्या दोन्हींचा पूर्ण अभ्यास करूनच हे वक्ते भाषणाला उभे रहात आणि त्यामुळें त्यांचीं भाषणें यशस्वी होत. ह्या दोघांहि नाटक-कारांच्या नाटकांतून वक्तृत्वपूर्ण भाषणाचे कितीतरी उत्कृष्ट नमुने काढून दाखवितां येतील. मराठी नाटकें आणि त्यांचे प्रयोग ह्यांच्या दुर्लभतेमुळें नाटकांतील तें वक्तृत्व आज ऐकायला मिळत नाहीं ही फार मोठी हानि आहे— हानि आहे मराठी भाषेची आणि मराठी मनाची!

भोपटकर बंधू त्या काळांतील वक्तृत्वाचे दोन भिन्न नमुने होते. दोघेहि कट्टर टिळकभक्त परंतु स्वमतप्रतिपादनाची दोघांची शैली अगदीं भिन्न असे. भास्कर बळवंत हायकोर्ट प्लीडरच्या परीक्षार्थींसाठीं एक वर्ग चालवित असत. त्या काळांत मासिक उत्पन्न रु. १००० मिळेल इतका भरभराटीला आलेला तो वर्ग होता. मध्यंतरीं कांहीं वर्षें त्यांनीं सार्वजनिक भाषणांचा संन्यास घेतल्यामुळें त्यांचीं भाषणें ऐकायला मिळत नसत. परंतु टिळकांच्या गायकवाडच्यांत प्रतिवर्षीं होणाऱ्या गणेशोत्सवांत त्यांनीं पुन्हां बोलायला सुरुवात केली. छद्‌मी भाषण करावें भाऊसाहेबांनींच! त्यांची ती गुटगुटीत, सामान्य उंचीची, काळ्या रंगाची मूर्ति, तिरपी टोपी सांवरीत बोलायाला उभी राहिली कीं श्रोते कान टवकारून ऐकूं लागत. उपरोध हेंच भाषणांतलें हुकमी हत्यार! कर्तव्यशून्य बहुसंख्य श्रोत्यांना त्या भाषणानें भरपूर करमणूक होई आणि भास्कर बळवंतांच्या भाषणांवर श्रोत्यांच्या उड्या पडत. 'भाल्यां'-तून एक स्फुट लिहिन' ही प्रतिपक्षाला द्यावयाची हमखास धमकी ते आपल्या भाषणांत बोलत. डोळे मिचकावणें, शरीर थरथरविणें, हातवारे करणें, इत्यादि आंगिक अभिनयाच्या प्रकारांत भाऊसाहेब निष्णात असत.

लक्ष्मण बळवंत तथा अण्णासाहेब भोपटकर ह्यांची वकिली चांगली चाले. तरीहि टिळकांच्या राजकारणाची आघाडी सांवरण्यांत, लढविण्यांत ते कसूर करीत नसत. 'लोकसंग्रह' ह्या दैनिकाचें संपादन त्यांनीं यशस्वी रीतीनें केलें. "वत्सला वहिनींचा बुरखा' व 'बेटा गुलाबचा अंगरखा' हे अच्युत बळवंत कोल्हटकरांना उद्देशून लिहिलेले त्यांचे लेख त्या काळांत

विशेष गाजले. ठणठणीत शरीराचे हे दोघे बंधू लहानपणीं चांगले कुस्तीगीर होते. अण्णासाहेब रंगानें गौर, उंचीनें पुरे आणि शरीरानें पीळदार असत. त्यांच्या बोलण्यांत अनुनासिक उच्चार अधिक असे. टिपण साधणाऱ्या वाघाप्रमाणें बोलतांना ते मध्येंच थांबत आणि पुन्हा शब्दांचें शरसंधान सुरू करीत. तात्यासाहेब केळकरांचे एक सच्चे साथी ह्या दृष्टीनें अण्णासाहेबांनीं टिळकपक्षाला मिळालेल्या अप्रियतेचा अर्धा वांटा उचलला होता. पुण्याच्या लॉ कॉलेजमध्यें ते आम्हांला काँट्रॅक्ट ॲक्ट शिकवत. त्या कायद्याचें त्यांचें ज्ञान तर सखोल होतेंच परंतु विवेचन अत्यंत मार्मिक असे. एक उत्तम शिक्षक असेंच मी त्यांचें वर्णन करीन. पुण्याच्या महाराष्ट्र व्यायाम मंडळाची योजना आणि वाढ ह्यांचें बव्हंशीं श्रेय अण्णासाहेबांचेंच आहे.

व्यवसायानें मी शिक्षक झालों त्यामुळें मला रोज बोलावेंच लागे. न बोलतां शिकविण्याची कला मला अवगत नव्हती. मराठी, इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र ह्या विषयांची चर्चा करतांना शाळेंत आणि कांहीं वेळां शाळेबाहेरहि माझ्या बोलण्याच्या छंदाचें यथास्थित पोषण झालें. माझ्या लेखनाच्या छंदाला मात्र माझ्याकडून फार मोठा अन्याय झाला. नाटकी भाषा पाठ करण्याचा परिणाम म्हणून मी लिहूं लागलों. ह्या क्षेत्रांत माझा मित्र चुनीलाल शेठ ह्यानें मला फार प्रोत्साहन दिलें. माझ्या कविता इतक्या तन्मयतेनें इतर कुणी वाचल्या नाहींत. त्यानें लिहिलेल्या कवितांचें मी केलेलें रसग्रहण त्याला फार आवडत असे. त्या निमित्तानें लेखनकलेसंबंधी आमची चर्चा तासचे तास चाले.

१९२१ च्या फेब्रुवारी महिन्यांत आईसारखें माझ्यावर प्रेम करणारी माझी मावशी—डॉ. भालेराव ह्यांची आई—देवाघरीं गेली आणि तिच्या स्मरणार्थ मी 'दुनिया' ह्या नांवानें दैनंदिनीसारखें कांहीं अधूनमधून लिहायला सुरवात केली. पंचवीस वर्षें मी ह्या वह्या लिहिल्या. आणि त्या निमित्तानें माझी लेखनाची संवय राहिली— पोसली गेली. माझ्या फारच थोड्या स्नेह्यांनीं त्या वह्या वाचल्या आहेत. परंतु ज्यांनीं त्या वाचल्या त्यांत नारायणराव कुलकर्णी आणि चं. वि. बावडेकर ह्यांनीं मला त्या लिहिल्याबद्दल मनापासून धन्यवाद दिले आहेत. माझ्या जीवनाचे अनेक लहानमोठे ठसे त्यांतून उमटले आहेत. त्या वह्या संदर्भासाठीं उपलब्ध आहेत

म्हणूनच मला 'मराठी नाटकें : माझा छंद' ही लेखमाला लिहितां आली. गेल्या १५ वर्षांत हा उपक्रम थांबला ही मोठी हानि झाली असें मी समजतों. त्यामुळें आयुष्यांतील कितीतरी उद्बोधक प्रसंगांचें विस्मरण होतें ही ती हानि होय.

हरी नारायण आपटे आणि गडकरी ह्या दोन लेखकांनी मला लेखन-प्रेरणा दिली. परंतु लेखनाच्या कला आणि कल्पनांचा प्रभाव मुख्यत: इंग्रजी वाङमयांतील कांहीं लेखकांच्या भाषेंतून पडला. मेरी कॉरेली, हॉल केन, थॉमस हार्डी, ह्यू वॉलपोल, अर्नोल्ड बेनेट, जेम्स बॅरी, गॉल्सवर्दी, ड्रिंकवॉटर ह्यांच्या साहित्यांत मला जीं सौंदर्यस्थळें आढळलीं, भाषेचा जो ताजेपणा, प्रवाहीपणा मनावर ठसला तसा मराठींत दिसला नाहीं. शेक्सपियरचा टीकाकार ब्रॅडले ह्यानें नाटचाकडे पाहण्याची जी दृष्टि मला दिली तीहि माझ्या लेखनाच्या छंदाला पोषक झाली.

मला सुचलेल्या अनेक कथानकांच्या अर्धवट रूपरेखा मी माझ्या त्या पंचवीस वर्षांच्या वह्यांतून नमूद केल्या आहेत. तें सारें केव्हांतरी मला सुचलें ह्यावर आज माझा विश्वास बसत नाहीं. माझा आळस, हेतुपूर्वक कष्ट करण्याची अपात्रता ह्यांची जाणीव झाली कीं मी भयचकित होतों. what a waste असे उद्गार बाहेर पडतात.

• • •

लेखांक सव्वीसावा

# एक स्वाधीन उपक्रम !

पंच-कला-संच! डोअर-कीपर्स म्हणून ह्या कार्यक्रमाची थिएटर-वरची व्यवस्था सांभाळण्यासाठीं महाराष्ट्र–नाटच–मंदिराचे आम्ही सभासद उभे राहिलों. श्री. भाई गोडबोले, जगप्रवासी त्यांचे बंधु नाथ गोडबोले, त्यांची पत्नी आणि एक नोकर असा हा चार जणांचा सुटसुटीत संच होता. प्रल्हादच्या ओळखीनें मंदिराकडे ही जबाबदारी आली. त्यांच्या दोन कार्यक्रमांपैकीं दुसरा उत्पन्नाच्या दृष्टीनें अधिक यशस्वी झाला. दोघे भाऊ कांहीं नकला, गाणीं ,जादू, मधूनच भाषणें असा दोन तासांचा विविध कार्यक्रम करीत. त्यांत शरीरकष्ट भरपूर होते. परंतु कला फार मोठचा प्रमाणांत होती असें म्हणतां येणार नाहीं.

दुसऱ्या कार्यक्रमाच्या मध्यंतरांत श्री. भाई गोडबोले ह्यांनीं आभाराचें भाषण केलें आणि तें करीत असतांना स्टेजवरून खालीं उतरून मी बसलों होतों तेथें येऊन माझ्या गळचांत हार घातला. तो प्रकार कांहींसा आकस्मिक होता. भाई गोडबोले ह्यांचें व्यक्तिमत्व कांहींसें गूढ परंतु परिणामकारक होतें. माझ्यावर त्यांच्या कार्यक्रमाचे दोन भिन्न परिणाम झाले. स्वतःच स्वतःची जाहिरात केल्याशिवाय आपल्याला भाव येत नाहीं ह्या त्यांच्या म्हणण्याचा माझ्यावर कांहीं काल परिणाम झाला. एका चुकीच्या दृष्टिकोनानें मी वाहवत गेलों. जगांत रूढ असलेली ही पद्धत मला मानवत नाहीं.

माझ्यावर झालेली प्रतिक्रिया मात्र समाधानकारक आहे. घरोघर

ज्याचे अभंग म्हटले जातात त्या तुकारामानें स्वत:ची जाहिरात केव्हां व कोठें केली ? स्वकर्मांतील अभिरति हाच सिद्धीचा निश्चित मार्ग आहे ही जाणीव मला ह्या निमित्तानें झाली हा माझा लाभ मी समजतों आणि म्हणून मनांतल्या मनांत भाई गोडबोले ह्यांचे आभार मानतों.

ह्या कार्यक्रमाचा दुसरा परिणाम म्हणजे नाशिकमधील निरनिराळ्या कलावंतांचा एक संच जमवून प्रत्येक महिन्याला दोन तासांचा एक कार्यक्रम करावा ही कल्पना माझ्या मनांत रुजली. श्री. सोपानदेव चौधरी–महाराष्ट्रांतील ख्यातनाम काव्यगायक–ह्यांच्याशीं मी ती कल्पना बोललों. त्यांनीं सहकार्याचें आश्वासन दिलें. प्रत्यक्षांत मात्र ती कल्पना उतरली नाहीं.

मराठी नाटकांतील निवडक स्वगतांचें नाटचपूर्ण वाचन हा एक स्वावलंबी उपक्रम मी करून पाहिला. त्याच्या पुढची पायरी म्हणून फ्राईड ह्या मनोविश्लेषणशास्त्रज्ञाची मराठींत रूपांतरित झालेली एक कथा मी नाटचरूपानें करूं लागलों. एका गणपति–उत्सवांत मी त्या कार्यक्रमाचा प्रारंभ केला. नानासाहेब चांदवडकर ह्यांच्या वाडचांत मी तो कार्यक्रम प्रथम केला. कथेची रूपरेषा लक्षांत ठेवून तीन प्रवेशांत मी ती गोष्ट करीत असे. त्यांतील भाषणें उत्स्फूर्त (Extempore) असत. मी तीं कधींच लिहिलीं नाहींत. शब्दांत तफावत पडली तरी आशय कायम राही. त्या कथेंत मला दोन भूमिका कराव्या लागत. एक डॉक्टर आणि दुसरी त्याचा पेशंट ! पहिल्या भागांत डॉक्टर त्या पेशंटची प्रस्तावना करतात–त्याच्या आत्यंतिक दु:खाचें वर्णन करतात आणि वैद्यकशास्त्र व शिष्टाचार सोडून आपण त्या माणसाच्या आग होणाऱ्या हातांतून रक्त काढून त्याची व्यथा कशी सुसह्य केली ह्याचें वर्णन करतात. पुढच्या दोन प्रवेशांत तो पेशंट हाताची होणारी जळजळ आणि त्यामागें असलेला इतिहास ह्यांचें विश्लेषण करतो. करुण आणि रुद्र अशा दोन रसांच्या आविष्काराला त्या दोन प्रवेशांत खूप वाव आहे. एका कोटचधीश तरुणानें आपल्या लाडक्या पत्नीला गैरसमजानें ठार कसें केलें व त्या पत्नीच्या तेंच नांव असलेल्या मैत्रिणीनें तो गैरसमज दूर केला तेव्हांपासून त्याचा तीव्र पश्चाताप हातावर एका विशिष्ट ठिकाणीं असह्य आग होऊन व्यक्त होऊं लागला अशी ती कथा आहे. अखेर तो तरुण तें दु:ख असह्य होऊन विषप्राशन करून आत्महत्त्या करतो असें मी दाखवीत


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
दि: ..................

असे. नाट्याच्या उत्कट आविष्काराला ह्या कथेंत भरपूर वाव आहे व मी माझ्या कुवतीप्रमाणें तो आविष्कार करीत असे. ह्या नाट्यीकरणाला ३० ते ४० मिनिटें इतका वेळ लागे. मी निरनिराळ्या ठिकाणीं पांचसहा तरी प्रयोग केले. लहान बंदिस्त जागा आणि जाणता संवेदनाक्षम प्रेक्षक वर्ग ह्या दोन घटकांची आवश्यकता हा प्रयोग रंगविण्यासाठीं अपरिहार्य असे. जागा पाहून घेणें माझ्या स्वाधीन असे. परंतु दुसरा घटक – संवेदनाक्षम प्रेक्षक वर्ग – हा एक योगायोग असे.

एका परकीय कथेला साज चढविण्यापेक्षां 'देशीकार लेणें' तयार करावें असें मला वाटलें आणि मी 'सत्याग्रही' नांवाची गोष्ट मनांत रचली. बंदीशाळेंतून सुटलेला एक सत्याग्रही 'सुटलीच बंदीशाळा। झालों अतां स्वतंत्र' अशा ओळी गुणगुणत प्रवेश करतो. बहिणीच्या घरापाशीं येतो. सरकारी नोकराची पत्नी असलेली ती बहीण त्याला घरांत प्रवेश नाकारते. हा प्रास्तविक प्रवेश. दुसऱ्या प्रवेशांत विनयभंगाचा आरोपीम्हणून तो आपली जबानी देतो व तुरुंगांत एकांतवासाची शिक्षा देऊं नका अशी विनंती न्यायाधीशाला करतो. तिसऱ्या प्रवेशांत तो एकांतवासाची शिक्षा भोगीत आहे व त्या यातना असह्य होऊन आत्महत्त्येचा विचार करीत आहे. त्या विचारापासून त्याला परावृत्त करण्यासाठीं लोकमान्य टिळक दर्शन देतात. जीवनमरण देशासाठीं असा संदेश ते त्याला देतात व त्याच्या मनांत देशासाठीं जगण्याचा निर्धार निर्माण करतात. त्यानंतर तो "महाराष्ट्र–लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे। यशोगीत तूझें गातां मनीं हर्ष दाटे।" ह्या ओळी म्हणूं लागतो व हर्षाच्या उन्मादांत कथानक समाप्त होतें.

वरील कथानकाचें नाट्यीकरण करतांना पाठीशीं भिंतीचा भक्कम आधार आवश्यक असे. बंदीशाळेंतील प्रवेश करतांना त्या भिंतीवर रेटा देऊन उभे रहावे लागे. जुन्या यशवंत व्यायाम शाळेंत – गंगेच्या कांठीं असलेल्या जागेंत – मी तें नाट्यीकरण करण्यास उभा राहिलों. जवळपास भिंत मिळेना. पॅरलल् बारच्या दोन दांडक्यांत उभा राहून मी तो प्रवेश केला. प्रभाकर महाबळला माझ्याबद्दल कांहीं अवर्णनीय भावना असे. त्या दिवशीं 'मूड' कांहीं विशेष लागला आणि शेवटचा हर्षोन्मादाचा अभिनय उत्कट झाला. प्रभाकरला फार आनंद वाटला. आनंद व्यक्त करण्यांत प्रभाकर

कधींच कंजुषपणा करीत नसे.

नाटचाविष्काराची माझी ती हौस मी वेडचासारखी भागवीत असतांना मला निरनिराळे अनुभव आले. माझें तें वेड बेशिस्त होतें आणि माझ्या शारीरिक आणि मानसिक शक्ति मर्यादित होत्या. तयार आवाज आणि मनाचा हुरूप ह्या भांडवलावर मी तो व्यापार करी. भावनांची देवघेव हाच प्रमुख विनिमय. त्या व्यापारानें माझें मन विकसित झालें, समृद्ध झालें ह्यांत शंका नाहीं.

व्यायामक्षेत्रांतील एक नामवंत तज्ज्ञ असलेला प्रभाकर महाबळ नाट्याच्या आकर्षणामुळें महाराष्ट्र–नाट्य–मंदिराचा सभासद झाला. मंदिराचा आणि नाट्याचा त्याचा अभिमान जाज्वल्य होता. मला कुणी वाईट म्हटलेलें त्याला खपत नसे. त्यासाठीं तो कितीहि मोठ्या माणसाशीं हुज्जत घालीत असे. प्रभाकर शिस्तीचा विलक्षण भक्त असे. तो स्वतः बेशिस्त वागत नसे आणि मलाहि बेशिस्त वागण्यापासून परावृत्त करीत असे.

प्रभाकरनें शरीर तर कमावलें होतेंच पण मनहि कमावलें होतें. ह्या तयारीचा उगम होता बडोद्याच्या जुम्मादादा व्यायाम शाळेंत आणि तेथील अधिष्टात्री देवतां माणिकराव ह्यांच्या व्यक्तिमत्वांत ! प्रभाकरमुळेंच मला ह्या युगपुरुषाचें दर्शन जें घडलें तें षड्दर्शनांच्या अभ्यासापेक्षां मला मोलाचें वाटतें. माणिकरावांचे सर्व लहानमोठे विद्यार्थी एकमेकांना ‘ प्रिय बंधु ’ ह्या संज्ञेनें संबोधतात. माणिकरावांनीं स्थापन केलेलें आणि जोपासना करून वाढविलेलें हें ‘ भ्रातृमंडळ ’ Brotherhood ही महाराष्ट्राची फार मोठी शक्ति आहे.

शिवाजी महाराजांचा ‘ सलगी सांप्रदाय ’ माणिकरावांनीं फार यशस्वी रीतीनें आपल्या आचरणांत मुरवला होता. प्रभाकर त्या तालमींत खेळला होता आणि कसून तयार झाला होता. महाराष्ट्र–नाट्य–मंदिरांत प्रभाकराचा प्रवेश ही एक मंदिराच्या दृष्टीनें महत्वाची गोष्ट मानली पाहिजे.

● ● ●

लेखांक

सत्ताविसावा

# गणपतराव बोडस

"मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद।" ह्या वचनांत भगवन्तांनीं नारदाला आपल्या निवासस्थानाविषयीं दिलेल्या उत्तराचा विचार मी मराठी नाटकांच्या माझ्या छंदाच्या दृष्टिकोनांतून केला आणि मला एक आश्चर्यकारक प्रबोधन झालें. मराठी रंगभूमीचा विस्तार केवळ व्यवसायी नाटकांच्या प्रयोगक्षेत्रापुरता मर्यादित नाहीं तर ज़ेथें जेथें मराठी नाटकांचें वाचन, चर्चा, चिंतन वा संकीर्तन चालू असेल तेथें तेथें मराठी रंगभूमीचें क्षेत्र पसरलेलें आहे ही जाणीव मला मोठी उत्साहवर्धक वाटली. एखादें राज्य मिळावें असा त्या जाणीवेनें मला आनंद वाटला.

त्या आनंदाचीं मानसशास्त्रीय कारणें अशीं आहेत. महाराष्ट्र नाट्य–मंदिर ह्या संस्थेला वर्षांतून अेखादा नाट्य–प्रयोग करणें जड जाई. आमची प्रयोगक्षमता अशी निकृष्ट असल्यावर आम्ही समाधान कशाचें मानावें? नाट्यविषयक मुलाखती, चर्चा, व्याख्यानें, नाट्यवाचन, स्वगतांचें प्रात्यक्षिक, नाटककार आणि नट ह्यांचे स्मृतिदिन अथवा सत्कार–समारंभ हें मराठी रंगभूमीचेंच क्षेत्र आहे असें आम्हांला वाटणें स्वाभाविक आहे. एक तऱ्हेनें आमच्या लहानशा कार्याचें तें गौरवपूर्ण मूल्यमापन होतें.

हळूहळू पण निश्चित एका कल्पनेचा उदय माझ्या मनांत होत होता. 'महाराष्ट्र नाट्य विद्यालय' ही ती कल्पना. नाट्यशिक्षणासाठीं असें विद्यालय काढावें अशी कल्पना १९३७ मध्यें प्रथम माझ्या मनांत आली.

त्यासाठीं पूर्वतयारी म्हणून नटश्रेष्ठ गणपतराव बोडस ह्यांना एक पत्र लिहून मी माझी नाट्यशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली. गणपतरावांनीं पाठविलेलें उत्तर मी माझ्या डायरींत शब्दशः उतरून ठेविलें आहे. त्यांनीं माझें अभिनंदन केलें व नाट्य हा माझा व्यवसाय नसतां मी शिकण्याची तळमळ ठेवावी आणि धंदेवाईक नटांनीं ह्या बाबतींत उदासीन असावे हा विरोध त्यांनीं आपल्या पत्रांत व्यक्त केला व मला आग्रहपूर्वक निमंत्रण दिलें. मला त्यांच्या त्या पत्रामुळें फार धन्यता वाटली व १९३७ च्या मे महिन्यांत सांगलीस जाऊन साधेल तें नाट्यशिक्षण गणपतरावांजवळून घ्यावयाचें असा मी निश्चय केला.

संकल्प आणि सिद्धी ह्यांमध्यें परमेश्वरी इच्छा उभी असते व ती अनुकूल झाल्याशिवाय संकल्प सिद्ध होऊं शकत नाहीं. ह्याचा पुरेपूर प्रत्यय मला आला. अर्धा मे महिना कांहीं वायफळ उद्योगांत गेला आणि गमनास मुहूर्त सांपडेना. एकेक दिवस जाऊं लागला तसतसा मी अधीर होऊं लागलों. एकदांचा मी घरांतून बाहेर पडलों आणि पुण्यास जाऊन पोहोंचलों.

सांगलीला जावयाचें म्हणजे जणू कांहीं एका खंडांतून दुसऱ्या खंडांत जाण्याइतका लांबचा प्रवास करावयाचा असा माझा उगाचच समज झाला. नारायणराव कुलकर्णी अथवा विठूकाका ह्यांपैकीं कुणीच पुण्यांत नव्हते. सांगलीला जाऊन आलेल्या माझ्या कांहीं मित्रांपाशीं मी नाना तऱ्हेच्या चौकशा केल्या आणि त्यांच्या चेष्टेचा विषय झालों. शेवटीं एका रात्रीं एम्. एस्. एम्. च्या डब्यांत बसून मी बुधगांव स्टेशनवर उतरलों. तेथून एक बस पकडली व सांगली गांवांत पोहोंचलो.

सांगलीच्या सुप्रसिद्ध गणपती मंदिरासमोर गणपतराव रहात असत. मी त्यांच्या घरीं गेलों तेव्हां ते झोपेंतून उठले नव्हते. काकूंनीं मला कॉफी करून दिली जागरणामुळें ते झोपले आहेत – थोडया वेळानें उठतील असें सांगितलें.

समोर दिसणाऱ्या गणपति मंदिरांतील झुलणाऱ्या हत्तीनें माझें लक्ष वेधून घेतलें. रात्रीं आरतीच्या वेळीं तो हत्ती आपल्या सोंडेंतून शिंगासारखा आवाज काढी. थोडया वेळानें गणपतराव उठले व गप्पा सुरू झाल्या. मी माझ्याबरोबर शिकण्यासाठीं आणलेलीं पुस्तकें त्यांना दाखविलीं. देवलांचें 'झुंझारराव' व सावरकरांचें 'संन्यस्त खड्ग' हीं दोन नाटकांचीं

पुस्तकें, मराठी रंगभूमीचा इतिहास अशीं कांहीं पुस्तकें मी बरोबर नेलीं होतीं. त्यांनीं तीं पाहिलीं. आपल्या गुरूची म्हणजे देवलांची नाट्यशिक्षण-पद्धति त्यांनीं मला सांगितली. चुकेल तेवढेंच सुधारून घ्यावयाचें—बाकीचें सारें नटाला त्याच्या इच्छेप्रमाणें करण्याची संधि द्यावयाची अशी देवलांची उदार पद्धति होती. त्या सूचनेचा मनाशीं मी अर्थ केला तो असा कीं गणपतराव प्रत्यक्ष कांहीं शिकविणार नाहींत. मला जें शिकायचें तें माझें मी त्यांच्या सहवासांतून शिकलें पाहिजे.

प्रत्यक्ष घडलें तें असे. गणपतरावांनीं 'झुंझारराव' ह्या नाटकाचें साभिनय वाचन केलें. शब्द आणि शब्दार्थाला सुसंगत मुद्रा ह्या त्यांच्या बाबतींत इतक्या सहज घडत कीं मी चकित होऊन पाहतच राही. गणपतरावांचे डोळे विलक्षण भावक्षम आहेत. पाहिजे ती भावना डोळ्यांतून व्यक्त करण्याचें त्यांचें सामर्थ्य अद्‌भूत आहे. गणपतरावांचें दुसरें सामर्थ्य म्हणजे त्यांच्या आवाजांतील हुकमी आरोह – अवरोह ! त्यांच्या नाट्यवाचनांतून मला तो पाठ मिळाला. नाट्याचीं तीं दोन मूलतत्त्वें – भावव्यक्ति आणि आवाजाचा चढउतार—मला समजलीं. गणपतरावांनीं रस्ता दाखविला. तसें नाट्य व्यक्त करण्यासाठीं मला स्वतः मेहनत केली पाहिजे.

'संन्यस्त खड्ग' ह्याहि नाटकाचें वाचन गणपतरावांनीं केलें. त्यांतील कांहीं उत्कट प्रसंग ऐकतांना गणपतरावांचें नाट्यसामर्थ्य शब्दाशब्दांतून प्रत्ययाला येई. त्या नाटकावर व त्यांत प्रतिपादिलेल्या तात्त्विक भूमिकेवर गणपतरावांचें खास प्रेम होतें. त्यामुळें तें नाटक वाचतांना त्यांना विशेष हुरूप वाटला. गडकऱ्यांच्या पहिल्या पुण्यतिथीला मुंबईस गणपतरावांनीं 'राजसंन्यास' नाटकाचें उत्कृष्ट वाचन केलें असा उल्लेख भालेरावांच्या त्या वेळच्या पत्रांत होता. गणपतरावांची नाट्यवाचनाची ती पद्धत अत्यंत परिणामकारक आहे यांत शंका नाहीं.

मी एक आठवडा सांगलींतर राहिलों. त्या अवधींत मला मिळालेल्या नाट्यशिक्षणाचें स्वरूप असें होतें. 'माझी भूमिका' ह्या आत्मचरित्रांत मी नाट्यशिक्षणासाठीं [सांगलीस त्यांच्या घरीं राहिलों ह्याचा उल्लेख गणपतरावांनीं केला आहे.

सांगलीच्या त्या मुक्कामांत महत्त्वाच्या अशा तीन गोष्टी घडल्या.

नाटयाचार्य खाडीलकर ह्यांच्या समारोपाच्या प्रवचन श्रवणाचा लाभ मला मिळाला. नाटककार खाडीलकर आणि प्रवचनकार खाडीलकर ह्या व्यक्ति एकच आहेत हें मी डोळ्यांनीं पाहत होतों व कानांनीं ऐकत होतों म्हणूनच मला त्यावर विश्वास ठेवणें भाग आहे. उपनिषदांतील एका भागावर खाडीलकर बोलत होते. अवघड विषय सोपा करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. कार्यकर्त्याच्या प्रगतीच्या पायऱ्या ह्या दृष्टीनें मी त्या प्रवचनांतील कांहीं मुद्दे घरीं आल्यावर माझ्या डायरींत टिपून ठेवले. संज्ञान, आ–ज्ञान, विज्ञान आणि प्रज्ञान ह्या ज्ञानाच्या चढत्या श्रेणी वर्णन करतांना त्यांनीं दिलेले दृष्टांत मी आज विसरून गेलों आहे. नंतर मेधा, दृष्टि, धृति आणि मति ह्या चार अवस्था त्यांनीं सांगितल्या. प्रथम सुखत्याग, नंतर समज, धारणाशक्ति आणि शेवटीं विचार ह्या चार अवस्था त्यांनीं सांगितल्या विचार एकदां स्थिर झाला कीं मनिषा, द्युति, स्मृति आणि संकल्प ह्या चार पायऱ्या आक्रमण कराव्या लागतात. मन सतत विचारशील असणें म्हणजे मनिषा. त्यांतूनच द्युति म्हणजे प्रेरणा Impulse चा उदय होतो. त्या प्रेरणेचें सतत स्मरण – चिंतन चालू झालें कीं मन संकल्प करतें. शेवटच्या अवस्थेंत ऋतु – निश्चित बुद्धि, नंतर असु –प्राण, त्यांतून काम म्हणजे त्या कार्याबद्दलची आसक्ति आणि शेवटीं वश: म्हणजे त्या कार्यांत मिळून जाणें Merging एकरूप होणें ही अवस्था प्राप्त होते.

प्रवचनाच्या शेवटीं खाडीलकरांनीं आपल्या श्रोत्यांचे आभार मानले. ५० पेक्षां अधिक श्रोतृसंख्या नव्हती. सांगलीपासून मैलभर अंतरावर खाडीलकरांनीं एक छोटेसें दत्तमंदिर मोठ्या हौसेनें बांधलें. त्या मंदिरासमोर दोनशें माणसें बसतील असा कायम सभामंडप उभारला आहे. पत्र्याच्या शेडसारखी त्याची बांधणी आहे. देवासमोर बोलायचें–असें बोलणें हा एक उपासनेचा मार्ग आहे या निष्ठेनें तें बोलणें चाले. त्या उपासनेला श्रोत्यांची संख्या, मिळणारी दक्षिणा, नांवलौकिक ह्यांपैकीं कशाचीहि अपेक्षा नव्हती. लालसा नव्हती. श्रोत्यांपैकीं कांहींजणांनीं प्रवचनकारांचे आभार मानले–कांहीं पुरस्कारहि दिला. व्यवस्थापकांच्या परवानगीनें मीहि गौरवपर बोललों व नाशिकला या असें निमंत्रण दिलें.

तें प्रवचन ऐकून कृष्णानदीच्या पुलावरून परततांना मी भारावून

गेलों होतों. जीवनांतील सारे लहानमोठे संघर्ष अटीतटीनें झगडून खाडीलकर सुस्थितींत होते. त्यांनीं आयुष्यांत ही धडपड करण्याचें कारण नव्हतें. नांव-लौकिक, पैसा-अडका सारें कांहीं त्यांनीं हिंमतीनें मिळविलें होतें. पण ती उपासना होती. कांहीं वर्षांनीं अर्धांगवायूनें खाडीलकर विकलांग झाले असतां मी त्यांना भेटलों. त्यांचा तो दुबळेपणा मला पाहवेना. माझ्या एका वहींत K. P. Khadilkar अशी त्यांची स्वाक्षरी घेतली व त्यांना वंदन करून मी परतलों. खाडीलकरांची इच्छा ही कीं पुण्यांत आपल्याला घर असावें. अण्णानें – खाडीलकरांच्या मुलानें रु. ३५००० खर्च करून भिकारदास मारुतीजवळ घर विकत घेतलें व तेथें वडिलांना ठेवलें.

खाडीलकरांच्या आयुष्यांतील एक अखेरचा प्रसंग विठूकाकांकडून कळला तो असा. मृत्यूपूर्वीं कांहीं दिवस आधीं खाडीलकरांनीं मुलाला सांगितलें, " मला सांगलीला जायचं." अप्पानें स्वतंत्र मोटर ठरवून वडिलांना सांगलीस नेले. दत्तमूर्तीजवळ त्यांना नेण्यांत आले. एखाद्या जिवलग आप्ताला भेटावे त्याप्रमाणें खाडीलकरांनीं त्या पाषाणमूर्तीच्या गळ्यांत हात घातले. डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. " देवा, ही शेवटची भेट " इतकें बोलून खाडीलकरांनीं देवाचा निरोप घेतला. विठूकाकांनीं गोकुळ-अष्टमीला खाडीलकरांच्या अस्थी नाशिकला आणल्या. रुंगटा हायस्कूलच्या हजार विद्यार्थ्यांनीं मोठी मिरवणूक काढून त्या अस्थी सन्मानपूर्वक गंगेच्या कांठीं नेल्या व विठूकाकांनीं गोदावरींत त्या अस्थींचें विसर्जन केलें !

## लेखांक अठ्ठावीस

# देवलांचे हरीपूर

**ना**टयाचार्य खाडीलकरांचें प्रवचन ऐकायला मिळालें हा जसा अभावित लाभ घडला त्याचप्रमाणें नारायणराव आणि विठूकाका सांगलीस माझ्यासाठीं तीनचार दिवस आल्यामुळें कांहीं गोष्टी अभावितपणें घडल्या- पासून सांगलीपासून ३–४ मैल अंतरावर कृष्णा आणि वेण्या ह्या नद्यांचा संगम आहे. संकष्ट चतुर्थीला आम्ही तिघे त्या संगमावर स्नानासाठीं गेलों. उन्हाळा असल्यानें पाणी फार थोडें होतें. सांगलीहून जातांना एका राईंत एक मोरांचा कळप दिसला. त्यांपैकीं एक मोर आपला सुंदर पिसारा संपूर्ण उघडून मोठ्या ऐटींत पदन्यास करीत होता. त्याची ती ऐट, पिसाऱ्यावरील शेंकडों डोळ्यांचें तें सौंदर्य पाहतांना मी मुग्ध होऊन उभा राहिलों. आम्ही तिघांनीं तें अवीट सौंदर्य डोळे भरून मनसोक्त पाहिलें आणि मोठ्या कष्टानें पुढें जाण्यासाठीं पाऊल उचलिलें.

संगमाच्या कांठींच देवलांचें हरीपूर हें गांव वसलेलें आहे. दोनतीन मुली कमरेवर घागरी घेऊन नदीवर पाण्याला चालल्या होत्या. ह्यांतूनच देवलांची मानसकन्या शारदा जन्माला आली असावी असा विचार माझ्या मनांत आला. आम्ही संगमावर जाऊन स्नान केलें. देवल ज्या वास्तूंत राहिले ती वास्तु पहावी अशी इच्छा मी व्यक्त केली. दुपारची बाराची वेळ. आम्ही देवलांच्या घरांत शिरलों आणि तेथें राहणाऱ्या गृहस्थाला आमची इच्छा सांगितली. त्यानें आमच्याबरोबर फिरून सारें घर आम्हांला दाखविलें.

उपास असल्यानें जेवण करण्याची विनंती आम्ही नाकारली. चहा घेतला. चहा तयार होईपर्यंत आम्ही ओसरीवर बसलों. तेथें एक चमत्कार दिसला. भुईसर विठोबा–रखमाईंच्या एकवीत उंचीच्या दगडी मूर्ति होत्या. देव देव्हाऱ्यांत किंवा उंच कोनाडयांत असतात. येथें भुईसर देव कां म्हणून त्या वस्तीवाल्याला मी प्रश्न केला. त्यानें उत्तर दिलें, "देवलांनीं हें घर एका बाईपासून विकत घेतलें. त्या बाईनें घर विकतांना एक अट घातली. ती म्हणाली, 'मला मूलबाळ नाहीं. हे देव हींच माझीं मुलें. ह्या घरांतून, ह्या जागेवरून हीं मुलें हलवायची नाहींत. तर मी घर देईन.' देवलांनीं ती अट मान्य केली म्हणून त्या मूर्ति तेथें आहेत." देवाला स्वतःचे मूल समजण्याची ती कल्पना और होती. आम्ही चहा घेतला आणि देवलांच्या त्या वास्तूचा निरोप घेतला. संगमनाथाचें देऊळ, त्यांतील ओऱ्या हा सर्व देखावा देवलांनीं शारदा नाटकांत यथास्थित रेखाटला आहे. त्याच दिवशीं संध्याकाळीं संशयकल्लोळांत ज्याचा उल्लेख आहे तो आंबराईचा कोपरा कीं कोंपऱ्यांतील आंबराई पाहिली. देवलांच्या मुलाचा तेथें छापखाना आहे.

नारायणराव कुलकर्णी मला भाटेबुवांच्या नाटचकला मंडळीच्या बिऱ्हाडीं घेऊन गेले. तेथें भाटेबुवांचा परिचय झाला. त्याच मंडळीचे एक नाटककार श्री. कोठीवाले व कंपनींतील प्रमुख नटी बन्नू ह्यांचा परिचय झाला. स्वरूपसुंदर स्त्रीभूमिका करणारे म्हणून भाटेबुवा गाजले. त्यांचा तो देखणेपणा पहिल्याच भेटींत डोळ्यांत भरला. बन्नूही मुसलमान स्त्री भाटेबुवांच्या कंपनींत नाटकांतील कामें करी व एका दृष्टीनें कंपनीची मालकीण म्हणून राही. नारायणरावांच्या शिफारशीनें मी माझें 'गुरुकुल' हें नाटक भाटेबुवांना वाचून दाखविलें. त्या नाटकावर त्यांनीं अभिप्राय तर दिला नाहीं. परंतु कंपनीचीं सूत्रें सर्वस्वीं आपल्या हातीं नाहींत एवढेंच सांगितलें.

नरसोबाची वाडी ह्या देवस्थानाला आम्ही तिघेजण जाऊन आलों. जयसिंगपूर ह्या स्टेशनपासून आम्ही बसचा प्रवास केला व नरसोबाच्या वाडीला पोहोंचलों हें दत्ताचें स्थान आहे. संगम येथेंहि आहेच. नदीला घाट बांधलेला आहे. पुष्कळशा पायऱ्या उतरून गेल्यावर आपण पाण्याजवळ पोहोंचतों. एका खडकावर पादुकांचे ठसे आहेत तोच देव. देवाला ओलेत्यानें पाणी घालण्याची पद्धत आहे. परत येतांना बापूराव पेंढारकरांचे श्वशुर

श्री. बंडोपंत हर्डीकर ह्यांच्या घरीं थांबलों व थोड्या वेळानें सांगलीस परतलों. श्री. एस्. ए. कुलकर्णी ह्यांनीं तेथील वाचनालयांत माझें व्याख्यात ठेवलें होते. व्याख्यानाचा विषय 'मराठी रंगभूमि' हाच होता. 'मराठी रंगभूमि मेली' अशी जी अशुभ ओरड बोलपटाचे पक्षपाती करीत होते. त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न मी त्या भाषणांत केला. व्याख्यानाला प्रथम कांहींच गर्दी नव्हती. रस्त्याच्या कडेला व्याख्यान. त्यामुळें येणाराजाणारा थांबे. हळूहळू गर्दी वाढत गेली. माझ्या त्या व्याख्यानांतून एक अभावित विनोद निर्माण झाला. नाटचकला हा शब्द माझ्या व्याख्यानांत मी वापरला होता. दुसऱ्या दिवशीं नाटककार कोठीवाले भेटले व रागानें म्हणू लागले, "तुम्ही काल आमच्या नाटक मंडळीवर का टीका केलीत ?" मी त्यांना विचारलें, "तुम्ही व्याख्यानाला हजर होतां कां ?" ते म्हणाले, "आमच्या गवळयानं सांगितलें कीं तुम्ही नाटचकला, नाटचकला, असं सारखं बोलत होतां." मो त्यांना सांगितलें, "तुमचें म्हणणें बरोबर आहे. मी ज्या नाटच-कलेबद्दल बोलत होतों ती नाटचकला तुमची नाटकमंडळी नव्हे तर मराठी रंगभूमीवर दिसणारी नाटचकला आणि तिच्या स्वरूपासंबंधी मी बोलत होतों."

व्याख्यान देऊन मी परत आल्यावर गणपतरावांनीं मलाच विचारलें, "व्याख्यान कसं झालं ?" मी सांगितलें "समाधानकारक झालें नाहीं." त्यावर त्यांनीं अनुभवाचा असा बहुमोल सल्ला दिला. ते म्हणाले, "ज्या दिवशीं आपल्या आवडीचा कार्यक्रम असेल त्या दिवशीं उगाच दमू नये त्या थकव्याचा परिणाम कार्यक्रमावर होतों. शरीराच्या आणि मनाच्या शक्ति त्या कार्यक्रमासाठीं राखून ठेवाव्यात." मी तें ऐकलें. पण त्याप्रमाणें वागण्याचें मला नेहमींच साधलें नाहीं. माझ्या जीवनाच्या धकाधकीच्या मामल्यांत तें पथ्य परवडणें शक्य नव्हतें. ह्याच व्याख्यानांत मी 'महाराष्ट्र नाटच विद्यालया'ची घोषणा केली. सांगलींत मराठी रंगभूमीच्या जन्मस्थानीं केलेल्या ह्या घोषणेला माझ्या दृष्टीनें फार महत्त्व होतें. नुसतीच घोषणा झाली—प्रत्यक्ष विद्यालय अस्तित्वांत आलें नाहीं. त्याच दिवशीं रात्रीं १० वाजतां देवल क्लबांत माझा नाटचदर्शनाचा कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाला विद्यार्थी संख्या अधिक होती. तो कार्यक्रम पाहून एस्. ए. कुलकर्णी म्हणाले कीं, आपण मदत करूं. एक सद्भावना हाच त्या आश्वासनाचा अर्थ मी समजलों.

सांगलीहून आम्ही कोल्हापूरला गेलों. श्री. विसूभाऊ मोडक–आमचय नारायणरावांचे स्नेही–ह्यांनीं आमचें स्वागत केलें. हेमाडपंती पद्धतीनें बांधलेल्या अंबाबाईच्या देवळांत जाऊन देवीचें दर्शन घेतलें. देवळाचें आवार खूप मोठें आहे. रंकाळा तलाव पाहिला. प्रा. श्री. ना. सी. फडके ह्यांना भेटलों. 'आठवणीचे खंदक' ह्या प्रहसनाचे लेखक श्री. र. गो. टेंबे ह्यांची भेट घेतली. त्या प्रहसनाचा मूळ जर्मन लेखक ऑगस्टस ह्याच्या दोनतीन नाटकांच्या रूपांतरांतील कांहीं भाग श्री. टेंबे ह्यांनीं वाचून दाखविला. संपूर्ण नाटकापेक्षां छोटें प्रहसन द्या म्हणजे दोन प्रहसनें एकत्र छापून काढू असें मी सुचविलें. र. गो. टेंबे बाळू कानिटकराचे स्नेही. त्यांनीं मला फार अगत्यानें वागविलें. श्री. यशवंतराव फडके–नारायणरावांचे स्नेही–ह्यांचा परिचय झाला. 'सत्याचा खून', 'पापाची चलती' इत्यादि कोल्हापुरी आख्यायिका त्यांनीं ऐकविल्या. कोल्हापुरांत दारांना उंबरे नाहींत हें घरबांधणीचें वैशिष्टच लक्षांत आलें.

'माईसाहेब' कर्ते श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांच्या 'सुरली' ह्या गांवीं मी प्रथमच गेलों. सुरली खेडेगांव आहे व तें डोंगरांनीं वेढलेलें आहे. आळंदीच्या पालखीचा रस्ता ह्या गांवावरून जातो. ८०० वस्तीच्या ह्या गांवांत ब्राह्मणाचें घर एकच आणि तें वतनदार कुलकर्ण्यांचें. शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. नारायणरावांचे ज्येष्ठ बंधु नोकरीसाठीं पुण्यांत राहिले आणि त्यांच्यामुळें नारायणरावांना पुणे दिसलें. 'माईसाहेब' नाटकांतील अमृतमामा म्हणतो, "केव्हांहि पहा, पुणं आपलं नवीनच दिसतं. कालचं पुणं आज नाहीं, आजचं उद्यां नाहीं." हा पुण्याला जाणाऱ्या नारायणरावांचा स्वतःचा अनुभव होय.

सुरलीस विशेष काम नव्हतें. नारायणरावांनीं वडिलार्जित घरांत शहराला शोभतील अशा सुधारणा करून घेतल्या आहेत. स्वतःचें ग्रंथालय राहील अशी सोय केली आहे. अभिजात लेखकाचा जन्म कोठें व्हावा ह्याला नियम नाहीं हेंच खरें. सुरलीहून कऱ्हाडमार्गें मी साताऱ्याला गेलों. मी कॉलेजमध्यें असतांना ज्यांनीं माझ्या अल्पस्वल्प गुणांचा विकास व्हावा म्हणून प्रयत्न केले आणि माझ्या लहानशा कृतींचें मनसोक्त कौतुक केलें त्या शिवराम गोविंद भावे ह्यांना भेटावे म्हणून मी सातारला थांबलों. त्या वेळीं भावे



➔ 'माईसाहेब' कर्ते—
श्री. ना. वि. कुलकर्णी

●

महाराष्ट्र नाटच-संमेलन, नासिक, १९४०. कार्याध्यक्ष श्री. पुरोहित, प्रतिनिधि नटवर्य श्री. केशवराव दाते, संमेलनाध्यक्ष नटवर्य श्री. गणपतराव बोडस, प्रतिनिधि नाटककार श्री. मामा वरेरकर. ↓





▲ सांस्कृतिक कलाकेंद्र : 'सोन्याचा कळस' नटवर्ग– उभे : श्री. पुरोहित, डॉ. दिघे, श्री कवळे, श्री. साने, गुलाब कोरगावकर, सन्मित्रा, श्री. डावरे, गोडबोले. खालीं बसलेले : जगन्नाथ बर्वे, श्री. माधव पवार, सुधाकर बर्वे.

श्री. पुरोहित, नटश्रेष्ठ श्री. पृथ्वीराज कपूर, श्री. प्रभाकर गुप्ते, श्री. मामा जोशी. ▼

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नुक्रम ........................ वि: ..................
मांक ........................ नों दि ..................



यादव पेठेंत राहत होते. छोटा सदाशिव चित्रें काढील म्हणून भाव्यांनीं त्याला ट्रेसिंग पेपर, पेन्सिल व रबर सगळें साहित्य आणून दिलें. या मुलाचें संगोपन भावे मोठ्या दक्षतेनें करीत आहेत हें पाहिलें. त्या मुक्कामांत दोनतीनदां तरी माझा स्वभाव संकोची आहे असें भावे म्हणाले. सातारहून पुणे, तेथून मी नाशिकला परतलों. चार गांवें फिरून मी घरीं आलों. नव्या इमारतींत तुझी बदली झाली आहे असें अध्यापक म्हणाले. मी किंचित खूष झालों !

• • •

## लेखांक एकोणतीस

# "महाराष्ट्र-नाट्य-विद्यालय"

**सां**गली येथें 'महाराष्ट्र नाट्य विद्यालय' ह्या कल्पनेचा उच्चार मी केला. त्या कल्पनेची रुजवात मनांत होऊं लागली मला भेटणाऱ्या प्रत्येकाला मी या विषयाची कल्पना सांगूं लागलों. त्या कल्पनेचा तपशील मात्र माझ्याजवळ तयार नव्हता.श्री. सोपानदेव चौधरी ह्यांना काव्य-गायना मुळें महाराष्ट्रांत खूपच प्रसिद्धि मिळाली. महाराष्ट्रांतील उत्कृष्ट काव्यगायक असेंच माझें त्यांच्याविषयीं मत आहे. त्यांचा व माझा परिचय झाल्यापासून त्यांनीं मजबद्दल विशेष आस्था दाखविली. काव्यगायन आणि नाट्यदर्शन असे जोड कार्यक्रम आम्ही केले. त्यांत काव्यगायन प्रथम होई आणि नंतर मी धास्तावून नाट्यदर्शनाला उभा राही. माझा अनुभव असा आहे कीं नाट्यदर्शनाचा कार्यक्रम परिणामकारक होई. माझ्या अनेक अडचणी असत. भाषण उस्फूर्त; 'मूड' लागला पाहिजे आणि श्रोत्यांची समरसता मिळाली पाहिजे. ह्या तीन अडचणी प्रमुख. आवाज ही एकच माझी तयारी. ह्या कार्यक्रमामुळें महाराष्ट्र नाट्य विद्यालयाच्या कल्पनेला सहानुभूति मिळविणें मला शक्य झालें. मालेगांवचे श्रीमंत बाळासाहेब राजेबहाद्दर ह्यांच्या वाड्यांत गणपति–उत्सवांत मी जो नाट्यदर्शनाचा कार्यक्रम केला तो त्यांना फार आवडला. मला त्यांनीं आग्रह करून एक दिवस ठेवून घेतले आणि मालेगांवमध्यें आपण महाराष्ट्र नाट्य विद्यालयासाठीं निधि गोळा करून देऊं असेंहि आश्वासन दिलें. आणखीहि कांहींजणापाशीं ती कल्पना

मो बोललों. प्रल्हाद औरंगाबादकरपाशींहि मी ती कल्पना बोललों. त्यानें होकार भरला.

१९३७ सालांतील गणेशोत्सवांत मी दहाहि दिवस व्याख्यान वा नाट्यदर्शन अशा कार्यक्रमांत गुंतलेलों होतों. 'अभिनयाचा अभ्यास' हा माझा व्याख्यानाचा आवडता विषय असे. लोकमान्य टिळकांचे 'गणेशोत्सव' ह्या विषयावरील लेख मी वाचले. त्यांत लोकमान्यांनीं अतिशय आग्रहानें असें प्रतिपादन केलें आहे कीं प्रत्येक सुशिक्षितानें देशाच्या परिस्थितीची माहिती जनतेंत जाऊन सांगणें हें त्याचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें आपल्या आवडत्या विषयासंबंधी लोकांना माहिती द्यावी. हीं दोन्हीं मतें मला मान्य आहेत; इतकेंच नव्हे तर माझ्या कुवतीप्रमाणें एक सुशिक्षित म्हणून त्याप्रमाणें आचरण करण्याचाहि मी प्रयत्न करीत आहे. अनाथ विद्यार्थी गृहांत राष्ट्रीय वाङ्मयाचें वाचन असा एक अभिनव कार्यक्रम गणेशोत्सवांत ठेवला होता. त्यांत मी भाग घेतला. त्यावेळीं श्री. पेंडसे म्हणाले कीं ह्या उपक्रमाचें श्रेय श्री. पुरोहित ह्यांचें आहे. त्यांनींच येथें खाडीलकरांच्या नाटकांतील उताऱ्यांचें वाचन केलें व हा उपक्रम सुचविला.

नाट्यशिक्षणाचें निमंत्रण मी सहसा नाकारीत नसे. नाशिकच्या एका स्त्रीमंडळाच्या वार्षिक उत्सवांत करमणूक म्हणून नाटकांतील कांहीं उतारे करून दाखवावे असें ठरलें. श्रीमती सौ. लीलादेवी चौधरी—सोपानदेवांच्या पत्नी—ह्यांना 'एकच प्याला' नाटकांतील सुधाकराचें प्रसिद्ध स्वगत "दुर्दैवाचे दशावतार इ." करून दाखविण्याची इच्छा होती. त्यांच्या घरीं जाऊन मी त्यांना तें स्वगत म्हणून दाखविलें व आवश्यक त्या अभिनयाच्या सूचना दिल्या. माईसाहेब चांदवडकर ह्यांनीं मला बोलावणं पाठविलें आणि त्या वेळीं नासिकच्या जिल्हा न्यायाधीशांच्या पत्नी श्रीमती सौ. द्रवीड ह्यांना 'स्वयंवर' मधील रुक्मिणीचें स्वगत "खडा मारायचा झाला तर" शिकविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तीन दिवस जाऊन मी तें स्वगत शिकविण्याचा प्रयत्न केला. मिसेस द्रवीड ह्यांना रुक्मिणीला शोभेल असें सौंदर्य स्वाभाविक होतें. माझ्यासमोर बोलतांना त्यांना संकोच वाटे. मी माईसाहेबांना माझी अडचण सांगितली. नीट उभें राहणें, आवश्यक ते हातवारे आणि पदन्यास करणें ह्या गोष्टी जमल्या नाहींत तर स्वगत उठावदार होणार नाहीं. मला ज्या सूचना करावयाच्या त्या मी माईसाहेबांजवळ सांगत असे आणि माईसाहेब

मिसेस द्रवीडांकडून तसे करून घेत असत. माईसाहेब स्वतः अत्यंत बुद्धिमान आणि मोकळ्या मनाच्या आहेत. उत्सवस झाल्यानंतर मला लहानसा पुरस्कार पाठविण्यांत आला आणि माझे आभार मानण्यांत आले. दोन्हीं स्वगतें चांगलीं झालीं असें कळून मला आनंद वाटला.

एका शनिवारीं सकाळची शाळा करून घरीं येण्यास मला उशीर झाला. १२–१२॥ ला मी घरीं आलों. श्री. बाळासाहेब काळे नटवर्य केशवराव दाते ह्यांना घेऊन घरीं आले होते व माझी वाट पाहत होते. केशवराव मला भेटायला आले ह्याचा मला अभिमान तर वाटलाच पण त्यांच्या सौजन्याचें मला अधिक नवल वाटलें. त्या बैठकींत मी महाराष्ट्र नाटच विद्यालयाची कल्पना केशवरावांना सांगितली. त्यांनीं त्या कल्पनेचा पुरस्कार केला. स्थानिक नाटचसंस्था काढावी व दर दोन महिन्यांनीं एक नवा नाटचप्रयोग करावा असें त्यांनीं सुचविलें. थोडा प्रयत्न केला तर हा उपक्रम यशस्वी होईल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. स्वतः केशवराव तसा उपक्रम करण्याच्या प्रयत्नांत होते. त्यांचा सांगण्याचा हेतु असा कीं नाटचप्रयोग बसवितांनाच नाटचशिक्षण द्यावें. महाराष्ट्र नाटक विद्यालय कसें चालवावें ह्याची ती सूचना होती. मला एक नवीन प्रकाश मिळाला. त्या दृष्टीनें ती मुलाखत महत्त्वाची झाली.

ललितकलादर्शचे व्यवस्थापक श्री. गोविंदराव सोळुस्कर नाशकांत येऊन राहिले होते. प्रल्हादरावांची व त्यांची ओळख होती. प्रल्हादराव एक दिवस त्यांना घरीं घेऊन आले. बैठेसे बिगार भली ह्या न्यायानें नाशकांत कांहीं नाटचव्यवसाय सुरू करावा. असें त्यांच्या मनांत होतें. त्यांच्याजवळ स्वतःचें भांडवल नव्हतें. महाराष्ट्र नाटच मंदिराला तसें व्यवसायी स्वरूप देतां आलें तर पहावें म्हणून ते माझ्याकडे आले. मी एक नाटक लिहिलें आहे हें त्यांना माहीत असावें. त्यांनीं माझ्यापुढें एक योजना मांडली. पंडितराव नगरकर आणि सुलोचना पालकर दोघेहि त्या वेळीं नाशिकलाच होते. गोविंदराव मला त्यांच्याकडे घेऊन जाणार व मी त्यांना माझें नाटक वाचून दाखवावें. त्यांतून कांहीं बनाव बनला तर पहायचे अशी ती योजना होती. त्याप्रमाणें शाळा सुटल्यानंतर मी पंडितराव नगरकरांकडे गेलों. गोविंदराव आधींच येऊन माझी वाट पहात होते. नाटचवाचनाचा दिवस मुक्रर झाला. नाटचवाचन झालें नाहीं. कारण ऐकणारांना वेळ नव्हता.

नवजीवन संगीत मंडळी ह्या नांवाची एक नाटक मंडळी नाशिकला

आली. श्री. जोशी नांवाचे रेल्वे अधिकारी ह्या कंपनीचे मालक होते. श्री. नानासाहेब गोखले, श्री. गणेशशास्त्री फाटक ह्यांचीं नाटकें ही मंडळी करीत असे. मास्टर नरेश ह्या नांवाचा एक देखणा स्त्रीभूमिका करणारा बालनट ह्या नाटक मंडळींत होता.

मी 'गुरुकुल' व 'सरकारी इन्स्पेक्टर' ह्या माझ्या दोन नाटकांचे कांहीं भाग कंपनींत वाचून दाखविले. 'सरकारी इन्स्पेक्टर' अधिक बरें एवढाच अभिप्राय ऐकला. श्री. गो. के. भट ह्यांचेंहि एक नाटक वाचण्याचा कार्यक्रम झाला. नाटक मंडळीची आर्थिक परिस्थिति फारशी समाधानकारक नसावी. कंपनी फार दिवस टिकली नाहीं.

केशवराव दाते कांहीं निमित्तानें पुन्हा एकदां नाशकास येऊन गेले. पुण्यास एखादी स्थायिक नाटक मंडळी काढावी असा आपला विचार आहे असें ते बोलले. तसें प्रत्यक्ष घडलें नाहीं. नाशिकच्या कांहीं संपन्न लोकांनीं एक फिल्म कंपनी काढली. त्याबाबतींत कांहीं व्यावसायिक बोलणीं करण्यास केशवराव आले होते. बोलणीं यशस्वी झालीं नाहींत. मला उगाचच आशा वाटत होती कीं त्या निमित्तानें केशवराव नाशकांत येऊन राहिले तर आपल्या नाट्यविषयक कार्याला चांगलें साहाय्य मिळेल.

येथल्या कॉलेजच्या नाटकांचें दिग्दर्शन श्री. बाळासाहेब काळे करीत असत. मी कांहीं वेळां तालमींना जाऊन बसे. काळे परिश्रम खूप घेत. परंतु त्या विद्यार्थ्यांच्या चुका अक्षम्य असत आणि काळे अतिशय तीव्र शब्दांत बोलत. मला प्रथम नवल वाटे कीं हे विद्यार्थी इतके कोडगे कसे कीं वाटेल तशीं बोलणीं ऐकून ते पुन्हा काळ्यांना चहातात. मी विचार केला आणि मला कळलें कीं तालमीच्या वेळचा हा Hard Task Master – कठोर शिक्षक–इतर वेळीं त्या विद्यार्थ्यांना जी सलगी दाखवी ती विलक्षण प्रभावी असे. मला तशी सलगी कधींच दाखवितां आली नाहीं–देतां आली नाहीं. श्री. काळे गुणदोषांचें एक चमत्कारिक पण हृद्य मिश्रण आहे. त्यांची सोबत अवीट आहे. कांहीं वेळां त्यांना कांहीं विलक्षण कल्पना सुचतात आणि ते त्या यथायोग्य शब्दांत व्यक्तहि करतात. त्यांच्या त्या बुद्धिमत्तेनें मन थक्क होते. त्याबरोबरच आपल्याला पाहिजे त्या मार्गानें ही विलक्षण शक्ति कार्यान्वित करतां येत नाहीं ह्याचा खेदहि होतो. स्वतः काळे मात्र ना खेद ना खंत अशाच चालीनें चालत असतात.

● ● ●

लेखांक तिसावा

# नाट्य-दिग्दर्शन : कांहीं अनुभव

'स्वे स्वे कर्मण्यभिरत : संसिद्धि लभते नर:' ह्या वचनांतील पूर्वार्धाबद्दल मी असें म्हणेन कीं १९३७ पासून नाट्यक्षेत्रांत अभिरत राहण्याची संधि मला मिळाली. सिद्धि मिळाली असें मी म्हणत नाहीं—म्हणूं शकत नाहीं. सांगली—कोल्हापूर हा प्रवास करून आल्यानंतर कुठें तरी मनाच्या एका कप्प्यांत त्या भूमीची आठवण सतत जागी असे. उन्हाळ्यांत नांगरून वखरून तयार केलेलीं तीं काळीभोर शेतें, आपल्या कसदारपणाचें तेज ओसंडून व्यक्त करीत. हिरव्या वनश्रीचें सौंदर्य डोळे दिपवून टाकीत असेल परंतु ह्या समृद्धिगर्भ काळ्याभोर जमिनी पाहतांना मनाची तहान तृप्त होई. सांगली, इचलकरंजी, जमखिडी, कोल्हापूर, कुरुंदवाड ह्या लहान-मोठ्या संस्थानांतून आमचे नाटकवाले जन्माला आले, मोठे झाले, आपल्या कर्तृत्वानें नांवलौकिकाला चढले हा इतिहास आहे. त्या राजेमहाराजांनीं ह्या नाटकवाल्यांना त्यांच्या पडत्या काळांत सांवरलें, आपला मदतीचा हात सतत पुढें केला, चांदीच्या रुपयांनीं भरलेलीं ताटें त्यांच्या पदरांत रिकामीं केलीं. नटश्रेष्ठ गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग ह्यांची शाहूनगरवासी नाटकमंडळी कोल्हापूरच्या शाहू महाराजांची लाडकी नाटक मंडळी. इंग्रजांचा शेक्सपियर पाश्चात्य नटांच्या सामर्थ्यानें मराठी रंगभूमीवर उभा करण्याचें श्रेय सर्वस्वीं ह्याच नाटकमंडळीचें. हॅम्लेट, अथेल्लो, मॅक्बेथ ह्या भूमिका मराठी माणसाला परिचित झाल्या त्या गणपतरावांमुळेंच. मराठी रंगभूमी-

वरचें पहिलें नाट्यमन्वंतर केलें तें गणपतराव जोशी ह्यांनींच ! हे सर्व विचार माझ्या मनांत येत आणि मराठी नाटकांचा माझा छंद अधिकच बळावे.

माझा हा छंद निष्क्रिय राहिला असता तर मला त्याचा कधींच अभिमान वाटला नसता. १९२९ ते १९३७ ह्या आठ वर्षांत महाराष्ट्र नाट्यमंदिरानें जी प्रतिष्ठा आपल्या कार्यानें मिळविली तिचा परिणाम असा झाला कीं गांवांतील इंग्रजी शाळांचीं नाटकें बसवायचीं म्हणजे त्या शाळांचे चालक आमच्या सहकार्याची अपेक्षा करीत. श्री. काळे ह्यांना आपला व्यवसाय सोडून जाणें शक्य नव्हतें. शाळेचें माझें काम संभाळून मला जें करणें शक्य होतें तें मी करीत आलों. १९३७ चा पावसाळा संपला आणि नोव्हेंबर–डिसेंबर ह्या दोन महिन्यांत मी दोन नाट्यप्रयोगांच्या तालमी घेऊं लागलों. एक कॉलेजच्या विद्यार्थिनींचें 'नवऱ्याला वेसण' आणि दुसरें मराठा हायस्कूलचें 'करीन ती पूर्व !' शाळा सुटली कीं नासिक हायस्कूलच्या सेंट्रल हॉलमध्यें त्या विद्यार्थिनी जमत. नाटकांतील बोलणें आणि रोजच्या व्यवहारांतील बोलणें ह्यांत फरक आहे हें मी त्या मुलींना समजावून दिलें. त्यांना स्त्रियांचे हातवारे, बोलणें शिकवूं लागलों. 'इश्श' हा स्त्री वर्गाचा बव्हर्थी शब्द कितीतरी जणींना उच्चारतां येत नसे. मग तो उच्चार करतांना मानेला द्यावयाचा झटका, डोळ्यांची हालचाल ह्या गोष्टी दूरच राहिल्या. केवळ स्त्रीभूमिका असलेल्या ह्या नाटकाची तालीम घेत असतांना मला एक जाणीव झाली कीं वाढत्या शिक्षणाबरोबर महाराष्ट्रीय स्त्री आपलीं सौंदर्यवैशिष्टचें गमावूं लागली आहे. गोल पातळ आलें आणि कांसोटचाचें नेसणें नष्ट झालें. मुरका, कटाक्ष, तिरस्कार हीं स्त्रीचीं खास वैशिष्टचें लुप्त झालीं आहेत. स्वर उचलणें, त्याला हेलकावा देऊन त्यांत लाडीकपणा निर्माण करणें हीं शस्त्रें बोथट झालीं आहेत. नाटकाच्या तालमी घेतांना मी–मिशा असलेला पुरुष–स्त्रीचा अभिनय करून दाखवी आणि माझें मलाच हसूं येई. त्या मुलींच्याकडून मला पाहिजे तशा स्वरांत आणि सुरांत म्हणवून घ्यावयाचे म्हणजे मला म्हणावे लागे. तास दीडतास ही तालीम चाले. प्रा. भा. ल. पाटणकर ह्यांच्या शिफारशीनें मला ही संधि मिळाली होती हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें आवश्यक आहे. त्याच वेळीं श्री. काळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांचें 'चढा-

ओढ ' नाटक बसवीत होते. त्याशिवाय आणखी एक छोटी इंग्रजी नाटिका व्हावयाची आहे असें समजलें. एकाच रात्रींत ' रात्र थोडी आणि सोंगें फार ' अशी परिस्थिति झाली. कोणतें ' सोंग ' आधीं नाचू द्यावयाचें ह्याचा पुष्कळ विचार झाला. प्रत्येक गटाला भीति कीं आपलें नाटक प्रथम झालें तर तें रंगणार नाहीं. हो ना करतां करतां मुलींचें नाटक प्रथम, नंतर मुलांचें आणि शेवटीं इंग्रजी असा क्रम ठरला. प्रत्यक्ष प्रयोग झाले ते विजयानंद थिएटर-मध्यें ! तीनहि प्रयोग यशस्वी झाले. विशेषतः इंग्रजी नाटिकेंतील मिस् कॅबिनेटमेकर ह्या मुलीचें काम मला फार आवडलें. नाट्यप्रयोग बसविण्याचे परिश्रम घेतल्याबद्दल श्री. काळे व मी–दोघांचे आभार मानण्यांत आले व प्रत्येकाला सुमारें वीस रुपये किंमतीचा चांदीचा एकेक पेला देण्यांत आला. मुलींच्या नाटकाच्या गर्दींत एका मुलीची साठ रुपये किंमतीची सोन्याची अंगठी हरवली. मुलींच्या नाटकाचा प्रयोग असला कीं रंगपटांत जी गर्दी होते ती आवरणें फार कठीण असते. या गर्दींत मुख्यत्वेंकरून बेसावध मुलींना रंगतांना अथवा रंगलेल्या पहायलाच अधिकजण असतात. नाटकांत काम करणाऱ्या मुली स्टेजवर पहावयाला मिळणारच आहेत असें असूनहि त्या सार्वजनिक दर्शनावर समाधान न मानणारे कांहीं हरीचे लाल असतातच !

मराठा हायस्कूलच्या 'करीन ती पूर्व' ह्या नाटकाच्या तालमी घेत असतांना मला आलेले कांहीं हृद्य अनुभव ह्यापूर्वी मी नमूद केले आहेत. त्या नाटकाचा प्रयोग विजयानद थिएटरमध्यें दुपारीं झाला. बार उडवून शिवाजीचा प्रवेश केला. प्रेक्षकांनीं टाळ्या दिल्या. त्यांना तो प्रयोग आवडला.

त्या दोन महिन्यांत मला आवाजाची दमछाकी खूपच करावी लागली. विशेषतः ऐतिहासिक नाटकांतील उतारे म्हणायला फार चांगले. विद्यार्थ्यांना तालीम देतांना माझा आवाज लागे आणि आवाजाच्या त्या धुंदींत मी माझे श्रम विसरत असे. ऐकणारे विद्यार्थी त्या आवाजानें दडपून जात आणि म्हणत, ' सर, हें नाहीं आम्हांला जमायचें. ' त्यांना मी धीर देत असे आणि माझ्या आवाजांत आवाज मिळवून शब्दांचे आरोह–अवरोह उच्चारण्यास सांगत असे. आवाज तयार करण्याचें शिक्षण देऊन मग नाटकाच्या तालमी घेणें एवढी सवड कोठल्याच शाळेला नसे. किंबहुना गॅदरिंगचें नाटक बसविणारा शिक्षक मुलांना नाटक करायला लावतों हा त्याचा घोर अपराध असें समजणारेहि महाभाग आहेत.

मला नाटकाची हौस म्हणून मी माझ्या शाळेचीं व गांवांतील इतर शाळांचीं गॅदरिंगचीं नाटकें बसवीत असे. इतर कुणीहि शिक्षक मग तिकडे फिरकावयाचा नाहीं. एक दिवस केव्हांतरी मुख्याध्यापकांचा निरोप येतो: "आज आम्ही तालीम पहायला येणार आहोंत." निरोपाप्रमाणें ते येतीलच असें नाहीं. आले तर त्यांचे चार बगलबच्चे शिक्षक बरोबर घेऊन. मुख्याध्यापक म्हणजे सर्वज्ञ! तालीम सुरू झाली कीं अगदीं फालतू सूचना द्यायच्या आणि आपल्या बगलबच्चांकडे अशा रीतीनें पहावयाचें कीं बिचारा तालीम घेणारा शिक्षक पाण्यांत टाकलेल्या ढेकळाप्रमाणें विरघळून जावा. मी गणेशोत्सवांत व्याख्यानासाठीं बाहेरगांवीं जाई त्यावेळीं त्या गांवांतील शाळेच्या तालीममास्तराची चौकशी करी. बिचारा भीत भीत आपल्या तक्रारी सांगे. त्या ऐकून मनाला विषाद वाटे.

मराठा हायस्कूलचें नाटक झालें आणि दुसऱ्या दिवशीं मराठा डॉबोग वर शाळेचा वार्षिक बक्षिस-समारंभ झाला. मुंबईचे पोलिस कमिशनर श्री. एन्. एम्. कामटे ह्यांच्या हस्तें मला एक चांदीचा पेला देण्यांत आला. आमची दोघांची भेट म्हणजे एक नाट्यपूर्ण प्रसंग झाला. नाशिक हायस्कूलमध्यें श्री. कामटे व मी सहाध्यायी होतों. त्यांनीं ती ओळख लक्षांत ठेवली होती. मराठा समाजाचे पुष्कळ लोक, कार्यकर्ते त्या समारंभासाठीं जिल्ह्यांतून आले होते रावसाहेब थोरात, काकासाहेब वाघ, अण्णासाहेब दौंडकर इत्यादि प्रमुख कार्यकर्ते दिसत होते. माझ्या एका विद्यार्थ्याच्या आग्रहानें मी त्या समारंभाला गेलों.

जानेवारी महिन्यांत नवें वर्ष सुरू झालें. सेवासदनचे नवे संचालक श्री. कुमठेकर मजकडे आले. सेवासदनच्या मदतीसाठीं एक नाट्यप्रयोग करावयाचा आहे अशी प्रस्तावना करून त्यांनीं मला निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें त्यांच्या शाळेंत जाऊन नाटकांत काम करणाऱ्या मुलींची चांचणी घेतली. वरेरकरांचें 'स्वयंसेवक' नाटक ठरवून त्याप्रमाणें भूमिकांची योजना केली. जगन्नाथ, मंजुळा, रघूजीराव, बायजाबाई ह्या भूमिकांसाठीं अनुक्रमें वारू घुले, गंगू इनामदार, खोंड आणि गोदू गोखले ह्या मुलींची निवड केली. लहानू ही भूमिका द्वारका इनामदारनें केली. मुलींनींच पुरुषभूमिका करावयाच्या म्हणून त्यांना पुरुषांचे कपडे तालमीच्या वेळीं वापरण्याची संवय

करायला लावली. दोन सव्वादोन महिने मी रोज शाळा सुटल्यावर सेवासदनमध्यें जात असे व नाटकाच्या तालमी घेत असे. तुरुंगातलें जगन्नाथाचें स्वगत सांगतांना मला विशेष हुरूप वाटे. अभिनयाला, आवाजाच्या आरोह–अवरोहाला त्यांत भरपूर वाव आहे. माझ्या आवाजांत तें स्वगत म्हणतांना मला खूप आनंद वाटे. जगन्नाथाचें काम करणारी मुलगीहि समाधानकारक साथ देई. मंजुळेचें काम करणाऱ्या मुलीचा आवाज अत्यंत लवचिक होता. त्या मुलीला तें काम पुष्कळ परिश्रम घेऊन मी शिकविलें. दीड पद रचून मी तें बसवून घेतलें. नाटकाचा प्रयोग परिणामकारक व्हावा म्हणून मी मनानें आणि शरीरानें थकेपर्यंत श्रम केले. विजयानंद थिएटरमध्यें प्रयोग सुरू झाला आणि कांहीं वेळानें प्रेक्षकांचा गोंगाट सुरू झाला. मला प्रेक्षकांचें तें वागणें मान्य नव्हतें. मुलींचे आवाज ऐकू येत नाहींत म्हणून गोंगाट आणि गोंगाट म्हणून आवाज ऐकूं यावयाचे नाहींत. असें दुष्ट चक्र निर्माण होत होतें. मध्येंच मी स्टेजवर जाऊन उभा राहिलों व प्रेक्षकांची यथास्थित हजेरी घेतली. त्या भाषणाचा अनुकूल परिणाम झाला व नंतरचें नाटक अतिशय रंगलें. विशेषत: लहानू, जगन्नाथ, मंजुळा आणि रघोजी ह्या भूमिका प्रेक्षकांना फार आवडल्या.

गोविंदराव सोळुस्कर, प्रभाकर महाबळ, देशपांडे, बाबूराव तासकर, वसंतराव रहाळकर, पटवर्धन इत्यादींनीं प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं मला खूप साहाय्य केलें. एक यशस्वी प्रयोग केल्याचा आनंद त्या सर्व मुलींना झाला लहानूची भूमिका करणाऱ्या मुलीचें काम पाहून एक मेळेवाले मला म्हणाले, "आमच्या मेळ्यासाठीं ही मुलगी मिळेल का ?" मी कांहीं उत्तर दिलें नाहीं. एकच गोष्ट माझ्या लक्षांत आली कीं जोड्यावर लक्ष ठवणारे चांभार ठिकठिकाणीं असतात. मी त्या मुलींना त्यांच्या यशाबद्दल धन्यवाद दिले. त्यांनींहि माझे आभार मानले.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ........................ वि: ..........
क्रमांक ........................ नों: दि: ..........

लेखांक एकतिसावा

# गत नाटककार – स्मृतिदिन

'स्वयंसेवक' नाटकाच्या तालमी चालू होत्या त्या गर्दीतच आमच्या महाराष्ट्र नाट्य मंदिराचा वार्षिक दिन साजरा झाला. त्या सभेंत एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'महाराष्ट्र नाट्य विद्यालया'बद्दलचा ठराव मंजूर झाला व प्रचारक म्हणून माझी निवड करण्यांत आली. मला लागणारा प्रवासखर्च देण्याची व्यवस्था मंदिरानें करावी असें ठरलें.

'गत नाटककार–स्मृतिदिन' हा कार्यक्रम गडकरी पुण्यतिथीला येथील विजयानंद नाटकगृहांत भोंसला मिलिटरी स्कूलचे प्रिन्सिपॉल श्री. कायंदे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र नाट्य मंदिरानें साजरा केला. 'स्वयंसेवक' ह्या नाटकाच्या तालमी चालू असतांनाच ह्या कार्यक्रमाची जुळवाजुळव करावी लागली. हॅम्लेट ह्या नाटकांतील 'भुताचा प्रवेश' करावा असें ठरलें. त्या प्रवेशाला मी एक प्रास्ताविक संवाद लिहून जोडला. हॅम्लेटची भूमिका मला करावयाची होती व श्री. काळे भुताची भूमिका करीत होते. मच्छरदाणीच्या कापडाचा डोक्यापासून पायापर्यंत एक सैल झगा शिवून तो भुताला घालायला देऊन 'भूत' हा भास निर्माण केला. तो प्रवेश झाल्या-नंतर मी 'सत्याग्रही' हें जीवनचित्र करून दाखविलें. प्रि. कायंदे कार्यक्रमाचा समारोप करतांना धन्यवाद देऊन म्हणाले, "हे नट समाजांत क्रांति करतील."

प्रि. कायंदे ह्यांचा परिचय झाला त्याचा परिणाम म्हणजे एक दिवस मला 'सत्याग्रही' हा कार्यक्रम भोंसला मिलटरी स्कूलवर जाऊन तेथील

शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांच्यापुढें करून दाखवावा लागला. स्वतः डॉ. मुंजे त्या कार्यक्रमाला हजर होते. 'मुलांना तुमचा कार्यक्रम आवडला' ह्या शब्दांत त्यांनीं स्वतःचें मत व्यक्त केलें. श्री. ओगले–तेथील एक शिक्षक–ह्यांनीं मोजक्या शब्दांत त्या कार्यक्रमाची स्तुति केली.

प्रा. भा. ल. पाटणकर ह्यांच्याकडून एक चिठ्ठी आली. मुंबईहून गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेजच्या साठसत्तर विद्यार्थी–विद्यार्थिनी कांहीं प्राध्यापकांसह सहलीसाठीं नाशिकला आल्या होत्या. शरणपूर रस्त्यावर डॉ. पुरंदरे ह्यांच्या बंगल्यावर ते उतरले असून त्यांना कांहीं करमणुकीचा कार्यक्रम पाहिजे होता. श्री. सोपानदेव चौधरी, मी व श्री. भट ह्यांनीं तो कार्यक्रम द्यावा अशी विनंती पाटणकरांनीं त्या चिठ्ठींत केली होती. मी होकार दिला आणि कार्यक्रमाच्या तयारीला लागलों. प्रथम सोपानदेवांचें काव्यगायन झालें. वैद्यकीय व्यवसाय शिकणाऱ्या त्या विद्यार्थ्यांसमोर फ्रॉईडची ती मनोविश्लेषणात्मक गोष्ट मी करून दाखविली. 'सवाई माधवरावांचा मृत्यु' ह्या नाटकांतील दोन स्वगतें वाचून दाखविलीं. कार्यक्रम संपला.

डॉ. पुरंदरे थोरले ह्यांनीं जें आभाराचें भाषण केलें तें मी कधींच विसरणार नाहीं. त्यांच्या त्या काळसर चेहऱ्यावर जें समाधान दिसत होतें तें विलक्षण होतें. डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळत असतांना म्हाताऱ्यानें आमचे आभार मानले. मराठी रंगभूमीवरचें उत्कृष्ट नाट्य ज्यानें रसिकपणें पाहिलें आहे असा एक थोर सर्जन ते आभार मानीत होता. त्यांना रोज पहाणाऱ्या त्यांच्या विद्यार्थ्यांनाहि आपल्या गुरूचें तें 'दर्शन' अपूर्व होतें. डॉ. मोडक–भालेरावांचे स्नेही–मला ओळखीत होते. सर्वच तरुण डॉक्टरांनीं माझी पाठ थोपटली. त्या लहानशा जागेंत झालेल्या कार्यक्रमाचे पडसाद गांवांत उमटले. माझे मामा शिंदीकर जहागीरदार ह्यांनीं मला बोलावणं पाठविलें. त्यांना जें ऐकायला मिळाले त्यामुळें त्यांना विशेष आनंद वाटला. 'वामन, आपल्याला तुझा कार्यक्रम पहावयाचा आहे' असें ते म्हणाले. वाटेंत श्री. त्रिंबकराव वाड भेटले. त्यांचे जामात डॉ. म्हसकर ह्यांनीं जें त्यांना सांगितलें तेंच त्यांनीं मला ऐकविलें. दुपारीं श्री. सोपानदेव आले. त्यांनीं प्रांजलपणें माझ्या कार्यक्रमाबद्दल चांगला अभिप्राय दिला व असे जोड कार्यक्रम आपण साऱ्या महाराष्ट्रांत करूं असें ते म्हणाले. मला स्वतःला तो कार्यक्रम करतांना शारीरिक

आणि मानसिक श्रम कमालीचे घडत. अर्धा पाऊणतास मन आणि शरीर शिस्तींत ठेवणें ही गोष्ट सोपी नाहीं. कार्यक्रम पाहणारे प्रेक्षक फक्त सहसंवेदनेला जबाबदार असतात. चांगली डावपेंचाची कुस्ती खेळून विश्रांति घेणाऱ्या पहिलवानाला जो आनंद होतो तसाच कांहींसा आनंद कार्यक्रमानंतर मला मिळत असे. त्या कार्यक्रमाचे श्रम जाणवत. पण यातना होत नसत. कार्यक्रम आपल्या मनासारखा झाला तर मन धुंद होई आणि दिवसचे दिवस त्या धुंदींत जात.

महाराष्ट्र नाट्य मंदिर, महाराष्ट्र नाट्य विद्यालय आणि महाराष्ट्र नाट्य परिषद ह्या एकाच कल्पनेंच्या विकासाच्या तीन पायऱ्या आहेत. एक स्थानिक, दुसरें अभ्याससाधन, तर तिसऱ्याची व्याप्ति महाराष्ट्रभर! नाट्यविषयक कल्पनांचा प्रसार करणें व त्या कल्पना जनतेंत मुरविणें ह्यांसाठीं लागणारा स्वाधीन वेळ आणि पैसा ह्यांची अनुकूलता नसल्यामुळें आमचे मनोरथ मनांतच संचार करीत. तें मानसिक चिंतन व्यर्थ गेलें असें म्हणतां येणार नाहीं. नाटकाच्या नादानें मला ती एक संवयच लागली. दिवसचे दिवस माझें मन एखाद्या कल्पनेभोंवतीं सारखे फिरत राही. कांहीं कल्पना इतक्या विलक्षण असत कीं रात्रीं झोपेंतुन जागा होऊन मी त्या कल्पनेमागें धांवत असे.

'नटाची डायरी' ह्या रंगभूमिविषयक लेखनाची कल्पना अशाच एका चिंतनांतून निर्माण झाली. मराठी रंगभूमीचा इतिहास रंजनात्मक पद्धतीनें लिहावा आणि त्यांतून मराठी रंगभूमीच्या पुनर्रचनेच्या कांहीं कल्पना सुचवाव्यात अशी माझी योजना होती. त्यासाठीं मी दोन प्रातिनिधिक नट – एक नाटक मंडळयांच्या जुन्या वातावरणांत मुरलेला आणि दुसरा नवीन कल्पना घेऊन त्या वातावरणांत शिरलेला – कल्पिले. 'एका सुशिक्षित नटाचें पदार्पण' असें एक प्रकरण मी लिहिलें व 'नाटक' ह्या मासिकांत तें छापलेंहि गेलें.

'विनायकराव' जुन्या नटांचे प्रतिनिधि आणि 'माधवराव' एक सुशिक्षित नट अशा दोन व्यक्ति कल्पितांना गणपतराव भागवत ह्यांच्या आख्यायिका मजसमोर होत्या. एका वर्गांत 'दोन ग्रहणें' हा पाठ एक विद्यार्थी शिक्षक घेत होते व मी निरीक्षक होतों. तो पाठ पाहतां पाहतां

'माधवराव' ह्या नटाचा शेवट कसा व्हावा ह्यासंबंधीच्या कल्पना माझ्या मनांत इतक्या वेगानें उसळूं लागल्या कीं पाठाकडे माझें लक्ष लागेना. विनायकराव माधवरावांने एकनिष्ठ भक्त बनतात. अनेक प्रयत्न करूनहि माधवरावांना जेव्हां असें आढळून येतें कीं मराठी नाटक मंडळ्या सुधारत नाहींत तेव्हां ते एक लोकविलक्षण निर्णय घेतात. त्या निर्णयाचें साम्य ज्ञानेश्वरांनीं घेतलेल्या 'जिवंत समाधी'च्या निर्णयाशीं असतें. कुठल्या एका दाट अरण्यांत माधवराव विनायकरावांना घेऊन जातात. तेथें एक खूप मोठें सरोवर आणि त्याला एका बाजूनें बांधलेला घाट असतात. माधवराव घाटाच्या पायऱ्या उतरून कमरेइतक्या पाण्यांत उभे राहतात. इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटतो. आकाश काळ्याकुट्ट मेघांनीं भरून जाते आणि सरोवराच्या लाटा भरतीच्या सागरी लाटांप्रमाणें उसळूं लागतात. विनायकराव सरोवराच्या कांठाशीं मूढ स्थितींत उभे राहून तें सर्व रुद्र स्वरूप पहात असतात. माधवराव मुखानें कांहीं मंत्र म्हणत असतानांच लाटा उसळूं लागतात आणि त्या लाटांत माधवराव शांतपणें 'जलसमाधी' घेतात. बिचारे विनायकराव कांठावर उभे राहून आक्रोश करूं लागतात.

माझ्या चर्मचक्षूंसमोर तो पाठ चालू होता आणि माझ्या मनांत तें वादळ घोंघावत होतें. पाठ सोडून घरीं जावे आणि तें सारें लिहून काढावे अशी ऊर्मि उसळे. पण मला लिहिण्यासाठीं घरीं जाऊं द्या अशी विनंती कशी करावयाची ह्या शंकेनें तसाच बसून राहिलों.

माधवराव ह्या सुशिक्षित नटाचा तो काल्पनिक सहवास मला अतिशय उद्बोधक झाला. व्यवसायी नट होण्याची संधि मला माझ्या आयुष्यांत मिळाली नाहीं. ती यक्षभूमि अप्राप्य असली तरी माझें उतावीळ मन अशा रीतीनें त्या भूमींत अनिरुद्ध कल्पना संचार करीत असे आणि काल्पनिक सुखांत दंग होत असे. 'एका मराठी नटाची डायरी' ह्या नांवाखालीं मी शेंदीडशें पानें लिहिलीं. त्यांतलीं कांहीं प्रकरणें मला आवडतात आणि त्यांची रचना माझ्या हातून झाली कशी असा प्रश्न पडतो. आज ते लिहिलेले कागद कुठेंतरी काळोखांत धूळ खात पडले आहेत. प्रथम मला ह्याबद्दल विषाद वाटत असे. परंतु आतां मन मुर्दाड झालें आहे आणि त्याबद्दलच्या संवेदना बधिर झाल्या आहेत!

● ● ●

लेखांक बत्तीसावा

# गणेशोत्सवांतील — कार्यक्रम

And the show must go on ! एका इंग्रजी नटाचे हे उद्गार कॉलेजच्या 'सत्तेचे गुलाम' ह्या नाटकाचें दिग्दर्शन करतांना मला अनुभवावे लागले. गॅदरिंगसाठीं कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं ह्या नाटकाची निवड केली. श्री. काळे ह्यांनीं विद्यार्थी निवडले. नंतर सवड नाहीं म्हणून नाटक बसवायला नकार दिला. १९३८ च्या डिसेंबरचे ऐन थंडीचे दिवस. रात्रीं ९ ते ११ तालमी घ्यावयाच्या. थंडीसाठीं जाड पांघरूण लपेटून मी तालमीला जात असे. त्यावेळच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मी तालमी घेत असे. कॉलेजच्या मुलींचेंहि नाटक बसवा म्हणून मला सांगण्यांत आलें. मी तो ताण मला सहन होणार नाहीं म्हणून नकार दिला.

एक संपूर्ण वाचन झालें. मुलांकडून एकदां नकला म्हणवून घेतल्या. सगळें सुरळीत चाललें. एक दिवस कळलें कीं प्रो. कापडी आजारी झाले आहेत. आजाराचें स्वरूप भयंकर होतें. घटसर्पासारखा आजार. प्रत्येकाला प्रा. कापडी ह्यांच्याबद्दल सहानुभूति वाटे. त्याचें कारण त्यांचा अतिशय शालीन स्वभाव आणि त्यांची विद्वत्ता. दोनतीन दिवसांतच तो तरुण गृहस्थ त्या रोगाच्या भक्ष्यस्थानीं पडला. कॉलेजनें गॅदरिंग बंद केलें. नाटकाच्या तालमी थांबल्या. मी स्वस्थ बसलों.

एक दिवस दुपारीं त्या नाटकांतील कांहीं मुलें माझ्याकडे आलीं आणि नाटकाच्या तालमी घ्याल का म्हणून विचारूं लागलीं. मला त्यांचें म्हणणें

प्रशस्त वाटेना. त्या मुलींनीं मला सांगितलें, आम्ही सर्व विचार करून आलों आहोंत. प्रा. कापडी ह्यांच्या कुटुंबियांच्या मदतीसाठींच हा प्रयोग करावयाचा आहे. तें ऐकून मी संमति दिली. नाटकाच्या तालमी पुन्हां सुरू झाल्या. नाटक बसवितांना मी आळस केला नाहीं. प्रयोग बरा झाला. खर्चवेंच वजा जातां रुपये १००० प्रो. कापडीयांच्या कुटुंबियांना देण्यांत आले. एका प्राध्यापकाच्या कुटुंबाची अशी विपन्न स्थिति असावी ह्याचा खेद वाटला. कॉलेजनें कापडीयांचा ग्रंथसंग्रह विकत घेतला. शेक्सपियरचा विशेष अभ्यासक म्हणून कापडीयांचा लौकिक होता. त्यांचा धाकटा भाऊ आमच्या शाळेंत होता. सामान्य परिचय ह्यापेक्षां प्रा. कापडींशीं माझा फारसा संबंध आला नाहीं.

नाटकाचा प्रयोग झाल्यानंतर मी त्यांत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना घरीं बोलावले. महाराष्ट्र नाट्य मंदिराला शक्य तें साहाय्य करण्याची त्यांना विनंती केली. त्या विद्यार्थ्यांनीं माझें म्हणणें ऐकून शक्य तें साहाय्य करण्याचें आश्वासन दिलें.

१९३८ च्या गणेशोत्सवांत मी भरपूर कार्यक्रम केले. त्यांत कांहीं व्याख्यानें, कांहीं नाट्यदर्शनाचे कार्यक्रम होते. ' माडाचें पोर ' ही श्री. वरेरकरांची पाठ्यपुस्तकांतील गोष्ट मी नाट्यरूपानें करून दाखविली. मायनाक भंडाऱ्याच्या वंशांतील भंडाऱ्याला उपरति होते व तो दारु तयार करण्याचा धंदा सोडून देतो. माडाची पोय कापणें म्हणजे स्वतःच्या मुलाचा गळा कापणें ही कल्पना करुणरसाला पोषक होती. 'माझ्या मनांत आज देव उभा राहिला' हें वाक्य आणि देवानें दाखविलेलें अफाट अनंत विश्व ह्यांत नाट्याचा आविष्कार करायला भरपूर जागा होती.

शाळा सुटल्यानंतर भंडाऱ्याचा पोषाख मिळवायचा म्हणून मी पुष्कळ हिंडलों. शेवटीं गोपाळराव खरे ह्यांच्याकडे मला पाहिजे तशी हाफ पँट मिळाली. सरळ रुंद पात्याचा कोयताहि तेथेंच मिळाला. डोक्याला हिरवा मफलर बांधून भंडारी सजला. ७००–८०० विद्यार्थी आणि २००–३०० स्त्रिया असा मोठा समुदाय शाळेंत जमला होता. कार्यक्रम परिणामकारक झाला—यशस्वी झाला. भाषण आयत्या वेळीं जुळवलेलें होतें. रात्रीं घरीं परत येत असतांना दत्तोपंत पुरोहित आणि रामभाऊ अध्यापक दोघांनीं माझी खूप स्तुति केली. मी ज्यांना मनानें गुरु मानीत होतों त्यांनीं माझ्या गुणांचा

गौरव करावा ह्याबद्दल मला आनंद वाटला तर नवल काय? दत्तोपंतांनीं मला कवितेचे प्राथमिक पाठ दिले, तर रामभाऊंनीं मी कॉलेजमध्यें असतांना मला गणित विषय शिकविला. नाट्य–दर्शनाच्या माझ्या कार्यक्रमाचा शेवट मी हर्ष–शोक मुद्रा करून करीत असे. प्रथम शोक–रडणें आणि नंतर हर्ष–हंसणें असा क्रम असे. शेवटीं एक इंग्रजी वाक्य मी म्हणत असे. you cry and none cries with you. You laugh and the world laughs with you! प्रेक्षकांना नमस्कार करून मी कार्यक्रम संपवीत असे.

गणेशोत्सवाच्या व्याख्यानांतहि मी नाट्याचा भरपूर उपयोग करण्याचा प्रयत्न करीत असे. व्याख्यानाच्या विषयाचें नांव देण्यापासून हें नाट्य असे. जिज्ञासा निर्माण करणें हा व्याख्यानाच्या यशाचा पाया आहे. मुद्यांची मांडणी करतांना व प्रत्यक्ष भाषण करतांना आवाजाची चढउतार करणें, हेतुपूर्ण थांबणें आणि पुन्हा बोलणें सुरू करणें ह्या गोष्टी ठरवून करण्याचा मी प्रयत्न करी. 'सूर्याजीचे दोर' हा विषय ह्या माझ्या प्रयत्नांचें चांगलें उदाहरण आहे. तानाजीच्या मृत्यूनंतर आणीबाणीच्या लढाईंत ८० वर्षांच्या शेलारमामानें प्रथम किल्ला उतरून जाण्याचे दोर कापले आणि मराठी सैन्य प्राणपणानें लढलें. जीवन ही अशीच दोर कापून लढण्याची लढाई आहे हा सिद्धांत मी प्रतिपादन करीत असे. तें व्याख्यानहि चांगलें रंगत असे असा माझा अनुभव आहे.

त्या वर्षीं इगतपुरी येथें व्याख्यानासाठीं जात असतांना एक नाट्यपूर्ण प्रसंग घडला. संध्याकाळच्या गाडीनें मी इगतपुरीला जावयास निघालों. मुंबईला जायला निघालेले डॉ. बापूसाहेब गुप्ते स्टेशनवर मला भेटले. इगतपुरीपर्यंत आम्ही दोघे सहप्रवासी. मी कोठें जात आहे ह्याची त्यांनीं चौकशी केली. त्यानंतर आमचा प्रवास सुरू झाला. गणेशोत्सवाच्या जाग्रणांनीं मला सारखी डुकली येई. संभाषण थांबलें नाहीं. परंतु त्याचा बहुतांश भाग डॉक्टरांच्याकडे होता.

आम्ही नाटकें करतों हें फार चांगलें करतों. नाटकें केलींच पाहिजेत. वैद्यकीय व्यवसाय यशस्वी रीतीनें करणाऱ्या ह्या माणसाला नाटकाची एवढी शिफारस कां हें मला कळेना. शेवटीं त्यांच्याचकडून तें कारण कळलें. "बरं कां मास्तर, कॉलेजमध्यें असतांना मी 'हॅम्लेटचें' काम केलें होतें."

ते उद्गार ऐकून मी त्यांच्याकडे पहातच राहिलों. माझी झोंप उडाली. इगतपुरी स्टेशन आलें आणि मी मोठ्या आदरानें डॉक्टरांना नमस्कार करून खालीं उतरलों. स्टेशनवर मला घ्यायला आलेल्या गृहस्थांबरोबर मी चालूं लागलों. मनांत गणपतराव जोशी आणि बापूसाहेब गुप्ते ही अकारण तुलना चालू झाली.

गणपतरावांच्या त्या दिव्य कलेनें महाराष्ट्रांत सहस्रावधि माणसें प्रभावित झालीं होतीं. ज्यांना संधि मिळाली त्यांनीं गणपतरावांची कुठली तरी भूमिका करून एक विलक्षण समाधान मिळविण्याचा प्रयत्न केला. आज हा प्रसंग लिहितांना मनांत विचार येतात कीं आम्ही किती कृतघ्न आहोंत. गणपतराव जोशी ह्यांचीं कामें पाहिलेली पिढी आज नामशेष होत आहे. गणपतरावांच्या विविध भूमिकांची रसग्रहणात्मक नोंद आमच्यापाशीं नाहीं. आम्हांला ती उणीव कधीं खटकली नाहीं. त्याचे विपरीत परिणाम असे कीं ज्या पिढीच्या हातीं आज नाटकांचा कारभार आहे आणि ज्यांनीं गणपतरावांचीं कामें पाहिलीं नाहींत तीं माणसें गणपतरावांबद्दल—त्यांच्या आवाजाबद्दल बिनदिक्कत विपर्यस्त बेछूट विधानें करतात. त्या विधानांची मजल इथपर्यंत गेली आहे कीं गणपतराव हे एक आरडाओरड करणारे सामान्य नट होते असा समज निर्माण होत आहे. मानसशास्त्रदृष्टया असा समज निर्माण होणें अगदीं स्वाभाविक आहे. कुणाची तरी कुचेष्टा केल्याशिवाय माझी प्रतिष्ठा वाढायची नाहीं हा जनस्वभाव आहे. भरभक्कम काम करून आपल्या प्रतिष्ठेचा पाया घालण्यापेक्षां हा कुचेष्टेचा मार्ग कमी श्रमाचा आणि सोपा आहे. 'भाऊबंदकी' नाटकांतील नमकशास्त्री रामशास्त्री यांचें वर्णन करतांना "अहो, हा पाणक्या-होता पाणक्या"! असे अवहेलनेचे उद्गार काढतो. रानडे, टिळक, आगरकर, गोखले, गांधी ह्या सर्वांना ही कुचेष्टाच सहन करावी लागली. 'जो लोककल्याण साधावया जाण। घेई करीं प्राण त्या सौख्य कैंचे। अपमान, उपहास, कारागृहीं वास हे भोग त्याचे।' ह्या देवलांच्या उद्गारांची यथार्थता पटते!

● ● ●

## लेखांक तेहतीसावा

# प्रेक्षक-संघटना

‘**आ**तां हें मराठी नाटकांचा उद्धार करणार!’ भरपूर चेष्टा, अवहेलना ह्यांचें मिश्रण असलेले ते उद्‌गार मला उद्देशून होते. ते उद्‌गार एका व्यक्तीचे नसून मुंबईंतल्या एक नाटकवाल्या गटाचे होते. ३०:१०:३८ ते ९:११:३८ असे दहा अकरा दिवस दिवाळीच्या सुट्टींत मी मुंबईला जाऊन राहिलों. ‘विश्रांति’ हा वरकरणी उद्देश असला तरी मराठी रंगभूमीच्या दृष्टीनें विशिष्ट विचारांचा प्रचार करावा असा माझा हेतु होता.

मुंबईस डॉ. भालेराव ह्यांच्या घरीं राहून तो हेतु सफल व्हावा म्हणून मी प्रयत्न करायला सुरुवात केली. माझ्या प्रचाराचें मुख्य सूत्र ‘प्रेक्षक संघटना’ हेंच होतें. ह्यालाच मी Family Circle असें संबोधित असे. मराठी रंगभूमीच्या दृष्टीनें मला जो विचार करतां आला त्यांतून मी पुढील सात मुद्दे निश्चित केले :

१) नाटक धंदा सध्यांच्या स्थितींत जोडधंदा म्हणूनच करतां येणें शक्य आहे.

२) ‘वाणी’ हें ज्यांचें ज्यांचें पोट भरण्याचें प्रमुख साधन आहे अशा सर्व होतकरू माणसांनीं या कलेची आवड असल्यास हा जोडधंदा करावा. शिक्षक, वकील, विक्रेते इत्यादिकांचा ह्या वर्गांत समावेश होतो.

३) हा धंदा उन्नतीस यावा असें वाटत असेल तर पुढें मागें त्यासाठीं नाट्यशिक्षण विद्यालय निघालें पाहिजे.

४) ह्या धंद्यांत परकीय आक्रमणाची भीति कमी आहे. कारण परकीयांना ही भाषा अवगत नाहीं. मात्र परकीयांचे नोकर म्हणून आम्ही ह्या धंद्यांत रहावयाचे कीं स्वपराक्रमानें आमचे आम्ही धनी रहावयाचे ह्याचा निर्णय घेतला पाहिजे.

५) ह्या धंद्यासाठीं स्थानिक मंडळें निघालीं पाहिजेत. जोरानें प्रचार-कार्य केलें पाहिजे. स्त्रियांत या कलेविषयीं आवड, अभिमान निर्माण होईल असे प्रयत्न केले पाहिजेत.

६) बोलपटांमुळें सध्यां नाटचगृहांची अडवणुकीची भूमिका लक्षांत घेतां नवीन पद्धतीचीं लहान रंगमंदिरें निर्माण केलीं पाहिजेत. नवीन नाटकें शक्यतोंवर चालू परिस्थितीशीं निगडित असावींत.

७) ठिकठिकाणीं अस्तित्वांत येणाऱ्या मंडळांनीं आपली संघटना केली पाहिजे. जगांत निरनिराळचा भाषा आपापली रंगभूमि समृद्ध करण्यासाठीं काय प्रयत्न करीत आहेत ह्याचा सारखा शोध ठेवून आपल्या परिस्थितीला अनुरूप अशा सुधारणा करण्यासाठीं दक्ष राहिले पाहिजे.

माझ्या ह्या सप्तसूत्रीचा प्रचार मी व्यक्तीपासून सुरू केला. मजबद्दल सहानुभूति असणारे माझे स्नेही श्री. चं. वि. बावडेकर ह्यांना मी ती संथा म्हणून दाखविली. माझें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन ते म्हणाले "तुमचें कार्य अवघड आहे." माझ्या अवघड कार्यांत ते सहभागी झाले. ५–५० माणसें जेथें जमतील अशी एक जागा त्यांनीं मजसाठीं २–४ दिवस हिंडून शोधून काढली.

केळेवाडीच्या कोपऱ्यावर असलेल्या ओरिएन्टल हायस्कूलच्या इमारतींत पांचव्या मजल्यावर एका वर्गांत कार्यक्रम ठरविण्यांत आला. त्याच शाळेंत शेजारच्या एका वर्गांत 'न्याय' या नाटकाची तालीम चालू होती. सुरुवातीला दिलेले सामुदायिक उद्‌गार त्याच हौशी नाटचमंडळाचे. मुंबई हें एक अफाट शहर आहे ह्याची कल्पना प्रत्यक्ष फिरण्यानें येते तशी वाहनांचा वापर करून येत नाहीं. ६–११–३८ ला सायंकाळीं ५ वाजतां कार्यक्रम झाला. राणा भीमदेव, सवाई माधवरावांचा मृत्यु, हॅम्लेट ह्या नाटकांतील स्वगतें वाचून दाखविलीं. 'सत्याग्रही' हें जीवनचित्र केलें. कार्यक्रमाला ५०–६० लोक होते. श्री. जोगळेकर नांवाचे वृद्ध वकील त्यांत होते. त्यांनीं

स्वयंस्फूर्त भाषण करून गणपतराव जोशांची परंपरा चालविण्याचें श्रेय मला दिलें. तो एक योगायोग होता. माझी आवाजाची तयारी आणि मुद्राभिनय ह्यांचा तो परिणाम होता. पाठारे प्रभूंचा नाटक करणारांचा एक क्लब त्यावेळीं मुंबईंत होता. श्री. हिरामण देसाई, त्या क्लबाचे संचालक ह्यांनीं माझे आभार मानले. श्री. पी. बी. कुलकर्णी–नाथमाधवांचे चरित्र-लेखक ह्यांनीं निरनिराळ्या शाळांतून प्रचार करण्याच्या कामीं आपण साहाय्य करूं असें आश्वासन दिलें. श्री. बावडेकरांनीं खूपच परिश्रम घेतले. त्यांनीं मला सांगितलें कीं माझा चेहरा वीर व करुणरसांना अनुकूल आहे. श्री. मोकाशी – डॉ. भालेरावांचे कंपौंडर– त्या कार्यक्रमामुळें माझे एक साहाय्यक बनले. त्यांनीं मला सल्ला दिला कीं डॉक्टरांना तुम्ही यांत ओढा. आणखी एकदोघांचें तसेंच मत कळलें. डॉ. भालेराव–ह्यांना मी विनंती केली. आपल्या व्यवसायामुळें ह्यांत भाग घ्यायला आपल्याला वेळ नाहीं. असें त्यांनीं सांगितलें. श्री. केशवराव दाते ह्यांची भेट घेण्याचा मी प्रयत्न केला. परंतु ते पुण्यास गेल्यामुळें भेट झाली नाहीं. मी आणखी दोनतीन दिवस मुंबईंत राहून घरीं परतलों. वृत्तपत्रांतून माझ्या कार्यक्रमाची प्रसिद्धि येऊन गेली होती. नाशिकच्या माझ्या स्नेह्यांनीं व परिचितांनीं मला सांगितलें कीं तुमचें नांव वर्तमानपत्रांत आलें आहे.

त्याच वर्षीच्या दिवाळींत निघालेल्या ‘मौज’ साप्ताहिकाच्या दिवाळी अंकांत माझा एक लेख प्रसिद्ध झाला. “एका नटश्रेष्ठास अनावृत्त पत्र” ह्या माझ्या लेखांत एका श्रेष्ठ नटाच्या नैतिक अध:पाताची चर्चा मी केली. ती चर्चा करतांना मला मुख्यत: माझा कलाविषयक दृष्टिकोण मांडावयाचा होता. रंगभूमि हें मंदिर मानलें तर त्या मंदिराच्या उपासकानें आपली नीति उच्च दर्जाची ठेवली पाहिजे. त्या लेखानेंहि मला बरीच प्रसिद्धि मिळवून दिली. त्यांतील माझी हार्दिकता अनेकांना जाणवली.

श्री. जोगळेकर वकील ह्यांची मी मुलाखत घेतली. शिक्कानगरमध्यें त्यांचें बिऱ्हाड होतें. त्यांचीं मुलें नाटकांत हौसेनें काम करीत. श्री. जोगळेकर गणपतराव जोशांचे स्नेही व त्यांच्याबरोबर ते नाटकमंडळींत कांहीं दिवस राहिलेले. ‘हॅम्लेट’ ह्या नाटकाची २॥ ते ३ तासांची एक रंगावृत्ति तयार करतां येईल व तो प्रयोग गणपतराव करीत तसा होईल असें त्यांनीं

सुचविलें. श्री. हुदलीकर नांवाचे एक गृहस्थ मुंबईंत आहेत. ते हुबेहूब गणपतरावासारखें काम करतात. मला त्या गृहस्थांची भेट घेण्याची इच्छा होती. परंतु तें जमलें नाहीं.

'नटाची डायरी' हें माझें लिखाण मी बावडेकरांना दाखविलें. त्यांनीं तें वाचून डायरी पुरी करा–मराठी रंगभूमीचा उत्कर्ष व अपकर्ष ह्यांचा इतिहास लिहा असें प्रोत्साहन मला दिलें. त्या ७–८ दिवसांत बावडेकर व मी अधिकच एकमेकांजवळ आलों. त्यांचा मजवरचा अकृत्रिम लोभ हा माझा वैयक्तिक लाभ होय ! मराठी नाटकाच्या छंदानें मला हें स्नेहनिधान मिळवून दिलें.

जो विचार घेऊन मी मुंबईस गेलों तो माझा विचार मुंबईहून परतल्यानंतर अधिकच पक्का झाला. मराठी रंगभूमि आणि मराठी कुटुंबसंस्था ह्यांचा अविभाज्य ऋणानुबंध जुळविल्याशिवाय मराठी रंगभूमीचा विपत्काल टळणार नाहीं असा विचार बळावत चालला. मराठी नाटकांतून पुरुषनटांनीं केलेल्या स्त्रीभूमिका पाहून प्रेक्षकांचीं मनें विकृत झालीं होतीं. कला म्हणून त्या भूमिकेचा कितीहि गौरव केला तरी त्या भूमिकेंतील Reality कधींच पटली नाहीं. 'एकच प्याला' ह्या नाटकांतील सिंधूची भूमिका करतांना बालगंधर्व प्रेक्षकांना करुणरसांत बुडवून काढीत. परंतु एका पुरुषाची ही भूमिका आहे हा ग्रह नाहींसा होत नसे. कुलीन स्त्रीनें नाटकांत भूमिका करावयाची तर आवश्यक ती सुरक्षिततेची हमी तिला मिळणें आवश्यक आहे. त्यासाठीं नाटकांचे प्रयोग एका निर्दोष वातावरणांत झाले पाहिजेत. Family Circle –प्रतिष्ठित कुटुंबांतील स्त्रीपुरुषांच्या समोर प्रयोग करणें हाच या साठीं हमखास उपाय आहे अशी माझी मनोमन खात्री झाली.

मी मुंबईंत असतांना अनेकदां माझ्या कल्पनांना प्रकट व अप्रकट उजळणी दिली. ज्या काळांत मराठी माणसांना नाटकाशिवाय अन्य प्रतिष्ठित करमणुकीचें साधन नव्हतें त्या काळांत प्रेक्षकांनीं नाटकप्रयोगांना गर्दी केली. ज्या गांवीं हीं नाटकें होत तेथें मोठीं व सुसज्ज रंगमंदिरें महाराष्ट्रांत नव्हतीं. मुंबईचें बालीवाला थिएटर सोडलें तर ग्रँटरोडवरच्या सर्वच नाटयगृहांत सात आठशें पेक्षां अधिक प्रेक्षक मावणें शक्य नव्हतें. टिळक फंडासाठीं झालेल्या संयुक्त मानापमान ह्या प्रयोगाला दोन हजारपेक्षां अधिक प्रेक्षक

बालीवाला थिएटरमध्यें मावले असतील असें वाटत नाहीं. मुंबईचीं नाटयगृहें ज्या वस्तींत बांधलीं गेलीं आहेत तो ग्रँट रोड वेश्याव्यवसायाचें अग्रस्थान. अशा वस्तींत कुलीन स्त्रियांनीं नाटक पहायला जाणेंच जेथें धोक्याचें तेथें त्या वस्तींतल्या नाटकगृहांत कुलीन स्त्री भूमिका करण्याची कल्पना तरी कशी करूं शकणार ?

नाटयकलेचा सात्विक आनंद मिळावा असें वाटत असेल तर ज्या वातावरणांत तो आनंद निर्माण व्हावयाचा तें वातावरण त्या सात्त्विक आनंदाला पोषक असेल तरच तो आनंद निर्माण होईल. परंतु ह्या तात्त्विक विचाराला प्रत्यक्ष तसे प्रयोग केल्याशिवाय कांहींच अर्थ नाहीं. मुंबईसारख्या प्रसिद्धीचीं प्रचंड साधनें असलेल्या शहरांत जर हा प्रयोग केला गेला तर इतर गांवें त्या प्रयोगाचें अनुकरण करतील. गांवोगांवीं प्रेक्षकवर्ग संघटित होतील आणि त्या प्रचंड संघटनेच्या सामर्थ्यानेंच मराठी रंगभूमीवरचा अंधार उजळून निघेल आणि मराठी रंगभूमीच्या उन्नतीचा मार्ग त्या प्रकाशांत दिसेल !

• • •

लेखांक बत्तीसावा

# नाट्य-संमेलनाला निमंत्रण

**ना**गपूर ! भूगोलांत वाचलेल्या त्या नांवाला जानेवारी १९३९ मध्यें झालेल्या 'महाराष्ट्र नाटच-संमेलनाच्या' अधिवेशनानें विशेष अर्थ आला. ह्याच नागपूरच्या राजे लक्ष्मण राजे भोसले ह्यांनीं महाराष्ट्र नाटच-मंदिराच्या 'माईसाहेब' ह्या पहिल्या प्रयोगाला उपस्थित राहून आम्हांला हुरूप आणला होता. नाशिकला स्थापन झालेल्या भोंसला मिलिटरी स्कूल ह्या विद्यालयानें व तेथील कार्यकर्त्यांनीं कांहीं ऋणानुबंध निर्माण केला होता. त्याच नागपूरहून प्रा. श्री. ना. बनहट्टी ह्यांनीं पुढील अधिवेशनाचें निमंत्रण नाशिकनें द्यावें अशी इच्छा आपल्या एका पत्रानें अधिवेशनापूर्वी व्यक्त केली होती. त्या पत्रानें आमचीं मनें उंच उंच भराऱ्या मारूं लागलीं. नाशिकपुरतें मर्यादित असणारें आमचें कार्य आतां विस्तारणार ह्या कल्पनेनें आम्हांला आनंद वाटला. दहा वर्षांच्या आंत एका संस्थेला अशी प्रतिष्ठा लाभावी हा केवळ योगायोग नव्हता. मंदिरानें निमंत्रण देण्याचें ठरविलें आणि बाळासाहेब कानिटकरांना निमंत्रक म्हणून नियुक्त केलें. कारण कानिटकरांना नागपूर सुपरिचित—ते तेथें राहिलेले आणि तेथील कार्यकर्त्यांशीं त्यांचा दृढ परिचय !

नागपूरला जाणार होते कानिटकर पण हुरहूर मात्र माझ्या मनाला. मी मनानें तो सारा प्रवास केला. कानिटकर अधिवेशनांत निमंत्रणाचें भाषण करीत आहेत आणि त्यांच्या भाषणाला टाळ्या मिळून निमंत्रणाचा स्वीकार

होत आहे हेंहि मी मनानें ऐकत होतों. कानिटकर परत आले आणि आपलें निमंत्रण स्वीकारलें गेलें असें त्यांनीं सांगितलें. नागपूर नाट्यविषयक चळवळीचें केंद्र व्हावें अशी तेथील कार्यकर्त्यांची इच्छा आहे व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू आहेत. नाट्यतपस्वी श्री. त्र्यंबक सीताराम कारखानीस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं तें संमेलन भरलें. नागपूरला त्या क्षेत्रांत कार्यकर्ते फारच थोडे आहेत. हें सर्व बोलणें झालें. माझ्या सर्व मानसिक आणि शारीरिक शक्तींना जणू तें आव्हान आहे हें ओळखून मी पवित्र्यांत उभा राहिलों. आतां वर्षभर –तें अधिवेशन होईपर्यंत– मला सतत कामच करीत रहावयाचें आहे ह्या दृष्टीनें मी काम करूं लागलों.

नाटकाचा प्रयोग करावयाचा म्हणजे प्रत्येकवेळीं कांहींतरी अडचण यावयाची, मी गोंधळून जावयाचों आणि अकल्पितपणें ती अडचण दूर होऊन प्रयोग पार पडावयाचा असा माझा आतांपर्यंतचा अनुभव आहे. त्या तीन महिन्यांत म्हणजे ५।२।३९ पासून ९।४।३९ पर्यंत चार नाट्य-प्रयोगांत मला शरीरानें व मनानें परिश्रम करावे लागले. ५।२।३९ ला 'सोन्याचा कळस' ह्या नाटकाचा प्रयोग विजयानंद थिएटरमध्यें दुपारीं केला. त्याच्या आधीं चारच दिवस Monkey's Paw ह्या इंग्रजी नाटिकेचा प्रयोग शाळेच्या विद्यार्थ्यांनीं सर्कल थिएटरमध्यें केला. एक इंग्रज अधिकारी त्या प्रयोगाला आले होते. आमच्या आंग्लभाषाप्रेमाबद्दल त्यांनीं आमची पाठ थोपटली. राज्यकर्त्यांची भाषा–तिचा हा गौरव ! आमच्या मराठी नाटकाचें कौतुक कोण करणार ? इंग्रजी नाटिकेच्या प्रयोगासाठीं सर्वजण राबत होते–प्रयोग उत्तम झालाच पाहिजे म्हणून अट्टाहास करीत होते. विद्यार्थ्यांनीं प्रयोग समाधानकारक केला. 'सोन्याचा कळस' या नाटकाचा प्रयोग कसा होणार ह्या चिंतेंत मी चूर होतों. नाटकाच्या दिवशीं सकाळीं नाटककार श्री. वरेरकर ह्यांचें पत्र हातीं पडलें कीं प्रयोगाच्या परवानगीसाठीं रु. २५ भरल्याशिवाय प्रयोग करूं नये. ते भरण्याची व्यवस्था केली आणि प्रयोगासाठीं लागणाऱ्या वस्तूंची जमवाजमव करूं लागलों.

मी 'बाबा शिगवण' ही भूमिका केली. ती करतांना नाटककार व सुप्रसिद्ध श्री. नाना फाटक ह्यांनीं त्या भूमिकेला दिलेलें bearing मी बदलून टाकलें. गांधी तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता बाबा शिगवण पहिल्या प्रवेशांत एका

खाटेवर बिड्या ओढीत बसला आहे हें मनाला पटेना. मला विडीचें व्यसन नाहीं म्हणूनहि मी तसा विचार केला असेल. परंतु चरख्यावर सूत कांतणारा व खादी वापरणारा बाबा शिगवण मी सजविला. त्यानंतर त्या प्रयोगांत मी खादीच्या कपड्यांचाच वापर केला.

विठू कृष्णाचें काम दीक्षित नांवाचा एक विद्यार्थी करीत होता. चौथ्या अंकांत विठ्ठलदास आपलें खरें स्वरूप प्रगट करतो त्या प्रवेशांतला करुण रस त्या मुलानें कसा व्यक्त करावयाचा ही एक समस्याच होती. प्रयोग रंगत चालला. तिसरा अंक संपून चौथा अंक सुरू झाला. दीक्षितला मी एकच सूचना दिली कीं मी कांहीं करीन त्याला मोकळ्या मनानें साथ दे—त्यांत मिसळून जा—त्याचा परिणाम होऊं दे. त्या प्रवेशांतील करुण रसाच्या आविष्काराची सारी जबाबदारी मी घेतली. एका दृष्टीनें माझ्या अभिनय-सामर्थ्याची ती कसोटी होती. प्रवेश सुरू झाला आणि माझ्या आवाजानें तो करुण रस निर्माण करायला मला साहाय्य केलें. ते स्वर ऐकतांच विठू कृष्णा (दीक्षित) कावराबावरा झाला – त्याचे डोळे भरून आले आणि तो हुंदके देऊं लागला. मी त्याला जवळ घेतलें आणि पाठ थोपटून त्याला शांत केलें. नाटक संपलें आणि प्रत्येकजण येऊन विठू कृष्णाला मी फार चांगलें शिकविलें म्हणून माझी तारीफ करूं लागला. अंदरकी बात राम जाने ! त्या यशाचा मला आनंद झाला.

सेवासदनच्या स्नेहसंमेलनासाठीं ‘ वरमाय ’ ही नाटिका बसविण्याचें काम एक शिक्षिका करीत होत्या. श्री. कुमठेकर ह्यांनीं मला बोलावून ती नाटिका ऐकविली. मुली केवळ शुद्धलेखन म्हणत होत्या. आठदहा दिवस प्रयत्न करून मी शक्य ती सुधारणा केली. केवळ वाचनानें त्या नाटिकेबद्दल माझा ग्रह प्रतिकूल झाला. परंतु प्रत्यक्ष प्रयोग रंगला. नाटक काय किंवा नाटिका काय त्याचें मूल्य प्रयोगानेंच ठरतें हें मी शिकलों. तो प्रयोग सेवा-सदनच्या आवारांत उघड्या पटांगणांत झाला. थिएटरपेक्षां अशा जागेंत अधिक सोज्वळ वातावरण निर्माण होतें असा अनुभव आला. Open air theatre ह्या कल्पनेचें तें प्रात्यक्षिक यशस्वी झालें असें मला वाटतें.

सेवासदनाच्या मदतीसाठीं तीन तासांचा एक कार्यक्रम आंखला. ‘ शारदा ’ नाटकांतील हळदीकुंकवाचा प्रवेश त्यांतील संगीतासह; श्री.

सोपानदेव चौधरी ह्यांचें काव्यगायन आणि ‘जडावाची देवी’ ही नाटिका असें त्या कार्यक्रमाचें स्वरूप होतें. ‘जडावाची देवी’ ह्या नाटिकेंत मी स्वत:, प्रभाकर महाबळ आणि बाळासाहेब कानिटकर अशा तिघांनीं भूमिका करावयाचें ठरविलें. त्यांत दोन स्त्रीभूमिका होत्या. सेवासदनमधील दोन मुलींची त्यांसाठीं निवड केली. नाटकाच्या तालमी झाल्या. वर्षप्रतिपदेला प्रयोग होता. दुपारीं १२ वाजेपर्यंत स्टेजची बांधणी व्यवस्थित व्हावी म्हणून सेवासदनमध्यें थांबून मी घरीं आलों. आतांपर्यंत सारें सुरळीत झालें. घरीं येऊन जेवायला बसलों. अर्धें जेवण होतें नाहीं तों श्री. कुमठेकर अंगणांत येऊन उभे राहिले. त्यांना माडीवर थांबण्यास सांगून मी जेवण उरकलें व त्यांना भेटलों. त्यांनीं सांगितलें, “माईची भूमिका करणाऱ्या मुलीला तिचे पालक काम करूं देत नाहींत. ‘ती भूमिका करीत आहे असें दिसलें तर दंगा करूं’ असा त्या पालकांनीं दम दिला आहे ! ”

अपेक्षित संकट तर येऊन थडकलें. श्री. कुमठेकरांना मी स्पष्ट सांगितलें कीं सेवासदनमध्यें काम करणाऱ्या इतर कुणा स्त्रीनें ही जबाबदारी घेतली तरच हा प्रसंग पार पडेल. आम्ही दोघे सेवासदनमध्यें गेलों. दोनतीन स्त्रिया ती जबाबदारी घेण्यास तयार झाल्या. मी त्यांचें वाचन ऐकलें व त्यांतून एका स्त्रीची निवड केली. आपल्याला हें कसें जमेल अशी भीति त्या बाईंनीं व्यक्त केली. मी त्यांना त्यांची भूमिका एकदां वाचून दाखविली आणि कुमठेकरांना सांगितलें कीं रात्रीं प्रयोग होईपर्यंत ह्या बाईंना एका खोलींत कोंडून ठेवा—बाहेरून कुलूप लावा. त्याप्रमाणें व्यवस्था झाली.

रात्रीं कार्यक्रमाची सुरुवात सोपानदेवांच्या काव्यगायनानें झाली. नंतर शारदा नाटकांतील प्रवेश झाला. गाणीं—संभाषणें चांगलीं झालीं. ‘जडावाच्या देवीं’तील दरोडेखोर म्हणून साधवनें (मेकप करणारा) माझा भेसूर मेकप केला. मी एक जुना लेहेंगा नेसलों. पावसांतून आलों हें दाखविण्यासाठीं वाळूंत लोटीभर पाणी ओतून चिखल तयार केला व त्या चिखलांचे छाप लेहेंग्यावर दिले. केस अस्ताव्यस्त फिंदारले. माई (त्या कोंडलेल्या बाई) आणि दादा (प्रभाकर महाबळ) ह्यांचा प्रवेश सुरू झाला. चार वाक्यें बोलून माई आंत गेल्या. दादा आणि दरोडेखोर (मी) ह्यांचा प्रवेश सुरू झाला. माईनें माझा मेकप पाहिला नव्हता. दादानें जेवणाचें ताट

आणावयास सांगितलें. माई आंतून ताट घेऊन आली. मला दरोडेखोराच्या वेषांत पाहून व माझें अवसान पाहून माई लटलट कांपूं लागली व जेवणाचें ताट तिच्या हातून पडणार असें पाहून प्रभाकरनें तें ताट तिच्या हातांतून काढून घेतलें. तो सगळा भाग इतका स्वाभाविक झाला कीं चार तासांच्या तयारीनंतर 'माई' उभ्या राहिल्या हें कुणाच्याच लक्षांत आलें नाहीं. प्रयोग संपला. माझें दरोडेखोराचें काम प्रेक्षकांना आवडलें. मी आलेल्या संकटांतून सहीसलामत सुटलों. मी ईश्वराचे आभार मानले. मेकप उतरला व घरीं आलों. २४ : ३ : ३९ ला हा कार्यक्रम झाला.

त्याच वर्षीं नाशिकला देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचें अधिवेशन भरलें. नानासाहेब बालाजीवाले त्या अधिवेशनाचे सूत्रचालक. बापूसाहेब लोथे ह्यांच्यामार्फत त्यांनीं मला त्या अधिवेशनासाठीं एक नाट्यप्रयोग बसविण्यास सांगितलें. मात्र माझ्यावर एक अट लादण्यांत आली. प्रयोगांत भूमिका करणारा प्रत्येकजण देशस्थ ऋग्वेदीच असला पाहिजे. तत्वशः ती मला मान्य नव्हती. परंतु बापूसाहेब लोथे ह्यांची भीड मोडतां न आल्यानें मी तो उद्योग स्वीकारला.

त्या विलक्षण अटीमुळें सर्व भूमिकांना माणसें मिळणें कठीण झालें. तरुण ऐक्य मंडळाचे संचालक व ज्यांच्यावर नाटकाचा संस्कार कधींच झालेला नाहीं त्यांना आग्रह करून 'माईसाहेब' ही भूमिका करण्यास तयार केलें. 'माईसाहेब' नाटकाचे लेखक माझे स्नेही श्री. नारायणराव कुलकर्णी देशस्थ ऋग्वेदी. शाळेंतील तीन सहकारी शिक्षकांना भूमिका दिल्या. श्री. पुराणिक, श्री. बेदरकर आणि श्री. रुद्रे ह्यांपैकीं श्री. बेदरकर काय ते कॉलेजमध्यें नाटकांतून कामें केलेले. दोन जुने नट श्री. मामा निरंतर व श्री. नायगांवकर ह्यांनीं भूमिका करण्याचें मान्य केलें. तरीहि कमल आणि प्रेमाबाई ह्यांच्यासाठीं दोन देशस्थ मिळेनात. चांभाराचें लक्ष जोड्यावर तसा मी त्या भूमिकांना शोभतील अशा देशस्थांवर लक्ष ठेवून होतों. एका दुकानांत दाढीमिशीची लव उगवलेला—नाकींडोळीं नीटस् असा एक देशस्थ दिसला. आजूबाजूला चौकशी केली आणि सरळ त्याला विचारलें. तो गोंधळला. आपल्यावर असा कांहीं हल्ला होईल अशी त्याला कल्पना नव्हती! वळण साधलें आणि श्री. पोहेकर 'कमल' होण्यास तयार झाले. राजाभाऊ प्रभुणे 'प्रेमाबाई' होण्यास

उभे राहिले. प्रत्यक्ष प्रयोगाच्या तारखेआधीं चार दिवस दोन माणसें कमी अशी आमची स्थिति होती. नाटकाच्या तालमी तशाच रेटीत होतों. बापूसाहेब लोथे त्या तालमींना न चुकतां हजर असत. माझ्या निश्चल वृत्तीबद्दल त्यांनीं मला धन्यवाद दिले.

उमरावतीचे नेमस्त पुढारी रावबहादूर ब्रह्म त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. नाटकांतील अण्णासाहेबांची वेषभूषा व मेकअप अध्यक्षांच्या थाटाचा केलेला पाहून प्रेक्षकांना नवल वाटलें. त्या अधिवेशनाला महाराष्ट्रांतून आलेले प्रतिष्ठित देशस्थ ऋग्वेदी स्त्री–पुरुष नाटकाला आवर्जून हजर राहिले. ९ : ४ : ३९ ला विजयानंद नाट्यगृहांत तो प्रयोग झाला.

नाटक प्रथमापासून रंगत गेलें. स्वतः नाटककार श्री. ना. वि. कुलकर्णी आणि माझे स्नेही श्री. शि. गो. भावे त्या प्रयोगाला उपस्थित होते. दोन अंकांनंतर आभार–प्रदर्शनाचा कार्यक्रम सुरू झाला. नाटकांत भूमिका करणाऱ्या माझ्या सहकारी नटांचा मी परिचय करून दिला. माझें तें भाषण कांहीं जणांना फारच आवडलें. मी माझ्यावर लादलेल्या अटीचा उल्लेख करून एवढेंच म्हणालों, “नाटकाला बाकी सारे देशस्थ मिळाले पण नाटकांतलं बाळ मात्र जपानी आहे आणि पडद्याआड दोन बाजूंना उभे राहून आम्हांला प्रॉम्टिंग करणारे दोन कोंकणस्थ आहेत!” एक होता प्रभाकर महाबळ आणि दुसरा बाळू कानिटकर. त्या प्रयोगाचा बोलबोला खूप झाला. ‘ समर्थ ’ मासिकांत एका भगिनीनें त्या प्रयोगावर रसग्रहणात्मक लेख लिहिला.

● ● ●

लेखांक पस्तीसावा

# शं. प. जोशी, भाटेबुवा, पाटणकर, बन्नु

**त्या**च वर्षी मे महिन्याच्या सुटींत नाटयकला प्रवर्तक मंडळी फारच वर्षांनीं नाशिकला आली. तिचे मालक श्री. भाटेबुवा ह्यांचा व माझा परिचय दोन वर्षांपूर्वी सांगली येथें झाला होता. नाटककार श्री. शं. प. जोशी आपल्या नव्या नाटकाच्या तालमी घेण्यासाठीं नाटक मंडळींत येऊन राहिले होते. त्यांचा परिचय व्हावा म्हणून मी त्यांना भेटलों. भाटेबुवांनीं पूर्वीचा परिचय कायम ठेवला होता. शाळेला उन्हाळ्याची सुटी म्हणून मी दुपारीं मंडळीच्या बिऱ्हाडीं जात असे. श्री. शं. प. जोशी ह्यांची दाट ओळख झाली. शिरपूरचे ते एक काँग्रेस कार्यकर्ते—गांवाचें पुढारीपण त्यांच्याकडेच. तत्त्वज्ञान ह्या विषयाचा त्यांचा व्यासंग इत्यादि त्यांच्या व्यक्तित्वाचे पैलू त्या भेटींत कळून आले. 'खडाष्टक' नाटकाची कल्पना पुण्यांत आपल्या शेजारीं राहणाऱ्या एका बिऱ्हाडावरून सुचली असें त्यांनीं एकदां सांगितलें.

श्री. जोशी ह्यांच्याशीं सहज सलगी करतां येईल असें त्यांचें सवंग व्यक्तित्व नव्हतें. नव्या नाटकांच्या तालमींना मी हजर रहावे असा त्यांचा आग्रह असे. त्या मंडळीचीं दोन नाटकें मी पाहिलीं. एक 'पराचा कावळा' आणि दुसरें 'म्हातारपणाचे डोहाळे.' भाटेबुवा, पाटणकर आणि बन्नु ह्यांचें नाट्यकौशल्य दिसलें. भाटेबुवा जुन्या जमान्यांतले नांवाजलेले देखणे स्त्री-पार्टी नट. पुरुषाची भूमिका करतांना सहज शब्दोच्चार, आवाजाची चढ-

उतार, मुद्राभिनय इत्यादि गुण ते यथास्थित दाखवीत. श्री. पाटणकरांची 'भांडूप'ची भूमिका अप्रतिम होत असे. साऱ्या नाटकाचा तो कणाच होता. परंतु पाटणकर आणि बन्नु ह्यांनीं मला दिपविलें तें त्यांच्या 'म्हातारपणाचे डोहाळे' ह्या नाटकांतील भूमिकांमुळें. श्री. पाटणकर त्या नाटकांत नऊ महिन्याच्या गरोदर स्त्रीची भूमिका करीत. गरोदरपणामुळें लागणारा श्वास आणि त्यामुळें होणारी पोटाची हालचाल ते इतक्या सूक्ष्म रीतीनें दाखवीत कीं पहातांना स्त्रीनेंहि चकित व्हावें. श्वास आणि निःश्वास ह्यांचें तें तंत्र अचाट होतें बन्नु त्या नाटकांत 'लवंगी' नांवाच्या एका दासीची भूमिका करीत असे. मराठमोळा स्त्रीची तिची वेषभूषा, चालणें, लचकणें, हातांचे तिस्कारे सारें कांहीं Pertect पूर्ण होतें. एका प्रवेशांत पायांच्या चवड्यावर उकिडवी बसून पायांना चाकें लावल्याप्रमाणें स्टेजच्या एका विंगपासून दुसऱ्या विंगपर्यंत ती अशा कांहीं वेगानें जाई कीं पाहणाराचा डोळ्यावर विश्वासच बसत नसे. बन्नु शुद्ध मराठी बोले.

श्री. शं. प. जोशी ह्यांच्या नाट्यप्रयोग बसविण्यासंबंधी विशिष्ट कल्पना होत्या. ते म्हणत कीं प्रयोग असा व्हावा कीं एकदां आलेला प्रेक्षक त्या प्रयोगाला अनेकवेळां खेंचला गेला पाहिजे. हें आकर्षण निर्माण करण्या-साठीं नटांनीं सक्त मेहनत केली पाहिजे. ह्या विषयावर बोलतांना बन्नूबद्दल ते म्हणाले कीं–ती Flat–chest –सपाट छाती– आहे. आपल्या नव्या नाटकांत तिनें 'ब्रेस्टस्' वापरल्या पाहिजेत असें त्यांनीं भाटेबुवांना निर्भिड-पणें सांगितलें. नाटककार शं. प. जोशी, भाटेबुवा आणि नाटक मंडळींतील सातआठजणांना मंदिरानें बाळू कानिटकरच्या घरीं चहापाण्यासाठीं बोलावलें. त्यावेळीं मी मंदिराच्या कार्याचा परिचय करून दिला आणि आमची Family circle ची कल्पना त्यांना सांगितली. श्री. जोशींना ती कल्पना फार आवडली. त्यांनीं महत्त्वाची सूचना केली. स्वतःची जागा मिळवा व तेथें हे प्रयोग करा म्हणजे तुम्हांला अधिक यश मिळेल. विचाराचा एक नवा किरण आम्हांला दिसला. श्री. भाटेबुवांनीं त्या कल्पनेला दुजोरा दिला व म्हणाले कीं नाट्यविषयाचा असा विचार करणारी दुसरी संस्था महाराष्ट्रांत नाहीं. ती बैठक संपली. श्री. जोशी यांनीं मला शिरपूरला या म्हणून अगत्याचें निमंत्रण दिलें. त्यानंतर एक दिवस भाटेबुवांच्या नटमंडळींसमोर माझें

एक भाषण झालें व शेवटीं मी ‘ सत्याग्रही ’ हें जीवनचित्र करून दाखविलें. सर्वांना तें आवडलें.

बाळू कानिटकरनें Family circle ह्या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या कल्पनेला मराठी नांव ‘ अभिजन मंडळ ’ शोधून काढलें. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्र नाट्य मंदिरानें नाट्यक्षेत्रांत जें अल्पस्वल्प कार्य केलें त्यांतून निर्माण झालेला एक प्रभावशाली विचार म्हणजे ‘अभिजन मंडळ !’ ह्या विचाराचें यथास्थित संगोपन करणें आणि त्याला आचारस्वरूप देणें ही आमची जबाबदारी होती. प्रथम नाशिकच्या जनतेला ह्या कल्पनेचा परिचय व्हावा म्हणून एक नाट्यप्रयोग करण्याचें आम्ही योजलें. ‘ अभिजन मंडळ ’ ह्या योजनेला प्रयोगस्थळाचें क्षेत्रफळ ही महत्त्वाची मर्यादा आहे. प्रयोग-स्थळ विजयानंद थिएटर ठरल्यानंतर आम्ही त्याचे तीन भाग आसनव्यवस्थे-साठीं योजले. त्या तीनहि भागासाठीं प्रवेशपत्रिका एकच. म्हणजे एक खुर्ची, एक एक स्त्रियांची जागा व चार मुलें अशी ती संयुक्त प्रवेशपत्रिका होती. एका प्रवेशपत्रिकेला रु. २ व रु. १ असे दर होते. थिएटरमध्यें खुर्च्यांची संख्या तितक्याच प्रवेशपत्रिका काढल्या होत्या. त्या प्रवेशपत्रिका खपवितांना पुष्कळच सामाजिक ज्ञान मिळालें. सडाफटिंग ब्रह्मचारी अथवा विधुर ह्यांना ह्या योजनेंत स्थान आहे कीं नाहीं, बायको माहेरीं गेली आहे, बाळंतीण आहे अशांना येतां येईल का असे अनेक प्रश्न उपस्थित झाले. त्या सर्वांना आम्ही एकच उत्तर दिलें कीं ज्याला ज्याला ‘ अभिजन मंडळ ’ हें तत्त्व मान्य आहे त्याला त्याला ह्या योजनेंत निश्चित स्थान आहे.

‘ अभिजन मंडळा ’चा पहिला प्रयोग म्हणून आम्ही ‘ स्वयंसेवक ’ हें नाटक निवडलें. त्यांत काम करायला दोन विद्यार्थी मिळाले. एक सवाई आणि दुसरा आचार्य, दोघेहि देखणे आणि गुणी होते. त्यांतल्या त्यांत बाळू आचार्य फारच देखणा दिसे. बायजेच्या भूमिकेसाठीं श्री. गांगुर्डे ह्या नांवाचे सरकारी नोकरींतले तरुण गृहस्थ मिळाले. प्रल्हादनें बाबाजीची भूमिका केली. त्याची ‘ फिगर ’ त्या भूमिकेला फारच शोभून दिसली. श्री. काळे ह्यांनीं ‘ लहानू ’ची चटकदार भूमिका केली. प्रभाकर महाबळ ‘ यादवराव ’, श्री. माटे ‘ नागोजीराव ’ व मी ‘ रघोजीराव ’ अशा भूमिका केल्या. मला त्या नाटकांतला रघोजीरावचा शेवटचा प्रवेश व त्यांतील कांहीं वाक्यें फार



↑ 'खडा मारायचा झाला तर'– हें 'स्वयंवर' नाटकांतील सुप्रसिद्ध स्वगत म्हणतांना घेतलेला पवित्रा, शरिराचा झोंक, गोंडस हात आणि भावपूर्ण डोळे ह्यांनीं व्यक्त केलेला तो प्रतिकार– मराठी नाटकवेडयांना आपल्या गायनानें आणि अभिनयानें वेड लावणारे 'बालगंधर्व' ते हे नारायणराव राजहंस.



बालगंधर्वांच्या लोकप्रियतेचे गद्य प्रतिस्पर्धी नटवर्य श्री. वामनराव पोतनीस : 'विचित्र–लीला'मधील लीला. स्त्री–भूमिका करतांना ज्यांचें बोलणें, चालणें, लचकणें, मुरडणें, हंसणें आणि रडणें स्त्री–जीवनाचा वस्तुपाठ वाटावा इतका तंतोतंत स्त्री–भाव प्रगट करणारे समर्थ नट.

आवडतात. रघूजी जगूला सांगतो : "घे हा चाबूक आणि असा फटका मार कीं ह्या रघूजीच्या काळजाचे दोन तुकडे होतील." ललितकलादर्श नाटक मंडळींतील जाधव नांवाच्या नटाची ती भूमिका मला आवडली. जाधवांचा आवाज तेवढा तेज नव्हता. परंतु त्यांचें bearing फार चांगलें असे. आमच्या सगळ्या संचांतील कच्चा दुवा म्हणजे 'मंजुळा'. तें काम करणाराला नुसतीच हौस होती, बाकी कांहीं नाहीं.

न्यू इंग्लिश स्कूल मधला वसंत बापट आणि मराठा हायस्कूलमधला वैद्य दोघांनीं प्रॉम्टर म्हणून साहाय्य केलें. स्टेज–व्यवस्था वामनराव खरे ह्यांनीं सांभाळली. हा अभिनव प्रयोग विजयानंद नाटकगृहांत १३ : ८ : ३९ ला दुपारीं झाला. गांवांत प्रयोगाची जाहिरात नाहीं. त्यामुळें एकहि गांवगुंड थिएटरकडे फिरकला नाहीं. अभिजन मंडळाचे सभासद म्हणून आलेल्यांना आपल्या घरोब्यांतील कांहींजण नाटकाला आले आहेत हें पाहून सुखावह आश्चर्य वाटलें. प्रयोग सुरू होण्यापूर्वीं दहा मिनिटांत थिएटर भरून गेलें. स्त्रियांना ओटा व पीट, गॅलरींत मुलें व घरांतील कर्त्या पुरुषांसाठीं खुर्ची अशी आसन-व्यवस्था होती. तान्हीं मुलें रडूं लागलीं म्हणजे थोडा व्यत्यय येई परंतु कुटुं-बांत जसें हें सहन केलें जातें तसेंच येथेंहि घडलें. अतिशय चांगल्या वातावरणांत तो प्रयोग झाला सुरुवातीला बालसन्मित्र मेळ्याच्या सहकार्यानें थोडें संगीत ठेवलें होतें. मध्यंतरांत सर्व प्रेक्षकांना 'अभिजन मंडळ' ह्या कल्पनेचा बोध व्हावा म्हणून उपस्थित प्रेक्षकांपैकीं प्रा. भा. ल. पाटणकर, श्री. माधव काळे (सिने–नट), प्रि. सोमण, प्रो. जोगळेकर व श्री. रहाळकर ह्यांनीं भाषणें करून योजनेचें मन:पूर्वक अभिनंदन केलें

श्री. बाळासाहब काळे सुरुवातीला उदासीन असले तरीहि प्रयोग झाल्यानंतर त्यांनीं प्रयोगाच्या यशस्वितेबद्दल प्रांजळ अभिप्राय दिला. बाळू कानिटकर आणि प्रभाकर महाबळ या दोघांनीं ती योजना यशस्वी व्हावी म्हणून खूप परिश्रम केले. प्रयोग झाल्यानंतर आम्ही तिघेजण यशाच्या आनं-दांत न्हाऊन निघालों. आजहि प्रभाकरचा तो आनंदी चेहरा मला दिसत आहे.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ विः ....................

## लेखांक छत्तीसावा

# रण क्षेत्र !

**न्यू** इंग्लिश स्कूलच्या प्रवेश-द्वाराच्या पायरीवर मी पाऊल ठेवलें–बँडचा ठोका पडला आणि माझें मरगळलेलें मन खडबडून जागें झालें. सन्माननीय अध्यक्ष नटवर्य गणपतराव बोडस, नटवर्य केशवराव दाते, नाटककार मामा वरेरकर, डॉ. भालेराव ह्यांच्या स्वागतासाठीं तो बँड वाजत होता. मला मात्र तो रणक्षेत्राचा इशारा वाटला. जवळजवळ वर्षभर मेहनत करून अभिजन मंडळाच्या कल्पनेवर आधारलेलें महाराष्ट्र नाट्य संमेलनाचें अधिवेशन सुरू व्हावयाचें आहे. प्रा. जोगळेकर ह्यांनीं आधल्याच दिवशीं ज्या सभामंडपाचें वर्णन "जिल्हा काम" म्हणून केलें तेथें १८०० प्रेक्षकांची आसनव्यवस्था सुसज्ज होती. कार्याध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष या दोन्ही भूमिका मला एकट्यालाच करावयाच्या होत्या.

२३ आणि २४ मार्च १९४० ला भरलेलें नाट्यसंमेलनाचें ३१ वें अधिवेशन यशस्वी रीतीनें पार पडलें. त्या यशाची धुंदी ज्या वेळीं ओसरली नव्हती. अशा वेळीं मी माझ्या डायरींत लिहिलेलें वर्णन त्या यशाचें यथातथ्य चित्र उभें करील म्हणून तो उतारा येथें देतों. त्या यशाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. १) संपूर्ण अधिवेशन अभिजन मंडळाची कल्पना आधारभूत घेऊन योजिलें व पार पाडलें. २) दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे अध्यक्ष नटश्रेष्ठ गणपतराव बोडस ह्यांच्या 'माझी भूमिका' ह्या आत्मचरित्राचें प्रकाशन. एका व्यवसायी नटाचें मराठी भाषेंतील पहिलें आत्मचरित्र म्हणून

ह्या प्रकाशनाला आगळें महत्त्व आहे. ३) तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवा'चा ठराव मंजूर झाला.

दि. ३१ : ३ : ४० ला पानें २०४ ते २०७ वरील उतारा : "माझी सर्व मानसिक आणि शारीरिक शक्ति पणाला लावून हें अधिवेशन यशस्वी करण्यासाठीं मी श्रमत होतों. अधिवेशन यशस्वी झालें. अनेकांना आनंद झाला. कांहींना मत्सर वाटला. कांहीं घरच्या घरीं कुचंबून धुसफुसले.

महाराष्ट्राचें नांव घेऊन डोक्यावर घेतलेली ही जबाबदारी पार पडली याला कारण आमच्या अनेक साह्यकर्त्यांचें निर्लोभ सहकारित्व. वामनराव खरे, बापूसाहेब पंडित, प्रल्हादराव औरंगाबादकर, बाळासाहेब काळे, कानिटकर, कानडे इत्यादि अनेक सज्जनांनीं माझ्यासारखेच श्रम केले. काकाजी जोगळेकर नाटकाचें सामान घेऊन पुण्याहून मुद्दाम आले.

नागपूर, मुंबई आणि पुणें येथून प्रतिनिधि आले. केशवराव दाते आणि मामा वरेरकर यांनीं संमेलनाला शोभा आणली. प्रा. बनहट्टी, बापूसाहेब जोशी, डॉ. भालेराव इत्यादि कार्यकर्त्यांनीं जागता पहारा ठेवला. नारायणराव कुलकर्णी, विठूकाका खाडीलकर, रमाकांत वेलदे, ठकार, एस्. ए. कुलकर्णी ह्यांनीं अनेकप्रकारें मला खूप साहाय्य केलें.

राम मास्तर आणि त्यांचे ते स्वयंसेवक – काय ती उत्सुकता – केवढा उत्साह – उल्हास! एका कुटुंबांतली सारी मंडळी जणू एका कार्यासाठीं धडपडत होती. शं. पु. जोशी व प्रा. जोगळेकर ह्यांनीं आस्थेनें भाग घेतला. माधवराव जानोरकरांनीं जुना स्नेह दाखविला.

प्रभाकर महाबळ ह्यानें आयत्या वेळीं येऊन कचेरी थाटली आणि उत्कृष्ट प्रकारें कार्य केलें. त्याचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. बाळूमामा, जोशी, सोपानदेव चौधरी ह्यांनीं शक्य तितकें सहकार्य केलें.

श्रीमंत नानासाहेब चांदवडकर ह्यांनीं कमाल केली. स्वतःचा मानापमान बाजूला ठेवून आमच्याइतकेच त्यांनीं स्वतःला राबविलें.

प्रा. नानासाहेब फडके मुंबईहून मुद्दाम आले. त्यांना सारेंच कौतुक वाटलें.

शनिवार ता. २३ ला दुपारीं ४॥ वाजतां सभामंडपाच्या शृंगारलेल्या कमानीपाशीं अध्यक्ष श्री. गणपतराव बोडस ह्यांच्यासह मी मोटारींतून उतरलों.

स्वागताच्या सलामीचा बँड ऐकतांच मी गंभीर झालों. हातीं घेतलेल्या कार्याची ती तयारी होती. मला माझ्या साऱ्या शक्ति एकवटून आतां सज्ज झालें पाहिजे. मी स्वतःला विसरत चाललों. कार्याध्यक्ष म्हणून मला लोकांचें स्वागत केलें पाहिजे. मी मंडपांत शिरलों. मला नेहमीं पहाणारे माझ्याकडे टक लावून पाहूं लागले. चिंता आणि धीर ह्यांचें मिश्रण माझ्या तोंडावर दिसूं लागलें. श्री. सोपानदेव चौधरी ह्यांनीं महाराष्ट्र-गीत म्हटलें. मी त्या माझ्या भव्य कणखर देशाचें मनांतल्या मनांत चिंतन केलें. नंतर गंगू आणि द्वारका इनामदार बहिणींनीं 'मराठी रंगभूमि' हें अशोकांचें गीत म्हटलें. गीत चांगलें आणि म्हणणाऱ्या त्याहिपेक्षां चांगल्या. श्रोतृसमाज हलला. स्वागतपर पद झालें आणि मी उभा राहिलों.

मी काय बोललों हें आज मला आठवत नाहीं. पण मी बोलत होतों आणि लोक ऐकत होते. माझ्या एका विद्यार्थ्यानें –वसंत बापट यानें– माझें भाषण उत्कृष्ट झालें म्हणून सांगितलें. मला माझ्या भाषणाचा विचार करायला सवडच नव्हती. श्री. बोडस यांचें भाषण झालें. पुस्तक-प्रकाशन समारंभ झाला. गेले ८–१० महिने ज्या पुस्तकाच्या परिचर्येंत मी आणि नारायणराव कुलकर्णी ह्यांनीं दिवस घालविले तें पुस्तक प्रकाशित झालें. माझे स्नेही दादासाहेब बनहट्टी यांनीं प्रकाशन केलें.

रात्रीं सौ. इंदिराबाई चौबळ यांचें काव्यगायन झालें. श्री. सहस्रबुद्धे –'नाटककार गडकरी' ह्या ग्रंथाचे लेखक– ह्यांनीं कै. भागवत, प्रधान, कारखानीस इत्यादि नटांबद्दल आख्यायिका सांगितल्या व त्या त्या नटांचीं कांहीं भाषणें म्हणून दाखविलीं. मी त्या नटांचीं रंगभूमीवरील कामें पाहिलेलीं नसल्यानें मला तुलनेला आधार नव्हता. त्यांनीं सांगावयाचें, "हें भागवतांचें भाषण" –मी "होय" म्हणायचें.

'मराठी रंगभूमीचें शतक' या सप्रयोग व्याख्यानाची मी तयारी करीत होतों. ६०–७० वर्षांपूर्वींचा सूत्रधार म्हणून मी रंगलों. त्याचवेळीं मनांत विचार चालू होता. माझें व्याख्यान सुरू झालें. एकामागून एक प्रवेश आणि त्यांच्यावर माझी टीका–प्रेक्षकांना तें नाविन्य पटलें. आणि सर्वांच्या शेवटीं मी जेव्हां बेकार नटांचें हृदयद्रावक चित्र पुढें मांडलें तेव्हां लोक हलले. मी कांहींतरी उत्स्फूर्त प्रवेश करण्याच्या विचारांत होतों तों होणाऱ्या गोष्टीच्या

ओघांत मी कुठल्या कुठें गेलों. दुसऱ्या दिवशीं कांहीं जणांनीं माझें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं विषय-नियामक मंडळ बसलें. कडाक्याचे वाद झाले पण मिटले. अत्यंत महत्त्वाचा ठराव—मराठी रंगभूमीच्या शताब्दि महोत्सवाचा झाला. राम गोगटे ह्यांचें भाषण झालें. शंकरशेठ चुंबळे ह्यांचा सन्मान केला. रात्रीं ' छापील संसार ' नाटक झालें. मी समोर बसून तो प्रयोग पाहिला. अत्यंत यशस्वी प्रयोग झाला. दोन अंक झाल्यानंतर मी निरोपाचें भाषण केलें. कांहींतरी अज्ञात शक्ति माझ्या मुखांतून बोलत होती.

नाटकाला २००० लोक हजर होते. तो न विसरण्यासारखा देखावा होता. नाटक संपलें आणि दादासाहेब बनहट्टी यांनीं उचंबळून मला घट्ट मिठी मारली. अहेतुक स्नेहाचा तो उद्रेक मी निमूटपणें सहन केला. मनोभावें सुरु केलेली रंगभूमीची पूजा यथास्थित झाली. मी विनम्र होऊन मला यश देणाऱ्या शक्तीला धन्यवाद देत बाहेर पडलों.

डॉ. भालेराव, प्रा. बनहट्टी, डॉ. बरवे इत्यादि प्रतिनिधींकडून मला व्यक्तिशः अभिनंदनपर पत्रें आलीं. दादासाहेब बनहट्टी यांनीं विशेष गौरवपर लिहिलें, " नाशिक येथें संमेलनाचा जो अपूर्व सोहळा आपण साजरा केलात त्याबद्दलच्या धन्यवादाचे सूर अद्याप माझ्या अंतःकरणांत घुमत आहेत. आपणासारखे सहृदय प्रेमळ व कर्तृत्ववान बंधु पाठीशीं असल्यावर महाराष्ट्र नाट्य संमेलनाचें कार्य आपण नमुनेदार रीतीनें करून दाखवूं असा भरंवसा बाळगण्यास मला कोणतीहि हरकत वाटत नाहीं."

" माझी भूमिका " ह्या पुस्तकाच्या मुद्रणासाठीं रु. १५०० खर्च आला. रु. २० चा शेअर करून आम्ही आपसांत पैसे जमविले. पुण्याचे श्रीमंत रास्ते ह्यांनीं प्रथम कांहीं रक्कम कर्जाऊ दिली व नंतर तिचें रूपांतर देणगींत केलें. ह्या प्रकाशनानें आम्ही कांहीं भरीव कार्य केलें ह्यांत शंका नाहीं.

श्री. देवदत्त नारायण टिळक ह्यांनीं ' अभिजन मंडळा 'च्या यशाबद्दल एक पत्र पाठविलें तें मी नाट्यसंमेलनाच्या इतिवृत्तांत तसेंच्या तसें छापलें. त्यानंतर मी त्यांच्या घरीं गेलों असतां रूथबाईनीं जें अगत्य दाखविलें तें विलक्षणच !

पुढील अधिवेशनाचें निमंत्रण मुंबई मराठी साहित्य-संघानें दिलें व तें स्वीकारलें गेलें. नाशिकला झालेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या ठरावाला विशेष प्रसिद्धि मिळावी, तो महोत्सव मराठी रंगभूमीच्या आतांपर्यंतच्या वैभवाला शोभेल अशा रीतीनें साजरा व्हावा म्हणून चाललेल्या प्रयत्नांना बळकटी यावी या हेतूनें तें निमंत्रण स्वीकारण्यांत आलें होतें. डॉ. भालेराव ह्यांच्यासारख्या कार्यकर्त्याला आवाहन करण्याइतका परिणाम नाशिकच्या अधिवेशनानें केला असें मानण्यांत मी केवळ स्वतःचा गौरव करीत आहे असें नसून आमच्या सर्वच लहानथोर कार्यकर्त्यांच्या शक्तीचा तो गौरव आहे.

महाराष्ट्र नाट्य मंदिरासारख्या एका लहान संस्थेचा होणारा विकास मी माझ्या डोळ्यांनीं पहात होतों. तो विकास व्हावा म्हणून कष्ट करणारांपैकीं मी एक; माझाहि विकास होतच होता. संस्था आणि तिचा कार्यकर्ता ह्यांचा हा अन्योन्य संबंध अतिशय हृद्य आहे. शून्यांतून एक प्रवाह निर्माण करावयाचा आणि त्या प्रवाहाशीं आपण एकरूप व्हावयाचें हाच माझ्या दृष्टीनें सायुज्य मोक्ष होय.

अभिजन मंडळाच्या कल्पनेचें स्वागत नागपूर, पुणें आणि मुंबई ह्या तीन शहरांत झालें. नागपूरच्या कार्यकर्त्यांनीं कार्यक्रमाला येणाऱ्या स्त्रियांचीं तान्हीं मुलें सांभाळण्याची सोय केली. पुण्यास श्री. नानासाहेब गोखले ह्यांनीं एका मेळ्याचे कार्यक्रम अभिजन मंडळ पद्धतीनें गाजविले. मुंबईस श्री. पार्श्वनाथ आळतेकर ह्यांनीं आपल्या नाटकाचे कांहीं प्रयोग ह्या पद्धतीनें केल्याचें कळलें.

मी मात्र मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवापर्यंत म्हणजे १९४३ अखेर नाट्यक्षेत्रांतील ह्या कार्याला बांधून घेतलें. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या धामधुमींत तें कसें साधणार हरी जाणे !

• • •

## लेखांक सदतीसावा

# अब्रूनुकसानीची फिर्याद

इंडियन पिनल कोड कलम ५०० Defamation अब्रूनुकसान ह्या कलमाप्रमाणें 'आरोपी' म्हणून माझ्यावर समन्स् लागलें. मे महिन्याच्या सुटींत मी बहुधा पुण्यामुंबईस जाऊन येत असे. भालेराव, बावडेकर, टिकेकर हे मुंबईचे स्नेही आणि नारायणराव कुलकर्णी, विठूकाका खाडीलकर हे पुण्याचे स्नेही. त्यांचा एखाद्या आठवडयाचा सहवास म्हणजे वर्षभर केलेल्या श्रमावर उत्तम उतारा. ह्याहि वर्षी मी पुण्यास गेलों. शाळा सुरू होण्याच्या थोडया आधीं मी परत आलों त्यापूर्वीं माझ्या गैरहजेरींत तें समन्स बजावलें गेलें.

श्री. साठे ह्यांनीं गणपतराव बोडस ह्यांच्या ' माझी भूमिका ' पुस्तकांत आपल्या वडिलांबद्दल कांहीं बेअब्रू करणारा मजकूर लिहिला म्हणून ती फिर्याद माझ्यावर गुदरली. पुस्तकाचे लेखक गणपतराव बोडस सांगली येथें आणि त्याचे मुद्रक श्री. सहस्रबुद्धे कोल्हापूर येथें दोघेहि संस्थानी हद्दींत रहात असल्यानें उरलेला मी त्या पुस्तकाचा प्रकाशक नाशिक येथें म्हणजे ब्रिटिश हद्दींत म्हणून मला आरोपी करण्यांत आलें. समन्स ठाण्याच्या कोर्टा-कडून आलें होतें.

माझा एक कॉलेज–स्नेही वसंत गुप्ते ठाणें येथें वकिली करीत आहे अशा विश्वासावर मी त्याच्या घरीं गेलों. त्याला तसें जाण्यापूर्वीं पत्र लिहिलें. वसंता घरीं नव्हता. तो नोकरीसाठीं अहमदाबादला असतो अशी माहिती

वसंताच्या वडिलांनीं मला सांगितली. ते स्वत: वकिलीच करीत. त्यांनीं माझें समन्स पाहिलें व मला श्री. टी. जी. चित्रे – त्यांचे जांवई ह्यांच्याकडे पाठविलें. श्री. चित्रे एक वर्ष पुण्यास आमच्या कॉलेजांत होते व मला ओळखत होते. त्यांनीं माझें वकीलपत्र घेतलें

मी ठाण्याच्या कोर्टाच्या पटांगणांत प्रवेश करीत असतांनाच दाराशीं उभ्या असलेल्या दोघातिघां इसमांपैकीं एकजणानें माझ्याकडे बोट दाखवून मोठ्यानें उद्‌गार काढले, "अरे, हाच तो." प्रथम मला त्यां बोलण्याचा बोध झाला नाहीं. परंतु तो फिर्यादी आहे हें कळल्यावर संदर्भ लक्षांत आला. प्रकाशक म्हणून माझा फोटो त्या पुस्तकांत छापलेला होता. त्यावरून त्यानें मला ओळखलें व वरील उद्‌गार काढले.

फिर्यादीचें काम सुरू झालें. दर आठदहा दिवसांनीं भाडें खर्च करून, शाळा बुडवून कोर्टांत हजर राहणें ही मला न मानवणारी चैन होती. मी माझे वकील श्री. चित्रे ह्यांना विनंती केली कीं अर्ज करून कोर्टाकडून हजेरीची माफी मिळवावी. त्याप्रमाणें श्री. चित्रे ह्यांनीं अर्ज गुदरला. मी मॅजिस्ट्रेट साहेबांपुढें उभा राहिलों. एक मध्यमवयीन बोहरी जे. पी. म्हणून तो खटला चालवीत होते. त्यांनीं प्रश्न केला कीं तुम्हांला ही सवलत कां पाहिजे. मी अगदीं दीनवाणा चेहरा करून सांगितलें, "साहेब, मी एक शिक्षक आहे. मला रजा मिळत नाहीं. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचें नुकसान होतें." त्यावर साहेब म्हणाले, "ठीक, ठीक. आतां आमी (म्हणजे ते) सांगते तें संमदा ऐकून घे. ते तुमच्या गणपतराव बोडसची ती पगडी कशी आली आहे माहीत ?" मला माहीत होतें. परंतु साहेबांचें बाळसें मोडूं नये म्हणून मला कांहींच माहीत नाहीं असें मी सांगितलें. साहेबांचें गॅसच्या बत्त्यांचें दुकान ग्रँट-रोडवर एका थिएटरशेजारी होतें. आपला व्यवसाय चालूं ठेवून साहेब चक्क गंधर्व नाटक मंडळीचीं नाटकें पहात असत. तो सारा इतिहास, मराठी नाटक मंडळ्यांची माहिती त्यांनीं मला ऐकवली. पाठारे प्रभु घालतात तशी ती पगडी आहे हेंहि सांगितलें. मी तें सारें भाषण हो, हो करून ऐकून घेतलें व मला पाहिजे ती हजेरीची माफी मिळवली.

माझ्या इतका उत्सुक श्रोता साहेबांना आजपर्यंत मिळाला नसावा. माझ्याबद्दल सहानुभूति उत्पन्न झाल्यामुळें अथवा अन्य कांहीं कारणानें

असेल परंतु साहेबांनीं दर दोनचार दिवसांनीं फिर्यादीला तारीख देऊन हैराण केलें. श्री. चित्रे ह्यांच्यामार्फत मी एकदां तडजोडीचा प्रयत्न फिर्यादीच्या वकिलाकडे जाऊन करून पाहिला. फिर्यादीनें रु. ५०० नुकसानभरपाई मागितली. मी त्यांना सांगितलें कीं मी मास्तर असलों तरी मला एवढें कळतें कीं रु. ५०० पर्यंत मी हा खटला हायकोर्टापर्यंत लढवीन. जें व्हावयाचें असेल तें होऊं द्या. २०–२५ तारखा झाल्यानंतर फिर्यादी टेकीला आला. प्रत्येक तारखेला त्याला वकील फी रु. ५ पडत असे. माझा वकील मला कांहीं मागत नव्हता. तडजोड करावयाची असें ठरलें. तडजोडीच्या दोन अटी होत्या. १) पुस्तकाच्या पुढील आवृत्तींत बदनामी करणारा मजकूर गाळून टाकावयाचा. २) मी एका वर्तमानपत्रांतून खेद व्यक्त करावा. मी दोन्ही अटी मान्य केल्या. मात्र माफीचा मज़कूर फिर्यादीनें लिहून द्यावयाचा व तो प्रसिद्ध करण्याचा खर्च मी करावयाचा. खर्चाचे पैसे मी माझ्या वकिलाच्या स्वाधीन केले. आजपर्यंत फिर्यादीनें तो मजकूर लिहून दिला नाहीं व त्यामुळें माफी प्रसिद्ध झाली नाहीं. अशा रीतीनें अब्रूनुकसानीच्या खटल्याचा निकाल लागला.

माझ्या दृष्टीनें तो खटला ही एक 'इष्टापत्ति'च ठरली. ठाण्याचें काम संपलें कीं बसनें मी मुंबईस जात असे. ठाणें ते मुंबई हा रस्ता अत्यंत मोहक दिसत असे. कोंकणपट्टीचा भरपूर पाऊस पडत असल्यानें सगळें रान हिरवेंगार दिसे. झाडांच्या पानापानांवरून ओघळणारे पाण्याचे थेंब पाहतांना मन हरखून जाई. सृष्टीच्या त्या आर्द्रतेपेक्षांहि मुंबईच्या माझ्या स्नेह्यांची आर्द्रता मला अधिकच तृप्त करी. श्री टिकेकर ह्यांच्या प्रेरणेनें मी मुंबई-रेडिओसाठीं नाटिका लिहिण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. हा एक नवाच अनुभव होता. रेडिओवर होणारी नाटिका ऐकण्यासाठीं कुणातरी रेडिओ असणाराच्या घरीं जाऊन बसावयाचे. भाऊ – माझे वडील मोठ्या उत्कंठेनें ती नाटिका ऐकण्यासाठीं जात. मंगळागौरी, नागपंचमी, शिवरात्र इत्यादि नाटिका रेडिओवर झाल्या.

प्रतिवर्षाप्रमाणें त्याहि वर्षी, ऑगस्टला शाळेंत लोकमान्य टिळकांची पुण्यतिथि साजरी झाली. समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून येवल्याचे श्री. आपटे गुरुजी आले होते. श्री. पुराणिक व ते येवल्याच्या राष्ट्रीय विद्यालयां-

तील सहकारी आणि स्नेही. पुराणिकांनींच त्यांचा व माझा परिचय करून दिला. त्या वर्षीं गणेशोत्सवांत येवल्यास मी एक व्याख्यान आणि रात्रीं 'सत्याग्रही ' हें नाटचदर्शन असा कार्यक्रम केला. एका दिवाणखान्यांत माझ्या डाव्या हाताला आणि समोर प्रेक्षक बसले होते. श्री. आपटे गुरुजी आणि त्यांचे सहकारी ह्यांनीं राष्ट्रीय शाळा चालवीत असतांना त्या गांवाला अशी शिस्त लावली कीं श्रोते कार्यक्रमाला वक्तशीर हजर रहात. 'सत्याग्रही ' ह्या कार्यक्रमासाठीं मी उभा राहिलों. माझ्यामागें उघडी खिडकी होती. मी ती खिडकी बंद केली. 'सत्याग्रही ' जीवनांतील एकेक टप्पा दाखवितांना न कळत अशी कांहीं तंद्री लागली कीं तुरुंगांतला एकांतवासांतला यातनांचा असह्यपणा दाखवितांना मी मागच्या खिडकीचा आधार घेतला व तुरुंगाचे गज अशी कल्पना करून खिडकीची कडी धरून त्या फळचा खडखड वाजविल्या. भावनोत्कटता व्यक्त करण्याच्या दृष्टीनें मला समाधान झालें. लोक निघून गेले. आपटे गुरुजी माझ्यासमोर येऊन बसले आणि म्हणाले, " वामनराव, काय दाखविलेंत हें. ह्या जीवनांतून आम्ही प्रत्यक्ष गेलों आहोंत. एक क्षण असा आला कीं मी तुम्हांला ओरडून सांगणार होतों कीं " पुरें करा, आतां हें सहन होत नाहीं." मी तें ऐकून आनंदित झालों. राजकीय बंदी म्हणून आपटे गुरुजींना जी भावना निर्माण झाली तशी तो अनुभव नसलेल्यांना उत्पन्न होणें शक्य नाहीं. आपटे गुरुजींइतका समरस होणारा श्रोता मिळणें हें एक महाभाग्यच आहे.

थकून रात्रीं मी बिछान्यावर पडलों. मला झोंप लागली. पायाला कुणाचा तरी स्पर्श झाला आणि मी जागा झालों. पाहातों तों आपटे गुरुजी माझे पाय दाबीत आहेत! मला शरम वाटली. त्यांनीं मला सांगितलें, " तुम्ही थकला आहांत. मला तुमचें अंग दाबूं द्या. तुमचा थकवा कमी होईल. संकोच करूं नका." मी अगतिक होऊन स्वस्थ पडलों आणि आपटे गुरुजी अंग चेपीत राहिले. माझ्या आयुष्यांतला तो एक विलक्षण अनुभव होता. माझ्यापेक्षां वय, विद्वत्ता व तपस्या सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ असलेल्या आपटे गुरुजींच्या त्या सेवावृत्तीनें मी थक्क झालों. माझ्या आयुष्यांत मी तो अनुभव विसरूं शकत नाहीं. आपल्या सहानुभूतीनें आपटे गुरुजींनीं माझ्यावर केवढा उपकार केला आहे ह्याची मला कल्पनाच करतां येत नाहीं.

त्या वर्षी गणेशोत्सवासाठीं मला एक नवीन विषय मिळाला. 'टेरेन्स मॅक्स्विनी' ह्या आयरिश देशभक्ताचें थरारून सोडणारें चरित्र मी सांगत असे. शिक्षा सांगणाऱ्या न्यायाधीशाला मॅक्स्विनीनें दिलेलें उत्तर टिळकांनीं दिलेल्या उत्तराशीं तुल्यबळ आहे. बंदीवासांत त्यानें केलेलें प्राणांतिक उपोषण, त्या उपोषणांतील क्षीण शक्तीमुळें होणाऱ्या यातना आणि त्याचा तो तेजस्वी अंत वक्त्याला स्फुरण चढावें आणि श्रोत्यांना देशभक्तीचें अवसान यावें असाच तो विषय आहे. ह्या देशभक्तानें भाषा ही परतंत्र देशानें शर्थीनें लढविण्याची आघाडी आहे असा विचार हिरिरीनें प्रतिपादन केला आहे. मला स्वत:ला त्या विषयाचें जबरदस्त आकर्षण वाटलें. प्रा. श्री. ना. सी. फडके ह्यांनीं लिहिलेलें त्या देशभक्ताचें चरित्र वाचूनच मला विषयावर व्याख्यान देण्याची प्रेरणा झाली.

'The stage' by Lena Ashwell ह्या पुस्तकाचें वाचन करतांना नटाच्या सहा गुणांची केलेली नोंद मला उपयुक्त वाटली. ते सहा गुण असे : 1) A good voice, 2) Control over movement, 3) A good memory, 4) An iron will, 5) Sensitiveness, 6) A reasonable appearance. त्या सहा गुणांपैकीं iron will दुर्दमनीय इच्छाशक्ति ह्या संदर्भांत लिहिलेलें एक वाक्य अत्यंत परिणामकारक आहे......but if ones objective is the highest form of art, and something within commands and compels to that end, then the will should be strong enough to withstand discouragement, disappointment, difficulty, poverty privation, despair...... there must be no indolence or self-indulgence, but a persistent effort to master the personality and live a life that is full of work, full of creation. कलेचा हा हव्यास, ही दुर्घट उपासना ह्यांचा आमच्या समाजांतील अभाव हेंच मराठी रंगभूमीच्या अवकळेचें एक महत्त्वाचें कारण आहे अशी खात्री हें पुस्तक वाचून झाली.

'अभिजन मंडळ' ह्या कल्पनेचा महाराष्ट्रांत प्रचार करावा ह्या कल्पनेनें मला घेरलें आणि त्या वर्षीच्या दिवाळीच्या सुटींत मी तो कार्यक्रम आंखला. नागपूर ते जळगांव अशा कक्षेंत मी फिरलों. ● ● ●

## लेखांक अडतीसावा

# 'अभिजन-मंडळ' प्रचार व प्रवास

'अभिजन मंडळ' ह्या कल्पनेचा प्रचार करावा म्हणून मी आंखलेला दौरा २४ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर असा एकूण १८ दिवस झाला. मराठी रंगभूमीची रचना स्थिर पायावर व्हावी आणि त्यासाठीं महाराष्ट्रांत गांवोगांव नाटकें करणारीं व पहाणारीं अशीं संयुक्त मंडळें निघावींत. ह्या मंडळांचे सभासद सहकुटुंब सहपरिवार समाविष्ट व्हावेत व त्यांनीं 'नाटक' हा एक कुलधर्म म्हणून पाळावा असा ह्या कल्पनेचा आशय आहे.

१९३७ मध्यें सांगलीला जातांना जशी मनःस्थिति होती तसाच कांहींसा प्रकार ह्याहि प्रवासांत होता. मावशी असतांना मी वर्ध्यापर्यंत गेलों परंतु नागपूरला गेलों नाहीं. बाळूमामा प्रभुणे मला न्यायला आले परंतु केवळ आळसापायीं मी तें टाळलें. स्वभावतः मला प्रवासाची हौस नाहीं. स्टेशनवर येऊन प्रल्हाद औरंगाबादकरानें मला रात्रींच्या नागपूर मेलमध्यें चांगली जागा मिळवून दिली. 'तूं आतां झोप' असें सांगून तो गेला आणि तो ४००–४५० मैलांचा प्रदीर्घ प्रवास सुरू झाला. २५ तारखेला सकाळीं मी नागपूर स्टेशनवर उतरलों व कॉंग्रेसनगरमध्यें रहात असलेले प्रा. दादासाहेब बनहट्टी ह्यांच्या घरीं गेलों. गरम पाणी, तेल व साबण सर्व कांहीं बाथरूममध्यें आहे हें दाखवून बनहट्टी निघून गेले. मी यथास्थित स्नान केलें व भोजनोत्तर ४–५ तास झोप काढली. प्रवासाचा इतका शीणच

आला होता. नागपूरमध्यें मी तीन दिवस होतों. २६ तारखेला संध्याकाळीं युनिव्हर्सिटी कॉन्व्होकेशन हॉलमध्यें माझें भाषण झालें. अध्यक्षस्थानीं ॲ. केदार होते. ते आपल्या भाषणांत 'नट हे Loafers आहेत' असें म्हणाले. मी त्या विधानाचा तीव्र शब्दांत निषेध केला. भाषणाला ५–५० पेक्षां अधिक समुदाय नव्हता. ॲ. केदार नागपूरांतील फार मोठें प्रस्थ. माझ्यासारख्या सामान्य माणसानें त्यांचा निषेध करण्याचें धैर्य दाखवावें ही गोष्ट कित्येकांना रुचली – कित्येकांना रुचली नाहीं.

दि. २७।१०।४० ला रात्रीं सिटी कॉलेजच्या हॉलमध्यें माझा नाट्यदर्शनाचा कार्यक्रम झाला. श्री. चिमोटे ह्यांनीं –नटवर्य केशवराव दाते ह्यांचे नाट्य मन्वंतर मधले एक शिष्य ! – 'मेकअप'चें सामान देऊन मला मदत केली. 'अनन्ता' आणि 'सत्याग्रही' अशीं दोन जीवनचित्रें मी करून दाखविलीं. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गजाननराव माडखोलकर त्या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रा. बनहट्टी, डॉ. बरवे, श्री. गडकरी, श्री. गोमकाळे, श्री. बापूसाहेब जोशी इत्यादींनीं खूप परिश्रम घेतले. कार्यक्रम उत्तम झाला. सर्वांना तो आवडला.

२८ तारखेला संध्याकाळीं दोन तास मोहनी कुटुंबांत मी पाहुणचार घेतला. दत्तोपंत पुरोहितांचे एक सहाध्यायी त्याच कुटुंबांतील एक आहेत हें मला माहीत होतें. ज्यांनीं मला चहासाठीं बोलावलें त्या मोहनींची इच्छा मी त्या दिवशीं तेथें त्यांच्याकडे रहावें म्हणजे बाहेर गेलेल्या घरांतल्या 'बाबा लोकांना' माझा परिचय होईल व मी बोलतों कसा हें कळेल. आपल्या कुटुंबांतील मुलांवर कांहीं संस्कार हेतुशः करायचे ही त्यांची पद्धत मला विशेष वाटली. मला थांबणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्यांची निराशा झाली.

२९ तारखेला सकाळीं मी नागपूर सोडलें व वर्ध्यास उतरलों. प्रि. श्री. लोंढे ह्यांची भेट घेतली. परंतु त्यांनीं थंडें स्वागत केलें त्यामुळें प्रचार-कार्य झालें नाहीं. श्री. गंगाधरपंत कावळे ह्यांचा नवा संसार पाहिला. नव्या 'माईसाहेब' सुसंस्कृत आहेत – धीटपणें बोलतात. एका स्त्री–मंडळाच्या कार्यकर्त्या आहेत. त्यांच्या दोन मुलांनीं – बाळू व निळू ह्यांनीं – विशेष लोभ दाखविला. ३० तारखेला गांधींचा आश्रम पाहिला. ती वेळ संध्याकाळची होती. नित्यक्रमाप्रमाणें ते स्नानगृहाकडे निघाले होते. त्याच दिवशीं

जवाहरलाल नेहरू त्यांची भेट घ्यायला आले होते. मी त्यांच्या जाण्याच्या रस्त्यावर मुकाट्यानें उभा राहिलों. दोघेहि हंसत गोष्टी करीत आपापल्या उद्योगाला गेले. 'रोटी खाओगे' ह्या गांधींच्या प्रश्नाला नेहरूंनीं नकार दिला. दुसऱ्याच दिवशीं नागपूरला नेहरूंना अटक झाली.

३१ तारखेला मी उमरावतीला पोहोंचलों. बापूसाहेब जोशी ह्यांच्या भावाकडे मी उतरलों. नवीन बांधलेल्या बंगल्याची वास्तु शांत होती. ५–५० नातलग त्यासाठीं जमले होते. परका होतों तो मीच. परंतु बापूसाहेबांनीं व त्या सर्व कुटुंबीयांनीं मला घरांतला एक असेंच वागविलें. श्री. बंदे नांवाचे चित्रकला शिक्षक भेटले. मी झोपत असे त्यांच्याचकडे. श्री. आपटे ह्या शिक्षकानें माझ्या कार्यक्रमासाठीं फार मेहनत घेतली. तो दिवस भाऊबीजेचा होता. मी माझ्या आयुष्यांत घर सोडून दिवाळींत प्रथमच दूर होतो. त्याच दिवशीं संध्याकाळीं एका मुलींच्या शाळेंत एका वर्गांत माझें भाषण व नाट्यदर्शनाचा कार्यक्रम होता. अध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे! माझ्या परस्वाधीनतेमुळें व बापूसाहेब जोशी ह्यांच्या गैरसमजामुळें सभेच्या ठिकाणीं आम्ही अर्धा तास उशीरां पोहोंचलों. प्रवेशद्वारापाशीं आम्ही तर पटांगणाच्या दुसऱ्या टोंकाला आमच्या अक्षम्य विलंबामुळें रागावून निघालेले आमचे अध्यक्ष असा देखावा दिसला. मी बापूसाहेबांच्या लक्षांत ती गोष्ट आणून दिली. ते घाईघाईनें पुढें झाले व त्यांनीं बाबासाहेबांची समजूत करून त्यांना परतविलें. सभेला ५० पेक्षां अधिक लोक नव्हते. भाऊबीजेचा दिवस त्यामुळें जो तो आपल्या उद्योगांत होता. श्री. आपटे ह्यांनीं माझा परिचय करून दिला व बाबासाहेबांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली.

आमच्याकडून झालेल्या अकारण उशीरामुळें बाबासाहेब क्षुब्ध झालेले मला स्पष्ट दिसत होते. प्रसंग अवघड होता. अध्यक्ष स्थानापन्न झाले आणि त्यांनीं मला इषारा दिला, "बोला." अडलेल्या घोड्याला चाबूक बसावा तसा मला तो इशारा वाटला. दादासाहेब खापर्डे ह्यांची अगाध रसिकता, नाट्यकलेला त्यांनीं दिलेलें प्रोत्साहन अशा अनेक वर्णनाचे वळसे देत अध्यक्षांच्या रागाचा पारा खालीं यावा म्हणून मी प्रयत्न केले. ते अयशस्वी झाले. मी माझें प्रचाराचें भाषण संपविलें व बाबासाहेबांना समोर बसून माझ्या नाट्यदर्शनाचा कार्यक्रम पाहण्याची विनंती केली. मी 'सत्याग्रही' ही भूमिका

घेतली. माझ्या बहिणीपासून मी दूर होतों. कांहीं विलक्षण 'मूड'मध्यें मी शिरलों व माझ्या कलेचा अपूर्व आविष्कार झाला. मी बेभान झालों. कार्यक्रम संपला आणि बाबासाहेब उठून माझ्यापाशीं आले. माझा हात हातांत घेऊन ते म्हणाले, "पुरोहित, मी पुष्कळ नाटकें पाहिलीं आहेत. परंतु तुम्ही जें दाखविलेंत तें मला कुठेंच पहायला मिळालें नाहीं. शाब्बास." मी धन्यतापूर्वक ती शाबासकी स्वीकारली. एका मोठ्या पेंचप्रसंगांतून मला माझ्या कलेनें सहीसलामत सोडविलें. त्या कलेचा गौरव मी कसा करूं?

All is well that ends well हें खरें. दुसऱ्या दिवशीं बापूसाहेबांच्या आग्रहावरून त्यांच्या कुटुंबीयांपुढें मी तोच कार्यक्रम करून दाखविला. अर्थात आधल्या दिवशींचा 'मूड' आला नाहीं. श्री. अ. तु. वाळके हे गृहस्थ मला भेटून साहाय्य करण्याचें आश्वासन देऊन गेले.

उमरावतीहून मी अकोल्यास गेलों. शांताबाई समुद्र – श्री. गोरवाडकर ह्यांच्या भगिनी – ह्यांच्याकडे मी उतरलों. भाऊसाहेब समुद्र कॉलेजमध्यें माझे समकालीन. त्या दोघांनीं मोठ्या अगत्यानें माझें स्वागत केलें. श्री. गोडबोले वकील – तेथील एक कार्यकर्ते ह्यांची भेट घेऊन 'सीताबाई आॅर्टस् कॉलेजमध्यें' कार्यक्रम ठरविला. रात्रीं कार्यक्रमाला गर्दी खूप होती. परंतु कांहीं कारणानें माझें मन अप्रसन्न झाल्यानें मला यशस्वी कार्यक्रमाचें श्रेय लाभलें नाहीं. कर्तव्य केलें एवढीच समाधानाची कमाई घेऊन मी बाहेर पडलों.

थिऑसफी लॉज् आणि सार्वजनिक वाचनालय ह्या दोन संस्था मला पहावयास मिळाल्या. श्री. चिपळूणकर वकील गेलीं ३६ वर्षें अत्यंत निष्ठेनें थिऑसफी लॉज्चें काम पाहत होते. धार्मिक विषयावरील एक नमुनेदार ग्रंथालय तयार करण्यांत व तें चालविण्यांत त्यांनीं दाखविलेली चिकाटी असामान्य आहे. २५–२६ विषयांवरील व्याख्यानें तयार करून केव्हांहि बोलण्याची त्यांची तयारी आहे. स्वतः भाऊसाहेब समुद्र ह्या पंथाचे एक आस्थेवाईक अनुयायी आहेत. अंतर्बाह्य सौजन्यानें ओथंबलेल्या समुद्र–पतिपत्नींचा निरोप घेतांना मला वाईट वाटलें. श्री. चिपळूणकर वकील त्यांच्या कार्यपद्धतींतून मी स्वतः कांहीं बोध घेतला हीच ह्या मुक्कामांतील माझी कमाई! ह्याच गांवीं एक योगायोग माझ्या लक्षांत आला. नागपूर, उमरावती, वर्धा, अकोला ह्या प्रत्येक ठिकाणीं श्रीमत् रामकृष्ण परमहंस ह्या विभूतीचें

दर्शन मला घडत गेलें. त्या जगद्वंद्य विभूतीचा अनुग्रह व्हावा अशी माझी किंचितहि योग्यता नाहीं हें जाणूनहि मला त्या योगायोगाचें नवल वाटलें.

५ नोव्हेंबरला सकाळीं मी जळगांवला पोहोंचलों. बळवंतराव पळशीकर– माझे कॉलेज स्नेही आणि साहित्यिक ह्यांनीं मन:पूर्वक माझें स्वागत केलें. सकाळीं बळवंतराव मला त्यांच्या दोनतीन स्नेह्यांकडे घेऊन गेले. त्यांत कोल्हटकर वकील, श्री. देशमुख व श्री. फडणीस हे प्रमुख होते. रात्रीं ९।। वाजतां कोल्हटकरांच्या दिवाणखान्यांत मी कार्यक्रमाला उभा राहिलों. प्रथम अभिजन मंडळाच्या कल्पना सांगितल्या आणि नंतर एका जिन्याच्या गज असलेल्या कठड्याचा आधार घेऊन "सत्याग्रही" दोन भागांत करून दाखविला. कार्यक्रम यशस्वी झाला. श्री. चिमोटे ह्यांची सूचना कार्यक्रमाचा वेळ थोडा कमी असावा – मी अंमलांत आणली. कार्यक्रम चालू असतां सिगरेट पिणाऱ्या एका वकिलाला धूम्रपान करूं नका म्हणून मी सांगितलें. त्यांनीं तें ऐकलें. कार्यक्रम आटोपून आम्ही घरीं आलों. रात्रीं १०।। वाजेपर्यंत गप्पा करीत बसलों. दुसऱ्या दिवशीं १ वाजतां मी धुळ्यास गेलों. तेथें नारायणराव कुलकर्ण्यांचे स्नेही श्री. भय्यासाहेब देशपांडे ह्यांना भेटलों. त्यांनीं एकंदर निराशजनक चित्र उभें केलें. मी कांहींसा गोंधळलों. तेवढ्यांत नाट्यकला प्रवर्तकमधले पाटणकर भेटले. त्यांनीं नवीन नाटक मंडळी काढून जगण्याची धडपड चालविली होती. युद्धाच्या धुमश्चक्रींत पाटणकर लहान लहान गांवीं फिरले पण त्यांनीं व्यवसायांत खंड पडूं दिला नाहीं.

७ तारखेला श्रीमती सौ. गिरजाबाई केळकर आणि अप्पासाहेब केळकर ह्यांची भेट घेतली. त्यांनीं माझी योजना ऐकून घेतली व स्वस्ति स्वस्ति असा आशीर्वाद दिला. 'पुरुषांचें बंड' ह्या नाटकाच्या लेखिका, नाट्य संमेलनाच्या एका अधिवेशनाच्या अध्यक्षा, उत्तम वक्त्या म्हणून मी गिरजाबाईंना ओळखीत होतों.

धोंडू कावळे ह्या माझ्या आप्ताच्या प्रयत्नानें संध्याकाळीं न्यू प्रताप मिलमधील 'लोकसेवा समाजा'च्या नाट्यप्रेमी सभासदांबरोबर बैठक होऊन चर्चा झाली. सर्वांनीं माझें म्हणणें अतिशय उत्सुकतेनें ऐकून घेतलें. त्या चर्चेतून एक महत्त्वाची गोष्ट घडली. आधल्या वर्षी सोन्याची पाटली

नाट्यप्रयोगाच्या वेळीं हरवली म्हणून नाटकच करावयाचें नाहीं असें म्हणणाऱ्या त्या मंडळींनीं माझें भाषण ऐकून नाटक करावयाचें असा निर्णय घेतला.

८ तारखेला दुपारीं १२ वाजतां मी चाळीसगांवला पोहोंचलों. चाळीसगांव माझी जन्मभूमि. माझ्या दौऱ्यापैकीं बहुतेक भाग संपला होता. चाळीसगांवला एकच महत्त्वाची मुलाखत झाली. सुप्रसिद्ध नाटककार व नाट्यटीकालेखक श्री. वसंत शांताराम देसाई ह्यांना मी माझी योजना सांगितली. त्यांनीं माझें म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें. श्री. जुन्नरकर वकील ह्यांना मी योजना सांगितली. कांहीं करावें असें त्यांना वाटलें. माझे मावसबंधु श्री. यशवंतराव देशपांडे ह्यांचा पाहुणचार घेतला. माझें मनापासून कौतुक करणारे मामा नव्हते – ती ताईमावशी नव्हती – मला मनापासून त्यांची आठवण येत होती. "मालवणचा मुलगा" म्हणून त्या आप्तांकडून माझें जें कौतुक होई तें पोट भरून टाकी. यशवंतरावांनीं सासरीं जाणाऱ्या मुलीची पाठवणी करावी तशी माझी पाठवणी केली. खानदेशांतला कापूस, तीळ, मिरच्या ह्यांचीं गांठोडीं बांधून दिलीं. मी मूक कृतज्ञतेनें सर्वांचा निरोप घेतला आणि घरीं आलों.

१० तारखेला सकाळीं अकरा वाजतां मी घरीं पोहोंचलों. दुपारीं बाबूराव मांडवगणे, प्रभाकर महाबळ, बाळासाहेब कानिटकर ह्यांच्या भेटी घेतल्या.

त्या अठरा दिवसांत जें घडलें त्याचा माझ्या मनावर इष्ट असाच परिणाम झाला. ठिकठिकाणीं माणसें कशीं रहातात, आतिथ्य कसें करतात, आणि एकमेकांना साथ कशी देतात हें मी पाहिलें– अनुभविलें. त्या दौऱ्याचा मी निष्कर्ष काढला तो असाच कीं मजबूत संघटनेचा अभाव हेंच मराठी रंगभूमीचें खरेंखुरें दुखणें आहे. मराठी नाटकाबद्दल समाजाच्या एका थरांत खूप प्रेम आहे. नाटकें व्हावींत असें त्यांना मनापासून वाटतें. गांवोगांव हौसेनें नाट्यप्रयोग करणारीं माणसें आहेत. परंतु त्यांच्या एकाकीपणामुळें त्यांच्या हौसेला जोर पोंहोचत नाहीं.

त्या दौऱ्यांत मला जें समाजदर्शन घडलें त्यांत मोहनी कुटुंब, श्री. चिपळूणकर वकील, समुद्र पतीपत्नी ह्यांनीं मला जीवनाचे आदर्श पाठ

दिले. हीं सर्व माणसें आपापल्या परीनें कामांत रमलीं आहेत. त्यांच्या कांहीं ज्वलंत निष्ठा आहेत आणि तेंच त्यांचें जीवन आहे. माझ्या निष्ठा वेगळ्या— माझा व्यवसाय वेगळा. हा विरोध अनेक वेळां मला जाणवला – जाचला. आपला व्यवसाय आणि आपल्या निष्ठा ह्यांचा समन्वय ज्यांच्या जीवनांत घडत असेल, "तेचि पुरुष दैवाचे !"

● ● ●

## लेखांक एकूणचाळीसावा

# कलावन्ताच्या व्यथा

**श्री.** रमाकान्त वेलदे ह्यांचें पत्र आलें कीं नाशिकला 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' भरवा. आपण सर्वप्रकारें साहाय्य करूं. १९४० ला आम्ही म्हणजे महाराष्ट्र नाटच मंदिरानें प्रकाशित केलेल्या 'माझी भूमिका' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत पुष्कळ साहाय्य केलें होतें. तें पत्र १९४१ च्या फेब्रुवारीं महिन्यांत आलें. १९४३ मध्यें व्हावयाचा मराठी रंगभूमीचा शत-सांवत्सरिक महोत्सव अजून लांब होता. महाराष्ट्र–नाटच–मंदिराच्या दृष्टीनें साहित्य–संमेलन भरविणें हा एक महत्त्वाचा प्रगतीचा टप्पा होता. त्या दृष्टीनें मी हालचाली करूं लागलों.

संघटना शास्त्राचें शिस्तबद्ध शिक्षण मी घेतलें होतें असें मुळींच नाहीं. परंतु सार्वजनिक कार्यांतला एक अलिखित नियम मी पाळीत आलों आहे. ज्या कार्यासाठीं ज्यांचें साहाय्य अंशत: कां होईना परंतु आवश्यक आहे त्यांच्या उंबऱ्यांत मी जाऊन उभा राही आणि मला पाहिजे तें सहकार्य मिळे. त्याप्रमाणें ५–६ जणांचें सहकार्य प्राथमिक अवस्थेंत लाभावें म्हणूनच मी फिरूं लागलों. त्यांत प्रा. र. श्री. जोगळेकर ह्यांच्याकडे गेलों असतां कांहीं उणादुणा हिशोब झाला. नाटचसंमेलनांत त्यांच्या वक्तृत्व ह्या गुणाला वाव देण्यांत आला नाहीं अशी त्यांची तक्रार होती. तसें घडलें हें खरें परंतु आमचा अनुभव अपक्व म्हणून तसें घडलें हें मी त्यांना समजावून सांगितलें व त्यांना तें पटलें. साहित्य-संमेलनासाठीं संपूर्ण सहकार्याचें आश्वासन त्यांनीं दिलें. वामनराव खरे,

तात्यासाहेब देवळालकर, बाळासाहेब कानिटकर ह्यांना मी भेटलों व त्यांनींहि तशीच आश्वासनें दिलीं.

प्रा. जोगळेकरांना घेऊन मी प्रा. पाटणकर ह्यांची भेट घेतली. वाङमय विहार मंडळ ही त्यांची संस्था. वाङमयविषयक कार्य करीत असतां त्या संस्थेनें साहित्य-संमेलनाचें निमंत्रण द्यावें-महाराष्ट्र नाटय मंदिर सर्वतोंपरी साहाय्य करील अशी विनंती प्रा. पाटणकर ह्यांना केली असतां ती त्यांनीं धुडकावून लावली. ती मुलाखत संपवून आम्ही खालीं उतरलों. प्रा. जोगळे-करांनीं सांगितलें कीं महाराष्ट्र नाटय मंदिरानें निमंत्रण द्यावें. आपण स्वतः महाराष्ट्र नाटय मंदिराचे निमंत्रक होऊं व त्यासाठीं सोलापूर येथें जाऊं.

मार्च महिन्यांत प्रा. जोगळेकर मुंबईला गेले. जातांना ते मला भेटून गेले. त्यावेळीं त्यांना अथवा मला चुकूनहि कल्पना आली नाहीं कीं त्यांची व माझी ती शेवटची भेट असेल. कांहीं दिवसांनीं जोगळेकर आजारी झाल्याची बातमी आली आणि दोनतीनच दिवसांत कळलें कीं आजार विकोपाला जाऊन त्या तरुण विद्वानाचा-प्रा. जोगळेकरांचा ऐन उमेदींत अंत झाला. माझ्या सार्वजनिक आयुष्यांतील तो अकल्पित अपघात मला सहन झाला नाहीं. स्वतःचा जवळचा आप्त जावा असें दुःख झालें. दुखवटयाच्या सभा झाल्या. आम्ही श्रद्धांजलि वाहिल्या. 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' ही उक्ति जोगळे-करांनीं सार्थ करून दाखविली. आपल्या निगर्वी आणि प्रेमळ स्वभावानें त्यांनीं आमच्या गांवांतील लहानमोठयांचीं मनें जिंकून घेतलीं होतीं. प्रसन्न व्यक्तित्व, वाणीची सोज्वलता आणि विद्येचें व्यसन ह्या दुर्मिळ गुणांचा संगम त्यांच्या ठिकाणीं झाला होता. त्या सर्व आठवणींनीं मी व्याकुळ झालों.

'नासिक हायस्कूल' ह्या नांवानें चालत असलेली सरकारी शाळा बंद करण्याचा निर्णय सरकारनें घेतला. त्या शाळेचे आम्ही माजी विद्यार्थी-आम्हांला आमची शाळा प्रिय होती. त्या शाळेचा सांगता समारंभ व्हावा असें आम्हांला वाटलें. योजना आंखल्या आणि आम्ही कामाला लागलों रमाकान्त वेलदे, वामनराव खरे, बापूसाहेब पंडित ह्यांनीं ह्या बाबतींत पुढाकार घेतला.

मे महिन्यांतली ती दुपार मला चांगली आठवते. गोळे कॉलनींतून मी घरीं परतत होतों. रस्त्यांत उन्हाची अशी लाही होती कीं आपण आगींतून

चालत आहोंत असें वाटलें. कुत्रेंसुद्धां रस्त्यांतून फिरकत नव्हतें. मला ऊन लागलें आणि मी आजारी पडलों. प्रथम साधा ताप, नंतर नवज्वर अशीं निदानें झालीं. मला सारखा घाम येई आणि अशक्तपणा बेसुमार वाढत होता. त्या तशा स्थितींतच मी समारंभाला गेलों. आचार्य अत्रे अध्यक्षस्थानीं होते. त्यांचें भाषण झालें. 'वंदे–मातरम्' राष्ट्रगीत सुरू झालें. मी उभा राहिलों आणि थोड्याच वेळांत भोंवळ येऊन पडलों. मी शुद्धीवर आलों तेव्हां समारंभ संपला होता. कुणाच्यातरी मोटारींतून मला घरीं पोहोंचविण्यांत आलें. माझ्याकडे सहसा न येणारे लोक समाचाराला येऊं लागले. भाऊंनीं डॉ. दामले ह्यांना एक दिवस आणलें. तास अर्धा तास त्यांनीं मला तपासलें. दुपारीं औषध न्यायला या असें भाऊंना सांगून ते निघून गेले. संध्याकाळीं भाऊ औषधासाठीं गेले. त्या वेळीं डॉ. दामले त्यांना म्हणाले, "चिरंजीव जिवंत आहेत कां ? आतां औषध न्या." त्यांनीं औषध पाठविलें आणि ते भाऊवर खूप रागावले. दुखण्याचें त्यांनीं निदान केलें–Sunstroke उष्माघात–येणारा घाम आणि वाढती अशक्तता ह्यांची उपपत्ति आतां लागली. त्यानंतर एक महिनाभर जें औषध मला प्यावें लागलें त्याची चव वर्णन करणें अशक्य आहे. मी त्या दुखण्यांतून बरा झालों. केसांचा काळा रंग जाऊन त्यांना पांढरेपणा आला. शाळा सुरू झाल्यानंतर एक महिन्यानें मी कामावर रुजू झालों.

हळूहळू अशक्तपणा कमी होऊन मी पूर्ववत् काम करूं लागलों. त्या आजारापूर्वीं मी पुण्यास 'मराठी अध्ययन–अध्यापन' परिषदेसाठीं गेलों. त्यावेळीं श्री. केशवराव दाते ह्यांची भेट झाली. मराठी रंगभूमीच्या शत–सांवत्सरिक महोत्सवासाठीं नेमावयाची समिति महाराष्ट्राची प्रातिनिधिक असली पाहिजे असा एक विचार त्यांनीं सांगितला. विठूकाका, नारायणराव ह्यांची भेट झाली. काकाजी जोगळेकर 'आठवणीचे खंदक' च्या तालमी घेत होते. एकच दिवसासाठीं मी मुंबईस गेलों असतां 'पुरोहित–पाटणकर' प्रकरण भालेरावांना सांगितलें. त्यांनीं माझें म्हणणें ऐकून घेतलें.

नित्य आणि नैमित्तिक ह्यांचें एक चमत्कारिक मिश्रण माझें जीवन असें मला वाटूं लागलें. व्याख्यानें देणें, नाटकांचें दिग्दर्शन करणें, कांहीं थोडें वाचन आणि जमेल तेव्हां लेखन हा माझा नित्यक्रम तर नाट्यसंमेलन,

साहित्य संमेलन ह्यासाठीं करावयाचीं कामें म्हणजे नैमित्तिक! प्रा. जोगळेकरांच्या मृत्यूनंतर मी त्यांचें जेव्हां जेव्हां स्मरण करी तेव्हां तेव्हां मला मनापासून वाटे कीं आपण विद्वान् व्हावें. परंतु नुसत्या वाटण्यानें विद्वान् पैदा झाले असते तर जगाच्या बाजारांत विद्वत्ता पैशापासरी विकली गेली असती. ज्या वयांत मी विद्वत्तेची अभिलाषा करीत होतों त्या वयांत ती माझ्या थाऱ्याला उभी रहाण्याइतकी अडाणी नव्हती.

ह्याच काळांत मी 'रुद्रवीणा' ह्या नांवाची एक लघुकथा लिहिली. ती सुचण्याचें कारण श्री. रामभाऊ कुंदगोळकर अथवा सवाई गंधर्व. प्रल्हाद औरंगाबादकरबरोबर मी त्यांच्या घरीं गेलों. कोपऱ्यांत गवसणी घालून ठेवलेल्या तंबोऱ्याकडे पाहून ते म्हणाले, "तंबोऱ्याकडे पाहिलें कीं अंगावर कांटा उभा रहातो." त्या एका वाक्यानें मी विचार करूं लागलों. ह्या कलावंताच्या कलेला साथ करणारें तें हत्यार त्याला भयानक कां वाटावें ? अब्दुल करीमखाँच्या ह्या शागीर्दाला गाण्याची धडकी भरावी हें काय आहे ? "खुदाके घर जाना–दरबारी गाना" असें म्हणून दरबारीचे आलाप घेत जीवनसमाधी घेणाऱ्या त्या कलावंताची ती धुंदी कोणीकडे आणि ही मृत्यूची भीति कोणीकडे ! मी त्या कथेला शेवट करतांना कलासागरांत विलीन होणें हाच कलावन्ताच्या जीवनाचा शोभणारा शेवट असा विचार मी मांडला, विविध वृत्तांत प्रसिद्ध झालेली ती गोष्ट अब्दुल करीमखाँचे नाशिकचे शिष्य श्री. रामभाऊ खाडीलकर ह्यांना मी वाचायला दिली. दुसऱ्या दिवशीं मी त्यांची भेट घेतली तर ते अस्वस्थ दिसले. ते म्हणाले, "तुमच्या ह्या गोष्टीनें माझ्या साऱ्या आठवणी चाळवल्या गेल्या. माझ्या मनांतला तो कलावंत विसरण्याचा प्रयत्न मी करीत आहे. मी ह्या गोष्टीनें अस्वस्थ झालों." तें विषादाचें बोलणें ऐकून मी स्तब्ध झालों.

जळगांवच्या बळवंतराव पळशीकरांना काव्याच्या ऊर्मि येतात आणि कुणी साथ देणारा नाहीं म्हणून त्या जिरतात. रामभाऊ खाडीलकर मनांत उसळणारे गाण्याचे सूर दरखास्त आणि कैफियत ह्यांच्या दडपणाखालीं मारून टाकतात. मराठी समाजांतील कलावंतांच्या ह्या व्यथा मला व्याकुळ करतात !

• • •

## लेखांक चाळीसावा

# मुंबईचें नाट्य-संमेलन

मुंबईच्या नाट्यसंमेलनाचा प्रचार करण्याची कामगिरी मजकडे देण्यांत आली आणि त्याप्रमाणें मी कामाला लागलों. त्या प्रचाराचें मुख्य स्वरूप म्हणजे नाट्यसंमेलनासाठीं प्रतिनिधि जमविणें हेंच होतें. नाशिकच्या अधिवेशनानंतरचें तें अधिवेशन म्हणून त्यांत आधींच्या अधिवेशनाचें इतिवृत्त प्रसिद्ध होणें आवश्यक होतें म्हणून मी तें लिहूं लागलों. छपाईचा प्रश्न श्री. रमाकांत वेलदे ह्यांनीं सोडवला. अलंकारिक भाषा, कल्पना विलास ह्यांचा उपयोग करून मी एक नमुनेदार इतिवृत्त बनविलें. वास्तविक इतकें करण्याची गरज नाहीं परंतु माझी हौस!

नाट्यसंमेलनाचें प्रत्यक्ष अधिवेशन नाताळच्या सुटींत झालें. वुइल्सन हायस्कूलच्या पटांगणांत मांडव देऊन अधिवेशनाची तयारी केली होती. आसन व्यवस्था खूपच गुंतागुंतीची होती. ती योजना आणि तिची कार्यक्षमता ही सर्व जबाबदारी होती. श्री. टिकेकर ह्यांची. भालेराव त्यासाठीं त्यांना 'मंडप प्रदीप' असें म्हणत. भालेरावांनीं निरनिराळ्या क्षेत्रांतील माणसें गोळा करून अधिवेशनाचें स्वरूप जास्तीत जास्त आकर्षक करण्याचा प्रयत्न केला. नटी, सूत्रधार ह्यांच्या प्रवेशानें अधिवेशन सुरू झालें. भार्गवराम आचरेकर आणि सरस्वती राणे ह्यांच्या प्रासादिक गायनानें प्रसन्न वातावरण निर्माण झालें. हा सगळा सोहळा आचार्य अत्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्यांनीं मराठी रंगभूमीच्या विकासाविषयीं अतिशय नाविन्यपूर्ण विचार


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ....................

मांडले. विशेषत: महाराष्ट्राची भौगोलिक रचना आणि नाटक ह्यांचा अन्योन्य संबंध त्यांनीं नाविन्यपूर्ण रीतीनें चर्चिला. आचार्य अत्रे ह्यांच्या मी ऐकलेल्या भाषणांपैकीं तें एक उत्कृष्ट भाषण होतें.

करमणुकीच्या कार्यक्रमांत डॉ. भालेरावांनीं एक धाडसी प्रयोग केला. 'तमाशा–लोकशिक्षणाचें एक प्रभावी साधन' हा विचार तमाशाचें एक प्रात्यक्षिक दाखवून त्यांनीं प्रेक्षकांपुढें उभा केला. तमाशाला आजचें सोवळें स्वरूप त्यावेळीं नव्हतें. श्री. नानिवडेकर ह्यांनीं ती जबाबदारी सांभाळली. त्यांनीं स्वत: सोंगाड्याची भूमिका घेतली. राधाबाई बुधगांवकर ह्या बाईंचा ताफा तमाशासाठीं बोलावला होता.

तमाशा हें तंत्र समजण्यासाठीं 'दौलत जादा' ह्या प्रकाराचें त्यांत प्रात्यक्षिक होतें. राधाबाईंच्या आवाजाची जात कांहीं विशेष आहे. पुरें तीन तास त्या एका बाईनें आपल्या साथीदारासह प्रेक्षकांची भरपूर करमणूक केली. त्या बाईच्या कलेविषयीं माझ्या मनांत विलक्षण आदर आहे.

नाशिकला राजेबहादूर ह्यांच्या बखळींत त्या मंडळींचा मुक्काम असतांना घडलेला हा प्रसंग आहे. नाटकमंडळ्या बहुतेक नामशेष झालेल्या. अशा स्थितींत नाटकांचे पडदे व इतर सामान मिळण्याची एकच सोय म्हणजे तमाशा. आमच्या शाळेचें स्नेहसंमेलनाचें नाटक म्हणजे 'शेंडीपासून तयारी असाच प्रकार असे. नाटकासाठीं पडदे मिळावे म्हणून दोनतीन शिक्षक बरोबर' घेऊन मी त्या बाईंच्या मुलाखतीला गेलों. रात्रीं ९ ची वेळ. शोध करीत त्यांच्या बिऱ्हाडापाशीं आम्ही आलों. आधीं निरोप पाठविला असल्यानें आम्हांला पाहतांच बाईंनीं आमचें स्वागत केलें. आम्हांला त्या हंसून म्हणाल्या, "थांबा जरा, पोरांची गंमत करूं." आम्ही होकार दिला. बाईंनीं 'खंड्या' म्हणून हांक दिली. त्याबरोबर कुडतें घातलेलें एक दहा वर्षांचें किरकोळ पोर समोर येऊन उभें राहिलें. एकच नव्हे तर तीन शिक्षक समोर पाहून तें पोर घाबरलेंच. त्यांतच बाईंनीं आवाज चढवून रागाचा संपूर्ण आविर्भाव दाखवून त्या कडाडल्या. "मेल्या, तुला शरम कशी वाटं ना? तुझे तीन मास्तर कागाळी घेऊन आल्याती कीं खंड्या अभ्यास करीत नाहीं." असेच आणखी प्रेमळ उद्‌गार (शिव्या) काढून बाईंनीं खंड्याची बोळवण केली. एका मोठ्या हॉलमध्यें म्हणजे अधिक अंतरावर भिंती असलेल्या खोलीमध्यें

नऊ बिछाने व त्यावर कमीअधिक वयाचीं मुलें झोपलीं होतीं. बाईंना आम्ही आमचें काम सांगितलें. मुलाच्या मास्तरांना नकार देणें बाईंना शक्यच नव्हते. बाईंनीं नाटकाचे पडदे देण्याचें मान्य केलें व त्याप्रमाणें दिले.

विद्यार्थी 'खंड्या' ह्याच्या तिसरीच्या वर्गांत न्यू इंग्लिशस्कूलमध्यें झालेला हा 'गुरु–शिष्यसंवाद' लक्षांत घेण्यासारखा आहे.

"सर, हा वर्गांत फाजीलपणा करतो." शिष्य नंबर एकची तक्रार ऐकून शिक्षक तथाकथित फाजीलपणा करणाऱ्या शिष्य नंबर दोनला दम भरतात व 'ये इकडे' असा हुकूम करतात. आरोपी जवळ येऊन उभा राहताच खटल्याची सुनावणी सुरू होते.

"काय रे, वर्गांत काय फाजीलपणा करतोस ?"

"सर, मी कांहीं केलं नाहीं." आरोपीचें उत्तर.

"काय फाजीलपणा केला रे यानें ?" फेर तपासणीचा प्रश्न व त्याला फिर्यादीचें उत्तर "सर, हा वर्गांत गाणं म्हणतो." त्यावर आरोपी दुरुस्ती करतो. "नाहीं सर, मी लावणी म्हणत होतों."

कोणाहि शिक्षकाचा संपूर्ण दम उखडून जाण्यासारखें तें उत्तर ऐकून शिक्षक क्षुब्ध होतात व पुन्हा प्रश्नांची सरबत्ती करतात.

"वर्गांत लावणी म्हणतोस ? म्हणजे तमाशाला जातोस कां तूं ?"

"हो, सर."

"तमाशाला जातोस ?" पुन्हां तोच प्रश्न मात्र अधिक रागानें.

"होय सर, रोज जातों." आरोपीनें उत्तर दिलें.

रोज तमाशाला जाणारा विद्यार्थी आपल्या शाळेंत, आपल्या वर्गांत ह्यापेक्षां ह्या पवित्र व्यवसायाची अधिक विटंबना ती काय असणार ? अशा विचारानें–सात्विक संतापानें त्रस्त झालेले शिक्षक त्या घोर अपराध्याकडे पाहून म्हणतात, "अरे कारट्या, रोज तमाशाला जाऊन करतोस तरीकाय ?"

"कडी वाजवितों–साथ करतों."

मर्यादा सुटलेला सागर खवळावा त्याप्रमाणें खवळून शिक्षक विचारतात, "हें सांगायला तुला लाज नाहीं वाटत ?"

"मी काय करूं सर ? माझी आई तमाशांत आहे." आरोपीची ती जबानी ऐकून शिक्षक हतबुद्ध होतात.

राधाबाईचा तो मुलगा खंडेराव आणि मातोश्री राधाबाई असा हा गुरुशिष्य संवाद घडला. त्या परिचयाचा फायदा घेऊन आम्ही नाटकासाठीं पडदे मिळविले.

गेलीं कित्येक वर्षें मी माझ्या विद्यार्थ्यांना वेळप्रसंगीं राधाबाईंच्या आवाजाची शिफारस शिकवीत असतांना करीत आलों आहे. मनांत घर करून बसणारे जे थोडे आवाज मी ऐकले आहेत त्यांपैकीं एक आवाज राधाबाईंचा आहे. अगदीं अलीकडे म्हणजे एक वर्षापूर्वीं त्या बाईंचा कार्यक्रम ऐकण्याची व पाहण्याची दोनदा संधि मिळाली. वरील गुरुशिष्य संवादांतील शिष्याला पहावें अशी एक इच्छा होती. तेथें पेटी वाजविणारा तोच तो विद्यार्थी असावा असा मनाशीं अंदाज केला. परंतु प्रत्यक्ष खात्री झाली ती नासिकरोडला आमच्या शाळेंत महाराष्ट्र राज्य प्रचारक शिबिरांत राधाबाईंचा कार्यक्रम झाला त्यावेळीं. मी तो कार्यक्रम तर पाहिलाच परंतु दुसऱ्या दिवशीं शाळेंत जाऊन बाईंची भेट घेतली. खंडेराव व्यवस्थापक असलेल्या त्या संचांत राधाबाईंच्या चार मुली व चार मुलें भाग घेतात. नाच, गाणें आणि साथ सर्वजण तयार आहेत. राधाबाईंनीं आपल्या मुलामुलींना शिक्षण दिलें आहे तें आपल्या नृत्यगायन कलेचें. आंध्र राज्यांत त्यांचें घर आणि शेती आहे. महाराष्ट्र सोडून तिकडे कां गेलांत म्हणून विचारलें तर त्यांनीं उत्तर दिलें, "मुलूख चांगला आहे–माणसं चांगलीं आहेत." एका कुटुंबांतील हीं बारातेरा माणसें कलावंत आहेत. महाराष्ट्राला अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. बारीकराव हा एक अक्कलवान् मुलगा आहे. वात्सल्यपूर्ण दृष्टीनें पहाणारी राधाबाई आणि त्यांची कलावंत मुलंमुलीं हें एक रंगमंचावर दिसणारें अविस्मरणीय दृश्य आहे.

मुंबईच्या नाट्यसंमेलनाच्या अधिवेशनांत नटवर्य केशवराव दाते ह्यांनीं केलेलें एक भाषण असेंच अविस्मरणीय आहे. त्या भाषणाची मध्यवर्ती कल्पना अशी कीं नटांना रहायला जागा द्या–नाटकें करण्यासाठीं जागा द्या. पूर्वींचीं नाटकाचीं बहुसंख्य थिएटरें बोलपटांच्या स्वाधीन झालेलीं आणि त्यामुळें नाटकें करायला सोय नाहीं. केशवरावांनीं अतिशय तळमळीनें ती हांक दिली. गेल्या वीस वर्षांत असा जमाना बदलला आहे कीं सरकार, शिक्षणसंस्था रंगमंदिरें, बांधीत आहेत तर नाटकें खेळायला नट नाहींत.

ह्याच अधिवेशनांत केशवरावांनीं कांचनगडची मोहना ह्या नाटकांतील प्रतापरावाचीं स्वगतें सटीक म्हणून दाखविली. प्रत्येक स्वगतापूर्वी श्री. प्रभाकर गुप्ते त्या स्वगताची पार्श्वभूमि निवेदन करीत आणि नंतर प्रवेश करून केशवराव तें स्वगत म्हणत. हा कार्यक्रम अत्यंत उद्‌बोधक झाला.

सांगली येथें १९४३ मध्यें मराठीं रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव करण्याचा ठराव त्या अधिवेशनांत करण्यांत आला. त्याबरोबरच त्याला जोडून नाट्यसंमेलनाचें अधिवेशन त्याचवेळीं घेण्यांत यावें असें ठरलें. मुंबईच्या त्या अधिवेशनानें व्यक्तिश: माझे दोन फायदे झाले. डॉ. भालेराव नाट्यविषयक चळवळीला मिळाले. असा कार्यकर्ता झाला नाहीं–पुढें होणार नाहीं हें त्रिवार सत्य आहे. रुपये पन्नासवर रखडणाऱ्या मराठी नटांना एका प्रयोगाला रुपये दोनशें तीनशें पर्यंत मिळवून देण्याचें श्रेय व धाडस डॉ. भालेराव ह्यांचेंच आहे.

प्रा. न. र. फाटक ह्यांचा परिचय हा दुसरा लाभ होय. १९४२ च्या जानेवारींत महर्षि माधवराव रानडे ह्यांच्या शतसांवत्सरिक महोत्सवाला प्रा. फाटक ह्यांनीं व्याख्यानासाठीं यावे अशी विनंती करायला मी गेलों. ती मुलाखत घेतांना मी वागलों तों द्वाडपणानेंच ! त्यांनीं माझें सगळें बोलणें ऐकून घेतलें आणि मला सांगितलें, "मी व्याख्यानाला येईन." त्यांच्या या संमतीला बऱ्याच प्रमाणांत कारण म. म. पोतदार आहेत हें नंतर मला कळलें. त्या परिचयांतून माझ्यावर लोभ करणाऱ्या एका व्यासंगी विद्वानाचा सहवास मधून मधून मला मिळूं लागला हें माझें थोर भाग्य असेंच मी समजतों.

● ● ●

लेखांक

अेकेचाळीसावा

# बेचाळीसावें गाजलेलें साहित्य-संमेलन

महाराष्ट्र नाट्य मंदिरानें साहित्य संमेलनाला निमंत्रण दिलें त्याचा स्वीकार झाला. १९४२ साल उजाडलें आणि मंदिराचे कार्यकर्ते त्यासाठीं हालचाल करूं लागले. १८ जानेवारी १९४२ ह्या दिवशीं महर्षि महादेव गोविंद रानडे ह्यांचा जन्मशताब्दि महोत्सव नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयांत मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांचें विचारपरिप्लुत भाषण झालें. रानडे ह्यांचे चरित्रलेखक साऱ्या महाराष्ट्रांत फक्त नाशिक येथेंच प्रवक्ते म्हणून बोलले हें ह्या कार्यक्रमाचें वैशिष्ठ्य होतें. सातारा ते नाशिक ह्या प्रवासांत एक संपूर्ण दिवस घालवून प्रा. फाटक नाशिकला आले. पार्ले येथें ते संध्याकाळीं जाऊ शकले नाहींत. व्याख्यान संपल्यावर त्यांनीं मला व्याख्यानाबद्दलचा अभिप्राय विचारला. "तुमच्या अपेक्षा कांहीं अंशानें पुऱ्या झाल्या कां ?" मी सांगितलें, "शंभर टक्के."

ह्या समारंभानिमित्त एक संघटना करून रानडे ह्यांच्या कार्याचा परिचय अधिक व्यापक स्वरूपांत करून द्यावा असें आम्ही योजिलें. १८ तारखेला सार्वजनिक वाचनालयाचा मुख्य चिटणीस ह्या नात्यानें मी आगामी साहित्य-संमेलनाची घोषणा केली व सर्वांना सहकार्याची विनंती केली. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन सर्वच थरांतील मराठी विषयाच्या शिक्षकांची एक संघटना करावयाची व नाशिकमध्यें निरनिराळ्या केंद्रांतून व्याख्यानें घडवायचीं त्यासाठीं मराठी शाळा निवडल्या. वक्ता आणि रानडे

ह्यांची प्रतिमा आम्ही द्यावयाची. अध्यक्ष आणि श्रोते त्या केंद्रानें पुरवायचें. असा श्रमविभाग आम्ही ठेवल्यानें कार्यक्रम व्यवस्थित होत गेला. सहासात वेगवेगळ्या वक्त्यांनीं भाषणें अभ्यासपूर्वक केलीं. समारोप न्यू इंग्लिश--स्कूलच्या चौकांत प्रि. श्री. टी. ए. कुलकर्णी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. येथील जुन्या पिढींतील एक उत्तम वक्ते श्री. भाऊसाहेब पाटणकर ह्यांनीं भाषण केलें. प्रत्येक शाळेंतून बोलावलेल्या विद्यार्थ्यांची एकूण उपस्थिति दीड हजार होती. त्यामुळें सभा जोरदार झाली. अध्यक्षांनीं आमच्या उपक्रमाची शिफारस केली.

साहित्यसंमेलनाच्या अधिवेशनाची उभारणी मुख्यतः विद्यार्थ्यांच्या संघटनेवर व्हावी अशी आमची कल्पना होती. रानडे महोत्सवाच्या कारणानें आम्ही त्या कल्पनेची चांचणी घेतली. हुरूप वाटावा असाच तो कार्यक्रम झाला. प्रारंभ तर ठीक झाला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेप्रमाणें निमंत्रक संस्थेला संमेलन-विषयक नियम करण्याचे अधिकार असतात. ज्या क्षणाला महाराष्ट्रनाटच मंदिराचें निमंत्रण स्वीकारलें गेलें त्या क्षणापासून साहित्यसंमेलनाचीं सर्व सूत्रें मंदिराच्या स्वाधीन झालीं. वाङमय–विहार मंडळाच्या कार्यकर्त्यांनीं आमचें सोयर–सुतक धरावयाचें नाहीं असें धोरण स्वीकारलें. साहित्य–संमेलन भरविण्याचा अधिकार नाटच मंदिराला काय असाहि टोमणा देण्यांत आला. त्या कार्यकर्त्यांना आमची एक उणीव स्पष्ट दिसत होती. ती म्हणजे संमेलनासाठीं लागणारा चारपांच हजार रुपयांचा निधि आम्ही कसा गोळा करणार ? त्यांची ती विचारसरणी तर्कशुद्ध होती. परंतु आम्ही जिद्दीला पेटलों आणि आमच्या गांवांतील पहिल्या दर्जाचे नागरिक व आमचे स्नेही नानासाहेब चांदवडकर आमच्या पाठीशीं उभे राहिले. खुद्द मंदिराच्या सभासदांत एकमत नव्हतें. खडाजंगीच्या बैठकी झाल्या. नाटचसंमेलनाचा कार्याध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष दोन्ही कामें मलाच करावीं लागलीं. आचार्य अत्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालींच हें अधिवेशन व्हावें असा एक आंतला विचार होता. ह्याहि विचाराशीं सर्वजण सहमत नव्हते. परंतु स्थानिक वाद झाला तो "स्वागताध्यक्षपदा"बद्दल. मी माझी भूमिका स्पष्ट केली. महाराष्ट्र नाटच–मंदिराचा सभासद मग तो कोणीहि असो. हाच स्वागताध्यक्ष होईल.

जबाबदाऱ्या जर मंदिरानें घ्यावयाच्या तर मानाचा वांटा कुणातरी तथाकथित प्रतिष्ठिताला कां असा माझा सवाल होता. ह्या संबंधांत बाळू कानिटकरानें केलेला स्वार्थत्याग मी कृतज्ञतेनें मान्य करतों. वामनराव खरे ह्यांच्या नांवासाठीं आग्रह धरण्यांत आला. परंतु तो टिकला नाहीं. ज्या सभेंत स्वागताध्यक्ष म्हणून माझी निवड झाली तेथें चुरस नव्हती. एकमतानें मी स्वागताध्यक्ष म्हणून निवडून आलों.

अध्यक्षपदासाठीं तीन नांवें आलीं. साने गुरुजी, कृ. पां. कुलकर्णी आणि आचार्य अत्रे. साने गुरुजी भूमिगत असल्यानें त्यांची निवड करणें अव्यवहार्य होतें. वामनशास्त्री दातार आमच्या कार्यकारी मंडळाचे एक सदस्य होते. त्यांनीं मला मोकळ्या मनानें विचारलें कीं तुमची काय योजना आहे. मी आचार्य अत्रे ह्यांचें नांव सांगितलें. ते म्हणाले, कीं प्रा. कुलकर्णी हेंच अधिक योग्य आहेत व मी त्यांना मत देईन. त्या निवडणुकीच्या निमित्तानें सार्वजनिक कार्यांतला एक मौल्यवान वास्तुपाठ वामनशास्त्र्यांनीं मला दिला. मतमोजणी झाली आणि आचार्य अत्रे प्रचंड बहुमतानें निवडून आले. रमाकांत वेलदे ह्यानें खूप परिश्रम करून स्वागत मंडळाचे सभासद मिळविले व निवडणूक जिंकण्याचें सर्व श्रेय त्याचेंच आहे. त्या निवडणुकीनंतर वामनशास्त्र्यांनीं मला स्पष्ट सांगितलें, "अत्रे निवडून आले. आमचा विरोध संपला. आतां आमचा अध्यक्ष–म्हणूनच आम्ही त्यांचा मानसन्मान ठेवूं." सार्वजनिक कार्यांतील हें औदार्य दुर्मिळ आहे.

८ ऑगस्ट १९४२ ला 'चलेजाव'चा ठराव झाला आणि सारें वातावरण राजकीय प्रक्षोभानें पेटून निघालें. मुंबईच्या वृत्तपत्रांनीं हा प्रक्षोभ आणखी पेटावा म्हणून नाशिकला भरावयाच्या संमेलनावर विरोधी टीका करण्यास सुरुवात केली. रोम जळत असतां नीरो फिडल वाजवितो तसाच कांहींसा अनौचित्याचा प्रकार आम्ही संमेलन भरविणारे करीत आहोंत असा त्या टीकेचा आशय होता. हा विरोधी सूर वाढूं देणें घातक होतें. म्हणून मी तांतडीनें मुंबईस गेलों. 'नवयुग' कार्यालयांत पत्रकारांची एक खास बैठक घेतली. स्वतः आचार्य अत्रे एक पत्रकार म्हणून त्या बैठकीला हजर होते. १०–१५ पत्रकार जमले. त्यांच्यापुढें मी संमेलन भरविणारांची भूमिका मांडली. "साहित्य–संमेलन ही चैन नव्हे. सगळीं राजकीय व्यास-

पीठें सरकारनें बंद केल्यानंतर आम्ही हें व्यासपीठ तयार करीत आहोंत. सर्व परिणामांची जबाबदारी आम्ही स्वीकारीत आहोंत. धान्य, साखर इत्यादि दुर्मिळ वस्तु आम्ही गोळा करीत आहोंत. आपण विरोध न करतां आम्हांला पाठिंबा द्यावा अशी संमेलनाच्या कार्यकर्त्यांची विनंती आहे." माझ्या त्या भाषणाला प्रथम पाठिंबा दिला तो श्री. पां. वा. गाडगीळ ह्यांनीं. त्यांनीं आमची भूमिका यथायोग्य विशद केली आणि साहित्यसंमेलनाचा अपमृत्यु टळला. दुसऱ्या आठवड्यांत मुंबईच्या वृत्तपत्रांत सूर बदलला आणि संमेलनाला पोषक वातावरण निर्माण झालें.

वर्गणी जमवितांना नानासाहेब चांदवडकर आमच्याबरोबर वाटेल तेथें येत. मनुष्य स्वभावाचे कांहीं हृद्य अनुभव आले. एक सेवानिवृत्त सरकारी अधिकारी झक्क चार आणे वर्गणी देऊं लागले. आपल्याकडे आलेल्या सार्वजनिक कार्यकर्त्याचा अपमान करण्याची ती रीत पाहून चीड येते. परंतु सार्वजनिक कामांत न रागवण्याचें पथ्य पाळावेंच लागतें. तें कसेंहि असो आम्ही कसोशीनें प्रयत्न करून रुपये चार हजार गोळा केले. एका वकिलाच्या ऑफिसमध्यें रोज संध्याकाळीं आम्ही जमत असूं. तेंच आमचें कार्यालय. कानिटकरांनीं ही बाजू इतकी चोख सांभाळली कीं सांगतां सोय नाहीं. त्या तीन महिन्यांत आम्ही शेवगांठ्या बेचाळीस रुपयांच्या खाल्ल्या. म्हणजे रोजचा खर्च चार ते सहा आणे झाला.

डॉ. भालेरावांनीं साहित्यसंमेलनाच्या तारखा ठरविणें, कार्यक्रम तयार करणें ह्यासाठीं फार मार्मिक मार्गदर्शन केलें. निरनिराळ्या दिशांनीं येणाऱ्या प्रतिनिधींच्या प्रवासाच्या सोयी पाहून कार्यक्रम ठरवायचे असतात हें धोरण मी भालेरावांपासून शिकलों. विषयनियामक समितीसाठीं लागणारें छापलेलें साहित्य त्यांनीं मुंबईहून आणलें.

अधिवेशन जसजसें जवळ येऊं लागलें तसतसा मी अस्वस्थ होऊं लागलों. कां कुणाला ठाऊक पण ही एक जिवावरची जोखीम आहे असेंच मला वाटूं लागलें. स्वागताध्यक्षाचें भाषण तयार करतांना नाशिकमधल्या अनेक कलावंतांची माहिती मी परिश्रमपूर्वक जमा केली. वामनशास्त्री दातार व श्रीधरशास्त्री वारे ह्यांनीं महत्त्वाची माहिती दिली. जिनगर, तांबट, सुतार इत्यादि विविध क्षेत्रांतील लोकांना भेटून मी माहिती मिळ-

विली. स्टेशनवर, परगांवीं सवड मिळेल तसें व तेथें भाषण लिहून पूर्ण केलें.

अधिवेशनाची सुरुवात गोविंद कवींच्या 'सरस्वतीची भूपाळी' ह्या पदानें झाली. पंडितराव नगरकर ह्यांनीं अतिसुंदर चाल देऊन ती भूपाळी बसवून घेतली होती. भरदार साथ आणि मोहक चाल ह्यामुळें ती भूपाळी ऐकतांना श्रोते मंत्रमुग्ध झाले. वामनशास्त्री दातारांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहिले. स्वागतपर पद झालें. मी स्वागताध्यक्षाचें भाषण करण्यास उभा राहिलों. यथास्थित बोला असें आचार्य अत्रे ह्यांनीं सांगितलें. मी तें भाषण वाचलें. मराठी भाषेची शाळाशाळांतून होणारी उपेक्षा थांबली पाहिजे व त्यासाठीं परिषदेनें भरीव प्रयत्न केले पाहिजेत असा मुद्दा मी प्रतिपादन केला.

माझें भाषण चालू असतां निर्माण झालेलें वातावरण अधिवेशनाच्या दृष्टीनें पोषकच झालें. माझे वडील—ती. भाऊ प्रेक्षकवर्गांत बसून तें ऐकत होते. जवळपास गोपाळराव खरे बसलेले होते. त्यांनीं नंतर केव्हांतरी सांगितलें कीं भाऊंच्या डोळ्यांतून तें भाषण ऐकतांना पाणी येत होतें. ते अश्रू प्रेमाचे होते-आनंदाचे होते. ह्यापेक्षां अधिक कशाची अपेक्षा आयुष्यांत करावी ?

आचार्य अत्रे ह्यांनीं आपल्या भाषणांत मराठी भाषेचा गौरव तर केलाच परंतु चालू राजकारणाचे प्रतिध्वनीहि त्यांत उमटविले. भाषण चांगलें झालें. अत्रे त्यावेळीं कट्टर कॉंग्रेसभक्त होते. ते संपूर्ण खादीच्या पोषाखांत होते. श्री. भोळे व श्री. अत्रे चित्रमंदिर हें बोलपटगृह भागीदारींत चालवीत असल्यामुळें आम्हांला पुष्कळच सवलती मिळाल्या.

प्रतिनिधि निवास आणि विषयनियामक समितीच्या बैठकी न्यू इंग्लिश स्कूलमध्यें होत. माझे स्नेही प्रल्हादराव ह्यांनीं प्रतिनिधींसाठीं उत्तम तांदूळ आणि भरपूर साखर कोठून कोणाला ठाऊक मिळविलीं होती. मुंबईच्या प्रतिनिधींनीं भात खाऊनच ढेंकर दिला. एका राजकीय ठरावावर निर्माण झालेला मतभेद मिटविण्यासाठीं श्री. काकासाहेब लिमये ह्यांनीं दोघां विरोधकांना एका वर्गांत कोंडले आणि एकमत झाल्यावर त्यांना बाहेर येण्यासाठीं दार उघडलें.

'मानापमान'मधील धैर्यधर आणि भामिनी ह्या दोन्ही वेषांतील एकच नट रघुवीर सावकार! 'संशयकल्लोळ'मधील 'रेवती' ह्या भूमिकेनें महाराष्ट्राला कांहीं काळ वेड लावणाऱ्या ह्या नटाचें हें दुर्मिळ छायाचित्र नासिकचे श्री. बापूसाहेब सायगांवकर ह्यांच्या कृपेनें मिळालें.↓





↑ 'अमात्य माधव' ह्या नाटकांतील 'हंसेश्वरी' आणि 'अमात्य माधव' ह्या भूमिकांत श्री. रघुनाथराव गोखले आणि श्री. रामभाऊ गोखले. चित्ताकर्षक नाटक मंडळी आणि त्या मंडळीचे हे चालक आज इतिहास-जमा झाले आहेत. १९१४ मध्यें मी हा प्रयोग पाहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
अनुक्रम...................... विः ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..............

करमणुकीच्या कार्यक्रमाच्या दृष्टीनें दोन रात्रीं दोन कार्यक्रम केलें. एक नाटक व नृत्य. प्रल्हादरावांचे आप्त श्री. सुरेंद्र वडगांवकर ह्यांनीं एक-व्यक्ति (Solo) नृत्यें करून दाखविलीं. प्रा. श्री. वि. मा. दी. पटवर्धन ह्यांनीं आपल्या मुलीला सुमनला माझ्या 'झोंका' कवितेवरील नृत्य रुपये दोनशें खर्च करून शिकविलें त्याचा कार्यक्रम केला. प्रा. पटवर्धन ह्यांनींच लिहिलेल्या एका नाटकाचा प्रसंग आम्ही केला. त्यासाठीं पुण्याहून गंगूबाई नांवाची एक व्यवसायी नटी व कु. सुमन प्रल्हादरावांची कन्या ह्यांनीं भूमिका केल्या. मी केलेली भूमिका अत्यंत वाईट झाली. नक्कल धड पाठ नाहीं, मान-सिक व शारीरिक शीण अशा अवस्थेंत भूमिका चांगली व्हावी कशी ? एक अंक झाला आणि निम्मे प्रेक्षक उठून गेले.

ह्या अधिवेशनांत दोन संस्मरणीय गोष्टी झाल्या. एक म्हणजे नासिक हायस्कूलच्या मुलींनीं बसविलेला एक प्रवेश. मुक्त छंद पद्धतीनें त्या प्रवेशां-तील संवाद बोलले जात होते. लहान मुलींच्या तोंडीं तीं छोटीं छोटीं लयबद्ध वाक्यें कानाला अतिशय मधुर लागलीं. त्या प्रवेशाचें खूप कौतुक झालें

अधिवेशनाचा समारोपाचा भाग ज्वलंत राजकीय स्वरूपाचा झाला. तीं भाषणें ऐकतांना असा भ्रम व्हावा कीं चाललें आहे हें साहित्यसंमेलन कीं राजकीय बैठक ? मुंबईस वृत्तपत्रकारांच्या सभेंत मी जें बोललों त्याचें प्रत्यंतर त्या समारोपाच्या बैठकींत आलें.

अधिवेशन संपलें. निवासांत उतरलेल्या प्रतिनिधींना त्या तीन दिव-सांत मी एकदांहि भेटूं शकलों नाहीं. श्री. अमोणकर मला तेथें घेऊन गेले. औपचारिक रीत्या ते माझा परिचय करून देत होते व मी मला त्यांना प्रति-निधींना भेटूं शकलों नाहीं म्हणून दिलगिरी व्यक्त करीत होतों. सांगलीचे एक प्रौढ वकील श्री. विठ्ठलराव जोशी सपत्नीक आले होते. त्यांनीं मला प्रश्न केला, "तुम्ही कोण आहांत ?" मी उत्तर दिलें, "ज्या शाळेंत आपण उतरला आहांत त्या शाळेंतील मी एक शिक्षक आहे."

"मग स्वागताध्यक्ष कसे झालात ?" पुन्हां प्रश्न. "गेले तीन दिवस आपल्यासाठीं जे राबत आहेत त्या स्नेह्यांच्या बळावर" माझें उत्तर. त्यावर ते म्हणाले कीं आतांपर्यंतची प्रथा वेगळी आहे. कुणी लक्षाधीश, गांवांतला पुढारी नाहींतर सरकारी अधिकारी ह्यांच्यासाठीं ही राखीव जागा आहे.

एक सामान्य स्थितींतला शिक्षक साहित्यसंमेलनाचा स्वागताध्यक्ष होतो असें परिषदेच्या इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण आहे.

त्यांचें म्हणणें खरें होतें. मी एकटाच बसून जेव्हां जेव्हां त्या घटनेचा विचार करतों त्या त्या वेळीं माझ्या त्या निःस्वार्थी मित्रांनीं माझ्यासाठीं असा त्याग कां करावा हेंच मला कळत नाहीं. तें आत्मसंशोधन रुचकर नसलें तरी पथ्यकर खास आहे.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ..................... वि: ...................
क्रमांक ..................... नों: दि: ..............

## लेखांक बेचाळीसावा

# श्री क्षेत्र पडघवली

**श्री** क्षेत्र पडघवली ! कर्जत स्टेशनपासून ३५ मैल असलेल्या त्या वेळच्या भोर संस्थानांतील पडघवली ह्या गांवीं मी ७ फेब्रुवारीं १९४३ ह्या दिवशीं जाण्यास निघालों. बरोबर प्रभाकर महाबळ होता. मुंबईत मी भालेरावांच्या घरीं गेलों. गोमांतक मराठी साहित्य संमेलनाचें अधिवेशन वेगळ्या हॉलमध्यें चालू होतें. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष होते. तेथें गेलों त्यावेळीं ' श्री क्षेत्र पडघवली ' ह्या शब्दांनीं माझें स्वागत भालेरावांनीं केलें. माझ्या श्रद्धेचें इतक्या थोडक्यांत त्यानें केलेलें वर्णन ऐकून मला आनंद वाटला. तर्कतीर्थांना मी प्रथमच पहात होतों आणि ऐकत होतों. त्यांची विद्वत्ता मला कळण्यापलीकडची होती. परंतु त्यांचें वक्तृत्व प्रभावी होतें.

गोमांतकीय कलावन्तांचा सत्कार साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. वादनकार, चित्रकार, शिल्पकार, लेखक, गायक असे निरनिराळ्या क्षेत्रांतील कलावंत होते. गायक म्हणून वझेबुवांना मानाचें पान देण्यांत आलें. तात्यासाहेबांनीं त्यांना गाणें म्हणण्याचा आग्रह केला. " आपला शब्द मी कसा मोडूं ? परंतु म्हातारपणीं कुस्ती आणि गाण्याची बैठक वर्ज्य आहेत. " वझेबुवांनीं एक अभंग म्हटला. वृद्धाची असली तरी सिंहगर्जनाच ती.

८ फेब्रुवारीला सकाळीं मी मुंबईहून पडघवली येथें जाण्यास निघालों. श्री. राजाभाऊ केतकर माझी सोबत करीत होते. प्रभाकर महाबळ दादरला

भेटला. कर्जतला उतरून कर्जत–पाली ह्या मोटर सर्व्हिसनें आम्ही पडघवली येथें जाण्यास निघालों. तेथें जाणारे आणखी ८–१० यात्रेकरू होते. मुख्य रस्त्यापासून पडघवली गांव थोडें आंत आहे. श्री. मधु फाटक मला घ्यायला आले होते. त्यांच्याच आग्रहावरून मी निमंत्रण स्वीकारलें. गांवांत पोहोंचल्या-वर प्रथम गणपती दर्शन घेतलें आणि श्री. रामभाऊ फाटक–मधूचे चुलते ह्यांच्या घरीं मी मुक्काम केला. माझें सारें लक्ष संध्याकाळच्या माझ्या भाषणाकडे होतें. एका अपरिचित गांवांत मला बोलावयाचें होतें.

उन्हें उतरल्यावर सभेची सुरुवात झाली. मनांतल्या मनांत त्या गांवां-तील दोन दिवंगत व्यक्तींचें आवाहन मी करीत होतों. एक कै. नाना दिवेकर आणि दुसरी व्यक्ति कै. भाऊ फाटक–मधूचे वडील. पडघवलीच्या अखंड नाट्यपरंपरेचे हे दोघे संस्थापक आणि प्रवर्तक. मला मराठी रंगभूमीचा शंभर वर्षांचा इतिहास सांगावयाचा होता. प्रभाकर समोर श्रोत्यांत बसला होता. प्रास्ताविक, परिचय इत्यादि उपचार झाले. मी भाषण करावयास उभा राहिलों. माझ्या आयुष्यांतील एक प्रदीर्घ आणि अत्यंत यशस्वी भाषण मी केलें. संपूर्ण दोन तास मी बोललों. ग्रामदेवता, इष्टदेवता सर्वच जणू प्रसन्न झाल्या आणि मला त्या जणू बोलावीत होत्या. माझ्या भाषणाचें सूत्र अत्यंत विचारप्रक्षोभक होतें. "परंपरा चारित्र्यावर पोसल्या जातात" हें तें सूत्र ! १८८० मध्यें किर्लोस्कर नाटक मंडळी आणि पडघवलीचा "मित्र-समाज" ह्यांची स्थापना झाली. मी दोन्हींची तुलना केली. संचार व्हावा तसा मी बोललों. सर्व श्रोते तृप्त झाले–आकंठ जेवण व्हावें तसे तृप्त झाले. त्या एका भाषणानें मी त्या सर्वांचा आप्त बनलों. वक्तृत्वानें यक्षिणीची कांडी फिरवावी तसा एकंदर वातावरणांत बदल झाला. प्रभाकरनें माझ्या भाषणाचा रिपोर्ट घेतला. त्याला फार आनंद वाटला. मजबद्दलच्या अभि-मानानें त्याचें अंतःकरण भरून गेलें. मी अध्यक्ष आणि तो माझा साथी. प्रभाकरची ती साथ इतकी सर्वांगीण असे कीं आईच्या जपणुकीची आठवण व्हावी. अध्यक्षाच्या लहानसहान गरजांचा तर तो विचार करीच पण अध्यक्षांच्या प्रतिष्ठेच्या म्हणून त्याच्या कांहीं कल्पना असत. त्या प्रतिष्ठेला तो फार जपत असे. मी त्याची ती धडपड पहात होतों आणि परमेश्वरानें असा मित्र दिला म्हणून परमेश्वराचे उपकार मानीत होतों. वक्तृत्व ह्या एका

गुणाचें केवढें महत्त्व आहे ह्याची जाणीव त्या प्रसंगानें झाली व मला त्या गुणाची दीक्षा देणाऱ्या बाळू कानिटकराचे मी मनांत आभार मानले.

रात्रीं 'गणेश जन्म' झाला. पहांटें पांचपासून रात्रीं दोनपर्यंत मी जागा होतों. धरणीवर अंग टाकलें त्यावेळीं संध्याकाळच्या माझ्याच व्याख्यानाचे पडसाद मनांत उमटत असतांना मी झोपीं गेलों. आणखी दोन दिवस मी पाहुणा म्हणून राहिलों. ९ तारखेला 'ललीत' झालें. सुरुवात आणि शेवट कथेकरी करतो. मध्यंतरांत नाटक होतें. नाटकाच्या वेळीं रंगण्यापूर्वी १८८० सालांत ज्या समईच्या प्रकाशांत पहिल्या नाटकांतील नट रंगले ती समई पेटविली जाते व तिची पूजा होते. तिला वंदन करून सर्वजण रंगायला बसतात. 'मंगलमूर्ति नाम संकीर्तय मोरया' हा तेथला प्रसिद्ध घोष आहे.

सकाळीं पडघवलीपासून मैलभर अंतर असलेल्या जांभूळपाडा ह्या गांवीं गेलों. तेथें रामनवमीच्या उत्सवांत नाटक होतें. साऱ्या कोंकणभर ठराविक उत्सवाला नाटक करणारीं शेंकडों खेडीं आहेत. वऱ्हाडांतल्या एका मालगुजराची हकीकत समजली. दरवर्षी नवें नाटक लिहावयाचें—त्याचा प्रयोग करावयाचा. नंतर त्या नाटकाची वास्तपुस्त नाहीं. प्रसिद्धीची हांव नाहीं—गाजावाजाची अभिलाषा नाहीं. त्या गृहस्थानें चाळीस नाटकें लिहिलीं. त्यांचे प्रयोग केले आणि तीं फाडून टाकलीं. याच जांभूळपाड्यास कुणी एक साठे नांवाचा नट व्यवसाय निवृत्तीनंतर जाऊन राहिला. रोज संध्याकाळीं पडघवलीस तो गणपती दर्शनास जाई. त्या नाटकवाल्यानें आपल्या रसाळ गप्पांनीं तेथल्या तरुण मुलांत नाटक भिनविलें. भाऊ फाटक आणि नाना दिवेकर ह्यांनीं गणपतीच्या पायावर हात ठेवून शपथा घेतल्या, "आम्ही नाटक मंडळींत जाणार नाहीं. आम्ही देवापुढें नाटक करूं." त्या कठोर दिव्यांतून गेल्यावरच पडघवलीच्या प्रतिष्ठितांनीं त्या तरुण मुलांना देवासमोर नाटक करण्यास संमति दिली. १८८० पासून १९४३ पर्यंत ती परंपरा अखंड तेवत होती.

देवस्थान जागृत आहे असें दाखविणाऱ्या कांहीं अद्‌भुत कथा ऐकल्या. दिवेकरांच्या घरीं चहासाठीं गेलों तों पत्रावळी मांडलेल्या दिसल्या. गरम पोहे आणि त्यावर मसाले भातावर वाढतात तसें भरपूर तूप असा बेत पाहून मी चकित झालों. त्या अल्पोपहारानंतर ५०–६० स्त्रीपुरुषांसमोर 'सत्या-

ग्रही ' हें जीवनचित्र मी करून दाखविलें. दोन वर्षांपूर्वींच्या माझ्या त्या विलक्षण दुखण्यानंतर मी तें साहस प्रथमच केलें होतें. कार्यक्रम चांगला झाला. जेवणें झालीं. रात्रीं नाटक झालें तें 'प्रेम–विवाह'. मधु फाटक व दिवेकर ह्या दोघांनीं आठव्या एडवर्डचा राज्यत्याग ह्या विषयावर तें नाटक रचलें होतें. गांवकऱ्यांनीं दोघां नाटककारांचा सत्कार केला. प्रत्येकाला दोनदोनशें रुपये किमतीच्या चांदीच्या वस्तु भेट म्हणून देण्यांत आल्या. स्त्रियांच्या जागा राखून ठेवण्याची विशेष पद्धत मी तेथें पाहिली. एकेका घरांतील खाटा खुल्या पटांगणांत आणून ठेवल्या जातात. तान्हीं मुलें घेऊन स्त्रिया तेथें बसून नाटक पहातात. आजूबाजूच्या डोंगराळ प्रदेशांतील शेतकरी मोठ्या संख्येनें नाटक पहायला येतात. कांहीं कामचलाऊ पडदे व किटसनचे दिवे मित्रसमाजाच्या मालकीचे आहेत त्यावर नाटक होतें. विशेष कपडे लागले तर मुंबईहून तात्पुरते भाड्यानें आणतात. संगीत, गद्य, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक सर्व प्रकारचीं नाटकें ह्या ठिकाणीं झालीं आहेत. 'मानापमान' आणि 'स्वयंवर' अशीं संगीतप्रधान नाटकेंहि येथील हौशी नटांनीं केलीं आहेत.

उत्सवापूर्वीं दोनतीन महिने आधीं नाटक ठरतें. 'मित्रसमाजा' चा सेक्रेटरी 'चिठ्ठे' म्हणजे नाटकाच्या नकला त्या त्या माणसाला रवाना करतो. एकत्र अशी एकच तालीम होते आणि वसंतपंचमीला प्रयोग होतो. इतरवेळीं ज्या गांवांत दहा माणसें मिळण्याची मुष्कील तेथें ह्या उत्सवाला महाराष्ट्रांतून दोनअडीचशें स्त्रीपुरुष जमतात. सर्वचजण नाटकाच्या वेडानें भारलेले असतात. पडघवली हें गांव नसून 'घर' आहे अशा भावनेनें पडघवलीकर गोळा होतात आणि उत्सव संपला कीं गांवोगांव पांगतात.

'मित्रसमाजाची' वार्षिक सभा गोपाळ भोजनापूर्वीं षष्ठीला होते. ह्या सभेंत अटीतटीचे तंटे होतात, वर्षाचा देण्याघेण्याचा हिशेब होतो आणि नवीन वर्षाचें कार्यकारी मंडळ निवडलें जातें. सभा संपली कीं सर्वजण गोपाळ-भोजनासाठीं उठतात. फाटक, दिवेकर, मोडक, डोंगरे, आठवले, केतकर हीच ह्या गांवचीं प्रमुख कुटुंबें आहेत. ह्या कुटुंबांतल्या विवाहित मुली मुला-बाळांना व पतीला घेऊन उत्सवाला येतात. केलेले नवस फेडतात. पडघवली-कर म्हटला कीं त्याला सर्व प्रकारचें साहाय्य द्यायला दुसरा पडघवलीकर

अलिखित नियमानें बांधलेला असतो. मला षष्ठीची जी सभा पहायला मिळाली तिच्यापासून मी कितीतरी धडे शिकलों. हीं सर्व माणसें देववेडीं आहेत असें म्हणण्यापेक्षां तीं सर्वजण नाटकवेडीं आहेत. वयाच्या आठव्या वर्षी प्रत्येक मुलाला 'सारजा' होऊन, लुगडें नेसून, मोरपिसें कमरेला बांधून नाचावें लागतें. त्या मुलाचा नाटकाचा 'श्रीगणेशा' असा सुरू होतों. तेंच मूल १२ वर्षांचें झालें कीं, 'गणपतीचें' सोंग घेऊन नाचूं लागतें. पडघवलीच्या नाटका-आधीं गणपती आणि सारजा नाचल्याशिवाय नाटक सुरूच होत नाहीं. ह्या गांवानें 'नाटक' अशा रीतीनें पिढ्यान् पिढ्या आपल्या रक्तांत भिनविलें आहे.

'गोपाळ भोजन' हा ह्या उत्सवांतला शेवटचा कार्यक्रम .तो झाला कीं गांव रिकामें होऊं लागतें. फांट्यावर जाऊन दाटीवाटीनें आम्ही एका मोटारींत बसलों. कर्जतपर्यंतचा तो प्रवास फार आनंदांत झाला. मुंबईला आलांत कीं आमच्या घरीं या असें प्रत्येकानें आग्रहाचें निमंत्रण दिलें. मी माझ्या पहिल्या दिवशींच्या भाषणांत समारोप करतांना सांगलीला या असें निमंत्रण दिलें होतें. कल्याण स्टेशनवर मी उतरलों तों भारावलेल्या अंतः-करणानें—माझ्या आप्तस्वकीयांना सोडून मी जात आहे अशा भावनेनें !

• • •

लेखांक त्रेचाळीसावा

# महोत्सव चक्राचे उलटसुलट फेरे !

**मा**र्च ते ऑक्टोबर १९४३ ह्या आठ महिन्यांत मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या हालचाली जशा जुळल्या तशा केल्या. उत्सवसमिति आणि नाट्य-समिति ह्या दोन्हींचा सेक्रेटरी ह्या नात्यानें माझ्यावर दुहेरी जबाबदारी होती. डॉ. भालेराव आणि भगवान् पंडित हे दोन माझे पक्के सहकारी– त्यांच्याच बळावर दोन्ही समित्यांचीं कामें सिद्धीस गेलीं. म्हणजे उत्सव झाला आणि नाटकहि झालें.

प्रत्येकाचा थोडा थोडा तपशील देतों. पहिली अडचण अशी कीं ह्या उत्सवाचे आम्ही तीन कार्यकर्ते तीन निरनिराळ्या गांवीं रहात होतों. भालेराव मुंबईस, भगवान पुण्यास तर मी नाशिकला. उत्सवस्थळ सांगली आमच्यापासून चारशें मैलांवर. ह्या कार्यकर्त्यांचा समन्वय होईल तेव्हांच योजना आंखली जायची नी पार पडायची. केव्हां मुंबई तर केव्हां पुणें असें मला नाशिकहून जावें लागे. भालेरावांचें पत्र किंवा तार आली कीं मी निघत असे. एक दिवस दोन दिवस राहून परत येत असे.

महायुद्धाच्या ऐन धामधुमींत आमची रंगभूमीच्या पूजेची तयारी चालू होती. केशवराव दाते, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर आणि नारायणराव बालगंधर्व ह्या चार मातबर नटांचें सहकार्य मिळविणें हा आमच्या कार्यांतील पहिला टप्पा होता. त्यांत गणपतराव बोडस सांगलीचे म्हणून त्यांच्याकडून सहकार्याची अधिक अपेक्षा. श्री. लोंढे ह्यांच्या राजाराम

संगीत मंडळीमध्यें गणपतराव तालीममास्तर म्हणून होते. त्यांना ह्या उत्सवासाठीं जमणाऱ्या लोकांना धान्य कसें पुरवायचें हा यक्षप्रश्न पडला व अशा अवघड परिस्थितींत उत्सव करूंच नये असें त्यांनीं सांगितलें. श्री. केशवराव दाते ह्यांचा निश्चय कीं कसा कां होवो पण हा उत्सव याच वर्षीं झाला पाहिजे. खुद्द सांगलींत जें नेतृत्व होतें त्याला आवाहन करावयाचें तर गणपतरावांची शिफारस आवश्यक होती. केशवरावांनीं मला फार चांगला पाठिंबा दिला. भालेरावांच्या दवाखान्यांत आम्ही दोघांनीं ठरविलें कीं सांगलीच्या लोकांनीं उत्सव केला नाहीं तर ३१ डिसेंबरला सांगलीच्या शिवेवर उभे राहून घोषणा करावयाची कीं, "मी–केशव त्र्यंबक दाते–व्यवसायी नटांचा प्रतिनिधि आणि मी–वामन श्रीधर पुरोहित–हौशी नटांचा प्रतिनिधि–माते रंगभूमि, आम्ही तुला वंदन करतों–हीच आमची महापूजा. तिचा स्वीकार कर." अशी घोषणा करून बरोबरची भाजीभाकर खाऊन परत यावयाचे पण उत्सव झालाच पाहिजे. त्या कल्पनेनें मला फार हुरूप वाटला. गणपतरावांना आमचा तो निर्वाणीचा संकल्प आम्ही सांगितला आणि मग मात्र त्यांचें मन हललें. त्यांनीं स्वत: हा उत्सव झालाच पाहिजे व तोहि याच वर्षीं झाला पाहिजे असें पत्र लिहिलें. त्यालाच जोडून वरील संकल्पाचा उल्लेख करून मी एक पत्र लिहिलें. हीं दोन्ही पत्रें सांगलीचे गणपतराव गोडबोले वकील ह्यांना उद्देशून होतीं. त्यांचा व माझा परिचय उत्सवाच्या वेळीं झाला व त्यांनीं सांगितलें कीं माझ्या पत्रामुळेंच ते ह्या उत्सवाच्या भानगडींत पडले.

तें कसेंहि होवो परंतु उत्सवाचीं चक्रें सुलट दिशेनें फिरूं लागलीं हा त्या पत्रांचा परिणाम होय. परळ येथील दामोदर हॉलमध्यें आचार्य अत्रे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं हौशी नटांची संघटना व्हावी म्हणून एक सभा झाली. परळ भागांत अनेक हौशी नाट्यमंडळें आहेत. त्या सभेंत मी बोललों. शेवटीं सांगलीच्या महोत्सवाचा चिटणीस ह्या नात्यानें मी श्रोत्यांना महोत्सवाचें निमंत्रण दिलें. माझें भाषण संपलें आणि कुणालाहि कल्पना नाहीं अशा रीतीनें अध्यक्षांच्या समोर उभें राहून भालेराव बोलूं लागले. सर्वांना विस्मयाचा मोठाच धक्का बसला. सभेंत अशा रीतीनें भाग घेण्याचा भालेरावांचा शिरस्ता नव्हता. भालेरावांनीं माझ्या बोलण्याला भक्कम दुजोरा दिला.

त्या सभेंत मोठीं भाषणें झालीं तीं आमचीं दोघांचींच. मला फार आनंद वाटला. एका व्यासपीठावरचें आमचें तें सहकार्य मी कधींच विसरणार नाहीं. आचार्य अत्रे ह्यांनीं प्रभावी समारोप केला.

उत्सव होणार हें ठरल्यानंतर कार्यक्रमाची जबाबदारी आली. सांगली येथें दोन नाट्यप्रयोग करावयाचे व त्यासाठीं नटसंघ तयार करावयाचे ही नाट्यसमितीची म्हणजे आमचीच जबाबदारी. 'कीचकवध' नाटकाचा प्रयोग करावा ही कल्पना अत्यंत आकर्षक परंतु अडचण होती ती कीचक, भीम आणि सैरंध्री ह्यासाठीं योग्य माणसें मिळविण्याची. नानासाहेब फाटक कीचक, पार्श्वनाथ आळतेकर भीम आणि दुर्गाबाई खोटे सैरंध्री अशी योजना आंखली. भालेरावांचें संघटनाचातुर्य आणि प्रत्युत्पन्न बुद्धि ह्यांचा फार चांगला अनुभव मला आला. दुर्गाबाई मिळूं शकत नाहींत म्हणून सीतारामपंत जोशी ह्यांना विनंती करावयाची असा विचार केला.ज्या नाटकांत पुरुष स्त्री भूमिका करीत आहे त्यांत पार्श्वनाथ आळतेकर काम करणार नाहींत ही अडचण होती. दवाखाना संपल्यानंतर भालेराव आणि मी आळतेकरांची भेट घ्यायला भारतीय भुवनमध्यें गेलों. गॅलरींतच उभें राहून आमचें बोलणें झालें. आळतेकरांनीं आपला तात्विक विरोध सांगितला. त्यावर भालेरावांनीं सांगितलें, "अहो, आईसाठीं हें सोवळं नेसायचं." पार्श्वनाथांनीं मोठ्यानें हंसून संमति दिली. त्या एकाच वाक्यांत भालेरावांची रंगभूमीविषयक भावना आणि प्रत्युपन्न मति ह्यांचा उत्कृष्ट आविष्कार झाला असें मला वाटतें. भालेरावांना आलेले पेंचप्रसंग आणि त्यांनीं केलेली सोडवणूक हा एक संपूर्ण ग्रंथ होईल. श्री. सीतारामपंत जोशी ह्यांनीं नकार दिल्यामुळें आम्हांला 'कीचकवधा'चा नाद सोडावा लागला.

'शारदा' नाटकाचा प्रयोग करावा अशी दुसरी योजना आंखली. त्यासाठीं भालेराव व मी दोघे नारायणरावांकडे गेलों. "देवा, जिथें गणपतराव तिथं आम्ही" असें आश्वासन मिळालें. कोदंडाच्या भूमिकेसाठीं लोंढे व शारदेसाठीं नरेशला तयार करा असेंहि नारायणरावांनीं सांगितलें. गणपतरावांच्या मध्यस्थीनें आम्ही लोंढे यांना विनंती केली. लोंढे ह्यांनीं ज्या पद्धतीनें ती विनंती उडवून लावली ती पद्धत अपमानास्पद होती. अगतिक होऊन आम्ही तो अपमान गिळला इतकेंच.

नारायणरावांनीं मात्र निराळीच युक्ति केली. त्यांनीं नरेशला एक गौरवपर पत्र लिहून त्यानें 'शारदा' नाटकांत शारदेची भूमिका करावी असा त्याला आग्रह केला. त्या गौरवानें आणि आग्रहानें नरेश हुरळला व ज्याला त्याला तें पत्र दाखवून स्वतःचें कौतुक करून घेऊं लागला. नानांचा (बालगंधर्वांचा) शब्द आपण मोडणार नाहीं अशी भाषा तो बोलूं लागला. केशवराव दाते, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, चिंतोबा गुरव, स्वतः नारायणराव हीं माणसें शारदेंत कामें करणार आणि आपणच एकटे वगळले जाणार हें शल्य लोंढे यांना बोचूं लागलें. शेवटीं नारायणराव जर आपल्याला म्हणतील तर आपण कोदंडाची भूमिका करूं असा निरोप आम्हांला पोचेल अशी व्यवस्था त्यांनीं केली. नारायणरावांचें मानसशास्त्राचें ज्ञान सरस ठरलें. नारायणरावांनीं लगेच एक पत्र लोंढे ह्यांना लिहिलें. लोंढे ह्यांची संमति आली.

आतां सांगलीला जाऊन उत्सवाच्या तारखा व कार्यक्रम निश्चित करणें आवश्यक होतें. म्हणून भालेराव, वा. दा. गोखले, बापू नाईक, प्रल्हादराव आणि मी असे पांचजण सांगलीस गेलों. श्री. साधुदास ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एका शाळेंत सभा झाली. श्री. गंगूनाना कानेटकर, श्री. एस्. ए. कुलकर्णी इत्यादि सांगलींतील कार्यकर्ते जमले होते. श्री. वा. दा. गोखले ह्यांनीं भाषण केलें. कार्यक्रमाची तारीख व रूपरेषा ठरली. आम्ही सांगलीहून परतलों. प्रल्हादरावांनीं मिरज स्टेशनवर स्त्रियांच्या रिकाम्या इंटरच्या डब्यांत आम्हांला दडपून बसविलें व पुणें स्टेशनपर्यंतचा प्रवास आम्ही आरामांत केला.

सांगलीच्या महोत्सवाचें अध्यक्षपद बॅरिस्टर मुकुंदराव जयकर ह्यांना द्यावें अशा विचारानें भालेराव, गंगूनाना कानेटकरांना व मला घेऊन मलबारहिलवरील जयकरांच्या बंगल्यांत घेऊन गेले. अत्यंत कलात्मक दृष्टीनें सजविलेल्या त्या बंगल्यांत पाऊल टाकल्यापासून एक सुसंस्कृत मनाचा आविष्कार प्रत्येक पावलाला दिसूं लागला. जयकरांच्या बंगल्यांतील ती बैठक अविस्मरणीय झाली. नाटकांच्या अनेक रसाळ आठवणी जयकरांनीं आम्हांला ऐकविल्या. लहानपणीं खिशांत पिस्त्याचे पुडे न्यावयाचे व त्या पिस्त्यांचा फन्ना करीत नाटक पहावयाचें. भाऊराव कोल्हटकरापासून अगदीं आजपर्यंतच्या सर्व

संगीत नटांची हजेरी झाली. बोलपटानें संगीत भ्रष्ट करून टाकलें ही त्यांची तक्रार. चंदा नायकिणीचें लग्न झाल्यामुळें तिचें गाणें बंद झालें. अशा अनेक गोष्टी ऐकून चहा पिऊन व जयकरांची मान्यता घेऊन आम्ही बाहेर पडलों. नाट्याचार्य खाडीलकर ह्यांच्या अपंग स्थितीमुळें इच्छा असूनहि आम्ही त्यांचा विचार करूं शकलों नाहीं. जयकरहि नाहींत, खाडीलकरहि नाहींत– प्रत्यक्ष निवडले गेले ते स्वातंत्र्यवीर सावरकर.

सांगली येथें साहित्य संमेलन आणि नाट्य–संमेलन अशीं दोन अधिवेशनें ह्या महोत्सवाला जोडूनच भरणार होतीं. साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले प्रा. माटे आणि नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं माझे स्नेही नारायणराव कुलकर्णी ह्यांची निवड झाली. मला त्या गोष्टीचा फार आनंद झाला.

भालेरावांनीं मुंबईहून दीडशें प्रतिनिधिसाठीं डबा रिझर्व केला होता. त्यांतच आम्ही नाशिकचे अठराजण घुसलों. मुंबई–पुणें–नाशिक अशा त्रिकेन्द्र योजनेची जणू नांदीच अशी पाटी त्या डब्यावर फडकत होती. भालेरावांनीं ह्या प्रवासासाठीं किती प्रकारें तयारी केली. चहा, साखर, दूध, फराळाचे अनेक जिन्नस, पुणें स्टेशनवर दहीभात आणि बुंदीच्या लाडूचीं पोतीं–सांगलीपर्यंतचा प्रवास आम्ही अत्यंत उत्साहानें केला. महोत्सवाचे अध्यक्ष सावरकर त्याच गाडींत होते. आम्हा प्रतिनिधींची एकदांहि विचारपूस त्यांनीं करूं नये ही गोष्ट मनाला खटकली. ४ नोव्हेंबरला रात्रीं आम्ही सांगलींत पोहोंचलों. वादळी पाऊस पडून मंडपांत चिखल झाला होता. वाळू पसरून तो कोरडा व्हावा म्हणून प्रयत्न चालू होते.

● ● ●

## लेखांक चव्वेचाळीसावा

# महोत्सवाचें इतिवृत्त !

श्रीक्षेत्र सांगली येथें जें घडलें त्याचा वृत्तांत मी घरीं आल्यानंतर एक महिन्यानें लिहिला. कारण माझा आजार ! त्या वृत्तांताचा आवश्यक तो उतारा येथें देतों म्हणजे त्यावेळच्या घटना व माझी मन:स्थिति ह्यांचा यथायोग्य बोध होईल.

. . .रात्रीं प्रा. बनहट्टी ह्यांनीं बोलाविलेल्या एका सभेला गेलों. थोडा वेळ थांबलों व परत आलों. मंडप पाहिला. प्रवेशद्वार व आंतील मांडव भव्य होतीं. थोडावेळ इकडेतिकडे हिंडलों व परतलों. इतक्यांत बावडेकर भेटले. वृत्तपत्र प्रतिनिधींना अपमानास्पद रीतीनें वागविण्यांत आलें, त्यांना बेगुमान उत्तरें देण्यांत आलीं, ह्या तक्रारी घेऊन त्यांनीं प्रा. माटे ह्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मी श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. भेट झाली नाहीं. रात्रीं १ वाजतां वसतिगृहांत येऊन झोंपलों.

* * *

शुक्रवार उजाडला. मला माझें तिकीट मिळालें नाहीं. . .खुर्च्यांवर नंबर नाहींत, तिकिटांवर नंबर नाहींत. अशा स्थितींत जो तो सांपडेल त्या जागेवर बसत होता. मंडपांत लोक किती घुसतात ह्याचा अंदाज न घेतां बेफाट तिकिटविक्री सुरू होती. गॅलरीवर बेसुमार गर्दी होत होती. तिचा परिणाम म्हणजे समारंभ सुरू होण्यापूर्वी लांकडी गॅलरीचा एक भाग कोसळला आणि त्यावर असणारे शेंकडों लोक खालीं आले. गॅलरीच्या खालीं

ज सांपडले त्यांपैकीं अनेकांना मार बसला, हाडें तुटलीं, लहानमोठ्या स्वरू-पाच्या जखमा झाल्या. पण सर्वांत भयंकर स्वरूपाचा अपघात श्री. केंडे नांवाच्या धुळें येथील वृद्ध गृहस्थाला झाला. एक डोळा फुटून बाहेर लोंबला, कपाळ-पट्टी फुटली आणि सारें अंग रक्तानें माखलें. अत्यंत विद्रूप स्वरूपांत त्यांना मिरज येथील दवाखान्यांत नेण्यांत आलें. उत्सवाच्या सुरुवातीलाच मराठी रंगभूमीचा रुद्रावतार दिसला. रक्ताचें सिंचन होऊनच पहिला अंक सुरू झाला. माझ्या मनाला चरका बसला.

* * *

सावरकरांच्या अध्यक्षतेखालीं झालेला नाट्यशताब्दि महोत्सव अत्यंत किरटा झाला. स्वत: सावरकरांचें भाषण अत्यंत दरिद्री झालें. त्यांचें वक्तृत्वहि त्यावेळीं प्रकाशलें नाहीं. मराठी रंगभूमीसंबंधीच्या आदराचें–अभिमानाचें जें छत्र निर्माण व्हायला पाहिजे होतें त्याचा मागमूस त्या भाषणांत नव्हता.

* * *

नटश्रेष्ठ नारायणराव राजहंस व केशवराव दाते ह्यांना त्यांच्या आजपर्यंतच्या सेवेबद्दल नटराजाच्या चांदीच्या मूर्ति देण्यांत आल्या. श्री. बाबूराव पेंटर ह्यांचाहि सत्कार करण्यांत आला. श्री. वासुदेवराव भावे–मराठी रंगभूमीच्या संस्थापकांचे–विष्णुदास भाव्यांचे–प्रपौत्र–ह्यांचें भाषण यथातथाच झालें. श्री. गणपतराव गोडबोले ह्यांनीं भावे नाट्य मंदिराचा वृत्तांत सांगितला. सांगली संस्थानांतील ही एक अत्यंत प्रभावी व्यक्ति परंतु महोत्सवांत कुठलेंहि अधिकारसूत्र त्यांच्या हातीं नव्हतें. सांगली येथील गैरव्यवस्थेचें मुख्य कारण तें होतें. खुद्द राजेसाहेबांनीं कोनशीला बसविली आणि भाषण केलें. त्यांचें भाषण बऱ्यापैकीं झालें. ज्यांच्या प्रोत्साहनानें मराठी रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा झाली त्या कै. श्रीमंत अप्पासाहबांचे हे राजेसाहेब नातू ! मराठी रंगभूमीशीं संबंध असलेल्या एका अत्यंत मोठ्या व्यक्तीचें दर्शन झालें हा मी मोठा लाभ समजतों.

* * *

दुपारीं १ वाजतां ‘ कृष्णेवर ’ जाऊन आंघोळ केली. सांगलीचा उत्सव व्हावा म्हणून जे परिश्रम मी आजपर्यंत केले त्यांचा परिहार म्हणून मी तें

स्नान केलें. सावरकरांच्या भाषणानें मी कांहींसा वैतागलोंच होतों. त्यांतच प्रा. बनहट्टी वगैरेंचा तुटकपणा ह्यांनीं त्या वैतागांत भरच घातली.

*　　*　　*

दुपारीं १ वाजतां प्रा. माटे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साहित्यसंमेलनाचें अधिवेशन सुरू झालें. खांडेकर, पोतदार, आळतेकर इत्यादींचीं गुणगौरवपर भाषणें झालीं. स्वागताध्यक्ष श्री. साधुदास ह्यांनीं आपलें भाषण भरडून काढलें. खुद्द माटे ह्यांनीं भाषणाची सुरुवात मोठ्या गंभीरपणानें केली. परंतु मिळालेल्या मानानें त्यांचाहि संभ्रम झालेला स्पष्ट दिसत होता. मला सर्व भाषण ऐकतां आलें नाहीं. उत्सव मंडळाच्या सभेसाठीं मला निघून जावें लागलें.

*　　*　　*

म्युनिसिपल हॉलमध्यें प्रा. बनहट्टी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ती सभा भरली. प्रत्यक्ष सभेंत माझें फारसें लक्ष नव्हतें. श्री. सदाशिवराव कुलकर्णी ह्यांनीं शारदा नाटकाचा खर्च उत्सव मंडळानें करावा असें प्रतिपादन केलें. त्यावेळीं सांगलीकरांची भूमिका ह्या उत्सवाबाबत कशी चुकीची आहे हें मी त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितलें. उत्सव सांगली गांवाचा नसून महाराष्ट्राचा आहे आणि सांगलीस मिळणारा पैसाहि उत्सवमंडळाचा आहे. श्री. गणपतराव गोडबोले ह्यांना माझें म्हणणें पटलें. उत्सवाकरतां होणारा खर्च सांगलीस जमणाऱ्या पैशांतून दिला गेला पाहिजे हें त्यांनीं मान्य केलें. याच वेळीं त्यांनीं माझ्या मे महिन्यांतील पत्राचा उल्लेख केला व त्या पत्रानेंच उत्सवाच्या कार्याला चालना मिळाली म्हणून सांगितलें. मराठी रंगभूमीचा इतिहास आणि मराठी नाट्यवाङमयाचा इतिहास यांपैकीं रंगभूमीचा इतिहास कसा लिहावा यावर बरीच चर्चा झाली. श्री. वरेरकर, गोविंदराव टेंबे, के. नारायण काळे ह्यांचें त्याबाबतींत एकमत होतें. बराच वेळ चर्चा झाली. उत्सव मंडळ १९४४ अखेर रहावें व उत्सवहि १९४४ अखेर साजरे व्हावे असें ठरलें. इतर ठराव मला आठवत नाहींत. रात्रीं ९ वाजेपर्यंत सभा झाली. नंतर शारदा नाटकासाठीं चिंतामणराव कोल्हटकर वगैरेंना जावयाचें होतें म्हणून सभा संपली.

*　　*　　*

"शारदा" नाटकाचा प्रयोग हा या उत्सवाचा अत्यंत रसाळ असा भाग झाला. तीन महिने या प्रयोगाची जुळवाजुळव करण्यासाठीं नाटच-समितीचे अध्यक्ष, चिटणीस व सभासद प्रयत्न करीत होते. डॉ. भालेराव, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, गणपतराव बोडस ह्यांचे प्रयत्न लहानसहान नाहींत. परंतु या नाटकाचें यश कुणाचें म्हणून जर विचारलें तर तें एकटया नारायणराव बालगंधर्वांचें आहे. त्यांनींच मास्टर नरेश आणि लोंढे ह्यांना ह्या प्रयोगांत भूमिका करण्यास लावले. नाटकाचा प्रयोग अवर्ण-नीय झाला. आमचे सारे मराठी नट मोठ्या अभिनिवेशानें आपापल्या भूमिका करीत होते. श्री. चिंतोबा गुरव ह्यांनीं २६ वर्षांनंतर वयाच्या ७० व्या वर्षी श्रीमंतांची भूमिका पुन्हां केली. आणि ती इतकी सुंदर केली कीं सर्व प्रेक्षकांनीं ह्या भीष्माचार्यांवर धन्यवादांचा वर्षाव केला. या प्रयोगांत कांहीं अभूतपूर्व गोष्टी दिसल्या. गणपतराव बोडस, केशवराव दाते आणि चिंतामणराव कोल्हटकर या तीन श्रेष्ठ नटांचें एकत्र काम पहाणें ही विशेष गोष्ट होती. केशवराव व नारायणराव एक गद्य व दुसरा संगीत नट ह्यांचा सामना प्रेक्षणीय झाला. गणपतराव कांचनभट व नारायणराव इंदिराकाकू यांचा प्रवेश अत्यंत सुंदर झाला. दोघेहि म्हातारे रमले होते. लोंढे ह्यांनीं गाण्याची व अभिनयाची कमाल केली. 'मधुरा बिंबाधरा' ह्या पदाला लोंढें ह्यांनीं जो स्वर लावला तो ऐकून प्रेक्षकांच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. मास्टर नरेश ह्यानें सहा मुलींच्या जोडीला उभे राहून आपली भूमिका उत्तम वठविली. त्या सहा मुलींचें भाग्य तर हेवा करण्यासारखें होतें. हा संच भालेरावांनीं मिळवून दिला व त्यांच्या कामाचें दिग्दर्शन बाळासाहेब काळे ह्यांनीं केलें. आयुष्यांत सदैव अभिमानानें उल्लेख करतां येईल असा तो दिवस होता. रंगपटांत तर अजब उत्साहाचें वातावरण होतें. माझ्या मनाला खरा आनंद तेथें होत होता. केवढ्या अडचणींतून ही सारी सामुग्री सिद्ध झाली याची ज्याला माहिती आहे त्यालाच माझ्या आनंदाची कल्पना येईल. समोर हजारों प्रेक्षक नाटकाच्या आनंदांत अक्षरशः गटांगळ्या खात होते. नारायणरावांनीं मला स्वतःजवळ बसवून घेतलें आणि माझ्याबद्दलचा स्नेहभाव मोठ्या उत्कटतेनें व्यक्त केला. केशवराव, नारायणराव, गणपतराव, चिंतामणराव— माझीं हीं दैवतें— लहानपणापासून माझ्या स्वप्नसृष्टींतील ह्या आराध्य-

देवता ! त्यांच्या सान्निध्यांत त्यांच्या कौतुकाचा विषय म्हणून मी बसलों असतांना मला धन्य वाटलें. एवढे मोठाले नट एकत्र रंगून काम करीत आहेत ही मराठी रंगभूमीच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची घटना होय. त्या रात्रीं मी बेहोष होतों. प्रल्हादनें मला बाहेर नेऊन अर्धे नाटक दाखविलें. नाटक सुटायला ५।। वाजले. केवढा अफाट जनसमुदाय नागासारखा मंत्रमुग्ध होऊन डोलत होता. माझ्या आयुष्यांत तें दृश्य मी विसरणार नाहीं. त्या रात्रीं अक्षरश: माझे डोळे निवले–डोळ्यांची भूक शांत झाली. माझ्या मराठी नटांचा त्या रात्रीं मला अभिमान वाटला. ते मर्द ठरले–त्यांनीं मोठी लढाई जिंकली. प्रवेशाला सुरुवात होण्यापूर्वीं दहा मिनिटें आधीं खांद्यावर ओले पिळे कमरेवर भरलेली घागर घेऊन उभे असलेले इंदिराकाकूंच्या भूमिकेंतील नारायणराव म्हणजे उत्कट नाट्याची मूर्तीच होती. किती रीतींनीं मी या नाटकाचें वर्णन करूं ? अमर असा तो प्रयोग ज्यांनीं केला ते नट धन्य–ज्या प्रेक्षकांनीं तो पाहिला ते धन्य ! मराठी रंगभूमीचा खरा महोत्सव, खरी महापूजा, त्या रात्रीं झाली.

* * *

६ तारखेला सकाळीं नाट्यसंमेलनाचें अधिवेशन होतें. मी मंडपांत गेलों व नानासाहेब गोखले ह्यांच्या सहकार्यानें नारायणराव कुलकर्णी ह्यांच्या अध्यक्षपदाचा गौरवपर भाषणें करणाऱ्या वक्त्यांची यादी केली. नानासाहेबांनीं त्या त्या वक्त्यांना तशी विनंती केली. सुरुवातीला श्री. वरेरकर ह्यांनीं भाषण करून आजच्या मराठी वाङ्मयांत नारायणरावांचें स्थान काय ह्याची स्पष्ट शब्दांत श्रोत्यांना जाणीव करून दिली. त्यानंतर प्रा. आळतेकर, सांवतवाडीचे नगराध्यक्ष श्री. सामंत, प्रो. पोतदार व मी स्वत: अशीं भाषणें झालीं. सुरुवात परिणामकारक झाली. निरनिराळ्या संस्थांच्या वतीनें नारायणरावांना हार घालण्यांत आले. नारायणरावांचा हा सत्कार पाहण्यास त्यांचे वडील बंधू बापू व पत्नी सौ. लक्ष्मीवहिनी हजर होते. मला एक फार मोठें समाधान झालें. नाशिकला मला जें करतां आलें नाहीं तें सांगलींत साधलें. नारायणरावांच्या वाङ्मयतपाचा असा गौरव झाला. परमेश्वर कुणाला बिसरत नाहीं हेंच खरें. श्री. कमतनूरकर ह्यांनीं केलेल्या स्वागताध्यक्षांच्या भाषणांत अध्यक्षांच्या नांवाचाहि उल्लेख नसावा ही गोष्ट मनाला खटकली.

नारायणरावांचें भाषण चांगलें होतें. परंतु परिणामकारक पद्धतीनें त्यांना वाचन करतां आलें नाहीं. उत्सव व साहित्यसंमेलन ह्यांचे जबाबदार अधिकारी त्यावेळीं हजर नव्हते. स्वत: गंगूनाना बेपत्ता होते. एस्. ए. कुलकर्णी मात्र धडपडत होते. प्रेक्षकवर्ग पुष्कळ होता. सांगलींत हें घडलें. हेंच विशेष. हा कार्यक्रम संपल्यानंतर मी माझ्या जबाबदारींतून बहुतेक मोकळा झालों.

* * *

दुपारीं दोन वाजतां मुंबई शिबिरांत श्री. केशवराव दाते ह्यांच्या सूचनेवरून सांगलीस जमलेल्या नटांची अनौपचारिक सभा बोलावली. जेवण करून मी अंग टाकलें न टाकलें तोंच माझ्या नांवाचा पुकारा झाला. डोळे चोळीत तसाच धडपडत गेलों. ५–१० नट जमले होते. केशवराव दाते व श्री. आठवले यांचें संभाषण चालू होतें. आपला धंदा कसा सुधारेल हा आठवल्यांचा एक प्रश्न होता. या सभेंत एकंदर ३०–४० नट जमले. शारदेंतल्या सर्व मुली या सभेला होत्या. या सभेंत महत्त्वाचा एकच विचार ठरला. नटांना श्रद्धेची जागा पाहिजे. सांगली हें तें श्रद्धास्थान. प्रत्येक वर्षी आपण सांगलीस यावें आणि स्फूर्ति घेऊन परत जावें. नट—मग त्याचा पोटाचा व्यवसाय नाटच असो वा नसो—तो कीं जो स्वत:ला नट म्हणवून घ्यायला लाजत नाहीं. अशा प्रत्येकाला येथें येण्याचा अधिकार आहे. प्रत्येक वर्षी जमण्याची तारीख वर्तमानपत्रांतून जाहीर करावी. येथें अहेतुक जमावे. जमल्यानंतर होईल तो कार्यक्रम ! हें सर्व काम त्यावेळीं मजकडेच सोंपविविण्यांत आलें. नटांच्या संघटनेच्या दृष्टीनें सभा अत्यंत महत्त्वाची झाली. विनंती पत्रकाला मान देऊन जे सभेला आले त्या सर्वांचें आभार केशवरावांनीं व मी मानलें.

त्यानंतर उत्सव मंडळाची सभा होती. तिकडे मी गेलों. तेथें रात्रीं ९ वाजले परत आलों आणि जेवण करून झोंपलों तो सकाळीं उठलों. इतका मी दमलों होतों. त्या दिवशीं रात्रीं सांगलीकरांच्या 'शस्त्रसंन्यास'चा एक अंक अत्यंत विस्कळीत रीतीनें झाला व नाटक बंद करावें लागलें. त्यानंतर केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर व शिवरामपंत परांजपे (गोकुळख्यातनाम) याचे प्रवेश झाले व ते प्रेक्षकांना अतिशय आवडले. कांचनगडची मोहना, संन्यस्त खड्ग, प्रेमसंन्यास ह्या नाटकांतील ते प्रवेश होते. श्री.

दाते ह्यांचा प्रतापरावाच्या भूमिकेंतील अभिनय सर्वोत्कृष्ट झाला असा अभिप्राय कळला. दोघांहि नटांचे आवाज दुसऱ्या दिवशीं बसले.

* * *

रविवारीं दुपारीं वादळ निर्माण झालें. रावसाहेब भावे मुंबई शिबिरांत गेले व मुंबईच्या प्रतिनिधींमुळें मंडपांत व्यवस्था ठेवणें अशक्य होतें अशी तक्रार त्यांनीं डॉ. भालेराव ह्यांच्याकडे केली. मुंबई प्रतिनिधींनीं नंतरच्या सर्वच कार्यक्रमावर बहिष्कार घातला. नंतर कोणीहि प्रतिनिधि मंडळाकडे फिरकला नाहीं. बावडेकर व मी दुपारीं बाहेर पडलों. इतक्यांत प्रा. वि. मा. दी पटवर्धन भेटले. त्यांच्या मुलीला पारितोषिक द्यावयाचें होतें. नागपूर शिबिरांत श्री. बावडेकर ह्यांच्या हस्तें तो समारंभ झाला. तेथून आम्ही मंडपाकडे गेलों. रात्रींचा नटांचा संकीर्ण कार्यक्रम फळ्यावर लिहावयास लावला आणि आम्ही तिघे खाडीलकरांच्या दत्तमंदिरांत पानसुपारीस गेलों. मुंबईची मंडळी आधींच जमली होती. दत्ताचें ध्यान फारच सुंदर आहे. मी मनोभावें मूर्तीला नमस्कार केला आणि प्रसाद म्हणून बागेंतून थोडीं फुलें घेतलीं. महाराष्ट्राच्या नाट्याचार्यांचें हें विश्रांतिस्थान! याच मंडपांत मी ६ वर्षांपूर्वीं खाडीलकरांचे प्रवचन ऐकलें होतें. परत येतांना अंधार पडला.

* * *

सांगलीच्या मुख्य दैवताचें–गणपतीमंदिरांत जाऊन दर्शन घेतलें. श्री. बावडेकर ह्यांच्याबरोबर माईणकर ह्यांच्या घरीं मास्टर विनायक ह्यांच्याकडे गेलों. ते घरीं नसल्यानें वाट पहात थांबलों. थोड्या वेळानें खांडेकर आणि विनायक हे दोघे आले. सांगलींतील अंदाधुंदीवर बोलणें झालें.

* * *

मास्टर विनायक आणि खांडेकर यांच्या ह्या मुलाखतींत मास्टर विनायकबद्दलचा माझा ग्रह अधिक चांगला झाला. खांडेकर आणि बावडेकर गुरु–शिष्य. बावडेकरांची गुरुभक्ति विशेष आहे. खांडेकरांची ही एक मोठी पुण्याई आहे. अनेक शिष्यांना साहित्याची गोडी त्यांनीं लावली. लता मंगेशकर व बेबी आचरेकर ह्यांना तेथें पाहिलें. एक नवे दिग्दर्शक श्री. जोगळेकर तेथें होते. विनायकांनीं बावडेकरांना कोल्हापूरचें स्नेहपूर्वक निमंत्रण दिलें.

* * *

शिबिरांत परत येतों तों तेथें प्रचंड सभा भरलेली असून अप्पा पेंडसे भाषण करीत होते. स्त्रीपुरुष मिश्र सभेंतील राजकीय पक्षोपक्ष सांगलीच्या बेमुर्वतखोर अरेरावीचा एकमुखानें निषेध करीत होते. मंडपावर जाऊन प्रभावी निदर्शन करावें असाहि विचार चालू होता. बहिष्कार ,धुमसत धुमसत आतां पेटला होता. सोलापूर, धारवाड, बेळगांव, सातारा, खानदेश, नाशिक, पुणें इत्यादि ठिकाणचे प्रतिनिधि त्या सभेंत सामील होते. केशवराव दाते निघून गेले होते आणि जातांना सर्व जबाबदारी माझ्यावर टाकून गेले होते. नटांचा संकीर्ण कार्यक्रम हा महत्त्वाचा कार्यक्रम असून त्यासाठीं मला कुणीहि साहाय्यक नव्हते. या बहिष्कारांतून मला माझें कर्तव्य ठरवायचें होतें. मी तें ठरविलें आणि त्यासाठीं मंडपाकडे गेलों.

*　　　　*　　　　*

दामूअण्णा मालवणकरांचा कार्यक्रम होत नाहीं. असा निरोप तेथें कळला. नाना देवधराला घेऊन तसाच मास्टर विनायकाकडे गेलों. नटांना आंत रंगण्यासाठीं प्रवेश मिळत नाहीं असें कळल्यावरून स्वयंसेवकांच्या खोलींत ती व्यवस्था केली. भालचंद्र पेंढारकर तेथें होता. विनायकांच्या बिऱ्हाडीं पोहोंचलों तर तेथें गप्पा चालू होत्या. सर्व मंडळी परत जाण्याच्या तयारींत होती. मी कार्यक्रमासंबंधी विचारतां गंगूनाना कानेटकरांनीं तो रद्द झाल्याचें त्यांना कळविलें असें समजलें. आर्जव करून मी त्यांना तो कार्यक्रम करण्याची विनंती केली. त्यांनीं ती मान्य केली. या कार्यक्रमासाठीं कोल्हापूरहून दहा माणसें घेऊन आलेल्या विनायकाला जेथें अशी संभावना मिळते तेथें इतरांची काय दुर्दशा या सांगलीकरांनीं केली असेल याची कल्पनाच केलेली बरी. दामूअण्णानीं विनंती मान्य केली. सर्व मंडळींनीं रंगूनच यावें असें ठरलें. मी मंडपाकडे परतलों.

*　　　　*　　　　*

मंडपावर परत येतों तों आमच्या फुटकळ नटांनीं एक लहानसें वादळ निर्माण करून ठेवलें होतें. बंडोपंत सोहनी गर्जना करीत होते. पुण्याचे जोशीबुवा आगींत तेल ओतींत होते. "आम्ही मंडपांत रंगणार—बाहेर रंगणार नाहीं." हा वादाचा विषय ! आतांपर्यंतच्या घटनांनीं माझाहि तोल सुटला होता. मीहि वरदळीवर आलों. भालचंद्र पेंढारकरानें माझी समजूत

काढण्याचा प्रयत्न केला. शेवटीं मी व बंडोपंत श्री. ताम्हणकर यांना भेटलों. नागपूरच्या प्रयोगाचे ते एक व्यवस्थापक होते. माझा व त्यांचा पूर्वपरिचय होता. दोन अंकानंतर जागा देतों असें त्यांनीं कबूल केलें. येथें वादळ मिटलें. मी स्थूलमानानें होणाऱ्या प्रवेशांचा अनुक्रम लावला आणि एक खुर्ची घेऊन बसलों.

* * *

नागपूरचें 'पूर्वग्रह' नाटक मला पहावयास मिळालें नाहीं. प्रा. बनहट्टींनीं मला एकदां औपचारिक विनंती केली. संकीर्ण प्रवेशांची जबाबदारी माझ्यावर आहे असें मीं त्यांना सांगितलें. नाटकाबद्दल अनुकूल मत दिसलें नाहीं. प्रा. वि. मा. दी पटवर्धनांच्या बहिणीनें त्यांत काम केलें. स्त्रियांच्या भूमिका बऱ्या झाल्या असें लोक म्हणत होते. या प्रयोगाला सांगलीचे राजेसाहेब उपस्थित होते. नागपूरकर आणि सांगलीकर ह्यांच्यांत ह्या नाटकानें चांगलीच तेढ उत्पन्न झाली. सांगलीच्या राणीसाहेब नागपूरच्या मोरोपंत जोशींच्या कन्या! सासुरवाडीचें नाटक–त्यासाठीं राजसाहेबांनीं आपलें सारें दल हलविलें. वासुदेवराव भावे जातीनें धांवाधांव करीत होते. वुइंगमध्यें पोलिस शिपायांचा कडकोट बंदोबस्त होता. नाटक रात्रीं दोन वाजतां संपलें. मास्टर विनायक आपला नटवर्ग घेऊन हजर होते. खांडेकरहि आले होते. दामूअण्णांचें काम पहावयाला मिळणार म्हणून बहुतेक प्रेक्षकवर्ग–त्यांत खुद्द राजसाहेब थांबून राहिले. आमचें ललित सुरू झालें.

* * *

कै. दिनानाथांची कन्या लता मंगेशकर हिनें ललिताला प्रारंभ केला. तिचा स्वर्गीय मधुर आवाज ऐकून लोक थक्क झाले आणि खूष झाले. त्यानंतर श्री. जोग ह्यांनीं 'युगांतर'मधील गवयाचा प्रवेश बेबी आचरेकरबरोबर करून दाखविला. नंतर बेबंदशाहीमधील प्रवेश झाला. यांत रघुनाथराव गोखले यांचे चिरंजीव कलुषा कबजी झाले होते. जगन्नाथ आठवले यानें खडाष्टकमधील प्रवेश केला. शेवटीं "हाच मुलाचा बाप" मधील वधूपरीक्षेचा प्रवेश दामूअण्णा मालवणकरांनीं डॉ. पशूच्या भूमिकेंत केला. यांत लता, बेबी, जोग अशी सर्व मंडळी होती. ललिताचा एक अंक येथें संपला. राजेसाहेब अद्याप बसले होते. लोकांना या ललितांत रंग वाटत होता. मध्यं-

तरानंतर दुसरा अंक सुरू झाला. सांगलीच्या राजसाहेबांचा निरोप आला कीं कीचकवधांतील प्रवेश दाखवा. सुरुवातीला टोपकरांनीं गुलेलूच्या भूमिकेंत संन्याशाचा संसारमधील प्रवेश केला. विनायकराव पाटणकरांनीं कीचक-वधांतीळ पहिला प्रवेश केला. लोकांनीं टाळ्या वाजवून प्रवेश बंद केला. राजेसाहेब व त्यांचा लवाजमा नंतर उठून गेला. आमचें लळीत चालूच होतें.

गणपतराव मोहिते ह्यांनीं कामण्णाची भूमिका करून दाखविली. श्री. बंडोपंत सोहनी यांनीं लक्ष्मीधराची भूमिका केली. इतक्यांत एक नटवर्य आमच्यावर येऊन आदळले. ते म्हणजे यशवंतराव आठवले. गणपतराव बोडसांचें सारें नाटक आपल्यांत संचारलें आहे अशा अभिनिवेशानें 'एकच प्याल्यांतील' सात पानांचें सुधाकराचें स्वगत पंधरा मिनिटांच्या उत्स्फूर्त व्याख्यानासह त्यांनीं सुनावलें. इतका अहंमन्यपणा मी पाहिला नव्हता चंदू पेंढारकराला मागें सारून आठवल्यांनीं आपलें घोडें पुढें दामटलें. सकाळचे सहा वाजायला आले. चंदूनें 'सत्तेचे गुलाम' मधील प्रवेशांना सुरुवात केली. प्रेक्षकांनीं मोठ्या उत्साहानें त्याचें स्वागत केलें. त्याच्या पदांना टाळ्या मिळाल्या. मी एका विलक्षण अनुभूतींतून जात होतों. चंदूच्या आवाजानें क्षणाक्षणाला कै. बापूराव पेंढारकरांचा भास होत होता. इतका विलक्षण सारखेपणा चंदूच्या आवाजांत होता. नंदू खोटे ह्यांनीं मंगलमूर्ति भूमिका केली. शेतावरचा प्रवेश झाला. त्यांत मी एका शेतकऱ्याची भूमिका केली. चंदूनें वाक्यें सांगितलीं व मीं म्हटलीं. प्रवेश संपला व सर्व नटांना घेऊन मी रंगभूमीवर उभा राहिलों. चंदूनें 'वंदे मातरम्' म्हटलें. मी साऱ्या नटांचे आभार मानले. मराठी रंगभूमि सहस्रायु होवो म्हणून अभीष्टचिंतन केलें आणि सकाळीं सात वाजतां सूर्याचे किरण अंगावर घेऊन रंगभूमीला मुजरा केला व लळीत संपविलें.

काय विलक्षण ती रात्र ! मी बेहोष होऊन काम करीत होतों. लोकांचा आनंद हेंच माझ्या कामाचें बक्षीस होतें. स्वतःचा अभिमान बाळगावा इतकें अवघड काम त्या रात्रीं माझ्या हातून झालें. बाहेर आलों तर एका मोटार ड्रायव्हरनें "तुमचें पहिलें काम या दृष्टीनें बरें झालें." असा माझ्या शेत-कऱ्याच्या कामावरचा अभिप्राय सांगितला. इतका अनाहूत प्रांजल अभिप्राय मला आतांपर्यंत ऐकायला मिळाला नव्हता. लळीत संपलें आणि सांगलींतील

माझें काम संपलें कार्योपाध्यक्ष हे एकच गृहस्थ सर्व कार्यक्रम संपेपर्यंत आंत बसून होते. पडदे वगैरे सामान एका मारवाड्याचे होते. तो सज्जन होता. आपल्या गांवीं बाहेरगांवची मंडळी आली आहेत त्यांची हौस आपण पुरविली पाहिजे ही त्याची वृत्ति सर्व सांगलीकर कार्यकर्त्यांत असती तर किती बरें झा लें असतें.

* * *

यानंतर सांगलींतून प्रयाण करण्याचे वेध लागले. नाना देवधर ह्यांच्या मदतीनें रिझर्व्ह डब्यांची सोय केली. शिबिरांत येऊन सामान बांधलें. नारायणराव कुलकर्णी इत्यादींचा निरोप घेतला व गाडींत बसलों. एकादशीचा उपवास कडकडीत घडला. सारा प्रवास मजेंत झाला. एका डब्यांत कार्यक्रम झाले. त्यांत ' मी ' या कादंबरींतील भावानंदा 'चें शेवटचें भाषण मीं म्हणून दाखविलें. त्यांतील आजार माझ्या भावी आजाराचें पूर्वचिन्ह ही कल्पनाहि आली नाहीं. पुणें स्टेशनवर पुरीभाजीं खाऊन रात्रीं १२॥ ला एकादशी सोडली. गांवांत माधवराव पटवर्धन हॉलमध्यें झोप घेतली.

* * *

मुंबईस पोहोंचल्यानंतर बुधवारीं दुपारीं ' राजकमल 'मध्यें जाऊन केशवराव दाते ह्यांची भेट घेतली. भगवान पंडित, भालेराव, अंधृटकर व मी असे चौघेजण होतों. तीन केन्द्रांचा उत्सव मुंबई, पुणें, नाशिक–कसा साजरा करावा यासंबंधी विचार केला. केशवरावांना ती कल्पना पसंत पडली. त्यांनीं आणखी एक नवीन विचार सांगितला. शक्य तर व्यवसायी नटांचा एकेक प्रयोग यानंतरच्या उत्सवांतून घडवून आणावा–नटांना मोबदला द्यावा–त्यांचा गौरव करावा ही ती योजना ! त्याप्रमाणें पत्रक तयार करावें असें ठरलें. संध्याकाळीं मुंबईहून निघून रात्रीं कलकत्ता मेलनें घरीं आलों–फराळ केला. रात्रीं खोकल्याचा त्रास झाला. अंग कसकसत होतें. दुसऱ्या दिवशीं डॉ. वाईकर यांना प्रकृति दाखविली. त्यांनीं संपूर्ण विश्रांति घेण्यास सांगितलें. संपूर्ण एक महिना आजार काढला. भयंकर अशक्तपणा आला. अडीच वर्षांनंतर साहित्यसंमेलन आणि हा उत्सव यांची मेहनत करून आजारी पडलों. उत्सवाच्या कामांत धांवपळ–प्रवास यांचा विशेष त्रास झाला. अनुभव खूप आला–अपमान भरपूर सोसले. पण मनाचें समाधान झालें. १९४३ सालांतच शतसांवत्सरिक उत्सव झाला. यांत सगळें भरून आलें. सार्वजनिक

काम करतांना मी एक धडा शिकलों. कार्यकर्ता हा समाजाची आई असतो. मुलांच्या लाथा खाऊन ह्या आईनें समाजाचें पालनपोषण केलें पाहिजे. समाजानें केलेला अपमान हा अपमान नसून काम करतांना ती एक सहज घडणारी एक गोष्ट आहे.

माझी कल्पना–महाराष्ट्रांत शंभर ठिकाणीं उत्सव व्हावेत ,फलद्रूप होत आहे. आतांपर्यंत ग्वाल्हेर, नागपूर, उमरावती, जळगांव, कोल्हापूर, सातारा, हैद्राबाद, मुंबई, पुणें, नाशिक, नगर इत्यादि ठिकाणीं हा उत्सव होत आहे. किंवा त्याच्या योजना आंखल्या जात आहेत. नगर येथें माझे स्नेही बाळासाहेब कानिटकर अध्यक्ष म्हणून गेले. प्रभाकर महाबळनें त्यांना सोबत केली. महाराष्ट्र नाटच मंदिराचा तो गौरव होय.

उत्सवाचें म्हणून महत्त्वाचें सांगावयाचें तें सांगून झालें. सांगलीच्या राजेसाहेबांना 'शारदा' नाटक पहावयास त्यांच्याच अधिकाऱ्यांनीं येऊं दिलें नाहीं ही गोष्ट सर्वांना लागून राहिली. मंडपांत गर्दी फार आहे. दंगा होण्याचा संभव आहे या सबबींवर त्यांना व त्यांच्या पाहुण्यांना ह्या अधिकाऱ्यांनीं घरींच बसविलें.

खुद्द गणपतराव बोडसांना मंडपाच्या दारावर अडविलें. तितक्यांत वरेरकर तेथें आले व त्यांनीं स्वयंसेवकाला समजावून सांगितलें कीं ज्या 'शारदा' नाटकाची तू व्यवस्था पहात आहेस तें नाटक ह्यांना आंत जाऊं दिलें नाहींस तर होणार नाहीं. तेव्हां गणपतराव आंत गेले.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

लेखांक

पंचेचाळीसावा

# शतसांवत्सरिक महोत्सव–नासिक !

**सां**गली येथें साजरा झालेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवानंतर गांवोगांव महोत्सव सुरू झाले. नाशिकचा उत्सव १९४४ च्या मे महिन्यांत १५ तारखेच्या सुमारास साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. केळकरांचें अध्यक्षीय भाषण हें ह्या उत्सवाचें एक वैशिष्टच होय. प्रा. श्री. दत्तो वामन पोतदार ह्यांच्या खास शिफारशीनें श्री. केळकर आम्हांला अध्यक्ष म्हणून लाभले. प्रल्हाद औरंगाबादकराबद्दल पोतदारांना वाटणारा विलक्षण लोभ हें कारण आहे. पुणें ते नाशिक व परत अशी स्वतंत्र वाहन व्यवस्था, प्रवासांत चहापाण्याची सोय, व्यवस्थापक म्हणून नानासाहेब गोखले अशा मोठ्या इतमामानें आम्ही आमच्या अध्यक्षांना आणलें. आतिथ्यशील नानासाहेब चांदवडकर ह्यांच्या सर्व सुखसोयींनीं सज्ज अशा खानदानी वाड्यांत त्यांची राहण्या उतरण्याची सोय केली. केळकरांचें भाषण अत्यंत मार्मिक झालें. हा उत्सव नासिकच्या विजयानंद थिएटरमध्यें साजरा झाला.

त्या उत्सवाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे 'संशय कल्लोळ' नाटकाचा प्रयोग. गंधर्व नाटक मंडळीचा सारा नामवंत संच ह्या प्रयोगांत पुन्हां दिसला. गणपतराव बोडसांनीं त्या रात्रीं कमाल केली. स्टेजवर प्रवेश करतांच त्यांनीं जो रंग भरला तो अविस्मरणीय. नारायणराव, विनायकराव, रानडे ह्यांच्या कामांनीं तो रंग खुलूनच गेला. जलशाच्या देखाव्यांत अनंत वर्तकनें गायन

केलें आणि नानासाहेब फाटक एक श्रोते म्हणून जलशांत बसले. ह्या प्रयोगाचा आनंद अलौकिक होता. सांगलीचें "शारदा", मुंबईचें "सौभद्र" आणि नाशिकचें "संशय कल्लोळ" ह्या प्रयोगांनीं रंगभूमि उजळून टाकली. स्वत: गणपतराव त्या दिवशीं इतके प्रसन्न झाले कीं नाटकानंतर रात्रीं न जेवणारे-गणपतराव त्या रात्रीं आवडीनें जेवले. प्रभाकर महाबळानें नारायणरावा बरोबर 'अनुराधे'चें काम केलें व प्रल्हादच्या मुलीनें –सुमननें 'स्वाती'चें काम केलें. आजन्म लक्षांत राहील असा तो प्रयोग झाला. श्री. बाळासाहेब काळे बोरगांवला जाऊन गणपतरावांना घेऊन आले. गंधर्व नाटक मंडळींतील ह्या नटांशीं असलेले आमचे जुने संबंध आमच्या उपयोगी पडले.

'भाऊबंदकी' नाटकाचा प्रयोग नाशिकला व्हावा म्हणून मी श्री. केशवराव दाते ह्यांची भेट घेतली. सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवांच्या साहित्य संघानें केलेल्या 'भाऊबंदकी' नाटकांतील विनोदी पात्रें दूर बाहेर-गांवीं गेल्यानें प्रयोग व्हावा कसा हा प्रश्नच होता. विनोद वगळून बाकीचें नाटक आम्ही करतों असें केशवरावांनीं सांगितलें. श्री. आळतेकर 'रामशास्त्री' वृत्तपत्रीय टीकेनें नाखूष होते. त्यांची विनवणी करून मान्यता मिळविली. नानासाहेब फाटक स्वेच्छेनें तयार झाले. सौ. गोदूताई वर्तक ह्यांची हमी केशवरावांनीं घेतली. नाशिकचे त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री. नंजाप्पा प्रयोगाला हजर होते. त्यांना मराठी बोलतां येत नसे. परंतु समजत असे. आनंदीबाई मागोमाग तुळोजीच्या भूमिकेंत केशवरावांनीं जो प्रवेश केला तो पहातांच साहेबांनीं शेजारीं बसलेल्या नानासाहेब बर्‍यांना प्रश्न विचारला, "Who is that man? He is real actor." नानासाहेबांनीं उत्तर दिलें, "He is Keshavarao Date– the most veteran actor no our stage"

केशवरावांचा तो प्रवेश आणि आनंदीबाईच्या डोळ्याकडे लक्ष देऊन होणाऱ्या त्यांच्या त्या लवचीक हालचाली ज्यांनीं पाहिल्या त्यांनाच केशव-रावांचें नट ह्या नात्यानें असलेलें अलौकिक सामर्थ्य समजेल. आपल्या धनी-णीच्या मर्जीच्या तालावर नाचणारा हुजऱ्या म्हणजे काय ह्याचें जें अपूर्व दर्शन केशवरावांनीं त्या रात्रीं घडविलें त्याला – प्रल्हादच्या शब्दांत सांगा-

वयाचें तर, 'माप' नाहीं. असा दुजऱ्या झाला नाहीं. पुढें होणार नाहीं. आनंदीबाईपासून सन्माननीय अंतर (Respectable distance) ठेवून केशवराव ज्या हालचाली करीत होते–आनंदीबाईच्या विचारांना बोलून, न बोलून, हुंकारानें, हात वाऱ्यानें जी साथ देत होते त्या दिव्य अभिनयावरून जीव ओवाळून टाकावा असेंच वाटे. राघोबाच्या भूमिकेंत नानासाहेब फाटकांनीं आपलें सारें अभिनय कौशल्य पणाला लावलें होतें. गोदूबाईंनीं उभी केलेली 'आनंदीबाई' पुन्हां पहावयास मिळाली नाहीं. तो त्रुटित प्रयोग इतका उच्च दर्जाचा झाला कीं प्रेक्षकांच्या डोळ्यांचें आणि कानांचें पारणें फिटलें. केशवरावांचे न फिटण्यासारखे उपकार झाले.

विनायकराव पटवर्धनांनीं 'मराठी रंगभूमीवरील संगीत' ह्या विषयावर सप्रयोग व्याख्यान दिलें. मामा पेंडसे, वगळ, म्हात्रे, शिरके ह्या मुंबईच्या नटांनीं स्फुट प्रवेश करून आमचा उत्सव अधिक भरदार केला. विशेषतः राजसंन्यासमधील जिवाजी कलमदाने व देह दप्तरी हा प्रवेश मामा पेंडसे ह्यांनीं करून दाखविला. मामांनीं जिवाजीची भूमिका केली आणि प्रभाकर महाबळ झाला देहू दप्तरी. इतक्या कसलेल्या शरीराचा देहू कुठल्या नाटक मंडळीला मिळाला असता ?

स्थानिक मंडळींनीं बसविलेलें 'तारामंडळ' नाटक हें निराळ्या अर्थानें या उत्सवाचें वैशिष्टच झालें. मोठ्या हुरूपानें मी तें नाटक हातीं घेतलें आणि आपसांतील आमच्या हृदयशून्य धोरणामुळें आम्ही त्या नाटकाचा चिखल केला. माझ्याकडे 'दुर्जनसिंगाची' भूमिका होती. त्यासाठीं महाबळ गुरुजींनीं आपला वेळ खर्चून मला तरवारीचे पवित्रे आणि हात शिकविले. मीहि तें शिकलों. त्या नाटकासाठीं लागणारे पोषाख मी मुंबईहून आणले. दुपारीं मी थकून आलों आणि रात्रीं नाटकाचा प्रयोग .इतबारराव आणि दुर्जनसिंग ह्यांच्या एका प्रवेशांतील दुर्जनसिंगाचीं भाषणें मी नक्कल समोर ठेवून वाचलीं. माझें तें धाडस पाहून नानासाहेब गोखले चकित झाले. मला शरम वाटली. मी केलेलें धाडस सद्‌बुद्धीनें केलें. इतबारराव पडूं नये म्हणून मी तो प्रयोग केला. माझ्या गांवकऱ्यांनीं माझा तो दोष डोळ्याआड केला आणि एका दृष्टीनें माझ्या श्रमाबद्दल मला माफी केली असाच मी त्याचा अर्थ केला.

अनेक उत्पातांतून अपघातांतून गांवचा उत्सव पार पडला. रंग-भूमीची सेवा यथाशक्य करीत असतांना मी गृहहीन झालों हें आर्त कुणाला सांगूं ? दोन मुखवटे घालून मी वावरत होतों.

या उत्सवानें कांहीं न विसरण्यासारखे धडे मला शिकविले. उपेक्षा ही आमच्यांतील स्थायी भावना आहे. ह्या भावनेला अनेकदां मत्सराची धार चढते आणि मत्सरग्रस्त बुद्धिमान् माणसें समाजाच्या विघटनेला कारण होतात. नाटयासारख्या एका बुडित क्षेत्रांत त्या विषयाच्या ओढीनें काम करीत असतांना सहकार्याऐवजीं मत्सर माझ्याभोंवतीं कां पसरावा हें मला समजत नाहीं. डॉ. गोगटे ह्यांनीं सपत्नीक केलेलें सहकार्य ह्या पार्श्वभूमीवर अधिक खुलून दिसते.

प्रभाकर महाबळ आणि प्रल्हाद औरंगाबादकर ह्या दोघांनीं ह्या उत्सवांत आपल्या परिश्रमांची शिकस्त केली. प्रभाकरसारख्या व्यायाम-विशारदानें स्त्रीवेष नेसतांना क्षणभरहि विचार केला नाहीं. प्रल्हादनें आपल्या घराचे दरवाजे मुंबई–पुण्याहून येणाऱ्या नट पाहुण्यांसाठीं चोवीस तास उघडे ठेवले. इतकेंच नव्हे तर त्यांच्या दोन वेळच्या सुग्रास जेवणाची जबाबदारी घेतली आणि उत्तम रीतीनें पार पाडली. त्या युद्ध काळांत तांदुळाला कस्तुरीचें मोल होतें. दुर्लभ पण होतें. प्रल्हादनें आपल्या घरांतील कमोद या नटांना खाऊं घातला आणि घरीं गेल्यावर दोन दिवस पुरेल इतका तांदुळ प्रत्येक नटाला बरोबर बांधून दिला. प्रसन्न मनानें परतणाऱ्या त्या नटांनीं प्रल्हादला दुवा दिला. केळकर अध्यक्ष म्हणून येत नाहींत अशा अफवा उठवणारे जेव्हां केळकरांची चौकशी करायला आले त्यावेळीं प्रल्हादनें त्या निंदकांना चोख उत्तर देऊन गप्प बसविलें.

● ● ●

लेखांक

शेहेचाळीसावा

# शतसांवत्सरिक महोत्सव-हैद्राबाद

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचें आजीव सदस्यत्व १९४३-मध्यें मला दोन अटींवर मिळालें. बी. टी. व एम्. ए. ह्या परीक्षा उत्तीर्ण होणें ह्या त्या अटी होत. १९४४ च्या जूनमध्यें बी. टी. अभ्यासक्रमासाठीं मी पुण्यास गेलों व तेथें टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्यें २३ जून रोजीं नांव घातलें. १९४३–मध्यें न्यू इंग्लिश स्कूल हें नांव बदलून जु. स. रुंग्टा हायस्कूल असें नांव देण्यांत आलें. पुण्यास मी विठूकाका खाडीलकर आणि नारायण-राव कुलकर्णी ह्यांच्या नारायण पेठेंतील बिऱ्हाडांत रहात असे व तेथून मी रोज सकाळीं कॉलेजला जाऊं लागलों.

आमचे प्रिन्सिपल श्री. म. शं. गोडबोले ह्यांनीं जिमखान्याच्या पहिल्याच बैठकींत मला सुनावलें, " पुरोहित, आपलें स्नेहसंमेलनाचें नाटक मिश्र होईल हें लक्षांत ठेवा ! " मला हें कां बजावण्यांत आलें ह्याचा बोध त्यांच्या नंतरच्या वाक्यानें झाला. " मात्र अट अशी कीं कॉलेज व्यतिरिक्त बाहेरच्या एकाहि प्रेक्षकाला प्रवेश मिळणार नाहीं. " ती अट आम्ही मान्य केली. आमचें नाटक कसें झालें ह्याची चर्चा योग्य वेळीं करीन. 'मराठी' आणि 'इतिहास' हे दोन विषय मी अध्यापन पद्धतीसाठीं घेतले. मराठीचे मार्गदर्शक प्रा. श्री ना. वि. पाटणकर पूर्वींचे फर्ग्युसन कॉलेजमधील माझे सहाध्यायी त्यामुळें त्यांचा व माझा दृढ परिचय होताच. इतिहासाचे मार्ग-दर्शक प्रा. श्री. बी. व्ही. काळे साऱ्या मुंबई इलाख्यांत इतिहासाचे शिक्षक

म्हणून गाजलेले आहेत. माझ्या बी. टी. च्या वर्षांत मजवर जे चिरंतन परिणाम झाले त्यांत प्रा. काळे ह्यांचें मार्गदर्शन आणि दृढ परिचय ह्यांना फार महत्त्व आहे.

प्रा. काळे इतिहासाचा पाठ घेतांना नाट्याचा सर्वांगीण भरपूर उपयोग करतात. आवाज, मुद्रा आणि शरीराच्या हालचाली ह्यांचा इतका परिणामकारक उपयोग करणारा शिक्षक मी पाहिला नाहीं. फर्ग्युसन कॉलेजमधील प्रा. वासुदेवराव पटवर्धन किंवा प्रा. अय्यर ह्यांच्या अध्यापनांत नाट्य असे. परंतु तीं व्याख्यानें असत. पाठाचें तंत्र कांटेकोरपणें सांभाळून प्रा. काळे ज्या प्रकारचें नाट्य वापरतात तें अतुलनीय आहे. विद्यार्थ्यांना उत्सुक करणारें–इतिहासाची आवड निर्माण करणारें पाठ–नाट्य मी त्या वर्षी यथेच्छ पाहिलें. अनुभवलें. माझ्या नाटकाच्या नादानें मी इतरांपेक्षां त्यांत अधिक वहावत गेलों. मला मात्र माझ्या पाठांत नाट्य तितक्या यशस्वीपणें वापरतां आलें नाहीं हें सत्य आहे.

ह्या वर्षांतील नाट्यविषयक घटनांची त्रोटक नोंद त्या जशा घडल्या त्या क्रमानें करतों. पुण्याच्या सोशल क्लबांतील कांहीं सभासदांशीं माझा अधिक परिचय ह्या वर्षांतच झाला. त्यांत श्री. दादा काळे, अप्पासाहेब गोखले आणि भाऊसाहेब दातार ह्यांनीं विशेष लोभ दाखविला. त्यांच्या आग्रहावरून एक दिवस रात्रीं मी सोशल क्लबांत गेलों. अप्पासाहेब गोखले ह्यांनीं आपल्या तारुण्यांत माधवराव टिपणीस आणि वामनराव पोतनीस ह्यांच्या गाजलेल्या स्त्रीभूमिका तितक्याच कौशल्यानें करून नांव कमावलें होतें. परिश्रम केले तर हौशी नट व्यवसायी नटाची बरोबरी करूं शकतों हें त्यांनीं सिद्ध केलें. त्या दिवशीं त्यांना काय लहर आली कुणाला ठाऊक–कांचनगडच्या मोहनेंतील प्रवेश आपण करूं असें ते म्हणाले. मी प्रतापराव आणि साठीच्या घरांतील अप्पासाहेब मोहना. प्रतापरावाचें भाषण मी पुस्तकांतून वाचीत होतों आणि अप्पासाहेब मोहनेचीं भाषणें तन्मयतेनें साभिनय म्हणत होते. पाठ म्हणत होते. एकदां तर त्या व्याकुळ मोहनेनें प्रतापरावाच्या छातीवर मान टेकली व करुण रसांतील भाषण सुरू केलें. नाटकाबद्दलची ती एक विलक्षण निष्ठा मी अनुभवीत होतों. शाहू नगरवासी आणि महाराष्ट्र–नाटक मंडळी ह्यांच्या व्यवसायी ख्यातनाम नटांशीं एक वेळ यशस्वी मुकाबला ह्या सोशल क्लबाच्या

हौशी नटांनीं केला आहे हा इतिहास आहे.

अप्पासाहेब गोखले ह्यांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे नाटय-विषयक चित्रें व माहिती ह्यांचीं त्यांनीं तयार केलेलीं शेंकडों कात्रणें. मराठी, इंग्रजी वृत्तपत्रांतून ,मासिकांतून त्यांनीं जमा केलेलीं हजारों कात्रणें तपासून, अभ्यासून उच्च पदवीसाठीं एक प्रबंध तयार करावा इतकें त्या कात्रणांचें महत्त्व आहे. एका छांदिष्ट नटानें हीं कात्रणें गोळा करून त्यांचीं व्यवस्थित बांधीव चिकट पुस्तकें तयार करण्यांत आपली हयात खर्च केली. त्यावरून प्रबंध लिहिणारा नादी नट जन्माला यावयाचा आहे !

श्री. नानासाहेब गोखले, श्री. विजापुरे, सांगलीला भेटलेले जोशीबुवा ह्यांचा ह्या संस्थेच्या कारभारांत महत्त्वाचा भाग आहे हें मला दिसून आलें. श्री. गोपाळराव आपटे—ह्यांच्याच बंगल्याच्या बाजूच्या खोलींत मी कॉलेज-मध्यें असतांना तीन वर्षें रहात असे—नाटयक्षेत्रांत पदार्पण करून विनोदी नट म्हणून प्रसिद्धीस आलेले—तेहि ह्या संस्थेचे एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. पुण्यासारख्या शहरांत मध्यवस्तींत स्वतःच्या मालकीची जागा—छोटीशी इमारत आणि त्यांतील एकाच आकाराच्या नटांच्या छायाचित्रांचा संग्रह हें सर्व त्या संस्थेचें विलोभनीय वैभव आहे.

हैद्राबाद येथील रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवांत एक सन्मान्य वक्ता म्हणून जाण्याची मला संधि मिळाली. हैद्राबाद शहर मी प्रथमच पाहणार होतों. संध्याकाळीं मी मद्रास एक्सप्रेसमध्यें बसलों व दुसऱ्या दिवशीं सकाळीं १०—१०॥ ला मी हैद्राबादला पोहोंचलों. हैद्राबादजवळ आलें तसें कांहीं चमत्कारिक आकाराचे खडक दिसूं लागले. लंकेला जातांना मारुतीनें टाकलेले ते खडे आहेत अशी त्याबद्दलची आख्यायिका कळली. हैद्राबादला माझे स्नेही श्री. दिवाकर कृष्ण ह्यांच्या घरीं मी उतरलों. तो रविवार होता. त्या दिवशीं सायंकाळीं ६ ते ६॥ हैद्राबाद रेडिओवर 'अभिनयाची प्रगति' ह्या विषयावर माझें भाषण झालें.

सोमवारीं दुपारीं तेथील विवेकवर्धिनी नाटयगृहांत 'रंगभूमीची पुनर्घटना' या विषयावर माझें व्याख्यान झालें. हायकोर्टाचे न्यायमूर्ति श्री. श्रीपादराव पळनीटकर अध्यक्षस्थानीं होते. मी पुण्याहून निघण्यापूर्वींच ह्या व्याख्यानाची तयारी माझ्या पद्धतीनें करून निघालों होतों. भाषणाच्या

प्रास्ताविक भागांत लक्ष्मीची आख्यायिका—लोकहिततत्पर राजानें आपल्या एकनिष्ठ नोकराचा केलेला वध—त्या राजधानींतील दोन श्रेष्ठ कार्यकर्ते धर्मवीर वामनराव नाईक आणि न्यायमूर्ति केशवराव कोरटकर ह्यांच्या-बद्दल आदर व्यक्त करणें अशी मी सुरुवात केली. ' रंगभूमीची पुनर्घटना ' हा माझा विषय होता. जवळ जवळ दोन तास मी बोललों. माझ्या त्या भाषणाचें कल्पनातीत कौतुक ज्ञाताज्ञात श्रोत्यांकडून झालें. खुद्द अध्यक्षांनीं माझी पाठ थोपटली. मी ते धन्यवाद नम्रतेनें स्वीकारले. गळ्यांत घातलेला हार सभा संपेपर्यंत गळ्यांतून काढावयाचा नाहीं असा शिष्टाचार आहे. अध्यक्षांनीं ती सूचना दिल्यामुळें मी तो शिष्टाचार बरोबर पाळला. सभागृहांतून मी बाहेर पडलों आणि पटांगणांत उभ्या असलेल्या दादा मसलेकरांनीं आनंदानें मला मिठीच मारली. वय वर्षें ७० चा तो म्हातारा भावनाविवश होऊन म्हणाला, " खरा मर्द आहेस. "

विठूकाका आणि नारायणराव दोघेहि हैद्राबादला आधींच आले होते. ते दोघे मसलेकरांकडे उतरले. दादा मसलेकर माझे सहाध्यायी रामभाऊ मसलेकर ह्यांचे वडील. हैद्राबादेंत फॅन्सी कापडाचे दुकानदार. म्हणून ते नांवाजलेले होते. नाटक मंडळ्यांचा राबता घरीं चालू. त्या मुक्कामांत दादांनीं ' झुंझारराव 'चें एक स्वगत म्हणून दाखविलें. त्यांचे ते गरकन् फिरणारे डोळे—तो विलक्षण भेदक आवाज—मी थक्क होऊन ऐकतच राहिलों. व्याख्यान झाल्यानंतर ४–५ दिवस आम्ही तिघें हैद्राबादेंत राहिलों. आबासाहेब जहागिरदारांनीं एका संध्याकाळीं २४–२५ निमंत्रितांसाठीं एक कार्यक्रम ठेवला. १४–१५ वर्षें वयाच्या त्यांच्या मुलीनें नाटचप्रवेश करून दाखविले. धीरोदात्तापासून विनोदापर्यंत विविध तऱ्हेच्या स्त्रीपुरुष भूमिका गद्य व संगीत त्या मुलीनें करून दाखविल्या. मला त्या मुलीची कला अभिनंदनीय वाटली. गेलीं चार वर्षें मी जवळ बाळगलेलें " मराठी रंगभूमि " हें छायाचित्र त्या मुलीला बक्षीस दिलें.

" विवेकवर्धिनी " हायस्कूलमध्यें प्रा. श्री. माटे, नारायणराव कुलकर्णी, विठूकाका व मी अशा चौघांना बोलावून आमचा सत्कार करण्यांत आला. 'यावेळीं प्रा. माटे ह्यांनीं आम्ही न्हाला बसलों असतां मला सांगितलें, " पुरोहित, तुम्ही चांगलें बोललात. " मी तो आशीर्वाद ग्रहण केला आणि



↑

'जाधवराव' श्री. मामा भट, 'शहाजी' श्री. केशवराव दाते, 'कठोर धिक्कार आणि निर्दय शस्त्र-प्रहार' हे शब्द उच्चारतांना शहाजीनें घेतलेला पवित्रा दर्शनीय आहे. गेलीं ३२ वर्षें माझ्या छंदांत केशवराव संधि मिळेल तसें मार्गदर्शन करीत आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम...................... दि: ....................

'वृन्दावन,' 'घनःश्याम'– नटश्रेष्ठ श्री. चिंतामणराव कोल्हटकर ह्यांच्या आवाजाची मस्ती असामान्य! मराठी रंगभूमीची निष्ठा अलौकिक!

↓



धीर करून त्यांना प्रश्न केला, "आपण कधीं नाटकांत काम केलें होतें का ?" त्या प्रश्नाला उलट प्रश्न करूनच त्यांनीं मला उत्तर दिलें, "नाटकांत कामें केल्याशिवाय असं बोलतां यतं कां ?" तो प्रश्न अशा कांहीं स्वरांत विचारला कीं मी गप्पच बसलों. त्यांच्या त्या प्रश्नानें मला राग तर आला नाहींच उलट मला आनंद झाला. प्रा. माटे ह्यांच्यासारखा एक व्यासंगी विद्वान् एक वेळ हौसेनें कां असो पण नाटकांत कामें करीत असे-आपणहि एक हौशी नट ! ह्यांची विद्वत्ता नसेना का अंगीं ते मोठे हें खरें पण मग आपणहि कांहीं फार छोटे नाहीं अशा सुखद संभ्रमांत मन कांहीं काळ सुखावलें ! माझ्या ह्या आनंदाचें आणखी एक कारण आहे. मी कॉलेजमध्यें असतां ज्या व्याख्यात्यांनीं मला भारून टाकलें अशा दोनतीन वक्त्यांपैकीं प्रा. माटे एक होत. मी ज्यांना एक वेळ देव मानले त्यांपैकीं एकानें माझी शिफारस करावी ही सामान्य गोष्ट नव्हे.

हैद्राबादच्या शतसांवत्सरिक उत्सवांत श्री. दत्तो वामन पोतदार, माटे, मामा वरेरकर, नारायणराव कुलकर्णी अशा प्रथितयश साहित्यिकांचीं भाषणें आयोजित करीत असतांना माझ्या नांवाला तेथील कांहीं प्राध्यापकांनीं विरोध केला. मी चांगलें बोलेन ह्याची हमी ते विरोधक मागूं लागले. मसलेकरांनीं त्यांना उत्तर दिलें, कीं वक्तृत्व ही मिठाई नव्हे कीं तिचा नमुना आधीं देतां येईल. बऱ्याच घासाघाशीनंतर ठरलेलें माझें तें व्याख्यान भलताच भाव खाऊन गेलें. त्यानंतर माझा नाट्यदर्शनाचा एक खाजगी कार्यक्रम ठेवण्यांत आला. एका धन्वंतरी महाशयाचा तो प्रशस्त दिवाणखाना होता. मी दुपारीं ती जागा पाहून आलों होतों. खाडीलकरांच्या नाटकांतील कांहीं स्वगतें आणि 'सत्याग्रही' हें व्यक्तिचित्र करावयाचें असें मी ठरविलें. मनांत मात्र खूपच अस्वस्थता होती. भाषणानें मिळविलेली अब्रू त्या कार्यक्रमानें जाण्याची धास्ती वाटत होती. कार्यक्रमाला पुष्कळच लोक जमले होते. कार्यक्रम प्रथमपासून रंगत गेला. 'सत्याग्रही' आणि त्यांतील 'महाराष्ट्र लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे' ह्या ओळींतून व्यक्त झालेला उन्माद, शेवटचें टिळकांचें भासचित्र सारें कांहीं व्यवस्थित झालें. कार्यक्रम संपला. शिलकी माणसें उरलीं. माझ्या भाषणाबाबत विरोधी भूमिका घेणारे प्राध्यापक मला भेटले आणि त्यांनीं मला प्रांजलपणें धन्यवाद दिले. नाटकाचा असा कांहीं अभ्यास असतो हें आम्हांला आज कळलें असेंपण ते म्हणाले. त्या कार्यक्रमानें माझी तर अब्रू वांचलीच. परंतु हैद्राबादमध्यें ती चळवळ करणाऱ्या लोकांना मोठें बळ आलें.

हैद्राबाद येथें नाट्य-क्षेत्रांत कार्य करणाऱ्या दोन संस्था आहेत. 'आदर्श नाट्य निकेतन ' श्री. लेले, श्री. प्रभुणे इत्यादींची एक व दुसरी डॉ. रानडे, श्री. दिवाकर कृष्ण ह्यांची एक. डॉ. रानडे उत्साही आणि ऐतिहासिक दृष्टीचे गृहस्थ आहेत. 'गजानन मंडळ ' या नांवाच्या एका क्लबाचा तीस वर्षांपूर्वीचा वृत्तांत मोडींत लिहिलेला त्यांनीं दाखविला. डॉ. रानडे ह्यांनीं हैद्राबादमधील नाट्यविषयक कार्याची सारी सामुग्री गोळा केलेली मी पाहिली. 'धन्वंतरी हॉल ' मधील माझा कार्यक्रम आदर्श नाट्य निकेतन ह्या संस्थेतर्फे झाला. त्यामुळें माझ्या कार्यक्रमाच्या यशांत त्या संस्थेचा मोठा वांटा होता.

हैद्राबाद येथें चालू असलेल्या शारदीय उत्सवांत 'सुंदर मी होणार ' या कवितेवर माझें एक व्याख्यान झालें. मला तयारी करायला तशी सवड मिळाली नाहीं. परंतु माझें भाषण परिणामकारक झालें. हा कार्यक्रम राम-मंदिरांत झाला.

हैद्राबादचें चहाचें निमंत्रण म्हणजे ३-४ जेवणाचें निमंत्रण असा मला अनुभव आला. त्या प्रदेशांत तशी संपन्नता भरपूर आहे. आहे दुर्भिक्ष तें मराठी भाषेचें. त्यामुळें मराठी बोलणाराचें तेथें कौतुक होतें. श्री. हर्डीकर, डॉ. साताळकर, डॉ. फाटक अशा कांहीं वेगळ्या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचा परिचय झाला. हर्डीकर मास्तर हैद्राबादमधील तीन पिढ्यांचे शिक्षक. इतका निरलस कार्यकर्ता क्वचित् पहायला मिळतो. धोतराचा कांचा मारून सायकल-वर टांग मारून कामाचे डोंगर उचलीत ते सारखे फिरत असतात. आळस हा शब्द त्यांच्या शब्दकोशांत नाहीं. मराठी समाजांत हर्डीकर हें एक जादूचें नांव आहे.

हैद्राबादहून मी परतलों तो अनुभव समृद्ध होऊन आणि आयुष्यांतील एक अविस्मरणीय कालखंड संपवून ! स्टेशनवर मसलेकर वगैरे माझे स्नेही, कांहीं नवे परिचित मला निरोप देण्यासाठीं आले होते. विठूकाका आणि नारायणराव ह्या प्रवासांत बरोबर होते. मसलेकरांनींच मला ही संधि मिळ-वून दिली. माझ्या भाषणांत मी माझें आयुष्य मराठी रंगभूमीच्या सेवेला वहाणार आहे अशी प्रतिज्ञा बोललों. भारावलेल्या मनाचा एक उद्गार ह्यापेक्षां त्या प्रतिज्ञेला काय अर्थ उरला ? 'सत्त्वपरीक्षा ' नाटक आम्ही वाचायचें-त्यांतला हरिश्चंद्र व्हायचें नाहीं. ● ● ●

## लेखांक सत्तेचाळीसावा

# सोलापूर-पंढरपूर-पुणें!

रात्रीं ३।। वाजतां सोलापूर स्टेशनवर उतरून आम्ही आमचे स्नेही श्री. कामतकर वकील ह्यांच्या घरीं पोहोंचलों. यशस्वी व्यवसाय करून कामतकरांनीं स्वतःचें घर बांधलें आहे. रात्रीं झालेलें जाग्रण आणि हैद्राबादच्या कार्यक्रमाचा शीण त्यामुळें बिछान्यावर अंग टाकतांच झोप लागली. तेवढ्यांत कामतकरांनीं मला सोलापूर येथें दोन व्याख्यानें द्यावीं लागतील हें सांगून ठेवलें.

श्री. कामतकरांचीं दोनतीन लहान मुलेंच घरीं होतीं. त्यांच्या नव-प्रसूत पत्नी माहेरीं होत्या. २४ तारखेला नारायणराव कुलकर्णी ह्यांचें भाषण सोलापूरच्या वाचनालयांत झालें. त्यानंतर मी बोललों. 'मराठी नाटकांच्या जागा' असा माझा विषय होता. मी तोंच विषय दोन भागांत बोललों. तेथील बोलपटगृहाचे एक संचालक श्री. पटवर्धन ह्यांनीं माझ्या भाषणानंतर आपली स्वतःची एक योजना ऐकविली. दुसऱ्यावर छाप पाडून बोलण्याची त्यांची पद्धत—मीहि प्रथम त्या प्रवाहांत वहात गेलों. परंतु नंतर विचार करून मी स्वतःला सांवरलें. दुसऱ्या दिवशींच्या व्याख्यानाची तयारी मी अधिक काळजी-पूर्वक केली.

विठूकाकांनीं मला पंढरपूर दाखविलें. प्रत्यक्ष विठ्ठल मंदिरांत दोन तास बारींत उभें राहिल्यानंतर देवदर्शन झालें. मनाला क्षेत्रस्थांच्या कारवायांचा उबग आला. रुपये पांच दक्षिणा देणारे आमच्या समोर दर्शनाला जात येत

होते आणि आम्ही बारीचे गज मोजीत उभे होतों. मी दर्शन घेतलें इतकेंच. पंढरपूरहून परत आल्यानंतर विठूकाकांना सोमवारचा उपास म्हणून जेवणें करून सभेला जाण्याचा विचार केला. सभेची वेळ ७ वाजतां–आम्हांला २० मिनिटें उशीर झाला. श्री. पटवर्धनांनीं त्या उशीराबद्दल विनाकारण दोष दिला. कामतकरांच्या अध्यक्षतेखालीं कालच्याच विषयावर माझें भाषण झालें. मी तास दीडतास बोललों. कामतकरांनीं गौरवपूर्ण शब्दांत माझे आभार मानले. माझा पाय सुजला होता–अंग तडतडत होतें. पण तें माझें मलाच. कार्यक्रम संपला. श्री. पटवर्धनांचा मी निरोप घेतला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं विरोध असला तरी मी मदत करीन. त्यांच्या त्या दिलदारपणाबद्दल मी त्यांचे आभार मानले.

रात्रीं १० वाजतां श्री. मंगळवेढेकर ह्यांच्या दिवाणखान्यांत सोलापूरमधील निरनिराळ्या नाटक करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींची एक बैठक झाली. २५।३० मंडळी उपस्थित होती. महाराष्ट्रांत २० संघटित नाट्यकेंद्रें स्थापन करण्याची योजना मी त्यांना सांगितली. उपस्थितांत स्वतःच्या कल्पना असलेले कोणीच नव्हतें. सोलापूर व्यवसायी नाटक मंडळ्यांचें हमखास उत्पन्नाचें गांव म्हणून नाटकें पहाण्याचा षोक आणि त्यामुळें स्वतः नाटकें करण्याचा छंद एवढाच त्यांच्या नाट्यविषयक चळवळीचा अर्थ होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही सोलापूर सोडलें व संध्याकाळीं पुण्यास पोहोंचलों. बस सर्व्हिसनें प्रवास केला. यमूताई आमची वाटच पहात होत्या. देवाला नवस करून त्या अस्वस्थ स्थितींतच त्या वाट पहात होत्या. विठूकाकांना पहातांच त्यांची काळजी दूर झाली व त्यांनीं एक रुपयाचे पेढे वांटले. पुण्यांत बी. टी. ची एक सहामाही संपत आली होती. आमच्या कॉलेजांतीलच प्रा. गद्रे ह्यांनीं लिहिलेल्या 'आम्ही कोण' या नाटकाचा प्रयोग पांडोबा कुलकर्णी व्यवसायी पद्धतीनें बसवीत होते. सदुभाऊ रानडे, सरोज बोरकर अशी व्यवसायी मंडळी त्यांत होती. नाटकाच्या तालमींना मी जात असे. परंतु त्यापेक्षां अधिक भाग मी त्यांत घेतला नाहीं. हैद्राबादहून परत येतांना मला एक कल्पना सुचली व मी ती नारायणरावांपाशीं बोललों. मला त्या कल्पनेबद्दल पुष्कळच हुरूप वाटत होता. ती कल्पना अशी. 'माईसाहेब' नाटक प्रथम रंगभूमीवर आलें त्याला २५ वर्षें झालीं होतीं. त्या नाटकाचा

रौप्यमहोत्सव करावा व तसा प्रयोग बसवावा अशी माझी योजना होती. सरोज बोरकर माईसाहेब, मी अमृतमामा, पांडोबा कुलकर्णी केशवमामा नारायण काळे उत्तम असा भूमिकांचा विचार केला. नारायणरावांना ती कल्पना आवडली व पुण्यांत तो उद्योग करावा असा बेत आंखला. पुण्यास नानासाहेब गोखले ह्यांना मी ती कल्पना सागितली त्यांनींहि प्रोत्साहन दिलें. पहिल्या सहामाहीनंतर पुणें सोडतांना ती जबाबदारी घेऊन जायचें हें मनाशीं ठरविलें.

२९ सप्टेंबरला डॉ. भालेराव पुण्यास येऊन गेले. ते, भागवान पंडीत आणि मी अशी त्रिवर्ग बैठक झाली. मराठी रंगभूमीच्या पुनर्घटनेचा एक आराखडा आम्ही तयार केला. त्यावर्षीं जळगांव येथें नाटयसंमेलनाचें अधिवेशन भरावयाचें होतें. श्री. केशवराव दाते ह्यांनीं अध्यक्षपद स्वीकारण्याचें चक्क नाकारलें. त्यामुळें आमची तिघांची अतिशय निराशा झाली. आम्हांला रागहि आला. विशेष रंगभूमीच्या पुनर्घटनेच्या योजनांचा पुरस्कार व्हावा म्हणून जळगांवच्या अधिवेशनाचें आम्हांला महत्त्व वाटत होतें.

केशवरावांची संमति मिळावी म्हणून मी पुण्याहून मुंबईला गेलों. केशवरावांची भेट घेतली. परंतु त्यांनीं नकारच दिला. मात्र तेथें ५ नोव्हेंबर रंगभूमीवर्धापन दिन म्हणून सांगलीस जाऊन साजरा करावा, सवाई माधवराव, हॅम्लेट ह्या नाटकांतील प्रवेश करावे—स्वतः केशवरावांनीं भूमिका कराव्या अशी चर्चा झाली.

मी एक प्रश्नमाला तयार करून केशवराव दाते ह्यांना देऊन ठेवली होती. त्या प्रश्नांचीं उत्तरें म्हणजे केशवरावांचें रंगभूमीवरील चरित्र अशी त्या प्रश्नांची मांडणी केली होती. पुरेसा वेळ मिळतांच आपण त्या प्रश्नांचीं उत्तरें लिहूं असेंहि केशवराव म्हणाले. शनिवारीं रात्रीं स्वतः केशवराव भालेरावांच्या घरीं आले. सांगलीच्या कार्यक्रमाची आणखी चर्चा झाली. कार्यक्रमाला तिकिटें ठेवून निम्में उत्पन्न रंगभूमीला अर्पण करावें असाहि विचार झाला.

१ ऑक्टोबर हा दिवस नाटयछटाकार दिवाकरांचा स्मृतिदिन म्हणून महाराष्ट्रीय कलोपासक श्रद्धेनें पाळतात. त्या वर्षीं ‘ नटाच्या दृष्टींतून दिवाकरांच्या नाटय–छटा ’ ह्या विषयावर बोलण्याची माझी इच्छा मी व्यक्त

केली म्हणून माझें भाषण व्हावयाचें होतें. श्री. केशवराव दाते ह्यांची भेट घेऊन मी सकाळीं मुंबईहून निघालों. गाडींतच भाषणाचे मुद्दे नमूद केले. समोर माझ्यापेक्षां वयानें तरुण असे दोन प्रवासी बसले होते. संभाषणाच्या ओघांत त्यांनीं सांगितलें कीं जुनीं नाटकें पहाणें आपल्याला फार आवडतें. मी पुण्यास पोहोंचलों. विमल पटवर्धन ह्या नटीनें अफू खाऊन आत्महत्त्या केल्याचें कळलें. पुण्यांतील सार्वजनिक असें हें माझें पहिलेंच व्याख्यान होतें. श्री. के. नारायण काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. भगवान पंडित ह्यांच्या दिवाणखान्यांत व्याख्यानाची व्यवस्था केलेली होती. निमंत्रित आणि दिवाकरांचे ऋणानुबंधी ह्यांचाच मुख्य भरणा श्रोतृवर्गांत होता. श्री. डांगे चंद्रकुमार ह्यांनीं अहवाल वाचला. नंतर माझें भाषण झालें. एक तास मी बोललों. दिवाकरांच्या नाटचछटा केवळ विनोदी असतात हा गैरसमज दूर व्हावा म्हणून त्यांच्या कांहीं करुणरसांतील व धीरोदात्त नाटचछटांचें साभिनय वाचन मी करून दाखविलें. नाटचछटेच्या शब्दाशब्दांतूनच नव्हे तर प्रत्येक विरामचिन्हांतून नाटच कसें भरलेलें आहे हें दाखविण्याची माझी धडपड होती. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत पवित्रा घेतला तोच विरोधाचा. त्यांनीं केलेल्या भाषणांत अवास्तव विधानें भरपूर होतीं. शब्दांत नाटच नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं I have four Potatoes हें वाक्य हास्य, करुण आणि विस्मय अशा तीन रसांत म्हणून दाखविलें. आतांपर्यंतच्या नाटककारांना – खाडीलकरांनासुद्धां नाटच लिहितां आलें नाहीं असलीं विधानें करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. मला तो सारा प्रकार अप्रशस्त वाटला.

५ नोव्हेंबर हा रंगभूमिदिन म्हणून साजरा केला जावा ह्या कल्पनेनें आम्ही एक पत्रक तयार केलें. त्यावर सह्या घेण्यासाठीं फिरलों तेव्हांहि असेंच चमत्कारिक अनुभव मला आले. श्री. पोतदार आणि अण्णासाहेब कारखानीस ह्यांच्याकडे मी गेलों. पोतदार भेटले नाहींत आणि कारखानीसांनीं एक स्वतंत्र व्याख्यान दिलें, 'नवें–ज्वलंत नाटक करा म्हणजे रंगभूमि जिवंत राहील हा त्यांचा संदेश! आपलें 'स्वैरिणी' हें नाटक महाराष्ट्रांत होऊं नये ह्याचा अर्थ काय हा आम्हांला सवाल.' केशवराव दाते ह्यांच्या पत्रकावर सही करण्याचें त्यांनीं स्वच्छ नाकारलें. नकार देतांना पुन्हा आणखी एक

टीकेचा डोस–केशवराव दाते कांहीं करूं शकणार नाहींत. मी २० वर्षांपूर्वीच अनुभव घेतला आहे.' ही मुलाखत संपवून आम्ही बाहेर पडलों. १२॥ वाजले होते आणि ऑक्टोबरचें ऊन चटका देत होतें.

प्रा. पोतदार ह्यांची भेट झाली. त्यांनीं सही दिली. परंतु कल्पना अव्यवहारिक असल्याचें सांगितलें. दाते स्वतः सांगलीला जाऊन राहणार आहेत कां ? हें सारें कोण करणार ? इत्यादि इत्यादि.

श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांच्याकडे शुक्रवारीं ६ तारखेला मी गेलों त्यांनीं सही देण्याचें नाकारलें. यात्रा म्हणून जाण्यापेक्षां सांगलीच्या लोकांनीं निमंत्रण करावें आणि मग जावें ही प्रथा अधिक प्रशस्त असें ते म्हणाले. आपण स्वतः सांगलीस देवल क्लबांच्या उद्घाटन प्रसंगीं जाऊं त्यावेळीं आपली कल्पना आपण तेथील लोकांना सांगू–या वर्षी सही नको असें ते म्हणाले.

श्री. केशवराव दाते ह्यांच्या पत्रकावर सह्या घेतांना जे नकार मिळाले त्यामुळें विचारांत खळबळ उडाली. श्री. नानासाहेब गोखले सांगली येथील श्री. बी. जी. कुलकर्णी ह्यांना घेऊन आले. सांगलीच्या उत्सवानंतर मिळालेला पैसा आणि त्यांतून निर्माण होणारे मानापमानाचे प्रसंग ह्यांनीं एकच गोंधळ निर्माण झाल्याचें कळलें. त्या क्षेत्रांतील कार्यकर्ते अटीतटीनें भांडत होते. एखादी नवी कल्पना रुजवायची तर त्यासाठीं हें क्षेत्र अनुकूल नव्हे. संस्कारक्षम कार्यक्षेत्र निवडणें अत्यंत चातुर्याचें काम आहे. पहिली गोष्ट नवीन कल्पनेचा पुरस्कार करण्याची ताकद त्या क्षेत्रांत पाहिजे. कल्पनेची भरपूर जाहिरात व्हायची म्हणजे वृत्तपत्रांचें पाठबळ हवें. तिसरी गोष्ट मनुष्यबळ आणि चवथी गोष्ट द्रव्यबळ. ह्या सर्व घटकांचा विचार करतां मुंबई हें एकच केन्द्र रंगभूमीच्या पुनर्घटनेसाठीं योग्य असेंच म्हणावें लागेल. १४ एप्रिलला मुंबईच्या गोदींत स्फोट झाला तरी दुसऱ्या दिवसापासून मुंबईकरांनीं ज्या धडाडीनें उत्सव केला त्याचा विचार करतां मुंबई हेंच मुख्य केन्द्र आणि भालेराव हे पुढारी असें कांहीं विचार मनांत खळबळ करूं लागले.

● ● ●

लेखांक अठ्ठेचाळीसावा

# पांच नोव्हेंबर आणि नंतर !

मराठी रंगभूमीचा वर्धापन-दिन प्रतिवर्षी ५ नोव्हेंबरला साजरा करावा अशी योजना आंखून तशीं पत्रकें ठिकठिकाणीं पाठविण्यांत आलीं. मुंबई, पुणें, धुळें, नाशिक इत्यादि ठिकाणीं हा वर्धापनदिन साजरा करण्यांत आला. नाशिकला हा दिन साजरा करतांना महाराष्ट्र नाट्य मंदिराला बाल नटांच्या आनंद संगीत मंडळीचे मालक श्री. अण्णासाहेब शिरगुप्पीकर ह्यांनीं फार मोठें सहकार्य दिलें. नाटयव्यवसायांतील ज्या व्यक्तींशीं माझा ह्या ना त्या कारणानें संबंध आला त्यांत श्री. शिरगुप्पीकर ह्यांच्या इतकी कल्पक, व्यवहारदक्ष आणि संघटना चतुर व्यक्ति मला आढळली नाहीं.

प्रल्हाद औरंगाबादकर ह्याच्या वाडयांतील चौकांत 'तोतयाचें बंड' या नाटकांतील कांहीं प्रवेश महाराष्ट्र नाट्य मंदिरानें केले. मी 'सुखनिधान' प्रभाकर महाबळ 'दौलतगीर' आणि वसंत बापट 'रामचंद्र नाईक' अशा भूमिका त्या प्रवेशांत होत्या. किल्ल्याचा नवीन रंगविलेला देखावा, चौकासाठीं चहूंबाजूंनीं कापडी झालर इत्यादि सजावट शिरगुप्पीकरांनीं पुरविली. ते स्वतः कार्यक्रमाला हजर राहिले. कार्यक्रम यशस्वी झाला.

श्री शिरगुप्पीकर नाशिकला 'सोनार वाडयांत' आपल्या कंपनीसह उतरले होते. नवीन नाटकाचे कांहीं देखावे तयार करून घेण्याचें काम ते करवून घेत होते. त्या मुक्कामांत त्यांच्या व माझ्या अनेक मुलाखती झाल्या. युद्धकालांत मराठी नाटकमंडळ्या हातघाईस आल्या त्याचें कारण त्यांनीं

सांगितलें व त्यांनीं योजलेला उपायहि सांगितला. त्या काळांत केरोसीन अत्यंत दुर्मिळ होतें. फारच थोड्या शहरांत विजेची सोय होती. अशा अडचणींत किटसन लाईटवर चालणारीं नाटकें घासलेट नाहीं म्हणून बंद पडूं लागलीं. शामरावांनीं मनमाड येथें असलेल्या लष्करी छावणींतून एक जुनें मोटर मशीन विकत घेतलें. रस्त्यावर धांवणाऱ्या लष्करी. गाड्या वाटेल तेवढें पेट्रोल विकत असत. त्याचा उपयोग करून शामरावांनीं त्या एंजीनवर वीज निर्माण करून धंदा चालू ठेवला. दोन गॅलन पेट्रोलमध्यें लाईटच लाईट मिळे.

शामरावांनीं सगळ्या महाराष्ट्राचा एक नकाशा तयार केला होता. त्यावर मराठी नाटकमंडळीला प्रयोग करतां येतील अशीं गांवें दाखविलीं होतीं. शामरावांचें म्हणणें असें कीं एका नाटक मंडळीला हीं सर्व गांवें फिरून पुन्हां पहिल्या मुक्कामाला पोंचायला बारा वर्षें लागतील. जवळजवळ दीडशें गांवांचा तो नकाशा होता.

नाटक मंडळींतील वादनकार अधिक पगार मिळावा म्हणून कंपनी सोडण्याच्या गोष्टी बोलूं लागले. शामरावांनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते ऐकेनांत म्हणून शामरावांनीं त्यांना रजा दिली. सहा महिने नाटक मंडळी बंद ठेवून मुंबईस जाऊन त्यांनीं एक टेप रेकॉर्डिंग मशीन खरेदी केलें. उत्कृष्ट साथवाल्यांकडून साथीचें रेकॉर्डिंग घेतलें. नाटकांत काम करणाऱ्या मुलांना त्या साथींत गाणें म्हणण्याची संवय करावी लागे. मुलांचे छोटे आवाज दूरवर ऐकूं जावे म्हणून बॅटरीसह छोटे मायक्रोफोन बालनटांच्या गळ्यांत ठेवण्याची व्यवस्था त्यांनीं केली होती. प्रेक्षकांची नाडी ओळखून ट्रिकसीन, जादू, करमणूक, गायन या सर्वांचा वापर यथायोग्य प्रमाणांत ते आपल्या प्रयोगांतून करीत. शामरावांनीं आर्थिक दृष्ट्या अत्यंत यशस्वी व्यवसाय केला ह्यांत शंकाच नाहीं. एकाच नाटक मंडळीच्या दोन शाखा महाराष्ट्रांत एकाच वेळीं प्रयोग करीत असल्याचें माझ्या माहितीप्रमाणें मराठी रंगभूमीच्या इतिहासांत हेंच एकमेव उदाहरण आहे.

एके दिवशीं दुपारीं मी शामरावाकडे गेलों. मला तान्ह्या मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला. शामरावांनीं खुलासा केला, "बाळंतपणाला मुलगी आली आहे. तिचं मूल आहे." ह्या मुली कोण ह्याचा शामरावांनीं खुलासा केला. नाटकमंडळीत आठ दहा वर्षें वयाच्या अनाथ मुली येऊन

रहात. बालनटांच्या कंपनींत त्या कामें करीत. शामराव त्यांचें संगोपन करीत. त्यांना खाणें-पिणें-कपडालत्ता शिवाय त्यांच्या योग्यतेप्रमाणें दरमहा चारपांच रुपये पगार देत. ह्या मुली नंतर वयांत येत. अंगीं पिंडीं भरूं लागत आणि रंगल्यानंतर रंगभूमीच्या प्रकाशांत आकर्षक दिसूं लागत. समाजांतील एखादा उल्लूके भाई मशालजी त्यांच्याशीं लग्न करी. त्या संसारांत शिरत. हें सारें शामरावांनीं घडविलें. त्या मुली लग्नानंतर शाम-रावांच्या नाटक मंडळींत माहेरपणाला-बाळंतपणाला येत आणि शामराव त्यांचं माहेरपण यथास्थित करून खणानारळांनीं ओटी भरून त्यांना सासरीं पाठवीत. संन्याशाच्या संसारापेक्षांहि नाटकवाल्याचा हा संसार अजब होता.

शामरावांनीं कोल्हापूरला घडलेला एक प्रसंग मला सांगितला. त्यांच्या असामान्य धैर्याचा आणि कंपनींतील बालनटांबद्दलच्या जिव्हाळ्याचा द्योतक असा तो प्रसंग आहे. पॅलेस थिएटरमध्यें प्रयोग लागला होता. मुलें रंगण्यासाठीं आधींच गेलीं होतीं. अंधार पडल्यावर शामराव थिएटरला जायला निघाले. जाण्याचा रस्ता एका नाल्यांतून होता. नाल्यांतून जातांना शामरावांना सर्पदंश झाला. शामरावांनीं क्षणभर विचार केला. खिशांतून चाकू काढून दंश झालेल्या जागीं रक्त जाईल अशी कातडी कापली आणि बोटाला रुमाल घट्ट बांधून ते चालू लागले. मुलें रंगून अण्णांची-शामरावांची वाट पहात होतीं. नाटक सुरूं झालें. अण्णा हार्मोनियमवर साथ करीत होते. एक अंक झाल्यावर अण्णांनीं मुलांना शांतपणें तो प्रसंग सांगितला आणि जसें कांहीं कांहींच घडलें नाहीं अशा रीतीनें पुन्हां नाटक सुरू केलें. त्या धीरो-दात्त नाटकवाल्याच्या स्मृतीला माझें अभिवादन-सदैव अभिवादन !

* * *

मराठी रंगभूमीचा वर्धापनदिन साजरा झाल्यानंतर दुसऱ्या सहामाही-साठीं मी पुण्यास गेलों तो बराच उशीरां. 'उसना नवरा' ह्या नाटकाचा प्रयोग स्नेहसंमेलनासाठीं करावा असें ठरलें. भूमिका वांटल्या गेल्या. आमचे प्रिन्सिपल श्री. म. शं. गोडबोले आजारी झाले आणि प्रा. श्री. बापट त्यांचें काम पाहूं लागले. नाटकांत काम करणारे सगळेच हौशी आणि पुन्हां सुशिक्षित त्यांचा आणि शिस्तीचा सुतराम् संबंध नव्हता. मला त्यांच्याकडून पाहिजे

तशा भूमिका करवून घेणें अशक्य होतें. माझ्याकडे ‘लख्यालंगोटचा’ ही भूमिका देण्यांत आली.

आम्हांला म्हणजे बी. टी. कॉलेजच्या आम्हा विद्यार्थी–शिक्षकांना मुख्य अडचण आली ती प्रयोग करण्याच्या जागेची. नूतन मराठी विद्यालयाचे सभागृह नाकारण्यांत आलें. त्या बाबतींत तात्यासाहेब केळकरांची मुलाखत घेतली तर त्यांनीं कानावर हात ठेवले. बी. टी. वर्गाचे आम्ही ५०–६० विद्यार्थी आणि आमचे ५–१० प्राध्यापक म्हणजे सरासरी १०० प्रेक्षक बसतील एवढीच जागा आम्हांला पाहिजे होती. गांवांत एखादें मंगल कार्यालय मिळावें म्हणून खटपट करूं लागलों. स्त्री–पुरुष संमिश्र नाटकाचा प्रयोग आम्ही करीत होतों. एक मंगल कार्यालय ठरविलें. रुपये पांच बयाणा दिला. संध्याकाळीं चालक महाशयांना भेटायला गेलों तेव्हां त्यांनीं रुपये पांच परत करून सांगितलें, “अहो, ते कृष्णराव मराठे येऊन गेले. तुम्ही जें कांहीं करीत आहांत तें संस्कृति विनाशक आहे असें ते म्हणतात. मला ही उठाठेव. नको. तुम्ही दुसरी जागा पहा.” आम्ही परोपरीनें समाजावून सांगितलें परंतु तो गृहस्थ ऐकेना.

बॅ. खाजगीवाले ह्यांच्या ताब्यांत बुधवारांतलें आर्यभूषण थिएटर आहे असें कळलें. आमचे शिष्टमंडळ त्यांच्या भेटीस गेले. ह्या शिष्टमंडळांत दोघीतिघी विद्यार्थिनी होत्या. आम्ही बाहेर बॅरिस्टर साहेबांची भेट घेतली त्यांनीं अत्यंत सौजन्यानें आमचें म्हणणें ऐकून घेतलें. आम्हांला जागा तर मिळालीच परंतु पडदे, रंगपट इत्यादि सर्व प्रकारचें साहाय्य देण्याचें आश्वासनहि त्यांनीं दिलें. आतां निघायचे म्हणून आमच्या सहकारी विद्यार्थिनींची चौकशी करूं लागलों तर त्या स्वयंपाकघरांत चक्क पोळी भाजी खात बसलेल्या दिसल्या.

आर्यभूषण थिएटर चालू स्थितींत नव्हतें. चार हमाल लावून सांचलेली धूळ आधीं साफ करून घेतली. खाजगीवाल्यांनीं पडदे रंगपट, सगळें साहाय्य आम्हांला दिलें. मिसेस् भागवत एक भूमिका करणार होत्या. त्यांचे ‘मिस्टर’ ती पहाण्यासाठीं मुद्दाम बाहेरगांवाहून आले होते. भागवतबाईंचें रंगणें झालें. गालावर किंचित् लाली देण्यास मी रंगवणाराला सांगितलें. मिस्टर भागवतांना बोलावलें व त्यांना म्हणालों, “मिसेस् भागवत आतां जशा

दिसतात इतकी त्यांची प्रकृति न रंगतां राहील ह्याची काळजी घ्या." ते दोघे हंसू लागले.

सर्वांचें रंगणें झाल्यावर माझें काम लहान असल्यानें मी शेवटीं रंगायला बसलों. 'राक्षस दिसतो मेला' असें ज्याचें वर्णन सार्थ वाटेल असा मेकअप करण्यास रंगविणाराला सांगितलें. भुंवया जाड केल्या, चेहऱ्यावर भेसूर रेषा काढल्या, तशाच मिशा लावल्या. जिना उतरून त्या वेषांत खालीं येऊं लागलों. मला न ओळखून नाटकांतल्या मुली आणि इतर मुली किंचाळू लागल्या. मी त्यांना हात जोडून सांगितलें, "अहो, मी पुरोहित." एका क्षणांत किंचाळण्याचें रूपांतर खिदळण्यांत झालें. आमचे सर्व प्राध्यापक प्रयोगाला हजर राहिले. प्रयोग चांगला झाला. सेनापति बापट ह्यांच्या सुनेनें एका कोचाच्या आड बसून साऱ्या नाटकाचें प्रॉम्टिंग केलें. त्या नाटकाच्या निमित्तानें एका अतिशय सालस मुलीचा परिचय झाला.

खाजगीवाले आणि माईसाहेब दोघेहि प्रयोगाला हजर राहिले. आम्हांला कांहींहि अडचण आली तरी ती दूर करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. अतिशय सहानुभूतीच्या वातावरणांत तो प्रयोग झाला.

* * *

१९४४ डिसेंबरमध्यें जळगांव येथील नाट्यसंमेलनांत झालेल्या ठरावाला अनुसरून पुण्यांत इंग्रजी शाळेंतील विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या नाट्यस्पर्धा घेण्यासाठीं मी एक योजना आंखली. निरनिराळ्या १५–१६ मुख्याध्यापकांना भेटून त्यांच्या शाळेनें स्पर्धेत भाग घ्यावा म्हणून मी प्रयत्न केला. त्या निमित्तानें मी पुण्यांतील कांहीं शाळा पाहिल्या. सर्वच मुख्याध्यापक उत्सुक दिसले नाहींत. मुलांसाठीं कांहीं प्रवेश व मुलींसाठीं कांहीं प्रवेश अशी निवड करून दिली. त्यांत मुलेंमुलीं एकत्र येणार नाहींत असा नियम पाळला.

जागा, पंच, बक्षिसासाठीं लागणारा निधि–सगळ्याच अडचणीच्या गोष्टी. ह्या बाबतींत जास्तीत जास्त सहकार्य श्री. नानासाहेब गोखले ह्यांनीं दिलें. ते सतत पुण्यांत वावरणारे त्यामुळें त्यांना सर्वच माहिती होती.. सेवासदनची जागा मिळाली–पंच मिळाले. बक्षिसासाठीं लागणारे रु. २५ कोठून आणावयाचे हा माझ्यापुढें प्रश्नच होता. विजापुरे ह्यांच्या कापड दुकानीं संध्याकाळीं बहुधा नानासाहेब भेटत. मी तेथें जाऊन सचिंत स्थितींत बसलों.

नानासाहेबांनीं मला कारण विचारलें. मी म्हणालों, " सगळीं सोंगें सजलीं. पैशाचें सोंग कसें सजवायचें एवढाच प्रश्न आहे. " नानासाहेबांनीं तोहि प्रश्न मिटविला. त्यांनीं कोठून पैसे आणले तें मला शेवटपर्यंत कळलें नाहीं. आतां तें कळणें शक्य नाहीं. कारण नानासाहेब इहलोकांत नाहींत.

माध्यमिक शाळांतील नाटच-स्पर्धांचा हा अल्पारंभ क्षेमकर झाला पुण्याच्या महाराष्ट्रीय कलोपासक ह्या संस्थेनें त्यानंतर प्रतिवर्षीं ह्या स्पर्धा भरविल्या–विद्यार्थ्यांना शुद्ध आणि अस्खलित वाणीचें शिक्षण देणारे अभ्यास-क्रम आंखले–उन्हाळ्याच्या सुटींत तसे वर्ग घेतले–नाटच हा एक शिक्षणाचा विषय आहे अशी प्रतिष्ठा त्या विषयाला मिळवून दिली. श्री. भगवान पंडित व त्यांचे सहकारी ह्यांनीं त्या स्पर्धा आपल्या संस्थेचा एक अभिमानास्पद कार्यक्रम म्हणून त्याची जोपासना केली–प्रतिवर्षी बक्षीस समारंभासाठीं मातब्बर अध्यक्ष आणून कार्यक्रमाची प्रतिष्ठा वाढविली–स्पर्धांचें इतिवृत्त तयार केलें. ह्या उपक्रमानें मराठी रंगभूमीवरील प्रचलित चळवळीचा इति-हास ह्या संस्थेनें व तिच्या निरलस कार्यकर्त्यांनीं घडविला असें म्हणण्यांत बिलकुल अतिशयोक्ति नाहीं. १९५४–५५ पासून ह्या नाटचस्पर्धा सरकार भरवूं लागलें. स्पर्धा होतात. शाळा भाग घेतात इतकेंच !

●●●

लेखांक

एकूणपन्नासावा

# "गडकऱ्यांचा राजयक्ष्मा"

शिक्षकाचा व्यवसाय करणाऱ्या माझ्या मनाचा स्पृहणीय विकास मी बी. टी. ला असतांना १९४४–४५ ह्याच वर्षांत झाला. मला लाभलेल्या दोघांहि मार्गदर्शकांनीं प्रा. पाटणकर आणि प्रा. काळे ह्यांनीं अध्यापन पद्धतीपुरतें तरी मला जगांत निर्भय करून सोडलें.

जोगेश्वरी येथील इस्माईल कॉलेजमध्यें माझा एक नाटचदर्शनाचा कार्यक्रम झाला. योगायोग असा कीं ह्याहि कार्यक्रमाला श्री. के. नारायण काळे हेच अध्यक्ष होते. ह्या कॉलेजचीं कांहीं वैशिष्टचें डोळचांत भरण्यासारखीं आहेत. टेकडीवर बसलेल्या ह्या कॉलेजच्या इमारती भोंवतालच्या रम्य परिसरांत मोठचा ऐटबाज वाटतात. दुसरें वैशिष्टच म्हणजे ह्या कॉलेजांतील मुस्लीम विद्यार्थ्यांचा मराठी भाषेचा विलक्षण अभिमान आणि अतिशय शुद्ध मराठी बोलण्याबद्दल त्यांची ख्याती हीं होय. आमच्या नाशिकचे प्रा. नानासाहेब फडके येथें गणित विषयाचे प्राध्यापक आहेत. नाशिक हायस्कूलचा मी एक माजी विद्यार्थी म्हणून त्यांना मजबद्दल अकारण लोभ वाटतो. माझ्या कार्यक्रमाचें मन:पूर्वक कौतुक त्यांनीं केलें. प्रा. श्री. बा. रानडे ह्यांनीं हा कार्यक्रम योजला. कां तें मला माहीत नाहीं. त्या कार्यक्रमांत 'सत्याग्रही' हें जीवनचित्र मी केलें. त्यामुळें एक कॉलेजकन्या नाराज झाली. तिला तसेंच कांहीं शोकपूर्ण नाटच करावयाचें होतें व मी त्या रसाचा आधींच आविष्कार केला. आतां आपल्या कामाला रंग भरणार नाहीं असें तिला वाटलें. प्रत्यक्ष

तसें कांहीं घडलें नाहीं. मोठ्या हौसेनें त्या मुलीनें आपल्या त्या प्रवेशासाठीं अनेक वस्तू जमविल्या होत्या.

त्या कार्यक्रमामुळें मला कांहीं कल्पना सुचल्या. प्रत्येक 'स्वगत' ही एक खानदानी चीज आहे अशा पद्धतीनें तें बसविलें पाहिजे. त्या स्वगतांतील प्रत्येक हालचालीचें, प्रत्येक उच्चाराच्या आरोह–अवरोहाचें, मुद्राभिनयाचें कां व कसें संयुक्तिक असलें पाहिजे. निरनिराळ्या महत्त्वाच्या नाटकांतील ५–५० तरी स्वगतांचा असा अभ्यास करायला पाहिजे. प्रत्येक स्वगत त्यावरील टीकेसह दहा मिनिटें तरी पुरावें. मराठी नाटकांचा नाद असलेला एक गुजराती विद्यार्थी तेथें भेटला. मराठी रंगभूमीचें पुनरुज्जीवन होत आहे असें आपल्याला वाटत नाहीं का? गद्य भाषणांत Rhythm असते का? असें कांहीं विचारप्रवर्तक प्रश्न त्यानें विचारले.

२७ जानेवारी १९४५ ला इस्माईल कॉलेजमध्यें वरील कार्यक्रम झाला. एक दिवस मुंबईंत राहिलों. त्यांत कांहीं महत्त्वाच्या मुलाखती झाल्या. श्री. मामा पेंडसे ह्यांनीं बसविलेलें 'काळ्यांची सोनू' हें नाटक पाहिलें. त्यांनीं 'माईसाहेब' नाटकाच्या प्रयोगाबद्दल मला विचारलें. श्री. नारायणराव कुलकर्णी ह्यांना मान आणि पैसा दोन्हीं मिळावींत अशी त्यांची इच्छा. श्री. बावडेकर ह्यांच्या भेटींत 'अब्राहम लिंकन' आणि 'रॉबर्टली' ह्या दोन नाटकांबद्दल बोलणें झालें. जॉन ड्रिंकवॉटर ह्या नाटककाराचीं हीं दोन विलक्षण नाटकें आहेत. शेंकडों मैल पसरलेल्या रणक्षेत्रावर ह्या नाटकांतील नाट्यपूर्ण घटना घडतात. सैन्याचे तळ आणि त्यांतील सैनिक–त्यांच्या जीवनविषयक आशा–अपेक्षा सारें कसें डोक्यांत शिरतें आणि तेथें दीर्घकाळ घट्ट बसतें. अमेरिकेंत ह्या नाटकाचे प्रयोग होतात हें मला कळलें तेव्हां मला अतोनात आश्चर्य वाटलें.

त्यानंतरची महत्त्वाची मुलाखत म्हणजे नटवर्य केशवराव दाते ह्यांची. पुण्याच्या माझ्या १ ऑक्टोबरच्या व्याख्यानाविषयीं आणि कॉलेजमध्यें झालेल्या कार्यक्रमाविषयीं मी त्यांच्याशीं बोललों. ते म्हणाले, "सत्याग्रही लिहून काढा. त्याचा शेवट Tragic च करा. तोच वास्तविक आहे. Jail life वर ती चांगली टीका आहे. 'सवाई माधवराव' आपण एकत्र वाचूं. चरित्रविषयक प्रश्नांविषयीं सवड काढून या म्हणजे सांगेन." यानंतर कांहीं


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
धनक्रम ........................ दि: ....................

बोलणें झाल्यावर अत्यंत विचारप्रवर्तक अशी नाट्यचर्चा केशवरावांनीं केली. त्यांच्या अंतःकरणांतील तें सचेतन नाट्य पाहून मला फार आनंद झाला.

केशवरावांच्या भाषणांतील ते दोन महत्त्वाचे मुद्दे त्या वेळीं मी जवळ-जवळ त्यांच्याच शब्दांत लिहून ठेवले. आजहि तोच उतारा येथें देत आहे:

"१) जयंताची भूमिका पंचवीस वर्षें करतांना मला वयाच्या निरनिराळ्या अवस्थेंतून जावे लागले. सुरुवातीला मी २३–२४ वर्षांचा–जयंताच्याच वयाचा–भावनावश तरुण होतों. परिणाम–समरस होत असे. पुढें कांहीं वर्षांनीं जयंत हा ढोंगी आहे असें वाटूं लागलें. पूर्वीं विषाचा प्रवेश करतांना माझ्या डोळ्यांतून अश्रू येत, ते येईनासे झाले.

२) गडकऱ्यांची भाषा बोलतांना ती काव्यात्मक भाषा Sing song पद्धतीनें बोलून तिच्यांतील काव्य लोकांना जाणविलें पाहिजे. आज हा भाषणपद्धतीचा प्रयोग चांगल्या पातळ आवाजाच्या नटानें करावा. 'राजसंन्यास' नाटकांत अशीच भाषा आहे. तोंडावरील, डोळ्यांतील अभिनय दाखविण्याची धडपड करण्यापेक्षां नटानें आपलें बोलणें जास्तीत जास्त सुंदर केलें पाहिजे. oratory (वक्तृत्व)च ऐकायला, पहायला, प्रेक्षक येतात. अभिनय पाहणारे फार थोडे. स्वतः गणपतराव जोशी ह्यांची भाषण-पद्धतीच मनाचा वेध घेणारी होती. त्यांचा आवाज खालीं वर वाटेल तसा फिरत असे. क्षणांत तो सद्‌गदित होई तर क्षणांत आवेशानें ठणठण वाजूं लागे. ही करामत और–अलौकिक होती. या नटाला तोड नाहीं. मी अनेक वेळां त्यांचे प्रवेश पाहिले–परंतु त्यांच्यासारखा आवाज काढण्याची माझी शक्ति नाहीं.

३) कीचक–वध नाटकांत भागवतांनीं कीचकाला जें Bearing दिलें–जी भाषण–पद्धति बसविली तीच बरोबर होती. महाराष्ट्र नाटक मंडळीच्या विशिष्ट भाषण पद्धतीवर गणपतराव बोडस जो कृत्रिमतेचा आक्षेप घेतात तो चुकीचा आहे. खाडीलकरांच्या नाटकांतील भाषाच अशी आहे कीं ती परिणामकारक करण्यासाठीं विशिष्ठ भाषणपद्धति तयार करणें आवश्यक होतें. तीं भाषणें थिल्लरपणें म्हणतांच येणें शक्य नाहीं. प्रत्येक पदाची चाल निराळी तशी प्रत्येकाच्या भाषेची भाषणपद्धति निराळीच असणार. असे कांहीं प्रयोग करावेत असें मनांत येते.सवती मत्सरांतील रामाचें काम करतांना अभिनयापेक्षां भाषणांतील Oratory ला मी अधिक

महत्त्व दिलें. सिनेमांत जिला वास्तवपद्धति म्हणतात ती अत्यंत अयशस्वी आहे. अभ्यास न करणारांनीं योजलेली ती सोपी पळवाट आहे. "

तें भाषण ऐकतांना एक अतिशय खेदकारक विचार मनांत आला. ह्या नटाला रंगभूमीच्या कार्याला आपलें सर्वस्व वहातां येऊं नये हें आमचें कर्मदारिद्रय होय!

'सत्याग्रही' लिहिण्याचा प्रयत्न मी केला. परंतु २–२।। पानापलीकडे माझी प्रगति झाली नाहीं. दुपारीं श्री. बंडोपंत धुमाळ मजकडे येऊन गेले. सगळ्या नाटकमंडळ्या मोडून एक मध्यवर्ती जबाबदार नियंत्रक संस्था असली पाहिजे ही त्यांची आवडती कल्पना आहे. Temple Theatres अशा एका संस्थेचा उल्लेख संभाषणांत झाला. एक कंत्राट कंपनी–पैसा मिळविणें एवढेंच उद्दिष्ट! पैसा येतो आहे आणि खर्च होतो आहे. कशासाठीं? राम जाणे!

मुंबईच्या त्या मुक्कामांत अंधृटकरनें मला पुष्कळच साहाय्य केलें. नाट्यविषयक कांहीं उद्बोधक चर्चा झाली. एका फ्रेंच नाटिकेचें त्यानें केलेलें भाषांतर मी वाचलें. चांगलें होतें तें Modern म्हणजे काय असा एक मुद्दा बोलण्यांत निघाला. रूढ विचारसरणी आणि रूढआचार सोडून चिरंतन कल्याणाच्या दृष्टीनें सामाजिक प्रश्नांकडे पाहणें म्हणजे Modern! त्या दृष्टीनें ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, शिवाजी, टिळक, आगरकर, गांधी सर्वचजण Modern आहेत. केवळ प्रेम–विषय हाताळणें म्हणजे Modern होणें नव्हे.

२३ : १ : १९४५ ला गडकरी–स्मृति दिनानिमित्त नूतन मराठी विद्यालयाच्या सभागृहांत माझें व्याख्यान झालें. त्या व्याख्यानाचा पूर्वेतिहास विचित्र आहे. प्रा. दत्तो वामन पोतदार यांच्या घरीं १० जानेवारीला एक बैठक झाली. नटवर्य श्री. चिंतामणराव कोल्हटकर त्या बैठकीला हजर होते. त्या सभेसमोर गडकरी स्मृतिदिनानिमित्त नाट्यस्पर्धा व्हाव्यात असा ठराव मी मांडला. त्यावेळीं आलेला अनुभव खेदजनक आहे. सूचना उत्तम पण दिवस थोडे. एवढ्या थोड्या वेळांत शाळा कितपत भाग घेतील असे आक्षेप घेण्यात आले. योजना नापास झाली. चिंतामणराव आणि मी दोघेहि चिडलों. सभा संपतांना दत्तोपंत पोतदारांनीं मोठ्या कौशल्यानें ती योजना संमत

करून घेतली. त्याच बैठकींत २३ तारखेच्या सभेचा मुख्य वक्ता म्हणून माझी निवड करण्यांत आली. माझे एक जुने परिचित—श्री. वसंतराव देशमुख ह्यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली.

माझा व्याख्यानाचा विषय 'गडकऱ्यांचा राजयक्ष्मा' असा होता. 'एकच प्याला' ह्या नाटकाला 'ठिगळ' ह्या शीर्षकाखालीं श्री. वि. स. गुर्जर ह्यांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत 'राजयक्ष्मा' हा शब्द वापरला आहे. १९१९ मध्यें 'एकच प्याला' ह्या नाटकाचें पुस्तक जेव्हां प्रथम माझ्या हातांत आलें त्यावेळीं विशेषत्वानें ज्या गोष्टी लक्षांत राहिल्या त्यांपैकीं 'राजयक्ष्मा' हा शब्द एक होय. गडकऱ्यांचें निधन क्षयरोगानें झालें. त्या रोगाला हा संस्कृत शब्द आहे. 'क्षय' ही एक शारीरिक पीडा आहे. गडकऱ्यांनीं आपल्या समाजाचें जें निदान केलें त्यांत दारिद्र्यामुळें शिक्षणावाचून तडफणारीं मुलें हें समाजाचें एक विलक्षण दुखणें आहे. त्या कल्पनेचें प्रतीक म्हणून गडकऱ्यांनीं 'जयंत', 'सुधाकर' आणि 'प्रभाकर' ह्या भूमिका निर्माण केल्या आहेत. जयंताचें शिक्षण मामाघरीं, सुधाकराला रामलाल भेटला तर प्रभाकराला त्या भावड्या धुंडीराजानें पोटाशीं धरलें. 'एकच प्याला' ह्या नाटकांत रामलाल आणि भगीरथ ह्यांच्या प्रवेशांत एक 'लोकशिक्षण' ह्या विषयावरचें व्याख्यानच गडकऱ्यांनीं रामलालच्या तोंडीं घातलें आहे. शिक्षण—सार्वजनिक शिक्षण हाच एक मार्ग ह्या देशाच्या उद्धारासाठीं गडकरी निश्चयात्मक स्वरूपांत सांगतात. माझ्या व्याख्यानाचें तें सूत्र मी विस्तारानें सांगितलें. माझी विचारसरणी निर्दोष आहे हें पडताळून पाहण्यासाठीं मी श्री. वि. स. गुर्जर ह्यांची मुलाखत घेतली. अण्णासाहेब भोपटकर ह्यांच्या घरीं त्या वेळीं त्यांचा मुक्काम होता. त्यांनीं माझ्या विचारांना पाठिंबा दिला. त्या व्याख्यानानंतर माझे आभार मानतांना श्री गं. भा. निरंतर म्हणाले, "२५ वर्षानंतरहि गडकऱ्यांबद्दल कांहीं नवीन बोलतां येतें हें आजच्या वक्त्यांनीं सिद्ध केलें आहे."

● ● ●

लेखांक पन्नासावा

# खाडीलकरांचा वीररस !

महाराष्ट्र नाट्य मंदिराचे एक ज्येष्ठ व श्रेष्ठ कार्यकर्ते माझे स्नेही श्री. बाळासाहेब कानिटकर ह्यांनीं तत्त्वज्ञान हा विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची पीएच्. डी. ही पदवी मिळविली. ह्या त्यांच्या यशाबद्दल आम्ही सर्व मित्रांनीं त्यांचें मन:पूर्वक अभिनंदन केलें. २१ : ७ : १९४५ आषाढ शुद्ध एकादशीला हा गौरव–समारंभ झाला. नाशिक सोडून पुण्याला स्थायिक होण्याचा निर्णय कानिटकरांनीं घेतला. मी बी. टी. होऊन परत आलों. आणि पीएच्. डी. होऊन कानिटकर चालले. १९२९ मध्यें महाराष्ट्र नाट्य मंदिराची औपचारिक स्थापना झाल्यापासून गेलीं सोळा वर्षें माझ्या कल्पनांची साधकबाधक चर्चा करणारा व मला यथायोग्य मार्गदर्शक ह्या दृष्टीनें कानिटकरांनीं माझ्यासाठीं जें जें केलें आहे त्याचा उपयोग संस्थेला झाला. परंतु मूलत: तो स्नेहभावाचा परिणाम आहे. सहवासानें स्नेह निर्माण होतो परंतु तो दृढ होण्यास समान उद्योग लागतो. जीवनाच्या ह्या धकाधकींत जे कांहीं थोडे दिव्य क्षण येतात त्यांतला कांहीं भाग स्नेह्यांच्या सहवासांत निर्माण होतो. Two is Company हें कानिटकरांच्या व माझ्या-बाबतींत अनुभव सिद्ध सत्य आहे. 'मनोरथ' हा माझा लघुकथा संग्रह कानिटकरांना अर्पण करतांना माझी हीच भावना मी व्यक्त केली. आयुष्यांतील अनेक निराशा आणि उत्साह भंग सहन करीत असतांना श्री. कानिटकर ह्यांनीं जी दुर्दम्य आनंदी वृत्ति धारण केली यांतच नाट्याचा परमश्रेष्ठ उत्कर्ष त्यांनीं

सावला असें मी म्हणेन. कुरूप होत जाणाऱ्या जीवनाला आनंदानें नटविणें हेंच साऱ्या नाट्याचें मर्म नव्हे कां? देशाविषयीं असीम प्रेम ही एकच प्रेरक शक्ति कानिटकरांना आजपर्यंत कार्यप्रवण करीत आली आहे.

१९ : ७ : ४५ ला मी शाळेंत एक नाट्य वर्ग घेतला. 'नाट्य–प्रसंग' म्हणजे काय ह्यासंबंधी मुलांना थोडेसें विवेचन करून सांगितलें. दोन कल्पना, दोन विचार, दोन व्यक्ति यांचा संघर्ष ही नाट्यप्रसंगाची मुख्य भूमिका आहे. टिळक पुण्यतिथि साजरी करावयाची तर टिळकांच्या जीवनांतील संघर्षस्थळें शोधा असें विद्यार्थ्यांना सांगितलें. १) न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना, २) टिळक–आगरकरवाद, ३) ताई महाराज खटला असे तीन नाट्यप्रसंग व त्यांतील संघर्ष ह्यांची आम्ही चर्चा केली. हें सर्व चालू असतांना विद्यार्थ्यांनीं दाखविलेली उत्सुकता, सहसंवेदना स्पृहणीय वाटल्या. ह्या प्रयोगाचें रूपांतर प्रत्यक्ष कृतींत झालें नाहीं.

महाराष्ट्र नाट्य मंदिरांत ऐतिहासिक नाटकांच्या प्रयोगांचें पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी अंगावर घ्यावी असा एक विचार सुचला. केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर ह्यांच्या सारख्या नटांचा रंगभूमीवरील राबता कमी व्हावा हें इष्ट नाहीं. त्यासाठीं व्यवसायी व हौशी नटांनीं मिळून ते प्रयोग करावेत म्हणजे नवीन नटांना शिक्षण मिळून परंपरा अखंड राहील असें वाटलें.

अहमदनगर येथें व्हावयाच्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून मी श्री. नानासाहेब गोखले ह्यांचें नांव सुचविलें. मराठी रंगभूमीच्या पुनर्घटनेचा मी एक आराखडा तयार केला. महाराष्ट्र, वऱ्हाड आणि मराठवाडा ह्या तीन विभागांत तीन प्रचारक नेमून पुनर्घटना करावी अशी कल्पना होती. एक नाट्यविद्यालय मुंबईस असावे. या तीन प्रचारकांचें एक मध्यवर्ती कार्यालय असावे. प्रत्येक विभागांतून दोनदोन हजार रुपये गोळा करावेत. महाराष्ट्र आणि मराठवाडा ह्या दोन विभागांत श्री. नानासाहेब गोखले व मी काम करावे. स्वतःचें जीवन समर्पित करावे ही माझी इच्छा या योजनेच्या मुळाशीं होती. परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. दि. ५ : ८ : ४५ ला श्री. कानिटकर नासिक सोडून गेले. माझ्या कल्पनांना प्रोत्साहन कोण देणार?

१९४५ च्या गणेशोत्सवांत मी एकच विषय घेऊन पांच गांवीं

व्याख्यानाचीं निमंत्रणें स्वीकारलीं. येवलें, कल्याण, औरंगाबाद, चाळीसगांव, मालेगांव त्याप्रमाणें तारखाहि ठरल्या. 'खाडीलकरांचा वीररस' हा विषय मी घेतला त्या कार्यक्रमाला निघतांना माझ्या मनावर झालेला एक मर्मावरील आघात घेऊनच मी निघालों. सिंधु ह्या नांवाची माझी मुलगी ३१ ऑगस्टला कालवश झाली. तिला शक्य तें वैद्यकीय साहाय्य देण्याचा प्रयत्न मी केला. परंतु नियतीपुढें निरुपाय झाला. एक रात्र मी तिच्या उशाशीं बसून काढली. सकाळ उजाडतांना प्रभाकर महाबळ आणि मी दोघांनीं तिचे अखेरचे संस्कार केले. तिचा तो दीर्घकालीन आजार आणि त्या तसल्या स्थितींत तिनें मजबद्दल दाखविलेली विलक्षण आत्मीयता हें मनांत सर्व ठसठसतच होतें. समाजांतल्या एका उपेक्षित विषयांतल्या कार्यकर्त्याचें हें आर्त आहे.

८ सप्टेंबरला मी येवल्यास बोलायला उभा राहिलों. श्री. आपटे गुरुजी श्री. पुराणिक असे मजवर अत्यंत लोभ करणारे श्रोते व मित्र माझ्याजवळ बसले होते. मी व्याख्यानाला प्रारंभ केला आणि काय झालें तें कळेना—माझा स्वर सद्गदित झाला आणि चक्कर येणार असें वाटू लागलें. उभे राहवेना म्हणून मी खालीं बसलों. डॉ. महाजन ह्यांनीं लगेच कांहीं उपचार केले. व्याख्यान न देतांच मी घरीं परत आलों. माझ्या मनाला तो अपघात लागला. श्री. पुराणिक ह्यांनीं मला ठेवून घेतलें. कल्याणला तार देऊन मी येऊं शकत नाहीं असें कळविलें. आणि नाशिकला परत आलों. औरंगाबाद येथें मला सोबत म्हणून प्रभाकर महाबळ माझ्याबरोबर आला.औरंगाबादला व्याख्याना-साठीं मी प्रथमच जात होतों. निजाम राज्यांत त्यावेळीं व्याख्यानासंबंधीचे नियम निराळेच होते. व्याख्यात्यावर कोणतेंहि भाषण विषयक नियंत्रण नाहीं. सारा जाच—सारीं बंधनें अध्यक्षावर आणि तो स्थानिक असला पाहिजे. असा नियम होता. निजामी राज्यांत मराठी भाषेची जी गळचेपी चालू होती ती माहिती मला हैद्राबादच्या मुक्कामांत कळलीच होती. मला दोन व्याख्यानें द्यावयाचीं होतीं. शाळांतील मराठी माध्यम हा विषय बदलून "आमच्या शाळांत काय चाललें आहे?" ह्या विषयावर मी बोललों. अध्यक्षांना माझ्या भाषणामुळें उपसर्ग होणार नाहीं ह्याची मी काळजी घेतली. भाषण श्रोत्यांना आवडलें. प्रभाकरनें चांगला अभिप्राय दिला. "खाडीलकराचा वीररस" ह्या विषयावर शिकंदर थिएटरमध्यें माझें

व्याख्यान झालें. ह्या व्याख्यानाचा एक अपेक्षित परिणाम झाला. श्री. वैष्णव वकील ह्यांच्या घरीं साहित्य व नाटच ह्या विषयांची आस्था असणाऱ्या मंडळींची बैठक झाली. मी मराठी रंगभूमीच्या पुनर्घटनेची नवी योजना सांगितली. श्रोत्यांनीं ती ऐकली. ह्यापेक्षां निराळें कांहीं झालें नाहीं. औरंगाबादच्या नभोवाणी केन्द्रावर 'मराठी रंगभूमीचा भविष्यकाळ' ह्या विषयावर मी बोललों. श्री. कांत ह्यांचा नवीन परिचय झाला. त्या विषयावर त्यांनीं एक लेखमाला लिहून पाठवण्याची मला विनंती केली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही निघणार. त्या रात्रीं प्रभाकर एकाएकीं आजारी झाला. मला सोबत आलेल्या प्रभाकराची ती अवस्था पाहून मी घाबरलों. निघण्यापूर्वीं गांवांत जाऊन श्री. गोगटे ह्यांच्याकडून कापराचा अर्क मिळविला. त्याचा उपयोग झाला व प्रभाकर नाशिकला जाण्याइतका दुरुस्त झाला.

चाळीसगांव येथें जाऊन मी व्याख्यान दिलें. श्री. जयंतराव टिळक ह्यांचें व्याख्यान होणार त्याची सारी गर्दी ,गडबड चालू होती. माझें व्याख्यान विठ्ठल मंदिरांत झालें. राजकीय प्रसिद्धि नसल्यानें माझ्या व्याख्यानाला गर्दी नव्हतीच. जे थोडे श्रोते होते ते मला ओळखणारे होते.माझे एक सहाध्यायी श्री. हसबनीस ह्यांनीं "तूं तुझा व्यासंग चालू ठेवला आहेस" ह्या शब्दांत मला धन्यवाद दिले.

चाळीसगांव येथून मी परस्पर मनमाडमार्गें मालेगांव येथें गेलों. नियोजित कार्यक्रमांतील तो शेवटचा टप्पा होता. मी तेथें पोहोंचल्यानंतर श्री. बाळासाहेब राजेबहाद्दूर यांच्याच वाड्यांत उतरलों. व्याख्यान ठरवितांना मी मोबदला घेईन अशी अट घातली होती. त्या प्रश्नावर कांहीं तात्त्विक चर्चा झाली. त्यावेळीं मी माझी विचारसरणी स्पष्ट करून सांगितली. गणेशोत्सवांत व्याख्यानाखेरीज इतर सर्वच कार्यक्रमांना पैसे दिले जातात. व्याख्यान ह्या विषयाकडे दिवस भरण्याचा कार्यक्रम म्हणूनच चालक पाहतात. सवतीच्या मुलासारखीच ह्या कार्यक्रमाची हेळसांड असते. नाहीं श्रोत्यांची उपस्थिती, नाहीं आस्था, जणू कांहीं वक्त्यावर आपण उपकार करीत आहोंत अशा थाटांत सर्व चाललेलें असतें. हे अनुभव जमा धरूनच व्याख्यानाचा मोबदला घ्यावयाचा असें धोरण स्वीकारावें लागलें. बाळासाहेबाची समजूत पटेना. माझें म्हणणें पटावें असा प्रसंग माझ्या व्याख्यानाच्या वेळींच घडला. श्री.

चिघडे हेच माझ्या व्याख्यानाला अध्यक्ष होते. कांहीं वर्षांपूर्वी मी केलेल्या 'सत्याग्रही' ह्या नाट्यदर्शनाचा उल्लेख मोठ्या गौरवानें त्यांनीं केला. उत्सवाच्या जागेंत मावणार नाहीं एवढी गर्दी जमली होती. माझ्या व्याख्यानानंतर व्हावयाच्या मोफत नाट्यप्रयोगासाठीं जागा मिळावी म्हणून ती गर्दी होती. चालकांची ती योजना 'अवघड जागीं दुखणें' अशीच होती. रात्रीं १०॥ वाजतां मी व्याख्यानाला उभा राहिलों. त्यावेळीं अंग कणकणत होतें. विरुद्ध लक्ष असलेल्या त्या गर्दीसमोर मी एक तास कसा बोललों तें माझ्या जिवाला माहीत. बाळासाहेबांनीं आपली प्रतिष्ठा पणाला लावून शांतता ठेवण्याचा प्रयत्न केला. व्याख्यान संपलें आणि मी अंथरुणावर अंग टाकलें. रात्रीं अंगांत ताप भरला .सकाळीं बाळासाहेबांनीं चांगलें अगत्य दाखविलें. विश्रांति घ्या–दोन दिवस रहा–असा आग्रह केला. परंतु शाळेसाठीं मला परत येणें भागच होतें.

● ● ●

## लेखांक

## अेक्कावन्नावा

# श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर

"**मी** जातिवंत नाटकवाला आहे. मी कीर्तनांत नाटकाबद्दल काहींहि बोललों तरी नाटक हा माझा प्राण आहे. राजकीय चळवळचांनीं लक्षांत ठेवावें कीं नाटकानें पाटी स्वच्छ न झाली तर त्यावर अक्षर काय काढणार ? नाटक ही एक काडचाची पेटी आहे. विझलेला दिवा लावण्याची ती एक सोय आहे." हे उद्गार श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार यशवंतबुवा कवीश्वर यांचे आहेत. आपला व्यवसाय कोणताहि असो आपण नाटकवाले आहोंत हें अभिमानानें सांगणारे वीर दोनच – एक नाटचाचार्य खाडीलकर आणि दुसरे कीर्तनकेसरी कवीश्वर !

१९४६ च्या जानेवारी महिन्यांत ५, ६ ,७ ह्या तारखांना त्र्यंबकेश्वर येथें मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव झाला. त्या उत्सवासाठीं मी पुष्कळच राबलों. लहान गांवें आणि त्यांचे स्वभाव ह्यांचा त्या उत्सवाच्या निमित्तानें मला परिचय झाला. गांवांत गट असतात आणि तुम्ही कांहींहि करा ते गट कधींच एकत्र येत नाहींत. हा आला तर तो नाहीं आणि तो आला तर हा नाहीं असें त्रांगडें होऊन बसतें. त्र्यंबकेश्वर ह्या क्षेत्रांत गांवकऱ्याचे पांच प्रयोग प्रतिवर्षी होतात. ब्राह्मणांच्या चार पोटशाखा आणि एक अखिल ब्राह्मणेतर असे पांच गट ह्या गांवांत आहेत. प्रत्येकाची नाटचप्रयोग करण्याची जागा ठरलेली आहे. प्रत्येकाचे पडदे वगैरे सामान वेगळें. इतर व्यवहारांत पक्के सनातनी असलेले येथले ब्राह्मण 'नाटक' म्हटलें म्हणजे

वाटेल ते करायला मागेंपुढें पहात नाहींत. आपल्या शाखेचें नाटक म्हणजे त्या शाखेच्या प्रत्येकाला स्वतःच्या घरचें एक मंगलकार्य वाटतें. नाट्य-प्रयोगाला निमंत्रण देण्यासाठीं इतर शाखीयांकडे ह्या शाखेचे शिष्ठ 'अक्षत' घेऊन जातात. निमंत्रितासाठीं प्रयोगाच्या ठिकाणीं सर्वांत चांगली जागा राखून ठेवलेली असते. अनेक वर्षांचे अलिखित शिष्टाचार बिनचूक पाळले जातात. नाट्यप्रयोगाच्या दृष्टीनें प्रत्येक शाखेच्या कांहीं परंपरा आहेत प्रयोगाचा एक विशिष्ट दर्जा ठरलेला आहे. त्या दर्जापेक्षां कमी असा प्रयोग होऊं लागला कीं समोर बसलेले सन्मान्य निमंत्रित प्रयोग करणारांच्या तीर्थरूपांचा उद्धार करून शिवीगाळ करूं लागतात. हीं भांडणें वाढतात–कांहीं वेळां विकोपास जातात. बंदोबस्तासाठीं असलेला पोलिस मध्ये पडला कीं पक्ष एक होतात आणि प्रथम त्या पोलिसाची कणीक मऊ करतात. ह्या परंपरा आहेत. नाटकासंबंधीचे हे पीळ आहेत.

सुरुवातीला दिलेले उद्‌गार अशा एका परंपरेनें पीळदार बनलेल्या–रसवत्तेनें समृद्ध असलेल्या व्युत्पन्न कीर्तनकाराचे आहेत. दोन तीन महिने मी त्या गांवीं खेपा घालून उत्सवाला चालना देण्याचा प्रयत्न केला. श्री. चिंतामणराव कोल्हटकरासारखा मोहरा ह्या उत्सवासाठीं अध्यक्ष म्हणून खर्ची घातला. माझ्यावरच्या लोभानें सगळ्या अडचणी सोसून चिंतामणराव आले. 'उग्रमंगल' हा प्रयोग तेथील शुक्ल यजुःशाखी यांनीं केला. चिंतामण-राव प्रयोग पहात होते कीं पंचवीस वर्षांपूर्वीं बलवंत नाटक मंडळी त्या नाटकाचे जे दिमाखदार प्रयोग करीत असे त्या प्रयोगाचें चिंतन करीत होते हें सांगणें कठीण आहे. नायिकेचें काम करणारा पठ्ठा १५० पौंड वजनाचा होता. पत्रे आंथरून स्टेज केलें होतें. पायांचा आवाज होऊं नये म्हणून गाद्या अंथरलेल्या त्यावर सतरंजी असा थाट! तो वजनदार गडी तसल्या स्टेजवर नाच काम करूं लागला त्याबरोबर त्या जुन्या गाद्यांतून धुळींचे लोट वर येऊं लागले व किटसनच्या प्रकाशांत ती धूळ चमकूं लागली. मास्टर दिनानाथ अस्सल ढंगानें हें नृत्य करीत असत. तें पाहून वासुदेव शास्त्री खऱ्यांसारखा रसिक नाटककार तन्मय होत असे व आईच्या मायेनें म्हणत असे, "दिनाची दृष्ट काढा हो."

अध्यक्षीय भाषण आणि नाट्यप्रयोग असा कार्यक्रम पहिल्याच दिवशीं

ठेवला. तो कार्यक्रम झाल्यानंतर चिंतामणराव निघून गेले. दुसऱ्या दिवशीं 'शारदा' नाटकाचा प्रयोग आम्ही नाशिककर करणार होतों. गंधर्व नाटक मंडळींतील भांडारकरला मी पत्रानें कळविलें होतें कीं श्रीमंताच्या कामासाठीं आपण येण्याची गरज नाहीं. त्या पत्राप्रमाणें भांडारकर आले नसते तर आमचें आणि आमच्या त्या नाटकाचें काय झालें असतें हें एक परमेश्वरच जाणे. माझ्या आयुष्यांत तो एक चमत्कार झाला. आम्ही संध्याकाळीं नाटका साठीं बाहेर पडलों आणि कांहीं अंतर गेलों नाहीं तोंच समोरून भांडारकर येतांना दिसले. हातांत एक लहानसें गाठोडें ह्याखेरीज कांहीं सामान त्यांच्या-जवळ नव्हतें. त्यांत 'श्रीमंता'चे कपडे आणि दागिने होते. आमच्या संचांत काम करणाऱ्या 'श्रीमंता'ला काय सांगावयाचें हा प्रश्नच होता. विसुभाऊ निरंतर आणि बापूसाहेब काळसेकर ह्यांचा मी सल्ला घेतला. सगळ्यांनाच कांहीं प्रेरणा झाली आणि आम्ही भांडारकरनेंच 'श्रीमंत' ही भूमिका करावी असा निर्णय घेतला.

प्रयोग सुरू होण्यापूर्वी मी प्रांजलपणानें भांडारकरांना सांगितलें कीं आमची तयारी बेताची आहे. भांडारकर नुसतेच हंसले. पडदा उघडल्यापासून भांडारकरानें जी साथ दिली ती विलक्षणच ! सूत्रधाराचा गाण्याचा आवाज कमी पडला कीं भांडारकर स्वत: गाऊन ती उणीव भरून काढीत. पहारेकरी, गाडीवाला, हीं सर्व भाषणें भांडारकर आंतूनच म्हणत असे. 'शारदा' नाटकांतील अथपासून इतिपर्यंत अक्षरन् अक्षर भांडारकरांना मुखोद्गत होतें. भांडारकर आणि मिसेस् काळसेकर–इंदिराकाकू ह्या दोघांनींच नाट-काचा सारा रंग भरला. मी भद्रेश्वराची भूमिका केली. श्रीमंत, भद्रेश्वर आणि सुवर्णशास्त्री. भांडारकर मला प्रॉम्टिंग करीत असे आणि स्वत:चें कामहि करीत असे. डोळ्यांतील त्याचा अभिनय इतक्या क्षणापर्यंत बदले कीं स्तब्ध होऊन ती दिव्य कला पहातच राही. नाटक रंगलें नाहीं तर आम्ही शेणमार करूं अशी धमकी आम्हांला देण्यांत आली होती. नाटक निर्विघ्नपणें पार पडलें. भांडारकरानें येऊन आमची अब्रू वाचविली.

७ तारखेला कवीश्वरांची भेट झाली तेव्हां ते म्हणाले, 'श्रीमंताचे काम करणारा तोच एक खरा नट ! " एक परिसंवाद ठेवला. विषय 'हौशी नटांनीं नाटकें करूंच नयेत " असा होता. डॉ. काळे ह्यांनीं पूर्वपक्ष मांडला.

मी त्यांना उत्तर दिलें. परिसंवादाचा समारोप कवीश्वरांनीं केला. सुरुवातीला दिलेले उद्गार त्यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत काढले.

नानबा गोखले आणि कवीश्वरबुवा ह्यांच्या आवाजांत विलक्षण साम्य आहे हें मला जाणवलें. कवीश्वरांची वाणी तितकीच स्पष्ट, शब्दोच्चार बाणेदार आणि आर्जवी–त्यांच्या भाषणाचा प्रभाव तात्काळ पडत असे. कवीश्वरांच्या घराण्यांत कीर्तनव्यवसाय परंपरेनें चालत आला आहे. कवीश्वरांनीं आपल्या तारुण्यांत स्त्रीभूमिकाहि केल्याचें कळलें. त्र्यंबकेश्वर हें क्षेत्र नाटय–दृष्टया फार हट्टी आहे. स्त्रीभूमिका करणाऱ्या मुलाला दोनदोन महिने तालमीच्या जागेंतच राहण्याची सक्ती केली जाई. त्याला स्त्रीचा ढंग साधलाच पाहिजे. तालमींत पहिलवान तयार करावा तशीच मेहनत ह्या भूमिका करणाऱ्या मुलावरहि घेतली जाई.

भांडारकराचें अकल्पित आगमन हा त्र्यंबकेश्वर येथें घडलेला एक साक्षात्कारच समजला पाहिजे. एका चांगल्या कार्याला परमेश्वरानें दिलेला तो हुंकार असें मी मानलें तर आजच्या काळांत तें हास्यास्पद वाटेल कदाचित्. परंतु त्यामुळें झालेला आनंद कमी होत नाहीं.

● ● ●

लेखांक
बावन्नावा

# दातारांचा नाट्यछंद !

**म**हाराष्ट्र नाटच मंदिराच्या कार्यकर्त्यांना आपापल्या उपजीविकेच्या उद्योगामागें जावें लागलें. ही घटना मुख्यत्वेंकरून त्या संस्थेच्या निष्क्रीयत्वाला आणि नंतर नामशेष होण्याला कारण झाली. श्री. कानिटकर आणि मी एकत्र बसलों कीं चर्चेंत कांहीं कल्पना निघे आणि त्या कल्पनेलाच सार्वजनिक कामाचें स्वरूप दिलें जाई. श्री. कानिटकर ह्यांनीं अठरा पुराणांचा सखोल अभ्यास केला आणि भद्रकाली मंदिरांत तीन वर्षें एकेक महिना प्रवचनें केलीं. शास्त्रीय ज्ञान आणि पुराणांकडे पहाण्याचा नवा दृष्टिकोन, ह्यामुळें तीं प्रवचनें श्रवणीय झालीं. पुण्यास गेल्यानंतर त्यानें तेथील खुन्या मुरलीधर मंदिरांत अठरा पुराणें सांगितलीं आणि स्वतःचा एक श्रोतृवर्ग निर्माण केला. निष्काम कर्मयोगाचें आदर्श जीवन असेंच मी ह्या उपक्रमाचें वर्णन करीन.

कांहींसें ध्यानींमनीं बसतां १९४६–४७ ह्या वर्षीं नाशिकरोड येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलमध्यें मुख्याध्यापक म्हणून माझी नेमणूक झाली. शैक्षणिक दृष्टचा मी केलेल्या प्रयोगांना शिक्षणतज्ज्ञांच्या दृष्टीनें महत्त्व असेल अथवा नसेल. मला मात्र त्या प्रयोगांनीं विद्यार्थी जीवन फार जवळून दाखविलें. आणि मी त्या विद्यार्थ्यांपासून खूप शिकलों.

श्री. ना. ल. वैद्य ह्या शाळेंत एक नामांकित शिक्षक होते. ते मराठी व इंग्रजी विषय घेऊन एम्. ए. चा अभ्यास करीत असतांना मराठी नाटकें,

नाट्यपरंपरा आणि मराठी रंगभूमि ह्या विषयांवर त्यांच्याशीं अनेक वेळां चर्चा होई. जें मी पाहिलें होतें आणि जें मी अनुभविलें होतें तें मी सांगत असे. श्री. वैद्य ह्यांच्यामुळेंच अमर शेख ह्यांच्याशीं माझा परिचय झाला. मनांत घर करून बसणारा एक विलक्षण आवाज मी ऐकला. शाळेच्या त्या लहानशा परिसरांत तो आवाज ज्या सहजतेनें पसरला ती एक नवलाची गोष्ट वाटते. शब्दोच्चाराबरोबर श्रोत्यांना तल्लीन करण्याचें विराट सामर्थ्य त्या आवाजांत आहे. तो आवाज ऐकत असतांना पोटांत हर्षाचे पाझर सुरू होतात आणि सुखद अवस्थेंत मनुष्य डुबत रहातो.

वर्ष सरतांना शाळेचें स्नेहसंमेलन झालें. 'विद्याहरण' आणि 'उसना नवरा' असे दोन नाट्यप्रयोग केले. 'विद्याहरण' मध्यें देवयानीची भूमिका करणारी विद्यार्थिनी शानू तेंडूलकर हिच्या डोळ्यांत मदिरेची मादकता स्पष्ट दिसे. तिला नाटकांत काम करण्याची हौस होती आणि तिनें आपली भूमिका तन्मयतेनें केली. मी स्वत: 'शुक्राचार्य' झालों. शुक्राचार्यांचीं शेवटच्या अंकांतील भाषणें म्हणतांना माझा आवाज प्रतिध्वनीरूपानें मला ऐकूं येई. त्या आवाजाचें सामर्थ्य मला प्रतीत होत असे. 'उसना नवरा' ह्या नाटकांत मी लख्या लंगोटच्या हीच भूमिका केली. त्यांतलें लख्याचें शेवटचें वाक्य "जातों, जातों. कोण ह्या महारवाड्यांत रहायला तयार आहे ?" हें एक पताकास्थानक ठरलें. वर्षअखेर माझी बदली पुन्हा नाशिकला झाली.

महाराष्ट्र नाट्य मंदिरानें १९४६ च्या मार्चमध्यें आपला वार्षिक वाढदिवस साजरा केला. "प्रो. शहाणे !" ह्या नाटकाचा प्रयोग आम्ही त्या निमित्तानें केला. श्री. काळसेकर ह्या नाट्यव्यवसायी कुटुंबानें सहकार्य दिलें. त्यामुळें स्त्री भूमिकांचा प्रश्न सुटला. श्री. प्रल्हादराव औरंगाबादकर ह्यांच्या चौकांत आम्ही तो प्रयोग केला. प्रयोग चांगला झाला. श्री. बाळासाहेब दातार ह्यांनीं त्या प्रयोगांत केलेली भूमिका यशस्वी झाली. दातार आणि मी रुंग्टा हायस्कूलमध्यें सहकारी शिक्षक होतों. आम्ही दोघे आजी व सदस्य असलों तरी आमचा दृष्टिकोन वेगळा होता. श्री दातार ह्यांच्याशीं मधल्या सुटींत अथवा रिकाम्या वेळांत जीं संभाषणें झालीं त्यावरून त्यांच्यांत विनोद-बुद्धीचा समृद्ध झरा असल्याचें आढळून आलें. त्यावरून केव्हांतरी मी त्यांना 'मराठी रंगभूमीवरील विनोद' असा विषय प्रबंधासाठीं सुचविला. पूर्व-

तयारी म्हणून आम्ही मुंबईला जाऊन प्रा. श्री. कृ. पां. कुलकर्णी ह्यांची मुलाखत घेतली. श्री. अमोणकर ह्यांनीं प्रा. कुलकर्णी ह्यांची संमति मिळ-विण्यासाठीं आम्ही काय करावें ह्याबद्दल मार्गदर्शन केलें. प्रत्यक्ष मुलाखतींत तें मार्गदर्शन अतिशय उपयोगी पडलें. विषय मान्य झाला ह्यांतच पीएच्. डी. चें अर्धें यश आलें. कारण विषय स्वीकारल्यानंतर तयारी करून घेण्याची जबाबदारी मार्गदर्शकावर असते.

श्री. दातार ह्यांनीं पीएच्. डी. साठीं नांव नोंदविलें. आम्ही जो आराखडा तयार केला त्यांत विनोदी नटांच्या मुलाखती हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. मराठीं नाटकें हुबळीपासून नागपूरपर्यंत प्रयोगरूपानें झालीं. मुंबईचे प्रेक्षक ज्या विनोदाला प्रतिसाद देतील त्याच विनोदाला नागपूरचे प्रेक्षक प्रतिसाद देतीलच असें नाहीं. शब्दांकित विनोद जेव्हां मुद्राभिनय, स्वरांचे आरोह–अवरोह, आंगिक अभिनय ह्यांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न नट करतो तेव्हां त्याला येणारे अनुभव हा ह्या प्रबंधांतील एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे असें मी समजत असे. नटांप्रमाणेंच विनोदी नाटककारांच्या मुलाखती हाहि महत्त्वाचा भाग आहे म्हणून माधवराव जोशी, आचार्य अत्रे ह्या नाटककारांच्या मुलाखती घेतल्या. 'म्युनिसिपालिटी' ह्या अतिशय गाज-लेल्या नाटकाची कुळकथा स्वतः माधवरावांच्या तोंडून ऐकायला मिळाली ती इतरत्र उपलब्ध नसल्यानें येथें नमूद करतों.

स्थानिक स्वराज्यांच्या कारभारांतील बेशिस्तपणाची चीड हें त्या नाटकाच्या जन्माचें प्रमुख कारण आहे. तशा प्रकारचें नाटक लिहायला परकीय भाषांतील विनोदी नाटकांचे नमुने समोर होते. M. P.; A Shopkeeper Turned a gentleman इत्यादि चांगल्या नाटकांचा अभ्यास केल्यानेंच नाट्यनिर्मितीला प्रोत्साहन मिळालें. ह्या मुलाखतींत माधवराव खूप मोकळेपणानें बोलले. प्रथम आपण गंभीर स्वरूपाचेंच नाटक लिहिलें परंतु तें सपशेल पडलें. त्या घटनेचा विचार करूनच विनोदी नाटकें लिहावयाचीं असें ठरवून 'विनोद', 'म्युनिसिपालिटी', 'प्रो. शहाणे' इत्यादि नाटकें लिहिलीं.

माधवराव जोशी ह्यांच्या भाषेचें एक वैशिष्ट्य आहे. ती भाषा प्रासा-दिक आहे. कल्पनांचा जल्लोष उडवितांना माधवरावांनीं प्रतिभेला जणूं

मोहोर येतो. माधवरावांना आपल्या मुलाखतींत एका इंग्रजी पुस्तकाची माहिती दिली. " Who's who in the Theatre " ह्या पुस्तकांत इंग्रज नटनटींच्या कुळकथा दिलेल्या आहेत. त्यांत असा सिद्धांत मांडला आहे कीं अनुवंशिकता हा कलासाधनेंतील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सातसात पिढ्या नाट्यकलेची उपासना करणाऱ्या घराण्यांची माहिती त्या त्या घराण्याचे वंशवृक्ष देऊन तो सिद्धांत सिद्ध केला आहे. मी त्या पुस्तक-प्रकाशकाचा पत्ता लिहून घेतला. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयांत त्या पुस्तकाची प्रत विकत घेण्याची व्यवस्था केली आहे. ह्या दृष्टिकोनांतून मराठी नटांचा अभ्यास झालेला नाहीं. अभ्यास करण्यासारखी वस्तुस्थिति नाहीं. चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, रघुवीर सावकार, रघुनाथराव गोखले, बापूराव पेंढारकर, कोल्हापुरे, मास्टर दिनानाथ अशी हाताच्या बोटांवर मोजण्यासारखीं नांवें आहेत कीं ज्यांच्या दुसऱ्या पिढींत नाट्यव्यवसाय चालू आहे.

आचार्य अत्रे ह्यांची मुलाखत नाशिकला घेतली. श्री. दातार आचार्य-कन्येला-नानीला संस्कृत शिकवीत असत. मुलाखत फारच दिलखुलास झाली. प्रथम त्यांनीं दातारांच्या विषयाचें 'विराट स्वरूप' आमच्यापुढें रेखाटलें. आम्ही घाबरून म्हणालों, " शिष्यस्तेऽहं शाधिमाम् त्वाम् प्रपन्नम्. " आमची ती करुणस्थिति पाहून त्यांना आमच्याबद्दल कळवळा उत्पन्न झाला. त्यांनीं वाचनीय इंग्रजी पुस्तकांची एक यादी आम्हांला दिली. व्यासंगी अत्रे आणि विनोदी अत्रे ह्या माझ्या दृष्टीनें भिन्न व्यक्ति आहेत. आचार्य अत्रे ह्यांचा ग्रंथसंग्रह हें एक गुपीत आहे. एखाद्या पतिव्रतेच्या निष्ठेनें आचार्य आपल्या ग्रंथसंग्रहाला जपतात. श्री. दातार ह्यांना ती मुलाखत फार उपयुक्त वाटली. आचार्य अत्रे आणि प्रा. श्री. कृ. पां. कुलकर्णी स्नेही आहेत हें त्या उपयुक्ततेचें महत्त्वाचें कारण आहे.

श्री. वा. रा. ढवळे, श्री. क्षीरसागर, श्री. वा. ल. कुलकर्णी इत्यादि टीकाकारांच्या मुलाखती आम्ही घेतल्या. विषय सर्वांनाच पसंत होई. तपशीलाच्या सूचना प्रत्येकजण भिन्नभिन्न प्रकारें करी. स्वतः मार्गदर्शक प्रा. श्री. कृ. पां. कुलकर्णी ह्यांचा प्रारंभापासून अखेरपर्यंत एकच यक्ष-प्रश्न होता. त्याचें उत्तर अखेरपर्यंत सांपडलें नाहीं. तो प्रश्न असा, " तुमचा Thesis

(सिद्धान्त) काय ? कोणता मूलभूत सिद्धान्त तुम्ही शोधून काढणार आहांत ? " प्रबंधाची जुळवाजुळव करतांना तो सिद्धान्त सांपडेल अशा अपेक्षा–तसा तो सांपडला नाहीं हा त्याचा शेवट !

'गडकऱ्यांचा विनोद' ह्या टीकाग्रंथाचे लेखक माझे स्नेही श्री. शिवराम गोविंद भावे ह्यांच्या घरीं सातारला आम्ही चार दिवस त्या प्रबंधाच्या चर्चेसाठीं जाऊन राहिलों. भाव्यांचा व्यासंग मला सुपरिचित आहे. त्यांचें मार्गदर्शन उपकारक ठरलें. त्या मुक्कामांत सज्जनगडावर जाऊन समर्थांच्या समाधीचें दर्शन आम्ही घेतलें. दिवसा दिसणारें त्या डोंगराचें रुद्र स्वरूप पहातांना छातींत धडकीच भरते.

नाशिकचे डॉ. देवस्थळी ह्यांच्याशीं झालेल्या चर्चेंत प्रबंधाची रूपरेषा अधिक व्यवस्थित झाली. प्रा.श्री. आंबेकर ह्यांनीं ह्या प्रबंधाच्या सर्व अवस्थांत जी सोबत केली तिला मोल नाहीं. प्रत्येक प्रकरण तपासून त्यांत शोध–बोध घालण्याचें काम केलें तें मुख्यत: प्रा. आंबेकरानीं. प्रा. कृ. पां. कुलकर्णी ह्यांनींहि प्रा. आंबेकरांना अप्रत्यक्ष मान्यता दिल्यामुळें प्रबंधलेखन सुकर झालें.

दातार पीएच्. डी. झाले. त्यांचा तो चारपांच वर्षांचा काळ कौटुं-बिक अडचणींमुळें अतिशय अवघड गेला. तरीहि धीर न सोडतां हातीं घेतलेला उद्योग त्यांनीं शेवटास नेला–यशस्वी केला. मधून मधून संत्रस्त होऊन ते मला शिव्या देत. मी त्या शिव्या आनंदानें स्वीकारल्या. मराठी नाटकांचा अभ्यास झाला, एक विद्वन्मान्य प्रबंध सिद्ध झाला. तें सर्व ब्रह्मार्पण असो !

● ● ●

‘मी प्रथम नाटकवाला आहे’ असा मराठी नाटकांचा कैवार घेणारे नाट्याचार्य श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, साक्षात्कारी नाटककार आणि मराठी रंगभूमीचे महान् शिल्पकार.



*

K-P-Khadilkar

नाट्याचार्य श्री० कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांची स्वाक्षरी

मु० पुणें - भिकारदास मारुति शेजारी खाडीलकरांच्या रहात्या घरांत ही स्वाक्षरी मिळाली पक्षाघातानें शरीर विकल झालें आहे - जगासंबंधी संपूर्ण विरक्ति - ईश्वरावर दृढतम श्रद्धा - स्वातंत्र्याचा महामंत्र देणारा माझा आवडता नाटककार - माझ्या संग्रहांत या स्वाक्षरीचें मोल मोठें आहे ! हा माझा आशीर्वाद आहे

२२-५-४८
शनिवार
सकाळीं ८
स्वाक्षरी समय

पा. श्री. पुरोहित



↑

मी, बालगंधर्व आणि प्रल्हाद :
१९३० मधलें हें छायाचित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ...............

● मराठी नाटकें माझा छंद ....

लेखांक
त्रेपन्नावा

# त्रिकेंद्र योजना नी माझी एम. ए. साधना

**डॉ.** भालेराव ह्यांनीं मला प्रश्न केला. "तूं रंगभूमीवरून retire झालास का ?" मी त्या प्रश्नाचें उत्तर देऊं शकलों नाहीं. देण्यासारखें उत्तर माझ्या जवळ नव्हतेंच. १९४४ पासून प्रतिवर्षी मुंबई-मराठी साहित्य संघ एक दणकेबाज नाट्य महोत्सव करूं लागला. ह्या महोत्सवाची योजना-अंमल बजावणी ह्यांतला फार मोठा हिस्सा डॉक्टरांचा होता. डॉक्टर आणि मी सांगलीच्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवांतले सहकारी. ह्या सहकार्यामुळें डॉक्टरांच्या मनांत मूळचा असलेला मजबद्दलचा लोभ अधिक वाढला. डॉक्टरांच्या घरीं एका रात्रीं १० ते सकाळीं ६ पर्यंत एक अखंड बैठक झाली. गोविंदराव टेंबे, केशवराव दाते, अनंत काणेकर, के. नारायण काळे अशी फार मातबर माणसें त्या बैठकींत होतीं. मी एक श्रोता म्हणून त्या बैठकीला हजर होतों. मुंबई, पुणें, नासिक अशी एक त्रिकेंद्र योजना त्या बैठकींत आंखली जात होती, चर्चिली जात होती. ह्या तीन केंद्रांतून नाट्य-प्रयोग सतत होत राहणें हा त्या योजनेचा उद्देश होता. मुंबईस डॉ. भालेराव, पुण्यास भगवान पंडित आणि नाशिकला मी अशीं तीन माणसें आणि तीन संस्था म्हणजे मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्रीय कलोपासक आणि महाराष्ट्र नाट्य मंदिर ह्यांनीं ही योजना यशस्वी करावी. प्रत्यक्ष घडलें तें असें !

डॉ. भालेराव अति परिश्रम करून प्रतिवर्षी मुंबईचा नाट्योत्सव सह-

कुटुंब, सहपरिवार करीत राहिले. डॉक्टरांच्या ह्या कुटुंबांत बेबी, बाळ, कुंदा आणि वहिनी एवढीच माणसें नसून बाळासाहेब काळे, अंध्रुटकर ,प्रल्हादराव औरंगाबादकर, बापू नाईक, अमोणकर, अनंत वर्तक, दाजी भाटवडेकर, पांगे, शिवा अशा आणखी कितीतरी जणांचा समावेश झाला होता. मी जन्मसिद्ध हक्कानें त्यांचा कुटुंबीय होतोंच. माझी ती प्रेमळ मावशी आणि डॉक्टर भालेराव ह्यांनीं माझ्या नाट्य-गुणाला प्रोत्साहन दिलें आणि नाट्य क्षेत्रांतला एक कार्यकर्ता म्हणून उभा राहण्यास मला धीर दिला. हें त्यांचें ऋण मला यथातथ्य फेडतां येत नव्हतें हें उघड होतें. नाशिकला नाट्यविषयक चळवळीचा व्हावा तसा उठाव होत नाहीं. ह्या निष्क्रीयतेला उद्देशून भालेरावांचा तो प्रश्न असावा असें मी समजतों. आजहि त्या प्रश्नाचें उत्तर मला देता येत नाहीं.

प्रत्यक्ष घडत होतें तें कांहीं निराळेंच. बाळासाहेब दातार ह्यांच्या नाट्यविषयक प्रबंधानें माझ्या मनांत आपणहि विद्वान् व्हावें अशी प्रेरणा निर्माण झाली. १९४७–४८ ह्या कालांत माझे परमप्रिय पांच आप्त कालवश झाले. आई, माझी बहीण चंद्राबाई, भाऊ, यमूताई आणि शेवटचा आघात म्हणजे नारायणराव कुलकर्णी. ह्या आप्तांच्या निधनानें माझ्या आयुष्यांत केवढी पोकळी निर्माण झाली ह्या कल्पनेतेंहि आज काळजाचे तुकडे पडूं लागतात.

प्रा. श्री. आंबेकर ह्यांच्या एम्. ए. च्या वर्गांनीं मला नवा उत्साह दिला. ७–८ विद्यार्थी घेऊन सतत तीन महिने प्रा. आंबेकर रोज कमीत कमी दोन तास व्याख्यानें देऊन आमची एम्. ए. ची तयारी करून घेत होते. श्रोते आणि वक्ता ह्यांचा इतका दीर्घकालाचा सुसंवाद क्वचित्च घडत असेल. प्रा. आंबेकर ह्यांच्याशीं एक पवित्र करार करूनच मी एम्. ए. परीक्षेचा फॉर्म भरला. फीची पावती त्यांना दाखविली तेव्हां ते म्हणाले, "आतां तुम्हांला या परीक्षेंत यश मिळवून देण्याची जबाबदारी माझी आहे. "

त्या व्याख्यानांनीं केवळ प्रा. आंबेकरांच्या व्यासंगाचा परिचय झाला असें नव्हे तर एक अष्टपैलू व्यक्तिमत्व जवळून पहायला मिळालें. नाटक हाच त्या वर्षीं आम्हांला एम्. ए. साठीं फॉर्म–साहित्य प्रकार होता. मला मराठी नाटकांचा इतिहास एका नवीन दृष्टिकोनांतून ऐकायला मिळाला.

अभ्यासक अनेक असतात पण आपल्या व्यासंगाला कलात्मक डूब देण्याची शक्ति फार थोड्यांत असते. प्रा. आंबेकरांचें मराठी नाटकांतील पदांचें विलक्षण पाठांतर आहे. गायन शास्त्रांतले पक्के जाणकार, स्वतःच्या वडिलांच्या गळ्यांतून भाऊराव कोल्हटकरांची गायकी ऐकलेली, हरी नारायण आपटे ह्यांचा सहवास घडलेला, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या रसाळ गोष्टी मनांत सांठविलेल्या, स्वतः मराठी, संस्कृत, इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र ह्यांचा सखोल अभ्यास असलेले, अत्यंत बुद्धिमान आणि प्रत्युत्पन्नमति असलेले आंबेकर ह्यांनीं माझ्या जीवनांत एक मनोज्ञ रंग भरला.

'शारदा' नाटकांतील चैत्रागौरीचा प्रवेश आणि नाटककारानें साधलेले दुहेरी परिणाम ह्यांची साधार चर्चा ज्या दिवशीं आंबेकरांनीं केली त्या दिवशीं मला नाटकांतलें कांहीं कळतें हा माझा अभिमान संपूर्णपणें गळून पडला. विनोद हें ह्या प्रवेशाचें बाह्य स्वरूप आहे. परंतु ह्या प्रवेशांत शारदेच्या व प्रेक्षकांच्या मनाची तयारी नंतर येणाऱ्या आपत्तीसाठीं करणें हें त्याचें अंतःस्वरूप अत्यंत कलापूर्ण आहे. "श्रीमंत पतीची ही राणी । मग थाट काय तो पुसतां ।।" किंवा "म्हातारा इतुका न । अवघे पाऊणशें वयमान" ह्या पदांतून चौदा वर्षांच्या शारदेला एका जराग्रस्त थेरड्याशीं विवाह करावयाचा आहे ह्याची स्पष्ट जाणीव दिली आहे. ती जाणीव झालेल्या शारदेचें पद "मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली । वाटते दुजा सुदाम मज दिसेल त्या स्थळीं ।।" करुणरसाचा उत्कट आविष्कार करणारें मराठी नाटकांतील एक असामान्य पद आहे.

केशवराव भोसले आणि बालगंधर्व ह्या दोन्ही नटांनीं आपल्या कोंवळ्या वयांत ज्या अविस्मरणीय भूमिका करून नांव मिळविलें व त्यांत त्यांचीं जीं पदें अत्यंत लोकप्रिय झालीं त्यांत 'शारदा' नाटकांतील शारदेची भूमिका आणि "मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली ।" हें पद हीं होत. 'संन्याशाचा संसार' ह्या नाटकांतली डेव्हिडची भूमिका करतांना केशवराव भोसले "बा रे पांडुरंगा केव्हां भेट देसी" ह्या अभंगाची करुणरसांत जी आळवणी करीत त्या सुरांनीं अंतःकरणाचे लचके तुटत असत ! केशवराव भोसले नट नाहींत असा आक्षेप घेणारांना त्यांची डेव्हिडची भूमिका हें चपखल उत्तर आहे.

एम्. ए. परीक्षेचा अभ्यास मला अनेक दृष्टींनीं उपकारक झाला. साहित्याकडे पहाण्याची विशेष दृष्टि मिळाली. परंतु १९४७–४८ मध्यें पांच आप्तांच्या निधनानें जें मानसिक औदासिन्य आलें होतें तें हळुहळू वितळूं लागलें व मन नवा हुरूप धरूं लागलें. विद्येंत संजीवनीचें सामर्थ्य आहे ह्याचा अल्पसा अनुभव मला स्वतःला आला.

"पन्नाशीची झुळूक लागतां बाईल दुसरी करूं नको" हा शारदें तल्या भुजंगनाथाला कोंदडानें केलेला उपदेश, "परीक्षा आतां देऊं नको" असा माझ्या बाबतींत बदल करून सत्य असल्याचा प्रत्यय मला आला. मराठीच्या सहा प्रश्न पत्रिका लिहितांना पाठीचा कणा मोडला आणि हाताचीं लिहिणारीं बोटें अक्षरशः ठणकूं लागलीं. व्युत्पत्ति विषयाची शंभर मार्कांची प्रश्नपत्रिका हा माझा अपघात होता. मिस्. जेरुशा रुबेन ह्या विद्यार्थिनीनें मधल्या चहाच्या वेळेंत प्रा. माटे ह्यांच्या त्या विषयावरील टिपणांची उजळणी केली आणि तेंच माझें भांडवल ठरलें. त्या अगदीं ताज्या तयारीवर मी प्रश्न तर लिहिले. वुइल्सन कॉलेजच्या तिसऱ्या मजल्यावर आमचें परीक्षा स्थळ होतें. शेवटचा पेपर संपला आणि मी बाहेरच्या व्हरांड्यांत उभा राहून समोर दिसणाऱ्या समुद्राकडे पाहूं लागलों. समुद्राला ओहोटी होती आणि बराचसा गाळानें भरलेला तळ उघड्यावाघड्या स्थितींत दिसत होता. एम. ए. च्या परीक्षेला बसून मला कोणता उज्ज्वल भविष्यकाल लाभणार होता ? माझें जीवन त्या ओहोटी लागलेल्या समुद्रासारखें झालें होतें.

आचार्य जावडेकर ह्यांचें 'आधुनिक भारत' हें पुस्तक आम्हांला परीक्षेसाठीं होतें. परीक्षा सलग नव्हती. मध्यंतरी ५–६ दिवसांचा खंड होता. त्या काळांत एके दिवशीं मी त्या कठीण ग्रंथाचीं टिपणें लिहिलीं तीं १२ तास लिहीत होतों. श्रम झाले पण विषय कळला ह्याचें फार मोठें समाधान वाटलें. इंग्रजीच्या दोन प्रश्नपत्रिकांचें मार्गदर्शन प्रा. देशपांडे ह्यांनीं केलें. मॉमचें एक खंडकाव्य नेमलेलें होतें. इंग्रजी वाङ्मयांत कांहीं नवीन पद्धती रुळत होत्या त्याची त्या काव्यामुळें जाणीव झाली.

परीक्षेच्या निकालाच्या वेळीं मी मुंबईंत होतों. भालेरावांच्या घरांत बाळ, बेबी आणि विमल ह्यांच्या परीक्षांचे आनंददायक निकाल कळले. आतां माझा निकाल काय लागणार ह्याचा मला अंदाज नव्हता. मी स्वतः

जाऊन परीक्षेचा निकाल पाहिला तो ह्याच एका परीक्षेचा. आश्चर्याची गोष्ट अशी कीं मी एम्. ए. तर झालोंच पण दुसऱ्या श्रेणींत उत्तीर्ण झालों. निबंधाच्या उत्तरपत्रिकेंत मला शेंकडा ७५ पेक्षां अधिक गुण मिळाले.

नाशिकला माझ्या परीक्षेच्या निकालासाठीं माझ्या हितचिंतकांनीं दुहेरी तयारी केली. कारण त्यांच्या दृष्टीनें निकालाचे पर्याय दोनच होते. मी नापास झालों असतों तर त्यांना मनांत सुखच वाटलें असतें. मी इतक्या वयांत परीक्षेला बसलों ह्या धारिष्टाबद्दल माझें यथेच्छ कौतुक करावयाचें. बरें उत्तीर्ण झालों तर मला समजेल अशा रीतीनें आपसांत बोलायचे कीं वशिले आहेत म्हणून पास झाले. परंतु प्रत्यक्ष झालें तें आणखी वेगळेंच. मी उत्तीर्ण तर झालोंच पण एम्. ए. सेकंडक्लास झालों. त्यामुळें टीकेची नांगीच मोडली गेली.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.



अनुक्रम.......................... दिः ....................

लेखांक

चोपन्नावा

# नाटकावर प्रवचनें !

१९२३ ते १९४८ या उण्यांपुऱ्या पंचवीस वर्षांत मी जीं स्वत:बद्दलचीं टिपणें लिहिलीं त्या पद्धतीनें लिहिलेलें अखेरचें टिपण ३१ : १ : १९४८ चें आहे. त्या पंचवीस वर्षांत मी जें पाहिलें, अनुभवलें आणि कांहीं थोडें केलें त्याची माहिती देतांना तें माझें लेखन मला मार्गदर्शक होतें. हा एक चमत्कारिक योगायोग आहे कीं ह्या लेखनाचे आदि आणि अंत दोन मृत्यु आहेत. माझ्या मावशीच्या मृत्यूनें प्रारंभ आणि महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर शेवट असें घडलें आहे. त्या नंतरच्या बारा वर्षांत मराठी नाटकांचा माझा छंद कोणत्या स्वरूपांत व्यक्त झाला त्याच्या आठवणीच आतां नमूद करावयाच्या आहेत.

एम्. ए. च्या परीक्षेनंतर मी माझ्या नाटकाच्या छंदाकरतां एक अगदीं वेगळा मार्ग स्वीकारला. २५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर १९४९ ह्या सात दिवसांत मी पार्ले येथें समर्थ मंदिरांत नाट्याचार्य खाडीलकरांच्या दोन नाटकांवर प्रवचनें दिलीं. मुंबईचें हें उपनगर मी निवडलें ह्याचें कारण तेथें माझे कांहीं आप्त आहेत आणि जागा मिळणें शक्य झालें. ही केवळ निष्काम सेवा नव्हती. कांहीं आर्थिक प्राप्ति व्हावी हा मनांतला हेतु होताच ! त्या दृष्टीनें मी श्री. विष्णुपंत घोटीकर ह्यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. आर्थिक प्राप्तीची हमी घेणार नाहीं—जागा मिळेल असें उत्तर आलें. मी जें उत्तर लिहिलें तें थोडेसें चिडूनच. जागेचें भाडें, दिवाबत्तीचा खर्च, माळ बुक्का

ह्यासाठीं लागणारा खर्च व नासिक ते मुंबई जाण्यायेण्याचा खर्च इतकी तयारी करून मी येतों–कुणाला तोशीस लागूं देणार नाहीं.

२५ ऑक्टोबरला अंधार पडल्यानंतर मी पार्ले स्टेशनवर उतरलों. रस्ता सांपडेना तेव्हां एका जाणाराला विचारलें. तो गुजराती–मी मराठी. भाषा कळेना. श्री. घोटीकर माझी वाट पाहून थकले होते. मी उशीरां पोहोचलों. बैठक घालून ठेवली आहे. सुरुवात करावयाची कां ? असा त्यांनीं प्रश्न केला. मी हो म्हणालों. तीनशें माणसें बसतील अशा त्या सभागृहांत ५–२५ लोक होते. देवाचें नांव घेऊन मी सुरुवात केली. नंतरचे सहा दिवस माझा कार्यक्रम असा असे. प्रवचन रात्रीं ९ ते १० होई. प्रवचनानंतर श्री. कोरैकाका–भालेरावांचे चुलते कोरान्ने–ह्यांच्याकडे मी झोपत असे. झोपण्यापूर्वीं रात्रीं तास दोन तास गप्पा होत. सकाळीं उठून चहा घेऊन मी मुंबईला भालेरावांच्या घरीं जात असे. दिवसभर मी तेथें राहून त्या दिवशींच्या बोलण्याचीं टिपणें करीत असे. दुपारीं ४–२० च्या लोकलनें मी पार्ल्यास जात असे.

ह्या प्रवचन–मालेचा मला व्यक्तिशः फार मोठा फायदा झाला. प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांच्या तोंडून खाडीलकरांच्या नाटयलेखनासंबंधीं जी चर्चा मला ऐकावयास मिळाली तशी इतरत्र मी कोठेंहि ऐकली नाहीं. स्वतः खाडीलकर प्रा. फाटक ह्यांना मानीत असत आणि त्यांच्याशीं नाटयविषयाची म्हणजे निवडलेल्या कथानकाच्या तात्विक भूमिकेची चर्चा करीत असत. खाडीलकर त्या विषयावरील उपलब्ध पुस्तकें वाचीत असत. 'सवतीमत्सर' हें नाटक लिहितांना भांडवलशाही हा प्रश्न खाडीलकरांच्या मनांत घोळत होता. स्वतःच्या गरजेपेक्षां अधिकाचा सांठा करण्याच्या प्रवृत्तींतून 'भांडवलशाही'चा उगम झाला. भावी काळांत जन्माला येणाऱ्या मुलासाठीं दुपटयाचीं फडकीं संग्रहित करणारी माता ही जगांतील पहिली भांडवलदार. कैकेयी ही त्या परंपरेंतील भांडवलदार आहे. अशी कांहीं चर्चा ऐकल्यानंतर खाडीलकरांच्या नाटकाकडे पाहण्याची नवीन दृष्टि निर्माण झाली.

दुसऱ्या दिवसापासून प्रवचनाला गर्दी होऊं लागली. त्या गर्दींत स्त्रियांचा भरणा अधिक असे. खाडीलकरांचीं नाटकें पौराणिक –त्यांतील व्यक्ति

परिचित—त्यामुळें ऐकायला अवघड कांहीं नसे. नाटयरचना आणि खाडील-कराची सामाजिक भूमिका ह्यांचीच चर्चा त्या त्या नाटकाच्या आधारें मी करीत असे. लोकमान्य टिळकांच्या उज्ज्वल जीवनाचा ठसा खाडीलकरांच्या मनावर कसा खोल उमटला होता आणि खाडीलकर विद्वत्तेकडे कोणत्या दृष्टिकोनांतून पाहतात हें सांगतांना त्यांच्याच नाटकांतील उतारे मी आधारादाखल वाचून दाखवीत असे. हें सर्व जुळवितांना मला एम्. ए. चा अभ्यास करतांना जी दृष्टि मिळाली होती तिचा फार उपयोग झाला. ह्या थोर लेखकांनीं आपला प्रत्येक शब्द लिहितांना किती परिश्रम घेतले आहेत. समाजाबद्दलचा त्यांचा केवढा कळवळा आहे हें सांगतांना मन भरून येई. माझ्या प्रवचनांना जाण्याची उत्कंठा श्रोत्यांत कशी आहे ह्याचे पडसाद शेजारच्या बंगल्यांत ८।। पासून जी गडबड सुरू होई त्यावरून माझ्या कानीं येत. माझा आवाज, भाषणपद्धति ह्या सर्वांची प्रेरणा होती माझ्या नाटकाच्या छंदांत !

एक दिवस एक नाटक मंडळींत असलेले गृहस्थ प्रवचनाला आले. प्रवचन ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला. आमच्या उपनगरांत येऊन बोला असें त्यांनीं निमंत्रण दिलें.

प्रवचनांचा समारोप उठावदार व्हावा म्हणून मी एक योजना आंखली. हा एक नवा प्रयोग आहे—अनेकांना त्याची माहिती व्हावी म्हणून कांहीं प्रतिष्ठितांना निमंत्रणें दिलीं. प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांना अध्यक्ष होण्याची विनंती केली. नटवर्य श्री. केशवराव दाते, प्रा. वि. ह. कुलकर्णी, प्रा. आर्. आर्. देशपांडे, डॉ. भालेराव, बावडेकर इत्यादींना आग्रहपूर्वक निमंत्रण दिलें. प्रसाद म्हणून श्रोत्यांना देण्याकरतां खाडीलकरांचें छायाचित्र ‘नवा-काळ’मधून छापवून घेतलें. भालेराव आदि खास पाहुण्यांसाठीं दूध कोल्ड्रिंकची व्यवस्था करविली.

‘सवतीमत्सर’ ह्या नाटकांतील शेवटचा उदात्त भाग मला त्या दिवशीं सांगावयाचा होता. माझ्या श्रोत्यांत आज कांहीं निमंत्रित आणि विद्वान् श्रोते उपस्थित होते. कैकेयी आणि दशरथ ह्यांच्या प्रेमाची मीमांसा करतांना मी सांगितलें कीं दशरथाला कैकेयी हा केवळ शारीरिक आकर्षणाचा विषय नव्हता तर तिचें सारथ्य कर्मांतील कौशल्य हें समान गुण म्हणून

फार मोठें आकर्षण वाटत होतें  हा मुद्दा अगदीं नवीन होता आणि त्याबद्दल भालेरावांनीं मला शाबासकी दिली. भालेरावांकडून अभिनंदन केलें जाणें ही स्वस्त गोष्ट नव्हे. त्यांच्या चिकित्सक बुद्धीची मला चांगली जाणीव होती. माझे गुरु केशवराव दाते ह्यांनीं प्रवचनकाराच्या गादीचा मान म्हणून रुपये पांच दक्षिणा दिली आणि माझ्या त्या अभिनव उपक्रमाबद्दल मला धन्यवाद दिले. त्यांच्यां त्या आशीर्वादानें मला आनंद झाला. प्रा. वि. ह. कुलकर्णी ह्यांनीं सांगितलें कीं हीं प्रवचनें कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं ऐकलीं पाहिजेत. माझ्या कथन पद्धतीचेंहि वैशिष्टय त्यांनीं सांगितलें. प्रा. आर. आर. देशपाडे ह्यांचें भाषण झालें. प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांनीं एक नवीन मुद्दा सांगितला.

नाटयाचार्य खाडीलकर लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्य ह्या ग्रंथाबद्दल नेहमीं म्हणत कीं कोणी कीर्तनकार, प्रवचनकार ह्या ग्रंथाचा उपयोग करीत नाहीं. त्यामुळें तो ग्रंथ निर्जीव होतो. प्रा. फाटकांनीं मला धन्यवाद दिले तें यासाठीं कीं खाडीलकरांच्या नाटकावर प्रवचनें करून मी त्या नाटकांना सदेह केलें. कोणत्याहि ग्रंथकाराच्या ग्रंथाकडे पाहण्याची ही एक सामाजिक दृष्टि आहे. एवढीं मोठालीं माणसें–त्यांत केशवराव दाते ह्यांच्यासारखा श्रेष्ठ नट ज्या प्रवचनकारासाठीं येतात-गौरवपर बोलतात त्या प्रवचनकाराचीं प्रवचनें आपण ऐकलीं ही चूक नव्हे असें माझ्या श्रोत्यांना वाटूं लागलें.

पार्ले येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाला भालेरावांनीं देणगी म्हणून दिलेल्या जागेंत मी सात दिवस बोललों. भालेरावांनीं माझी पाठ थोपटली. केशवराव दाते आले आणि त्यांनीं आशीर्वाद दिला. प्रा. श्री. न. र. फाटक, प्रा. श्री. वि. ह. कुलकर्णी, प्रा. श्री. आर. आर. देशपांडे ह्या सर्वांनीं मला केवढें प्रोत्साहन दिलें. माझ्या अस्थिर मनाला किती स्थिर केलें ह्या सुखद भावनेंत मी त्या रात्रीं मोठ्या समाधानानें झोंपलों. कोरेकाकांना फार आनंद वाटला. ' वामन 'चें मनसोक्त कौतुक त्यांनीं केलें. दुसऱ्या दिवशीं श्री. रत्न-पारखी ह्यांच्याकडे मी जाऊन आलों. नाशिक हायस्कूलमध्यें माझ्याबरोबर शिकणारे एक विद्यार्थी त्यावेळचे त्यांचे क्रिकेटचें अवसान पार नाहींसें झालें होतें.

१९५० च्या फेब्रुवारींत मी चाळीसगांव येथें 'विद्याहरण' आणि 'सवती मत्सर' ह्याच दोन नाटकांवर तेथील नारायण बंकट वाचनालयांत प्रवचनें दिलीं. चाळीसगांव माझी मातृभूमि–त्यापूर्वी तीनचार वेळां मी व्याख्यानें दिलेलीं असल्यामुळें मी गांवकऱ्यांना परिचित होतों. विषय तयार असला तरी प्रत्येक वाचनानें नवा नवा अर्थ लक्षांत येतो हा अनुभव आला. श्रोते भरपूर असत. प्रभाकर जहागीरदार, मोरू अण्णा देशपांडे डॉ. जहागीरदार घोंडोपंत देशपांडे, हे माझे आप्त तसेच श्री. काळकर, श्री. घाटे, इत्यादि हितचिंतक होते. समारोपाच्या दिवशीं श्री. जोगळेकर वकील बोलले. शेक्सपीअर ह्या विषयावर एक तें स्वतंत्र व्याख्यान झालें. शेवटीं आभार मानले.

प्रवचनांच्या ह्या दोन कार्यक्रमांनीं माझ्या छंदासाठीं मला एक नवा रस्ता दाखविला ह्यांत शंका नाहीं. बाळासाहेब कानिटकरांचीं प्रवचनें ऐकतांना त्यांच्या व्यासंगाचा–पाठांतराचा जसा अनुभव येई तसा माझ्या बोलण्यांत नव्हता. माझ्या बोलण्यांतील एक श्रवणीय गुण म्हणजे माझा तो तयार केलेला आवाज, त्यांतलें तें नाट्य, मला वाटणारी तळमळ हींच होत. तेंच माझें भांडवल होतें आणि आहे.

माझे एक विद्यार्थी मित्र श्री. विष्णूजी क्षीरसागर ह्यांनीं मला एक अनाहूत अनुग्रह मिळवून दिला. जगन्नाथपुरी येथील शंकराचार्यांच्या समोर तो कार्यक्रम घडला. आद्य शंकराचार्यांच्या उत्सवांत मला एक प्रवचन देण्यास सांगितलें. माझा विषय होता "सदा सर्वदा योग तुझा घडावा." मी त्या श्लोकांतील चार ओळींचा अर्थ आणि चर्चा अगदीं स्वतंत्र पद्धतीनें केली. आपलें दैवत श्रीराम ह्याच्या समाजहितपर गुणांशीं आपला योग घडावा अशी प्रार्थना समर्थांनीं ह्या श्लोकांत केली आहे. तो योग साधावा म्हणून त्या कारणीं देह पडला तरी पर्वा नाहीं. किंबहुना तीच आपली दृढ आकांक्षा आहे. अनंताची ही प्रार्थना गुणांसाठीं आहे–लौकिक स्वार्थासाठीं नाहीं. अशी मी केलेली चर्चा श्रींना आवडली. नंतर एक दिवस मला श्रींकडून आदेश आला व श्रींनीं मजवर अनुग्रह करून मला 'साहित्य वाचस्पति' ही पदवी दिली. साहित्य चर्चेत कुशल असा त्या पदवीचा अर्थ आहे. समर्थ सांप्रदायी श्रींना माझा तो अर्थ मान्य झाला असें मी समजतों. श्री. क्षीरसागर ह्यांना धन्यवाद !

● ● ●

लेखांक

पंचावन्नावा

# लोकहितवादी मंडळ स्थापना नी संयोजन

कविवर्य कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं लोकहितवादी मंडळाची स्थापना सप्टेंबर १९५० मध्यें झाली. ही रीतसर स्थापना होण्यापूर्वी मंडळाची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठीं जी पहिली बैठक झाली तींत स्वतः शिरवाडकर, श्री. बाळासाहेब सहस्रबुद्धे आणि मी असे तिघेजण होतों. महाराष्ट्र नाट्य मंदिर नामशेष झाल्यापासून राजकारणापासून अलिप्त अशा संस्थेची गांवांत गरज होतीच. १९४७ मध्यें स्वातंत्र्य मिळालें आणि सार्वजनिक क्षेत्रांत आम्ही उदासीन झालों हें इष्ट नव्हे अशा जाणीवेनें आम्ही एकत्र आलों. श्री. शिरवाडकर डॉ. भालेरावांच्या निकट सहवासांत आले ते मुंबईच्या नाट्योत्सवांतील एक नाटककार म्हणून. भालेरावांचे परिश्रम आणि उमेद ते पहात होते. ह्यासारखें कांहीं नाशिकला होणें आवश्यक आहे असें शिरवाडकरांना वाटू लागलें असावें. तसे कांहीं उल्लेख त्या पहिल्या बैठकींत झाले.

ह्या बैठकींत मी माझे विचार स्पष्टपणें सांगितले. महाराष्ट्र नाट्य मंदिराच्या अठरा वर्षांच्या कामाचा अनुभव लक्षांत घेऊन मला हें दिसून आलें माझ्या कामाला परिस्थितीनें आपोआप मर्यादा पडल्या आहेत. माझें कार्य क्षेत्र शालेय जीवनाशीं निगडित आहे. बाळासाहेब काळे आणि प्रल्हाद औरंगाबादकर ह्यांचा मुंबईच्या प्रतिवर्षीच्या नाट्यमहोत्सवाशीं अधिक जवळचा संबंध होता. मी एक तटस्थ प्रेक्षक होतों.

माझ्या मर्यादा लक्षांत घेऊन मी विद्यार्थ्यांसाठीं एक योजना सांगितली साहित्यविषयक व्याख्यानें आणि चर्चा ह्यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होतो आणि त्यांना साहित्याची गोडी लागते असा माझा अनुभव आहे. स्वतः शिरवाडकर, माधव मनोहर ह्यांचे पहिले संस्कार वाङ्मय–विहार मंडळ आणि वाङ्मय मंडळ ह्या संस्थांनीं घडविलेल्या व्याख्यानांनीं केले आहेत. मराठी भाषेच्या विकासांत शालेय विद्यार्थी हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याची उपेक्षा तर होताच कामा नये परंतु त्या घटकाचें यथायोग्य संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारणें अपरिहार्य कर्तव्य आहे. मी त्या बैठकींत माझे विचार सांगितले. विरोध कुणाचाच नव्हता.

लोकहितवादी मंडळ हें नांव देण्यांत शिरवाडकरांची कल्पकता कारण आहे. लोकहितवादींचें स्मरण आणि विचार ही प्रेरणा आहे हें स्पष्ट करण्यांत आलें. मंडळाच्या उद्घाटनाचा भव्य समारंभ रुंगटा हायस्कूलच्या पटांगणांत महामहोपाध्याय प्रा. श्री. दत्तो वामन पोतदार ह्यांच्या शुभ हस्तें झाला.

शारदीय महोत्सव म्हणजे एक व्याख्यानमाला आणि वासंतिक महोत्सव म्हणजे नाट्यप्रयोग अशी कार्यपद्धती सुरू झाली. व्याख्यानमालेला विद्यार्थी आणि नागरिक ह्यांनीं चांगला पुरस्कार दिला. नाशिकमध्यें पैसे देऊन व्याख्यानें ऐकण्यास इतका मोठा समाज उपस्थित राहिला हें लोकहितवादी मंडळाच्या कार्यकर्त्यांचें डोळ्यांत भरणारें यश होय. श्री. शिरवाडकरांच्या नेतृत्वानें यशस्वी झालेल्या ह्या कार्यक्रमामुळें मंडळासंबंधीच्या अपेक्षा खूपच उंचावल्या. कार्यकारी मंडळाचा एक सभासद म्हणून मला जें करणें शक्य झालें तें मी केलें.

*　　　　*　　　　*

१९५० ते १९५४ ह्या तीनचार वर्षांत मला ह्या मंडळाच्या द्वारें जें नाट्यविषयक कार्य करतां आलें त्याचाच मुख्यतः विचार करणें प्रस्तुत आहे. 'उसना नवरा' ह्या नाटकाचा प्रयोग करावा असें ठरलें व त्या प्रयोगाची संपूर्ण जबाबदारी मजवर टाकण्यांत आली. मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांचें सहकार्य मला मिळालें. ह्या नाटकांतील नायिकेच्या भूमिकेसाठीं कु. रत्नमाला पोतनीस ही कॉलेज विद्यार्थिनी मिळावी म्हणून प्रयत्न करण्याचें ठरलें. श्री. पोतनीस वकील ह्यांना बापूसाहेबांनीं मजबरोबर

येऊन विनंती करावी अशी मी शिफारस केली. बापूसाहेब व मी पोतनीसांच्याकडे गेलों. पोतनीस वकिलांनीं एकदम संमति दिली नाहीं. मास्तर म्हणजे मी दिग्दर्शक आहे वगैरे भरंवशाच्या गोष्टी बापूसाहेबांनीं सांगितल्या आणि आग्रह चालूच ठेवला. तरीहि मुलीला विचारून सांगतों असें वकीलसाहेब म्हणाले. मुलगी तयारच होती. बाकीचा संच जमला. मी आजोबाची भूमिका घेतली. पेठे हायस्कूलमध्यें तालमी सुरु झाल्या. नाटककार श्री. ना. घों. ताम्हणकर नाशकांत येऊन राहिले होते. त्यांचा व माझा पूर्वपरिचय होता. प्रयोगाच्या वेळीं ते नाशकांत नव्हते. त्यांनीं ह्या नाटकाची जी कुळकथा सांगितली ती ह्या विषयाचा विचार करणारांना बोधप्रद आहे.

'उसना नवरा' हें मूळच्या अमेरिकन नाटकाचें रूपांतर आहे अमेरिकेच्या रंगभूमीवरील नट बेकार झाले आणि त्यांनीं अमेरिकेच्या अध्यक्षाच्या घरावर मोर्चा काढला. एका लोकशाही राष्ट्राच्या अध्यक्षानें त्या बेकार नटांची कर्मकथा सहानुभूतीनें ऐकून घेतली व पहिला उद्‌गार काढला तो असा. "ह्या देशांत कोणतीहि कला मरूं दिली जाणार नाहीं." सरकारी यंत्रणा नाटकाला जगविण्यासाठीं राबूं लागली. प्रथम त्या सर्व बेकार नटांना अन्न, वस्त्र आणि निवास ह्यांची सोय करून देण्यांत आली. त्यानंतर एकामागून एक तज्ज्ञ समित्या कार्यान्वित करण्यांत आल्या. पहिल्या समितीनें नाट्य व्यवसायावर आलेल्या संकटाची पहाणी करून आपला अहवाल सादर केला. यांत्रिक जीवनाची गति वाढल्यानें सामान्य प्रेक्षकाला चारचार तासांचीं नाटकें पाहण्याची सवड नाहीं. म्हणून नाट्यप्रयोगाची कालमर्यादा दीड ते दोन तास असावी. दुसऱ्या समितीनें नाटककारांना सूचना दिल्या. 'उसना नवरा' ह्या नाटकासाठीं योग्य अशा नटनटींची निवड करण्यांत आली. एक अंक एक प्रवेश, नेहमींची सामाजिक वेषभूषा खटकेबाज संवाद, औत्सुक्यपूर्ण प्रसंग ह्यामुळें नाटक रंगलें. प्रयोगाला बेसुमार गर्दी होऊं लागली. सरकारनें अनुदान देऊन चालविलेला धंदा यशस्वी होतो असें दिसताच व्यापारी पुढें सरसावले व किफायतशीर धंदा चालवूं लागले. एक राष्ट्र आपल्या कलेची आणि कलावंतांची बूज कशी राखतें ह्याचें हें प्रात्यक्षिक आहे !

लोकहितवादी मंडळाचा पहिला नाट्यप्रयोग म्हणून ह्या प्रयोगाला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. प्रत्यक्ष प्रयोगाच्या आधीं दोनतीन दिवस

माझा घसा दुखत होता आणि आवाज बसला होता. रंगभूषा आणि वेषभूषा सातारी थाटाच्या म्हाताऱ्याची केली. माझा बसलेला आवाज हें त्या प्रयोगांतील माझ्या भूमिकेचें भांडवल ठरलें. नाशिकच्या प्रेक्षकांना माझा आवाज सुपरिचित आहे. मी म्हाताऱ्याची भूमिका करण्यासाठीं एक कृत्रिम आवाज तयार केला आणि त्यासाठीं कांहींनीं माझें कौतुक केलें. लोकांच्या आंधळ्या प्रेमाचा तो एक नमुना आहे आणि कृतज्ञ नटानें त्यापुढें नतमस्तक होणें एवढेंच त्याला शक्य आहे. प्रयोग रंगला. रत्नमाला पोतनीसचें काम चांगलें झालें.

* * *

श्री. पु. ल. देशपांडे ह्यांच्या 'अंमलदार' नाटकाचा प्रयोग करावयाचें ठरलें व दिग्दर्शक म्हणून प्रा. श्री. वसंतराव कानेटकर ह्यांची निवड करण्यांत आली. ढेरे साहेबांची भूमिका मला देण्यांत आली. तालमीचा नारळ फुटला त्या दिवशीं दिग्दर्शक आले आणि त्यांनीं एक तालीम घेतली. त्यानंतर शारीरिक अस्वस्थता म्हणून येतां येणार नाहीं व तालमी घेतां येणार नाहींत असें पत्र त्यांनीं पाठविलें. दिग्दर्शन व भूमिका दोन्ही माझ्याचकडे देण्यांत आलीं. नाशकांतले फार मातबर नागरिक त्या प्रयोगांत भूमिका करणार असल्यामुळें नाट्यप्रयोगाकडे अनेकांचें लक्ष लागलें होतें. श्री. दादा पोतनीस, संपादक, 'गांवकरी', डॉ. श्री. अ. वा. वर्टी, प्रि. श्री. सोमण, श्री नामपूरकर, श्री. विठ्ठलराव पटवर्धन ही ढेरेसाहेबांची प्रभावळ भरदार होती. नारभट आणि हरभट ह्यासाठीं विसुभाऊ निरंतर आणि रिमांड होमचे प्रमुख श्री. पानसे ही दुक्कल फारच चांगली जमली. विसूभाऊ एकवेळचे व्यवसायी नट, फाळके ह्यांच्या फिल्म कंपनींतील नट व नाशिकच्या एका घरंदाज घराण्यांतील गृहस्थ. त्र्यंबकेश्वर येथें जो शारदा नाटकाचा प्रयोग आम्ही केला त्यांत विसुभाऊंनीं सुवर्णशास्त्र्याची भूमिका तर केलीच पण प्रयोग उभा करतांना फार मेहनत घेतली. देशस्थ ऋग्वेदी संघासाठीं बसविलेल्या 'माईसाहेब' ह्या नाटकाच्या प्रयोगांत त्यांनीं 'शाळीग्राम'ची भूमिका केली. मी दिलेली तालीम ते अत्यंत प्रामाणिकपणें घेत. त्यांची शिस्त प्रसंशनीय व हौशी नटांना अनुकरणीय आहे. दामूअण्णा मालवणकर ह्यांच्या शब्दोच्चारांत जो आल्हादकारक खटका आहे तसाच खटका विसुभाऊंच्या आवाजांत आहे. बोलणें स्पष्ट आणि आवाज निकोप, ढेरेसाहेबांकडे आलेल्या अंमलदाराला जो शास्त्रोक्त आशीर्वाद द्यावयाचा त्यासाठीं विसुभाऊंनीं नाशिकमध्यें असलेल्या

एका विद्वान् ब्राह्मणाकडून स्वरसंथा घेतली. एखादी रागदारी म्हणावी तसा बिसुभाऊ तो आशीर्वाद म्हणतात. ते स्वर ऐकतांना कान तृप्त होतात.

श्री. पानसे मूळचे पुण्याचे–के. नारायण काळे ह्यांची तालीम घेतलेले. नाशकांत कोणी आपल्याला तालीम देईल अशी त्यांना कल्पनाच नव्हती. नाटकाचा अतिरिक्त नाद म्हणूनच ते आमच्यांत सामील झाले. मी तालीम देत असतांना ते माझा अंदाज घेत होते. परीक्षा पहात होते. मी माझ्या कल्पने-प्रमाणें तालमी घेत असे. कांहीं शब्दोच्चार स्पष्ट झालेच पाहिजे असा माझा कटाक्ष होता. तालीम घेतांना मी सुलतान असे. नंतर मी मोकळेपणानें सर्वांत मिसळत असे. कांहीं दिवसांनीं श्री. पानसे ह्यांनीं दुसऱ्याजवळ मजबद्दल भलेपणाचे उद्गार काढले, मला ते कळले.

श्रीमती सौ. वैद्य ह्यांच्याकडे 'माईसाहेब' ही भूमिका होती. त्या भूमिकेला साजेसें रूप त्यांना होतें परंतु इतर गुणांची उत्कटता नव्हती. 'अंमलदार'चा पहिला प्रयोग रुंगटा हायस्कूलमध्यें झाला. आम्ही त्यानंतर केलेल्या तीनचार प्रयोगांत हाच पहिला प्रयोग उत्कृष्ट झाला असें कांहींचें मत आहे. श्री. पोतनीस नाटकांत प्रथमच रंगले. इतकें उमदें व्यक्तित्व व्यव-सायी नाटक मंडळ्यांत सुद्धां क्वचित पहायला मिळतें. ह्या वृत्तपत्रीय संपा-दकानें मोठें विलोभनीय सहकार्य दिलें. प्रि. श्री. सोमण ह्यांचा उत्साह एखाद्या लहान मुलासारखा होता. मी वयानें लहान–त्यांच्या हाताखालीं एक शिक्षक म्हणून काम करणारा–कांहीं दिवस इंग्रजीची शिकवणी त्यांच्याकडून घेत-लेला–तरीहि तालमीच्या वेळीं सोमण एखाद्या आज्ञाधारक विद्यार्थ्याप्रमाणें वागत. चौथ्या अंकांत ढेरेसाहेबांना अभिनंदनाची मिठी ते अशा कांहीं उत्कट-तेनें देत कीं मी क्षणभर गोंधळून जाई. त्यांना नाटकांत भूमिका करण्याची संधीच फार कमी मिळाली. परंतु जेव्हां संधि मिळाली तेव्हां त्यांनीं आळस केला नाहींच पण प्रतिष्ठेचा बाऊहि केला नाहीं.

लोकहितवादी मंडळानें केलेला ह्या नव्या नाटकाचा प्रयोग यशस्वी झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. मी ढेरेसाहेबांच्या भूमिकेंत एक उद्धट अधिकारी रंगविला. ढेरेसाहेबांची जात 'मराठा' असें ठरवून मी माझा वेष आणि बोलणें त्याला अनुसरून ठेवलें. श्री. पोतनीस ह्यांनीं माझी भूमिका जास्तीत जास्त कोठें यशस्वी वठली हें मला प्रयोग झाल्यानंतर कांहीं दिव-सांनीं सांगितलें. चौथ्या अंकांत एक अंमलदार जांवई मिळाल्याचा आनंद

आणि तें पत्र आल्यानंतर झालेला संताप ह्या दोन परस्परविरोधी भावनांचा आविष्कार करतांना मी फार चांगलें कौशल्य दाखविलें असें त्यांचें म्हणणें. मी तो आविष्कार जाणून बुजून केला नव्हता. तें घडलें. परंतु एक गोष्ट लक्षांत आली कीं आपल्या भूमिकेंतील गुणदोषांची प्रांजल चर्चा करणारा एक तरी प्रेक्षक तालमीच्या वेळीं असावा. बाबा टकले ह्यांनीं केलेली पोस्टमास्तरची भूमिका छोटी पण इरसाल होती.

'अंमलदार' नाटकाचे एकंदर चार प्रयोग दोन वर्षांत लोकहितवादी मंडळानें केले. प्रत्येक प्रयोगांत 'माईसाहेब' व इतर पात्रें बदलत. माझे स्नेही श्री. बाबूराव प्रभुणे ह्यांनीं एका प्रयोगांत हरभटाची भूमिका केली. त्यांचा चेहरा, अंगलट विनोदी भूमिकेला साजेसा आहे. तिसऱ्या प्रयोगाच्या तालमी चालू असतांना प्रभाकर महाबळ अतिशय आजारी झाला. त्याचें दुखणें उलटलें आणि त्यांतच त्याचा अत्यंत दुःखदायक अंत झाला. माझ्या जीवनांत फार मोठा अपघात घडला. प्रभाकर माझ्यावर निस्सीम लोभ करीत असे. पडघवली आणि औरंगाबाद येथें त्यानें केलेली सोबत, नाटकांत त्यानें माझ्याबरोबर हौसेनें केलेल्या भूमिका—अनेक आठवणींनीं मन भरून गेलें. मनांत तीव्रतेनें वाटूं लागलें कीं आतां नाटकांत काम करूं नये. तसें मी सेक्रेटरींना पत्र लिहून कळविलें. त्यानंतर एक शिष्टमंडळ आलें व त्यांनें नाना प्रकारें माझी समजूत करण्याचा प्रयत्न केला. अखेर मला माझा निर्णय बदलावा लागला. प्रभाकर गेला—एक व्यायाम विशारद गेला—एक नाट्यभक्त गेला—आमचा एक लाडका मित्र गेला. कांहीं काळानें आमचे डोळे कोरडे झाले. पण त्याच्या शेंकडों आठवणींनीं आमचीं मनें चिंब भिजलेलीं आहेत आणि आम्ही जिवंत आहोंत तोंपर्यंत तीं तशींच रहातील.

प्रभाकर कांदीवली येथील शारीरिक शिक्षण विद्यालयांत प्राध्यापक म्हणून ख्यातनाम झाला. इंग्रजी बोलण्याची आणि लिहिण्याची संवय त्यानें अशी केली कीं बी. ए. आणि एम्. ए. झालेल्यांनीं चकित व्हावें. मला सर्वांत अभिमान वाटण्यासारखी गोष्ट असेल तर ती ही कीं प्रभाकरानें कांदीवलीच्या डोंगरावर नाटकाचें बी रुजवलें. त्या विद्यालयांत प्रतिवर्षी मराठी नाटकाचा प्रयोग करण्याची परंपरा चालू करण्याचा मान त्याचा आहे. त्यानें 'भावबंधन' ह्या नाटकाचा प्रयोग बसविला. मला त्याचें पत्र आलें. मी दोनतीन दिवस कांदीवलीला राहून प्रयोगाचें कमी अधिक पहावें. मी

तीन दिवस प्रभाकरकडे जाऊन राहिलों. सकाळीं संध्याकाळीं मिळतील तेवढे विद्यार्थी घेऊन मी त्यांची तालीम घेत असे. प्रभाकर त्या प्रयोगासाठीं जे परिश्रम करीत होता ते पाहूनच माझे डोळे दुखूं लागले. २०–२५ फूट उंचीच्या अर्धगोलाकृति पत्र्याच्या शेडमध्यें स्टेज उभारायचें म्हणजे प्रत्येक वेळीं वर चढा आणि खालीं उतरा. अंगाचा नुसता घाम होत होता. मी बाजूला बसून तें सारें पहात होतों. शेड खूप मोठी होती.

प्रयोग सुरू व्हायला पांच मिनिटें उरलीं. प्रभाकर मला म्हणाला, "प्रिन्सिपल जोसेफ ह्यांची अशी इच्छा आहे कीं नाटकाचें सूत्र इंग्रजींत सांगावें. येथें जमलेले लोक भिन्न भिन्न भाषांचे आहेत, तुम्हीच बोला." मी पडदा वर जाण्यापूर्वीं प्रेक्षकांपुढें उभा राहिलों आणि पांच मिनिटें इंग्रजींत बोललों. प्रेक्षकांना–मराठी न जाणणाऱ्यांना–तो उपक्रम आवडला. नाटक सुरू झालें. प्रभाकर नाटकांत 'प्रभाकर' च होता. श्री. गं. बा. पाठक ह्यांनीं 'कामण्णा'ची भूमिका केली. हौसेनें केलेला तो प्रयोग सर्वांना आवडला. प्रि. जोसेफ ह्यांनीं त्या उपक्रमाबद्दल प्रभाकरला धन्यवाद दिले नाटकाचा झेंडा प्रभाकरानें कांदीवलीच्या गिरीशिखरावर रोवला. तो गेलीं १०–११ वर्षें तेथें फडकत आहे. प्रभाकर गेला. दुसरा प्रभाकर झाला नाहीं. आमच्या आयुष्यांत प्रभाकर एकच ! आमचें दुर्दैव असें कीं प्रभाकराचें विशाल प्रेम-स्वरूप त्याच्या मृत्यूनंतर जीं दुखवटयाचीं पत्रें आलीं त्यांतून आम्हांला पहावयास मिळालें. प्रभाकर एक होता तो अनेकांच्या अंतःकरणांतुन पहाण्याची संवय आम्हांला करावयाची आहे.

आम्ही राज्यस्पर्धेंत 'अंमलदार' नाटकाचा प्रयोग केला. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत तो प्रयोग झाला. पुण्याचा रंगवणारा मेकअप करीत असतांना मला म्हणाला, "साहेब, तुमचा चेहरा मेकअपला फार छान खूप मोठा आहे. माझ्या" चेहऱ्याकडे पहाण्याची ही दृष्टि मला अभावितपणें कळली. "जगन्नाथाचा रथ" ह्या नाटकाचा प्रयोग मी आदल्या दिवशीं पाहिला. त्या प्रयोगांतील शिस्त, पात्रांची निवड, नाटकाचा विषय सारेंच वरच्या दर्जाचें होतें. त्या प्रयोगापुढें आमचा पाड लागणार नाहीं हें सांगायला ज्योतिषाची गरज नव्हती. वाहिली ती गंगा आणि राहिलें तें तीर्थ ! ना खेद, ना खंत ! !

● ● ●

लेखांक छप्पन्नावा

# रामायण-प्रवचनें आणि "नव्या वाटा !"

मराठी नाटकांवर केलेल्या प्रवचनांनीं माझें मन 'प्रवचन' ह्या विषयाकडे ओढलें गेलें. नाशिकचे एक पुराणिक श्री. बाबूशास्त्री पोळ ह्यांची भेट घेऊन मी त्याबद्दल चर्चा केली. त्यांनीं मला सांगितलें कीं रामायण किंवा महाभारत ह्यावर प्रवचनें करा. कांहीं मार्गदर्शनहि त्यांनीं केलें. मी नाशिकच्या काळाराम मंदिरांत मारुतीसमोरच्या सभामंडपांत १५ : २ : ५२ ते २२ : २ : ५२ ह्या आठ दिवसांत 'रामायणांतील भरत' ह्या विषयावर बोललों.त्यासाठीं लागणारीं सार्थ रामायणाची प्रत मी नासिकच्या सार्वजनिक वाचनालयांतून मिळविली, वाईचे भाऊशास्त्री लेले ह्यांनीं संपादित केलेल्या त्या प्रतींत अर्ध्या पानावर मूळ श्लोक व खालच्या अर्ध्या पानांत त्या श्लोकांचें मराठी भाषांतर अशी रचना आहे.

मराठीच्या अध्यापनपद्धतीचा पुरेपूर उपयोग मी ह्या उपक्रमांत केला. रोज किती भाग सांगायचा ह्याचें प्रथम मी स्थूल निवेदन करी. नंतर त्याच भागाचें सूक्ष्म निवेदन करीत असे. शेवटीं पुन्हा समारोप. ह्यामुळें मी जें सांगत असे तें श्रोत्यांच्या लक्षांत येई व लक्षांत राही. तसें तेथें जमणाऱ्या श्रोत्यांच्या अभिप्रायावरून मला कळलें. श्रोत्यांमध्यें एक फळी पूर्णपणें अडाणी अशा निरक्षर स्त्रियांची असे. कळो न कळो केवळ श्रद्धेनें ऐकावयाचें हीच त्यांची भूमिका. त्यांना मी सांगत असे तें कळूं लागल्यामुळें विशेष आनंद वाटूं लागला. रोज प्रवचन संपल्यानंतर पोथीला व कांहीं वेळीं प्रवचनकाराला

ज्या श्रद्धेनें ते श्रोते नमस्कार करीत तें पाहून मी चकित होई.

रामायणाचा अभ्यास करतांना महाकवि वाल्मिकीच्या प्रतिभेनें मन थक्क होई. तीन पिढ्यांची कथा लिहिणाऱ्या ह्या महाकवीनें नाट्यपद्धतीचा इतक्या विपुलतेनें उपयोग केला आहे कीं भारतीय नाट्याचा पहिला ग्रंथ म्हणून रामायणाचा निर्देश करावा लागेल. संभाषणांतून कथा आणि व्यक्ति ह्यांचा यशस्वी रीतीनें परिपोष करण्याच्या कलेचा सर्वश्रेष्ठ उद्गाता म्हणूनच वाल्मिकीचा विचार करावा लागेल. रामायण केवळ चित्रपट नाहीं–तो एक बोलपट आहे.

अयोध्याकांडाच्या उत्तरार्धांत भरताचें व्यक्तित्व कांहीं असामान्य तेजानें प्रकाशते. त्या तेजाचें मोहक सौंदर्य इतकें प्रभावी आहे कीं प्रत्यक्ष प्रभु रामचंद्राला तें रडायला लावतें. अयोध्येचें राज्य रामाचेंच आहे– आपण त्या राज्याचे एक विश्वस्त आहोंत असा निर्णय रामाला स्वीकारायला लावणारा भरत, हत्तीवरून रामाच्या चरणपादुका मिरवित नेणारा भरत, नंदीग्रामांत तापस वेषांत राहून चौदा वर्षं राज्यकारभार करणारा भरत, मानवी मनाचा हा आविष्कार उदात्त आहे–बिनतोड आहे. रामायणांतील नैतिक मूल्यें श्रेष्ठ आहेत परंतु माझ्या मनाला जी विलक्षण ओढ लागली ती त्यांतील नाट्यमय संघर्षानें ! रामायणासारख्या महाकाव्याकडे पहाण्याचा हा नाटकी दृष्टिकोन शिष्टसंमत नसेल परंतु आल्हाददायक आहे.

त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यांत मी मालेगांव येथें त्याच विषयावर प्रवचनें दिलीं. श्रीमान् राजेबहादूर ह्यांच्या वाड्यांत तीं प्रवचनें झालीं. स्वतः बाळासाहेब प्रवचनांना बसत असत. त्यांनीं माझ्या सांगण्याच्या पद्धतींत एक सुधारणा घडवून आणली. प्रवचनांत मूळ रामायणांतील कांहीं श्लोक वाचले जावेत. श्रोत्यांना ते श्लोक ऐकणें पुण्यकारक वाटते. त्या सूचनेचा मी स्वीकार केला आणि प्रवचनांच्या रोजच्या टिपणांत वाचावयाचे श्लोक लिहूं लागलों. महत्त्वाच्या श्लोकांची निवड मी करीत असे आणि त्या त्या दिवसाच्या प्रवचनाचे ते मुद्दे असत. ह्या सुधारणेमुळें माझें विवेचन साधार झालें. मूळ काव्याचा कणभर आनंद श्रोत्यांना देण्याची शक्यता निर्माण झाली.

मालेगांवच्या ह्या मुक्कामांत श्री. बाळशास्त्री हरदास या विद्वान्

गृहस्थांची भेट झाली. त्यांचा व माझा पूर्वपरिचय होता. मी जो विषय बोलत होतों त्याला मार्गदर्शक असे ग्रंथ मला माहीत व्हावे म्हणून मी त्यांना विनंती केली. कॅ. जयस्वाल ह्या भारतीय संशोधकाचा Hindu polity भारतीय शासनशास्त्र हा ग्रंथ वाचण्याची शिफारस त्यांनीं केली. तसेच 'अराजक' ही राज्याच्या दृष्टीनें एक भयावह अवस्था आहे व वसिष्ठ आणि भरत ह्यांचे प्रयत्न अयोध्येंत ती अवस्था निर्माण होऊं नये म्हणून चालले होते ह्या मुद्यावर श्री. बाळशास्त्री खुलासेवार बोलले. मला तें मार्गदर्शन फार उपयुक्त वाटलें. माझे शालेय जीवनांतील एक स्नेही श्री. बडवे वकील ह्यांच्या घरीं मी राहिलों.

१९५३ च्या फेब्रुवारीं महिन्यांत मी नाशिकला काळाराम मंदिरांत "रामायणांतील विश्वामित्र" ह्या विषयावर प्रवचनें दिलीं. विश्वामित्र हा एक आदर्श शिक्षक आणि राम व लक्ष्मण हे त्यानें निवडलेले विद्यार्थी–रामाचा जीवित हेतु निश्चित करणारा आणि तो साध्य व्हावा म्हणून सशास्त्र विद्या शिकविणारा ही विश्वामित्राची भूमिका माझ्या प्रवचनांतील मध्यवर्ती कल्पना होय. मी व्यवसायानें शिक्षक असल्यानें आजची शिक्षणपद्धती आणि रामायण कालीन शिक्षण पद्धती ही चर्चा मला साधार करतां येई. ह्या प्रवचनासाठीं एक गुजराथी गृहस्थ श्री. जयंतीभाई ओझा नियमानें येत. त्यांचा व माझा परिचय झाला इतकेंच नव्हे तर परिचयाचें रूपांतर स्नेहांत झालें. साहित्य, संगीत, नृत्य व नाट्य ह्या चारहि कलांचाअभ्यास केलेले जयंतीभाई माझ्याशीं मराठींतून बोलत. आमच्या ह्या बैठकींचा एक परिणाम असा झाला कीं जयंतीभाईंनीं एका इंग्रजी नाटिकेचें When the moon rises मराठी रूपांतर केलें. १९४२ मध्यें सुरू असलेलें राजकीय आंदोलन ही पार्श्वभूमि घेऊन जयंतीभाईंनीं केलेलें रूपांतर सरस आहे. सैगल ह्या नटाशीं जयंतभाईंचें विलक्षण साम्य आहे.

* * *

ह्याच काळांत एका दिवाळीच्या सुटींत घडलेला हा प्रसंग आहे मी प्रकृतीनें अस्वस्थ असतांना मला निरोप आला कीं सरदार विंचूरकर ह्यांच्या घरीं तुम्हांला बोलावलें आहे. मला चालत जाणें शक्य नव्हतें. म्हणून मला नेण्यासाठीं गाडी पाठविण्यांत आली. मी गेलों तेव्हां

भय्यासाहेबांच्या दिवाणखान्यांत नासिक जिल्हाधिकारी श्री. साळवी, पोलीस दल प्रमुख श्री. पंत, मिसेस् साळवी, मिसेस पंत आणखी एक दोन स्त्रिया असा मेळावा जमलेला होता. दिवाळीचीं फराळाचीं ताटें पुढें होतीं. मला कांहीं खावयाचें नसल्यानें मी फक्त चहा घेतला. एका मॉंटे-सरी शाळेसाठीं नाटय–प्रयोग करावयाचा आहे. मिसेस साळवी, मिसेस् पंत इत्यादि स्त्रिया त्या प्रयोगांत भूमिका करतील. प्रयोगाची जबाबदारी तुम्ही घ्या असें मला सांगण्यांत आलें. मी त्यांना माझी अट सांगितली. नाट-काचीं निवड त्यांनीं करावयाची, प्रयोग जास्तीत जास्त चांगला होईल असा प्रयत्न मी करीन. ह्या अटीवर मी तें काम स्वीकारलें. नंतर तीन महिने नाट-काच्या तालमी चालू होत्या. ' नव्या वाटा ' ही आनंदीबाई किर्लोस्कर ह्यांनीं लिहिलेली नाटिका करावी असें ठरलें. आचार्य अत्रे ह्यांनीं ह्या नाटिकेची शिफारस केली असें नंतर समजलें.

ह्या नाटकाच्या तालमीच्या निमित्तानें श्री. साळवी आणि श्री. पंत ह्या दोन अधिकाऱ्यांशीं ओळख झाली आणि तिचें रूपांतर कायमच्या लोभांत झालें. अधिकाऱ्यांचें जग मला जवळून पहावयास मिळालें आणि एक इष्ट असें मानसिक शिक्षण मला मिळालें. रोज शाळा सुटल्यावर सेवानिवृत्त जिल्हाधिकारी श्री. दीक्षित ह्यांच्या बंगल्यावर मी जात असे. चहाचा कप आणि बिस्किटें मला देण्यांत येत आणि नंतर तालमीला सुरुवात होई. शिक-णारांना मनापासून हौस त्यामुळें तालमी व्यवस्थित होत. शामलाबाई दीक्षित आणि कमलाबाई पंत ह्यांच्यासाठीं गाणीं घालण्यांत आलीं आणि एका संगीत नाटकाचें दिग्दर्शन मी करू लागलों. मला गातां येत नसलें तरी गाण्या-मुळें रसहानि होणार नाहीं ह्याबद्दल मी दक्ष होतों.

१२ फेब्रुवारी १९५३ ला विकास थिएटरमध्यें श्री. मोरारजी देसाई–मुंबई राज्याचे मुख्य मंत्री ह्यांच्या अध्यक्षतेखालीं प्रयोग झाला. तिसऱ्या अंकाच्या आधीं नामदार मंत्री आंत आले आणि त्यांनीं सांगितलें कीं १२ च्या आंत प्रयोग संपला पाहिजे. ह्या फर्मानामुळें आमची त्रेधा उडाली. सुचेल तो भाग आणि शामलाबाईंचें एक पद गाळून प्रयोग बाराला पांच मिनिटें कमी असतांना संपविला. श्री. मोरारजी देसाई पडद्यासमोर उभे राहिले व लोकांना उद्देशून ते बोलले. नाटकांत भूमिका करणाऱ्या स्त्रियांचें त्यांनीं कौतुक केलें

व आपण केलेला कायदा आपणच पाळायला शिकलें पाहिजे असा संदेश देऊन ते निघून गेले. त्या स्त्रियांचा विरस झाला.

ह्या नाटकाचे आणखी दोन प्रयोग झाले. एक प्रयोग रिमांड होमच्या मदतीसाठीं नाशिकला झाला आणि दुसरा मालेगांव येथें दुष्काळ फंडासाठीं झाला. मालेगांवीं सोल्जर्स बोर्डाच्या इमारतींत आम्ही नाटकवाले उतरलों. जिल्हाधिकाऱ्याची तैनात म्हणजे काय ह्याचा अनुभव मी व माझे स्नेही श्री. हरीभाऊ कुलकर्णी ह्यांनीं घेतला. तो प्रयोग काकाणी थिएटरमध्यें झाला. स्टेज वाढवून घ्यावें लागलें. कमतरता कसलीच नव्हती. राजा बोले आणि दळ हाले अशीच अक्षरशः स्थिति होती. एक फौजदार आणि चार शिपाई चोवीस तास तैनातीला हजर होते. प्रयोग फारच चांगला झाला. श्रीमंत बाळासाहेब राजेबहादूर ह्यांनीं त्या प्रयोगाची खूप स्तुति केली. शामलाबाईंचीं गाणीं फारच चांगलीं झालीं. सुप्रसिद्ध गायिका ज्योत्स्नाबाई भोळे ह्यांची आठवण होईल इतकीं सरस गाणीं त्यांनीं म्हटलीं.

त्या मुक्कामांत श्री. साळवी ह्यांचा अधिक जवळून परिचय झाला. त्यांच्याच तोंडून दुसऱ्या महायुद्धांतील त्यांच्या अनुभवाच्या कांहीं युद्धकथा ऐकल्या. जीवनाच्या धकाधकींत मृत्यूशीं सामना करून परत आलेल्या एका वीराचें दर्शन झालें आणि मला हर्ष झाला. नाशिकला आल्यानंतर लोकहित-वादी मंडळातर्फे न्यू हायस्कूलच्या सभागृहांत साळवीसाहेबांचीं पांच व्याख्यानें १८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट मी करविलीं. विद्यार्थ्यांना तीं व्याख्यानें फार आवडलीं. श्री. फडके—माझ्या शाळेंतील चित्रकला शिक्षक—आणि माझे एक विद्यार्थी ह्यांच्याकडून कांहीं युद्धकालीन प्रसंगांचीं आणि वस्तूंचीं मोठ्या आकाराचीं रंगीत चित्रें काढून घेतलीं. व्याख्यान चालू असतांना मी उभा राहून तें तें चित्र दाखवीत असे. एखाद्या सीरियलप्रमाणें रोज त्या व्याख्यानांची उत्कंठा वाढूं लागली. कांहीं विद्यार्थी इतकें बेचैन होत कीं त्यांना रात्रीं झोंप येत नसे. एका स्टेनोग्राफरनें तीं व्याख्यानें शब्दशः लिहून घेतलीं. विद्यार्थ्यां-करतां एक प्रेरक पुस्तक त्या व्याख्यानांतून तयार करावें ही माझी कल्पना साळवी साहेबांना पसंत पडली. मी त्या पुस्तकाचें यथायोग्य संपादन अद्याप करूं शकलों नाहीं. संकल्प केला आहे. त्याचें रूपांतर ईश्वरी इच्छा अनुकूल झाली कीं सिद्धींत होईल अशी मनोमन जाणीव आहे. ● ● ●

लेखांक सत्तावन्नावा

# नटाचा योगाभ्यास

"स्टॅनिस्लव्हस्की" ह्या नांवाच्या जादूनें गेलीं दहा वर्षे मी भारला गेलों आहे. डॉ. भालेराव ह्यांनींच ह्या महान् नाटच-दिग्दर्शकाचा प्रथम परिचय त्याच्या "The art on the stage" ह्या ग्रंथानें करून दिला. गेल्या तीस चाळीस वर्षांतील रंगभूमीविषयक माझ्या विचारांत आणि कल्पनांत फार मोठा बदल ह्या एकाच पुस्तकाच्या वाचनानें घडवून आणला.

स्टॅनिस्लव्हस्की हा रशियन नट आणि दिग्दर्शक त्या देशाच्या क्रांति-काळांत होऊन गेला. १९१७ मध्यें झालेल्या रशियन क्रांतीनंतर त्या देशांतील जीवन अनेक तऱ्हांनीं बदललें. रशियांतील सर्वच व्यवसाय सरकारी मालकीचे झाले आणि प्रत्येक व्यवसायांत द्रुतगतीनें सुधारणा होऊं लागली. "मॉस्को थिएटर्स" हें एका अमेरिकन दिग्दर्शकाचें पुस्तक वाचीत असतांना नाटच-व्यवसायांतील रशियन प्रगतीचें जें असामान्य दर्शन घडलें तें अविस्मरणीय आहे. शिक्षक आणि नट ह्यांना रशिनय समाजांत फार मोठा मान आहे. व्यवसाय तज्ज्ञ शिक्षकांसाठीं जशा सोयी केलेल्या आहेत तशीच व्यवस्था नाटच-शिक्षणासाठीं केलेली आहे. त्या व्यवस्थेचें वैशिष्टच असें कीं नाटच-शिक्षणाला योग्य अशीं माणसें निरनिराळ्या व्यवसायांतून निवडून घेण्याची सोय ह्या पद्धतींत आहे. त्या अमेरिकन लेखकानें दिलेलें एक उदाहरण अत्यंत विचारप्रेरक आहे.

एका कारखान्यांत वार्षिक स्नेहसंमेलनाचें एक नाटक चालू होतें. एक तरुण एंजीनियर त्या प्रयोगांत भूमिका करीत होता. मॅनेजरला वाटलें कीं हा तरुण बऱ्यांपैकीं काम करीत आहे. त्यानें मॉस्कोच्या नाट्य विद्यालयाला फोनवरून विनंती केली कीं तें काम पहाण्यास कोणी तरी यावे. त्याप्रमाणें एक निरीक्षक तें नाटक पहायला विमानानें आले. प्रयोग पाहून परत जातांना त्यांनीं मॅनेजरला सांगितलें कीं त्या तरुण एंजीनियरला मॉस्को-नाट्य विद्यालयांत हजर व्हायला सांगा. त्या आदेशानुसार तो तरुण मॉस्को नाट्य विद्यालयांत दाखल झाला. तेथें पांच वर्षांचा अभ्यासक्रम त्यानें पुरा केला. त्या पांच वर्षांत त्याचें नांव कारखान्याच्या यादींतच होते आणि त्याचा पगारहि वार्षिक वेतन वाढीसुद्धां कारखान्याकडूनच मिळत होता. पांच वर्षांनंतर कारखान्यांतून नांव काढून नाट्यव्यवसायांत नट म्हणून त्या तरुणाला दाखल करण्यांत आलें. समाजांतील व्यवसायात्मक बुद्धि भिन्नभिन्न थरांतून परिश्रमपूर्वक निवडून काढावयाची. तिचें यथास्थित संगोपन करायचें आणि तिला त्या व्यवसायांत स्थान द्यावयाचें हें घडणें व घडविणें फार कठीण आहे. म्हणून त्या लेखकानें आपल्या देशाला उद्देशून प्रश्न केला आहे, " बाई अमेरिके, आपल्या देशांत हें कधीं काळीं घडेल का ? "

आमच्या नाशिकच्या शाळेंत एका वर्षीं एका विद्यार्थ्याबाबत असा प्रकार घडला. 'दामाजी' बोलपटांतील विठू महाराचें मोहरा ओतण्याचें गाणें तो विद्यार्थी अतिशय चांगल्या आवाजांत म्हणत असे. त्याचा तो आवाज कानांतून मनापर्यंत घुसत असे आणि तेथेंच घर करून राही. विशेषतः त्यांतील एक ओळ " मोहरा ओतल्या खळखळा " ह्यांतील खळखळा हा शब्द तो अशा रीतीनें म्हणे कीं तो आवाज प्रत्यक्ष मोहरा ओततांना होत आहे असें वाटावें. स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष आणि 'लोकमान्या'चे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ ह्यांनीं तें गाणें ऐकलें आणि ते असे कांहीं भारावून गेले कीं त्यांनीं मला हांक मारून प्रश्न केला, " पुरोहित, ह्या मुलाचं काय करणार ? " गरीब बिचारा पुरोहित मास्तर त्या प्रश्नाला उत्तर देऊं शकत नाहीं. असे अनेक आवाज वाऱ्यावर विरून गेले आहेत. समाजाला, सरकारला त्याची जाणीव नाहीं असें मी कसें म्हणूं ? तो गरीब मुलगा कुठें तरी कारकुनी करीत जगेल. त्याच्या चार सहकाऱ्यांना कधीं काळीं मिळाला तर त्या

आवाजाचा आनंद मिळेल. आमच्या देशांत इतिहास संशोधन आहे परंतु गुणसंशोधन नाहीं. ही आहे ह्या समाजाची व्यथा !

स्टॅनिस्लव्हस्कीनें आपल्या पुस्तकाचें प्रयोजन असें सांगितलें आहे कीं नाटचव्यवसायांत नवीन माणसाला मार्गदर्शक असें एकहि पुस्तक नाहीं. हा व्यवसाय करतांना आपल्याला ज्या अडचणी आल्या त्या इतरांना येऊं नये-म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे. समाजाविषयीं केवढी कळकळ ! कळकळीची कोरडी करामत करणारे अनेक असतात. परंतु ती कळकळ सामाजिक उपयुक्ततेंत रूपांतरित व्हावी म्हणून प्रयत्न करणारे फारच थोडे. स्टॅनिस्लव्हस्कीनें कांहीं महान् समकालीन नटांच्या नाटचपद्धति समजावून घेतल्या आणि अनुभवाच्या ह्या सामुग्रींतून नाटच व्यवसायाचे कांहीं शाश्वत सिद्धांत प्रस्थापित केले. मला त्या ग्रंथाचा जसा अभ्यास करतां आला तसा मी केला व त्या विषयावर तीन व्याख्यानें दिलीं.

'नटाचा योगाभ्यास' ह्या नांवानें मी तीं व्याख्यानें दिलीं. आमच्या तथाकथित विचारवंतांना नट हा एक सामाजिक दुर्गुणांचा पुतळा असें वाटतें आणि वेळीं अवेळीं ते ह्या समजुतीचा उच्चार–उल्लेख करण्यांत भूषण मानतात. 'योगाभ्यास' म्हणजे शुद्धशील कठोर तपस्या करणाऱ्या तपस्व्याचा अभ्यास ! ह्या दोन परस्पर विरोधी कल्पना एकत्र करून मी तो विषय मांडला. एक व्याख्यान मी मालेगांव येथें गणेशोत्सवांत दिलें.

स्टॅनिस्लव्हस्कीनें 'साल्व्हिनी' ह्या इटालियन नटाची गाजलेली 'अथेल्लो' भूमिका करतांना तो पूर्वतयारी कशी करतो ह्याचें वर्णन दिलें आहे. हजारपेक्षां अधिक वेळां ती भूमिका केल्यानंतरच्या एका प्रयोगाच्या वेळेचें हें वर्णन आहे. प्रयोगापूर्वीं तीन तास साल्व्हिनी थिएटर मध्यें येतो. स्टेजवरचीं माणसें 'सेट' उभारीत असतात. साल्व्हिनी त्यांच्यांत ४–५ मिनिटें मिसळतो, अगदीं मोकळेपणानें मिसळतो आणि नंतर आपल्या मेकअपच्या खोलींत जातो. 'अथेल्लो'च्या रंगभूषेला प्रारंभ होतो. मध्यंतरी एक दोन वेळां साल्व्हिनी स्टेजवर येऊन जातो. स्टेजवरच्या कामाची बरीचशी प्रगति झालेली असते. अगदीं आवश्यक सूचना देऊन साल्व्हिनी परत जातो. आतां प्रयोग सुरू व्हायला फारच थोडा अवकाश असतो. थिएटरच्या प्रेक्षकगृहांत प्रेक्षक यायला सुरवात झालेली असते. रंगभूषा, वेषभूषा संपवून

तिसऱ्यांदा त्या खोलींतून बाहेर येतो तो साल्व्हिनी नव्हे– तो अथेल्लो–रोम रोमांत अथेल्लोच असतो. येथें हें विवेचन करतांना स्टॅनिस्लव्हस्कीनें असा प्रश्न उपस्थित केला आहे कीं ते तीन तास साल्व्हिनी काय करीत असतो. आणि त्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं तो Mental make up मनाची रंगभूषा करीत असतो. भूमिकेची ही योगसाधना आहे. रंगपटांत मराठी नटांच्या ज्या आचरट चेष्टा चाललेल्या असतात त्या लक्षांत घेतल्या म्हणजे मराठी रंगभूमीवर असामान्य नट कां नाहींत ह्याचें उत्तर मिळतें. नाहीं म्हणायला एक अपवाद मला माहीत आहे. 'एकच प्याला' नाटकांत तळीरामाची भूमिका करणारा भांडारकर मेक–अप् झाला कीं जी मुद्रा धारण करी ती प्रयोगाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत टिकवीत असे. त्या चार पांच तासांत तो कुणाशींहि बोलत नसे.

साल्व्हिनी पद्धतीचा अभ्यास करून स्टॅनिस्लव्हस्कीनें दोन प्रकारच्या नटांचा विचार मांडला आहे. Part–actor आणि I–actor हे ते दोन प्रकार! आपण वेगळे आणि भूमिका वेगळी अशा रीतीनें काम करणारा नट हा Part–actor आणि भूमिका म्हणजेच मी असें एकरूप काम करणारा नट हा I–actor ही चर्चा करीत असतांना ह्या लेखकानें रंगभूमीवरील नट आणि प्रकाशरेषेच्या पलीकडे बसलेले प्रेक्षक ह्यांच्याबद्दल कांहीं क्रांतिकारक विचार व्यक्त केले आहेत.

नाटकांत भूमिका करणाऱ्या नटानें आपली भूमिका करतांना एक महत्त्वाचें पथ्य पाळणें आवश्यक आहे. नाटककारानें आपल्या नाटकांत दाखविलेल्या एका घटनात्मक जीवनाचें आपण एक घटक आहोंत ही जाणीव ठेवून आपल्या सर्व हालचाली त्या जीवनाला उद्देशून ठेवल्या पाहिजेत. हें पथ्य पाळतांना रंगमंचासमोर बसलेल्या प्रेक्षकांशीं नटाला कांहीं कर्तव्य नाहीं. त्यांना खूष करणें हा नटाचा उद्योग नव्हे. प्रेक्षकांना नाटकांत रंगविलेल्या जीवनाचें आकर्षण वाटत असेल तर ते तो प्रयोग लक्षपूर्वक पहातील. नटाला आपल्या सामर्थ्याचा अप्रत्यक्ष उपयोग करूनच त्या प्रेक्षकांवर परिणाम केला पाहिजे. नाटकांतील जीवन जिवंत करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करणें व त्यासाठीं नटाची प्रत्येक हालचाल पूर्वनियोजित असली पाहिजे. प्रेक्षकांना खूष करण्यासाठीं नटानें कांहीं करणें हा अधर्म होय असें स्टॅनिस्लव्हस्कीनें

प्रतिपादन केलें आहे. मराठी नटांपैकीं कितीजणांनीं हा अधर्म कटाक्षानें टाळला आहे कीं पाळला आहे ह्याचा विचारच करायला पाहिजे.

डॉ. भालेरावांनीं ह्याच दिग्दर्शकाचें आणखी एक पुस्तक मला वाचावयास दिलें. Stanislavasky Produces Othello ह्या पुस्तकांत स्टॅनिस्लव्हस्कीनें इटलींत रुग्ण शय्येवरून लिहिलेलीं अथेल्लो ह्या नाटकाचीं नाट्यप्रयोगविषयक टिपणें आहेत. मॉस्को थिएटरच्या वार्षिक उत्सवासाठीं करावयाचा प्रयोग म्हणून तेथील नटांनीं ह्या नाटकाची निवड केली व ह्या महान् नटाला मार्गदर्शक सूचना करण्याची तेथील नटांनीं विनंती केली. स्टॅनिस्लव्हस्कीनें शेक्स्पीअरच्या महान् नाट्यकृतीला जो साज चढविला आहे तो पाहिला म्हणजे एका नाट्य–दिग्दर्शकाच्या प्रतिभेचें सामर्थ्य मनाला थक्क करून टाकतें. नाट्य–दिग्दर्शनासाठीं एक महत्त्वाचा विचार ह्या टिपणांत आढळतो तो असा: प्रत्येक अंकांत एक उत्कर्ष बिंदू ठरवून सर्व हालचाली त्या उत्कर्ष बिंदूचा प्रभाव वाढविण्यासाठीं योजाव्या–कराव्या. आणि अशा रीतीनें नाट्यप्रयोग यशस्वी करावा हें तें महत्त्वाचें सूत्र होय. अथेल्लोचा दुसरा अंक ह्या दृष्टीनें सदोष आहे. जिंकलेल्या बेटावर अथेल्लोचें आगमन ही एकच घटना उत्कटत्वानें दाखविण्यासाठीं स्टॅनिस्लव्हस्कीनें सुचविलेली योजना अशी आहे.

किल्ल्याच्या तटाची भिंत आणि त्या भिंतीवरील रस्ता ह्यांचा उपयोग ह्या अंकाला गतिमानता आणण्यासाठीं करावा. तटाच्या भिंतीला माणसाचा चेहरा दिसावा अशीं पांच दहा भोंकें ठेवायचीं. किल्ल्यांतील माणसांची ये–जा ह्या भोंकांतून दिसावी व कुणाचा क्रुद्ध तर कुणाचा निराश, कुणाचा कष्टी, हताश असे चेहरे ह्या भोंकांतून दिसावे. यागो आणि रॉड्रिगो ह्यांचें संभाषण तटावर चालू आहे. एक जहाज किनाऱ्याला आणण्याचा प्रयत्न होत असतांना होणारे आवाज पार्श्वभूमींतून ऐकू येत आहेत. अथेल्लोच्या स्वागतासाठीं वाजणाऱ्या बॅंडचाहि ठेका लांबून ऐकू येत आहे. तटाच्या भिंतीवर कोठें काय व्हावें ह्याबद्दलचा इंचाइंचाचा तपशील दिला आहे. स्टेजवर काम करणाऱ्या मिस्त्रीसाठीं ह्यांत आवश्यक त्या सूचना आहेत.

हीं सर्व टिपणें वाचतांना अथेल्लो हा नाट्यप्रयोग आपण समोर पहात आहोंत असा भास होतो. मराठी नाटकांच्या बाबतींत असा विचार झाला


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.......................... विः ..................

नाहीं हें खरेंच आहे. स्टॅनिस्लव्हस्कीच्या आणखी दोन पुस्तकांचा विचार करणें आवश्यक आहे. The Actor Prepares ह्या पुस्तकाचें फक्त नांव मी ऐकलें आहे. प्रत्यक्ष पुस्तक प्रयत्न करूनहि अद्याप मिळालें नाहीं. My Life In Art हें पुस्तक मला उपलब्ध झालें परंतु त्या पुस्तकाचें संपूर्ण वाचन करण्यास मला वेळ मिळाला नाहीं. जीं शेंदीडशें पानें मी वाचलीं आहेत त्यावरून स्टॅनिस्लव्हस्कीनें केलेल्या निरनिराळ्या नाट्यविषयक प्रयत्नांची जाणीव होते. एक प्रकारें स्टॅनिस्लव्हस्कीचें हें आत्मचरित्रच आहे. केवळ आपल्या यशस्वी प्रयत्नांची नोंद करण्यासाठीं हें पुस्तक लिहिलेलें नाहीं. आपल्याला आलेलीं अनेक अपयशें, आपल्या लहानमोठ्या चुका, मानवी मनाचीं अनेक स्खलनें ह्या सर्वांचें अतिशय मनोज्ञ चित्रण ह्या पुस्तकांत केलें आढळतें. प्रयोग करीत करीत, चुका करीत करीत, स्टॅनिस्लव्हस्की मोठा झाला–नाट्यकलेंतील महर्षि झाला. हा बोध आम्ही आमच्या मनावर बिंबविला पाहिजे. नाट्यक्षेत्रांत नवे नवे प्रयोग अल्पस्वल्प प्रमाणांत कांहीं ठिकाणीं चालू आहेत. ह्याप्रयोगाचें यथायोग्य अभिसरण सामाजिक देहांत झालें पाहिजे.

मराठी नाट्यक्षेत्रांत स्टॅनिस्लव्हस्की उपकारक व्हावयाचा तर त्याच्या ग्रंथांचा व्यवस्थित अभ्यास होणें आवश्यक आहे. ह्या अभ्यासांतून स्टॅनिस्लव्हस्कीच्या नाट्य–सूत्रावर आधारलेली अभ्यासक्रम आंखला जावा व शाळा-कॉलेजांतून तो अभ्यासक्रम शिकविण्याची व्यवस्था व्हावी. नाट्याची सुप्त शक्ति असणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम म्हणजे एक प्रभावी आवाहन होईल आणि त्यांतूनच नाट्याभ्यासकांची नवी पिढी तयार होईल ह्यांत तिळमात्र शंका नाहीं !

● ● ●

## लेखांक अठ्ठावन्नावा

# डॉ. भालेराव अमर होतात!

नासिकहून नांदगांवच्या व्ही. जे हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून माझी बदली जून १९५४ ला झाली आणि गेल्या २५–३० वर्षांच्या माझ्या कार्यक्षेत्रांतून मी दूर गेलों. मुख्याध्यापकत्वाचें मोठेंपण आणि त्याला अंतर्भूत यातना माझ्यावर लादल्या गेल्या होत्या. गेल्या २१ वर्षांत पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलचें एक वर्ष सोडून मी नाशिक आणि तेथील वातावरण ह्यांत राबलों होतों. आतां निराळी शाळा, निराळे शिक्षक आणि निराळे विद्यार्थी ह्यांच्याशीं समरस होऊन मला माझी जबाबदारी पार पाडायची होती.

मी कानावर रुजूं झालों तोंच मुळीं आठ दिवस उशिरा. श्री. जाखडी आणि श्री. कवीश्वर ह्यांनीं माझा समावेश आपल्या कुटुंबांत करून घेतल्यामुळें माझा जेवणाचा व रहाण्याचा प्रश्न सुटला. पहिल्या सहामाहींत मी शाळेंत शाळेच्या कामाविषयीं माझें धोरण स्थिर केलें आणि त्याप्रमाणें काम करूं लागलों. नांदगांवच्या हवापाण्याचा एक इष्ट असा परिणाम झाला कीं माझें पचन सुधारलें आणि खाल्लेलें अन्न अंगीं लागलें. गेलीं २७ वर्षे पावसाळ्याच्या सरत्या काळांत मी दम्यानें आजारी पडत असे आणि त्या दुखण्यांत वर्षाची कमाई खर्ची पडे. नांदगांवच्या कोरडया हवेनें माझा तो व्याधी थांबला आणि शरीरानें मी स्थूल झालों.

दिवाळीच्या सुटींत मी घरीं नाशिकला आलों. आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'होनाजी बाळा' ह्या नाटकाचा प्रयोग पेठे हायस्कूलमध्यें

लागला. माझे मित्र श्री. बाळासाहेब काळे ह्यांनीं ह्या प्रयोगाचें दिग्दर्शन केलें असल्यानें आणि डॉ. भालेराव त्या प्रयोगासाठीं नासिक येथें येणार असल्यानें मला ती एक आनंदाची पर्वणी वाटली.

आपल्या नटवर्गासह डॉक्टर पंचवटींत मुरलीधर मंदिरांत उतरले. शंकर अंध्रुटकरचे वडील व चुलते त्या मंदिराचे व्यवस्थापक, जागा सर्व सोयींनीं सुसज्ज, भरपूर, मोठी आणि अंध्रुटकर डॉक्टरांचा एक विश्वासू कार्यकर्ता म्हणून त्यांचे लोभाचे संबंध इत्यादि कारणांनीं डॉक्टर तेथें उतरत हें ठीकच होतें. अंधृटकरचें घर आणि बाळासाहेब काळे ह्यांचा स्टुडिओ ह्या दोन ठिकाणीं डॉक्टर आपल्या सोयी सवडीप्रमाणें असत. नाटकांइतकाच डॉक्टरांना गप्पांचा विलक्षण षोक. तासचे तास दहापंधरा समवयस्क स्नेह्यांची ती बैठक रंगत असे. डॉक्टरांच्या विलक्षण लोभामुळेंच ही बैठक भरत असे. डॉक्टर त्या बैठकींत क्वचित्च पुढारीपण घेत. बाळासाहेब काळे व प्रल्हादराव औरंगाबादकर ह्यांचे संघर्ष, खटकेबाज संवाद आणि दोघांचें प्रत्युत्पन्न मतित्व व मधून मधून त्यांना चालना देणारे डॉक्टरांचे शेरे वा सूचना हें सर्व त्या बैठकींत घडत असे. येथें वाद, संवाद चाले पण भांडणाची कटुता नसे. ह्याला मुख्य कारण डॉक्टरच ! त्या बैठकीचें अप्रत्यक्ष नियोजन तेच करीत. रसाळपणें खाद्यपेयांचा यथास्थित समाचार हा त्या बैठकींतील स्थायी भाव असे.

डॉक्टर नाशिकला नाटक घेऊन आलें. म्हणजे नाटकाच्या तालमी पासून थिएटरमधील आसनव्यवस्थपर्यंतचे सारे तपशील जातीनें पाहत. तो जणू कांहीं स्वतःच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न समजून ते वागत. तेथें आळस नाहीं, थकवा नाहीं, तहानभूक–झोप ह्यांची पर्वा नाहीं. बैठकींत रंगून सातमजली हास्यानें बैठक दणाणून सोडणारे डॉक्टर निराळे आणि नाटकाची उभारणी करीत असतांना श्रमणारे डॉक्टर निराळे. कांटेकोर शिस्तीनें वागतांना पोटच्या मुलांची दयामाया नाहीं मग इतरांचा पाड काय ? राक्षसालाहि भीतीनें कांपायला लावील असा आवाज डॉक्टरांनीं काढला कीं लहानमोठे सारे गप्प होत आणि काम करूं लागत. डॉक्टरांचा तो रुद्रावतार फार कठीण !

'होनाजी बाळा' ह्या नाटकांतील एका प्रसंगाची तालीम डॉक्टर

घत होते. नटांनीं काय करावें आणि काय करूं नये ह्याबद्दल डॉक्टर अतिशय दक्ष असत. त्याबाबतींत त्यांना थोडासुद्धां चुकारपणा अथवा अत्याचार खपत नसे. मेथा ह्या गुजराथी मुलीला नायिकेची भूमिका दिलेली होती. गाणें आणि नृत्य ह्यांचा विशिष्ठ परिणाम झाला पाहिजे म्हणून डॉक्टर ती तालीम पहात होते. प्रेक्षकांना सवंग चेष्टा करून खूष करणें हा डॉक्टरांचा सवाल नव्हता. नाटककारांपेक्षांहि नाटकाबद्दल अपत्यवत् जिव्हाळा डॉक्टरांनाच अधिक असे. ललिता अमोणकर नृत्याची तालीम देत होती आणि मेथा ती घेत होती. एका विशिष्ट समेवर गाण्याचा शब्द आणि नृत्याचा पदन्यास ह्यांची सांगड झाली पाहिजे असा डॉक्टरांचा कटाक्ष होता. अर्धातास ती तालीम चालू होती. डॉक्टरांना पाहिजे तो क्षण साधेपर्यंत तें घटवून घेणें चालूच होतें. मी एक प्रेक्षक म्हणून त्या मेळाव्यांत बसलों होतों. गाणें आणि नृत्य ह्यांतलें मला कांहींच कळत नव्हतें. पण तेथें जें वातावरण निर्माण होत होतें तें मला खेंचून नेत होतें. असा आनंद उसळत होता कीं त्याचे घुटके घेतांना मन त्यांत दंग होई. नाटकाचें तें वातावरण इतकें प्रभावी होतें कीं क्षणभर मला वाटलें कीं शिक्षकाचा व्यवसाय सोडावा आणि ह्या नाटकाच्या वातावरणांत बुडून जावें. एका झोपाळ्यावर बसून डॉक्टर ती तालीम पहात होते. आणि त्यांना पाहिजे तो (परिणाम) येतांच ते आनंदानें हंसले. तें हास्य आणि ती आनंदी मुद्रा अविस्मरणीय आहेत.

संध्याकाळीं प्रयोगाच्या दिवशीं मी पेठे विद्यालयांत गेलों. माझ्या शरीराला गोलपणा येत चालला आहे ही गोष्ट डॉक्टरांनीं मला हंसत लक्षांत आणून दिली. रात्रीं नाटकाचा प्रयोग पहातांना ठायीं ठायीं डॉक्टरांच्या उत्कट नाटचभक्तीचा प्रत्यय येई–खुणा दिसत. बाळासाहेब काळ्यांनीं परिश्रमपूर्वक बसविलेल्या त्या प्रयोगांत डॉक्टरांची हृद्य साथ बाळासाहेब विसरणार नाहींत आणि मीहि विसरणार नाहीं. प्रयोग, त्याचें सेटिंग, गाणीं, नृत्य हें सारेंच आल्हादकारक होतें.

दिवाळीची सुटी संपली आणि मी नांदगांवला गेलों. १९५५ च्या फेब्रुवारींत मी मुंबईला श्री. खेतमल शेट ह्यांना शाळेच्या कामासाठीं भेटावयास श्री. देशमुख ह्यांच्याबरोबर गेलों. ती भेट झाली आणि देशमुखांना सांगून मी डॉक्टरांना भेटण्यासाठीं गिरगांवांत गेलों. डॉक्टर आजारी आहेत एवढेंच

मला माहीत होते पण त्या आजाराचें स्वरूप इतकें भयंकर असेल ह्याची मला जाणीव नव्हती.

डॉक्टर होते त्या खोलींत मी गेलों. ऑक्सिजन सिलेंडर उशाशीं असून त्यांना तो दिला जात होता. मला पाहून डॉक्टरांनीं पहिला प्रश्न केला "तुझें जेवण झालें ?" मी हो म्हणालों. त्यावर डॉक्टर म्हणाले, "ही तुमची आमची शेवटची भेट. घरांत तुला सर्व सांगतील. मला जास्त बोलायचं नाहीं." तें बोलणें ऐकून मी हतबुद्ध होऊन तेथें बसलों. त्यानंतर दोनतीन दिवस मी मुंबईला राहिलों. एक दिवस संध्याकाळीं डॉक्टरांना एक्सरे तपासणी करतां एका अँब्युलन्समधून नेण्यांत आलें. ते परत आले आणि कांता घुनटकरला सांगू लागले, "गाडींतच air hunger चा attack आला. असं वाटलं येथेंच इतिश्री होणार. पण आलों—घरीं आलों." कांतानें बोलू नकोस असें डॉक्टरांना सांगितलें.

त्या दोनतीन दिवसांत डॉक्टरांना डोळ्यांनीं पाहणें याखेरीज अधिक बोलणें चालणें मंजूरच नव्हतें. नाहीं म्हणायला केव्हांतरी डॉक्टरांचे पाय दाबून देण्याची संधि मिळाली. त्यांच्या यातना त्यांना माहीत !

फेब्रुवारी १९५५ नंतर कसें कुणास ठाऊक पण माझे मुंबईला जाणें घडलें नाहीं. मी नांदगांवहून नाशिकला आलों कीं बाळासाहेब काळ्यांना भेटत असे व डॉक्टरांच्या प्रकृतीची विचारपूस करीत असे. दुखणें कठीण आहे परंतु त्यांत आतां उतार पडत आहे असें कळल्यावरून मी गाफील राहिलों. उन्हाळ्याची सुटी मी नाशिकला घालविली. त्या उन्हाळ्यांत दहा दिवस मी नांदगांवला होतों. शाळेच्या शडला प्लायवूड बसवून घेण्याच्या कामाची देखरेख केली. अशी सुटी संपली. जून महिना उजाडला आणि शाळा सुरू झाली.

२६ ऑगस्ट १९५५ ला सकाळीं ११ च्या सुमारास माझ्या हातीं श्री. प्रभुणे ह्यांची तार पडली. Dr. Bhalerao expired yesterday. त्या तारेनें माझें मन बधीर झालें. मी ती तार घेऊन शाळेंत गेलों. श्री. गोडखिंडी ह्यांना ती तार दाखविली. त्यांनीं सांगितलें तुम्ही काम करूं नका—स्वस्थ बसा. चार तासानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांची दुखवट्याची सभा घेतली. 'लोकसत्ते'त भालेरावांचें अंत्यदर्शन होतें. मी मुलांच्या समोर बोलूं लागलों

आणि माझ्या भावना डोळ्यांतून पाझरूं लागल्या.

काशी एक्स्प्रेसनें मी मुंबईस जाण्यास निघालों. नाशिकरोडला श्री. उपासनी व श्री. मराठे भेटले. बोरीबंदरला पोहोंचल्यावर मी त्यांना विचारलें, "तुम्ही कुठें उतरणार आहांत ?" गिरगांवांत गोखले एज्युकेशन सोसायटीची शाळा हें ठिकाण त्यांनीं सांगितलें. रात्रीं दहा वाजून गेले होते. अशा अपरात्रीं जाऊन त्या घरांत मला पाहून आक्रंदन सुरू करणें इष्ट नाहीं असा विचार करून मी ती रात्र शाळेच्या मुख्याध्यापकाच्या कार्यालयांत काढली. सकाळीं उठून डॉक्टरांच्या घरीं गेलों.

प्रथमच बाळ–डॉक्टरांचा एकुलता एक मुलगा भेटला. त्याच्याजवळ बसून मी माझें दु:ख हलकें करण्याचा प्रयत्न केला. नंतर बयो–आमची बहीण आणि वहिनींच्या समोर बसलों. हताश होऊन त्यांचें अनिवार्य दु:ख पाहण्याव्यतिरिक्त त्याचें समाधान करण्याला माझ्याजवळ शब्द नव्हते.

डॉक्टरांच्या निधनानंतर वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून आलेले लेख आणि वहिनींना आलेलीं दुखवट्याचीं पत्रें मी वाचलीं. त्या पत्रांतून डॉक्टरांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचें जें दर्शन घडलें तें जितकें अभिमानास्पद तितकेंच दु:खाला भरती आणणारें होतें. बापू नाईक, अनंत वर्तक, दाजी भाटवडेकर, पांगे, शिवा, अंध्रुटकर ह्या सर्वांना डॉक्टरांनीं ज्या जिव्हाळ्यानें वागविलें त्यांचें दु:ख अपार होतें. आपली आई जावी म्हणजे जशीं मुलें रडतात–आकांत करतात तसें दु:ख करतांना मी ह्या सर्वांना पाहिलें.

जगण्यासारखें पुष्कळ जवळ असतांना डॉक्टर मरणाच्या मैदानांतून गेले. मराठी नाटकाचा ध्वज भारताच्या राजधानींत–दिल्लींत फडकवीत असतांना जखमी होऊन आमचा हा शूर धीर नेता धारातीर्थी पडला. मराठी रंगभूमि आणि मराठी भाषा ह्यांसाठीं त्यांनीं काय केलें नाहीं ? गर्भश्रीमंत असलेल्या ह्या मुलानें आपल्या भाषेसाठीं आणि आपल्या नाटकांसाठीं स्वत.चें बलिदान केलें. मराठी मन आणि मराठी मनगट कोणतें कर्तृत्व करूं शकते ह्याचा दिमाख महाराष्ट्राच्या राजधानींत–मुंबईमध्यें संघमंदिर उभारून त्यानें कोट्याधीशांना चकित केलें.

डॉक्टर भालेराव ह्या महान् व्यक्तित्वाचा विकास शब्दांकित करण्याचा माझा संकल्प अपुरा आहे. डॉक्टर केवळ माझे भाऊ एवढाच त्यांचा माझा

संबंध नव्हेता. त्यांनीं व मी जे एकत्र विचार केले-जें सहकार्य केलें. ज्ञानाच्या मार्गाची उपासना करण्यास ज्यानें मला शिकविलें आणि माझें मन जाणून मला वेळोवेळीं जें प्रोत्साहन दिलें-मजवर जी मनापासून माया केली तो माझा साथी,-माझा सहकारी - माझा मार्गदर्शक गुरु आतां इहलोकांत नाहीं ही जाणीव करून घ्यायला मन स्पष्ट नकार देते आणि टाहो फोडून सांगते, " डॉक्टर भालेराव अमर झाले ! "

● ● ●

## लेखांक एकूणसाठावा

# नांदगांवीं दोन वर्षें

"डॉक्टर भालेराव अमर झाले" ह्या माझ्या मनाच्या आक्रंदनाचा अर्थ मला हळहळू कळूं लागला. 'भाऊबंदकी' हें मराठी नाटक भारतीय १४ भाषांच्या प्रयोगस्पर्धेंत सर्वश्रेष्ठ ठरलें. भालेरावांच्या कर्तृत्वाचा तो परमोत्कर्ष बिंदू होय. जानेवारीं महिन्यांत मुंबई मराठी साहित्य-संघांत एक समारंभ झाला. त्यावेळीं डॉक्टर भालेराव 'मानाचें पान' घेण्यास हजर राहिले तें त्यांचें शेवटचें सार्वजनिक दर्शन होय. पुढील आठ महिन्यांत त्यांची प्रकृति विश्वास धरण्याइतकी सुधारली नाहींच. मुंबईचे सर्व प्रख्यात धन्वंतरी अहोरात्र आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होते. त्या विलक्षण दुखण्यांतील यातना असह्य होत खालचा ओठ दांतांनीं आवळून धरल्या-मुळें दांतांचे वण त्या ओठावर पडले. शेवटचा श्वास सोडीपर्यंत एकच ध्यास म्हणजे संघ आणि संघाचें कार्य. संघमंदिर हें एक सांस्कृतिक केन्द्र व्हावें आणि ह्या ना त्या कारणासाठीं माणसें तेथें कार्यतत्पर असावींत, नव्या नव्या कल्पनांचे प्रयोग तेथें होत रहावेत हा एकच हव्यास असावा असें डॉक्टरांना वाटत असे. संघाच्या कार्यकर्त्यांनीं संघमंदिराचा शिलान्यास माननीय चिंतामणराव देशमुखांच्या शुभ हस्तें मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या उपस्थितींत घडविला. त्याला मी हजर राहिलों.

नांदगांवच्या दोन वर्षांत नाट्यविषयक कार्य म्हणून विशेष झालें नाहीं. १९५६ च्या मार्चमध्यें नाशिकच्या यशवंत व्यायाम शाळेनें नाट्य-

निकेतनचे चार प्रयोग घेतले. ' राधामाई ' आणि ' धाकटी आई ' ह्या दोन प्रयोगांत ज्योत्स्नाबाईंच्या उत्कृष्ट भूमिका पहावयास मिळाल्या. ज्योत्स्नाबाईंनीं स्टॅनिस्लव्हिस्की वाचला नसेल पण त्याचे मंत्र त्यांच्या अंगांत पुरेपूर बाणले होते. प्रयोग उत्कृष्ट पण प्रेक्षक नाहींत. प्रेक्षक नाहींत म्हणजे उत्पन्न नाहीं. दोन प्रयोग झाले आणि व्यायाम शाळेच्या चालकांनीं जाहीर झालेले नंतरचे प्रयोग बंद करावे असा विचार चालविला. जाहीर झालेले प्रयोग बंद करण्यांत केवळ नाटयव्यवसायिकांचें नुकसान होतें असें नाहीं तर एक अनिष्ट प्रथा सुरू होणार होती. म्हणून मी त्या बैठकींत जाहीर झालेले प्रयोग झाले पाहिजेत असा आग्रह धरला. प्रथा अशी पडली असती कीं एखाद्या सार्वजनिक संस्थेनें प्रयोग जाहीर करावा आणि आयत्या वेळीं उत्पन्न नाहीं म्हणून तो बंद करावा. कोणता नाटयव्यवसायी ही प्रथा मान्य करील ? हे प्रयोग मालेगांव येथें झाले व मी ते चार दिवस भय्यासाहेब प्रभुणे ह्यांच्या घरीं जाऊन राहिलों. ७ मार्च आणि १५ मार्च ह्या तारखांना उद्देशून गणपतराव जोशी बापूराव पेंढारकर ह्यांच्याबद्दल आदर व्यक्त करणारे दोन लेख मी लिहिले व ते ' गांवकरी 'मध्यें छापून आले.

प्राथमिक शाळांच्या नाटयस्पर्धांचा पंच म्हणून तीं दोन वर्षें मी काम केलें. नांदगांवपासून जवळच असलेल्या जातेगांव बुद्रुक या खेडयांत नाटकाचे पडदे आणि इतर सामान असल्याचें आढळून आलें. प्राथमिक शिक्षकांना ह्या स्पर्धेत भाग घेण्यासाठीं फार त्रास सहन करावा लागतो—कांहीं वेळां आर्थिक झीज सोसावी लागते. नांदगांवच्या शाळेतर्फे स्पर्धेत भाग घेतला आणि प्रयोगाची तयारी पाहून मी अस्वस्थ झालों. दुसऱ्या दिवशीं तारेनें प्रयोग रद्द केल्याचें कळविलें.

नांदगांवांत नाटकें करणारा एक क्लब आहे हें कळल्यावर ' सत्त्वपरीक्षा ' ह्या नाटकाच्या तालमी कांहीं दिवस मी घेतल्या. गणपतराव् शिंदे, आर. डी. धामणे, अप्पा जोशी, दिपुशेट कासलीवाल, बद्रीशेठ गुप्ता आणि मी स्वत: असा आमचा नटसंच तयार झाला. माझें दिग्दर्शन आणि नाटक समजावून सांगणें ह्यांचा ह्या सर्वांच्या मनावर चांगला परिणाम झाला. प्रत्यक्ष प्रयोग झाला नाहीं पण ह्या सर्वांचा स्नेह मिळाला.

नांदगांव येथें माझ्या कांहीं विद्यार्थ्यांच्या आग्रहासाठीं मी एक सप्ताह व्याख्यानमाला चालविली. महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार ह्यांनीं

त्या व्याख्यानमालेचें उद्घाटन केलें. मी 'मराठी रंगभूमि' ह्या विषयावर दोन दिवस बोललों.

डॉक्टर दांडेकर ह्यांचा परिचय आणि सहवास मला तेथें लाभला. नाट्याचा शारीरिक प्रक्रियेच्या दृष्टीनें विचार अशी कांहीं चर्चा मी त्यांच्याशीं केली. हास्य आणि हुंदका दोघांचें उगमस्थान पोट हेंच आहे. पोटांतील स्नायूंची विशिष्ट पद्धतीनें हालचाल साधली तर हंसणें किंवा रडणें हुकमी साधेल असा माझा दावा आहे. नटाचा आवाज कंठांतून निघाला तर त्याला वजन येत नाहीं. तोच आवाज पोटांतून निघणें म्हणजे कष्ट आहेत. परंतु नटानें ते कष्ट बिनतक्रार केले पाहिजेत. असे कांहीं विचार त्या मुलाखतींतून माझ्या मनांत आले.

१९५५ ची पहिली सहामाही संपतांना चांदोरे येथें एक श्रमदान शिबीर शाळेंतील बालवीरांसाठीं घेतलें. ज्या गांवांत जाण्यास अधिकृत सार्वजनिक रस्ता नाहीं असें हें चमत्कारिक गांव आहे. एक रात्र तेथल्या प्राथमिक शाळेंत आम्ही मुक्काम केला. गांवकऱ्यांना मनोरंजनाचा कार्य क्रम म्हणून बालवीरांनीं 'बालवीर' ह्या नाटिकेचा प्रयोग केला. ठिपसे नांवाचा विद्यार्थी प्रेक्षकांवर आपल्या नाट्यानें जी हुकमत गाजवीत असे ती पाहून मी चकित झालों. तें नाट्य उत्स्फूर्त होतें. ३००–३५० शेतकरी स्त्रीपुरुष आनंदानें दिवसभराच्या कामाचा शीण विसरून त्या नाट्याचा आस्वाद घेत होते.

प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या शाळेच्या स्नेह-संमेलनांत मी एक लहानसा नाट्यविषयक प्रयोग केला. मोरोपंतांच्या आर्यांत अनेक नाट्यप्रसंग संवाद रूपानें लिहिलेले आढळतात. कर्ण आणि शल्य ह्यांचा संवाद बसविला जावा असें मी सुचविलें. मुक्तछंदाप्रमाणें योग्य-पद्धतीनें म्हटला गेलेला तो संवाद लोकांना आवडला. स्नेहसंमेलनासाठीं मनोरंजनाचा कार्यक्रम जुळविणें ही एक शिक्षकांची कायम डोकेदुखी आहे. पूर्वीं वेणीसंहार नाटकांतील अश्वत्थामा आणि कर्ण ह्यांचा संवाद संस्कृत भाषेंत म्हटला जात असे व तो अतिशय लोकप्रिय होत असे. मोरोपंतांच्या आर्यांचा केवळ नाट्यदृष्ट्या विचार करून एक संग्रह प्रसिद्ध झाल्यास शाळेच्या शिक्षकांवर तो उपकारच होईल. विद्यार्थ्यांची भाषा त्या पाठांतरानें समृद्ध होईल. १९५६ च्या जूनमध्यें मी नासिकरोड येथें मुख्याध्यापक म्हणून रुजू झालों.

● ● ●

लेखांक साठावा

# पहिलेंवहिलें शालेय नाट्य-शिबीर

कल्याण आणि कसारा ह्या दीडतासाच्या रेल्वे प्रवासांत एका लहान स्टेशनवर वीजेवर चालणारी आमची गाडी थांबली. लोक बोलूं लागले कीं गाडीचा बराच वेळ येथें मुक्काम होणार. मी डब्यांतून उतरलों आणि एंजीनच्या दिशेनें जाऊं लागलों. प्रत्यक्ष एंजीनजवळ भाऊ प्रभुणे उभा होता. नंतर कळलें कीं तोच आमच्या गाडीचा सारथी आहे. त्या एंजीनजवळच आमच्या नाटकाच्या गप्पा सुरू झाल्या. 'मराठी नाटकांतील लोकभूमिकेचा आविष्कार' या नांवाचा एक लेख मी लिहिला होता. त्या लेखाचा आशय मी सांगितला. कल्याणला त्या विषयावर मी व्याख्यान द्यावें असें निमंत्रण भाऊनें दिलें. ही मुलाखत केव्हांतरी उन्हाळयांत झाली आणि प्रत्यक्ष व्याख्यानाचा दिवस ठरला तो पावसाळयांत ऑगस्ट अखेर.

ठरलेल्या दिवशीं मी कल्याणला काशीएक्सप्रेसनें गेलों. रात्रीं ८ ला पै बिल्डिंगमध्यें भाऊ प्रभुणे ह्याच्या बिऱ्हाडीं मी पोहोंचलों. त्याच्या लहान मुलीनें आमचें स्वागत केलें. आई आणि वडील दोघेहि नाट्यवर्गाला गेलीं आहेत. थोड्या वेळानें येतील असें तिनें सांगितलें. मी वाट पाहात बसलों.

थोड्या वेळानें दुरून येणाऱ्या व्यक्तींचीं बोलणीं ऐकूं येऊं लागली, भाऊ, त्याची पत्नी आणि प्रभाकर गुप्ते असे तिघेजण आले. 'अंमलदार' नाटकाचा पुण्यास स्पर्धेसाठीं आम्ही प्रयोग केला त्यावेळीं सुरुवातीला आमचें यशश्चिंतन करून घाईघाईनें निघून गेलेले तेच हे प्रभाकर गुप्ते. १९४१ व

१९४३ मध्यें नटवर्य केशवराव दाते ह्यांच्या प्रतापरावाच्या स्वागताची पार्श्वभूमि सांगणारे तेच हे प्रभाकर गुप्ते. महाराष्ट्र नाट्य विद्यालयाचे संचालक आणि भावी कालांत घडणाऱ्या कांहीं नाट्यविषयक घटनांचे प्रणेते तेच हे प्रभाकर गुप्ते.

ह्यापूर्वीं श्री. गुप्ते ह्यांचा व माझा परिचय कांहींसा तांत्रिक होता. व्याख्यानासाठीं मी त्यांच्याबरोबर ३६ तास राहिलों. त्यामुळें तो परिचय खूपच वाढला. व्याख्यान नगरपालिकेच्या सभागृहांत श्री. गुप्ते ह्यांच्याच अध्यक्षतेखालीं झाले. श्रोत्यांची संख्या ५० पेक्षां अधिक नव्हती.

त्या दोन दिवसांच्या एकत्र सहवासांत श्री गुप्ते ह्यांच्याबरोबर जी. नाट्यविषयक चर्चा झाली तींतून "शालेय नाट्य-शिबीर" ही कल्पना उदयाला आली. पहिलें शालेय नाट्य-शिबीर माझ्याच शाळेंत घेण्याची विनंती मी गुप्ते ह्यांना केली. पत्रव्यवहारानें शिबिराच्या तारखा ठरल्या. ४ नोव्हेंबर १९५९ ते १३ नोव्हेंबर १९५९ असा दहा दिवसांचा कार्यक्रम आंखला. ३ नोव्हेंबरला रात्रीं १०॥ वाजतां श्री. गुप्ते आपले सहकारी श्री. चिंचवडे ह्यांच्यासह शाळेंत येऊन दाखल झाले.

हें शिबीर कोरडें म्हणजे जेवणाची सोय नसलेले होतें. शिबिराचे विद्यार्थी सकाळीं ७ ते १० व दुपारीं २ ते ७ शिबिरांत असत. त्यांची उपस्थिति ऐच्छिक असल्यानें ते वक्तशीर येत व न कंटाळतां अध्यापनाकडे लक्ष देत. गोविंद कवींच्या 'नमनें वाहुनी स्तवनें उधळा' ह्या शारदास्तवनानें रोजच्या कार्यक्रमाचा प्रारंभ होई. शिबिरांत १९ विद्यार्थी व ६ विद्यार्थिनी मिळून २५ जण होते. श्री. चिंचवडे १० दिवस शिबिरांत होते. भाऊ प्रभुणे आणि चंद्रकांत प्रधान येऊन जाऊन असत.

मानसिक विकासाचें प्रभावी साधन म्हणून कला किती सामर्थ्यशाली असते. ह्याचें प्रत्यंतर पहिल्याच बैठकींत मिळालें. प्रयोगशाळेंत हा वर्ग भरला. तेथून पश्चिमेच्या बाजूला पसरलेला शाळेचा चौथरा दिसतो. श्री. गुप्ते त्या चौथऱ्याकडे बोट दाखवून म्हणत, "ती रंगभूमि दूर आहे. आपण ह्या रंगभूमीचा विचार करावयाचा आहे." ह्या प्रस्तावनेनंतर विद्यार्थ्यांची संवेदनक्षमता अजमावण्यासाठीं श्री. गुप्ते ह्यांनीं एक चर्चा सुरू केली. चर्चेंत दोन मुद्दे होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



अनुक्रम.................. वि: ..................

शिवाजी महाराज धारातीर्थी पडलेल्या आपल्या मित्राला—तानाजीला पाहतात. लढणाऱ्या सैन्यांतील एक मावळा ह्या नात्यानें आपण काय करावें ? वर्गात सहसा न बोलणारे विद्यार्थी ह्या चर्चेत उत्सुकतेनें भाग घेऊं लागले. एका मुलानें दिलेलें उत्तर हा एक सभ्यतेचा नीतिपाठ होता. तो म्हणाला, "शिवाजी महाराजांपासून तोंड बाजूला वळवून आपण उभें राहूं." असें कां असा प्रश्न केला तेव्हां तो म्हणाला, "महाराजांचा आवडता मित्र गेला. मोठ्यांचं दुःख आपण कसं पहावं ?" त्या मुलाच्या थोर संस्कृतीचा केवढा दिव्य आविष्कार त्या प्रश्नांत व्यक्त झाला हें शिक्षकालाच कळेल.

चर्चा चालू असतां शिंदे नांवाच्या विद्यार्थ्यानें दिलेलें उत्तर थक्क करणारें आहे. वर्गाचें निरीक्षण करीत असतांना श्री. गुप्ते ह्यांच्या लक्षांत आलें कीं हा विद्यार्थी भावनेनें भारला जात आहे. त्यांनीं त्याला जवळ बोलावलें व प्रश्न केला, "शिंदे, तुला काय काय दिसत आहे ?" त्या मुलानें सगळा देखावा वर्णन केला. तानाजी मरून पडला आहे. मावळे त्याच्याभोंवतीं शोक करीत उभे आहेत. पुन्हां प्रश्न. "शिंदे, शेलार मामा कुठें आहेत ?" क्षणाचाहि विलंब न लावतां त्या भारावलेल्या विद्यार्थ्यानें उत्तर दिलें, "चरणापाशीं !" त्या उत्तराची चर्चा सुरू झाली. पायापाशीं कां—डोक्यापाशीं कां नाहीं. ह्या प्रश्नाला शिंदे ह्यानें उत्तर दिलें, "तानाजी महाराज लढतां लढतां रणांगणावर मरून पडले. रणांगणावर मरण येणारीं माणसें देव होतात." एवढें सांगून शिंदे ह्यानेंच प्रश्न केला, "आपण देवाच्या पायाशीं बसतों कीं डोक्यापाशीं ?" तो प्रश्न ऐकून स्वतः गुप्ते एक क्षणभर स्तब्ध झाले. शालेय नाटक—शिबिराचा त्यांचा हा पहिलाच अनुभव होता. आणि तो थरारून टाकणारा होता. श्री. गुप्ते ह्यांनीं त्या अनुभवाची नोंद करून घेतली.

५ नोव्हेंबर हा रंगभूमीदिन म्हणून शिबिरांत साजरा केला. श्री. केशवराव दाते ह्यांनीं शिबिराला भेट देऊन त्या नव्या उपक्रमाला आशीर्वाद द्यावा म्हणून आम्ही पुष्कळ प्रात्न केले. ते येऊं शकले नाहींत. प्रा. श्री. आंबेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं समारंभ झाला. भाऊ प्रभुणे ह्यानें 'महाराष्ट्र नाट्य विद्यालयाचें' कार्य फार प्रभावी भाषण करून सांगितलें. सांगली येथें सोळा वर्षांपूर्वी परिश्रमपूर्वक साजरा केलेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांव-

त्सरिक महोत्सवाची आठवण होणें अपरिहार्य होतें. श्री. केशवराव दाते ह्यांचा परिचय त्यांच्या गैरहजेरींत करून देणारें भावनापूर्ण भाषण मजकडून झालें. कंठ दाटून आला. डोळे अश्रूंनीं डबडबले. माझी ती गुरुपूजा पहाणाऱ्या विद्यार्थ्यांना एका उज्ज्वल परंपरेचा परिचय त्या कार्यक्रमामुळें झाला.

श्री. गुप्ते ह्यांनीं विषयाची स्पष्ट समज विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून आकृत्या, चित्रें, आराखडे ह्यांचें एक प्रदर्शन चित्रकला वर्गात मांडलें. त्यांत मुख्यतः नाट्याभ्यासाच्या अनेक Teaching aids अध्यापन उपकरणीं होतीं. नाट्य शिबिराला भेट देणाऱ्या अनेकांनीं तें प्रदर्शन पाहिलें व त्याची शिफारस केली. त्या शिबिरांत दुपारीं ४ ते ६ " शब्दरहित नाट्य " असा एक अभिनव प्रयोग मी पाहिला. प्रत्येक विद्यार्थ्यानें त्यांत भाग घेतलाच पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी आपण कोणता प्रसंग करणार ह्याचें लेखी टिपण करतो. त्या प्रसंगांतील हालचाली, आविर्भाव न बोलतां व्यक्त करण्याचा तो प्रयत्न करतो. त्याच वेळीं इतर सर्व विद्यार्थी निरीक्षण करीत असतात. तो प्रसंग झाल्यानंतर त्यावर गुणदोषदृष्टचा चर्चा होते. विद्यार्थ्यांच्या सृजन-शक्तीला (Creative Power) व विचारशक्तीला (Thinking power) त्या प्रयोगानें फार मोठें प्रोत्साहन मिळतें असें दिसून आलें.

सायंकाळीं ६ ते ७ त्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून दररोज एक व्याख्यान होत असे. त्या व्याख्यानांना शाळेंतील कांहीं शिक्षक व थोडसे नागरिक नियमानें येत असत. ‘ रंगभूमि ’ ह्या विषयाला पोषक व पूरक अशींच हीं व्याख्यानें असत. व्याख्यानाचीं टिपणें प्रत्येक विद्यार्थी त्याला दिलेल्या वहींत लिहीत असे. वर्ग चालत असे त्याहि वेळीं विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या मुद्याचीं टिपणें करून घेण्याची संवय लावली होती. त्या दहा दिवसांत विद्यार्थ्यांनीं जेवढें लेखन केलें तेवढें निबंधरूपानें एका शालेय वर्षांत त्यांच्याकडून होत नसे. त्या व्याख्यानमालेंतील वक्ते तालेवार आहेत. प्रा. श्री. आंबेकर, श्री. कुसुमाग्रज, डॉ. वसंतराव गुप्ते, श्री. यशवंत हडप, बापूसाहेब काळसेकर, श्री. य. र. प्रभुणे, श्री. चंद्रकांत प्रधान, प्रा. श्री. एम्. बी. कुलकर्णी आणि मी स्वतः अशा नऊ जणांनीं दहा व्याख्यानें दिलीं. त्यांत प्रा. श्री. आंबेकर दोन दिवस बोलले. ‘रंगभूमीचा इतिहास’ अत्यंत मनोरंजक पद्धतीनें त्यांनीं सांगितला.

ह्या दहा दिवसांत एके दिवशीं पूर्वसूचना आणि अनुज्ञा घेऊन नासिक-रोड येथील नाट्यप्रेमी जेल कामगारांची मुलाखत श्री. गुप्ते ह्यांनीं घेतली मी व चिंचवडे बरोबर होतों. वर्षांतून एखादा नाट्यप्रयोग ते कामगार तुरुंगाच्या आवारांत करतात. दिग्दर्शन व इतर तंत्र त्यांना फारसें अवगत नसतें. एकानें सांगायचें व दुसऱ्यानें म्हणायचे हीच पद्धत सर्रास अवलंबिली जाते. सामाजिक नाटकापेक्षां ऐतिहासिक नाटक ते अधिक पसंत करतात. चालू असलेल्या चर्चेंत एका कामगारानें प्रश्न केला. बेबंदशाही नाटकांतील संभाजीचें शेवटचें स्वगत कसें म्हणावयाचें ? प्रश्न अशासाठीं कीं राजा म्हणजे काय हें आपल्याला माहीत नाहीं. त्या प्रश्नाची चर्चा करतांना श्री. गुप्ते ह्यांनीं एक प्रात्यक्षिक करून दाखविलें. तें करतांना त्या कामगार वस्तींत घडलेल्या एका अपघाताची माहिती आम्हांला कळली तिचा त्यांनीं कुशलतेनें उपयोग केला. काथ्याच्या पाळण्यांत झोपलेलें तान्हें मूल खालीं ठेवलेल्या शेगडीची आंच काथ्याला लागून शेगडींत पडलें व भाजून गतप्राण झालें. एका कामगाराचें मूल जाणें व एका राजाचें राज्य जाणें ह्या घटनांचें दुःख व तीव्रता त्या त्या व्यक्तीला सारखीच आहे. श्री. गुप्ते ह्यांनीं नाट्यप्रसंग कसा रचावा व कसा रंगवावा ह्याचें जें प्रात्यक्षिक करून दाखविलें त्यावरून त्यांच्या व्यासंगाची व दिग्दर्शनकौशल्याची फारच चांगली कल्पना आली. ती मुलाखत होत असतांना त्या कामगारांच्या चेहऱ्यावरचे भाव ज्या उत्कटतेनें पालटत होते ते पहातांना मी विस्मयचकित झालों. ती मुलाखत नाट्यदृष्टया महत्त्वाची झाली. श्री. चिंचवडे–गुप्ते ह्यांचे विद्यार्थी व सहकारी. एक कामगारच आहेत. नाट्यभक्तीची त्यांनीं केलेली कठोर साधना त्यांच्या हॅम्लेटच्या प्रात्यक्षिकांत दिसून आली.

त्या दहा दिवसांत मी नाटक जगत होतों असें म्हणणें अतिशयोक्तीचें नव्हे. अनेक विषयांची चर्चा झाली. नाट्याचार्य खाडीलकर ह्यांच्या नाटकांचे प्रयोग करून प्रत्येक वर्षीं खाडीलकर नाट्य–सप्ताह साजरा करावा असाहि एक विषय आला. त्यासाठीं मुंबई, पुणें, नाशिक व नगर अशा चार केंद्रांचा विचार झाला. "मन ताल देतें" ह्या लहानशा वाक्यांत एका विद्यार्थिनीनें व्यक्त केलेला विचार प्रत्यक्षांत यावा म्हणून मी प्रयत्न करीत आहे. जेथें जेथें सौंदर्य व्यक्त होईल–मग तें जाणण्याचें माध्यम डोळा, कान, नाक, जिव्हा

अथवा त्वचा ह्यांपैकीं कांहींहि असो—त्या सौंदर्याला मनानें ताल देणें म्हणजेच जीवन विकास असा माझा ठाम ग्रह झाला. कोणत्याहि अवस्थेंत मन बेताल होतां कामा नये हेंच नाटचशिक्षणाचें खरेंखुरें उद्दिष्ट आहे.

ह्या पहिल्यावहिल्या नाटचशिबिरानें तीन नाटच भक्त विद्यार्थी कार्यकर्ते तयार केले. सुधाकर बर्वे, जगन्नाथ बर्वे, पद्माकर कांबळे ह्यांची कार्यक्षमता आश्चर्यकारक आहे.

● ● ●

## लेखांक
## अेकसष्टावा

# खुलें नाट्य-गृह

" **ती** रंगभूमि दूर आहे. " ह्या वाक्याचा उच्चार श्री. प्रभाकर गुप्ते वारंवार करीत. योगायोग म्हणा कीं अन्य कांहीं म्हणा पण ज्या ओटचाकडे पाहून श्री. गुप्ते अंगुली निर्देश करीत त्याच ४०x६५ फुटांच्या ओटचावर तीन महिन्यांच्या आंत खुलें नाटचगृह उभें राहिलें. नासिकरोड–देवळाली नगरपालिकेचें रु १५००० चें अनुदान मिळविण्याच्या प्रयत्नांना यश आलें. माझ्या शाळेंतील सर्वच शिक्षकांचें हें सामुदायिक यश आहे. २६ जानेवारीं १९६० ला खुल्या नाटचगृहाच्या बांधकामाचा मुहूर्त केला आणि २३ एप्रिल १९६० रोजीं प्रा. श्री. न. र. फाटक ह्यांच्या शुभ हस्तें खुल्या नाटचगृहाचें उद्‌घाटन रात्रीं ९ वाजतां झालें. ह्या खुल्या नाटचगृहाचें नांव "नासिकरोड-देवळाली नगरपालिकचें पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल खुलें नाटचगृह" वरच्या कपाळपट्टीवर कोरण्यांत आलें आहे.

२३ एप्रिल ते ३० एप्रिल हा आठवडा 'महाराष्ट्र राज्य समारोह' सप्ताह म्हणून शाळेनें उत्सव केला. ह्या सप्ताहांत विविध कार्यक्रम झाले. २३ एप्रिलला प्रथम उद्‌घाटनाचें भाषण झाल्यावर 'बोहाडा' ह्या नांवानें खेडचांतून ओळखला जाणारा लोकनाटचाचा प्रकार नमुना म्हणून करून दाखविण्यात आला. प्रथम गणपति सरस्वती ह्यांचें नृत्य व वीरभद्र आणि दक्ष ह्यांचें युद्ध दाखविण्यांत आलें वीरभद्राचा अवजड टोप घालून स्टेजवर नाचणें, ताकदीचें आणि कौशल्याचें काम आहे. शाळेचा माजी विद्यार्थी आणि

विद्यार्थी–प्रमुख खंडू भागवत ह्यानें वीरभद्र नाचविला. नासिकरोड–देवळाली ह्या भागांत वीरभद्र सजणारीं दोनतीनच माणसें आहेत आणि त्यांचे तट आहेत ही माहिती मिळाली.

नाटकांतील कांहीं प्रवेश त्या रात्रीं केले. त्यांत 'एकच प्याल्यां'तील सुधाकराचें बंडगार्डनमधील स्वगत मी म्हणून दाखविलें. "दुर्दैवाचे दशावतार पहाण्याची आतां माझ्यात ताकद नाहीं." येथपासून सुरुवात करून "आतां ह्यापुढें एक दारु, प्राण जाईपर्यंत दारु, अखेरपर्यंत दारु." हें स्वगत म्हणतांना गेलीं चाळीस वर्षें माझ्यासमोर उभीं राहिलीं. फर्ग्युसन कॉलेजच्या अँफी थिएटरमध्यें ऐन तारुण्याच्या मस्तींत मी तें स्वगत म्हटलें आणि आतां साठीच्या उंबरठ्यावर उभा असतांना मी तेंच स्वगत म्हणत होतों. पहायला आणि ऐकायला प्रा. श्री न. र. फाटक, श्री. वसंत शांताराम देसाई सौ. हिराबाई बडोदेकर अशीं नाट्यक्षेत्रांतील मातब्बर माणसें बसलीं होतीं. तो एक माझ्या भावनेचा मानबिंदु होता. आयुष्यभर नाटकाचा हव्यास मी बाळगला त्याची फलश्रुति होती. असें भव्य खुलें नाट्यगृह उभारलें जाण्याला अंशत: का होईना, आपले परिश्रम कारण होतील असें स्वप्नांतहि मला कधीं वाटलें नाहीं. परंतु सत्य कल्पनेवरहि कांहीं वेळां विलक्षणपणांत ताण करतें हेंच खरें! हिराबाईंनीं माझ्या एका स्नेह्याला प्रश्न केला, "मास्तरांनीं हें पाठ केव्हां केलं?" प्रश्न अनुत्तरितच राहिला. रामराज्यवियोग या नाटकांतील कैकेयी अणि मंथरा हा प्रवेश मिसेस् गोखले व मिस् कुलकर्णी ह्या दोघी शिक्षिकांनीं केला. त्या रात्रीं ठीक बारा वाजतां हिराबाईंनीं 'वंदे-मातरम्' हें राष्ट्रगीत म्हटलें. १५ ऑगस्ट १९४७ला दिल्ली येथें स्वातंत्र्याचा जयजयकार होत असतांना ज्यांनीं तें राष्ट्रगीत साऱ्या भारताला आणि भारता-बाहेरच्या साऱ्या विश्वाला ऐकविलें त्याच गायिका हिराबाई शाळेच्या नाट्य-गृहांत उभ्या राहून तेंच राष्ट्रगीत त्या मध्यरात्रीं म्हणत आहेत हा अनुभव माझ्यापुरता तरी चित्तथरारक झाला.

त्या आठ दिवसांत खूप भरगच्च कार्यक्रम आंखलेला होता. महामहो-पाध्याय दादा पोतदार 'महाराष्ट्राची वाटचाल' ह्या विषयावर दीड तास बोलले. इतिहासाचें सखोल ज्ञान तर होतेंच पण महाराष्ट्राच्या भविष्यकाला-विषयींची विलक्षण तळमळ हा माझ्या दृष्टीनें त्या भाषणाचा विशेष होता.

मंत्रमुग्ध झालेल्या सर्व श्रोत्यांनीं भाषण ऐकून तृप्तीचा ढेकर दिला. त्या सप्ताहांतील आणखी एक व्याख्यान म्हणजे डॉ. नरेश कवडी ह्या तरुण संशोधकाचें. "लोकगीतें, अुद्गम आणि विकास" ह्या विषयाची व्यासंगपूर्ण चर्चा त्यांनीं केली.

"गाजलेलीं नाट्यगीतें" हा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आंखला व यशस्वी रीतीनें पार पाडला. श्री. गणपतराव मोहिते–अविनाश–ह्यांनीं ह्या कार्यक्रमाचें नेतृत्व स्वीकारलें. मास्टर दीनानाथ ह्यांची शागीर्दी सार्थ करून दाखविली. सौ. लिमये – महाराष्ट्र नाट्य विद्यालयाच्या सेक्रेटरी व सौ. केळकर ह्या दोन स्त्रिया ह्या कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं पुण्याहून आल्या व त्यांनीं नाटकांतील पदें म्हटलीं. सौ. केळकर ह्यांची तयारी स्वतंत्र कार्यक्रम करण्याइतकी आहे असें आढळून आलें.

शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनीं एकाच रात्रीं दोन नाट्यप्रयोग केले. 'पांचाली' ही नानासाहेब गोखले ह्यांची नाटिका नाट्यशिबिराच्या विद्यार्थिनींनीं केली. त्यांत पुष्पा करवा, निशा वैद्य इत्यादि विद्यार्थिनी होत्या. श्री. ठाकरे ह्यांचें "खरा ब्राह्मण" हें नाटक सुधाकर बर्वे, जगन्नाथ बर्वे, पद्माकर कांबळे, गायकवाड ह्या विद्यार्थ्यांनीं केलें. शाळेच्या विद्यार्थिनींनीं स्त्रियांचीं कामें केलीं. श्री. प्रभाकर गुप्ते ४–५ दिवस नाट्यदिग्दर्शन करीत होते. त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले. शाळेंतील प्लॅटफॉर्मचा नवीन उपयोग त्यांनीं ह्या नाट्य–प्रयोगांत करून दाखविला. त्यांच्या कल्पकतेमुळें नाट्यप्रयोगाची सजावट आणि परिणाम उठावदार झाले.

'शिवजयंती' निमित्त नासिकरोड–देवळाली नगरपालिकेनें आंखलेल्या कार्यक्रमांत मिरवणुकींत शाळेनें भाग घेतला. मिरवणुकीचें विसर्जन दुर्गा उद्यानांत झालें व तेथें मी भाषण केलें. शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेविषयीं दादा पोतदार ह्यांनीं जें नवें संशोधन केलें आहे तीच माहिती मी श्रोत्यांना सांगितली.

ह्याच सप्ताहांत शाळेचें वार्षिक स्नेहसंमेलन सुप्रसिद्ध नाट्यटीकाकार श्री. वसंत शांताराम देसाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्या वेळीं 'गडकऱ्यांचीं नाटकें' ह्या विषयाची सखोल चर्चा अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत केली.

सप्ताहाचा समारोप ३० एप्रिल १९६० ला रात्रीं १२ वाजतां झाला महाराष्ट्र राज्याचें शाळेनें स्वागत केलें. श्री. सोपानदेव चौधरी ह्यांनीं महाराष्ट्राच्या गौरवपर कविता म्हटल्या. प्रा. श्री. आंबेकर ह्यांनीं महाराष्ट्र राज्याचें स्वागतपर भाषण केलें. त्या भाषणांत त्यांनीं महाराष्ट्र राज्यापासून निर्माण झालेल्या अपेक्षा आणि सामान्य नागरिकांचीं कर्तव्यें ह्यांचें विवेचन केलें. रात्रीं १२ वाजतां बँड, शाळेची घंटा आणि फटाक्यांचा आवाज ह्यांच्या निनादांत आम्ही महाराष्ट्र राज्याचें सहर्ष स्वागत केलें.

० ० ० ० ० ० ० ० ०

खुलें नाटयगृह बांधलें गेलें. परंतु त्यावर नाटयप्रयोग होत रहाणें ही जबाबदारी ओघानेंच आली. १९६० च्या मे महिन्यांत १३ तारखेपासून १७ तारखेपर्यंत शाळेच्या मदतीसाठीं चार नाटयप्रयोग ठरविले. श्री. रांगणेकर ह्यांच्या नाटय–निकेतनचे तीन प्रयोग आणि श्री. प्रभाकर गुप्ते ह्यांच्या महाराष्ट्र नाटय विद्यालयाचा एक असे चार प्रयोग झाले. गाजलेल्या 'कीचक-वध' ह्या नाटकाचा प्रयोग महाराष्ट्र नाटय विद्यालयानें सादर केला. त्यासाठीं श्री. रांगणेकर ह्यांच्याकडून सामान मिळविलें. वेषभूषा पुण्याहून आणली होती. भाऊ प्रभुणे ह्याची 'कीचका' ची भूमिका कलापूर्ण झाली. श्री. प्रभाकर मुजूमदार भीमाच्या भूमिकेंत प्रभावी वाटले. परंतु शेवटच्या कुस्तींत त्यांच्या गुडघ्याला मार बसला. मिसेस् मोडक ह्यांनीं सैरंध्रीची संयमपूर्ण भूमिका केली. नाटकांतील विनोदाची बाजू यशस्वी रीतीनें सांभाळली गेली.

'माझें घर' ह्या नाटकाचा एक प्रयोग आणि 'पठ्ठे बापूराव' ह्या नाटकाचे दोन प्रयोग–एक नासिकरोडला व दुसरा नासिकला झाले. १७ तारखेला दुपारीं ५ वाजतां खूप मोठें वादळ झालें आणि सीमेंटचे चाळीस पत्रे खालीं पडून कपबशासारखे फुटले. वादळाचा जोर विलक्षण होता.

नाटय–प्रयोगांची भरपूर जाहिरात केली. प्रत्यक्ष घरोघर जाऊन तिकिटें खपविलीं नाहींत. सगळा भर ठेवला तो विद्यार्थी आणि पालक ह्यांच्या शाळेबद्दलच्या सहानुभूतीवर. शाळेला दीड हजारांचें नुकसान सोसावें लागलें एका शिक्षकानें अर्ध्या रात्रीं रुपये एक हजार आणून दिले. ती त्या शिक्षकाची पत होती. त्या निमित्तानें नाटयनिकेतनचे कांहीं पडदे वगैरे नाटकाच्या सामानाचा सौदा केला.

त्या पांच दिवसांत नाटकमंडळी शाळेंतच उतरली होती. त्यांच्या जेवणा–खाण्याची सोय करायची त्यासाठीं प्रल्हाद औरंगाबादकरानें रात्रीं ९ वाजतां एक गुजराथी स्वयंपाकी मिळवून दिला. त्यासाठीं प्रल्हाद रोज संध्या-काळीं येत असे. शाळेचा एक मजला बांधला गेला. खुल्या नाट्यगृहासाठीं रुपये पंधरा हजारांचें अनुदान नगरपालिकेकडून मिळालें. त्या साऱ्या गोष्टींचा त्याला फार अभिमान वाटायचा. "वामन, लोकांना तुझी किंमत कळत नाहीं." ह्या शब्दांत तो अभिमान व्यक्त होई.

श्री. रांगणेकर आणि श्री. दाजी भाटवडेकर ह्या दोघांना 'पठ्ठे बापूराव' ह्या प्रयोगाच्या वेळीं शाळेतर्फें मानपत्रें देऊन शाळेनें त्यांचा गौरव केला. शाळेच्या सर्वच शिक्षकांनीं नमुनेदार सहकार्य दिलें आणि शिक्षक वर्गाच्या एकात्मतेचा प्रत्यय आणून दिला. एक ग्रॅज्युएट शिक्षक रात्रीं कणीक भिजवून पोळ्या करतांना पाहून स्त्रिया थक्क झाल्या व त्यांनीं त्यांच्या हातून लाटणें पोळपाट घेऊन स्वत: पोळ्या केल्या. नाट्यव्यवसायी पाहुण्यांनासुद्धां आमच्या शाळेचें तें वैशिष्ट्य जाणवलें. स्वत: श्री. रांगणेकरांनीं मला त्या अडचणींत अत्यंत सौजन्यानें वागविलें.

० ० ०          ० ० ०          ० ० ०

१९६० च्या जूनमध्यें एक अकल्पित अपघात घडला आणि मी सुन्न झालों. प्रल्हाद औरंगाबादकर आजारी आहे. अत्यवस्थ आहे असें कळलें. मी त्याला भेटायला गेलों. तो त्या आजारानें हैराण झाला होता. तो नुकताच मुंबईला जाऊन आला होता. त्याच्या आजाराचें स्वरूप गंभीर आहे हें कळतांच त्याचे आप्त गोळा झाले. त्याच्या आजाराची काळजी करणें ह्या खेरीज आमच्या हातीं कांहींच नव्हतें. त्याचे जांवई डॉ. चिडगुपकर ह्यांनीं नंतर वर्णन केल्याप्रमाणें प्रल्हाद रोगाच्या डोहांत बुडत होता–क्षणाक्षणाला खालीं खालीं जात होता. त्याचें तें बुडणें असह्यतेनें आम्हांला पहावें लागत होतें. १ जून १९६० ला त्याचा आजार विकोपाला गेला आणि मानवी उपाय निष्फळ ठरून प्रल्हादनें इहलोक सोडला. त्याची जन्मदाती वृद्ध माता दु:ख-विव्हल होऊन त्याच्या उशाशीं बसली. तिनें एकच प्रश्न विचारला, "हें पहाण्यासाठीं मला वांचवलंस कां रे ?" त्या वृद्ध मातेजवळ शोक करण्याचीहि शक्ति उरली नव्हती. तिचे सारे जीवनरस आटून गेले होते.



नटवर्य श्री. नानासाहेब फाटक मराठी नाटकांच्या दिल्लींतील स्वारीचे पराक्रमी सेनापति व राष्ट्राध्यक्ष पदकाचे मानकरी 'भाऊबंदकीं'तील राघोबा.

←



→

महाराष्ट्र नाट्य-मंदिराचे घटनाकार, नाशकांतील पहिले पी. एच्. डी. व लहानमोठ्या कल्पनांचे पुरस्कर्ते माझे स्नेही श्री. बाळासाहेब कानिटकर.

प्रल्हादची दहा वर्षे वयाची मुलगी " दादा, दादा, " असा टाहो फोडून सारखी तडफडत होती. प्रल्हादचा मित्र-परिवार गांवांत आणि गांवाबाहेर मोठ्या प्रमाणांत पसरला होता. त्यांना ती वार्ता कळणें आवश्यक होतें. म्हणून तशाहि स्थितींत मी व श्री. सराफ ' गांवकरी ' कार्यालयांत जाऊन ती बातमी दिली. प्रल्हादचा मोठा मुलगा कलकत्त्याच्या पलीकडे एक कोळशाच्या खाणींत अधिकारी होता. त्याला फोन करून बोलावलें होतें. तो यायला निघाला आहे असें कळलें. तो येईपर्यंत बर्फाच्या लादीवर प्रल्हादचें शव ठेवण्यांत आलें.

२ तारखेला सकाळीं १० वाजल्यानंतर अंत्यसंस्कार झाले. स्मशानांत प्रल्हादविषयीं गुणगौरवपर जीं भाषणें झालीं त्यांत त्याच्या जांवयानें केलेलें भाषण अत्यंत हृदयस्पर्शी झालें. त्या भाषणांतला प्रत्येक शब्द भावनेनें डबडबलेला होता. डॉ. चिडगुपकर-प्रल्हादचे जांवई-सोलापूरहून नाशिकला आले आणि त्या अल्पकालीन दुखण्यांत स्वत:ची तहानभूक विसरून त्यांनीं प्रल्हादसाठीं जें अहोरात्र जागरण केलें त्याला मोल नाहीं. प्रल्हादचा मोठा मुलगा कमलाकर इंग्लंडमध्यें जाऊन खाणीच्या कामाचें शिक्षण घेऊन आला होता. त्या सहा वर्षांचा त्याच्यावर झालेला संस्कार पाहून मी थक्क झालों. सर्व भाषणें झाल्यावर कमलाकर स्वत:ला सांवरून उभा राहिला. आणि हात जोडून एकच वाक्य बोलला, " मी आपल सर्वांचा फार आभारी आहे ! " त्या एकाच वाक्यांत त्यानें आपली कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. त्याच्यावर अक्षरश: कोसळलेल्या त्या अचानक प्रसंगांत तें एक वाक्य बोलण्याचें भान त्याला राहिलें कसें ह्याचें मला राहून राहून नवल वाटतें.

सार्वजनिक वाचनालयांत दुखवट्याची सभा झाली. प्रल्हादला श्रद्धांजलि वहातांना नाशिकमधल्या प्रतिष्ठित नागरिकांनीं जी भावना व्यक्त केली ती ऐकतांना मन सारखें व्यथित होत होतें. दहाबारा दिवसांपूर्वीं आम्हांला हंसविणारा-खेळविणारा प्रल्हाद आतां आमच्यांत नाहीं ही जाणीव स्वीकारायला मन कांहीं केल्या तयारच होईना. १९२७ ते १९६० ह्या तेहतीस वर्षांतला त्याचा सहवास, त्यानें दिलेली सलगी, माझ्या कामांत मला आणि माझ्याप्रमाणेंच अनेकांना त्यानें केलेली सोबत, त्याच्या नेतृत्वाखालीं केलेले ते प्रवास, भालेरावांचा त्याच्यावरचा अनन्य साधारण लोभ,

त्याच्या गप्पांनीं व हास्यविनोदानें उसळणाऱ्या त्या प्रहराप्रहरांच्या मैफली- त्याच्या अचाट बुद्धिमत्तेचे ते विलक्षण उन्मेष, महामहोपाध्याय दादा पोतदार, बाळशास्त्री हरदास आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांना भुरळ पाडणारें त्याचें व्यक्तिमत्व, बालगंधर्व, सवाई गंधर्व, गणपतराव बोडस, मास्तर कृष्णराव, बिसमिल्ला, सितारा अशा अनेक कलावंतांचा त्यानें संपादन केलेला लोभ, उत्कृष्ट गाण्यांच्या अनेक मैफलींचीं त्यानें केलेलीं तीं रसाळ वर्णनें, त्याच्या त्या अनेक आठवणींनीं आम्हां सर्वांना अक्षरशः तो दशांगुळे वर उरला होता. "वामन" म्हणून एकेरी नांवानें हांक मारणारा माझ्या मांडीवर थाप मारण्याचा अधिकार असलेला माझा तो जीवनाभरचा सोबती गेला. मी दीन झालों. प्रल्हादचा तो विचित्र मोठेपणा कळला, पटला तो जन्मभर त्याच्या आठवणींनीं आम्ही रडावें म्हणूनच कीं काय असें वाटलें.

कालपुरुषा, आमच्यापासून अकालीं छिनून नेलेल्या आमच्या त्या मित्राला सद्गति दे !

● ● ●

लेखांक बासष्टावा

# "सोन्याचा कळस" चार प्रयोग!

**ना**मदार डॉ. नरवणे ह्यांच्या हस्तें नासिक येथें 'कलायतन ह्या एका नवीन संस्थेचें उद्घाटन झालें. ३ जुलै १९६० रोजीं हा समारंभ झाला, शुभेच्छा व्यक्त करणारा एक नागरिक म्हणून वक्त्यांच्या यादींत माझें नांव होतें. श्री. प्रभाकर गुप्ते ह्यांना निमंत्रण होतें तें मुख्यतः एका नाटचशिबिराचे संचालक म्हणून. ४ जुलै ते १३ जुलै हें शिबीर नासिकमध्यें झालें. लोकहितवादी मंडळाच्या कार्यकर्त्यांत कांहीं मतभेद निर्माण होऊन त्याचें पर्यवसान ह्या फाळणींत झालें. श्री. दत्ता सराफ, सौ. सराफ (पूर्वींच्या उषा दळवी), सौ. लिमये ह्यांच्याकडे मुख्यतः ह्या नव्या संस्थेचें नेतृत्व आहे. ह्या समारंभाला जोडून कागदी फुलांचें एक प्रदर्शन मांडलें होतें. मुलांचें एक नाटक झालें. समारंभाला मी हजर राहिलों व भाषण शुभेच्छा-दर्शक केलें.

उपचाराचा हा भाग सोडला तर नाटच-शिबिराच्या उपक्रमाला माझ्या दृष्टीनें महत्त्व आहे. एक वर्ष पुरें होण्यापूर्वीं नाशिकला दुसरें शालेय नाटचशिबिर घेतलें जात आहे ही घटना ती कल्पना रुजत आहे ह्याची द्योतक आहे असेंच मी समजतों. सौ. सराफ व सौ. लिमये ह्यांनीं श्री. गुप्ते ह्यांना सहकार्य द्यावें अशी मी विनंती केली व त्यांनीं चांगलें सहकार्य दिलें.

नाशिक येथें झालेल्या ह्या नाटचशिबिरानें केलेला सांघिक महाराष्ट्र गीत पठणाचा प्रयोग मला अत्यंत यशस्वी वाटला. चाळीस विद्यार्थी-विद्या-

र्थिनींनीं शिस्तींत केलेलें पठण ऐकतांना मन भारावून गेलें. सौ. लिमये ह्यांनीं ह्या प्रयोगाचें नेतृत्व केलें. स्वतःच्या आवाजाबाबत असलेली त्यांची तक्रार श्री. गुप्ते ह्यांच्या मार्गदर्शनानें दूर झाली आणि मोकळा आवाज व त्याचा आनंद त्यांना मिळूं लागला. वर्गांत शिकवितांना एखादा विद्यार्थी चोरट्या आवाजांत बोलत आहे असें दिसतांच त्या त्या विद्यार्थ्याला मोकळा आवाज कसा काढावा ह्याची संथा देतात.

श्री. गुप्ते ह्यांना दुसऱ्या नाट्यशिबिरांत उपयोगी पडावें म्हणून कांहीं अध्यापन विषयक महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा मी केली. त्या चर्चेचें प्रात्यक्षिक म्हणून रुंगटा हायस्कूलमध्यें इयत्ता ७ वीच्या वर्गावर एक पाठ मी घेऊन दाखविला व अशा पाठांत नाट्याचा उपयोग कसा व किती करतां येतो हें पहाण्यासाठीं श्री. गुप्ते ह्यांना तो पाठ पहाण्याची विनंती केली. पाठाची प्रतिक्रिया फारच चांगली झाली. विद्यार्थ्यांनीं लिहून आणलेलीं पत्रें अत्यंत भावनापूर्ण होतीं. भावनेचें संक्रमण हा पाठाचा हेतु यशस्वी झाला व त्यांत उपयोजिलेलें नाट्य हेंच त्या यशाला जबाबदार आहे.

ह्याहि शिबिरांत भाषणांचा कार्यक्रम होता. प्रा. श्री. आंबेकर ह्यांनीं 'मराठी रंगभूमीची गोष्ट' फारच सोप्या भाषेंत व अत्यंत आकर्षक रीतीनें सांगितली. त्याच वेळीं नाट्याचार्य खाडीलकर ह्यांचा स्मृतिदिन कल्याण येथें साजरा करावा असें बोललें गेलें. प्रा. श्री आंबेकर ह्यांनीं खाडीलकरांच्या नाटकांवर भाषण करण्याचें मान्य केलें.

भाऊ प्रभुणे ह्यांच्या नेतृत्वाखालीं हा कार्यक्रम ऑगस्ट अखेर कल्याणच्या नगरपालिकेच्या सभागृहांत साजरा झाला. महाराष्ट्र गीताचें सांघिक पठण, खाडीलकरांच्या नाटकांतील दोन प्रवेश आणि प्रा. श्री. आंबेकर ह्यांचें भाषण असा दोन अडीच तासांचा कार्यक्रम आंखला होता. सत्व परीक्षेंतील हरिश्चंद्र विश्वामित्र ह्यांचा एक गंभीर प्रवेश आणि भाऊबंदकींतील देशस्थ कोकणस्थ बायकांचें भांडण हा विनोदी प्रवेश करून दाखविले.

प्रा. श्री. आंबेकरांनीं भाषणाचा प्रारंभ अत्यंत नाविन्यपूर्ण केला. वर्तमानकाळाचीं कांहीं लक्षणें सांगत असतांना नजीकच्या भूतकाळांत पारतंत्र्यानें झालेले परिणाम त्यांनीं वर्णन केलें. त्या पारतंत्र्याच्या पार्श्वभूमीवर नाटकें रचण्याचा प्रयत्न खाडीलकरांनीं केला व तो अत्यंत यशस्वी झाला

हें अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केलें. कोणत्याहि विषयाला नाविन्याची डूब देण्याची प्रा. श्री. आंबेकरांची हातोटी ह्या व्याख्यानानें सर्वांच्या प्रत्ययाला आणून दिली. सर्व श्रोत्यांना तें व्याख्यान अतिशय आवडलें.

* * *

'सोन्याचा कळस' ह्या नाटकाचा प्रयोग करावा अशा कल्पनेनें मी विचार करूं लागलों. श्री. रांगणेकर आणि श्री. काळसेकर ह्यांच्या सहकार्यानें स्त्रियांच्या भूमिका करण्यासाठीं दोन मुली मिळाल्या. 'पठ्ठे बापूराव'-मधील नायिकेची भूमिका करणारी गुलाब कोरगांवकर हिला 'बिजली'ची भूमिका दिली व काळसकरांची कन्या सन्मित्रा हिला 'हंसा'ची भूमिका दिली. पुरुष भूमिकांची वांटणी पुढें दिल्याप्रमाणें केली.

| | | | |
|---|---|---|---|
| बाबा शिगवण | : श्री. पुरोहित | विठू कृष्णा | : श्री. डावरे |
| धोंडू | : श्री. पवार | शिवा | : सुधाकर बर्वे |
| हरबा | : जगन्नाथ बर्वे | करसनदास | : डॉ. दिघे |
| माधवजी | : श्री. साने | वसनजी | : श्री. कवळे |
| नोकर | : श्री. वाटवे | ड्रायव्हर | : श्री. देशमुख |

ह्या संचांत समाजांतील भिन्न भिन्न थरांतील व्यक्तींनीं सहकार्य केलें. हौशी नाट्यसंघाचा माझा आतांपर्यंतचा अनुभव जमेस धरून एकापेक्षां अधिक प्रयोग व्हायला पाहिजेत ह्याची जाणीव मी सर्व नटांना करून दिली. हौसेनें नाटकांत भाग घेणाऱ्या स्त्रिया अथवा मुली अधिक प्रयोग करायला दम धरीत नाहींत. आमच्या संचांत काम करणाऱ्या नटी व्यवसायी असल्यानें त्यांचें वेतन दिलें कीं कितीहि प्रयोग करण्याची त्यांची तयारी असते. रोजच्या तालमींना ह्या नटी उपस्थित राहूं शकत नाहींत. प्रयोगाच्या तारखा त्यांच्या सोयीप्रमाणें ठरवाव्या लागतात अशा कांहीं अडचणी असतातच. एखादा प्रयोग हौसेसाठीं करून त्यांची खरी रंगत साधत नाहीं. व्यवसायी नाटक मंडळ्यांनासुद्धां पहिले पांचसहा प्रयोग रंगत साधण्यासाठीं खर्ची घालावे लागतात.

आणखी एक गोष्ट माझ्या लक्षांत आली ती अशी कीं हौशी नटसंघ रंगभूमीच्या सजावटीकडे लक्ष देत नाहीं. राज्य नाट्य स्पर्धांचे प्रयोग पहातांना असें दिसलें कीं कांहीं नटसंघ व्यवसायी नाटक मंडळ्यांच्या तोडीची

सजावट करतात. महाराष्ट्रीय कलोपासक, सोशल क्लब, प्रोगेसिव्ह ड्रॅमॅटिक असोशिएशन हे पुण्याचे संघ व मुंबई मराठी साहित्य संघ, गोंवा हिंदु असोसिएशन ह्या कांहीं मुंबईच्या संस्था कल्पकतेनें ही सजावट करतात. 'सोन्याचा कळस' ह्या नाटकाचा प्रयोग करतांना मी ही सजावट श्री. रांगणेकर ह्यांचेकडून बनवून घेतली. बाबा शिगवणाची सीमेंट चाळींतील खोली, माडाची वाडी इ. देखावे तयार करून घेतले.

घर पहावें बांधून तसेंच नाटक पहावें बसवून ह्याचा इतरांना येतो तसा अनुभव मला आला. 'सोन्याचा कळस' ह्या नाटकाचे चार प्रयोग झाले. १९ जानेवारीं नांदगांव, २५ जानेवारीं नासिकरोड, फेब्रुवारीं नासिक आणि १९ मार्च रविवारीं सकाळीं दादर किंग जॉर्ज हायस्कूल नाट्यगृह ह्याप्रमाणें दोन महिन्यांत चार प्रयोग झाले. ह्या चारहि प्रयोगांतून गुलाब कोरगांवकर ह्या मुलीचें रंगभूमीवरील व्यक्तित्व मला पहावयास मिळालें. रंगभूमीवर पाय ठेवल्या क्षणापासून ती प्रेक्षकांवर आपला प्रभाव गाजवूं लागते. तिचा आवाज, तिच्या हालचाली, हावभाव, मुद्रा ह्यांचा विलक्षण परिणाम होतो. तिचें सौंदर्य तिच्या शरीरापेक्षां तिच्या मनाच्या विलक्षण उत्साहशक्तींत आहे. दिलेल्या सूचना ती प्रामाणिकपणें स्वीकारते व नाटकाचा बेरंग होईल असा अतिरेक करीत नाहीं. श्री. रांगणेकरांच्या तालमींत ती अधिकाधिक तयार होईल आणि योग्य संधि व योग्य भूमिका मिळत गेल्यास तिला उज्ज्वल भविष्यकाल आहे असें मला वाटतें. सन्मित्रा ह्या मुलीला समज आणि तडफ चांगली आहे. बरोबर काम करणाऱ्या पुरुषाला मोकळें सहकार्य देण्यास ती संकोचत नाहीं. ती वयानें अद्याप लहान आहे. पण ह्या व्यवसायांत ती आपली ज्येष्ठ भगिनी शरद्बाला हिच्यासारखा नांवलौकिक मिळवील असें मला वाटतें.

ह्या प्रयोगांत काम करणारे आम्ही दहा पुरुष त्यांत एक डॉक्टर, दोघे कामगार, एक कारकून ,दोन विद्यार्थी आणि चार शिक्षक अशी वर्गवारी करतां येईल. 'सांस्कृतिक कला केंद्र' ह्या नुकत्यास निघालेल्या संस्थेच्या नांवावर आम्ही ते प्रयोग केले. आणि आमच्या तालमी चालत त्या पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलच्या शिक्षकाच्या खोलींत. मी मुख्याध्यापक असल्यानें शाळेंतील अनेक सोयी उपलब्ध होत.

माधवराव पवार आणि डावरे ह्यांनीं व्यक्त केलेलें नाट्यकौशल्य मला अभिनंदनीय वाटलें. नाटक म्हटलें कीं सर्व कांहीं विसरणारे हे दोन कामगार मला सहकारी म्हणून लाभले हा ह्या तालमींचा विशेष मी समजतों. डॉ. दिघे ह्यांनीं आपला व्यवसाय सांभाळून नाटकाच्या तालमींची जी शिस्त पाळली व प्रत्यक्ष भूमिकेचा जो आविष्कार केलातो अनुकरणीय होता. श्री. साने ह्यांची भूमिका त्या मानानें लहान असली तरी ती करतांना त्यांनीं मार्मिकपणा दाखविला. श्री. कवळे ह्यांना विशेष अवकाश मिळाला नाहीं. तरीहि त्यांनीं दिलेली साथ महत्त्वपूर्ण वाटली. सुधाकर बर्वे आणि जगन्नाथ बर्वे हे दोघे नाट्य–शिबिराचे विद्यार्थी–ते स्वतःच्या भूमिका तर चोख करीतच. परंतु रखवालदाराचा पोषाख माझ्या अंगावर चढविण्यांत मला बिनचूक साहाय्य करीत. त्यांच्या त्या उत्साही सहकार्याशिवाय मी माझ्या भूमिकेंत बिनतपत उभा राहूं शकलों असतों ह्याबद्दल मी साशंक आहे.

श्री. वाटवे आणि श्री. देशमुख ह्यांच्या भूमिका अगदींच लहान असून स्वयंसेवक वृत्तीनें ते त्यासाठीं चारहि प्रयोगांतून राबलें हेंच त्यांचें वैशिष्ट्य होय. माझी भूमिका बाबा शिगवण–माझ्या अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाली असें मी म्हणूं शकत नाहीं. बावीस वर्षांपूर्वीं शाळेच्या मदतीसाठीं केलेल्या ह्याच नाटकांत मी ती भूमिका ज्या तडफेनें व करुणरसाचा उत्कट आविष्कार साधून केली त्या दोन्ही गोष्टी मला साधल्या नाहींत. माझे डोळे कोरडे आणि कंठहि सद्गदित नाहीं ह्याची मला चुटपुट लागली. माधवराव पवारांनीं 'धोंडू'च्या भूमिकेंत करुणरस हुकमी दाखविला हें मी पहात होतों. मला तें साधत नव्हतें. माझी जबाबदारी आणि माझी साधना ह्यांचें प्रमाण व्यस्त पडलें असें मला वाटतें.

मुंबईचा प्रयोग मला एखाद्या अवघड दुखण्यासारखा वाटला. मुंबईंत प्रयोग करावयाचा आणि त्यासाठीं तिकिटें खपवायचीं हा फारच मोठा खटाटोप होता. परंतु तो मी स्वीकारला होता. माझे मित्र श्री. हरीभाऊ कुलकर्णी ह्यांनींच मला त्या निमित्तानें मुंबई दाखविली. मुंबईचा तो विस्तार, ते निरनिराळे थर पहातांना मी भांबावून गेलों. रांगणेकरांच्या नाटकाच्या तालमीच्या दिवाणखान्यांत आम्ही उतरलों. आजूबाजूला नाटकवाल्यांचीं बिऱ्हाडे आहेत. पहांटे ५ ला उठून स्नान उरकून मुंबईच्या एकेका टोंकाला

हिंडायचे हें जिकीरीचें काम होतें. मला शारीरिक आणि मानसिक कष्ट करावें लागत. किती तऱ्हेचीं माणसें पाहिलीं—त्यांच्या मनांचे कप्पे लक्षांत आले. माझ्या शाळेच्या शिक्षकांनीं फार भूषणावह सहकार्य दिलें. मुंबईच्या प्रयोगांतून फार मोठें उत्पन्न व्हावें ही अपेक्षा नव्हती. शाळेचे शेंकडों माजी विद्यार्थी मुंबईंत निरनिराळ्या व्यवसायांत काम करीत आहेत. शाळेला कर्जफेडीसाठीं एक नवीन समृद्ध कार्यक्षेत्र उपलब्ध व्हावें म्हणून माझी धडपड चालली होती.

ह्या सर्व धडपडींत श्री. रुस्तुम जोशी ह्या गृहस्थाचा अधिक परिचय झाला. कुलाब्याला त्यांचें एक आरोग्यभुवन आहे. ती जागा प्रासादिक आहे. ह्या ऋषीबाबांनीं मला फार प्रोत्साहन दिलें. त्यांनीं चॅरिटी कमिशनर-कडून मला एक हजार रुपये शाळेला अनुदान म्हणून मिळवून दिलें. श्री. डी. आर. प्रधान महसूल खात्याचे सेक्रेटरी सपत्नीक नाटकाला हजर राहिले. शाळेच्या विद्यार्थ्यांनीं शाळेविषयीं विलक्षण प्रेम दाखविलें. श्री. गुंजीकर ह्या विद्यार्थ्यानें भरीव आश्वासन दिलें व रुपये शंभराचा चेक मदत म्हणून दिला. सुधा खोपकर, राम देशमुख, रघु भोळे, शिवराम आवटी अशा १९४६–४७ मधील माझ्या विद्यार्थ्यांनीं केवढ्या उत्साहानें माझें स्वागत केलें. त्या सर्वांचें मला समाधान करतां आलें नाहीं. त्यांच्या भुकेला मी थिटा ठरलों.

श्री. गोपीनाथ सावकार ह्यांच्या सामानावर आम्ही नाटक केलें. माडाच्या वाडींतील झाडें आम्ही बरोबर नेलीं. नऊ वाजतां प्रयोग सुरू झाला. १२॥ ला प्रयोग संपला. डोक्यावरचा फार मोठा ताण नाहींसा झाला. स्वतः रांगणेकर शेवटच्या दोन अंकांना हजर राहिले. नाटक संपल्यावर आम्ही तेथेंच जेवणें केलीं. स्टेजवर एका कोंपऱ्यांत मी विश्रांतीसाठीं अंग टाकलें. दुपारीं चार वाजतां रांगणेकरांचें "हेहि दिवस जातील" ह्या नाटकाचा प्रयोग होता. सीनची मांडणी चालू होती आणि एका कोंपऱ्यांत मी गाढ झोपीं गेलों होतों.

● ● ●

लेखांक त्रेसष्टावा

# केशवराव दाते, पृथ्वीराज कपूर आणि केरळ नाट्य-संस्था

गुरुकृपा सर्वांनाच सुलभ आहे, असें मला वाटत नाहीं. ती दुर्लभ आहे तशीच अकल्पितहि आहे. २ फेब्रुवारी १९६१ गुरुवारीं रात्रीं ९ ते १० श्री. केशवराव दाते ह्यांनीं 'भूमिका—दर्शन' ह्या विषयावर जें कांहीं मला सांगितलें तीच मी अकल्पित गुरु—कृपा समजतों. घडलें तें असें: १२ जानेवारी १९६१ ला 'सवाई माधवरावांचा मृत्यु' या नाटकाचा मुंबई मराठी साहित्य संघानें सादर केलेला सुविहित नाट्यप्रयोग मी मुंबई येथें जाऊन पाहिला. श्री. केशवराव दाते ह्यांनीं दिग्दर्शन तर केलेंच परंतु 'केशवशास्त्री' ही आपली गाजलेली भूमिकाहि केली. मी तो प्रयोग पाहिला व मला समाधान वाटलें. पोट आनंदानें भरून गेलें.

त्यानंतरच्या भेटींत केशवराव जें बोलले त्यांतला शब्द न् शब्द मी दोन दिवसांनीं लिहून काढला. पुढच्या पिढीसाठीं मला मिळालेलें हें ऋण मी त्या पिढीच्या स्वाधीन करीत आहे.

केशवराव म्हणतात, "ही एक प्रक्रिया (Process) आहे. मी त्याला जोड—काम असें म्हणतों. एक वाक्य आणि दुसरें वाक्य ह्यांच्यांत पोकळी निर्माण होतां कामा नये. तीं वाक्यें-ते शब्द जोडून घ्यावे लागतात. हें जोड—काम करतांना केव्हां हातवारे, तर केव्हां मुद्राभिनय, केव्हां एक विशिष्ट पवित्रा, केव्हां स्वराचा आरोह—अवरोह, केव्हां नुसताच दृष्टिक्षेप अशा वेगवेगळ्या साधनांनीं हें जोडकाम साधतां येतें."

गणपतराव जोशी ह्या नटाजवळ आवाजाचें केवढें सामर्थ्य होतें पहा ! आपल्या त्या आवाजाच्या सामर्थ्यानें गणपतराव प्रेक्षकांना हां हां म्हणतां कब्जांत घेत.

मी कुणाचाहि शिष्य नाहीं. मी नकळत ही 'प्रोसेस' सुरू केली. प्रथम मी पुष्कळच चुका केल्या आहेत. त्यावेळीं त्या चुका आहेत असें वाटलें नाहीं. आपण जी भूमिका करणार आहोंत तिची एक मूर्ति (Image) तुमच्या मनापुढें उभी राहिली पाहिजे. चिंतनानें ती (Image) उभी रहाते. मात्र प्रत्यक्ष तुम्ही भूमिका करूं लागलांत कीं तुम्हीच ती Image होतां. भूमिकेंतील प्रत्येक उच्चारामागें, हालचलींमागें एक 'अस्तर' असावें लागतें. म्हणजे त्या भूमिकेला वजन येतें. भूमिकेंतील भाषणें Jumpy असतां कामा नयेत. मी म्हणतों तसें त्या भूमिकेला अस्तर असेल तर भाषणें Jumpy होणार नाहींत.

श्री. केशवराव दाते ह्यांच्या ह्या भाषणांतून नटाच्या प्राथमिक अभ्यासाची चांगली कल्पना येते. भूमिकेचें चिंतन, त्या चिंतनामुळें उभी राहणारी त्या भूमिकेची मानसमूर्ति ( Image ), ती मूर्ति व आपण एकच असणें—होणें ह्या सर्व मानसशास्त्रीय प्रक्रियांतून जाण्याची संवय जो परिश्रमपूर्वक करील त्याला यशस्वी नट होणें अगदीं शक्य आहे हा केशवरावांचा अनुभवसिद्ध अभिप्राय चिंतनीय अन् आचरणीय आहे.

* * *

श्री. गोपीनाथ सावकार ह्यांच्या 'कलामंदिर' ह्या व्यवसायी नाट्यसंस्थेनें ९ एप्रिल १९६१ रविवारीं रात्रीं मला 'मानवंदना' देण्याचा समारंभ साजरा केला. श्री. डी. आर प्रधान, महसूल खात्याचे सेक्रेटरी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं तो कार्यक्रम झाला. १९२९ ते १९६१ या बत्तीस वर्षांत जें कांहीं माझ्या हातून घडलें त्याचें स्वरूप श्री. प्रधान ह्यांनीं स्पष्ट शब्दांत मांडलें. त्यांच्या दृष्टीनें त्या मानवंदनेचें तेंच मुख्य कारण होतें. ते म्हणाले, "श्री. पुरोहित ह्यांनीं सुशिक्षितांचा नाट्यकलेकडे आणि मराठी रंगभूमीकडे पहाण्याचा विपर्यास्त दृष्टिकोण बदलून टाकण्याचे प्रयत्न केले. श्री. पुरोहित ह्यांनीं आपल्या कार्यानें केवळ नाशिकलाच नव्हे तर महाराष्ट्राला महत्त्व आणून दिलें आहे."

त्या मानवंदनेला मी दिलेलें उत्तर असें " ज्या सहकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें व पाठबळानें मी कांहीं करूं शकलों त्या सर्वांना दिलेली ही सामुदायिक मानवंदना आहे. माझ्या दोन दिवंगत सहकाऱ्यांचें स्मरण करणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. प्रभाकर महाबळ आणि प्रल्हाद औरंगाबादकर ह्यांनीं केलेला कामाचा उठाव मी विसरूं शकत नाहीं. श्री. बाळासाहेब काळे आणि श्री. बाळासाहेब कानिटकर ह्यांचा मजवरचा लोभ मी कसा विसरूं ? "

ह्या समारंभानें मला कांहीं संकल्प उच्चारण्याची प्रेरणा झाली. ते संकल्प सिद्ध करणें मला साधलें तर त्या समारंभाला औचित्य होतें असें समजण्यास हरकत नाहीं. मराठी नाटकांचा माझा छंद ह्या स्वरूपांत गेल्या पन्नास वर्षांचा मी पाहिला तो मराठी रंगभूमीचा इतिहास मी शब्दांकित करावा हा एक संकल्प. तो मी पुरा करीत आणलाच आहे. मराठी नाटयकोश तयार करावा असा दुसरा संकल्प आहे. तो अद्याप सिद्ध व्हावयाचा आहे.

* * *

१९६० च्या दिवाळीच्या सुटींत शाळेंतील शिक्षकांबरोबर मी दक्षिण भारताचा दोन अडीच हजार मैलांचा प्रवास करून आलों. कन्याकुमारीला तीन सागरांच्या संगमांत मी मनसोक्त स्नान केलें. योगायोग असा कीं ती त्रिपुरी पौर्णिमेची रात्र होती. भारताच्या अंतिम टोंकावर मी उभा होतों. समोरचा तो खडक–स्वामी विवेकानंदांच्या ध्यानसमाधीनें पावन झालेला तो खडक–पहातांना मन भावव्याकुल झालें. येथें आसनस्थ होऊनच स्वामीजींनीं भारतमातेच्या सेवेंत स्वत:ला समर्पण करण्याचा मनोमन संकल्प उच्चारला. तो प्रवास करून मी परत आलों तों कांहीं प्रेरक शक्तीनें भारून गेल्यासारखा होऊन आलों.

नोव्हेंबर आणि डिसेंबर ह्या दोन महिन्यांत श्री. पी. आर. ऊर्फ मामा जोशी ह्यांच्या मध्यस्थीनें श्री. पृथ्वीराज कपूर ह्यांच्या चार मुलाखती मी घेतल्या व स्नेहसंमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास त्यांची संमति मिळविली.

२५ फेब्रुवारीं १९६१ ला सायंकाळीं सहा वाजतां पृथ्वीराज नासिकरोडला उतरले. त्या नंतरच्या सहा तासांत जें घडलें तें एक दिव्य स्वप्न वाटावें

इतकें विलक्षण होतें. त्या महान् नटाच्या सहवासांत त्याच्या कितीतरी थोर गुणांचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. पांच हजार प्रेक्षकांनीं टाळ्यांच्या कडकडांत केलेलें तें अभिवादन स्वीकारण्याची ती मंत्रमुग्ध पद्धत, एका कटाक्षांत प्रेक्षकांना जिंकून घेण्याचें तें अलौकिक सामर्थ्य, सर्वांनाच तें दर्शन बिलोभनीय वाटलें. विद्यार्थ्यांच्या करमणुकीच्या कार्यक्रमाला दिलेलें तें मनसोक्त प्रोत्साहन, पारितोषिकें देतांना प्रत्येक विद्यार्थ्याचें वेगवेगळ्या पद्धतीनें कौतुक करण्याची ती हृद्य तऱ्हा आणि ह्या सर्वांवर कळस म्हणजे उच्चतेला, उदात्ततेला आवाहन करणारें तें भाषण–ज्यांनीं ज्यांनीं तें भाषण ऐकलें त्या प्रत्येकाला धन्य धन्य वाटले.

वक्तृत्वाचा पोटांतून ओठांपर्यंत उसळणाऱ्या वक्तृत्वाचा एक आदर्श पाठ मी तें भाषण ऐकतांना घेतला. बॅ. जयकर व बॅ. सावरकर ह्यांच्या भाषणांचा जो परिणाम माझ्यावर झाला त्यापेक्षां ह्या भाषणाची जात निराळी होती. १९२३ मध्यें कॉलेजांत असतांना रवींद्रनाथ ठाकुरांना मी पाहिलें व त्यांचें भाषण ऐकतांना त्या संध्याकाळीं जी धुंदी मी अनुभवली तीच धुंदी त्या २५ फेब्रुवारीला मी अनुभवली. शरीराच्या अणुअणूंतून नाट्याचे बोल घुमत होते. ३० फूट रुंद, ३८ फूट खोल व २१ फूट उंच अशा त्या खुल्या नाट्यगृहांत रुद्राचा विमुक्त संचार समोरच्या वातावरणाच्या कणाकणांतून मिसळत होता आणि अन्यथा जड असलेल्या वस्तूंत चैतन्याचा हुंकार उमटत होता. खुल्या नाट्यगृहाच्या प्रचंडपणाला शोभणारे त्या भव्य शरीराचे न्यासविन्यास आणि मनाचे उत्तुंग उन्मेष सामावून घ्यायला डोळे दुबळे होते शारदीय पाण्यावर सुधांशु किरणांचें नृत्य सुरूं व्हावें आणि आकाश पृथ्वीच्या त्या दोन सौंदर्यांत जीव आनंदानें न्हाऊन निघावा असें कांहींसें वाटूं लागलें. जीवनातील ती अनुभूति वर्णनांतीत होती. रात्रीं दोनच्या पठाणकोट एक्स्प्रेसनें पृथ्वीराज दिल्लीच्या प्रवासाला निघाले आणि मी घरीं परतलों तों आयुष्यांतील एक शतकृत्य घडलें अशा जाणीवेनें !

* * *

गांधीनगर ,नासिकरोड आणि देवळाली कँप ह्या परिसरांत रहाणाऱ्या केरळ समाजानें मल्याळी भाषेंतील एक नाट्य–प्रयोग आमच्या शाळेंत बसविला. भाषा कळत नसली तरी प्रयोग कसा करतात हें पहाण्याची उत्सुकता

म्हणून मी त्या नाटकाला गेलों. हार्मोनियम, क्लॅरोनेट, मृदुंग आणि झांज ह्यांचा मिश्रध्वनी पार्श्वसंगीत म्हणून नाटकभर ऐकू येत होता. एका लहान संस्थानाच्या स्वतंत्र राणीला कपटाला बळी पडून प्राण आणि स्वातंत्र्य दोन्ही गमवावी लागतात या सूत्रावर नाटक रचलेलें आहे. केरळ समाजाच्या चालीरीति, वेषभूषा आणि केशभूषा सारेच वेगळें होतें. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केल्या. नाटकांतील ख्रिश्चन व्यक्तींनीं विनोदाची बाजू सांवरली. हातवारे, मुद्राभिनय आणि पोषाख. ह्यांतून हास्य निर्माण करण्याचा प्रयत्न होत होता.

नाटकांतील दोन पुरुष सतेज दिसले. खड्गाचा सराव असलेलीं मनगटें भक्कम होतीं. इंग्रजी शब्दहि मधून मधून बोलले जात. १५ व्या शतकांतील त्या कथानकांत पोर्तुगीजांच्या आक्रमणाचा आणि कुटील नीतीचा परिणाम दाखविला होता. नाटकाचा शेवट शोकान्त होता. प्रयोग चालू असतां माझ्या शेजारी बसलेला एक मुलगा मधून मधून मला इंग्रजींतून कथानक सांगत होता.

मुंबईचे दोन प्रयोग आणि नासिकरोडचा एक प्रयोग ह्यामुळें नाटकवाले थकले होते. म्हणून एक दिवस विश्रांतीसाठीं बहुतेकजण तेथें राहिले. मी चालकांचा परिचय करून घेतला. ते इंग्रजी उत्तम बोलत. त्यांच्या रंगभूमीसंबंधींची माहिती मी मिळविली. केरळमध्यें नाट्यव्यवसाय कोठल्यातरी राजकीय पक्षाच्या आश्रयानें चालतो. सहाजिकच त्या पक्षाच्या राजकीय तत्वाचा प्रचार हाच त्या नाटक मंडळीचा मुख्य उद्योग होऊन बसतो. ही नाटकमंडळी केरळ मधील ख्यातनाम मंडळी असून ती पक्षनिरपेक्ष होती. २०′×२०′ एवढ्याच मर्यादेंत त्यांचा नाटकांतील व्यवसाय चालत असे. रंगमंचाची मांडणी करणारा एकच माणूस होता. तो प्रयोग पहातांना जुन्या मराठी नाटक मंडळ्यांची आठवण आली. प्रयोगांत एक फार चांगल्या आवाजाचा गाणारा होता. त्याच्या आवाजाचा लवचिकपणा आणि झार दोन्ही श्रवणीय होतीं. सर्वांची शिस्त डोळ्यांत भरत होती. आजचा मराठी नाटकाचा प्रेक्षक सर्व साधारणपणें उदासीन आहे–संवेदना शून्य आहे. येथें त्याच्या उलट प्रकार आढळला. हंशा, टाळ्या आणि उद्‌गार भरपूर! प्रयोगाची रंगत वाढत आहे ह्याची मला सारखी जाणीव होत होती. हिंदु आणि ख्रिश्चन असा हा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................... वि: ..............

मिश्र समाज असून त्या सर्वांना आपल्या जुन्या संस्कृतीचा, इतिहासाचा सारखाच अभिमान वाटतो. केरळ राज्याचें आमचें वृत्तपत्रीय ज्ञान आणि त्या समाजाचें हें प्रातिनिधिक स्वरूप ह्यांत फार तफावत आहे.

त्या दिवशीं दुपारीं मी त्या सर्व पाहुण्यांना शाळेतर्फे चहासाठीं बोलावलें. ती बैठक अनेक दृष्टीनीं संस्मरणीय झाली. आमचे शिक्षक आणि ते नाटयव्यवसायी दीडदोन तास एकमेकांशीं मिसळून गेलों. आधल्या रात्रीं पाहिलेल्या प्रयोगाचा माझ्यावर झालेला परिणाम मी प्रयोगाला न आलेल्या शिक्षकांना परिचित करून दिला. नाटक मंडळीचे मालक मल्याळी भाषेंत बोलले व त्याचा हिंदी अनुवाद त्यांच्यापैकीं एकानें करून दिला. आमच्या शाळेबद्दल, आम्ही केलेल्या आदरातिथ्याबद्दल त्यांनीं आम्हांला धन्यवाद दिले. चहा होण्यापूर्वीं आमच्या कांहीं शिक्षकांनीं त्यांना मराठी नाटकांतील कांहीं गाणीं म्हणून दाखविलीं. उलट त्यांच्यांपैकीं एकदोघांनीं मल्याळी गाणीं म्हटलीं. मालकाची बारा वर्षांची मुलगी त्यांच्याबरोबर होती तिनेंहि एक गाणें म्हणून दाखविलें. दोन भिन्न भाषी समाजांत एकात्मता निर्माण करण्याचें एक प्रभावी साधन म्हणून कलेचें महत्त्व किती आहे ह्याचें तें नमुनेदार प्रात्यक्षिक होतें.

भिन्नभिन्न भाषिक समाजांच्या एकीकरणाच्या उद्योगांत अभाषिक कलेचें एक विशिष्ट स्थान आहे. कला म्हणजे केवळ मनोरंजन ही कल्पना जाऊन मनोरंजनांतून एकमन निर्माण करणारी प्रभावी शक्ति म्हणजे कला हा विचार अधिकाधिक रूढ व्हायला पाहिजे. कला धर्मातीत, भाषातीत, देशातींत आहे. एक जग ही कल्पना प्रत्यक्षांत यावयाची तर ते शस्त्रास्त्रांनीं साधणार नाहीं. ‘धन्या ती गायनी कला’ ही कलेची प्रशस्ती करणाऱ्या समर्थ रामदासांना काय सुचवायचें होतें. ह्याचा क्वचित्‌च विचार केला जातो. निःशब्द स्वरविलासाचें सामर्थ्य कल्पनातीत आहे तसेंच तें विलक्षण प्रभावगर्भ आहे. कलेच्या उपेक्षेच्या ज्या अनेक रूढ रीति आहेत त्यांत कलेच्या सामर्थ्याची जाणीव नसणें ही परिस्थिति भयानक आहे. ही उपेक्षा जेव्हां प्रतिकाराचा पवित्रा घेते त्यावेळीं कलावंताच्या जीवाचा कसा कोंडमारा होतो हें समजायला “जावें त्याच्या वंशा तेव्हां कळें” हेंच खरें !

● ● ●

लेखांक चौसष्टावा

# दुसरे शालेय नाट्य-शिबीर !

मल्याळी भाषेंतील एक नाटक पाहून जे विचार माझ्या मनांत आले त्यांचा परिणाम असा झाला कीं भिन्नभिन्न भाषांच्या कलात्मक विकासाची माहिती व्हावी-त्या विकासक्रमांतील साधर्म्य व भिन्नता कळाव्या अशी इच्छा निर्माण झाली.

१ मे १९६१ पासून दुसरें नाटचशिबीर सुरू झालें. ह्या शिबिराचे संचालक एकटे श्री. प्रभाकर गुप्तेच होते. त्या शिबिराची रूपरेषा आंखतांना श्री. गुप्ते ह्यांच्या वेळापत्रकांत कांहीं भाग मला घेतां येईल असा विचार केला. सकाळीं व दुपारीं एकेक तास मला काम करतां यावें व श्री. गुप्ते ह्यांना विश्रांति मिळावी म्हणून मी एक उपक्रम सुरू केला. तीन लघुकथांची नाटचचर्चा असा विषय मी घेतला. 'मोर भटजी' आणि 'काळू मळक्यानें खून केला नाहीं.' अशाच दोनच कथांची नाटचचर्चा झाली. विद्यार्थ्यांना १०-१५ ओळींचा नाटचपूर्ण परिच्छेद लिहितां यावा असा त्या चर्चेचा हेतु होता. विद्यार्थ्यांनीं थोडी प्रगति दाखविली.

दोन वर्षांपूर्वींच्या नाटच-शिबिराचे अनुभव लक्षांत घेऊन श्री. गुप्ते ह्यांनीं आपल्या अध्यापनपद्धतींत पुष्कळ सुधारणा केली. श्री. चिंचवडे ह्यांच्याकडे संहिता म्हणवून घेण्याचें काम मुख्यतः होतें व निरलसपणें ते आपलें काम करीत.

माझे एक स्नेही श्री. जयंतीभाई ओझा ह्यांचा हस्तें ह्या नाटचशिबिराचें

उद्घाटन झालें. गुजरातच्या रंगभूमीचा त्यांनीं आपल्या एका व्याख्यानांत आढावा घेतला. 'जयसुंदरी' ह्या नांवानें गुजराती रंगभूमीवर ख्यातनाम झालेल्या नटाची माहिती त्यांनीं सांगितली. श्री. दिनकर ढेरे ह्यांना जसें 'कामण्णा' हें नांव मिळालें तसाच प्रकार 'जयसुंदरी' ह्या नांवाचा आहे. बालगंधर्व ज्या नटाच्या स्त्रीभूमिका अत्यंत आस्थेनें पहात व ज्याच्या नाट्यगुणांनीं प्रभावित होत असा हा नट आजहि अमदाबादला नाट्य–दिग्दर्शनाचें काम करीत आहे. ' करीन ती पूर्व ' ह्या नाटकाचें गुजराती भाषांतर करवून घेऊन त्यांत हिरोजीच्या बायकोची भूमिका ' जयसुंदरी 'नें बेमालूम केली. स्वतः नाटककार श्री. मामा वरेरकर त्या प्रयोगाला हजर होते. जयसुंदरीची एका अस्सल मराठमोळा स्त्रीची ती भूमिका व आविर्भाव पाहून वरेरकर थक्क झाले व त्यांनीं जयसुंदरीला आपलीं नाटकें करण्याची मुक्त परवानगी दिली. बापू माने हा नट एका गुजराती स्त्रीची भूमिका एका मराठी नाटकांत यशस्वी रीतीनें करीत असे. मारवाड्याचें सोंग काढण्यांत मराठी नट प्रसिद्धच आहेत. त्या व्याख्यानावरून ही जाणीव झाली कीं गुजरातनें आपल्या रंगभूमीची आबाळ तर होऊं दिलीच नाहीं. उलट अत्यंत ईर्षेनें तिचें संवर्धन केलें आहे. मुंबईस प्रिन्सेस थिएटर, भांगवाडी थिएटर, येथें गुजराती नाटकाचे प्रयोग होत आहेत. यांत्रिक साधनांची जोड ह्या रंगमंचांना देण्यांत आली आहे. नवे नट, नवे दिग्दर्शक हुरूपानें काम करीत आहेत.

जयंतीभाईंच्या मुलानें बडोदे येथील विद्यापीठांतील नाट्याभ्यासक्रमाची माहिती दिली. तो स्वतः त्या विद्यापीठांत अध्ययन करीत आहे. संस्कृत व हिंदी ह्या भाषांतील रंगभूमीबद्दल जें बोललें गेलें त्याचें स्वरूप मुख्यतः वाङ्मयीन होतें. श्री. तेरदाळकर ह्यांनीं कर्नाटकच्या रंगभूमीबद्दल माहिती सांगितली. मराठी नाटकेंच आपल्याला अधिक आवडतात असा स्वतःचा अनुभव त्यांनीं सांगितला. केरळ समाजांतील एका मल्याळी बंधूनें हिंदींतून त्या रंगभूमीची 'चक्षुर्वैसत्यम्' अशी माहिती दिली. नाट्यक्षेत्रांत बंगाल कोणते प्रयोग करीत आहे ह्याची माहिती श्री. गुप्ते ह्यांनीं ' अंगार ' ह्या नाटकाचें प्रायोगिक समीक्षण करून दिली. एका कोळशाच्या खाणींत कांहीं मजूर काम करीत असतां मारले गेले. ही घटना ह्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना आहे. जीवन आणि मृत्यु ह्यांच्या सीमारेषेवर

उभ्या ठाकलेल्या मानवी मनाचा तो आविष्कार जितका हृदयविदारक तितकाच भयानक आहे. श्री. गुप्ते ह्यांनीं अत्यंत भावपूर्णतेनें कांहीं उत्कट प्रसंगांचें वर्णन केलें. प्रकाशतंत्र कौशल्यानें वापरून खाणीचा देखावा व त्यांत भरलें जाणारें पाणी दाखवितांना बंगाली दिग्दर्शकानें यांत्रिक ज्ञानाचा पुरेपूर उपयोग केला आहे.

त्या व्याख्यानमालेंतील सर्वांत विचारप्रवर्तक व्याख्यान झालें श्री. श्रीधरपंत देशपांडे ह्यांचें. 'मराठी नाटकांतील संगीत' हा त्यांचा विषय त्यांनीं अभ्यासपूर्ण रीतीनें विशद केला. सूत्रधारानें नाटकाचें सारेंच कथानक संगीतांत व्यक्त करावयाचें हा पहिला टप्पा होय. सूत्रधार हाच गाण्याचा एकमेव मक्तेदार. दिंडी, साकी, श्लोक आणि लावणी ह्यांचा नाटकांतील उपयोग हा दुसरा टप्पा. रागदारी गायन हा तिसरा टप्पा आणि शेवटचा टप्पा म्हणजे पार्श्वसंगीत, पडद्यापुढें म्हटलें जाणारें संगीत पडद्या-आड गेलें. मराठी नाटकांतील संगीताकडे पहाण्याचा हा दृष्टिकोन अभिनव आहे. तें भाषण ऐकतांना मराठी नाटकांतील स्वगतांकडे पहाण्याची एक नवी कल्पना मला सुचली. गणपतराव जोशी, गणपतराव भागवत, गणपतराव बोडस, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, नारायणराव राजहंस, वामनराव पोतनीस, नानासाहेब फाटक, ह्यांच्यासारख्या नटश्रेष्ठांचीं गाज-लेलीं स्वगतें हा एक स्वतंत्र विषय आहे. मराठी नाटकांचा छंद जितका अवीट तितकाच त्यांचा अभ्यास करण्याचा मार्ग हि अफाट आहेत ह्याची जाणीव त्या व्याख्यानानें मला झाली.

समारोपाच्या दिवशीं शाळेंतील रंगमंचावर सहभोजनाचा कार्यक्रम आम्ही केला. जेवण करीत असतांना एकमेकांचा निरोप घेणें, कांहीं संकेत ठरविणें, अभ्यासाच्या पुढील दिशा अजमावणें इत्यादि गोष्टी आम्ही बोललों. १३ मे पासून रत्नागिरी येथें नाट्यशिबिरासाठीं श्री. गुप्ते आणि श्री. चिंच-वडे ह्यांना जावयाचें असल्यानें आम्ही त्यांचें अभीष्ट–चिंतन केलें व त्यांना निरोप दिला.

माझा मराठी नाटकांचा हा छंद माझ्या जीवनांत मला कळत न कळत, जागेपणीं आणि सुषुप्तींत, सुखांत आणि दुःखांत आशा–निराशेंत मला साथ करीत आला आहे. श्वासोच्छवासासाठीं लागणाऱ्या हवेप्रमाणें तो छंद माझें

जीवन व्यापून उरला आहे. ह्या छंदामुळेंच जीवनाच्या अनेक जाणीवा मला प्राप्त झाल्या. त्या जाणीवा हीच माझ्या जीवनाची समृद्धि होय ! माझ्या-सारख्या सामान्य स्थितींत जीवन कंठणाराला ती समृद्धि जतन करणें ही एक अवघड गोष्ट आहे. ज्या जीवन जलाशयांतून मला ही समृद्धि मिळाली त्या जलाशयालाच ती अर्पण करणें हें माझें कर्तव्यच आहे. त्याच समर्पण बुद्धीनें मी हें आत्म पुराण लिहीत आलों. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. भाऊसाहेब माडखोलकर ह्यांनीं हें लिहिण्य'ची प्रेरणा दिली. सिद्धहस्त लेखन हा माझा गुण नसल्यानें प्रारंभ केल्यापासून उणीं पुरीं तीन वर्षें हें सर्व लिहून पुरें करायला लागलीं.

ज्या व्यवसायीं नटांचे दिव्य आवाज ऐकून मला हा छंद जडला आणि ज्यांच्या भूमिका पहातां पहातां त्या छंदाचें पोषण झालें ते नट आणि त्यांचा व्यवसाय ह्यांचा आज संकोच झाला आहे. नाटच–कलेला उत्तेजन देण्यासाठीं राज्य नाटच स्पर्धा सुरू झाल्या आहेत. त्या निमित्तानें नवे नट, नवीं नाटकें, नवे नाटककार चमकत आहेत. स्त्रीपार्टी नट नाहीं म्हणून अरुण्यरुदन करणाऱ्या हौशी नटांनीं नाटकें करण्याची हौस मनांतच जिरवली. आज कांहीं अव्यवसायी नाटचसंघांची प्रगति पहातांना मन थक्क होतें. मुंबई मराठी साहित्य संघ, प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, गोंवा हिंदु असोसिएशन, महाराष्ट्रीय कलोपासक, सोशल क्लब ह्या आणि अशा कांहीं संस्था मराठी नाटकांचा आणि मराठी नाटच क्षेत्राचा विकास व्हावा, विस्तार व्हावा म्हणून आटोकाट प्रयत्न करीत आहेत. ह्या जिद्दीपायीं डॉ. भालेरावासारखा कार्यकर्ता हरपला. पार्श्वनाथ आळतेकर नाटच शिक्षणाचा ध्यास घेत परलोकवासी झाले. महाराष्ट्र नाटच विद्यालयाचे संचालक श्री. प्रभाकर गुप्ते नाटचशिक्षणाची आघाडी एकाकी असूनहि त्याच जिद्दीनें लढवीत आहेत.

विद्यार्थी असतांना मी नाटकाच्या छंदानें वेडा झालों. आजच्या विद्यार्थ्याला कशाचें वेड आहे ? शिक्षक म्हणून गेलीं उणीपुरीं तीस वर्षें मी विद्यार्थ्यांतच वावरत आहे. आजचा विद्यार्थी बोलपटांनीं प्रभावित झाल्यासारखा भासतो. पण ती चित्रपटसृष्टी कुणाला वेड लावायला समर्थ आहे असें दिसत नाहीं. नाहीं स्वभाषेचें वेड, नाहीं स्वदेशाचें वेड, मग हीं मुलें जाणार आहेत तरी कुठें ? त्या प्रश्नाचें उत्तर देण्याची माझी पात्रता नाहीं. त्याचप्रमाणें

ह्या मुलांपैकीं एका मुलानें मला विचारलेल्या प्रश्नाचेंहि उत्तर मला देतां येत नाहीं.

त्या मुलाचा प्रश्न असा, "तुम्हांला नाटकाचें इतकें वेड होतें तर तुम्ही नाटकांत कां गेला नाहींत ?"

मला निरुत्तर करणाऱ्या प्रश्नापाशींच मी थांबतों आणि भविष्य-काळांत मला तें उत्तर देणें शक्य झालें तर देईन एवढेंच त्या मुलाला आणि त्याच्या पिढीला आश्वासन देतों.

समाप्त

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

# नांवांची सूचि

अनंततनय
अंह्रुटकर शंकर :
२३१, २५७, २७४, ३०२.
अभोणकर :
२७४.
अभ्यंकर गं. ना. मंडळी
३२
अभ्यंकर नाना
२९
८२ व्या पानावर
आचार्य अत्रे :
१०६, १९९, २०६, २०८, २१७, २१८, २७१.
आचार्य बाळू :
१०६, १७६.
आजगांवकर म. भा. भू. :
११२.
आपटे गुरुजी :
१८५, १८६.
आपटे हरी नारायण :
९, १३१.
आळतेकर पार्श्वनाथ :
१११, १८२, २१८, २३४, ३३८.
आंबेकर प्राध्यापक :
२७२, २७४, २७५, ३१२, ३१३, ३१९, ३२४, ३२५.
इनामदार रघुनाथ :
५.
ओझा जयंतीभाई :
२९२, ३३६.
औंधकर वि. द. :
५, १०, ४९, ८८.
औरंगाबादकर प्रल्हाद :
६५, ६६, ७४, ७५, ७६, ७७, ७९, ८१, ८८, ९१, ११३, ११६, ११८, १२५, १२६, १४८, १७६, १७९, १८८, १९८, २०८, २०९, २१९, २२५, २३३, २३४, २३६, २४८, २६९, २७४, २८३, ३०२, ३२०, ३२१, ३२२, ३३१.
औरंगाबादकर बापू :
११८.
कवडी नरेश :
३१८.
कपूर पृथ्वीराज :
३३१, ३३२.

कवीश्वर यशवंतबुवा :
२६४, २६७.
कमतनूरकर बन्याबापू :
४९, २२५.
कर्वे महर्षि :
१२३, १२४, १२५, १२६.
काणेकर अनंत :
२७३.
कामतकर वकील :
२४३, २४४.
काळे बाळासाहेब :
६५, ६९, ७४, ७५, ७९, ८०, ८२, ९१, ९७, १०४, १०५, ११७, १२४, १४८, १४९, १५१, १५२, १५५, १५९, १७६, १७७, १७९, २२४, २७४, २८३, ३०२, ३०३, ३३१.
काळे माधवराव
८२, १७७.
काळे बाबासाहेब :
२३७, २३८, २५४.
काळे सी. वाय्. :
९९.
काळे के. नारायण
१११, २२३, २४६, २५४, २७३, २८७.
काळे दादा :
२७, ९३, २३८.
कानिटकर बाळासाहेब :
२३, ४२, ६१, ६५, ७४, ७५, ७७, ७९, ९१, ९७, १२१, १२५, १२६, १२७, १४४, १६८, १७१, १७३, १७५, १७६ १७७, १९३, १९६, २०६, २१३, २३२, २५९, २६०, २८२, ३३१.
कानिटकर बापू :
६, २४.
कामटे, एन्. एम्. :
१५३.
कारखानीस अण्णा :
१७, २०, ५०, ६२, ११०, १६९, १८०,२४६.
काळसेकर बापूसाहेब :
३१३, ३२५.
कायदे प्रिंसिपॉल :
१५५.
कुकडे गंगाधर :
७०.
कुमठेकर
१५३, १७०.
कुलकर्णी ग. वि :
३४.
कुलकर्णी ना. वि. :
३, ५८, ६०, ६१, ६६, ८३, ८५, ८६, ८७, ९१, ९३, ९४. ९८, ९९, १३०, १४१, १४२, १७३, १७९, १८३, १९२, १९७, २२०, २२१, २२५, २२६, २२९, २३६, २३७, २४०, २४१, २४४, २५५, २७४.

कुलकर्णी हरीभाऊ
२९४, ३२७.
कुलकर्णी पांडोबा :
७३, ७४, ७५, ७७, ७९, ८८,
९१, ११७, १२४, २४५.
कुलकर्णी वसंतराव :
७५, ७७.
कुलकर्णी भय्यासाहेब :
७४.
कुलकर्णी एम्. बी. :
३१३.
कुलकर्णी पी. बी. :
१६५.
कुलकर्णी एस्. ए. :
१४३, १७९, २२३, २२६.
केतकर राजाभाऊ :
२११, २१४.
केशवसुत
१६.
केळकर गिरिजाबाई :
१९२.
केळकर तात्यासाहेब :
२, ५४, १३०, २११, २३३,
२३६, २४७.
केळकर वासुदेवराव :
१३.
कोल्हटकर अच्युत बळवंत :
९, ६५, ९२, ९३, १२९.
कोल्हटकर चिंतामणराव :
५, ११, २०, २९, ५६, ८०,
९०, ९२, ९३, २१६, २२३,
२२४, २२६, २५७, २६०, २६५,
२६६, २७१.
कोल्हटकर श्रीपाद कृष्ण :
५९, ६०, ६४, ६५, ८२, ९७,
२७५.
कोल्हापुरे :
११.
कोरान्ने नारायणकाका :
२९.
कोरान्ने भीमराव :
२७९, २८१.
खरे दत्तु :
६९, ७०.
खरे वामनराव :
१७८, १९५, १९६, २०६.
खाडीलकर नाट्याचार्य :
१८, १९, २०, ८६, ९२,
११०, १२९, १३९, १४०, १४७,
२२०, २२७, २४१, २४६, २५९,
२६४, २७८, २७९, २८०, ३१४,
३२४.
खाडीलकर बाळू :
२३, २८.
खाडीलकर यमुताई :
५९, २४४, २७४.
खाडीलकर विठूकाका :
५९, ९३, १४१, १४२, १७९,
१८३, १९७, २३७, २४०, २४३.
खारकर बाबुराव :

७५, ८०.
खांडेकर वि. स. :
६४, २२७. २२९
खापर्डे दादासाहेब :
१९०.
खापर्डे बाबासाहेब :
१९०, १९१.
खेडकर माधवराव :
१६, १७.
गडकरी :
१७, २०, २८, ३०, ३१, ४८, ५०, ६५, ८३, ९३, ११९, १३१.
गांगल :
२२.
गाडगीळ पां. वा. :
२०७, २९६.
गांधी महात्मा :
३४.
गुप्ते प्रभाकर :
२०३, ३१०, ३११, ३१२, ३१३, ३१४, ३१६, ३१८, ३१९, ३२३, ३२४, ३३५, ३३६, ३३७.
गुप्ते वसंतराव :
३१३.
गुप्ते वसंत
१८३, १८४.
गुप्ते बापुसाहेब :
२८४, २८५.
गुरव चिंतोबा :
४, २२४.
गोखले नानबा :
२, ३, ५ २९, ३०, ५७, ७१, ७६, ७७, ८०. ११७.
गोखले रघुनाथराव :
२, ५, २७१.
गोखले रामभाऊ :
२.
गोखले अप्पासाहेब :
२७, २३८, २३९.
गोखले मास्तर :
२४.
गोखले नानासाहेब :
९३, ११६, १४९, १८२, २२५, २३३, २३९, २४७, २५२, २५३, २६८, ३१८.
गोखले दा. वि.
१२८.
गोडबोले नाथ :
१३२.
गोडबोले भाई :
१३२.
गोडबोले वकील
२१७, २२२.
गोऱ्हे कृष्णराव :
४, ५.
घैसास :
२७.
चांदवडकर नानासाहेब :
१३३, १७९, २०७, २३३.

चांदवडकर माईसाहेब :
१४७, १४८.
चित्रे टी. जी. :
१८४.
चिंचवडे :
३११, ३१४, ३३५, ३३७.
चुंबळे शंकरशेट :
७६, ७७.
चौधरी सोपानदेव :
८३, १४६, १५६, १७१, १७९, १८०, ३१९.
चौधरी लीलाबाई :
१४३.
जयकर बॅरिस्टर :
१२७, २१९.
जोग बाळाभाऊ :
४, १५०.
जोशी गणपतराव :
२, ४, ८, १२, १३, १४, १५, २९, ४०, ५५, ५६, ११२, १२८, १५०, १५१, १६२, १६५, २५६, ३०८, ३३७.
जोशी बापुसाहेब :
१८९, १९०, १९१.
जोशी लक्ष्मणशास्त्री :
२११, ३२२.
जोशी वीर वामनराव :
१२९.
जोशी शं. प. :
५२, ५३, १७४, १७५.
जोशी पी. आर्. :
३३२.
जोशी न्यू इं. स्कूल :
१०८.
जोशी सीतारामपंत :
५, ४९, ५२, २१९.
जोगळेकर काकाजी :
१११, ११३.
जोगळेकर वकील :
१६४, १६५.
टिपणीस माधवराव :
४, २२.
टिपणीस यशवंतराव :
५, २१, २२.
टिळक देवदत्त नारायण :
८३, १८१.
टिळक रूथबाई :
१८१.
टिळक लक्ष्मीबाई :
८३.
टिकेकर :
१८३, १८५, १९९.
टेंबे गोविंदराव :
१३, १४, २२३, २७१.
टेंबे र. गो. :
१०५, १४४.
डोंगरे :
७५.
ढोके नाना :
७५.

ताम्हणकर ना. घों. :
२८५.
तापकिरे सहदेव :
१०९.
तासकर बाबूराव :
७५, १५४.
थत्ते हरी :
७५, ११८.
दळवी :
५, ५०.
दातार भाऊसाहेब :
९३.
दातार वामनशास्त्री :
९३, २०६, २०७, २०८.
दातार बाळासाहेब :
२६९, २७०, २७१, २७४.
दाते केशवराव :
५, १०, ११, १२, २०, २९, ४७, ४९, ५०, ५२, ५३, ५६, ८०, ८६, ९१, ११०, १११, ११३, ११४, १४८, १४९, १६५, १७८, १७९, १९७, २०२, २०३, २१६, २१७, २२२, २२४, २२६, २२७, २८२, २३१, २३४, २३५, २४५, २४६, २४७, २५५, २५६, २६०, २७१, २७३, २८०, ३११, ३१३, ३३१, ३३७.
दिनानाथ :
४, ११, ८८, ९२, २६५, २७१.
दिवेकर नाना :
२१२, २१३.
दिवेकर सॉलिसिटर :
२१४.
दीक्षित शामला :
२९३, २९४.
दुगल न्यू इंग्लिश स्कूल :
१०८.
देवल गोविंद बल्लाळ :
१४१.
देव शंकरराव :
३३.
देव शंकर श्रीकृष्ण :
१२८.
देशपांडे यशवंतराव :
१०, ३२, ३४, १९३.
देशपांडे भय्यासाहेब :
१९२.
देशपांडे श्रीधरपंत :
३३७.
देसाई वसंत शांताराम :
३१७, ३१८.
देसाई हिरामण :
१६५.
दोंडकर अण्णासाहेब :
१५३.
धुमाळ बंडोपंत :
२५७.
नगरकर पंडितराव :
१४८, २०८.
नरेश मास्टर :
१४९, २१८, २१९, २२४.

नाथ माधव :
३.
नाईक बापूराव :
२१९, २७४.
निरंतर विसुभाऊ :
२८६, २८७.
निफाडकर नाथ :
८३, ९१, १००.
निफाडकर शंकरराव :
२८, ६५, ७४, ७९, ८०, १०४.
निफाडकर सदाशिवराव :
८२.
पटवर्धन विनायकराव :
८८, ९५, ९८, २३५.
पटवर्धन विठ्ठलराव :
२८६.
पटवर्धन वि. मा. दि. :
२०९, २२७, २२९.
पटवर्धन माधवराव :
५९, १०६.
पळशीकर बळवंतराव :
१९२.
परांजपे शकुंतला :
१२१.
परांजपे शिवरामपंत :
१२७.
परांजपे नट :
३८, ५६, २२६.
पंडित भगवान :
२१६, २३१, २४६, २५३, २७३.
पंढरपूरकरबुवा :
२२.
पंडित बापूसाहेब :
१७८, १९६.
पंत श्रीयुत व सौ.
२९३.
पाटणकर भा. ल. :
६४, ८२, ८३, १५१, १५६, १७७, १९६, १९७.
पाटणकर (भांडुप) :
१७५, १९२.
पानसे :
२८६, २८७.
पालकर सुलोचना :
१०३, १४८.
पांगे :
२७४.
पांडे बाबुराव :
१०४.
पाध्ये डी. जी.
६५, ७६, ७७, ७८, ७९.
पुरोहित दत्तोपंत :
५, २४, २५, ३१, ३५, १११, ११२, १६०, १६१, १८९.
पुरोहित नाना :
२१, २२, २९, ३०, ३१, ७७.
पुराणिक नाना :
१८५ १८६, २६१.
पुरंदरे डॉक्टर :
१५६.

पेंडसे मामा :
२३५, २५५.
पेंढारकर बापूराव :
५५, ७३, ७६, ७७, ८२, १११, १४२, २७१, ३०८.
पेंढारकर भालचंद्र :
२२८.
पोतनीस दादा :
२८६, २८७.
पोतदार म. म.
२२५, २३३, २४१, २४६, २४७, २५७, २८४, ३०८, ३१७, ३२२.
पोतनीस वामनराव :
४, ५, १०, ११, ३८, ३३७.
पोटे :
७५.
प्रधान त्रिंबकराव :
५, १०, १८०.
प्रभुणे बाबुराव :
२८८, ३०४, ३१३.
प्रभुणे भाऊ :
३१७, ३१९.
फडके ना. सी. :
३३, १४४, १८५.
फडके यशवंतराव :
१४४.
फडके चित्रकला शिक्षक :
२९४.
फणशीकर :
२७.
फाटक न. र. :
२०३, २०४, २७९, २८०, २८१, ३०९, ३१६, ३१७.
फाटक दादा :
२७, ९३, २३८.
फाटक नानासाहेब :
१२, १३, २९, ३७, ३८, ५५, ७७, ११२, १६९, २३४, २३५ ३३७.
फाटक रामभाऊ :
२१२, २१४.
फाटक मधु :
२१२, २१४.
फाटक भाऊ :
२१२, २१३.
फाळके सिनेमा महर्षि :
६५.
बखले :
४.
बनहट्टी श्री. ना.
१६७, १८०, १८१, १८८, १८९, २२१, २२३.
बन्नू (नाटचकला प्रवर्तक)
१७५.
बडोदेकर हिराबाई :
३१७.
बालाजीवाले नानासाहेब :
१७२.

बाबल्या :
२९.
बालगंबर्व :
४, २५, २९, ३२, ३३, ३९, ८५, ८६, ८७, ८८, ९५, ९८.
बालगंधर्व :
९९, १२०, १६६, २१६, २१८, २१९, २२२, २३३, २७५, ३२२.
बापट वसंता :
१०६, १७७, १८०, २४८.
बावडेकर चं. वि. :
११२, १२१, १३०, १६४, १६५, १६६, १८३, २२१, २२७, २५५, २८०,
बुधगांवकर राधाबाई :
२००, २०२.
बोडस गणपतराव :
२५, २९, ३२, ३९, ४०, ८७, ८८, ९२, ९५, १२०, १३६, १३७, १३८, १४३, १७८, १७९, १८३, २१६, २१७, २१८, २२४, २३०, २३३, २३४, ३२२, ३३८.
बोडस ग. कृ. :
१०१.
बोरकर दत्तू :
९, १०, २३.
भट दत्तोपत :
१२४.
भट विन्दा :
८७.
भट मामा :
५, १०.
भडकमकर विसुभाऊ :
११.
भागवत गणपतराव :
१६, १७, १८, १९, २०, ४०, ६२, १८०, ३७७.
भालेराव बापूसाहेब डॉक्टर :
२२, २९, ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३७, ३८, ४३, ४४, ५९, ९७, १३०, १५६, १६३, १६५, १७८. १७९, १८०, १८२, १८३, १९७, १९९, २००, २०३, २०७, २११, २१६, २१७, २१९, २२४, २२७, २३१, २४५, २४७, २७३, २७४, २७६, २७९, २८०, २८१ २८३, २९५, २९९, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०५, ३०६, ३०७, ३२१, ३३८.
भावे विष्णुदास :
२२२.
भावे शिवराम गोविंद :
४५, ४६, ४९, ५०, ५४, ११४, १४४, १४५, १७३, २७२.
भावे वासुदेवराव :
२२२, २२९.
भाऊ तीर्थरूप :
३६, १८५, १९७, २०८, २७८.
भांडारकर :
३२, ९६, २६६, २६७.

भाटवडेकर दाजी :
२७४.
भाटेबुवा :
४, ५३, १४२, १७४, १७५.
भोपटकर ल. ब. :
३४, ५८, १२९.
भोपटकर भाऊसाहेब :
१२९.
भोसले केशवराव :
४, १२०, २७५.
महाबळ प्रभाकर :
१३४, १३५, १५४, १७१, १७२, १७३, १७६, १७७, १७९, १९३, २११, २१२, २३२, २३४, २३५, २३६, २४८, २६१, २६२, २८८, २८९, ३३१.
मसलेकर दादा :
२४०.
मसलेकर रामभाऊ :
२४२.
महाजन पंडित :
११७.
मालवणकर दामुअण्णा :
३, ४, २२८, २२९, २८६.
माडखोलकर भाऊसाहेब :
३३८.
माणिकराव :
१३५.
मास्तर कृष्णराव :
३२, ८६, ८८, ९५.
मांडवगणे बाबूराव :
९.
माटे श्री. म.
१२८, २२०, २२१, २२३, २४०, २४१, २७६.
मोडक विसुभाऊ :
१४४.
रहाळकर वसंतराव :
८२, ११५, १५४, १७७.
राजहंस बापूराव :
११, ८६.
राजेबहाद्दर बाळासाहेब :
१४६, २६२, २६३, २९१.
राव गजानन शामराव :
२९, ३७, ३८, ४४.
रानडे :
३२, ३९, २३३.
रांगणेकर :
३१९, ३२०, ३२५, ३२६, ३२७, ३२८.
रूबेन जेरूशा :
२७६.
लजपतराय लाला :
३३, ३४.
लंके :
२९.

लिमये ओ. बा. :
२, २७.
लिमये पी. एम्. :
६९, ७२.
लोकमान्य टिळक :
३२, ३३, ३४.
लोंढे गंगाधरपंत :
२१६, २१८, २१९, २२४.
वझेबुवा :
२११.
वर्तक (नाटय मन्वन्तर)
११०, १११, ११२, ११३, ११४.
वर्तक अनंत :
१०५, २३३, २७४.
वरेरकर मामा :
६५, १५३, १६०, १६९, १७८, १७९, २२३, २२५, २४१, ३३६.
वर्टी अ. वा. :
७५, १२१, २८६.
विश्वामित्रे मास्तर
३४.
वेलदे रमाकान्त
१९५, १९६, १९९, २०६.
वेलदे राजाभाऊ :
७५, ११७.
वैशंपायन :
२२, ४९, ५१.
वैद्य विद्यार्थी :
७०, ७१, १७७.
शाळीग्राम :
२०, ४८, ५०, ६१, ८०, १२१.
शिरगुप्पीकर अण्णा :
२४८, २४९, २५०.
शिरवाडकर कुसुमाग्रज :
२८३, २८४, ३१३.
शिरोळकर :
२९.
शिवा :
२७४.
शेठ चुनीलाल :
३५, ४३, १३०.
सावकार रघुवीर :
१००, १०१, १०२, १०३.
सावरकर वि. दा.
१२७, १२८, १३७, २२०, २२२, २२३.
साळवीसाहेब :
२९३, २९४.
साळवी मिसेस् :
२९१.
साने गजाननराव :
२८.
सोमण प्रिंसिपल् :
२८६, २८७.
सोहनी गंगाधर :
६५, ७२, ७३, ७५.

सोळुस्कर गोविंदराव :
१४८, १५४.
हडप यशवंतराव :
३१३.
हरदास बाळशास्त्री :
२९१, २९२, ३२२.
हर्डीकर वासुदेवराव :
२४२.
हुदलीकर :
१६६.
क्षीरसागर विष्णुजी :
२८२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम...................... विः ..................
क्रमांक ...... नों. दि:

REFBK-0012353

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 12343
शाखा